म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. क्र.
१९१६

REFBK-0001271

म. ग्रं. सं. ठाणे
१७५

# माझें व्यापक शिक्षण.

डॉ. बुकर टी. वॉशिंग्टन यांचें

## आत्मचरित्र-उत्तरार्ध.

REFBK-0001271

नागेश वासुदेव गुणाजी, बी. ए., एल्‌एल्‌. बी.

इ.चा०
२८७

# डॉ. बुकर टी. वॉशिंग्टन.

( आत्मचरित्र–उत्तरार्ध. )

आत्मोद्धार ग्रंथावलि. नं. २.

# माझें व्यापक शिक्षण.

( डॉ. बुकर टी. वॉशिंग्टन यांचें आत्मचरित्र–उत्तरार्ध. )

" Some of the ways in which a people who are struggling upward may turn disadvantages into opportunities. "

—*Dr. Booker T. Washington.*

लेखक व प्रकाशक:

श्रीयुत नागेश वासुदेव गुणाजी, बी. ए., एल्एल्. बी.

बेळगांव.

प्रथमावृत्ति.

किंमत १–४–०. ] सर्व हक्क स्वाधीन. [ जानेवारी १९१६.

**Printed** at the Manoranjan Press, 1, Girgaon Rd., Bombay,
by Mr. K. R. Mitra,
and
**Published** at Belgaum, by Mr. N. V. Gunaji, B. A., LL. B.
Pleader & Chairman, School-Board, Belgaum Municipality.

डॉ० बुकर टी. वाशिंग्टन.



Booker T. Washington

सुप्रसिद्ध निग्रो पुढारी

महात्मा डॉ. **बुकर टी. वॉशिंग्टन**

यांच्या

शुद्ध, निष्कलंक, उदार व पवित्र आत्म्यास,
त्यांच्या अनुमतानें तयार केलेली
त्यांच्या ग्रंथाची ही मराठी प्रतिकृति
अत्यंत प्रेमभावानें
समर्पण केली आहे.

ना. वा. गुणाजी.

# अनुक्रमणिका.


| | | |
|---|---|---|
| प्रस्तावना. | | पृष्ठ. |
| उपोद्धात. | | |
| प्रकरण १ लें, | मनुष्य आणि वस्तु यांपासून मिळालेलें शिक्षण. | १ |
| ,, २ रें, | विशिष्ट प्रश्नानुरूप संस्थेची उभारणी. | १९ |
| ,, ३ रें, | कांहीं अलौकिक पुरुष. | ४७ |
| ,, ४ थें, | बातमीदार आणि वर्तमानपत्रें यांचा मला आलेला अनुभव. | ७१ |
| ,, ५ वें, | अक्कलवान लोक आणि बोस्टनचें बाजारबुणगें. | ९० |
| ,, ६ वें, | पदवीदानसमारंभांतील कोबीवरील व्याख्यान. | ११४ |
| ,, ७ वें, | कर्नल रुझवेल्ट आणि त्यांच्यापासून मी काय शिकलों? | १४१ |
| ,, ८ वें, | दक्षिणेंतील माझ्या शिक्षणविषयक सफरी. | १६२ |
| ,, ९ वें, | मी निग्रो लोकांपासून काय शिकलों? | १८२ |
| ,, १० वें, | यूरोपांतील उच्चनीचांची भेट. | २१२ |
| ,, ११ वें, | डेनमार्कांतील शिक्षणावरून मिळालेला बोध. | २३३ |
| ,, १२ वें, | निग्रोंच्या शिक्षणांतील चुका आणि त्यांची भावी स्थिती. | २५६ |

# प्रस्तावना.

परमेश्वरकृपेनें डॉ. बुकर टी. वॉशिंग्टन यांच्या आत्मचरित्राचा उत्तरार्ध–'माझें व्यापक शिक्षण' ( My Larger Education ) हा ग्रंथ तयार होऊन वाचकांच्या हातीं पडत आहे, ही मोठ्या आनंदाची गोष्ट आहे. त्यांच्या आत्मचरित्राचा पूर्वार्ध–'आत्मोद्धार'–प्रसिद्ध होऊन दोन वर्षें झालीं. त्याचा चांगला स्वीकार झाल्यामुळें डॉ. वॉशिंग्टनच्या पुढील चरित्राच्या ह्मणजे प्रस्तुत ग्रथाच्या तयारीस आह्मी लागलों आणि तें काम लवकरच संपविलें. पण तें छापून प्रसिद्ध करण्याचा योग मात्र लवकर जुळून आला नाहीं. ही एक ईश्वरी योजनाच होती, असें आतां वाटतें. ग्रंथ तयार होऊन एकदोन वर्षें मुरत पडल्यामुळे त्यांत बऱ्याच सुधारणा करण्यास आह्माला अवसर मिळाला आणि त्यामुळें ग्रंथाची उपयुक्तता अधिक वाढवितां आली. उपोद्धात, प्रत्येक प्रकरणाच्या आरंभीं दिलेला छोटासा उपक्रम वगैरे पाहिलें असतां या विधानाची खात्री पटेल. ग्रंथाचीं पानें अंदाजापेक्षां वरींच वाढल्यामुळें परिशिष्टांत हाम्पटन व टस्कगी संस्थेची हकीकत देण्याचा विचार तहकूब करणें भाग पडलें, याबद्दल थोडेंसें वाईट वाटतें.

हा ग्रंथ तडीस नेण्याच्या कामीं बऱ्याच मित्रांनीं अनेक प्रकारें साहाय्य केलें आहे. या ग्रंथांत जो कांहीं चांगुलपणा असेल, त्याचें सर्व श्रेय त्यांनां आहे. या सर्वांचीं नांवें देऊन शब्दांनीं त्यांचे औपचारिक आभार मानून काम भागेल, असें आह्मांला वाटत नाहीं. त्यांनीं वेळोवेळीं अशीच मदत करून आह्मांस सदैव आपल्या ऋणांत ठेवावें, अशी आमची त्यांनां नम्र विनंति आहे.

या आत्मचरित्राचा उत्तरार्ध–'माझें व्यापक शिक्षण' हा ग्रंथ आम्ही मराठींत प्रसिद्ध करणार आहों, असें डॉ. वॉशिंग्टन यांनां आम्हीं कळविलें होतें. त्यांनीं मोठ्या खुषीनें आपली संमति दिली, इतकेंच नव्हे तर आपल्या प्रकाशकाचीहि परवानगी आणून दिली होती, आणि या ग्रंथाचें कामहि आत्मोद्धाराप्रमाणें चांगलें व लवकर होईल, अशी आशा आपल्या पत्रांत प्रदर्शित केलेली होती. पण आमच्या दुर्दैवानें हा ग्रंथ तयार झालेला पाहण्यास ते आज राहिले नाहींत, याबद्दल आह्मांला दुःख व हळहळ वाटत आहे. त्यांनीं आम्हाला वेळोवेळीं पत्रें

व माहिती पाठवून जें साहाय्य व प्रोत्साहन दिलें, त्यांतून अंशतः तरी उतराई व्हावें म्हणून ही अल्पशी सेवा त्यांच्या आत्म्याला अर्पण केलेली आहे.

आत्मोद्धाराप्रमाणें हाहि ग्रंथ बक्षिस वांटण्यांत येऊन त्याचा विशेष प्रसार व्हावा, अशी आमची इच्छा होती आणि त्याप्रमाणें आम्हीं, मनोरंजनकार श्रीयुत का. र. मित्र यांनां विनंतिहि केली होती. पण प्रोफेसर कर्वे यांचें आत्मवृत्त बक्षीस देण्याचें त्यांनीं आधींच मुकरर करून जाहीर केल्यामुळें त्यांनां आमची विनंति मान्य करितां आली नाहीं. तरी त्यांनीं आपल्या वाढत्या कामाच्या गर्दींत सवड काढून हा ग्रंथ छापून देण्याची शक्य तितकी लवकर व्यवस्था केली, याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहों.

शेवटीं, महाराष्ट्रवाचकांनां ही आमची सेवा पसंत पडल्यास आणि त्यांनीं ती गोड करून घेऊन या ग्रंथाचा चांगला स्वीकार करून आम्हांला योग्य उत्तेजन दिल्यास, हाम्पटन–टस्कगी संस्थांचीं आणखी कांहीं मधुर फळें त्यांनां चाखावयास मिळतील, असें आश्वासन देऊन त्यांची रजा घेतों.

दत्तजयन्ति,
शके १८३७,
बेळगांव.

ना. वा. गुणाजी.

# उपोद्घात.

गुलामगिरींत ज्याचा जन्म झाला, द्रव्यलोभी सावत्रबापाची सहानुभूति नसतां केवळ मातेच्या हार्दिक प्रोत्साहनाच्या धुगधुगीवर आपल्या शिक्षणासाठीं ज्यानें दृढनिश्चयानें महाप्रयास केले, आर्मस्ट्रांग-सारख्या परोपकारैकव्रत महात्म्याच्या हाताखालीं जीवनदायी शिक्षण प्राप्त करून घेण्याचें ज्याला सौभाग्य प्राप्त झालें, व अशा शिक्षणाच्या साहाय्यानें पोरवयांत ज्यानें आपल्या परिस्थितीचें यथातथ्य निदान केलें, आपल्या ज्ञातीचें खरें कल्याण उपयुक्त शिक्षणांतच आहे हें ओळखून तदनुरूप तिच्या उन्नतीचा मार्ग ज्यानें आंखला, एवढेंच नव्हे, तर राजकीय चळवळीच्या कीर्तिपाशाला किंवा दुसऱ्या कोणत्याहि मोहाला बळी न पडतां शिक्षणाच्याच पवित्र पण कष्टसाध्य कार्याला वाहून घेऊन, शून्यांतून सृष्टि निर्माण करणाऱ्या परमेश्वराप्रमाणें आपल्या एकमात्र पौरुषानें—दोन तपांच्या भगीरथ प्रयत्नानें एक आदर्शभूत प्रचंड संस्था ज्यानें स्थापन केली व सर्वांगसुंदर अशा शिक्षणपद्धतीचें जगाला उत्कृष्ट उदाहरण घालून दिलें, लोकछंदानुवर्ती न बनतां केवळ परोपकारबुद्धीनें सतत निष्कामकर्म करीत राहून निग्रोंचें पुढारीपद ज्यानें मिळविलें, आपल्या सामोपचाराच्या संधिकारी धोरणानें व व्याख्यानांनीं अमेरिकेंतील काळ्या—गोऱ्यांमधील अहिनकुल स्वरूपाचा तीव्र द्वेष ज्यानें बऱ्याच अंशीं कमी केला व या सात्त्विक प्रयत्नांमुळें ज्यानें सर्व जगाकडून आपणाला जगांतील एक असामान्य मानव-हितकारी पुरुष ह्मणवून घेतलें व पृथ्वीवरील चारी खंडांत अजरामर कीर्ति मिळविली व जो अगदीं परवांपर्यंत टस्कगी येथील विद्यापीठाचें

आचार्यपद विभूषवीत होता, त्या डॉक्टर बुकर टी. वॉशिंग्टनची ओळख महाराष्ट्रवाचकांनां आज नव्यानें करून द्यावयास नको.

आमचे परम स्नेही रा. नागेशराव गुणाजी यांनीं 'आत्मोद्धार' या पुस्तकाच्या द्वारा तें काम यथायोग्य केलेंच आहे. गुणाजींच्या पुस्तकावरून गुजरातींत व हिंदींत अनुवाद झाले आहेत. हिंदुस्तानांतील पूर्वपश्चिम सीमांवरील सिंधी व बंगाली भाषांतहि या 'आत्मोद्धाराचें' शुभवर्तमान पोहोंचलें आहे. कानडींतहि लौकरच याचा प्रसार व्हावयाचा आहे. सारांश, गेल्या एकदोन वर्षांत वॉशिंग्टनचा पुरुषार्थ व त्याची आत्मोद्धाराची दिशा हिंदुस्तानांतील बहुतेक सर्व प्रांतांतील साक्षर लोकांनां समजली आहे, व त्यामुळें विचारी लोकांच्या कल्पनांत एकच क्रांति होऊन गेली आहे, व परिस्थिति जरा अनुकूल होतांच या विचारक्रांतीचें दृश्यफल लौकरच दृग्गोचर होईल, अशी आशा बाळगण्याला जागा आहे.

अशा स्थितींत या कर्मवीर निग्रो पुढाऱ्याचें पुढचें चरित्र व पाठशालीन शिक्षणक्रम संपल्यानंतर मिळालेल्या जगांतील बहुविध अनुभवात्मक व्यापक शिक्षणाविषयींचे त्याचे विचार समजून घेण्याची उत्कट इच्छा कोणालाहि होणें स्वाभाविक आहे, व ती पुरी करण्याकरितां नागेशराव गुणाजी यांनीं हा उत्तरार्ध प्रसिद्ध केला आहे. या पुस्तकाच्या 'प्रतिपर्व रसावहम्' अशा बारा प्रकरणांचे मथळे आणि प्रत्येक प्रकरणाच्या पूर्वीं जोडलेलें दिग्दर्शन एवढेंच वाचूनहि या पुस्तकांत आलेल्या विषयांचें वैचित्र्य व महत्त्व, विविधता व मनोरंजकता हीं वाचकांच्या नजरेला येतील.

वॉशिंग्टनचें रमणीय व बोधप्रद आत्मचरित्र वाचतांवाचतां समाजशास्त्र व अर्थशास्त्र, शिक्षणशास्त्र व मानसशास्त्र यांचे उपयुक्त सिद्धान्त

आपणाला शिकावयाला मिळतील; व मौज ही, कीं, शास्त्रीय पद्धतीच्या क्लिष्टतेचा येथें गंधहि सांपडणार नाहीं. वॉशिंग्टनची कथा ऐकताऐकतां, समाजाचें खरें हित कशांत असतें, समाजाचे घटक व त्यांमधील बंधनें कोणतीं, समाजाचें सामर्थ्य कसें वाढतें इत्यादि प्रश्नांवर महत्त्वाचा प्रकाश पडेल. वॉशिंग्टनचें वर्तन पाहून समाजांत पुढारीपण कसें येतें, पुढाऱ्याचीं कर्तव्यें कोणतीं व पुढारीपणाचें व्रत कसें पार पाडावें, हें निःसंदेह समजेल.

सुशिक्षित निग्रोंचे कांहीं दोष दाखवितांना स्वतंत्र देशांत सुद्धां लोकसेवकांनीं सरकारी नोकरींत कां शिरूं नये, सरकारी नोकरीच्या मोहांत पडल्यानें आपल्या स्वभावांत व वृत्तींत कसा फेर पडतो, याचें वॉशिंग्टननें केलेलें मार्मिक विवेचन वाचावयास मिळेल. तसेंच अधि-कारीपदारूढ होऊनहि आपलें सत्त्व व दृष्टि अढळ कशी राखावी, याचा आदर्श रुझवेल्टच्या प्रकरणांत दिसून येईल. भिन्न जातींनीं परस्परांशीं कसें वागावें, रूढ समजूती अडूं लागल्या तर तोड कशी काढावी, तेढ असेल तेथें सलोखा कसा उत्पन्न करावा, प्रतिकूल परिस्थितीशीं कसें तोंड द्यावें याचा उत्कृष्ट वस्तुपाठ या निग्रोपासून आपणाला मिळेल. धार्मिक संघ व धर्मोपदेशक यांनां करतां येणारें कार्य, त्यांचें समाजावर असलेलें वजन व त्यांनीं ठेवण्याचें नवीन धोरण यांविषयीं किती तरी महत्त्वाच्या सूचना या ग्रंथांत जागजागीं आपणाला वेचतां येतील.

त्याचप्रमाणें वर्तमानपत्रांचें ध्येय काय असावें, कार्याच्या अनुषंगानें त्यांत कोणते दोष येऊं शकतात, त्यांवर कोणती जबाबदारी असते, वर्तमानपत्रें कशा प्रकारें जनहित साधीत असतात, तसेंच सार्वजनिक कार्य करणारांनीं वर्तमानपत्रें व त्यांचे प्रतिनिधि यांशीं कसें वागावें, याचा वॉशिंग्टननें दाखविलेला—आदर्शवत् घालून दिलेला—कित्ता आपल्या

इकडील नेमस्त व राष्ट्रीय या दोन्ही पक्षांतील जहाल लोकांना उत्तम नेत्रांजनासारखा होईल.

आपण जाऊं तेथें वस्तुस्थितीचें निरीक्षण कोणत्या प्रकारें करावें स्वदेशांत किंवा परदेशांत प्रवास कसा करावा, कोणत्या गोष्टींचें निरीक्षण करावें आणि प्रत्येक गोष्टींतून बोध कसा घ्यावा, मधुकरीवृत्तीनें प्रत्येक मनुष्याचे गुण कसे घ्यावे, थोर विभूतींच्या वागण्याचें किंवा वर्तनाचें एकाद्या ग्रंथाप्रमाणें कसें अध्ययन करावें व परिचित मनुष्यांची अवज्ञा न करितां त्यांचें थोरपण कसें ओळखावें आणि अशा प्रकारें आपले विचार, हेतू व मार्ग दिवसेंदिवस उच्चतर कसे करावे, या प्रश्नांना वॉशिंग्टननें दिलेलें उत्तर प्रत्येक होतकरू तरुणाला मार्गदर्शक होईल.

या सर्व गोष्टी होतीलच. पण या पुस्तकाचा मुख्य विषय शिक्षण हाच आहे. शिक्षण कशाला ह्मणावें, शिक्षणाचा समाजावर काय परिणाम होतो, शिक्षणपद्धतींत बदल केल्यानें समाजाच्या ध्येयांत व सामर्थ्यांत किंबहुना समाजव्यवस्थेंत कशी क्रांति घडवून आणतां येते, शिक्षणक्षेत्राची व्याप्ति किती आहे हें सर्व, हा ग्रंथ चांगल्या प्रकारानें शिकवील. तसेंच शिक्षणविषयक भ्रामक कल्पनांनीं व सदोष योजनांनीं होणारें नुकसान, कृत्रिम शिक्षणानें विद्यार्थ्यांचें होणारें मातेरें, भिन्नभिन्न शिक्षणसंस्थांत असणाऱ्या चुरशीनें होणारा सामाजिक शक्तीचा अपव्यय, श्रमविभाग न केल्यानें कामाचा आटप न राहून होणारा घोटाळा, विघातक चळवळींची विफलता इत्यादि बाबींचें वेळींच इषारा देणारें बोधप्रद चित्र येथें रेखाटलेलें आहे. सारांश, जगांत कसें वागावें व काय शिकावें, काय करावें व काय शिकवावें, स्वतःचें व स्वतःच्या जातीचें, इतरांचें व सर्वांचें आत्यंतिक कल्याण कसें साधावें, या गोष्टी

हा ग्रंथ दाखवून देईल. याहून अधिक तें काय पाहिजे ? याच गोष्टी आज आपल्या समाजाला हव्या आहेत. हेच प्रश्न आज आपल्यासमोर उभे आहेत, व हेच प्रश्न बरोबर सोडविण्यावर आपली भावी उन्नति अवलंबून आहे.

आपल्या जातीच्या प्रगतीचा मार्ग आंखतांना व तद्विषयक पुस्तकें लिहितांना वॉशिंग्टननीं गोऱ्यांच्या पाश्चात्य संस्कृतीमध्यें मुख्य व महत्त्वाच्या गोष्टी कोणत्या आहेत, हें सहजासहजीं सांगितलें आहे; व यामुळें त्यांच्या पुस्तकांनां एक प्रकारचें विशेष महत्त्व आलें आहे. सुधारणेचें माहेरघर बनलेल्या अमेरिकेंत राहून सुधारणेच्या बाबतींत तीन चार शतकें मागें असलेल्या जातीचें पुढारीपण पत्करल्यामुळें वॉशिंग्टनला हा अभ्यास करावाच लागला. आपणहि पाश्चात्यांच्या सद्गुणांचें अनुकरण करूं इच्छीत आहोंत, म्हणूनच वॉशिंग्टनचे विचार आपणांला इतके उपयुक्त आहेत.

यास्तव आपणांला या पुस्तकांतील प्रत्येक विषयाचें मननपूर्वक परिशीलन केलें पाहिजे, आणि वॉशिंग्टन व त्यांचे गुरु आर्मस्ट्रांग यांनीं आंखलेल्या मार्गाचें ( आपल्या परिस्थितीला साधेल व ध्येयाला जुळेल असा फेरफार करून ) निश्चयानें अवलंबन करून आपल्या उत्कर्षासाठीं झटलें पाहिजे.

[ २ ]

भोजन तयार करण्याचे दोन भाग असतात. प्रथम शिधासामग्री मिळवून ती निवडून धुवून बेताच्या पाण्यांत घालून चुलीवर चढवणें, हा पहिला भाग होय. यांत खटपट बरीच असते व व्यापारवैचित्र्यहि असतें. दुसऱ्या भागांत अग्नीची आंच देऊन, शिजत ठेविलेल्या वस्तूंच्या परमाणूंत फरक करून ते भोजनाला उपयुक्त—पक्व अथवा

सिद्ध बनविणें याचा अन्तर्भाव होतो. पण ही सर्व क्रिया भांड्याच्या आंतच चालते. बाहेरून दिसत नाहीं. बाहेर फक्त सूं—असा एकश्रुति आवाज ऐकूं येतो. पण भोजन सिद्ध होण्याच्या कामीं ही दुसरी आंतरक्रियाच अधिक महत्त्वाची असते.

वॉशिंग्टनच्या चरित्राचेहि असेच दोन भाग पडतात. पहिला भाग आत्मोद्धार या पुस्तकांत आला आहे. तेथें अनेक अडचणी, अश्रांत श्रम, सतत प्रयत्न वगैरेंची रेलचेल आहे. बाह्य खटपटी यथेच्छ असून त्या चित्तवेधक आहेत. या पुस्तकांत त्यांच्या चरित्राचा उत्तरार्ध आला आहे. कींव करण्याजोग्या परिस्थितींतहि त्यानें स्वपराक्रमानें शिक्षण मिळवून तेंच शिक्षण आपल्यासारख्या हजारों तरुणांनां देण्याची सोय केली व त्यायोगें स्वतःचें व स्वतःच्या संस्थेचें नांव वर काढलें, इतकी गोष्ट पूर्वार्धांत येऊन गेली. पूर्वतयारी संपली. कामाचा वेत वसला. आतां पुढें प्राप्त साधनांनीं परिस्थितींत पालट करण्याकरितां आपल्या प्रयत्न-सातत्याची आंच लावून निग्रो जातीच्या भाग्यांत जें रासायनिक परि-वर्तन त्यांनीं घडवून आणलें, त्याची कथा या भागांत पहावयाची आहे. अर्थात् बाहेरच्या हकीकती व चटकदार घडामोडी यांत फारशा नसा-वयाच्याच. येथें सामाजिक योगक्षेमाचे गूढ सिद्धांत व त्यांचा व्यापार पहावयास मिळणार. वॉशिंग्टनच्या चरित्राचें हें आंतरचित्र आहे, व तें चटकदार नसलें म्हणून कमी बोधप्रद किंवा कमी मनोरंजक मात्र खास नाहीं.

अटलांटाप्रदर्शनांतील वॉशिंग्टनच्या सुप्रसिद्ध भाषणापासून त्याच्या आयुष्याला नवें वळण लागलें, व त्याची कामगिरी अधिक व्यापक झाली. त्याच सालीं (१८९५) निग्रोंनां स्वातंत्र्य मिळविण्याच्या कामीं आटोकाट प्रयत्न करणारा निग्रो पुढारी फ्रेडरिक डगलस मरण

पावला, आणि पुढारीपणाचीं वस्त्रें ओघानेंच वॉशिंग्टनच्या खांद्या-वर आलीं. डगलसचीं मतें व मार्ग जुन्या प्रकारचे होते. नव्या परि-स्थितीला नवें धोरण व नवीं माणसें हवीं होतीं, आणि तें धोरण व ती धुरीणता वॉशिंग्टननीं भरून काढली. त्यांचें धोरण त्यांच्याच शब्दांनीं सांगतां येईल. प्रस्तुत ग्रंथांत ते ह्मणतात:—

"लाखों निग्रोंनां त्यांची दैना व त्यांचे राजकीय हक्क यांची नुसती आठवण करून देण्याहून कांहीं अधिक हवें आहे. (पान ९५). यापुढें आपणाला विघातक काम सोडून विधायक काम केलें पाहिजे. संरक्षक धोरण सोडून प्रागतिक (पुढें घुसण्याचें) धोरण ठेवलें पाहिजे, *वैरभाव ठेवणें व जरा बेतली ह्मणजे शरण जाणें असा प्रकार न करतां* सलोखा व प्रगति हीं घडवून आणलीं पाहिजेत. (पान ९६).

"निग्रो ज्ञातीशीं होणाऱ्या *माझ्या व्यवहारांत मला असें आढळून* आलें आहे, कीं, लोकांनां एकत्र करण्याचा एकच मार्ग ह्मटला ह्मणजे विधायक व प्रागतिक कार्यक्रम हातीं घेणें, हाच होय. वादविवाद, टीका किंवा द्वेष यांनीं नव्हे, तर विधायक कामानेंच लोक वश होतात आणि एकाद्या सार्वजनिक कार्याच्या मदतीसाठीं एकत्र जमतात." (पान १११). हें धोरण त्यांनीं आज वीस वर्षें अबाधित एकसारखें चिकाटीनें चालविलें होतें.

१८९९ सालीं व त्यानंतर त्यांनां एम्. ए.ची व एल्‌एल्. डी. ची उपाधि मिळाली. ही उपाधि ह्मणजे गोऱ्या विद्वानांकडून निग्रोमध्यें ज्ञानार्जनक्षमता असल्याची कबूली तर आहेच; पण एका अर्थीं अमे-रिकेंतील दोन उत्कृष्ट विश्वविद्यालयांनीं आर्मस्ट्रांगप्रणीत नवीन शिक्षण-पद्धति मान्य करून तिचा गौरव करण्यासारखेंच होय. या पदव्यांनीं बौद्धिक शिक्षणवाद्यांनीं औद्योगिक शिक्षणानेंहि मनुष्य सुसंस्कृत होऊं शकतो, हें मान्य करण्यासारखें झालें.

पुढारीपण प्राप्त झाल्यानंतरचीं वॉशिंग्टनच्या आयुष्यांतील हीं शेवटचीं वीस वर्षें, टस्कगी येथील विद्यालयाची सुधारणा करण्यांत, तेथें नवीन धंदे सुरू करण्यांत, विद्यालयाच्या वाढत्या खर्चाची तोंडमिळवणी करण्याकरितां समाजाकडून पैसे मिळविण्यांत, टस्कगी येथील शिक्षणपद्धति सर्वत्र जारी करण्याच्या प्रयत्नांत, इतर शिक्षणसंस्थांची पाहणी करून त्यांच्या चुका व त्या सुधारण्याचे मार्ग दाखविण्यांत, नीग्रो व्यापारी, कारखानदार व शेतकरी यांचे संघ बनविण्यांत, आपले मित्र रुझवेल्ट यांनां निग्रोसंबंधींचें सरकारी धोरण ठरवितांना वेळोवेळीं सल्ला देण्यांत, निग्रोच्या स्थितीशीं इतर निकृष्ट समाजाची तुलना करून आपल्या उन्नतीचे नवीन मार्ग शोधण्याकरितां यूरोपच्या सफरी करण्यांत, स्वज्ञातीय व गोरे यांच्यामध्यें सलोखा उत्पन्न करून स्वज्ञातीयांनां पुढें आणण्याच्या हेतूनें दक्षिणी व उत्तरेकडील संस्थानांत व्याख्यानें देत फिरण्यांत आणि इतकें सर्व करून फावल्या वेळीं 'आत्मचरित्र,' 'निग्रोचा इतिहास,' 'डगलसचें चरित्र,' 'हातकाम,' 'यूरोपियन समाजांतील निकृष्ट वर्ग' इत्यादि अनेक उपयुक्त ग्रंथ लिहिण्यांत खर्च झालीं आहेत. सारांश, एकच कार्याला वाहून घेऊनहि तें कार्य सांगोपांग पुरें करण्यांत एका आयुष्याला किती भरपूर कामगिरी असते, याचें त्यांनीं उदाहरण घालून दाखविलें आहे. कारण, शिक्षणपद्धति जीवनदायी असेल तर ती जीवनव्यापी झालीच पाहिजे.*

---

* टस्कगीची शिक्षणपद्धति कशी जीवनव्यापी आहे, हें पहावयाचें असल्यास व शिक्षणाच्या संजीवनीनें समाजाची कशी कायापालट होते हें ओळखावयाचें असल्यास सहाव्या प्रकरणांतील 'उगवता तारा'या वसाहतीची हकीकत वाचावी; आणि त्याहिपेक्षां वॉशिंग्टन व त्यांचे सेक्रेटरी स्कॉट यांनीं लिहलेला 'Tuskegee & its people' हा ग्रंथ जरूर पहावा. या पुस्तकांत टस्कगीच्या विद्यार्थ्यांपैकीं कांहींजणांनीं आपलीं आत्मचरित्रें दिलीं आहेत.

आपलें सर्व आयुष्य व सर्व शक्ति आपल्या अंगीकृत कार्यालाच मिळावी ह्मणून ते फ्रीमेसनसारख्या परोपकारी संस्थानांहि मिळाले नव्हते. अनेक औद्योगिक योजनांतील शेअर फुकट मिळत असूनहि त्यांनीं ते याच उद्देशानें नाकारले. आपलें कार्य आहे त्याहून आकुंचित अथवा अधिक व्यापक त्यांनां करावयाचें नव्हतें. याकरितांच ते सरकारशीं संबंध ठेऊं इच्छित नसत, किंबहुना तसा प्रसंग ते काळजीपूर्वक टाळीत. मात्र कांहीं वर्षांपूर्वीं अमेरिकन सरकारतर्फे आफ्रिकेंतील लायबेरिया प्रांतांत कमिशनर ह्मणून जाण्याबद्दल जेव्हां राष्ट्राध्यक्ष टॅफ्ट यांनीं त्यांनां खास विनंति केली, तेव्हां नाखुशीनें पण कर्तव्यबुद्धीनें त्यांनीं ती मान्य केली होती. कारण, तेणेंकरून आफ्रिकेंतील निग्रोंचें कल्याण करतां आलें असतें. पण पुढें वॉशिंग्टन यांचे चिटणीस स्कॉट यांनां पाठविण्याचें ठरून वॉशिंग्टनचें राजसेवा न करण्याचें व्रत पार पडूं शकलें.

रुझवेल्टनें जेव्हां यांनां कांहीं सल्ला विचारण्याकरितां बोलावलें, तेव्हांहि त्यांनां अशीच शंका वाटली. पण अखेर त्यांनीं भेटण्याचें ठरवलें. या प्रसंगीं एक मौज घडली. रुझवेल्टनीं आपल्या सोयीकरितां वॉशिंग्टननां जेवण्याच्या वेळींच बोलावलें, व दोघांनीं जेवतांजेवतांच बोलून घेतलें. परंतु गोरा राष्ट्राध्यक्ष काळ्यास पंक्तीला घेऊन जेवला, याबद्दल मोठेंच ग्रामण्य माजलें व दोघांवर बरीच आग पाखडण्यांत आली. पण दोघांनींहि सर्वार्थसाधक मौनच स्वीकारलें. त्यामुळें सर्व वाद आपोआप मिटला. आधीं सहभोजन करून मग बभ्रा होतांच प्रायश्चित्त घेणारांनीं ही हकीकत ध्यानांत धरण्याजोगी आहे.

वॉशिंग्टनचें धोरण मवाळपणाचें वाटून बोस्टनमधील कांहीं पंडितंमन्य लोकांनीं एकदा यांच्या व्याख्यानांत यांची दुर्यो करण्याची खटपट

केली. पण यांच्या सात्त्विक वृत्तीमुळें लोकांची यांच्याविषयीं सहानुभूति उलट अधिकच वाढली. येथेंहि यांनीं आपलें मौनच स्वीकारलें होतें*.

वॉशिंग्टनचें धोरण, रिव्ह्यू आफ रिव्ह्यूजचे सुप्रसिद्ध संपादक स्टेड यांनां सुद्धां मवाळपणाचेंच वाटे. त्यांनीं चारपांच वर्षांपूर्वीं आपल्या मासिकाच्या कुठल्याशा एका अंकांत वॉशिंग्टनसंबंधानें लिहितांना खालीलप्रमाणें उद्गार काढल्याचें प्रस्तुत लेखकाला स्मरतें:—“ आपल्या संस्थेला उत्तरेच्या धनिक गोऱ्यांकडून पैसे मिळविण्यासाठीं हे मवाळ डॉक्टर गोऱ्यांकडून होणाऱ्या ‘लिंचिंग’सारख्या गुन्ह्याकडेहि डोळेझांक करीत असावेत. कारण, ते वर्णन करतात तितकी निग्रोंची स्थिति उत्तम नाहीं. ‘लिंचिंग’ वाढत्या प्रमाणावर आहे.”

वॉशिंग्टनचें धोरण परिस्थितीला धरूनच असे. निग्रोंनां गोऱ्यां-बरोबरच नांदावयाचें आहे, व त्यांनां कायद्यानें तरी निदान सर्व समान हक्क मिळाले आहेत. आतां फक्त जातीजातींतील वितुष्ट काढून टाकिलें पाहिजे, आणि भगवान बुद्धांनीं ह्मटल्याप्रमाणें, द्वेषानें द्वेष विझत नसून प्रेमानेंच तो विझवला पाहिजे.

हिंदुस्तानांत ज्याप्रमाणें बऱ्याच जाती परस्परांच्या रूढ सामाजिक समजुतींनां जपून, समानहिताच्या बाबतींत बऱ्याच अंशीं गुण्यागोविं-दानें वागतात, तसाच संबंध गोऱ्यांशीं ठेवण्याचें वॉशिंग्टनचें धोरण होतें, व सार्वजनिक कामांत, अथवा निवडणुकीच्या वेळीं मत देतांना जातीचा विचार न करतां फक्त आपल्या परगण्याच्या व संस्थानच्या हिताहिताचा विचार करावयाचा, असें त्यांचें वर्तन असे. सर्व समाजाचें हित तेंच व त्यांतच आपलें हित असतें, हें त्याचें तत्त्व असे.

---

* ‘ क्षान्त्यैवाक्षेपरुक्षाक्षरमुखरमुखान्दुर्मुखान्दूषयन्तः’—भर्तृहरि.

सांप्रतच्या महायुद्धासंबंधानें लिहितांना त्यांनीं असे उद्गार काढले होते, कीं, "दुसऱ्यांनां पायांखालीं घालून आपली उन्नति करून घेणें हीच जर सुधारणा असेल तर मला सुधारलेला ह्मणवून घेण्यापेक्षां रानटी ह्मणवून घेतलेलें पुरवलें. दुसऱ्यांनां दास बनविण्याची राक्षसी महत्त्वाकांक्षा ज्या जातीनें कधींहि मनांत बाळगिली नाहीं, अशा जातींत जन्मल्याबद्दल मला अभिमानच वाटतो."

वॉशिंग्टननीं एकंदर तीनदां यूरोपच्या सफरी केल्या. शेवटच्या सफरींत निग्रोंच्या स्थितीशीं ज्याचें बरेंच साम्य आहे,अशा यूरोपांतील निकृष्ट वर्गाचें निरीक्षण त्यांनीं केलें. इंग्लंडमधील मजूरदारवर्ग धनिक लोकांवर पूर्णपणें अवलंबून आहे, हें त्यांनां फारसें श्लाघ्य वाटलें नाहींसें दिसतें. कृषि हें राष्ट्राचें जीवन आहे व ती ज्या मानानें सुधारेल त्या मानानें राष्ट्राचें सामर्थ्य अधिक, हा त्यांचा सिद्धान्त आहे. डेनमार्क व जर्मनी येथील कृषीची प्रगति त्यांनां संतोषकारक वाटली.

नवीन कृपिशास्त्रांत व सामान्य शिक्षणांत मागसलेल्या इटली व ऑस्ट्रिया–हंगेरी येथून बरेचसे शेतकरी मजूर बनून अमेरिकेंत जातात, असें त्यांनीं नमूद केलें आहे. हिंदुस्तान देश कृषिप्रधान आहे; तरी पण आमच्या पुढाऱ्यांनां नवीन सुधारलेल्या कृषीची महती अजून पटली नाहीं, हें खरोखरच दुर्दैव आहे. डेनमार्कची शिक्षणपद्धति व आर्थिक स्थिति वॉशिंग्टननां फारच आवडली. त्याविषयीं ते आपल्या एका पुस्तकांत लिहितात. 'डेनमार्कमधील मुलांइतकीं निरोगी, सशक्त व आनंदी मुलें इतरत्र मीं पाहिलीं नाहींत. डेनमार्कची शेती उत्तम आहे, हें मला कबूल आहे; पण तेथील उत्तमोत्तम पीक ह्मणजे मुलांचेंच, असें मला ह्मटलें पाहिजे.'

डेनमार्कच्या राजाराणींनां वॉशिंग्टनचें कार्य फार महत्त्वाचें वाटलें. यूरोपच्या सफरींत यूरोपांतील प्रमुखप्रमुख लोकांकडून वॉशिंग्टनचा उत्तम पाहुणचार झाला. नीचातिनीच स्थितींत जन्मून दोन्ही खंडांतील प्रमुख पुढाऱ्यांच्या बरोबरीचें स्थान प्राप्त करून घेणें हा केवढा पुरुषार्थ ! आईनें चोरून आणलेल्या रताळ्यावर अथवा गुरांच्या आंबोणांतील मक्यावर भूक निववणारा बुकर इंग्लंड, डेनमार्क अथवा अमेरिका या देशांतील राष्ट्रपति व मुकुटधारी व्यक्तींच्या पंक्तींत सन्मान्य पाहुणा बनला हें केवढें भाग्य !

[ ३ ]

आर्मस्ट्रांग व वॉशिंग्टन यांनीं अंमलांत आणलेली शिक्षणपद्धति बरीच व्यापक आहे. या पद्धतीनें नुसत्या जातीय उन्नतीचा प्रश्न सुटतो, असें नसून मानवी जीवनाचा मोठा प्रश्न सुटतो आहे. "प्रजा-तंत्र राज्यांत नुकतेच स्वातंत्र्याचे हक्क मिळालेल्या अशा एका मागस-लेल्या जातीला नागरिकपदाला योग्य बनविण्याकरितां" जरी ही पद्धति सुरू केली गेली, तरी वस्तुतः कोणाहि मनुष्याला आपलें मानवी जीवन पूर्ण करण्यास व सामान्यतः येणाऱ्या कोणत्याहि परि-स्थितीला तोंड देण्यास पुरेशी शक्ति आणण्यास हें शिक्षण पुरें आहे. या शिक्षणक्रमानें मनुष्यांतील सर्व शक्तींचा विकास होतो.

मानवी जीवन काय आहे, याची खरी ओळख पटलेल्या लोकांनीं ही घालून दिली आहे, म्हणूनच जीवनाचें अध्ययन कसें करावें, व संसारांतील प्रत्येक गोष्टीकडे कोणत्या दिशेनें पहावें, याची किल्लीच या पद्धतीनें विद्यार्थ्यांच्या हातीं दिली जाते. येथें विद्यार्थ्यांनां परप्रत्ययावर पोसलें जात नाहीं. उष्टे विचार शिकविले जात नाहींत. वस्तुस्थितीचें निरीक्षण करावयास शिकवून स्वतःचे विचार व मतें स्वतःच्या अनु-

भवावरून ठरविण्यास येथें प्रोत्साहन मिळतें. शास्त्रें व त्यांतील सिद्धान्त डोक्यांत न कोंबतां शास्त्रीय पद्धतीनें विचार व निरीक्षण करावयास शिकवून स्वतःच शास्त्रें बनविण्यास येथें शिकवितात. यामुळें येथील विद्यार्थ्यांत ज्ञात्याचा आत्मविश्वास व अधिकारयुक्त निश्चितता हीं दिसून येतात.

प्रत्यक्ष करून शिकणें हें येथील व्रत आहे, आणि ज्याला त्याला त्याच्या त्याच्या योग्य मार्गांत व दिशेंत प्रवीण करणें, प्रत्येकाच्या स्वभाववैशिष्ट्याचा व विशिष्ट शक्तीचा विकास होऊं देणें हें ध्येय आहे. प्रत्येकाला आपल्या उमेदीनुरूप शक्य तितकें वाढण्याला वाव ठेवला आहे. 'पिण्डे पिण्डे शक्तिर्भिन्ना' माणसामाणसांमध्यें फेर असतो, हें तत्त्व येथें मान्य केलें जातें व ह्मणून अभिरुचीला वाटेल तसें शिक्षण घेण्याची मुभा विद्यार्थ्यांनां ठेविली आहे. ह्मणूनच या संस्थांमधून ( १ ) सर्वांस सर्वसामान्य प्राथमिक शिक्षण,(२)बहुतेकांस औद्योगिक धंदेशिक्षण आणि ( ३ ) समाजांत शिक्षक व नेते बनण्याची पात्रता असलेल्या शेलक्या तरुणांनां उच्च शिक्षण देण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे. परंतु प्रत्येकाला कर्मेंद्रियांचें अनुशीलन हें केलेंच पाहिजे, कारण कर्मांच्या द्वाराच चारित्र्य ( सत्त्व ) संगटन होतें, हा या पंथाचा मूलभूत सिद्धांत आहे. प्रख्यात कादंबरीकार व कवि स्कॉट यानें ह्मटल्याप्रमाणें ' उद्योग हा जगण्याचा परवानाच आहे ,' अशी या लोकांची दृढ श्रद्धा आहे.

धंदेशिक्षण श्रेष्ठ का उदार ( सामान्य ) शिक्षण श्रेष्ठ ? असा वाद निग्रो लोकांत बरींच वर्षें चालला आहे. या संस्थांनीं या वादाचा कायमचा निकाल लावला आहे. नुसत्या उदार शिक्षणापेक्षां धंदेशिक्षणच व्यवस्थित व शास्त्रीय पद्धतीनें देऊन उदारशिक्षणाचें कार्य करणें व कर्मानें सत्त्ववृद्धि करणें हेंच सर्वतोपरी इष्ट आहे, असें यांनीं ठर-

विलें आहे. नुसतें ठरविलें नाहीं, तर सिद्ध केलें आहे. उदार शिक्षण यांनां नको असें नाहीं. पण सेवेची योग्यता, उद्योगाची प्रतिष्ठा आणि श्रमाची आवश्यकता या सिद्धान्ताच्या पायावर जें उदार शिक्षण उभारलें नाहीं, तें वाळवंटावर बांधलेल्या इमारतीसारखें होय, असें यांचें ह्मणणें आहे. विद्यार्थ्यांनां अन्नूनें आपला चरितार्थ चालवितां यावा एवढ्याच-करितां येथें धंदे शिकविले जात नसून या धंदेशिक्षणानें विद्यार्थ्यांचीं मनें व आचार सुसंस्कृत व्हावे, हाच मुख्य उद्देश आहे. सांपत्तिक स्वातंत्र्यानें बाणा देखील स्वतंत्र बनतो आणि मिळून श्रम करण्याची संवय झाली ह्मणजे समाजकार्यांतहि सहकारिता उत्पन्न होते.

या सर्व गोष्टींचा विचार करून शिक्षणक्रम आयुष्यांतील असाधारण व अपवादात्मक गोष्टींवरून न रचतां, नेहमींच्या सामान्य गोष्टी व गरजा यांनां धरून ठरविला आहे. जनतेला आपल्या पांडित्यानें दिपवून सोडणें हा उद्देश नसून, ज्या समाजांत आपण राहतों त्याला शक्य तितकें अधिक उपयोगी पडणें हा आहे. याचसाठीं, अन्नवस्त्र व आसरा मिळवून देणारे धंदे प्रथम व सर्वांनां शिकविले जातात. यामुळें विद्यार्थी संसारांतील कोणत्याहि अडचणीला व प्रसंगाला तोंड देऊं शकतो. जीवित व शिक्षण यांचा या प्रकारें उत्तम मेळ घातला आहे; प्रत्येक गोष्ट वाकबगार कारागिराच्या देखरेखीखालीं विद्यार्थ्यांच्या हातून करवून घेऊन त्याला शिकविली जाते. अशा रीतीनें शिकल्यानें विद्यार्थ्याला आपल्या विषयाची खडानूखडा माहिती होते व जेव्हां तो आपल्या विषयासंबंधानें बोलतो किंवा लिहितो तेव्हां त्याला मोघम अथवा अस्पष्ट विधानें करण्याचा प्रसंग येत नाहीं. निबंधाचे विषयहि याच माहितीविषयीं असतात. त्यामुळें कोणत्याहि विषयाचें आपलें ज्ञान

परिपूर्ण व स्पष्ट आहे असें दाखविण्याची त्याला संधि मिळते, व आपला विषय विशद करतांनां तो सर्वांनां सहज समजेल असा मांडावा लागतो, कारण तो निबंध ऐकणारे अथवा वाचणारेहि व्यवहारचतुरच असतात. या सर्वांचा परिणाम असा होतो, कीं, विद्यार्थ्यांची लेखनशैली विशद, अल्पाक्षर व खोंचदार होते व त्यांचा स्वभावहि तसाच दिलदार व बाणेदार बनतो. यामुळें त्यांनां आपल्या धंद्यांत यश मिळतें व समाजांत मान मिळतो. कल्पना स्पष्ट नसणें हा आजकालच्या शिक्षणाचा एक मुख्य दोष आहे आणि निग्रोंपैकीं स्वतःला अक्कलवान समजणारे लोकहि याच प्रकारच्या पोकळ शिक्षणांतून निघालेले होते. या अक्कलवान लोकांजवळ सिद्धान्त हवे तितके तयार असतात, पण ते परिस्थितीला कसे लागू करावे, एवढेंच त्यांनां कळत नसतें. तरी पण आपल्या पांडित्याचा त्यांनां डौल केवढा! पोकळ सामान्य सिद्धान्ताची त्यांच्याजवळ रेलचेल असावयाची. ज्या धंद्यांत ते स्वतः यश मिळवूं शकत नाहींत तोच दुसऱ्यांनां शिकविण्याची यांची तयारी! टस्कगी अथवा हाम्पटन येथील विद्यार्थी असे नसतात. ते जगांतील प्रत्येक गोष्ट करूनच पाहतात. त्यामुळें त्यांनां प्रत्येक गोष्टीचा कोनाकोपरा पुरा माहित असतो. स्वातंत्र्याच्या जाहिरनाम्याचीं कलमें अथवा मानवी हक्कांचें विवेचन त्यांनां तोंडपाठ येत नसलें, तरी जगांत यश मिळवून नांवारूपास कसें यावें हें तत्त्वज्ञान त्यांनां चांगलें अवगत असतें. असा विद्यार्थी कोठेंहि गेला तरी तो इतरांतहि तशीच स्फूर्ति उत्पन्न करतो व त्यांनांहि यशाचा मार्ग दाखवितो. या विद्यार्थ्यांची उल्हासवृत्ति 'सांसर्गिक' असते, व याचमुळें या शाला इतक्या झपाट्यानें समाजांत क्रांति करूं शकल्या आहेत.

जेथेंजेथें हे विद्यार्थी जातात, तेथेंतेथें ते लोकांच्या उपयोगीं पडतात, गलिच्छपणा नाहींसा करतात, टापटिप शिकवितात, व आपलें काम कसें उत्तम करावें, याचा वस्तुपाठ घालून देतात.

याच उद्देशानें वॉशिंग्टननीं 'प्रसाराचें' काम सुरू केलें आहे. शाळेचें ध्येय व मार्ग सर्व समाजांत रुजविण्यासाठीं खेडोखेडीं लहानलहान शाळा स्थापल्या आहेत व तेथें आपल्या विद्यार्थ्यांनां "शेतकरी—शिक्षक" ह्मणून पाठविलें आहे. हे शिक्षक हंगामाच्या दिवसांत शेतकी करतात व रिकाम्या मोसमांत शाळा चालवितात. यामुळें ते लहान मुलांनां व त्यांच्या आईबापांनां दोघांनांहि शिक्षण देऊं शकतात. मोठ्या लोकांनां यांच्याकडून शेतकीच्या सुधारलेल्या पद्धति व कृति समजतात. असल्या शेतकरी—शिक्षकाच्या साहाय्यानें कापसाच्या एका ताटावर दोन बोंडांच्या जागीं चौदा बोंडें तयार करणाऱ्या जेम्स-हिलची हकीकत ( प्रकरण तिसरें, पान ६२ पहा ) याचें प्रत्यंतर होय. हा शिक्षक पहिल्याप्रथम आपल्या ताब्यांतील मुलांनां घरचीं कामें उत्तम तऱ्हेनें करावयाला शिकवितो. त्यामुळें पालकांनां त्याची शाळा फार आवडते व त्याचा बस बसतो.

या शाळांचें फळ फारच उत्कृष्ट येतें. जेथें जेथें अशी शाळा स्थापण्यांत येते तेथें तेथें लोकांची सांपत्तिक स्थिति सुधारते. जमिनीला दर येतो. गुन्हे कमी होतात. पेढ्या स्थापल्या जातात. शेतकऱ्यांनां कोणाचें देणें न राहून चार पैसे गांठीं राहतात. पाद्र्यावर देखील परिणाम होतो. आपल्या उपदेशांत दार्शनिक काथ्याकूट न भरतां ऐहिक सुखशांति कशी मिळवावी, याचा तो ऊहापोह करतो, व सार्वजनिक जीवनांत चैतन्य स्फुरूं लागतें. लोकांची राहणी बदलून ते अधिक उद्योगी होतात. सांपत्तिक स्थिति सुधारली ह्मणजे

सामाजिक दर्जा पण वाढतो. कुशल कारागीर बनल्यानें गोऱ्यांनां तो हवासा वाटूं लागतो आणि साहजिकपणें जातिभेदाची तेढ सैल होते.

'प्रसारा'ची आणखी एक पद्धति वॉशिंग्टननें अमलांत आणली. जेव्हां प्रथम त्यानें टस्कगी येथें शाळा उघडली, तेव्हां सर्व समाज त्याच्या औद्योगिक शिक्षणपद्धतीच्या विरुद्ध होता. ह्मणून त्यानें गांवोगांव व घरोघर जाऊन लोकांची समजूत घातली व त्यांचीं मनें वळविलीं. यामुळें परिस्थितीचें निरीक्षणहि उत्तम झालें. पुढें शाळेचें काम जसजसें वाढलें, तसतसे त्याचे प्रवास पण वाढले व शेवटीं त्यांनां शिक्षणविषयक मोहिमीचें स्वरूप प्राप्त झालें. अगदीं मरेपर्यंत वॉशिंग्टनच्या या मोहिमी चालू असत व यांमध्यें आपल्या समाजांतील लोकांस त्यांचें हित सांगणें, त्यांच्या प्रगतीचें निरीक्षण करणें आणि शक्य तेथें काळ्यागोऱ्यांत सलोखा घडवून आणणें हीं कामें तो करी.

याखेरीज औद्योगिक संघ, शेतकऱ्यांची सभा (परिषद) वगैरे स्थापून वॉशिंग्टननीं आपल्या टस्कगी संस्थेच्या मूळ ध्येयाचा विस्तार केला आहे. सर्व धंदेवाले व निग्रो शेतकरी एकत्र झाल्यानें त्यांची संघशक्ति वाढली आहे, व मोठमोठीं कामें ते करूं शकत आहेत. टस्कगी संस्थेच्या उद्देशांतच वॉशिंग्टननीं लिहिलें आहे:—"टस्कगी संस्थेचा उद्देश निग्रो जातीपैकीं कांहीं तरुणांनां अत्यंत व्यवहार्य व सर्वांगसुंदर शिक्षण देणें एवढाच नसून हींतून निघणाऱ्या हजारों विद्यार्थ्यांनां शाळेच्या मार्फत सूत्रबद्ध करून अनेक ठिकाणीं व अनेक प्रकारें स्वतंत्रपणें पण एकाच ध्येयधोरणानें स्वज्ञातीची आर्थिक, मानसिक व आध्यात्मिक उन्नति साधणारी अशी एक सेना उभारावयाची हा आहे." या उद्देशानुरूप टस्कगीनें आजपर्यंत सुमारें १५,००० विद्यार्थी तयार केले आहेत. ते सर्व संस्थानांत पसरले आहेत; सर्व

धंद्यांत आहेत. त्यांनीं टस्कगीच्या धर्तीवर तेवीस लहानमोठीं विद्यालयें चालविलीं आहेत. व्यापार, उदीम व कारखाने तसेंच पेढ्या स्थापून सर्वत्र स्वज्ञातीचा बस बसविला आहे, आणि निग्रो जातीला नवीन ध्येय अर्पण करून तें प्राप्त करून घेण्याचा मार्गहि घालून दिला आहे.

या सर्व विवेचनावरून वॉशिंग्टनचें हें कार्य किती महत्त्वाचें व कसें जीवनव्यापी आहे, हें आपणाला दिसून येतें.

[ ४ ]

निग्रो लोकांचें शिक्षण व निग्रो जातीची उन्नति यांविषयीं विचार करतांना आर्मस्ट्रांग व वॉशिंग्टन हीं दोन नांवें प्रामुख्यानें मनापुढें येतात. दोघांनींहि निग्रो जातीची उन्नति होण्याकरितां अश्रांत परिश्रम केले आहेत. दोघेहि परोपकाराचे पुतळे आहेत. दोघेहि सारखेच वंद्य आहेत. दोघांचीं चरित्रें बोधप्रद, अनुकरणीय व वंद्य आहेत. पण दोघांच्या परिस्थितींत फरक असल्यामुळें या गुरुशिष्यांपैकीं प्रत्येकाच्या जीवनापासून बोध घ्यावयाचा तो मात्र भिन्न आहे. एका जातीनें दुसऱ्या जातीला पारतंत्र्यांतच नव्हे, दास्यत्वांत ठेवणें यासारखें नीच-पणाचें दुसरें काम नाहीं, असें आर्मस्ट्रांगचें ठाम मत होतें. गोऱ्यांनीं काळ्यांवर केलेल्या जुलमाची त्यांनां लाज वाटत होती. गुलामगिरीची ही अन्यायकारी पद्धत आपल्या देशांत आपल्या डोळ्यांदेखत चालू असावी, याची त्याला चीड आली होती, व आपले प्राण खर्ची घालावे लागले तरी बेहत्तर; पण गुलामगिरी अमेरिकेंत उरूं द्यावयाची नाहीं, अशा निर्धारानें तो दक्षिणी गोऱ्यांशीं लढला. गुलामांनां स्वातंत्र्य मिळालें; तरी पण तेवढ्यानें आपलें कर्तव्य पूर्ण झालें असें आर्मस्ट्रांगला वाटेना. निग्रोंनां शिक्षण देऊन, त्यांच्या

पोटापाण्याची व्यवस्था लावून समाजांत त्यांना एक स्थान प्राप्त करून देणें हें आतां महत्त्वाचें कर्तव्य त्याच्यापुढें राहिलें व तें त्यानें उत्तम रीतीनें पार पाडलें. सारांश, जगांतील—निदान आपल्या देशांतील सर्व जातीला ज्ञानरूपी अमृत दिल्यावांचून मनुष्यकोटीचें खरें हित साधणार नाहीं व न्यायबुद्धीचें साम्राज्य कबूल केल्यावांचून कोणत्याहि जातीला आपणापुढील निरयगति चुकवितां येणार नाहीं, या दृढविश्वासानें आर्मस्ट्रांगनें निग्रोंच्या शिक्षणाचें पवित्र कार्य हातीं घेतलें होतें, व हाच बोध आह्मांला त्यांच्या चरित्रापासून घ्यावयाचा आहे. आपपरभाव मनांत न बाळगतां रंजल्यागांजलेल्यांना आपले ह्मणून हळुहळू त्यांना शहाणे करून सोडणें हें प्रत्येक सुशिक्षिताचें कर्तव्य आहे, हा धडा आपणाला आर्मस्ट्रांगच्या चरित्रापासून मिळतो. सर्व बंधनें तोडून प्रेम करावयास व प्रेमाचें पर्यवसान सेवेंत करण्यास आर्मस्ट्रांग शिकवितो.

वॉशिंग्टनपुढील प्रश्न निराळ्या प्रकारचा होता. गुलामगिरीच्या जुलमांत जरी त्यांचा जन्म झाला असला तरी तो त्यांच्या अंगवळणीं पडला असल्यामुळें त्याबद्दल व गोऱ्यांबद्दल त्यांच्या मनांत तीव्र चीड केव्हांच नव्हती. उलट गोऱ्यांच्या श्रमानें, गोऱ्यांच्या रक्तानें त्यांला स्वातंत्र्य मिळालें होतें. गोऱ्यांच्याच परिश्रमानें व धनानें त्यांला शिक्षण मिळालें होतें. दक्षिणी गोऱ्यांचा अनुदारपणा त्यांच्या परिचयाचा होता; पण उत्तरेकडील व कांहीं अपवादात्मक दक्षिणी गोऱ्यांची उदार सहानुभूति मात्र नवीन व आश्चर्यकारक होती. तिचा बुकरच्या मनावर विशेष संस्कार झाला. यास्तव व समान हक्काच्या तात्त्विक सिद्धांतानें त्यांचें मन बहकून न गेल्यामुळें गोऱ्यांशीं नेहमीं अकृत्रिम कृतज्ञताबुद्धीच त्याच्या हृदयीं वास करीत होती. पुनः त्यानें असें पाहिलें, कीं, गोरे कसेहि

वागवोत, आपणाला त्यांच्याबरोबरच दिवस काढावयाचे आहेत. विरोधाच्या बाबी अनेक असल्या तरी समानहितसंबंधाच्या बाबी अनंत आहेत. म्हणून गोऱ्यांशीं गोडीगुलाबीनें रहाणें हेंच शहाणपणाचें व आपल्या जातीच्या खऱ्या कल्याणाचें आहे. आणखी एक गोष्ट त्याच्या लक्ष्यांत आली; ती अशी, कीं, काळ्यागोऱ्यांत जो सलोखा व्हावयाचा तो आजपर्यंत हाडींमासीं खिळलेल्या सामाजिक रूढींशीं तत्त्वांच्या जोरावर विरोध करून व्हावयाचा नाहीं. विरोधानें मनोविकार उलट कडवे व दृढच होतात. तेंच पडतें घेऊन उपेक्षा केल्यानें ते मनोविकार बोथट होऊन बुजून जातात. याविषयीं वॉशिंग्टननें एक सुंदर गोष्ट आपल्या 'निग्रोच्या इतिहासां'त दिली आहे. एकदां एका निग्रो गृहस्थाला स्टेशनवर जाण्याची व एक विवक्षित ट्रेन गांठण्याची अत्यंत जरूरी होती व पायीं जाऊन गाडी गाठणें शक्य नव्हतें, म्हणून त्यानें एका व्हिक्टोरियावाल्यास हाक मारली. तो होता गोरा. त्यानें उत्तर केलें "काळ्या लोकांनां मी हाकीत नसतों, कारण तसें केल्यास माझी अप्रतिष्ठा होईल." निग्रो गृहस्थानें म्हटलें "कांहीं हरकत नाहीं, आपण त्यावर तोड काढूं. मला तर स्टेशनवर गेलेंच पाहिजे, तेव्हां तूं गाडींत बस व मला पुढें बसून घोडे हाकूं दे." याप्रमाणें सोय निघून निग्रोचें काम झालें. गाडीवालाहि अनायासें भाडें मिळालें म्हणून खूप झाला. या गोष्टींत वॉशिंग्टनचें सर्व धोरण आलें आहे.[१]

---

१ कांहीं आचार सुरुवातीला जरी एका जातीचा अपमान करण्याच्या उद्देशानेंच प्रचारांत आणले गेले असले, तरी त्यांविरुद्ध चिडण्यापासून फायदा नसतो. जातीनें, स्वपराक्रमानें व सात्त्विक वृत्तीनें आपला सामाजिक दर्जा व उपयुक्तता वाढविली म्हणजे प्रतिपक्षाची अपमान करण्याची प्रवृत्तिहि हळुहळू कमी होत जाते; पुढें तेच आचार अर्थहीन व निःसत्त्व होऊन राहतात व कालांतरानें नामशेष होऊन जातात. हा क्रम व हा मार्ग समजणें आपणांला फार महत्त्वाचें आहे.

वॉशिंग्टननें आणखी एक महत्त्वाचा शोध लावला. तो असा, कीं, वादविवाद अथवा स्पर्धा या मार्गानें निग्रोंची उन्नति होणार नसून उपयुक्त शिक्षणानें समाजांत आपलें बस्तान बशिवल्यानें आणि पैसा व जमीन मिळविल्यानेंच आपल्या जातीला बरे दिवस येणें शक्य आहे.

मुळाला पाणी घातलें ह्मणजे ज्याप्रमाणें सारें झाड तरारतें, त्याप्रमाणेंच समाजाचें आहे. समाजसुधारणेचें कोणतेंहि काम मुळापासूनच सुरू केलें पाहिजे. हें जाणून वॉशिंग्टननें आपल्या कार्याला प्रारंभ केला.

( १ ) जाति सुधारण्याला व्यक्तीची सुधारणा झाली पाहिजे, ह्मणून तेथूनच त्यानें सुरुवात केली.

( २ ) धंद्यांमध्यें मानवी जीवनाला अत्यावश्यक असे धंदे, अर्थात् शेतकी, सुतारकाम, लोहारकाम, घरें बांधणें वगैरे त्यानें सुरू केले.

( ३ ) सर्व सामर्थ्यांमध्यें आर्थिक सामर्थ्य आजकाल मुख्य आहे. ह्मणून विद्या व कला यांची त्यानें अशी जोड केली, कीं, प्रत्येक निग्रोची सांपत्तिक स्थिति व त्याबरोबर सामाजिक दर्जा हीं वाढावीं.

आजकालच्या युगांत अर्थशास्त्राचे नियम हीच मुख्य व सर्वव्यापी स्मृति आहे. अर्थशास्त्राचे नियम सर्वत्र सारखे लागू आहेत. संपत्ति हेंच सामर्थ्य आहे, व ती मिळविण्याचे मार्ग आपलेसे केले ह्मणजेच सामाजिक दर्जा व राजकीय हक्क आपल्या हस्तगत होतात. याप्रमाणें आपलें व्यवहारशास्त्र निश्चित करून वॉशिंग्टननें आपल्या जातीच्या उन्नत्यर्थ आपणाला वाहून घेतलें. इतर मार्गांनीं त्याला अधिक पुढें येतां आलें असतें; पण स्वजनहितापुढें स्वहित त्यानें तुच्छ मानलें. राजकारणांत शिरून त्याला महत्पद मिळविणें कठिण नव्हतें. अप्रतिम वक्ता ह्मणूनहि त्याला नांवारूपाला येतां आलें असतें पण त्यानें

तो मोह प्रथमपासून सोडला व लोकप्रियतेकडेसुद्धां न पाहतां आपल्या जातीचें खरें हित ज्यांत असेल तेंच बिनदिक्कत करावयाचें, असें असि-धाराव्रत त्यानें पत्करलें. वॉशिंग्टनच्या चरित्रापासून आणखी एक बोध आपणाला घेण्याजोगा आहे. समाजांत आपलें वजन उत्तम असूनहि तो अमेरिकेसारख्या प्रजासत्ताक सरकारच्या नोकरींत शिरला नाहीं. उलट त्याचें स्पष्ट मत आहे, कीं, ज्या जातीचे पुढारी सरकारी नोक-रीच्या मागें लागतात, त्या जातीनें उन्नतीची आशा करणें व्यर्थ आहे. हेंच तत्त्व निराळ्या शब्दांत असेंहि मांडतां येईल, कीं, जी जात आपल्यांपैकीं बड्या सरकारी नोकरांनां आपले पुढारी समजते, तिला उन्नतीची खरी कल्पनाच नाहीं, असें ह्मटलें पाहिजे.

एवंच कोणाचा द्वेष न करतां, सर्वांशीं गोड वागून, सर्वांच्या हिताची सारखीच काळजी वाहून, प्रतिपक्षीयांनांहि मित्र बनवून थिम्मे-पणानें मोझेसनें ज्याप्रमाणें इस्रायल लोकांचें नेतृत्व पत्करून त्यांनां अभीष्ट स्थानाला नेऊन पोहोंचविलें, त्याप्रमाणें अमेरिकन निग्रोंनां आर्मस्ट्रांगनीं आंखून दिलेल्या रस्त्यानें अभ्युदयाच्या शिखराकडे वॉशिं-ग्टन आमरण घेऊन चालले होते; आणि त्यांनीं बराच मार्ग आक्र-मिला होता. यांच्यासारखी गुरुशिष्याची जोडी जें कार्य हातीं घेईल, ‘ तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम. ’

[ ५ ]

बुकर टी. वॉशिंग्टनचें चरित्र वाचतांना व निग्रोंचा आजकालचा इतिहास अवलोकन करतांना, स्वाभाविकपणें असा प्रश्न मनांत उद्भ-वतो, कीं, या सर्व कथानकापासून आपण काय बोध घ्यावयाचा ? या लोकांच्या व आमच्या परिस्थितींत कितपत साम्य आहे, यांचे मार्ग आह्मांला कितपत इष्ट व साध्य आहेत, यांच्याप्रमाणें कोणत्या गोष्टी

आपण करूं शकतों, व त्या कशा करावयाच्या, इत्यादि अनेक प्रश्न उद्भवतात.

कोणतीहि यशाची कहाणी ऐकली ह्मणजे दोन भिन्न वृत्तींचे लोक दोन प्रकारें त्यावर विचार करतात. अल्पप्राण अकर्मण्यलोक बहुधा आपली परिस्थिति भिन्न आहे, दुसऱ्याला प्राप्त झालेल्या सोयी आपणाला मिळत नाहींत वगैरे कारणें सांगून आपल्या कर्मविमुखतेचें समर्थन करून स्वस्थ बसतात. पण साक्षेपी, पुरुषार्थी लोक असा विचार करतात, कीं, अडचणी नाहींत कोठें? अडचणींतून मार्ग काढणें हाच तर खरा पराक्रम. ' सर्व सैन्य मरोनि जावें । मग आपण राज्य करावें।' हा कांहीं पुरुषार्थ नव्हे. तेव्हां आपणाला कोणत्या सोयी आहेत, व अडचणींतून पार जाण्याला काय तोड निघणें शक्य आहे, याचाच विचार केला पाहिजे. पहिल्यांचा युक्तिवाद नेहमींच लंगडा असतो असें नाहीं. पण त्यांची वृत्ति मात्र नैष्कर्म्यसिद्धीकडे* असते, तें बरोबर नाहीं. तेव्हां आपण ही वृत्ति न बाळगतां साधकबाधक प्रमाणांचा थोडासा विचार करूं.

अमेरिकेंतील निग्रोंच्या परिस्थितींत व आमच्या परिस्थितींत खरोखर मोठा भेद आहे. निग्रोंनां भूतकाळची अशी परंपरा मुळींच नाहीं ह्मटलें तरी चालेल. आफ्रिकेंतील सर्व निग्रो जाति अगदीं पशुतुल्य व रानटी आहेत असें यूरोपियन लोकांप्रमाणें आह्मांला वाटत नाहीं. त्यांची एक प्रकारची संस्कृति असलीच पाहिजे; परंतु गुलाम करून अमेरिकेंत नेलेल्या निग्रोंनां गोऱ्यांनीं अशा रीतीनें वागविलें, कीं, कांहीं

---

* हा शब्द येथें वेदांती अर्थानें वापरला नाहीं. कर्म कसें न करावें व राजसवृत्तीनें दुःखदायक कर्मांचा त्याग कसा करावा, इकडेच सर्व बुद्धि खर्च करणाऱ्यांच्या वृत्तीला विनोदानें हा शब्द वापरला आहे.

काळानें त्यांच्यांतला माणूसपणा पार नाहींसा झाला, आणि त्यांची स्थिति पशूंहूनहि निकृष्ट झाली. अशा लोकांनां आतां फक्त पाश्चात्य संस्कृति जशी आहे तशीच घेण्यापलीकडे कांहीं मार्ग उरला नाहीं. धार्मिक, सामाजिक अथवा राजकीय ध्येयें यांनां ठरवावयाचीं नाहींत. प्राचीन संस्कृतीचा उद्धार किंवा भिन्न संस्कृतींचा समन्वय करण्याचें कठिण कार्य त्यांच्यावर पडलेलें नाहीं. ख्रिती धर्म व पाश्चात्यांची समाज-रचना हींच त्यांनां आदर्श आहेत. या दोन्ही बाबतींत पाश्चात्यांचें अनुकरण तंतोतंत व झपाट्यानें करणें यांतच त्यांचें हित व भावी कल्याण आहे. आह्मांला तोच अनुकरणाचा मार्ग समूळ नाशाचा होईल. आमचा धर्म व आमची समाजरचना (त्यांत कांहीं दोष असले तरी) इतरांहून श्रेष्ठ आहेत. निदान ते आह्मांला अत्यंत हितावह आहेत, असा आमचा दृढ विश्वास आहे. राजकीय बाबींतहि असाच प्रकार आहे. अमेरिकेंत निग्रो ह्मणजे अशिक्षित, निर्धन, अल्पसंख्याक व हीनजाति आहे. तेथें गोरे लोक निग्रोंच्या दसपट आहेत. पण तत्त्वत: निग्रोंनां गोऱ्यां-बरोबर सर्व हक्क समान आहेत. त्यांनां फक्त जातिमत्सरानें व अज्ञा-नानें होणारी आपली पीछेहाट थांबवावयाची आहे.

आमची गोष्ट तशी नाहीं. आह्मी आमच्याच देशांत आहोंत. आमची संख्याहि कांहीं थोडी नाहीं. गोरे लोक आमच्यांमध्यें वस्ती करून राहिले नाहींत. पण आह्मांला आपल्यामधील मत्सरानें व तज्जन्य विस्कळित-पणामुळें होणारी पीछेहाट थांबवावयाची आहे, व यथासाध्य सर्वच हक्क मिळवावयाचे आहेत.

शिक्षणाच्या बाबतींतहि असाच कांहींसा प्रकार आहे. शिक्षण-पद्धति ही कांहीं मोक्षाच्या मार्गासारखी ठराविक नाहीं. परिस्थितीच्या भेदाप्रमाणें व विशिष्टकालीन ध्येयाप्रमाणें शिक्षणपद्धतीहि बदलत

असते. आमची स्वतःची अशी एक शिक्षणपद्धति प्राचीन कालीं होती, व तिचें फळ पाहतां त्या काळीं ती उत्कृष्ट होती, यांत संशय नाहीं. तिच्यापैकीं आज जेवढा भाग पुनः ऊर्जितदशेला आणणें शक्य आहे, तेवढा आह्मीं आणला पाहिजे व फरक करावयाचा तो आधुनिक परिस्थिति व भावी ध्येय यांचा विचार करून केला पाहिजे.

निग्रोंनां पूर्वपरंपरेपासून एक पक्षीं मिळणारी स्फूर्ति अथवा दुसऱ्या पक्षीं तिच्या रूढ विचारांचें जड जोखड यांपैकीं कांहींच नाहीं. आह्मांला हीं दोन्हीं बऱ्याच प्रमाणांत आहेत. त्यांचा विचार पावलोपावलीं करावा लागतो.

निग्रोंनां आपला आदर्श गोऱ्या समाजांत पहावयास मिळतो. आह्मांला आपला आदर्श कल्पना—सृष्टींतच पाहिला पाहिजे, व तोहि अत्यंत श्रेष्ठ व्यक्तींनांहि अस्पष्ट व अंधुकच दिसणार. अर्थात्च आमचे मार्ग त्या मानानें अनिश्चित व कांहीं अंशीं धरसोडीचे असणार.

आणखी एक महत्त्वाचा भेद असा आहे, कीं, निग्रोसमाज अशिक्षित असला तरी त्याला सभोंवतालच्या उदाहरणानें शिक्षणाची महती कळली आहे व तेथील आबालवृद्ध पुरुष व स्त्रिया शिक्षणाला हपापलेल्या आहेत आणि शिक्षणप्राप्तीस्तव वाटेल ते कष्ट सहन करण्याला ते तयार आहेत. आमच्या येथें प्रत्येक जातीचें उद्दिष्ट भिन्न असल्यामुळें एका जातीला दुसरीचें उदाहरण कांहींच उपयोगी पडत नाहीं, आणि बहुतेक जातींत आधुनिक परिस्थितीविषयीं जागृतीच झाली नाहीं. त्यामुळें शिक्षणाच्या सोयी नवीन निर्माण होण्याची गोष्ट बाजूलाच राहो. असलेल्या सोयींचा फायदा घेण्याची वृत्ति देखील फारशी दिसून येत नाहीं. उच्च जातींत शिक्षणाची थोडी गोडी आहे खरी;

पण तेथेंहि शिक्षण हें अनेक अर्थविहीन संस्कारांप्रमाणें एक सामाजिक दर्जा प्राप्त करून घेण्याचा संस्कार बनला आहे.

अशी जरी स्थिति आहे, तरी साम्य कांहीं कमी नाहीं. म्हणून वॉशिंग्टनच्या कथनापासून आपणाला अनेक तऱ्हेनें मार्ग मिळणें शक्य आहे.

धार्मिक, सामाजिक व राजकीय स्थितीच्या मुळाशीं एक सर्वव्यापी सामाजिक चैतन्य असतें. ज्या मानानें त्याचें विकसन अथवा आकुंचन होतें, त्या मानानें समाज उन्नत अथवा अवनत स्थितीला पोहोंचतो. अमेरिकेंतील निग्रो, यूरोपांतील मजूर, आफ्रिकेंतील कुली किंवा आशियांतील मागसलेलीं राष्ट्रें यांची परिस्थिति भिन्न असली, तरी त्यांच्या निकृष्ट स्थितीचें निदान एकच आहे व तें हें, कीं, या सर्व समाजांत चैतन्य योग्य प्रमाणांत स्फुरण पावत नाहीं. धर्म उच्चतम असला, समाजव्यवस्थेचें ध्येय आदर्शभूत असलें, जनसंख्या मोठी असली, बुद्धिमत्ता अपार असली व परिस्थितिहि अनुकूल आली, तरी या चैतन्याच्या अभावीं सर्व व्यर्थ होतें. ह्मणून हें राष्ट्राचें ( समाजाचें ) चैतन्य—हा प्राण वृद्धिंगत कसा करावा, याचा प्रथम विचार केला पाहिजे, व हा विचार वॉशिंग्टननीं केला आहे, म्हणून भिन्न परिस्थितींतहि आह्मांला वॉशिंग्टनचा संदेश ग्राह्य आहे.

वॉशिंग्टननें शिक्षणकार्याला स्वतःला वाहून घेतलें खरें, पण विद्वान् निर्माण करण्याचा त्यांचा प्रयत्न नव्हता. आपल्या समाजाची राजकीय परिस्थिति त्यानें सुधारली आहे, पण राजकारणांत तो पडला नाहीं. निग्रो जातीचा सामाजिक दर्जा त्यानें वाढवला आहे, पण समतेच्या —समान हक्काच्या चळवळींत तो सामील झाला नाहीं. धंदेशिक्षण हा त्यांच्या संस्थेचा विशेष आहे, पण नुसते कारागीर निर्माण करण्याचा

त्याचा उद्देश नव्हता. प्रत्येक धर्मसंस्थेशीं त्याचा संबंध होता. टस्कगी संस्थेंतहि धार्मिक शिक्षण देण्यांत येतें, पण धार्मिक कार्याला त्यानें आपलें सर्व कांहीं अर्पण केलें नाहीं. हीं सर्व साधनें आहेत व या सर्वांचें एक मात्र साध्य ह्मणजे समाजांतील चैतन्य जागृत करावयाचें हें होय. याचकरितां राजकीय हक्क हवे आहेत, याचकरितां धर्माचा अवतार आहे, याचसाठीं धंदेशिक्षणानें येणारें आर्थिक सामर्थ्य हवें आहे व याचसाठीं विद्वत्ता व शिक्षण हवें आहे. हें चैतन्य जागृत झालें, समाजाच्या रोमरोमांत हा प्राण संचारून स्फुरूं लागला ह्मणजे भराभर सर्वांगसुंदर अशी उन्नति होऊं लागते.

सामान्य टेक्निकल इन्स्टिटयूट व टस्कगी संस्था यांत भेद हाच आहे. सामान्य टेक्निकल संस्थांतील शिक्षणानें सबंध जीवनास स्पर्श होत नाहीं, दृष्टि व्यापक होत नाहीं, कल्पनाशक्ति प्रज्वलित होत नाहीं, उच्च ध्येयानें हृदय भारून जात नाहीं. टस्कगी संस्थेमध्यें हें सर्व होतें, आणि हा भेद ह्मणजे जमीनअस्मानाच्या अंतराएवढा आहे.

निग्रोंमध्यें व आपणांमध्यें साम्य बरेंच आहे. दोघांनांहि या चैतन्याची जरूरी आहे. दोघांनांहि उच्च ध्येय, उमेद, उत्साह, दृढनिश्चय, उद्योगप्रियता, व्यवस्थितपणा व निर्मल दृष्टि यांची आवश्यकता आहे. श्रमाचें महत्त्व, उद्योगानें येणारा शीलाचा जोमदारपणा व स्वातंत्र्यलालसा दोघांनांहि सारखीच शिकावयाची आहे. शिक्षणाच्या भ्रामक कल्पनांनीं दोघांनांहि घेरलें आहे. शिक्षणाचें ध्येय व मार्ग दोघांनांहि अजून स्पष्टपणें कळावे तसे कळले नाहींत. बुद्धीचा व पौरुषाचा विकास होण्याच्या आड येणारें दडपण दोघांवर सारखेंच आहे. दोघांनांहि कर्तृत्वशक्ति वाढविण्याची अवश्यकता सारखीच आहे. दोघांनांहि विधायक व संघट्टनात्मक कामें करण्याची संवय लावून

घ्यावयाची आहे, तिकडे काळ्यागोऱ्यांचा ज्ञातिसंबंध अधिक सुरळीत करावयाचा आहे, तर आपणाला नवीन परिस्थितींत वाढत्या प्रमाणावर असलेल्या जातिमत्सराला आळा घालून एकोपा कसा करावा, याचें चिंतन केलें पाहिजे.

आपल्या आजपर्यंतच्या समाजविषयक कल्पनांनां विसंगत अशा अनेक कल्पनांचा प्रसार झपाट्यानें होऊं लागला आहे. समाजाची घडी बदलून नवीननवीन प्रश्न उद्भवूं लागले आहेत. आर्थिक स्थितींत क्रांति झाली आहे. अशा प्रसंगीं कसें धोरण ठेवावें, तसेंच मागसलेल्या जातींनीं कोणत्या गोष्टींपासून सावध असावें व कोणत्या गोष्टींवर विशेष जोर द्यावा, हें वॉशिंग्टन उत्तम तऱ्हेनें शिकवितो. मागसलेल्या जातींच्या उन्नतीपासून पुढारलेल्या जातीचें कल्याणच आहे, ही गोष्ट वॉशिंग्टन प्रत्ययाला आणून देतो, व प्रतिकूल शक्तीच्या ओझ्याखालीं दडपून गेल्यामुळें निराश झालेल्या लोकांनां वॉशिंग्टन ह्मणतो:—'आमच्यापुढील प्रश्न अत्यंत कठिण आहे खरा, पण अशा अडचणींनीं निराश होण्याऐवजीं आपणांला अडचणींत ठेवलें आहे, याबद्दल आपल्या जातीनें देवाचे आभार मानले पाहिजेत. ज्या जातीचा प्रगतीचा मार्ग पुष्पावकीर्ण आहे त्या जातीपेक्षां ज्या जातीला कंटकावनद्ध मार्गावरून जावें लागतें, अशा जातींत जन्म घेणें मला अधिक पसंत आहे. व्यक्ति काय आणि ज्ञाति काय, त्यांनीं अत्यंत बिकट प्रश्नांशीं मर्दुमकीनें टक्कर दिल्यानेंच अंगीं उत्तमोत्तम शक्ति येते." ( निग्रोचा इतिहास. )

राजकीय हक्क मिळविण्याचे आमचे मार्ग निग्रोंच्या मार्गांहून भिन्न असले, तरी प्राप्त झालेले हक्क किंवा असलेली अनुकूल स्थिति यांचा महत्तम उपयोग कसा करून घ्यावा व त्यायोगें अधिक मिळविण्यास

पात्र कसें व्हावें, आणि सामर्थ्य कसें मिळवावें, हें वॉशिंग्टनपासून आपण शिकूं शकतों.

'प्रथम पात्रता मिळवा म्हणजे हक्क आपोआप मिळतील' असा पोक्त सल्ला कांहीं लोक गंभीरपणें देतात. पण ती पात्रता कशी मिळवावी, हें मात्र त्यांनां सांगतां येत नाहीं. तें सांगतां येईल, तरच त्यांचें कोणी ऐकेल. वॉशिंग्टनसारखा खरा पुढारी हा मार्ग दाखवून देतो एवढेंच नव्हे, तर त्याचें प्रत्यक्ष उदाहरण घालून देतो. असा पुढारी आज हवा आहे. कर्तबगार पुढारी अष्टपैलू असतो. त्याच्या अंगीं दूरदृष्टि असते. पांचपंचवीस वर्षांच्या पुढचें त्याला दिसत असतें. सर्व ठिकाणची व सर्व बाबींतली माहिती तो मिळवून ठेवतो, व अनुकूल संधीसाठीं टपून बसलेला असतो. एकहि संधि तो वायां जाऊं देत नाहीं, संकटकाळीं आगाऊ तरतूद करून ठेवतो, लोंढा येण्याच्या अगोदरच त्याचा बांध तयार असतो. त्याच्या ठिकाणीं सहकारितेनें काम करण्याची शक्ति असते. तो गुणी लोकांचा संग्रह करितो. त्याच्या हृदयांत न्यायबुद्धि असते, मत्सर नसतो. सामान्य हिताच्या बाबींत तो द्वेष अथवा मतभेद यांनां गुंडाळून ठेवूं शकतो. प्रत्येकाचे गुण पाहून त्याप्रमाणें त्याची तदनुरूप कामीं योजना करतो. प्रत्येकाला त्याच्या गुणांचा विकास होण्यास अवसर देतो. त्याचा स्वतः-वर व स्वतःच्या समाजावर विश्वास असतो. आपली शक्ति व प्रतिपक्षाची शक्ति तो योग्य प्रकारें ओळखतो. अनुबंध, क्षय, हिंसा व पौरुष हीं न पाहतां मोहानें केलें जाणारें तामस कर्म तो करीत नाहीं. प्रतिपक्षी झाला तरी त्याला तो विनाकारण दुखवीत नाहीं. त्याच्या स्थितीचा व त्याच्या न्यायाचा पण विचार करतो. पण जर कां प्रतिपक्षी याच्या किंवा याच्या समाजाच्या वाटेस गेला, तर मग आपलें कांहींहि होवो, गय

ह्मणून करावयाची नाहीं; पुरा बंदोबस्त करावयाचा, अडचणींनां न जुमानतां आपल्या इच्छेनुरूप सर्व कांहीं घडवून आणावयाचें, असा चिकाटीचा दीर्घोद्योग त्याच्या ठिकाणीं असतो. धोरण व धाडस यांचा त्याच्या स्वभावांत सुंदर मिलाफ झालेला असतो. तो भपक्याला दिपून जात नाहीं. अडचणींनां डगमगत नाहीं, स्वकार्यापासून निवृत्त होत नाहीं, भावी संकटाकडे डोळेझांक करीत नाहीं. आपलें काम आपल्या आटोक्या-बाहेर जाऊं देत नाहीं. सतत उद्योगानें आपल्या व आपल्या समाजाच्या सर्व शक्ति जागृत ठेवतो, गंजूं देत नाहीं. आळस व नैष्कृतिकता टिकूं देत नाहीं. आपल्या मऊपणानें तो अयोग्य माणसांनां पुढें आणून कामाचा चुथडा होऊं देत नाहीं. तरी पण स्वार्थ किंवा कीर्तीचा लोभ त्याला नसतो. तो शांतताप्रिय असतो, पण प्रसंग येतांच झगड्यासहि तयार असतो. अहोरात्र तो आपल्या समाजाच्या हिताचें चिंतन करीत असतो. त्याच्याशीं तो एकजीव झालेला असतो. अशा पुढाऱ्याच्या नेतृत्वाखालीं कोणताहि समाज जोमदार होऊं शकेल.

[ ६ ]

वॉशिंग्टनच्या या उदाहरणावरून आमच्या आजकालच्या चळव-ळींनां व राष्ट्रोन्नतीच्या प्रयत्नांनां कांहीं नवीन वळण लावण्याजोगें आहे काय, हें आतां पाहूं. आमच्या चळवळी अनेक आहेत. धार्मिक, सामा-जिक, राजकीय, औद्योगिक, तसेंच भाषा, शिक्षण, शास्त्रीयज्ञान, संकट-निवारण, ललितकला इत्यादिसंबंधीं त्या आहेत. पण या अजून समाजांत चांगल्या रुजल्या नाहींत. बऱ्याच चळवळी पांढरपेशाजाती-पुरत्याच आहेत. स्वामी विवेकानंदांनीं ह्मटल्याप्रमाणें 'राष्ट्र झोंपडींत राहत असतें.' त्याचा विचारच झाला नाहीं. पांढरपेशांच्या चळवळींत देखील जोम असा नाहींच. कारण चळवळ ह्मणजे आपलीं मतें जाहीर-

पणें बोलणें याखेरीज विशेष होतच नाहीं. प्रत्यक्ष कृति करण्यास सुरुवातच होत नाहीं, व झाली तर टिकत नाहीं. जो तो लोकमत तयार करण्याच्या मागें लागला आहे. पण हें लोकमत ह्मणजे काय ? आपल्या ह्मणण्याला लोकांनीं होस हो दिला ह्मणजे लोकमत झालें काय ? जेव्हां एकादा विचार बहुजन समाजाला इतका पटेल, कीं, त्या विचारानुरूप कार्यसिद्धि करून घेण्यास समाजांतील अधिकांश लोक उत्साहानें, निश्चयानें व चिकाटीनें प्रयत्न करूं लागतील, फलागमापर्यंत विराम पावणार नाहींत, अथवा दबले जाणार नाहींत, तेव्हांच लोकमत तयार झालें असें ह्मणतां येईल व अशाच लोक-मताचा परिस्थितीवर परिणाम होईल. नुसती शाब्दिक सहानुभूति अथवा अनुमति फोल होय. ज्या विचाराचें पर्यवसान क्रियेंत होत नाहीं, त्याला किंमत नसते. एवढेंच नव्हे, तर तो एक मानसिक रोगच समजला पाहिजे. त्यानें संकल्पशक्तीचा ऱ्हास होतो. आजकालच्या सभांतील ठराव याच प्रकारचे असतात. त्यांचा प्रभाव काय पडणार ? बरें, या विचारांत तरी ऐक्य किंवा सामंजस्य आहे काय ? राजकीय चळवळ आधीं कीं सामाजिक चळवळ आधीं, यावरच तट पडून रणें माजलीं आहेत. शिक्षणाच्या प्रयत्नांलाहि असेच पक्षभेद आड आले आहेत. तरुण पिढीला जोमदार शिक्षण देण्याच्या ऐवजीं आपल्या पंथाच्या मतांचा प्रसार करणारे झगडेबाज उपदेशक निर्माण करण्या-करितां ऋषिकुलें, गुरुकुलें, आचार्यकुलें निर्माण झालीं आहेत. धार्मिक वृत्ति बाजूला राहून क्षुल्लक मतभेदावर शास्त्रार्थ व कलह होतात. सामाजिक सुधारणेच्या बाबतींतहि क्षुल्लक बाबींवरच सर्व जोर देण्यांत येतो. ज्या गोष्टी समाज जोमदार झाल्यावर सहज होऊं शकतील, त्या आज शुष्क वादांचा विषय बनविल्यानें विचारांचें अराजक माजलें

आहे. जातिभेदाचीच गोष्ट घ्याना. समाज आपलें उद्दिष्ट ठरवून तत्प्राप्त्यर्थ प्रयत्न करूं लागला ह्मणजे जातिभेदांतील अनिष्ट भाग आपोआप गळून जातील व इष्ट असल्यास जातिभेदच नष्ट होऊन जाईल. पण जातिभेदामुळेंच सर्व अडतें ह्मणून नुसते वाद माजविण्यानें कांहींच फायदा होत नाहीं. क्षुद्र स्वार्थबुद्धि जोंपर्यंत आहे, तोंपर्यंत जाती नसल्या काय व असल्या काय, प्रेम आणि सहकारिता हीं उत्पन्न होणार नाहींत. काश्मीरांत हिंदूंच्या अनेक जाती नाहींत. तेथें सर्वच हिंदू पंडित ( ब्राह्मण ). मग जातिभेदाच्या अभावीं काश्मीरचे लोक एकोप्यानें कां रहात नाहींत? दुसरें उदाहरण आहाराचें. आमचा शाकाहार आह्मांला नेभळे बनवतो, असें ह्मणणारांनीं पुनः काश्मीरची स्थिति पहावी. तेथें सर्व मांसाहार करतात. बिहारामध्यें मांसाहार प्रचलित आहे. पंजाबांत आहे, सिंधमध्यें आहे; बंगाल्यांत मत्स्याहार आहे. तरी पण आमच्या लोकांच्या कपाळावरचा नेभळटपणाचा छाप जात नाहींच. ब्रह्मदेशांत खाण्यापिण्याचे निर्बंध नाहींत, कोणत्याहि जातींत विवाहाची आडकाठी नाहीं, स्त्रियांना पूर्ण स्वातंत्र्य आहे, परदेशगमनाला पूर्ण मुभा आहे; तरी पण हिंदुस्तानाहूनहि तो देश मागसलेला आहे.

ज्या ज्या बाबतींत आह्मी यूरोपियनांहून भिन्न आहों, त्या त्या आपण सोडल्या पाहिजेत, अशी अंध वृत्ति कामाची नाहीं. त्यांच्यांत जोम कशाचा आहे, हें पाहिलें पाहिजे. खुद्द आपल्या देशांत यूरोपियन अंमलदार, यूरोपियन व्यापारी व यूरोपियन मिशनरी आहेत. त्यांचे गुणदोष पाहून ते जोमदार उद्योग कसा करितात, मोठमोठ्या संस्था आमच्याच लोकांच्या मदतीनें कशा उभारतात, याचें आपण सूक्ष्मदृष्टीनें निरीक्षण केलें पाहिजे, व आपल्या चळवळीचीं मुळें राष्ट्रांत रुजण्याला

अगदीं खालच्या जनसमूहांत काम सुरू केलें पाहिजे. त्यांना शिक्षण देणें, त्यांची आर्थिक स्थिति सुधारणें, त्यांच्यांत एकोपा वाढविणें, या सुधारणा प्रथम केल्या पाहिजेत. वॉशिंग्टननें आपल्या शिक्षणपद्धतीकडे लोकांचीं मनें कशीं वळवलीं हें ध्यानांत धरलें पाहिजे, उन्नतीचें मुख्य अंग कोणतें आहे हें पाहिलें पाहिजे, विचार उत्तम झाले पाहिजेत, विचाराप्रमाणें कृति करण्याचें संकल्पसामर्थ्य हवें आहे. चळवळ करावयाची ती विचारपूर्वक झाली पाहिजे. आपलें ध्येय काय आहे, हें प्रथम नीट ठरलें पाहिजे. उन्नति कशाला ह्मणावयाचें, आपल्या समाजाचें वैशिष्ट्य काय आहे, हल्लींची स्थिति काय आहे, आणि पुढें काय साध्य करावयाचें आहे, याविषयींच्या कल्पना स्पष्ट झाल्या पाहिजेत. नाहीं तर अनियंत्रित रोटीबेटीव्यवहार करून जाती मोडावयासहि तयार व पुन: ज्ञातिपरिषदा करून जातिभेद कायम करण्यासहि तयार असें दुटप्पी वर्तन व्हावयाचें. आपणाला काय मिळवावयाचें आहे, हें निश्चित झाल्यावर असे प्रसंग यावयाचे नाहींत. आमच्या मतें सामाजिक जोम वाढवून लोकांची वृत्ति बदलून एकदां ठाम मत बनलें, कीं, त्याप्रमाणें वागण्याचा निश्चय ( इच्छाशक्तीचा जोर—संकल्पसामर्थ्य ) आल्यानंतर या सर्व गोष्टी ठरावयाच्या आहेत. समाजांत हा जोम येण्यास सामाजिक संस्थांच्या व्यवस्थेंत फेरबदल करण्यापेक्षां व्यक्तीच्या वृत्तींत फेरबदल करणें हें अधिक महत्त्वाचें आहे, व तें झालें ह्मणजे समाजरचनेंत फेरबदल करणें फारसें कठिण काम नाहीं.

प्रत्येक व्यक्तीची योग्यता वाढली पाहिजे. प्रत्येक इसम अधिक जाणता, अधिक कर्तबगार, अधिक विश्वासु, अधिक तत्त्वनिष्ठ व अधिक समाजहिततत्पर झाला पाहिजे.

साध्या राहणीनें आपला खर्च कमी करून व वाकबगारपणें व उद्योगानें उत्तम काम करून आपलें उत्पन्न शक्य तितकें वाढवून, तसेंच समाजाच्या महत्त्वाच्या गरजा भागविण्याची शक्ति संपादून, आर्थिक स्वातंत्र्य, आर्थिक सामर्थ्य व सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त करून घेतलेलीं माणसें समाजांत अधिकाधिक वाढलीं पाहिजेत. अशा लोकांनीं सहकारितेनें काम करावयाला शिकलें पाहिजे. विश्वासानें परस्परांचें हित पाहून काम करतां आलें पाहिजे, व हळुहळू सर्व धंदे, सर्व उदीम-व्यापार आपल्या हातांत आणले पाहिजेत. समाजाच्या कोणत्याहि कामांत आपली गरज लागेल इतकी आपली योग्यता व काम कर-ण्याची शक्ति वाढली पाहिजे.

अशी शक्ति व सामर्थ्य प्राप्त झाल्यावर त्याचा उपयोग स्वार्थाकडे न करितां आपल्या समाजाच्या उन्नतीकडे केला पाहिजे. ह्मणजे कालां-तरानें लोक वश होऊन त्यांच्या हृदयावर प्रभुत्व गाजवितां येईल, व हवी ती सुधारणा, हवी ती सामाजिक क्रांति घडवून आणतां येईल. प्रथम सामर्थ्य मिळविलें पाहिजे. 'राजा बोले दळ हाले, बुड्ढा बोले दाढी हाले' ही ह्मण विसरतां कामा नये. आजकालचे आमचे पुढारी या ह्मणींतील दुसऱ्या कोटींत मोडतात. नुसता विचार करून व ठराव पास करून काय होणार? ठरावाप्रमाणें वागणारे लोक हवेतना? प्रत्येक व्यक्ति अधिक कर्तबगार, अधिक दक्ष व अधिक माहितगार झाली ह्मणजे ती उच्च ध्येय, उच्च आकांक्षा बाळगण्याजोगी होईल. त्या साध्य होण्याचा विश्वास वाटूं लागेल, प्रत्येक संधीचा फायदा घेतां येईल व निश्चित ध्येय-प्राप्त्यर्थ बुद्धिपुरःसर प्रयत्न होतील.

या सर्वांस सुरुवात शेतीपासून झाली पाहिजे; अर्थात् खेड्यांतून प्रारंभ केला पाहिजे. शारीरिक सामर्थ्याला जशी उत्तम अन्नाची आवश्यकता

आहे, त्याचप्रमाणें राष्ट्रीय सामर्थ्याला उत्तम शेतीची अत्यंत आवश्यकता आहे, पण तिकडे आपण अगदीं दुर्लक्ष्य केलें आहे व जी कांहीं शेती आपल्या देशांत आहे, तिचा फायदा परदेशी व्यापारी घेत आहेत, ही अगदीं शोचनीय गोष्ट आहे. अज्ञान शेतकरी आपला माल परदेशी कंपनीला ते सांगतील त्या भावानें विकतात. यूरोपांत आपला माल किती महाग विकला जातो व केवढ्या मोठ्या फायद्याला आपण मुकतों, याची बिचाऱ्यांनां कल्पनाहि नसते. आपल्या शेतकऱ्यांनां जाणते व माहितगार करणें, त्यांच्यांत जोम आणणें हें आपलें पहिलें काम आहे. त्यांचा माल आपण जगांतील उत्तम बाजारांत किफायतशीर भावानें विकण्याची सोय केली पाहिजे व शक्य तितका नफा आपल्या शेतकऱ्यांच्या पदरांत पडेल असें केलें पाहिजे. या सर्वगोष्टींचा शेतकींत अंतर्भाव होतो. नुसतें धान्य उत्पन्न करण्यानें शेतकी पुरी होत नाहीं. तसेंच प्रत्येक खेड्यास अथवा परगण्यास आपल्या गरजा स्वतःच भागवतां आल्या पाहिजेत. थोडक्यांत सांगावयाचें ह्मणजे आपल्या सामाजिक जीवनांत एक जोमदार नवीनपणा आणला पाहिजे. आमचे सुशिक्षित तरुण शहरांतील पांढरपेशा वृत्तीचा मोह सोडून खेडोखेडीं जाऊन राहतील व आंग मोडून काम करून आपल्या ग्रामबंधूंनां ज्ञान देऊन त्यांचें पुढारीपण पत्करतील तर त्यांनां खरेंखुरें भरींव देशकार्य केल्याचें श्रेय मिळून, उत्तम आरोग्यसुख व संपत्ति हींहि मिळतील. खेड्यांत राहण्यानें आर्थिक नुकसान मुळींच नाहीं. फायदाच आहे. शहरांत राहून इमानदारीनें जितका पैसा मिळणें शक्य आहे त्याहून अधिक खेड्यांत राहिल्यानें मिळेल. कारण ( निदान आपल्या देशांत ) संपत्ति निर्माण होते खेडेगांवांतच.

खेड्यांतील लोक सुशिक्षित झाले ह्मणजे ते आपल्या गरजा आपणच भागवतील, आपले तंटे आपसांतच निवडतील, आपला कारभार सहकारितेनें आपणच करूं लागतील व अशा प्रकारें एक प्रकारचें ग्रामस्वराज्य स्थापूं शकतील. डेनमार्कमध्यें असल्या शेतकऱ्यांनीं राज्याच्या मंत्रिमंडळांत सुद्धां आपला प्रवेश करून घेतला आहे, व तेथें त्यांच्या धोरणानेंच राज्यकारभार चालतो.

प्रत्येक खेड्यांत खालील धंदे चालूं शकले पाहिजेत:—

१ धान्य, फळें, भाजीपाला, दूधदुभतें, गुरेंढोरें यांची उत्तम पैदास करणें.

२ वस्त्रें तयार करणें व शिवून कपडे बनविणें.

३ घरें बांधणें व त्याला लागणारें सामान तयार करणें.

४ सुतारकाम व लोहारकाम, दोरखंड बनवणें वगैरे.

५ कातड्याचे जिन्नस तयार करण्याचा धंदा.

६ मालाची ने—आण करणें.

७ औषध, वनस्पति वगैरे तयार करून रोगोपचार वगैरे करणें.

८ लोकांनां शिक्षण व योग्य सल्ला देण्याची सोय.

९ कथा—कीर्तन पुराण, धर्मोपदेश करण्याची व्यवस्था.

१० पतपेढ्या.

व ही व्यवस्था निर्वेध चालण्याकरितां एक ग्रामपंचायत स्थापली पाहिजे. शहरांतहि अशीच सुधारणा घडवून आणली पाहिजे. ही सर्व सुधारणा सुरळीतपणें कांहींहि विघ्न न येतां पार पडेल असें नाहीं. आंतून व बाहेरून विघ्नें वरींच येतील; पण त्यांनां भिऊन उपयोगी नाहीं. करारीपणानें व नेटानें त्यांनां तोंड देणें हीच त्याला तोड आहे. हीच तपश्चर्या. याच तपश्चर्येचें फळ उन्नति होय. ही तपश्चर्या

ज्या समाजाकडून होऊं शकणार नाहीं, त्यानें मेलें पाहिजे. 'नान्यः पन्था विद्यतेऽयनाय !' चालीरीतींत सैतान बसला नाहीं, मनुष्याच्या वृत्तींत बसला आहे. 'मारा'ची प्रचंड सेना उभी आहे व तिनें आपणाला प्रायः घेरून टाकलें आहे. तिच्याविरुद्ध झगडण्यास देवसेना निर्माण केली पाहिजे. नीच खलांच्या उद्योगाला आळा घालण्यास न्यायनिष्ठुर, सात्विक व दीर्घोद्योगी लोकांच्या अविश्रांत श्रमाचे—भगीरथ प्रयत्नाचे डोंगर पडले पाहिजेत. ह्मणजे पापी असुरचमु हतवीर्य होईल, पापाची सद्दी संपेल व सत्ययुगास प्रारंभ होईल. हें सर्व आपल्याच हातांत आहे. *उद्योग करूं तर तरूं, नाहींतर मरण ठेवलेलेंच. पूर्वजांचें पुण्य, तेहतीस कोटि देवता, दिव्य इतिहास, शास्त्रेंपुराणें कांहींच मदतीस* येणार नाहींत, हें नीट लक्ष्यांत बाळगून आतां उद्योगाला लागलें पाहिजे. राहणी टापटिपीची व व्यवस्थित केली पाहिजे, मिळून काम करण्याला शिकलें पाहिजे,ह्मणजे सामर्थ्य वाढेल व इष्ट गोष्टी साध्य होतील.

पुराणांतरीं अमृतसंजीवनीचें वर्णन आपण ऐकतों. तिचें प्राशन करतांच मनुष्यांत नूतन प्राण संचार करतो व तारुण्य येतें. ही संजीवनी आतां मिळण्याची वानवाच आहे. पण वॉशिंग्टनची शिक्षणपद्धति व समाजसुधारणेची दिशा मात्र खास अमृतसंजीवनी आहे. हिचा हा अद्भुत गुण ओळखून जो समाज हिचें सेवन करील, तो खात्रीनें नवजीवनपूर्ण होईल. आपली प्राचीन विख्यात श्रेष्ठ आर्यभूमि या संजीवनीचें सेवन करून अतुल पराक्रम करण्यास आणि मानवजातीच्या गुरुस्थानीं पुनः विराजमान होण्यास तयार होईल काय?

ईश्वरकृपेनें तथास्तु.

**दत्तात्रेय.**

# माझें व्यापक शिक्षण.

## प्रकरण पहिलें.

## मनुष्य आणि वस्तु यांपासून मिळालेलें शिक्षण.

[ पुस्तकी ज्ञानापेक्षां अनुभविक ज्ञान कसें श्रेष्ठ असतें व दुसऱ्याच्या उसन्या विचारांपेक्षां स्वतः प्रयोग करून पाहून ठरविलेल्या सिद्धान्तानें आत्मविश्वास कसा उत्पन्न होतो, हें या प्रकरणांत डॉ० वाशिंग्टननीं दाखविलें आहे. गरिबीमुळें उन्नतीच्या मार्गांत कांहीं अडचणी येतात, हें खरें: पण उत्साहानें कार्य करणाराला गरीबीमुळेंच अशा कांहीं संधि मिळतात, कीं, त्या श्रीमंत मनुष्यांनां मिळत नाहींत ह्मणून त्यांची कींवच केली पाहिजे. अमूक गोष्ट वाचूं नको किंवा करूं नको, असें सांगितल्यानें जशी तीच गोष्ट वाचण्याची जिज्ञासा अथवा तेंच काम करण्याचा आग्रह तीव्र होतो, त्याप्रमाणें निग्रोला शिक्षण मिळावयाचें नाहीं अथवा निग्रोच्या हातून कोणतीहि संस्था चालूं शकणार नाहीं, अशी वृत्ति त्या वेळच्या समाजांत होती, ह्मणूनच डॉ० वाशिंग्टनला अंगीकृत कार्य यशस्वी करण्याकरितां भगीरथ प्रयत्न करण्याचा हुरूप आला. कोणतीहि गोष्ट उच्च कुलाच्या अथवा श्रीमंतीच्या किंवा विद्वत्तेच्या जोरावर बुकर वाशिंग्टनला आयती मिळाली नाहीं. प्रत्येक बाबतींत त्याला अश्रांत श्रम करावे लागले; यामुळें त्याला प्रत्येक गोष्टीची, प्रत्येक वस्तूची व प्रत्येक कामाची खडानूखडा माहिती झाली, व अशी खडानूखडा माहिती ज्याला असते, त्यालाच सामर्थ्य प्राप्त होतें व तोच कर्तबगार ठरतो, तोच पुरुषार्थी होतो. शुद्ध दृष्टि, अचूक धोरण व प्रबळ इच्छाशक्ति ह्मणजे निश्चय त्याला प्राप्त होतात. गरिबींत जन्म येणें दैवावर किंवा पूर्वकर्मावर अवलंबून असेल; परंतु गरिबींत किंवा अवनत स्थितींतच रहावें लागणें हें मात्र आपल्याच नालायकीचें लक्षण आहे. पुरुषार्थानें महत्कार्य हातीं घेतल्यास आपली कर्तृत्वशक्ति वाढते, जगाचा अनुभव मिळतो व थोर विभूतींशीं संबंध येतो. त्यांच्या सत्संगतीनें आपलें मन उदात्त होतें व त्यायोगें खरें थोरपण अंगीं येतें. पुस्तकांच्या अध्ययनापेक्षां अशा महात्म्यांच्या स्वभावाचें व वर्तनाचें अध्ययन अधिक फायदेशीर होतें व आपला आचार श्रेष्ठ होतो.

वाल्डविन नांवाच्या एका गृहस्थाचें दिलेलें उदाहरण वाचण्यालायक व अत्यंत मननीय आहे. नांव मिळविण्याच्या आशेनें एकाद्या संस्थेचे पेट्रन ( पोशिंदे ) बनणारे, पण एक दिवस देखील त्या संस्थेकडे ढुंकूनहि न पहाणारे लोक वाल्डविनचा कित्ता आपल्या डोळ्यांसमोर ठेवतील व आपली ह्मटलेल्या संस्थेचे गुणदोष प्रेमबुद्धीनें पाहून तिला मदत करतील, तर अनेक मुमुर्षू संस्थांत नूतन जीवनसंचार होईल व समाजाची भरभराट झपाट्यानें होईल. उलटपक्षीं आपली संस्था कांहीं खरेंखुरें काम करीत आहे, अशी लोकांची खात्री पटविल्याशिवाय लोकांनीं आपल्याला मदत करावी अशी चालकांनीं अपेक्षा करणें ह्मणजे एकाद्या निरक्षर ब्राह्मणानें 'मी याचना करतों एवढ्याचकरितां मला दक्षिणा द्या' अशी लाजिरवाणी भिक्षा मागण्यासारखेंच आहे, हें आमच्या संस्थांचे चालक लक्ष्यांत ठेवतील, तर त्यांचा समाजांत बोज राहून त्यांच्या कामाला व्यवस्थित स्वरूप येईल. संस्थेची अंतर्बाह्य व्यवस्था चोख ठेवणें हेंच यशस्वितेचें मुख्य अंग आहे. ]

दैवयोगानें माझें सर्व जीवितच एका प्रश्नाशीं—एका बिकट, भानगडीच्या पण महत्त्वाच्या प्रश्नाशीं जोडलें गेलें आहे. प्रथमप्रथम मला तें माझें मोठें दुर्दैवच वाटत असे. मी गरिबींत जन्माला आलों हें मला एकपटीनें संकट वाटे, तर माझा जन्म निग्रोच्या कुळांत झाला याचें मला त्याहून शतपटीनें संकट वाटे. तथापि ही मनःस्थिति दुसऱ्याकडे बोलून दाखविण्याचें तर राहोच, पण माझ्या स्वतःशींहि कबूल करणेंसुद्धां माझ्या जिवावर येई. कारण, आपण ज्या स्थितींत जन्माला आलों, त्या स्थितीबद्दल कोणत्याहि मनुष्यानें कुरकुर करणें हें त्याच्या दुर्बलतेचें व भेकडपणाचें एक लक्षण आहे, असें माझी मनोदेवताच मला सांगे. पुढेंपुढें तर माझी पूर्ण खात्रीच होऊन गेली, कीं, तसें मानणें ही खरोखरीच दुर्बलता आणि भेकडपणा आहे; इतकेंच नव्हे, तर ती समजूतच होणें मुळीं मोठी चूक आहे. अमेरिकेंतील निग्रोला ज्याप्रमाणें कित्येक गोष्टी प्रतिकूल आहेत, त्याचप्रमाणें कित्येक गोष्टी

त्याला अनुकूलहि आहेत असें मला आढळून आलें; आणि ज्या सवलती किंवा संधि मिळण्याला निग्रोला बाहेरून ह्मणजे इतरांकडून प्रतिबंध होतो, त्यांची उणीव जास्त एकनिष्ठतेनें व अंत:सामर्थ्यानें हवी तशी भरून काढतां येईल, असें माझें ठाम मत झालें.

शाळेंत शिकलेल्या एका गोष्टीवरून माझें वरील ह्मणणें थोडें अधिक स्पष्ट होईल. माझ्या शिक्षकानें एके दिवशीं वर्गाला असें समजावून सांगितलें, कीं, वाफ किंवा इतर कोणतीहि शक्ति जर हवी तशी बाहेर सोडून वायां जाऊं दिली, तर तिचा सर्व जोर नाहींसा होतो. शक्तीला कोंडून ठेविली पाहिजे. वाफेला बॉयलरांत कोंडून ठेविलें तरच तिजपासून चालकशक्ति निर्माण होते. निग्रोच्या बाबतींत ही गोष्ट बरोबर लागू पडते. जातिभेदामुळें जेथेंजेथें निग्रोला दुज्या-भावानें वागविण्यांत आलें आणि त्याला अडचणी सोसाव्या लागल्या, तेथेंतेथें त्याच्यामध्यें वाफ जास्तजास्तच जमत गेलेली आहे, आणि जेव्हांजेव्हां या वाफेचें योग्य दिशेनें योग्य नियमन होत गेलें, तेव्हांतेव्हां निग्रो जातीची उन्नति करण्याच्या कामीं तिचा जोर केवढा मोठा आहे, हें स्पष्ट दिसून आलें आहे. पण उलटपक्षीं शुष्क चळ-वळींत व कोरडया वितंडवादांत जेव्हां तिचा व्यय झाला, तेव्हां तिज-पासून चांगलें असें कांहींच निष्पन्न झालेलें नाहीं.

स्वतंत्रता मिळाल्यावर निग्रोला ज्या ह्मणून अडचणी आल्या, त्यांपासून त्याच्या उत्कर्षाला, माझ्या मतें प्रतिरोधापेक्षां, सदैव नाहीं तरी एकंदरींत, उत्तेजनच जास्त मिळालेलें आहे, हें विधान सकृद्दर्शनीं चमत्कारिक वाटेल; पण तें खरें आहे. उदाहरणार्थ, इंग्रजी भाषा लिहिण्याला व वाचण्याला शिकण्यामध्यें अर्ध्या शतकाच्या आंतच

निग्रोनें जी कांहीं आघाडी मारलेली आहे, तिचें बहुतेक श्रेय गुलामगिरीच्या दिवसांत हें ज्ञान प्राप्त करून घेण्याची त्याला मनाई होती, या गोष्टीकडे आहे. असें मला वाटतें. अनुभवानें आणि निरीक्षणानें मला असें कळून आलें आहे, कीं, जे लोक एकाद्या जातीपासून किंवा समाजापासून सुधारणेंतील उत्तमोत्तम गोष्टी दाबून ठेवूं पहातात, तेच लोक बहुतकरून त्या जातीला किंवा समाजाला त्याच गोष्टी मिळवून देण्यास पुष्कळदां मदत करतात; म्हणजे त्यांचा विरोधच साहाय्यक होतो. माझ्या स्वतःच्या उदाहरणावरून पहातां मी खात्रीनें सांगतों, कीं, अगदीं लहानपणीं शिक्षण संपादण्यासाठीं व मोठेपणीं अलाबामा येथील टस्कगीसंस्था ऊर्जित दशेला आणण्यासाठीं मीं जे कांहीं आटोकाट श्रम घेतले, ते मीं एरवीं खचित सोसले नसते. निग्रो मुलगा म्हणजे केवळ ढ, तो कधींहि शिकावयाचा नाहीं, आणि एकाद्या मोठ्याशा शिक्षणसंस्थेची उभारणी करून ती चांगल्या प्रकारें चालविण्याचें सामर्थ्य तर निग्रो लोकांच्या अंगीं बिलकूल नाहीं, अशी भ्रामक समजूत सर्वत्र दिसून येत असल्यामुळेंच मीं जे कांहीं भगीरथ प्रयत्न केले ते करण्याची मला प्रेरणा झाली, असाच खरोखर प्रकार आहे.

जगांतील भिन्नभिन्न दर्जाच्या लोकांशीं जसजसा माझा परिचय वाढत चालला, तसतसें निग्रोंची स्थिति इतरांहून विशेषशी भिन्न नाहीं असें मला कळूं लागलें. यशस्वी लोकांपैकीं बहुतेकांनां अडचणी सोसाव्या लागल्या आहेत, व बिकट प्रश्न सोडवावे लागले आहेत. अडचणींशीं झुंजतांना आणि कठिण प्रश्न सोडवितांना त्यांनां मानसिक सामर्थ्य व विशद बुद्धि (प्रज्ञा) यांचा जो लाभ झालेला आहे, तो सुखानें आयुष्य घालविणाऱ्या लोकांच्या वांट्याला क्वचितच येतो. अनुभवांतीं मला असें कळून चुकलें आहे, कीं, ज्या मनुष्याला दररोज

कठिण प्रश्नांशीं व प्रसंगांशीं झुंजावें लागत असतें, अशाची कींव करण्याचें कांहीं कारण नाहीं; उलट ज्याला कोणताच प्रश्न सोडवावयाचा नाहीं त्याचीच मात्र कींव केली पाहिजे. दुर्दैव बिचाऱ्याचें, कीं, आपली दानत आकाराला आणून तिची वाढ करणें. आपल्या निसर्गदत्त शक्तींचें अनुशीलन करून त्यांचा विकास करणें, व जीविताचें रहस्य ओळखून जीविताचा स्वामी बनणें, यांपैकीं कांहींच करण्यास त्याला अवसर मिळत नसतो. अर्थात् सुखवस्तु मनुष्याचें हें एक विशिष्ट प्रकारें दुर्भाग्यच होय. अलीकडे तर माझ्या आयुष्याचा एका विशिष्ट प्रश्नाशीं संबंध जडला असल्यामुळेंच केवळ मला विशेष संधि मिळाली आहे, याची अधि-काधिक साक्ष मला पटूं लागली आहे. उदाहरणार्थ, जगाचा अनुभव घेण्याची—व्यापक अर्थी शिक्षण संपादन करण्याची—मला विशेष संधि मिळाली आहे.

तसेंच मी गुलामाच्या कुळीं जन्माला आलों नसतों, तर अत्यंत अशिक्षित लोकांचा दिवसेंदिवस अधिक सहवास मिळण्याची आणि त्यांच्या स्थितीचें प्रत्यक्ष ज्ञान होण्याची संधि मला केव्हांहि मिळाली नसती. माझ्या पहिल्यापहिल्या अनुभवांतील सर्वांत श्रेष्ठ अनुभव झटला ह्मणजे मला पूर्वी गुलाम असलेल्या निग्रो लोकांत मिळून-मिसळून वागण्याची संधि मिळाली, व मला त्यांच्यापासून पुष्कळ गोष्टी शिकावयाला मिळाल्या, हाच होय. हल्लींसुद्धां मला एका किंवा अर्ध्या दिवसाची सवड मिळाली असतां, शहरापासून किंवा आगगाडीच्या रस्त्यापासून कित्येक मैल लांब असलेल्या खेड्यापाड्यांत मी जातों, आणि माझा वेळ एकाद्या निग्रो शेतकऱ्याच्या व त्याच्या कुटुंबांतील मंडळींच्या सहवासांत घालवितों. अशा प्रकारें जें कांहीं खरें सुखसमाधान मला मिळतें, तसें दुसऱ्या कोणत्याहि गोष्टीपासून मिळत नाहीं.

तसेंच पुष्कळ वेळां मला असेंहि वाटलें आहे, कीं, मी जर गुलामाच्या कुळांत जन्मलों नसतों, आणि गुलामाच्या मळ्यांत राहिलों नसतों, तर निसर्गाचें निरीक्षण करण्याची, भूमीवर प्रेम करण्याची, गाई, डुकरें, वृक्ष, फुलें, पक्षी, कृमिकीटक यांवर प्रेम करण्याची, संधि मला कधींहि मिळाली नसती. मला नेहमीं घराबाहेरील उघडया हवेंतील रहाणी अत्यंत आवडते. याचें कारण मी बहुतेक उघडयावरच उपजलों, आणि माझें बालपण घराबाहेरील खुल्या हवेंत गेलें, हेंच पुष्कळ अंशीं असावें. तसेंच निरनिराळे पशु, कोंबडीं, बदकें इत्यादिकांचा मला अगदीं बालपणापासून फार षोक आहे. माझ्या अगदीं लहानपणीं व मी गुलाम असतांनाच माझा प्राणिवर्गाशीं निकट व मनोवेधक असा परिचय झालेला होता.

बालपणीं मी गुलाम असतांना मला माझ्या आईचें दर्शन फारसें होत नसे. कारण, आपल्या मुलांनां सोडून मोठ्या पहांटेला तिला कामावर जावें लागे. आई लवकर निघून गेल्यामुळें मला न्याहारी मिळण्याची वारंवार पंचाईत पडे. या गोष्टीनें माझा जनावरांशीं पहिला परिचय घडून आला.

त्या वेळीं मळ्यांत गायींनां व डुकरांनां मका शिजवून घालीत असत. केव्हांकेव्हां मला न्याहारीला कांहींच मिळालें नसलें, ह्मणजे गायींनां व डुकरांनां जेथें मका देत असत तेथें जाऊन मी शिजलेल्या मक्याचीच न्याहारी करीं, अथवा कधींकधीं मका शिजविण्याच्या ठिकाणीं जाऊन मी माझा वांटा जनावरांच्या पूर्वींच घेत असें.

जनावरांनां मका चारण्याच्या ठिकाणीं मी एकादे वेळीं उशिरां गेलों, तरी कुंपणाभोंवतीं व डोणग्याभोंवतीं सांडलेला बराच मका मला मिळे, आणि तेवढ्यानें माझें समाधान होई. अन्न मिळविण्याचा हा कांहीं

प्रशस्त मार्ग नव्हे, असें कांहींजणांना वाटेल; पण सामान्य लोकसमजुतीकडे दुर्लक्ष्य केलें असतां यांत वास्तविक कांहीं वाईट आहे, असें मला वाटत नाहीं. चांगला शिजलेला मका ज्यानें खाल्ला आहे, तोच त्याची गोडी जाणे. शिजलेल्या मक्याचें भांडें माझ्याजवळून गेलें, कीं, हल्लींहि त्यांतून थोडे दाणे तोंडांत टाकल्यावांचून माझ्यानें राहवत नाहीं.

हल्लीं जी काम करण्याची शक्ति व पात्रता माझ्या अंगीं आहे, तिचें सर्व श्रेय घराबाहेरील उघडया हवेंतील राहाणीच्या माझ्या आवडीला आहे, असें मला वाटतें. आतां मला फारच थोडा वेळ मोकळ्या हवेंत घालवितां येतो हें खरें आहे. सरासरीनें पहातां, रोज एक तासापेक्षां अधिक वेळ मला खुल्या हवेंत खर्च करतां येत नाहीं. पण या एकच तासाचा मी शक्य तितका अधिक फायदा करून घेतों. शिवाय,हा तास केव्हां येईल आणि त्या तासांत मी कायकाय करीन, इत्यादि पूर्व विचारांनींहि मला फार सुख होतें.

टस्कगी येथें घरीं असलों, ह्मणजे मोठ्या पहांटे उठून आपल्या बागेंत हिंडण्यांत किंवा आपलीं बदकें, डुकरें, गायी यांनां पहाण्यांत मी तास अर्धा तास घालवितों. त्यांतल्या त्यांत सवड काढून रोज पहांटेला किती अंडीं नवीन निर्माण झालीं, हें मी स्वतः पहातों. मी घरीं असलों ह्मणजे हें काम माझ्यावांचून दुसऱ्या कोणालाहि मी करूं देत नाहीं. रोपांनां नवीन पालवी फुटलेली पाहून जसा मला आनंद होतो, तसाच आनंद नवीन अंडीं हातांत घेतल्यानें मला होतो. अटकळ आणि फळ, आकांक्षा व तृप्ति या दोन्ही गोष्टी मला फारच सुखकर होतात. आज किती अंडीं मला मिळतात किंवा किती लहान पिलें कवचींतून बाहेर डोकावीत आहेत, हें मीं दिवसाच्या सुरवातीलाच पहातों.

कोंवडयावदकांच्या निरनिराळ्या जातींविषयीं मला फार आस्था आहे. संस्थेनें आपल्या आवारांत व वदकखान्यांत या प्राण्यांच्या निरनिराळ्या जाति पाळिल्या आहेत, तरी मी वरीं त्यांच्या कांहीं विशिष्ट जाति पाळितों.

डुकर हा माझा आवडता प्राणी आहे. वाचकांनां हें विधान कसें रुचेल हें मला सांगतां येत नाहीं; पण तें सत्य आहे. कांहीं साधारण जातींचीं डुकरें—थोडीशीं 'वर्कशायर' व 'पोलंड—चायना' जातीचीं डुकरें मी पाळितों. त्यांची वाढ महिन्याच्या महिन्याला कशी होते, व त्यांच्यांत भर कशी पडते, हें पाहून मला फार समाधान वाटतें.

पुस्तकांच्या द्वारें मला जें कांहीं शिक्षण मिळालें आहे, त्याहून वरेंच अधिक शिक्षण वस्तूंच्या प्रत्यक्ष संघट्टनानें मला प्राप्त झालें आहे. वस्तूंनां हात लावून पहाणें व त्या प्रत्यक्ष हातांत घेणें हें मला फार आवडतें. रोपांची वाढ व जनावरांची चालचालणूक व स्वभाव हीं पहाण्यांत मला मोठी मौज वाटते. तसेंच सुतार जसें लांकूड वापरतो, लोहार जसें लोखंड, अथवा शेतकरी जसा जमीन वापरतो, त्याप्रमाणें वस्तूंशीं होतां होईल तों प्रत्यक्ष व्यवहार करण्याचा मला विशेष नाद आहे. आपल्या भोंवतालच्या पदार्थमात्रांशीं प्रत्यक्ष परीचय करून घेणें हें फार जरूरीचें व फायद्याचें आहे, असें मी स्वानुभवावरून सांगतों.

कांहीं वर्षांपूर्वीं लिहिलेल्या 'आत्मोद्धार' [Up from Slavery] नामक पुस्तकांत मीं माझ्या पूर्ववयाची हकीगत सांगितलेली आहे. आटोकाट प्रयत्न करून मीं शिक्षण कसें मिळविलें, 'टस्कगी नॉर्मल ॲन्ड इन्डस्ट्रियल इन्स्टिटयूट' ही संस्था कोणत्या परिस्थितींत मीं स्थापन केली, इत्यादि सर्व वर्णन त्या पुस्तकांत मीं दिलेलें आहे. टस्कगी संस्था स्थापन करण्याच्या वेळीं माझें वाचन फार थोडें झालें होतें. शिक्षण

या विषयावरील फारच थोडीं पुस्तकें मीं वाचलीं होतीं, आणि शिक्षण-शास्त्राविषयीं मला फारच थोडी माहिती होती. जनरल आर्मस्ट्रांग-सारख्या स्फूर्तिदायक गुरूच्या सहवासांत हाम्पटन संस्थेसारख्या अद्वितीय शाळेंत शिक्षणक्रम पुरा करण्याचें, आणि नंतर शिक्षक या नात्यानें तेथें काम करण्याचें भाग्य मला लाधलें होतें. तथापि ज्या पद्धतींनीं मीं तेथें शिकवीत असें, त्या पद्धतींतील तात्त्विक रचना समजून घेण्याचा मीं कधींच प्रयत्न केलेला नव्हता, आणि मीं माझी स्वतःची नवीन संस्था सुरू केल्यावर मला जेव्हां आरंभालाच नव्यानव्या व बिकट अडचणी आल्या, तेव्हां त्या पद्धति कशा लागू करावयाच्या याचाहि मला कांहींच अनुभव नव्हता, असें ह्मटलें तरी चालेल. अर्थात् मला शिक्षणशास्त्राची जी कांहीं माहिती झाली आहे, ती सर्व टस्कगी संस्थेची योजना ठरविण्यासाठीं आणि तेथील शिक्षणपद्धतींनां व्यवस्थित व कायमचें स्वरूप देण्यासाठीं प्रयत्न करीत असतांना प्राप्त झालेली आहे.

टस्कगी संस्थेच्या कामासाठीं दरवर्षी मोठमोठ्या रकमा गोळा करण्याकरितां मला बरेंच हिंडावें लागे, आणि सर्व तऱ्हेच्या लोकांत मिसळावें लागे. उच्च विद्यापीठांत शिकून तयार झालेले, पुष्कळ वाचन व प्रवास यांचा फायदा घेतलेले, अशा सुशिक्षित लोकांशीं माझी जेव्हां गांठ पडूं लागली, तेव्हां माझीं व्यंगें मला स्पष्टपणें दिसूं लागलीं. ज्या गोष्टीचें माझें ज्ञान फार तर अत्यंत संदिग्ध प्रकारचें असे, अशा कितीतरी गोष्टींविषयीं ते लोक कसें अस्खलितपणें व सहजपणें बोलूं शकतात, हें मला समजून आलें. ते लोक आपल्या भाषणांत कित्येक ग्रंथकारांच्या वचनांचा वारंवार उल्लेख करीत, पण मीं त्यांचे ग्रंथहि वाचलेले नव्हते, व कांहीं कांहीं ग्रंथकारांचीं नांवें देखील मीं पूर्वीं कधीं

ऐकिलेलीं नव्हतीं. यामुळें माझ्या दोषांचें ज्ञान मला चांगलें झालें आणि मी याविषयीं जों जों अधिक विचार करूं लागलों तों तों मी अधिक त्रस्त व खिन्न होऊं लागलों. माझें अंगीकृत कार्य मीं चालू ठेवावें, मला महत्त्वाच्या वाटणाऱ्या गोष्टी मीं वडवून आणाव्या, तर मीं कितीहि नेटानें व जोरानें अभ्यास केला तरी माझ्याहून अधिक सुशिक्षित लोकांची पुस्तकीज्ञानांत बरोबरी करण्याला मला कधींहि वेळ मिळणार नाहीं, हें लक्ष्यांत येऊन मला फारच वाईट वाटे.

तथापि कांहीं कालानंतर मला असें आढळून आलें कीं, जरी मी कांहीं बाबतींत वडयावडया सुशिक्षित लोकांपेक्षां कमी आहें, तरी इतर कांहीं गोष्टींत मी त्यांचेहून श्रेष्ठ आहें. "स्वतःच्या अनुभवानें जीविताच्या एकाद्या अंगाची प्रत्यक्ष माहिती करून घेतलेला पुरुष आपलें जीवितविषयक सर्व ज्ञान केवळ पुस्तकांच्या द्वारें मिळविलेल्या लोकांहून वराच श्रेष्ठ असतो" असें मला आढळून आलें. पुस्तकीज्ञानाचा उपयोग करून किंवा ग्रंथकारांचीं वाक्यें व वचनें पाठ ह्मणून मला जें कांहीं सांगतां आलें असतें त्यापेक्षां स्वतःच्या अनुभवाचा व निरीक्षणाचा उपयोग करून, मीं ऐकिलेल्या गोष्टींचे दृष्टान्त देऊन, माझ्या आयुष्यांत घडलेल्या किंवा इतरांपासून ऐकिलेल्या गोष्टी कथन करून मला माझें म्हणणें अधिक स्पष्टपणें व अधिक ठांसून सांगतां येतें, असें मला दिसून आलें. याशिवाय सूक्ष्म विचारान्तीं माझ्या असेंहि लक्ष्यांत आलें, कीं, ग्रंथकार झाले तरी ते आपल्या ग्रंथांत खरोखर आपल्या स्वतःच्या अनुभवांचा उपयोग करतात, किंवा ज्या कांहीं कल्पना त्यांनीं प्रत्यक्ष व्यवहारांत आचरून दाखविलेल्या असतात त्यांचेंच वर्णन ते आपल्या पुस्तकांत करतात. अर्थात्च त्यांच्या वचनांचा व कल्पनांचा आपण उपयोग

करणें म्हणजे दुसऱ्यांच्या डोळ्यांनीं जगाचें अवलोकन करण्यासारखें होतें.

याचा परिणाम असा झाला, कीं, पुस्तकी ज्ञानाची माझी उणीव, मनुष्य व वस्तु यांच्या प्रत्यक्ष ज्ञानानें भरून काढण्याचा मीं निश्चय केला. मी म्हणालों, कीं, 'जीवंत स्त्रीपुरुष यांचाच मी अभ्यास करणार, आणि जगांत माझ्या भोंवतीं जें कांहीं चाललेलें आहे त्या सर्वांचें मी नीट निरीक्षण करणार.' माझ्या कामांतूनच शिक्षण मिळविण्याचा व मनुष्यांशीं व्यवहार करण्यास शिकतांनाच जीविताचा अभ्यास करण्याचा मीं संकल्प केला. मी आपल्याशीं म्हणालों 'गांठ पडलेल्या प्रत्येक मनुष्यापासून मी कांहीं तरी शिकण्याचा प्रयत्न करीन, तोच माझा ग्रंथ आहे असें समजून मी त्याचें नीट अध्ययन करीन, आणि त्यापासून कांहीं तरी शिकून फायदा करून घेईन.' अशा रीतीनें मनुष्यांपासून शिकण्याचे मीं बुद्धिपुरःसर प्रयत्न सुरू केले. थोर माणसें व लहान माणसें, दुर्जन व सज्जन या सर्वांपासून मी कांहीं ना कांहीं गोष्टी शिकलों. मी जसजसा मनुष्यांचा नीट अभ्यास करूं लागलों व त्यांना जास्त चांगलें ओळखूं लागलों, तसतशी मनुष्यजात मला अधिक आवडूं लागली. इतकेंच नव्हे तर "प्रत्येक प्रकारच्या मनुष्यापासून कांहीं तरी शिकतां येतें," हें तत्त्व माझ्या ठिकाणीं पूर्णपणें बिंबलेलें असल्यामुळें मला कोणीं वाईट रीतीनें वागविलें, किंवा माझा कोणीं अवमान केला, तरी त्यामुळें मला कधीं राग आला नाहीं, किंवा माझी शांतिहि बिघडली नाहीं.

उदाहरणार्थ, कांहीं वर्षांपूर्वीं सभ्यतेचा व औदार्याचा जो कांहीं धडा मला मिळाला, तो मी कधींहि विसरणार नाहीं. टस्कगी संस्थेविषयीं थोडीबहुत आस्था उत्पन्न करण्याच्या हेतूनें मी एका मोठ्या

शहरीं श्रीमंत लोकांच्या भेटी घेत होतों. मीं एका मनुष्याची त्याच्या ऑफिसांत भेट घेतली. तो एकदम माझ्याशीं मोठ्या ताठ्यानें व उपमर्दकारक रीतीनें बोलूं लागला. त्यानें पैसा देण्याचें नाकारलें, एवढेंच नव्हे, तर तो माझ्या ज्ञातीविषयीं असें कांहीं बरळूं लागला, कीं, कोणाहि सभ्यगृहस्थानें परजातीविषयीं तसें भाषण करणें कधींहि योग्य होणार नाहीं. कांहीं मिनिटांनीं त्याच शहरांत मीं दुसऱ्या एका गृहस्थाची भेट घेतली. त्यानें माझें सभ्यतेनें स्वागत केलें, भेटीबद्दल माझे आभार मानले आणि मला मदत करण्याजोगी आपली परिस्थिति नाहीं, असें मला समजावून सांगितलें. दुसऱ्या गृहस्थाच्या भेटीपेक्षां पहिल्या गृहस्थाच्या भेटींत माझा व त्याचा दुप्पट वेळ खर्च झाला. असभ्यपणें वागण्यांत जितका वेळ मोडतो त्याहून अधिक वेळ सभ्यपणानें वागण्यांत खर्च होत नाहीं, असें मी या अनुभवावरून शिकलों.

जगाचा अनुभव घेत असतां पुढेंपुढें गोऱ्या लोकांपासूनच नव्हे, तर काळ्या लोकांपासूनहि कांहीं गोष्टी मी शिकलों आहें. गोऱ्या लोकांशीं कोतेपणानें व द्वेषानें वागणाऱ्या काळ्या लोकांविषयीं पूर्ववयांत मला सहानुभूति वाटत होती. पुढें मी या काळ्या लोकांचा नीट अभ्यास करूं लागलों, तों संकुचित वृत्तीच्या व द्वेषाच्या वागणुकीनें त्यांचा कांहींच फायदा होत नाहीं. अशा वागणुकीनें गोऱ्या लोकांचें वाईट होत नाहीं किंवा काळ्या लोकांविषयीं त्यांचें मतहि बदलत नाहीं; पण उलट गोऱ्या लोकांविषयीं अशा वृत्ति मनांत बाळगल्यानें त्यांचा प्रत्याघात काळ्या लोकांवर होऊन ते अधिक संकुचित व द्वेष्टे होतात, असें मला आढळून आलें.

पुढें दिलेल्या प्रकरणांमध्यें वृक्ष, जनावरें इत्यादि भौतिक पदार्थांशीं नव्हे, तर विशेषतः मानवी संस्था, राजकारण, वर्तमानपत्रें, शिक्षण-

विषयक व सामाजिक भिन्नभिन्न प्रश्न इत्यादिकांशीं माझा संबंध कसा आला, याचीच थोडीशी हकीगत मीं दिलेली आहे; आणि तसें करतांना मला शिक्षण कसकसें मिळत गेलें याचेंहि दिग्दर्शन तेथच्यातेथें करण्याचा मीं यत्न केलेला आहे.

माझ्या अनुभवांतील हा उत्तरभाग लिहिण्याचा एक हेतु, 'आत्मोद्धार' पुस्तकांत सुरू केलेली माझ्या शिक्षणाची कथा पुरी करावी, टस्कगीसंस्थेंत हल्लीं प्रचलित असलेल्या शिक्षणपद्धति आम्हीं कशा ठरविल्या याविषयीं वेळोवेळीं विचारलेल्या प्रश्नांचीं उत्तरें द्यावीं, आणि सरतेशेवटीं "उन्नतीच्या वाटेनें जाणाऱ्या लोकांनीं प्रतिकूल परिस्थिति कशी अनुकूल करून घ्यावी हें माझ्या ज्ञातिबांधवांच्या हितार्थ स्पष्ट करावें व हिरावून घेतलेल्या बाह्य गोष्टींची उणीव अंत:सामर्थ्यानें कशी भरून काढावी," हें दाखविण्याचा आहे.

वस्तूंपासून मी कांहीं शिकलों आहें, हें खरें आहे; पण त्याहून अधिक मी मनुष्यांपासून शिकलों आहें. माझ्या अंगीकृत कार्यामुळें देशांतील अत्यंत उदार, मोठ्या मनाच्या व सार्वजनिक कार्याला वाहून घेतलेल्या थोर पुरुषांशीं माझा लवकरच संबंध घडून आला. अशा सत्पुरुषांपासून मी काय शिकलों हें दाखविण्याचा प्रयत्न मीं पुढील प्रकरणांत केला आहे. गुरुवर्य जनरल आर्मस्ट्रांग यांच्या खालोखाल परलोकवासी वुइल्यम् एच्. बाल्डविन नामक एका सद्गृहस्थापासून मी सर्वांत अधिक गोष्टी शिकलों. या गृहस्थाचा व माझा संबंध कसा होता, याविषयीं थोडीशी माहिती सांगितली असतां, सत्पुरुषांच्या समागमापासून मी कायकाय शिकलों याचें दिग्दर्शन आपोआप होईल.

मिस्टर बाल्डविन यांची पहिली भेट माझ्या लक्ष्यांत चांगली आहे. पण ती नक्की केव्हां झाली, याचें मला स्मरण नाहीं. त्या वेळीं ते सदर्न

(दक्षिण) रेल्वेचे व्यवस्थापक व उपाध्यक्ष होते, आणि त्यांचें मुख्य ऑफिस वॉशिंग्टन (डी. सी.) येथें होतें. बोस्टन येथून त्यांच्या वडिलांकडून मीं त्यांनां एक पत्र आणलेलें होतें. एके दिवशीं सकाळीं त्यांच्या ऑफिसांत जाऊन तें पत्र मीं त्यांच्या हातीं दिलें. वहिवाटीप्रमाणें त्यांनीं तें पत्र लक्ष्यपूर्वक वाचलें. नंतर 'टस्कगीसंस्था आणि तिचें कार्य' या विषयावर आमचें संभाषण सुरू झालें. थोडयाच मिनिटांत माझी अशी खात्री झाली, कीं, आज मात्र माझी एका खऱ्या मार्मिकाशीं गांठ आहे. ज्याच्या मनामध्यें यत्किंचित् लटपट किंवा कपट नाहीं, ज्याचेपासून आपले हेतु व विचार लपविणें अशक्य आहे, अशा पुरुषासमोर आपण आहों, असें मला त्यावेळीं खरोखर वाटलें. पहिल्या भेटींत त्यांचेविषयीं झालेलें मत पुढें केव्हांहि बदलण्याचा प्रसंग मला आला नाहीं, आणि त्या वेळीं जमलेल्या प्रेमभावांत पुढें केव्हांहि अंतर पडलें नाहीं.

मिस्टर बाल्डविन यांनीं प्रथम टस्कगीच्या कामांत कांहीं विशेष आस्था दर्शविली नाहीं. ते ह्मणाले " मी एकदां येऊन तुमची संस्था नीट तपासीन आणि खरोखर चांगलें कार्य तुह्मी करीत आहां असें मला आढळून आलें, तर मी तुह्माला शक्य तितकी मदत करीन."

प्रथम भेटीनंतर थोडयाच दिवसांत 'संस्था नीट तपासून आह्मी कांहीं खरें काम करीत आहों कीं नाहीं हें पहाण्याचें' वचन त्यांनीं पाळिलें. ते एके दिवशीं आले आणि कसलेल्या सत्ताधाऱ्याप्रमाणें त्यांनीं संस्थेची प्रत्येक शाखा पूर्णपणें तपासून पाहिली. संस्थेच्या रचनेंत व व्यवस्थेंत त्यांनां बऱ्याच चुका आढळून आल्या; पण संस्था काय साधण्याचा प्रयत्न करीत आहे हें त्यांनीं जाणलें, आणि एकदम मदत करण्याचें ठरविलें. तेव्हांपासून संस्थेला हरएकप्रकारें मदत कर-

ण्याची कोणतीहि संधि त्यांनीं वायां जाऊं दिली नाहीं. संस्थेच्या वाढीविषयींच्या व पतीविषयींच्या प्रत्येक गोष्टींत संस्थेशीं संबंध असलेल्या कोणत्याहि इसमाप्रमाणें त्यांनां उत्सुकता व अभिमान वाटत होता. निग्रो लोकांच्या उन्नतिविषयीं कळकळ बाळगणारा. मिस्टर बाल्डविनहून अधिक आस्थेवाईक पुरुष मला अझून आढळला नाहीं. टस्कगीच्या त्यांच्या शेवटच्या भेटींत, मिसेस वॉशिंग्टन मला एके दिवशीं ह्मणाली "हे जेव्हां येथून जातील तेव्हां मला बरें वाटेल." तिनें असें ह्मणण्याचें कारण इतकेंच होतें, कीं, ते गृहस्थ संस्थेसाठीं आपल्या जिवाला जी अत्यंत हुरहूर लावून घेत असत, ती तिच्यानें पहावेना. त्यांची सहानुभूति फारच खोल होती. संस्थेच्या कार्याचें महत्त्व त्यांनीं जाणिलें होतें, आणि संस्थेच्या अडचणी त्यांनां कळल्या होत्या. पाहिलेल्या प्रत्येक गोष्टीनें त्यांच्या अंतःकरणाला पीळ पडे. विद्यार्थी व शिक्षक यांचे नेटाचे प्रयत्न पाहून त्यांचें मन कळवळत असे. संस्थेच्या वातावरणांतून बाहेर जाणें व संस्थेच्या कार्याचा विचार सोडणें आणि अशा रीतीनें विश्रांति घेणें हें त्यांच्या प्रकृतीला अवश्य होतें. पुढें ते ज्या रोगाला बळी पडले, त्या रोगानें आधींच त्यांनां घेरून टाकिलें होतें, याची कल्पना त्या वेळीं आह्मांपैकीं कोणालाहि आली नाहीं.

मिस्टर बाल्डविन यांनीं निग्रो लोकांशीं आपलें तादात्म्यच करून घेतलें होतें, असें ह्मटलें तरी चालेल. इतर कोणत्याहि जातीप्रमाणें आपल्या जातीलाहि जगांत महनीय व सन्माननीय स्थान प्राप्त झालें पाहिजे, या निग्रो लोकांच्या महत्त्वाकांक्षेशीं या तादात्म्यबुद्धीमुळेंच त्यांची पूर्ण सहानुभूति होती. त्यांची पुरी पारख ज्यांनां झालेली नव्हती, असे लोक, त्यांनीं प्रसंगोपात्त जातिविषयक प्रश्नावर काढलेले

उद्गार ऐकून असें अनुमान करीत, कीं, निग्रो लोकांच्या उच्च महत्त्वाकांक्षेशीं त्यांची कांहीं पूर्ण सहानुभूति नाहीं ही त्यांची समजूत अर्थात्च चुकीची होती. खरें ह्मटलें तर ह्मपाट्यानें पुढें सरून यश संपादण्यासाठीं निग्रो लोकांची धडपड चालली असतां त्यांनीं मृगजलाच्या मागें लागून फसूं नये, याबद्दल मि. बाल्डविन यांच्या जिवाला सर्वांपेक्षां जास्त तळमळ लागून राहिलेली असे. त्यामुळें निग्रो लोकांनां चुकीच्या मार्गापासून परावृत्त करीत असतां ते त्यांच्या हिताच्या आड येतात, असा केव्हां-केव्हां लोकांनां भास होई.

निग्रोंच्या कल्याणाविषयीं मि. बाल्डविन यांनां कळकळ होती, म्हणून दक्षिणेंतील गोऱ्या लोकांच्या उन्नतीविषयीं त्यांनां कमी आस्था होती, असा भाव माझ्या कोणत्याहि विधानांतून निघत असेल, तर मी त्यांचा मोठा अन्याय केल्याप्रमाणें होईल. परंपरागत परिस्थितीमुळें दोन्ही ज्ञातींच्या उन्नतीला कांहीं अंशीं प्रतिबंध होतो खरा, पण याबद्दल कोणतीहि ज्ञात पूर्णपणें जबाबदार नाहीं, असें त्यांचें स्पष्ट मत होतें. एका ज्ञातीचें हित दुसऱ्या ज्ञातीच्या हिताशीं अखेरीला संलग्न आहे, हेंहि ते जाणत होते. निग्रोंच्या शिक्षणाकरितां त्यांनीं पुष्कळ खटपट केली हें खरें, पण दक्षिणेंतील अभागी गोऱ्या लोकांच्या शिक्षणासाठीं पैसा व मदत मिळविण्याची संधि त्यांनीं केव्हांहि वायां दवडली नाहीं.

टस्कगीसंस्थेच्या जमाबंदीची नीट व्यवस्था लावून मि. बाल्डविन यांनीं त्या संस्थेवर फार उपकार केलेले आहेत. ते प्रथम संस्थेचे ट्रस्टी ( पंच ) झाले, तेव्हां संस्थेची व्यवस्था, जमाखर्च, हिशेबाची पद्धति इत्यादिकांची स्थिति फारच अनिश्चित व असमाधानकारक होती. आमच्या पैशाचा विनियोग आणि आमच्या वार्षिक अंदाजपत्रिकेंतील बाबी, हें सर्व ते लगेच नीट तपासून पाहूं लागले. संस्थेची वाढ तर

झपाट्यानें होत चालली. संस्थेनें चालविलेले किफायतशीर धंदे, आम्हीं बांधावयास सुरू केलेल्या मोठमोठ्या इमारती, संस्थेच्या निरनिराळ्या शाखांतील देवघेव व व्यवहार, या सर्वांमुळें संस्थेचे हिशेब गुंतागुंतीचे व घोंटाळ्याचे झाले होते, आणि सर्व कामाची चोख व्यवस्था लावणें हा एक मोठा महत्त्वाचा प्रश्न होऊन बसला होता.

मि. बाल्डविन आणि मीं अशा उभयतांनीं मिळून काम केलेल्या मागील वर्षांची आठवण करून पहातां, मला असें वाटतें, कीं, माझ्या आयुष्यांत जर कांहीं उत्तम काळ गेला असेल, तर तो ब्रुकलिन येथें त्यांच्या पुस्तकालयांत त्यांच्याबरोबर घालविलेला काळ होय. त्या प्रसंगीं आम्ही दोघे मिळून संस्थेच्या अडचणींचा सांगोपांग विचार करीत असूं, व त्या कामीं उद्भवणाऱ्या प्रश्नांचाहि खल करीत असूं. मी न्यूयॉर्कला आलों म्हणजे ते मला वरचेवर आपल्या घरीं बोलावीत, आणि जेवणानंतर आम्ही त्यांच्या पुस्तकालयांत तीनतीन चारचार तास खर्च करीत असूं. केव्हांकेव्हां मध्यरात्र उलटून गेली तरी आमचें खलबत संपत नसे.

मि. बाल्डविन यांच्यापासून मी पुष्कळ गोष्टी शिकलों. त्यांत ही एक आहे, कीं, 'क्षुद्र, कोत्या गोष्टींनींच लोकांमध्यें भेदभाव उत्पन्न होतो. मोठ्या कार्यांनीं लोक एकत्र होतात. जाति, पंथ, स्थळ इत्यादिकांचे क्षुद्र विचार मनांत न आणतां, कर्तव्य म्हणूनच जो कोणी एकादें चांगलें काम उदार मनानें करण्यास सुरुवात करतो, आणि अशा रीतीनें जो आपलें आयुष्य सत्कार्यांत घालवितो, त्यालाच जगांतील उत्तम व श्रेष्ठ अशा पुरुषांची मैत्री व मदत यांचा लाभ होतो.'

मी पुनः सांगतों, कीं, गुलामाच्या कुळांत माझा जन्म झाल्याबद्दल मला कांहीं वाईट वाटत नाहीं. एका प्रश्नाशीं माझा संबंध जडला,

त्या प्रश्नाला मला जखडून घ्यावें लागलें, ह्मणून मला कांहीं वाईट वाटत नाहीं. उलट, त्या प्रश्नानें मला योग्य वळण लाविलें आहे, माझें जीवित सार्थ व धन्य केलें आहे, आणि दुसऱ्या कोणत्याहि मार्गानें न मिळणारें सुखसमाधान व मैत्री यांची मला अकल्पित जोड करून दिली आहे.

## प्रकरण दुसरें.

# प्रश्नानुरूप संस्थेची उभारणी.

[ अमेरिकेंतील निग्रो गुलामांपैकीं बरेचसे संयुक्त संस्थानांच्या दक्षिणभागांत असत. उत्तरभागांतील गोऱ्या लोकांनीं गुलामांनां दास्यमुक्त करण्याचा निश्चय केला; पण दक्षिणेंतील गोऱ्यांनां तो मान्य झाला नव्हता. तेव्हां उत्तरेंतील गोऱ्यांनीं दक्षिणी गोऱ्यांशीं लढून गुलामांनां मुक्त करणें त्यांनां भाग पाडलें. पुढें अशा रीतीनें दास्यमुक्त पण अज्ञानयुक्त निग्रोंनां उद्योगप्रधान शिक्षण देण्याचें कार्य त्यांच्याचपैकीं एकानें ह्मणजे आमचे चरित्रनायक बुकर टी. वॉशिंग्टन यांनीं उचललें होतें, हें 'आत्मोद्धार' पुस्तक वाचणाऱ्या महाराष्ट्रीयांनां ठाऊक आहेच. या कामीं वॉशिंग्टनला पहिल्यापासून एक तिहेरी पेंच पडला होता. तो असाः—

उद्योगधंद्यासारख्या मेहनतीच्या कामांत न पडतां पुस्तकी विद्या शिकावी, परीक्षा द्याव्या, मोठमोठ्या सरकारी नोकऱ्या पटकवाव्या, राजकीय चळवळींत भाग घ्यावा, आणि आपणांला हें ध्येय प्राप्त करून घेण्याच्या कामीं विरोध करणाऱ्या दक्षिणी गोऱ्यांची खोड मोडावी, असें बऱ्यांच निग्रोंनां वाटे. उलट-पक्षीं, नुकते आपल्या घरीं गुलाम म्हणून रावणारे काळे निगर आज आपल्या बरोबरीनें खुर्चीसखुर्ची लावून राज्यकारभार चालवूं पाहतात, याचा त्या दक्षिणी गोऱ्यांनां विषाद वाटे, व त्यांनां शिक्षणच मिळूं नये असा ते प्रयत्न करीत. इकडे उत्तरेच्या गोऱ्यांनां वाटे, कीं, आपलें रक्त खर्ची घालून ज्यांनां आपण स्वातंत्र्य मिळवून दिलें, ते अतःपर लांकुडतोडे किंवा पाणके न राहतां स्वातंत्र्योपभोगक्षम होतील असेंच त्यांनां शिक्षण मिळावें.

आतां बुकरची स्थिति कशी होती पहा. पाण्यांत राहून ज्याप्रमाणें माशांशीं वैर धरतां येत नाहीं, त्याप्रमाणें दक्षिणी गोऱ्यांशीं फटकून निभाव लागावयाचा नाहीं. बरें, उत्तरेच्या गोऱ्यांनां नाराज करूनहि उपयोगी नाहीं; कारण, ते धन-वान् होते, व त्यांच्या भरींव सहानुभूतीवरच संस्था चालणें शक्य होतें. आणि पुनः स्वजातीय निग्रोंची समजूत घातल्यावांचून तर गत्यंतर नाहीं. कारण, त्यांनांच तर शिक्षण द्यावयाचें. अशा तिहेरी कैचींत प्रत्येक पक्षाशीं तोंडापुरतें गोड बोलूनहि फार दिवस पल्ला पोहोंचविणें शक्य नव्हतें.

अखेर परिस्थितीचा परिपूर्ण विचार करून वॉशिंग्टननें आपला रस्ता निश्चित केला, व यांतच त्याचें अलौकिक लोकनायकत्व व्यक्त होतें.

त्यानें पाहिलें, कीं, या तीन पक्षांतील विरोध यथार्थ नाहीं. निग्रो जोंपर्यंत गुलाम होता तोंपर्यंत तो पूर्ण कह्यांत राहण्यास त्यानें अज्ञान दशेंत राहणेंच दक्षिणी गोऱ्यांनां इष्ट होतें; पण स्वतंत्र झाल्यानंतर निग्रो अशिक्षित असणें गोऱ्यांच्या खऱ्या हिताला विघातकच होतें. अशिक्षित निग्रो भिक्षेकऱ्यांत भर टाकील, पण तोच निग्रो धंदेकामांत प्रवीण झाल्यास गोऱ्यांचें जीवन सुखावह करून दक्षिण संस्थानांची सांपत्तिक स्थिति सुधारण्याच्या कामीं महत्त्वाची भर घालील. ही गोष्ट दक्षिणी गोऱ्यांनां आज ना उद्यां पटल्यावांचून रहाणार नाहीं, असा वॉशिंग्टनला विश्वास होता. तसेंच कोणत्या कां प्रकारानें होईना, दक्षिणेंत काळ्यागोऱ्यांचा निकट संबंध शेंकडों वर्षांचा आहे, व कांहीं झालें तरी तो तुटणें अशक्य आहे. वादविवादाच्या भरीला पडून जरी दोन्हीं जातींत तात्पुरतें वितुष्ट आलें असलें, तरी आजपर्यंतच्या सेवेमुळें दक्षिणी गोऱ्यांच्या मनांत निग्रोसंबंधानें कृतज्ञता वास करीत होती.

हें सर्व जाणून वॉशिंग्टननें म्युनिसिपल कामांत, निवडणुकीच्या कामांत किंवा शांततारक्षणाच्या कामांत काळगोरा असा निष्कारण भेद न मानतां सार्वजनिक हित कशांत आहे, हें पाहूनच आपलें वर्तन निश्चित केलें. उलट, गोऱ्यांची खुशामत करून, किंवा निग्रोंपासून दूरदूर राहून गोऱ्यांत मिसळण्याचा निंद्य व हास्यास्पद प्रयत्न त्यानें कधींच केला नाहीं. आपण निग्रो आहों म्हणूनच उत्तरेचे किंवा सर्व ठिकाणचे लोक आपणाला बहुमान आणि साहाय्य देतात, हें तो विसरला नव्हता. तसेंच, लोकांनीं दिलेल्या मदतीचा व पैशाचा उत्तमोत्तम उपयोग आपण करतों व दिलेल्या दानाचें चीज होतें, हें तो सर्वांच्या निदर्शनाला आणी.

पण या सर्वांहून महत्त्वाचें काम म्हणजे स्वबांधवांचें समाधान करून त्यांची समजूत करणें, हें होय. याकरितां प्रथमप्रथम तर आपल्या परगण्यांत फिरून प्रत्येक निग्रोची त्याला ओळख करून घ्यावी लागली, व त्यांची परिस्थिति समजून घेतल्यानें आपल्या कामाची दिशा ठरविण्यास त्याला बरीच मदत झाली. पुढें त्यानें पाहिलें, कीं, निग्रोसमाजाला संघटित करणारे कांहीं रज्जू आहेत, व त्यांचा आपणाला बराच उपयोग होईल. हे रज्जू म्हणजे निग्रोंचे धार्मिक संघ, मेसॉनिक संघ, भजनी मेळे व निग्रोंचीं वर्तमानपत्रें. या सर्वांशीं

वॉशिंग्टननें आपला उत्तम परिचय करून घेतला, व त्यांच्या मार्फत आपल्या शिक्षणकार्याला स्वज्ञातियांची सहानुभूति मिळविली, आणि टस्कगीची संस्था आपलीच आहे अशी त्यांची भावना करून दिली. त्याचें वर्तमानपत्राशीं वागण्याचें धोरण आपल्याकडील कार्यकर्त्यांनीं आणि पत्रकारांनींहि मनन करण्याजोगें आहे.

आपलें तत्त्व न सोडतां निरनिराळ्या पक्षांशीं मिळतें घेण्याची कठिण कला वॉशिंग्टननें साध्य करून घेतली, यांतच त्याची असाधारण कर्तबगारी दिसून येते. ]

टस्कगी येथें माझें काम सुरू होतांच ज्ञातिविषयक लोकमताशीं ( ह्मणजे ज्ञातिभेदामुळें व ज्ञातिद्वेषामुळें काळे व गोरे या उभयतांचेहि जे ग्रह झालेले होते त्यांच्याशीं ) कसें वागावें, याचा मला मोठाच प्रश्न येऊन पडला.

दक्षिणेंतील एका लहानशा शहरांत एक लहानशी निग्रो औद्योगिक संस्था स्थापन करणाऱ्या मनुष्याला, मोठमोठ्या सामाजिक किंवा शिक्षणविषयक प्रश्नांवरील लोकमत विशेषसें साहाय्यकारक किंवा प्रतिबंधक व्हावें, हें कोणालाहि चमत्कारिक दिसेल; पण अलाबामा संस्थानची त्या वेळची परिस्थिति तशी होती खरी, आणि ह्मणूनच माझें काम सुरू होऊन थोडे दिवस झाले नाहींत तोंच कांहीं मुख्यमुख्य प्रश्नांविषयीं माझीं मतें मला निश्चित व ठाम करावीं लागलीं.

हे प्रश्न माझ्यासमोर असे उपस्थित झाले:—आमच्या मुलांनां श्रमाचीं कामें करण्यास शिकविण्याची योजना तुह्मीं कां केली, असें निग्रो लोक मला विचारूं लागले. आह्मांला व आमच्या वाडवडिलांनां सतत अडीचशें वर्षें सक्तीनें मेहनतीचीं कामें करावीं लागलीं आहेत, आणि आतां जें आह्मीं आमच्या मुलांनां शाळेंत पाठवूं इच्छितों तें एवढ्याच करितां, कीं, त्यांनां यापुढें तरी काम करण्याची दगदग न पडतां गोऱ्या

लोकांप्रमाणें त्यांनीं स्वतंत्र होऊन सुखानें रहावें.सामान्यतः काळ्या लोकांची वृत्ति अशा प्रकारची होती.

उलटपक्षीं, निग्रोला कोणत्याहि प्रकारचें शिक्षण देऊं नये, असें दक्षिणेंतील कांहीं गोऱ्या लोकांचें मत होतें. दुसरे कित्येक असें विचारीत, कीं, तुह्मी केवळ उपदेशक व शिक्षक शिकवून तयार करणार किंवा शिक्षित चाकर तयार करणार ?

मी निग्रोला केवळ लांकुडफोड्याचें किंवा पाणक्याचें काम शिकवणार, असें उत्तरेंतील कांहीं लोकांना वाटलें. निग्रोला मनुष्य व नागरिक बनविण्याचें शिक्षण देण्याचे प्रयत्न माझ्या शाळेंत होणार नाहींत, अशी त्यांना शंका आली.

अर्थात्, निग्रोला कोणत्या प्रकारचें शिक्षण द्यावें किंवा देऊं नये, याविषयींचीं हीं निरनिराळीं मतें ज्ञातिभेदाच्या तीव्र भावनांनीं लोकांच्या ठिकाणीं पूर्णपणें भिनून गेलेलीं होतीं. अलाबामा संस्थानांत '*कारपेट बॅगर' लोकांच्या सत्तेचा नुकताच शेवट झालेला होता. पुनर्घटनात्मक कालांतील खळबळीनें व चळवळीनें गोरे लोक निग्रो लोकांवर फारच क्षुब्ध झालेले होते.

दुसऱ्या पक्षीं राजकारणांतील आपली जागा किंवा भाग बहुतेक अंशीं नुकताच नष्ट झाल्यामुळें निग्रो लोक फारच खिन्न व हताश झालेले होते. आपणाला पुनः गुलामगिरींत जावें लागेल, अशीहि

* अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांपैकीं उत्तरेचे व दक्षिणेचे लोक यांच्यामध्यें १८६५ मध्यें आपापसांत लढाई झाल्यावर उत्तरेकडील इसम दक्षिणेकडे येऊन राजकीय हक्क स्वार्थपरायणतेनें मिळविण्याची खटपट करूं लागले. त्यांपैकीं प्रत्येकाला तिरस्कारानें हा शब्द लावतात.–रानडे यांचा कोश. याविषयीं व पुनर्घटनात्मक कालाविषयीं सविस्तर माहिती "आत्मोद्धार" प्र. ५ मध्यें पहावी.

पुष्कळांनां भीति वाटत होती. तसेंच या वेळीं उत्तर व दक्षिण या दोन्ही भागांत राजकीय बाबतींत अद्यापहि बरेंच वितुष्ट होतें.

मी या वेळीं परस्परविरुद्ध असलेल्या अशा तीन शक्तींच्या किंवा पक्षांच्या कैचींत सांपडलों. मीं योजिलेलें कार्य तडीस नेत असतां प्रत्येक पक्षाकडून कोणत्या ना कोणत्या तरी बाबतींत टीका किंवा प्रतिकार बहुतेक होणार, हें मला दिसून आलें. माझें काम सिद्धीला जाण्यासाठीं प्रत्येक पक्षाची मदत व सहानुभूति मला कोणत्या तरी मार्गानें मिळविलीच पाहिजे, हेंहि माझ्या लक्ष्यांत आल्यावांचून राहिलें नाहीं.

दक्षिणभाग गरीब व उत्तरभाग श्रीमंत होता, हें मला ठाऊक होतें. लोकांनां स्फूर्ति देण्याचें, त्यांनां वर आणण्याचें व त्यांच्या अंगीं नवा जोम उत्पन्न करण्याचें सामर्थ्य शिक्षणामध्यें आहे असें ज्याप्रमाणें उत्तरभागाला वाटत होतें, त्याप्रमाणें दक्षिणभागाला त्या वेळीं वाटत नव्हतें. तरवारीनें ह्मणजे युद्धानें सुरू केलेलें स्वातंत्र्यदानाचें काम शिक्षणाच्या मदतीनें पुरें करण्यास उत्तरभाग उत्सुक असून तो जी शाळा किंवा संस्था हें शिक्षणाचें काम खरोखर पायाशुद्ध रीतीनें करण्याची खटपट करील, तिला मोठ्या खुषीनें व आनंदानें मदत करील, अशी मला खात्री होती.

तथापि, माझ्या ज्ञातीच्या लोकांच्या हितार्थ सुरू केलेला कोणताहि प्रयत्न शेवटीं दक्षिणेंतील थोरथोर गोऱ्या लोकांचीच मदत व सहानुभूति मिळविल्याशिवाय सफल व्हावयाचा नाहीं, हें मला स्पष्ट दिसत होतें. उत्तरेकडील लोकांनां माहीत नव्हती किंवा समजत नव्हती अशी एक गोष्ट माझ्या चांगलीच लक्ष्यांत आली होती. ती ही, कीं,

निग्रोला शिक्षण देणें शहाणपणाचें आहे किंवा नाहीं याबद्दल दक्षिणेंतील गोऱ्या लोकांनां कितीहि शंका वाटत असली, तरी त्यांच्या अंतर्यामीं निग्रोज्ञातीविषयीं कृतज्ञतेची भावना खचीत वास करीत होती. त्यामुळें मला अशी खात्री वाटत होती, कीं, निग्रोला सुधारण्यासाठीं केलेल्या खऱ्या, योग्य व कळकळीच्या प्रयत्नाला अखेरीस दक्षिणेंतीलहि गोऱ्या लोकांचा आश्रय मिळाल्यावांचून रहाणार नाहीं.

शेवटीं, माझ्या ज्ञातीच्या लोकांच्या समंजसपणावर माझी श्रद्धा होती. त्यांनां देण्यासाठीं योजिलेलें शिक्षण जर खरोखरच योग्य मार्गांत असेल, आणि त्यांच्याशीं जर मी सतत सचोटीनें व प्रामाणिकपणानें वर्तन ठेवीत जाईन, तर मीं सुरू केलेल्या संस्थेलाच नव्हे—तर त्यांच्या कल्याणासाठीं मीं मनांत योजून ठेविलेल्या इतर कल्पनांनांहि त्यांचा पाठिंबा मला हटकून मिळणार, असा मला पूर्ण भरंवसा होता.

माझ्या कार्याकडे अगदीं भिन्नभिन्न दृष्टीनें पाहणाऱ्या या तिन्ही पक्षांतील लोकांची मनधरणी कशी करावी, आणि त्यांनां खूप कसें ठेवावें, हा मोठा बिकट प्रश्न होता. या तिन्ही पक्षांतील लोकांशीं वागतांना, प्रत्येक पक्षांतील लोकांनां जें कांहीं रुचेल तेवढेंच त्यांच्यापुढें मांडावें, त्यांचा मतभेद होईल, अशा गोष्टी त्यांनां सांगूंच नयेत, असा मोह मजसमोर उभा राहिला. गोऱ्या लोकांनां आवडेल तें त्यांनां सांगावें, काळ्या लोकांनां पसंत असेल तें त्यांनां सांगावें, उत्तरेंत एक बोलावें तर दक्षिणेंत एक सांगावें असें मला वाटूं लागलें.

मी कदाचित् या मोहाला बळी पडलों असतों. पण शेवटीं माझी लबाडी उघडकीला येईल, आणि माझ्या लोकांचें व दक्षिणेचें चिरकालिक असें थोडें तरी कल्याण करावयाचें तर सत्याच्या मजबूत

खडकावरच मला आपली इमारत उभारली पाहिजे, असा विचार लक्ष्यांत आणून मी या मोहांतून पार पडलों.

माझ्या विधानाच्या स्पष्टीकरणार्थ एका वृद्ध निग्रो उपदेशकाची गोष्ट मी येथें सांगतों. तांबड्या समुद्रामधून जात असतां इस्रायलचे वंशज कोरड्या पायांनीं कसे गेले, आणि फॅरोआ व त्याची मंडळी त्याच समुद्रांतून जात असतां कशी बुडून मेली, हें, रविवारच्या शाळेंतील वर्गाला तो उपदेशक समजून देत असतां त्यानें त्याचा खुलासा याप्रमाणें केला: —

*प्रथम जेव्हां इस्रायलचे वंशज आले, तेव्हां पहांटेची वेळ होती आणि बर्फ घट्ट व जाड होतें. त्यामुळें बर्फावरून जाण्याला त्यांनां कांहीं पंचाईत पडली नाहीं. पण पुढें जेव्हां फॅरोआ आणि त्याची मंडळी आली, तेव्हां सूर्य बर्फावर प्रकाशत होता. ते बर्फावर चालूं लागतांच बर्फ वितळलें आणि ते लगेच खालीं बुडून मेले.

एक हुषार तरुण मनुष्य या वेळीं त्या वर्गांत होता. तो त्या वृद्ध उपदेशकाकडे वळून ह्मणाला "महाराज, आपला हा खुलासा मला नीट कळत नाहीं. मी शाळेंत जाऊन बरेच दिवस अभ्यास करतों आणि माझा भूगोल मला असें सांगतों, कीं, भूमध्यरेषेच्या आजूबाजूला मुळीं बर्फच बनत नाहीं."

वृद्ध उपदेशकानें उत्तर दिलें "असा कांहीं आक्षेप येईल असें मला वाटतच होतें. कारण, धर्मशास्त्र बिघडवून टाकण्याला कोणीना कोणी तरी सदा तयार असतोच. मी ज्या कालाविषयीं सांगत आहें, तो काल भूगोल, भूमध्यरेषा वगैरेंच्याहि पूर्वींचा होय!"

* ही गोष्ट बायबलांत जुन्या करारांत आहे.

या वृद्ध उपदेशकानें सर्व कृत्रिमपणा दूर सारून आपणाला जें कांहीं खरें वाटलें तेंच सरळ व साध्या भाषेंत सांगण्याचा प्रयत्न केला. माझीहि स्थिति अशीच होती. निग्रोच्या प्रश्नाच्या सर्व बाजूंसंबंधानें नेटकीं पण लटकीं विधानें करून वेळ मारून नेणारे कांहीं सुशिक्षित व हुषार लोक माझ्या ज्ञातीमध्यें आहेत, हें खरें; पण अंगीकृत कार्याच्या सिद्ध्यर्थ मला त्या वृद्ध उपदेशकाचें अनुकरण करून अकृत्रिमपणाच्या व सत्याच्याच वाटेनें जाणें श्रेयस्कर वाटलें.

याप्रमाणें सूक्ष्म विचार करून पुढील दोन गोष्टींविषयीं मी ठाम निश्चय केला:—

( १ ) वर सांगितलेल्या तिन्ही पक्षांतील लोकांशीं नेहमीं निष्कपटपणानें व प्रामाणिकपणानें वागावयाचें.

( २ ) क्षणिक लोकप्रियता किंवा फायदा मिळविण्यासाठीं कोणत्याहि आडमार्गाचा किंवा कारस्थानाचा अवलंब करावयाचा नाहीं; मग त्यामुळें आपण प्रिय झालों किंवा अप्रिय झालों, तरी त्याची पर्वा नाहीं.

हीं दोन तत्त्वें माझा संप्रदाय किंवा क्रीड आहेत, असें नेहमीं मनांत बाळगून मी माझा पुढील मार्ग आक्रमूं लागलों.

ज्या एका गोष्टीनें प्रथमारंभीं माझ्या ठिकाणीं श्रद्धा उत्पन्न केली आणि पुढें मला धीर दिला, ती ही, कीं, दक्षिणेंतील दोन्ही ज्ञातींमधील परस्पर प्रत्यक्ष संबंधांचें ज्ञान मला आधींच झालेलें होतें. निरीक्षणानें मला असें कळून आलें होतें, कीं, अडीचशें वर्षांच्या गुलामगिरीनें दोन्ही ज्ञातींचे संबंध इतके कांहीं निकट व दृढ होऊन गेले आहेत, कीं, दक्षिणेबाहेरील लोकांनां त्या बंधनाच्या दृढतेची कांहींच कल्पना

होणार नाहीं, आणि खुद्द दक्षिणेंतील गोऱ्या व काळ्या लोकांनांहि त्याची पूर्ण जाणीव क्वचित्‌च असेल. शिवाय, दोन्ही ज्ञातींनां परस्परांची जरूरी आहे, आणि दक्षिणेंतील गोऱ्या लोकांचा हरएक व्यवहार सुरळीत चालण्यास निग्रोंची जागा भरून काढणारा दुसरा कामकरीवर्ग निर्माण होण्यास अजून किती तरी वर्षें गेलीं पाहिजेत, हें मला आरशांत पाहिल्याप्रमाणें चक्क दिसत होतें.

स्वतंत्रतेमुळें एक स्थित्यंतर घडून आलेलें माझ्या दृष्टोत्पत्तीला आलें. पण तें दक्षिणेंतील पुष्कळ गोऱ्या लोकांच्या लक्ष्यांत आलें नव्हतें, असें मला वाटतें. गुलामगिरी जोंपर्यंत अस्तित्वांत होती, तोंपर्यंत गोऱ्या मनुष्याला स्वसंरक्षणार्थ, आणि निग्रोनें आपल्या दास्यत्वाच्या स्थितींतच संतुष्ट रहावें म्हणूनसुद्धां, त्याला अज्ञानांधकारांतच ठेवणें भाग होतें. स्वतंत्रता मिळाल्यापासून ही स्थिति अगदीं पालटलेली आहे. आतां गोऱ्या मनुष्याला निग्रोनें स्वोन्नतिप्रीत्यर्थ चालविलेल्या प्रयत्नांनां मदत करण्यास स्वार्थाच्या दृष्टीनेंहि त्याला सबळ कारण आहे. कारण, निग्रोंनां शिक्षण देऊन त्यांची उन्नति केल्यानें, त्या ज्ञातींतील कंगाल व गुन्हेगार लोकांची संख्या कमी होईल आणि कुशल कारागिरांची संख्या व पात्रता वाढेल.

या विपयासंबंधीं स्पष्ट विचार एकदम माझ्या डोक्यांत आले नाहींत. हळुहळू व क्रमाक्रमानें माझी अशी समजूत होत गेली, कीं, 'एकच ज्ञात नव्हे तर दोन्हीहि ज्ञाति दास्यत्वांत होत्या.' नवीन परिस्थितीशीं मेळ बसविण्यासाठीं दोन्ही ज्ञातींचे आतां कसून प्रयत्न चाललेले आहेत; एकीची सुधारणा तीच दुसरीची सुधारणा होय, आणि याकरितां निग्रो लोकांच्या उन्नत्यर्थ सुरू केलेल्या माझ्या प्रयत्नांनीं जर गोऱ्या लोकांचेंहि

तितकेंच कल्याण होणार नाहीं, तर माझे सर्व प्रयत्न निग्रो लोकांनांहि निष्फळ व निरुपयोगीच ह्मटले पाहिजेत.

जसजसा हा विचार माझ्या मनांत भरत चालला आणि माझ्या अंगीकृत कार्याचें स्वरूप मी जसजसें नीट पाहूं लागलों, तसतसें दक्षिणभाग—उत्तरभाग, काळे लोक—गोरे लोक असे विभाग पाडणारे सर्व राजकीय वादविवाद व चळवळी हीं मला खोटीं व कृत्रिम वाटूं लागलीं. राजकीय चळवळीच्या मोहिमींत सामील होणारे लोक बहुधा छायांशीं—गतकालीन दुराग्रह व द्वेष यांच्या छायांशीं लढतात, असेंच माझ्या दृष्टीला दिसे.

उलट, याविषयीं जों जों अधिक विचार करावा, तों तों मी अंगीकृत केलेलें कार्यच खरें काम आहे, अशी माझी खात्री पटत चालली. शिवाय, माझें काम विधायक असल्यामुळें सर्व परस्परविरुद्ध तत्त्वांनां व शक्तींनां अधिक दूर लोटण्याची नव्हे, तर त्यांनां जोडण्याची किंवा सांधण्याची प्रवृत्ति त्यामध्यें निःसंशय होती.

यानंतर वर सांगितलेल्या तीन्ही पक्षांतील लोकांची सहानुभूति माझ्या कार्याला कशी मिळवावी, याचा मी शांतपणें विचार करूं लागलों.

प्रथम मीं असा निश्चय केला, कीं, माझ्या प्रत्येक कामांत होतां होईं तों माझ्याच ज्ञातीच्या लोकांची प्रत्यक्ष मदत व सहकारित्व मिळवावयाचें. हा हेतु मनांत धरून टस्कगी संस्थेचें काम सुरू करण्यापूर्वीं मी मेकन परगण्यांतील—( टस्कगी हा या परगण्यांतील मुख्य गांव आहे )—खेड्यापाड्यांतील लोकांत प्रवास करण्यांत कांहीं आठवडे घालविले. या अवधींत पुष्कळ शेतकरी लोकांची भेट घेण्याची व त्यांच्यांशीं व्यक्तिशः बोलण्याची संधि मला मिळाली. दक्षिणेंतील निग्रो

लोकसंख्येंत शेतकरी लोकांचें प्रमाण शेंकडा ८० आहे. मी त्यांच्या खोपट्यांत निजलों, त्यांचें अन्न खाल्लें, त्यांच्या देवालयांत त्यांच्याबरोबर भाषणें केलीं, त्यांच्या अडचणी व त्यांच्या गरजा यांविषयीं त्यांच्या घरीं खल केला. अशा रीतीनें मिळविलेल्या ज्ञानाचा पुढें माझ्या सर्व कामीं मला फार उपयोग झाला.

पुढें वर्षानुवर्षे मीं या भेटी जवळच्या परगण्यांत व संस्थानांत चालू ठेविल्या. नंतर टस्कगी संस्थेची चांगली प्रसिद्धि झाल्यावर दूरदूरच्या प्रांतांहून आलेल्या आमंत्रणाचा स्वीकार करून तेथील लोकांची प्रत्यक्ष रहाणी व त्यांच्या अडचणी यांची माहिती मीं मिळविली.

सर्व जनसमूहाची ओळख व्हावी, त्यांच्याबरोबर व त्यांच्या हितार्थ काम करतां यावें ह्मणून त्यांचा विश्वास संपादन करावा, हा या सर्व भेटींचा उद्देश होता.

निग्रो लोकांनीं आपल्यामध्यें ज्या कांहीं संस्था स्थापन केल्या आहेत, त्यांचें वजन जनसमूहावर किती आहे याचा माझ्या मनावर माझ्या प्रवासांत व निरीक्षणांत फार चांगला संस्कार झाला.

'या देशांतील सुमारें एक कोटि निग्रो लोक हे विस्कळीत, विजातीय अशा व्यक्तींचा समुदाय असून खानेसुमारीमध्यें जरी त्यांचा एकाच नांवाखालीं समावेश करण्यांत येतो, तरी त्यांनां वास्तविक कोणताहि शेंडाबुडखा नाहीं, किंवा त्यांच्यामध्यें कोणत्याहि सामान्य उद्देशाची किंवा सामान्य हितसंबंधांची बिलकूल जाणीव नाहीं,' असा निग्रो ज्ञातीबाहेरील पुष्कळ मनुष्यांचा समज होण्याचा संभव आहे; पण हा समज चुकीचा आहे. कांहीं हितसंबंध असे आहेत, कीं, ते सर्व निग्रोंनां सामान्य आहेत. कांहीं गोष्टी अशा आहेत, कीं, त्यांच्या द्वारें

एकंदर निग्रो लोकांचीं हृदयें भेदतां येतील व काबीजहि करतां येतील. निग्रो लोकांच्या संघटनात्मक पात्रतेविषयीं निरीक्षण करीत असतां मला लवकरच असें दिसून आलें, कीं, निग्रो लोकांमध्यें 'निग्रोचर्च' ही एक अत्यंत वजनदार अशी संघटना आहे. ज्याप्रमाणें संयुक्त संस्थानांतील एक कोटी निग्रो लोकांनां 'निग्रोचर्च' च्या सर्व संघटित धर्मसंस्थांच्या द्वारें तत्काळ वळण लावून त्यांची अनुकूलता मिळवितां येते, त्याप्रमाणें दुसऱ्या कोठेंहि—एवढ्या मोठ्या क्याथोलिक पंथांत देखील—एक कोटी लोकांवर हुकमत चालवितां येत असेल, असें मला वाटत नाहीं. या लक्षावधि निग्रो लोकांपैकीं ज्यांचा कोणत्याहि चर्चशीं ह्मणजे धार्मिक संस्थेशीं बिलकुल संबंध नाहीं, असे लोक अगदींच थोडे आहेत. मुख्य धर्ममठ पुढें दिल्याप्रमाणें आहेत:—बॅप्टिस्ट, आफ्रिकन मेथाडिस्ट्स, आफ्रिकन मेथाडिस्ट एपिसकोपल झिआनिस्ट आणि निग्रो मेथाडिस्टस. यांशिवाय दुसरे सुमारें बारा लहान पंथ सांगतां येतील.

टस्कगी संस्थेच्या आसपास असलेल्या लहानसहान चर्चांमध्यें ह्मणजे देवालयांमध्यें निग्रो लोकांसमोर व्याख्यानें देऊन मीं या धार्मिक संस्थांची मदत मिळविण्याचा उपक्रम केला. पुढें मी जेव्हां दूरदूरच्या प्रांतांत प्रवास करूं लागलों, तेव्हां चर्चांच्या मुख्य पुरुषांशीं माझी ओळख होऊं लागली, आणि त्यांचें चर्चद्वारा निग्रो जनसमूहावर कसें व किती वर्चस्व चालतें, हेंहि मला थोडथोडें समजून येऊं लागलें.

माझ्या ज्ञातीचे साधारण लोक कोठेंहि भेटले, तरी त्यांच्याशीं मिसळण्यांत व सरळपणें त्यांच्याशीं भाषण करण्यांत मला मोठा आनंद वाटतो. पण विशेषत: निग्रो चर्चमध्येंच त्यांनां भेटण्याची आणि ओळख करून घेण्याची उत्तम संधि मला अनेकवार मिळाली आहे.

बोस्टन येथील ट्रिनिटी चर्चमध्यें उपासनेच्या वेळीं हजर रहाण्याचा आणि फिलिप्स ब्रुक्स यांचें भाषण ऐकण्याचा सुयोग मला मिळालेला आहे. न्युयॉर्कमधील फिफ्थ ॲव्हिन्यु प्रेसबिटेरियन चर्चमध्यें उपासनेच्या वेळीं हजर राहून परलोकवासी डॉ० जॉन हॉल यांचें भाषण मीं ऐकलें आहे. लंडन येथील ' वेस्ट मिन्स्टर अबे'मधील उपासनेला मी गेलेलों आहें. तसेंच यूरोपमधील मोठमोठीं कॅथीड्रूलें, उपासना चालली असतांना मीं पाहिलेलीं आहेत. पण आमच्या ज्ञातीमधील कांहींकांहीं उपासनांनीं जसें माझें मन वेधलें, तसें वर सांगितलेल्या कोणत्याहि उपासनेनें माझें मन कधींहि वेधलें गेलें नाहीं. माझ्या सबंध आयुष्यांत यूरोप किंवा अमेरिका येथील चर्चांमध्यें मिळालेल्या उपासनेच्या सुखाहूनहि मला जास्त सुखाचा अनुभव देणाऱ्या एका उपासनेचा नमुना मी येथें थोडक्यांत देतों.

अलाबामा संस्थानांत मेकन परगण्यांत निग्रोलोकांची एक उपासनापद्धति आहे. तिचें नांव ' दिनभर उपासनामेळा ' असें आहे. या उपासनेचा पर्वकाल ह्मणजे मे महिन्याचा मध्य होय. देवालय गांवापासून सुमारें दहा मैल लांब असतें. ' दिनभर उपासनामेळ्या'चा सर्व आनंद अनुभवावयाचा असेल तर वरून होतां होईल तों लवकर निदान आठ वाजतां निघालें पाहिजे. देवालयाला जातांना वाटेंत अरण्यें व वन्यफुलें यांचा सुगंध यथेच्छ मिळतो. ज्याच्या जवळपास स्वच्छ व थंड पाण्याचा झरा किंवा मोठा प्रवाह असेल अशा एकाद्या आंबराईत किंवा वनांत हें देवालय बहुतकरून असावयाचें. सकाळीं नऊदहा वाजतां येथें निग्रो लोक मिळूनमिळून येऊं लागतात. कांहींजण चालत येतात; बहुतेक लोक गाड्यांतून येतात. पुष्कळ लोक बग्यांतून येतात; बरेच लोक खेचरें, घोडे व बैल यांच्या खटाऱ्यांतून येतात.

या गाड्यांत किंवा खटाऱ्यांत लहानांपासून तों थोरांपर्यंत कुटुंबांतील सर्व मंडळी मिळून प्रवास करतात. सर्वजण भोजनाचे करंडे बरोबर आणतात. कारण हा ‘ दिनभर उपासना मेळा ’ ह्मणजे रविवारचें वनभोजन किंवा एक प्रकारचा सणच असतो. बरोबर अकरा वाजतां गाणेंवजावणें व उपदेश यांला सुरुवात होते. देवालय मोठें नसलें, तर उपासना झाडाखालीं चालते. कधींकधीं एकच प्रवचन होतें; अधिक आचार्य हजर असले तर दोनतीन प्रवचनेंहि होतात. प्रवचन आटपल्यावर मळ्यांतील गाणीं—एक भाग किंवा केव्हांकेव्हां दोन भाग—सुरू होतात. नंतर भोजन व विश्रांति यांसाठीं सुटी होते.

केव्हांकेव्हां या ‘ दिनभर उपासनामेळ्या’ला तीन हजार लोक हजर असलेले मीं पाहिले आहेत. क्षुधित असा कोणीहि परत जात नाहीं. अनेक खाद्य पदार्थांचे करंडे उघडिले जातात. लोक टोळ्या करून ठिकठिकाणीं बसतात. पाण्याच्या प्रवाहाजवळ, वृक्षाखालीं, गवतावर चादर किंवा कपडा पसरलेला असतो. या ठिकाणीं जुन्या ओळखी पुनः दृढ केल्या जातात. कित्येक महिने न भेटलेल्या आप्तांच्या गांठी येथें पडतात. परकी लोक, प्रेक्षक इत्यादि सर्वांनां कोणीना कोणी तरी सहभोजनाला आमंत्रण देतोच. गवतावर किंवा वृक्षाच्या पडलेल्या फांद्यांवर बसून लोक उपाहार करतात. जनावरांनांहि चारापाणी देण्यांत येतें. नंतर सुमारें तीन वाजतां एकदोन प्रवचनें होतात. प्रवचनांच्या मध्यें गाणेंहि चालतें. नंतर पुनः मळ्यांतील गाण्याचे एकदोन भाग होतात. प्रवचनांच्या मध्यें मला व्याख्यानाचें आमंत्रण येतें आणि तें मी मोठ्या आनंदानें स्वीकारतों. सुमारें पांच वाजतां आशीर्वचन किंवा स्वस्तिवाचन होतें, आणि नंतर हजारों लोक परस्परांनां शुभचिंतनपूर्वक वंदन करून निरोप घेतात आणि आपापल्या घरीं निघून जातात.

ही उपासनापद्धति मला सर्वांत अधिक आवडते. या मेळ्याच्या प्रसंगीं भाषण करण्याच्या ज्या कांहीं संधि मला मिळालेल्या आहेत, त्यांमध्येंच मीं माझें सर्वोत्कृष्ट काम केलेलें आहे, असें मला वाटतें.

जनसमूहासमोर भाषण करण्याची कोणतीहि संधि मी वायां जाऊं देत नाहीं. पुष्कळ वर्षांपासून प्रत्येक संधीचा उपयोग करून घेण्याची माझी रीत आहे. तीस अनुसरून मी खेड्यापाड्यांतील देवाल्यांत व 'दिनभर उपासनामेळ्यां'त भाषणें केलीं आहेत; एवढेंच नव्हे, तर शक्य असेल त्या त्या वेळीं आचार्यांच्या प्रत्येक महत्त्वाच्या सभेला हजर राहण्याचा माझा नियम असून आज कैक वर्षें तो मीं सतत पाळलेला आहे. शहरांतील चर्चें (देवळें) पाहण्याची आणि तेथील आचार्यांची ओळख करून घेण्याची व लोकांनाहि भेटण्याची माझी वहिवाट आहे.

टस्कगी संस्थेच्या चालू खर्चाची रक्कम गोळा करण्यासाठीं मीं उत्तरेंत पुष्कळदां व पुष्कळ लांब सफरी केलेल्या आहेत. त्या वेळीं गोऱ्या लोकांच्या चर्चमध्यें किंवा दिवाणखान्यांत अगर एकाद्या मेजवानीच्या प्रसंगीं भाषण केल्यानंतर लगेच निग्रो लोकांच्या चर्चमध्यें जाऊन आमच्या लोकांबरोबर दिलास दिल देऊन बोलत बसण्यांत मला किती तरी सुख व समाधान झालेलें आहे. माझ्या कामाविषयीं ते जी खरी आस्था दाखवितात,व ज्ञातीच्या हिताच्या बाबीसंबंधानें त्यांच्याशीं मोकळेपणानें व खऱ्या भावानें बोलणाऱ्या कोणाहि मनुष्याला पाहून त्यांना जें प्रेमाचें विलक्षण भरतें येत असतें, त्यांमुळें त्यांच्याशीं भाषण करतांना मला फारच आनंद होत असतो.

उत्तरेकडील या माझ्या सफरींत पुष्कळदां असें घडलें आहे, कीं, निग्रो श्रोतृगणांनीं माझ्या आगमनाची वाट रात्रीं दहा अकरा वाजेपर्यंत पाहिलेली आहे. माझ्या दुसऱ्या सभांना ते येत नाहींत असा याचा अर्थ

नव्हे, तर खास त्यांच्याशींच मीं बोलावें हें त्यांनां बहुतकरून अधिक आवडतें. श्रोतृगण वाट पहात असलेल्या देवालयांत किंवा दिवाणखान्यांत मी एकदांचा जाऊन पोहोंचलों, कीं, त्यांच्या दर्शनानें मला इतका कांहीं आनंद होतो, कीं, रात्रीं बारा वाजून गेल्यावरहि मी त्यांच्याशीं पुष्कळदां बोलत उभा राहतों. आपल्या ज्ञातीच्या हिताशीं संबंध असलेल्या विषयावरील महत्त्वाचा वादविवाद निग्रो लोक—मग तो अशिक्षित जनसमूह असो किंवा सुशिक्षित शेलकी मंडळी असो—दोनतीन तास अत्यंत लक्ष्यपूर्वक ऐकत बसतील. या एका गोष्टीनेंच माझ्या ज्ञातीच्या भविष्याविषयीं मला जितकी कांहीं आशा वाटते, तितकी दुसऱ्या कोणत्याहि गोष्टीनें वाटत नाहीं.

उदाहरणार्थ, थोड्या दिवसांपूर्वीं मीं ओहिओ संस्थानांत क्लेव्हलंड येथें 'चेंबर ऑफ् कॉमर्स'मध्यें मोठ्या श्रोतृगणासमोर भाषण केलें. श्रोतृवृंदांत बहुतेक गोरे लोक होते, आणि सभेचें काम रात्र बरीच झाली तरी चाललें होतें. तें आटपल्यावर क्लेव्हलंड येथील निग्रो लोकांच्या देवालयांत मला गाडींतून नेण्यांत आलें. तेथें सुमारें अडीच हजार काळे लोक शांतपणें माझी वाट पहात बसले होते. देवालय गच्च भरून गेलें होतें आणि हजर असलेले कांहीं लोक तर दोनतीन तास वाट पहात राहिले आहेत, असें मला समजलें.

मी देवालयांत शिरतांच एक विलक्षण देखावा माझ्या नजरेला पडला. श्रोतृवृंदापैकीं प्रत्येकाजवळ अमेरिकेचा एक लहानसा बावटा देण्यांत आलेला होता. मी प्लॅटफॉर्मवर चढतांच सर्वजण उभे राहिले आणि हे बावटे फडकवूं लागले. जोरानें बावटे हालवीत असलेल्या अडीच हजार उत्साही लोकांचें चित्र वाचकांनीं आपल्या मनश्चक्षूंसमोर आणून पहावें. हा देखावा इतका कांहीं अपूर्व व अकल्पित

झाला, कीं, त्याचा माझ्या मनावर कधींहि न विसरण्यासारखा संस्कार राहिला. मीं या श्रोतृवृंदासमोर दीड तास भाषण केलें. देवालय इतकें गच्च भरलें होतें, कीं, उभें राहण्याला त्यांत कोठें चुकून देखील एक टीचभर जागा शिल्लक राहिली नव्हती. असें असून एक मनुष्यहि त्या अवधींत देवालय सोडून निघून गेला नाहीं.

दुसऱ्याहि एका मार्गानें माझ्या ज्ञातीच्या लाखों लोकांचा पाठिंबा व विश्वास मी मिळवितों. हा मार्ग ह्मणजे धार्मिक पुढाऱ्यांची त्यांच्या स्थानिक व राष्ट्रीय संमेलनांत भेट घेणें. उदाहरणार्थ, अमेरिकेच्या सर्व भागांतून चार किंवा पांच हजार धार्मिक पुढारी एकत्र जमविणाऱ्या 'नॅशनल कलर्ड (निग्रो) बॅपटिस्ट कनव्हेनशन्'समोर भाषण करण्याचें आमंत्रण मला दरवर्षी असतें. हा क्रम आज बरींच वर्षे चाललेला आहे. तसेंच मेथॉडिस्ट चर्चच्या निरनिराळ्या शाखांतील पुढाऱ्यांची भेट त्यांच्या परिषदांमध्यें मी चार वर्षांतून एकदां घेतों.

निरनिराळ्या गुप्त संस्थांकडून त्यांच्या राष्ट्रीय संमेलनांत भाषणें करण्याकरितां मला वेळोवेळीं आमंत्रणें येत असतात. चर्चच्या खालोखाल गुप्त संस्था किंवा परस्परसाहाय्यकारी सांप्रदाय हे पुष्कळ निग्रो लोकांना एकत्र आणतात आणि दुसऱ्या कोणत्याहि संस्थेपेक्षां ज्ञातीवर त्यांचें वर्चस्व अधिक असतें, असें मला वाटतें. तुह्मी कोणत्याहि निग्रोशीं शेकहँड करा, तो तुमच्या हाताला विशिष्ट दाब किंवा आंदोलन देऊन कोणत्या ना कोणत्या तरी गुप्त संस्थेचे आपण सभासद आहों असें दर्शविल्यावांचून राहणार नाहीं.

गुप्त संस्थांविषयीं सांगतांना आरकान्सस्मधील लिटल् रॉक येथील एका प्रसंगाची मला आठवण होते. या प्रसंगीं माझे मित्र विनाकारण बऱ्याच अडचणींत पडले. मी त्या शहरीं येणार आहें, असें आधींच

कांहीं आठवडे जिकडेतिकडे जाहीर करण्यांत आलें होतें. लिटल् रॉक येथील सर्व गुप्त संस्थांनीं मिळून 'परेड' करावी, असा माझ्या स्वागताच्या तयारींत एक कार्यक्रम होता. या परेडीबद्दल लोकांची फार उत्कंठा होती. कारण, लिटल् रॉकमध्यें गुप्त संस्था पुष्कळ आहेत आणि त्या सर्व मिळून एकत्र बाहेर पडण्याचे प्रसंग फार क्वचित् येतात.

मी तेथें जाण्याच्यापूर्वीं कांहीं थोडे दिवस मी कोणत्या पंथाचा आहें, याविषयीं कोणीं एकानें चौकशी सुरू केली. शेवटीं मी कोणत्याहि संस्थेचा सभासद नाहीं असें जेव्हां सर्वांनां समजलें, तेव्हां परेडीची तयारी करणाऱ्या कमिटीच्या उत्साहावर विरजण पडलें, आणि सर्वत्र औदासिन्य पसरलें. कोणत्याहि संस्थेचा सभासद नसलेल्या पुरुषाला मान देण्यासाठीं सर्व संस्थांनीं मिळून बाहेर येऊन परेड कां करावी, याविषयीं लोकांची समजूत घालणें आपणांला फार कठिण गेलें, असें पुढाऱ्यांनीं मला नतर सांगितलें. वास्तवीक, अशा रीतीनें त्यांनीं आपणांस अडचणींत पाडून घ्यावें अशी माझी मुळींच इच्छा नव्हती. एखाद्या निग्रोनें कोणत्याहि संस्थेचा सभासद असूं नये, हेंच आधीं त्यांनां अस्वाभाविक वाटलें. अखेर लोकांची कशीबशी समजूत घालण्यांत आली, आणि सर्व कांहीं ठीक झालें. सर्व संस्था बाहेर पडल्या आणि स्वागताचा थाट फार उत्तम झाला.

निग्रो लोकांमध्यें अचाट शक्ति असलेली दुसरी एक सत्ता म्हटली म्हणजे निग्रो 'मुद्रणालय' ही होय. निग्रो वर्तमानपत्रांचें वजन किती आहे, हें निग्रो ज्ञातीबाहेरील फारच थोड्या लोकांनां समजतें. अमेरिकेंत निरनिराळ्या ठिकाणीं निग्रो लोकांकडून प्रसिद्ध होणारीं वर्तमानपत्रें सुमारें दोनशें आहेत. त्यांपैकीं बऱ्याच वर्तमानपत्रांचे वर्गणीदार फारच थोडे आहेत. त्यांनां आपल्या अस्तित्वासाठीं बरीच धडपड करावी लागते. हीं पत्रें त्या त्या गांवांतीलच लोक वाचतात. दुसऱ्या कांहीं

पत्रांचा खप सर्व राष्ट्रभर आहे, आणि तीं मोठ्या हुपारीनें व उत्साहानें चालविलेलीं आहेत. तीन खेरीजकरून बाकी सर्व वर्तमानपत्रांनीं ज्ञातीच्या उन्नतीविषयींच्या माझ्या सर्व बेतांचें व धोरणाचें चांगलें समर्थन केलेलें आहे. माझे बेत व विचार सर्वांनां जाहीर करण्यासाठीं मीं त्यांची मदत मोकळ्या मनानें मागितली आहे, आणि ती त्यांनीं वेळोवेळीं मोठ्या उदारपणें दिलेली आहे.

ज्ञातीचे हितसंबंध व धोरण याविषयींचे माझे विचार स्वतःच्या वर्तमानपत्रांतून सर्वांनां कळावे ह्मणून मीं एकादें निग्रो वर्तमानपत्र विकत घ्यावें, अशी सूचना मला कित्येकदां करण्यांत आली होती. तसेंच कांहीं-जणांनीं असेंहि सुचविलें, कीं, कांहीं वर्तमानपत्रांनीं माझ्या विचारांचेंच नेहमीं समर्थन करावें, ह्मणून मी त्यांनां कांहीं पैसा द्यावा.

एकादें खोटें विधान खोडून टाकण्याचा, किंवा एकादा विशेष अपकारक संस्कार नाहींसा करण्याचा, सर्वांत सोपा मार्ग ह्मटला ह्मणजे आपलें स्वतःचें वर्तमानपत्र असणें, किंवा दुसऱ्यांच्या वर्तमानपत्रांतील संपादकीय कालमांत आपले विचार प्रसिद्ध करण्यासाठीं पैसा देणें हा होय. असें पुष्कळदां माझ्या मनांत आलें, हें मी येथें कबूल करतों.

पण आतां माझी अशी खातरी झाली आहे, कीं, या दोन्ही मार्गां-पैकीं कोणताहि मार्ग घातुक झाला असता. माझें स्वतःचें वर्तमानपत्र आहे असें एकदां समजलें—आणि हें तर समजणारच—कीं, लगेच दुसऱ्या वर्तमानपत्रांनीं मला मदत करण्याचें बंद केलें असतें. मीं जर कांहीं वर्तमानपत्रांला पैसा देण्याचा प्रयत्न केला असता, तर लवकरच तो मला सर्वांनां द्यावा लागला असता. वर्तमानपत्रांनां लांच देण्याच्या कामीं मला यश आलें तर लवकरच माझ्याभोंवतीं भाडेकरी लोकांचा घोळका जमेल. खरे व कळकळीचे आश्रयदाते माझ्या वाऱ्यालाहि उभे रहाणार

नाहींत. या मार्गानें जरी कांहीं वरपांगी व क्षणिक फायदा मला मिळाला, तरी माझी बाजू थोपटून धरणाऱ्या पत्रांची किंमत व वजन हीं मीं नाहींशीं केल्याप्रमाणें होईल, हें मी मुद्दाम सांगतों; कारण, स्वतःला खऱ्या वाटत नाहींत किंवा अर्धवट खऱ्या वाटतात अशा गोष्टी लिहिण्याला मीं भाड्यानें लोक लाविले, तर ते जे कांहीं लेख किंवा निबंध लिहतील त्यांत खरेपणा किंवा सत्य बिलकूल राहणार नाहीं, आणि त्यांत खरेपणा नसला ह्मणजे त्यांचें वजन कांहींच पडणार नाहीं.

याकरितां जेव्हां वर्तमानपत्रांतील विरुद्ध मजकूर किंवा प्रतिकूल टीका माझ्या दृष्टीला पडते, तेव्हां सरळपणानें व प्रामाणिकपणानें वागणें मला अधिक आवडतें. वर्तमानपत्रांतील टीकेमुळें माझा पुष्कळदां फायदा झालेला आहे. केव्हांकेव्हां माझें ह्मणणें किंवा करणें योग्य आहे, आणि माझे टीकाकार चुकलेले आहेत असें मला वाटतें; अशा वेळीं कोण चुकलेलें आहे हें परिणामावरून कळून येईल असें समजून मी स्वस्थ वाट पहात बसतों. याप्रमाणें क्षुल्लक गोष्टींत आमचा मतभेद असला तरी मुख्य महत्त्वाच्या बाबतींत व धोरणांत पुष्कळ वर्तमानपत्रांच्या संपादकांचा विश्वास व आश्रय मीं नेहमीं संपादन केलेला आहे.

अमेरिकेंत प्रवास करतांना, निग्रो संपादकांची मीं भेट घेतलेली आहे. त्यांपैकीं बरेचजण टस्कगीस आलेले आहेत. त्यांची ओळख व त्यांचा निकट परिचय होण्याला मला वीस वर्षे लागलीं. त्यांच्याशीं व्यवहार करतांना मला अतिपरिचयाची भीति वाटली नाहीं, किंवा त्यांनां दूर अंतरावर ठेवण्याची जरूरी भासली नाहीं. उलट मी त्यांनां माझे सर्व बेत उघडपणें व स्पष्टपणें नेहमीं सांगतों. निग्रो वर्तमानपत्रांचे कांहीं मालक व संपादक हे टस्कगीसंस्थेचे ग्रॅज्युएट किंवा जुने

विद्यार्थी आहेत. मी त्यांच्या आफिसांत व घरीं जात असतों. परस्परांनां आह्मी जाणतों. ते माझे मित्र आहेत आणि मी त्यांचा मित्र आहें.

'वर्तमानपत्रकारांशीं—मग ते गोरे असोत वा काळे असोत—वागतांना हें लक्ष्यांत ठेविलें पाहिजे, कीं, त्यांची व्यक्तिशः प्रत्यक्ष ओळख करून घेणें, त्यांची भेट घेणें व वेळोवेळीं त्यांच्याशीं उघडपणें भाषण करणें, आपण काय करीत आहों व काय करणार आहों याची सर्व माहिती त्यांनां देणें, यासारखा त्यांची सहानुभूति व मदत मिळविण्याचा दुसरा मार्ग नाहीं. पैशानें अशा तऱ्हेची मैत्री संपादन करतां येत नाहीं, किंवा ती जडली तरी कायम राखणें पुष्कळ वेळां शक्य नसतें.

निग्रो वर्तमानपत्रें प्रसिद्ध होत असलेल्या गांवीं किंवा शहरीं मी गेलों ह्मणजे त्यांच्या संपादकांची भेट घेणें, त्यांच्या आफिसांत जाणें, किंवा टस्कगी पहावयास यावें असें आमंत्रण देणें इत्यादि गोष्टी मी करतोंच. याप्रमाणें आह्मी एकमेकांची ओळख व माहिती करून घेतों, आणि परस्परांमध्यें चांगली सहानुभूति उत्पन्न करतों. परस्परांमध्यें असे निकट संबंध असल्यामुळें माझ्या कार्याविषयींचे त्यांच्या वर्तमानपत्रांतील संपादकीय लेख सप्रमाण, विश्वसनीय व माहितीनें भरलेले असतात. अमेरिकेंतील निग्रो ज्ञातीचे वर्तमानपत्रांचे मालक व संपादक यांच्यासारखा उदार व परोपकारी दुसरा वर्ग नाहीं.

दक्षिणेंतील पुष्कळ गोऱ्या लोकांचा विश्वास व सदिच्छा हीं मीं कशीं संपादन केलीं, असें मला पुष्कळदां विचारण्यांत आलेलें आहे. या प्रश्नाला माझें थोडक्यांत असें उत्तर आहे, कीं, मीं त्यांच्याशीं वागतांना नेहमीं सरळ आणि उघड रीतीनें वागण्याचा प्रयत्न केलेला आहे. कित्येक वेळां त्यांनीं माझ्या कार्याला प्रतिकार केलेला आहे.

व कित्येकदां केलेला नाहीं. पण त्यांनां फसविण्याचा मीं केव्हांहि प्रयत्न केलेला नाहीं. शत्रुमित्रांमध्यें असो किंवा काळ्यागोऱ्या लोकांमध्यें असो, दिसून येणारे सरळपणा, निष्कपटपणा इत्यादि गुण जलद ओळखणारे दक्षिणेंतील गोऱ्या लोकांसारखे लोक दुसऱ्या कोठेंहि नसतील.

दक्षिणेंतील गोऱ्या लोकांनां सदासर्वदा शिव्या देणें हें धीटपणाचें लक्षण आहे अशी समजूत असलेले, आणि या धीटपणामुळेंच क्षणिक लोकप्रियता मिळविलेले, कांहीं लोक माझ्या ज्ञातीमध्यें आहेत, असें मला अनुभवानें कळून आलेलें आहे; पण या वर्गाच्या आयुष्यक्रमाचें नीट निरीक्षण करतां प्रत्येक उदाहरणामध्यें त्यांची लोकप्रियता आणि निग्रो लोकांवरील त्यांचें वजन हीं फार दिवस टिकलीं नाहींत, असेंच मला दिसून आलें आहे. इतर कोणत्याहि ज्ञातीमधील साधारण जनसमूहापेक्षां निग्रो ज्ञातींतील सामान्य लोकांमध्यें व्यवहारज्ञान अधिक आहे, व त्यामुळें हे लोक वस्तूंचें आणि मनुष्यांचें यथार्थ स्वरूप शेवटीं बरोबर जाणतात.

उलटपक्षीं, दक्षिणेंतील समाजामध्यें कमजास्त अप्रामाणिक मार्गांनीं गोऱ्या लोकांची मैत्री संपादन करूं पाहणारे कांहीं निग्रो लोक आहेत. उदाहरणार्थ, सिव्हिल वॉरचा शेवट झाल्यानंतर कित्येक वर्षेंपावेतों वस्तुतः सर्वच निग्रो *रिपब्लिकन पक्षाचे असावेत, हें स्वाभाविक होतें. पण दक्षिणेंतील प्रत्येक समाजामध्यें आपणास *डेमोक्रॅट ह्मणविणारे एकदोन निग्रो तरी असतच. डेमोक्रॅट पक्षाचे आपण आहों असा बहाणा केल्यास आपल्या गोऱ्या शेजाऱ्यांनां आपण प्रिय होऊं, आणि त्यामुळें कांहीं क्षणिक फायदा मिळवूं, असें त्यांनां वाटलें. पण गोऱ्या लोकांनीं बऱ्याचजणांचें हें सोंग ओळखलें, आणि प्रामाणिक-

* रिपब्लिकन व डेमोक्रॅट हे अमेरिकन राजकारणांतील प्रमुख पक्ष होत.

पणानें आपल्या पक्षालाच मत देणाऱ्या निग्रोंपेक्षां त्यांना ते कमी मान देऊं लागले.

एका प्रमुख गोऱ्या डेमोक्रॅटनें थोड्या दिवसांपूर्वी मला असें सांगितलेलें आठवतें, कीं, पूर्वी जेव्हां एकादा निग्रो डेमोक्रॅट माझ्या आफिसांत येई, तेव्हां नेहमीं माझ्या खिशांतील चेकबुक मी घट्ट धरीं.* या गोष्टी येथें सांगण्याचें कारण माझी अशी खातरी आहे, कीं, जेथें जेथें मीं दक्षिणेंतील गोऱ्या लोकांचा विश्वास संपादन केला आहे, तेथें तेथें त्यांचा प्रतिकार करून किंवा त्यांची हांजीहांजी करून नव्हे, तर त्यांच्याशीं सरळपणें वागून, त्यांच्या सदिच्छेची नेहमीं अपेक्षा धरून—पण ती सदिच्छा खोट्या सबबींवर मिळविण्याचा केव्हांहि प्रयत्न न करतां—तो संपादन केलेला आहे.

दक्षिणेंतील गोऱ्या लोकांच्या निग्रोसंबंधीं चुका किंवा दोष यांविषयीं दुसऱ्यांकडे चकारशब्द न काढतां, त्यांच्यासमोरच बोलण्याचा मीं नियम केलेला आहे. दक्षिणेंतील पुष्कळ गोऱ्या लोकांची मदत व सहानुभूति मिळण्याचें शेवटचें कारण असें आहे, कीं, खरी परिस्थिति जाणण्याचा आणि तिला तोंड देण्याचा मीं प्रयत्न केलेला आहे, आणि ती सुधारण्यासाठीं दक्षिणेंतील कांहीं थोर गोऱ्या लोकांबरोबर मीं प्रामाणिकपणें काम केलेलें आहे.

माझ्या परगण्यांतील प्रत्येक गोऱ्या नागरिकाचा विश्वास व सदिच्छा संपादन करण्याचा प्रयत्न मीं पहिल्यापासून केलेला आहे. अनुभवानें मी असें शिकलों आहें, कीं, जर एकाद्या मनुष्याचें आपल्या शेजाऱ्यापाजाऱ्यांवर फारच थोडें वजन असलें किंवा बिलकुल नसलें, तर त्याच्या-

* या गोऱ्या डेमोक्रॅटची अशी समजूत होती, कीं, निग्रो आपणाला डेमोक्रॅट ह्मणवून धूर्ततेनें पैसे उपटण्याला येत असतो.

मध्यें कांहीं तरी दोष असला पाहिजे हें खास. दक्षिणेंतील आपल्या समाजांतील गोऱ्या मनुष्यावर छाप बसविण्याचा मला सांपडलेला उत्तम मार्ग ह्मटला ह्मणजे, आपण समाजाला उपयोगी आहों, अशी खातरी करणें हा होय. उदाहरणार्थ, तुह्मी जर शिक्षक असाल, तर तुमच्या गोऱ्या शेजाऱ्यांची अनुकूलता मिळविण्याचा उत्तम उपाय ह्मणजे तुह्मीं त्यांची खातरी केली पाहिजे, कीं, तुह्मी विद्यार्थ्यांनां जें शिक्षण देतां त्यायोगें ते आपलीं कामें पूर्वीपेक्षां अधिक चांगल्या व उपयुक्त रीतीनें करण्यास तयार होतील. दुसऱ्या शब्दांनीं सांगावयाचें ह्मणजे विद्यार्थ्यांनां मिळणाऱ्या शिक्षणानें समाजाचा कांहीं तरी फायदा झाला पाहिजे.

माझ्या स्वत:विषयीं ह्मणाल तर, माझ्या गांवांतील प्रत्येक गोऱ्या नागरिकाला, मीं त्याच्याप्रमाणेंच रोजच्या व्यवहारांतील सामान्य हिताच्या सर्व बाबींत काळजी घेत असतों, हें दाखविण्याचा मीं पहिल्यापासून प्रयत्न केलेला आहे. समाजामध्यें टिकाऊ संस्था असणें ह्मणजे, त्यांत उत्तम शेती, उत्तम बागाईत, सुरेख गृहव्यवस्था, उत्कृष्ट शाळा, उत्तम निर्बंध व उत्तम व्यवस्था इत्यादि गोष्टींचा समावेश होतो, असें त्यांच्या नजरेला आणण्याचा मीं प्रयत्न केलेला आहे. शिक्षणानें निग्रो शेफारून न जातां तो समाजाला अधिक उपयुक्त होतो व चांगला नागरिक बनतो अशी जर साधारण गोऱ्या मनुष्याची खात्री होत गेली, तर निग्रोच्या शिक्षणाविषयीं विरोध, शंका, अनास्था इत्यादि सर्व प्रकार बरेच नाहींतसे होतील.

आलाबामांत मेकन परगण्यांत मी बरींच वर्षे रहात आहें. या सर्व वर्षांमध्यें इलेक्शनच्या ह्मणजे निवडणुकीच्या वेळीं माझें मत नोंदतांना किंवा देतांना मला यत्किंचित्‌हि त्रास झालेला नाहीं. कारण, मी राहत

असलेल्या परगण्याच्या हितार्थच मी माझें मत देणार, अशी परगण्यांतील प्रत्येक गोऱ्या मनुष्याची खात्री असते.

कायद्याची अंमलबजावणी कशी करावी, सार्वजनिक बंदोबस्ताची व्यवस्था कशी राखावी, यांविषयीं खलबतें करीत कित्येक रात्री माझ्या परगण्याच्या शेरीफाबरोबर मीं घालविल्या आहेत. गुन्हेगार पकडून देणें व समाजांतील गुन्हेगार कमी करणें इत्यादि गोष्टींला मीं शक्य तितकी मदत केलेली आहे. गुन्हेगारांनां उघडकीस आणण्याच्या व पकडून देण्याच्या कामीं सरकारी अधिकाऱ्यांनां सर्वांनीं साहाय्य करणें किती महत्त्वाचें आहें, हें टस्कगी संस्थेनें प्रत्यक्षपणें किंवा अप्रत्यक्षपणें परगण्यांतील आसपासच्या पंचवीस किंवा तीस हजार निग्रो लोकांच्या मनावर बिंबविण्याचा प्रयत्न केलेला आहे. याचा परिणाम असा झाला आहे, कीं, संस्थानांत आमचा समाज अत्यंत सुव्यवस्थित आहे. उदाहरणार्थ, मेकन परगण्यांत जरी निग्रो लोकांची संख्या गोऱ्या लोकांहून बरीच मोठी आहे, तरी या परगण्यांत प्रतिबंधक कायदे * जितके कडकपणें पाळले जातात, तितके संस्थानांतील दुसऱ्या कोणत्याहि परगण्यांत पाळले जात असतील, असें मला वाटत नाहीं.

उत्तरेंतील गोऱ्या लोकांवर जें कांहीं माझें वजन पडलें आहे, त्याचें कारण मला असें वाटतें, कीं, खरें व टिकाऊ काम करण्याकडे मीं त्यांच्या देणग्यांचा प्रामाणिकपणें विनियोग केलेला आहे, असें त्यांनां अंतःकरणापासून वाटतें. शिक्षणामध्यें व इतर गोष्टींमध्यें प्रामाणिकपणानें केलेलें काम तेवढेंच टिकतें; लबाडी व कपट हीं शेवटीं उघडकीस आल्यावांचून राहणार नाहींत, हें मी बरेच दिवसांपूर्वीं शिकलों.

---

* गुन्ह्यांची संख्या कमी व्हावी या हेतूनें अमेरिकेंत कांहीं संस्थानांत मद्यपानाविषयीं फार कडक प्रतिबंधक कायदे केलेले आहेत.

तसेंच कोणीं एकाद्यानें मध्यरात्रीं कोणी पहात नसतां, एकादें चांगलें व प्रामाणिक काम केलें तर त्याचेहि परिणाम दृष्टोत्पत्तीस आल्या-शिवाय राहणार नाहींत, हेंहि मी शिकलों.

उदाहरणार्थ, अनुभवानें मला असें कळलें, कीं, संस्थेच्या अगदीं दूरच्या भागीं एकादा घाणेरडा तळमजला किंवा मळीण खोली असली तर ती दृष्टीला पडल्याशिवाय राहणार नाहीं. उलटपक्षीं, अगदीं दूरची खोली स्वच्छ राखिली तर कोणाची तरी दृष्टि तिकडे जाईल आणि स्वच्छ ठेवणाराच्या काळजीची व विचारीपणाची तो तारीफच करील.

आपल्या अपेक्षांपेक्षां आपण अधिक पहात आहों असें टस्कगी संस्थेच्या प्रेक्षकांनां वाटावें, अशा प्रकारचें धोरण मीं ठेविलेलें आहे. उदा-हरणार्थ, एका सद्गृहस्थानें एका इमारतीसाठीं जर वीस हजार डालर दिले, तर त्या किंमतीहून अधिक मौल्यवान इमारत बांधून देण्याचा मीं प्रयत्न केलेला आहे. सर्व लहानसहान बाबींवर चांगलें लक्ष्य ठेविल्यानें हें साधतां येतें, असें मला आढळून आलें आहे. मी एकदां मिस्टर जॉन. डी. रॉकफेलर यांच्या घरीं असतां त्यांनीं मला जो उपदेश केला, तो मी कधींहि विसरणार नाहीं. तो उपदेश असा होता:— "आपल्या कामाच्या सर्व तपशिलांची पूर्ण माहिती नेहमीं करून घ्या. ढिल्या किंवा अस्ताव्यस्त अशा कडा किंवा दशा फारशा ठेवूं नका."

तसेंच उत्तरेंतील लोकांशीं वागतांना, माझ्या ज्ञातीपासून मी निराळा होऊं इच्छित नाहीं. आपण गोरे लोक आहों याबद्दल त्यांनां जसा अभिमान वाटतो, तसाच मी निग्रो आहें याबद्दल मलाहि अभिमान वाटतो, असें मीं त्यांनां नेहमीं जाणविलें आहे. उत्तरेंतील चाणाक्ष व व्यवहारदक्ष मनुष्य कोणतेंहि ढोंग—मग तें पोपाखांतील असो किंवा वाणींतील असो—जितकें जलद ओळखतो, तितकें दुसरा कोण-ताहि मनुष्य ओळखूं शकणार नाहीं.

माझ्या ओळखीचा एक सुंदर तरुण निग्रो होता, तो कृत्रिमपणानें किंवा ढोंगानें आपला नाश करून घेण्याच्या बेतांत होता. त्याला विद्याभ्यासाकरितां कांहीं महिने इंग्लंडला पाठविलें होतें. परत आल्या-वर तो आपली भाषा विसरला. इंग्रजी स्वर, इंग्रजी पोषाक, इंग्रज़ी चालण्याची ढब या सर्वांचें तो अनुकरण करूं लागला. तो गैरसावध असतां इंग्रजी स्वराबरोबर सर्व आयुष्यभर वापरलेला त्याचा अमेरिकन स्वर कसा मिसळत असे, हें पाहून मला हंसूं आलें. एके दिवशीं मीं त्याला बाजूला बोलावून ह्मटलें 'भल्या माणसा, तू आपला नाश करून घेत आहेस. हीं खोटीं पंखें आणि पसारा टाकून दे आणि स्वत्व कायम राख.' सांगण्यास आनंद वाटतो, कीं, त्या तरुणानें माझ्या उपदेशाचें योग्य ग्रहण केलें आणि तेव्हांपासून तो बदलून पूर्ववत् झाला.

माझ्या सहवासांत येणारे सर्वांत कठिण व कडक लोक ह्मटले ह्मणजे, आपला रंग, आपली ज्ञात यांची ज्यांनां लाज वाटते, आणि यामुळेंच जे नेहमीं अप्रसन्न असतात, असे निग्रो स्त्रीपुरुष होत. उत्तरे-कडील व दक्षिणेकडील अत्यंत थोर गोऱ्या गृहस्थांचा स्नेह संपाद-ण्याचे सुप्रसंग माझ्याप्रमाणें माझ्या ज्ञातींतील थोड्याच लोकांनां मिळाले असतील. पण त्यांमुळें माझ्या ज्ञातीपासून मीं अलग व्हावें असें मला केव्हांच वाटलें नाहीं. उलट, मी परत माझ्या लोकांत अधिक प्रेमानें येऊन मिसळलों आणि अधिक उत्साहानें काम करूं लागलों आहें.

माझ्याशीं वागतांना, कोणींहि मी निग्रो आहें हें विसरावें, किंवा याकडे दुर्लक्ष्य करावें, असें मीं कधींहि सांगितलें नाहीं, किंवा तशी अपेक्षाहि केली नाहीं. उलट, मला जेव्हां एकादा विशेष मान मिळाला आहे, तेव्हां मी निग्रो आहें हें न मानतां मला तो दिला आहे असें नसून मी निग्रो आहें ह्मणून आणि मी माझ्या निग्रो लोकांच्या

हितसंबंधांशीं पूर्ण तादात्म्य केलें आहे ह्मणूनच तो मला दिलेला आहे, हें मीं नेहमीं जाणलेलें आहे.

पंचवीस तीस वर्षांच्या मागील कालाकडे पाहतां आतां मला असें दिसतें,—पूर्वी तसें दिसत नव्हतें—कीं, शाळा सोडल्यानंतरच्या कालांतच, व माझ्या कार्याशीं प्रत्यक्ष संबंध असलेल्या, दक्षिणेंतील गोरे, उत्तरेंतील गोरे आणि निग्रो अशा तीन्ही वर्गांची मदत व सहानुभूति मिळविण्यासाठीं मला जे कांहीं प्रश्न सोडवावे लागले ते सोडविण्याच्या प्रयत्नांतच माझ्या शिक्षणाचें उत्तमांग मला प्राप्त झालें.

मीं सुरु केलेल्या कार्याविषयीं या तीन्ही वर्गांनीं आदर बाळगावा, याकरितां या तिन्ही वर्गांच्या दृष्टींचा किंवा मतांचा मला सहानुभूतिपूर्वक चांगला विचार करावा लागला. या तीन्ही लोकांच्या हितसंबंधांवर माझ्या कार्याचा कसा काय परिणाम होतो, हें मला तपशीलवार पहावें लागलें. हें सर्व करणें आणि तसेंच प्रत्येक वर्गाबरोबर प्रामाणिकपणें व सरळ वागणें, हें मोठें बिकट व गुंतागुंतीचें काम होतें. पक्षाभिमान्यांच्या संकुचित व एकदेशीय मतांचें मजवर वेळोवेळीं पडणारें दडपण बाजूला सारून माझ्या कार्याला चिकटून राहणें हें काम नेहमीं सोपें नसे. पण आतां पावशतकानंतर त्या सर्व कार्याकडे मागें वळून पहातां, त्याला जी कांहीं किंमत पडली, जे कांहीं श्रम करावे लागले, ते सर्व योग्यच होते, असें मला वाटतें.

प्रकरण तिसरें.

# कांहीं अलौकिक पुरुष.

[ ज्या जाती निरंतरच्या एकाच ठिकाणीं सतत आहेत, ज्यांचे परस्पर-हितसंबंध एकच आहेत, त्यांनीं एकमेकांसंबंधानें विरोधबुद्धि ठेवणें यासारखें आत्मघातकी कृत्य दुसरें कोणतेंच नसेल. एकाची अवनति दुसऱ्याच्या अवनतीस कारण झाल्यावांचून राहणार नाहीं. हें तत्त्व निरनिराळ्या दिशेनें ज्यांनां पटलें आहे, अशा थोर मताच्या लोकांची ओळख करून देऊन वाशिंग्टननें जातिबहुल हिंदी समाजाला एक उत्कृष्ट वस्तुपाठच शिकविला आहे. संख्येनें, विद्येनें, सांपत्तिक दृष्टीनें, आचारामध्यें किंबहुना सर्वतोपरी मागसलेल्या निग्रोसंबंधानें प्रेमभाव आणि सहानुभूति बाळगणारे गोरे अमेरिकेंत आढळतात, तर वरील सर्व बाबतींत आपल्या व बरीच्या अशा अन्यज्ञातीय आपल्या बंधूंबरोबर आपण कसें वागलें पाहिजे, याचा आपल्यापैकीं प्रत्येकानें विचार केला पाहिजे. निग्रोसारख्या मागसलेल्या जातीला गोरे लोक निष्ठूरपणें वागवितात, याचें कारण त्यांची आंतरिक द्वेषबुद्धि नसून आजपर्यंत चालत आलेल्या रूढीचे ते दास आहेत, हें होय. असें जाणून निग्रोंनीं गोऱ्यांशीं तुसडेपणानें न वागतां रूढीच्या दास्यांतून मुक्त होण्याकरितां त्यांनां सलोख्याची मदत केली पाहिजे, हा धडाहि आमच्यापैकीं, सामाजिक अन्यायानें चिडून जाऊन कट्टू बनलेल्या मागसलेल्या बंधूंनीं शिकण्याजोगा आहे, आणि याच मार्गानें त्यांनां आपलें डोकें वर काढणें व सर्व समाजाचें हित करणें शक्य आहे. ]

श्रीमंतींत जन्मलेल्या मुलाला किंवा मुलीला मिळत नसलेल्या कांहीं संधी गरिबींत जन्मलेल्या मुलाला किंवा मुलीला मिळतात. त्याप्रमाणें, मागसलेल्या जातीच्या लोकांनांहि कांहीं लाभ प्राप्त होतात. ज्या ज्ञातीला किंवा व्यक्तीला विशेष कष्ट व अडचणी सोसाव्या लागतात, त्या ज्ञातीला अथवा व्यक्तीला मनुष्य, वस्तु व संसाराचें रहस्य यांचें जसें अनुभवानें पूर्ण ज्ञान होतें, तसें ज्ञान सुस्थितींत असलेल्या ज्ञातीला किंवा व्यक्तीला होत नाहीं.

पूर्वी गुलामगिरीच्या दिवसांत, आपल्या शेजारीं नवीन येऊन राहिलेल्या एकाद्या कुटुंबाची योग्यता कोणत्या दर्जाची आहे, हें गोऱ्या लोकांनां जर नीट समजलें नाहीं तर तें जाणण्याचा त्यांचा एक शेवटचा ठरींव उपाय असे. आपल्या शंकेचें निरसन करण्यास एकाद्या वृद्ध 'जेनी' मावशीचा ह्मणजे नीग्रो मोलकरणीचा त्यांनां फार उपयोग होई. जेनी मावशी एकदां त्या नवीन कुटुंबांत जाऊन आली आणि तिनें आपला रिपोर्ट सादर केला, कीं, शंकेचें निरसन झालेंच! तिनें दिलेला निकाल शेवटचा व ठाम समजला जात असे. कारण, या कामीं ती खरोखरच वाकबगार असे. आपल्या विशिष्ट प्रकारच्या अनुभवामुळें जुन्या पद्धतीच्या चाकरमाणसांनां लोकांची योग्यता ओळखण्याचें फारच मार्मिक ज्ञान असे.

आतां स्वतंत्रतेच्या कालांत सुद्धां आपल्या आसपास राहणाऱ्या गोऱ्या लोकांचे स्वभाव आणि योग्यता ओळखण्याच्या विशेष संधि निग्रोला मिळालेल्या आहेत. गोरगरिबांकडे नेहमीं लक्ष्य देणारा आणि त्यांच्यावर दया करणारा असा कोणी मनुष्य समाजांत असला तर निग्रोंनां तो माहीत असतो. उलट, गोरगरीबांनां त्रास देणारा व अन्यायानें वागविणारा कोणी त्या समाजांत असला तर त्यांनां त्याचीहि माहिती असते.

दक्षिणेंतील निग्रोलोक आपसामध्यें आपापल्या परीनें समाजांतील गोऱ्या लोकांविषयीं विचार करितात व आपलें मत ठरवितात. एकाद्या मनुष्याविषयींचें त्यांचें मत नऊ हिश्शांनीं बहुतेक बरोबर असतें. अप्रिय ज्ञातीच्या लोकांचें संरक्षण करण्यास व त्यांनां मदत करण्यास जो नेहमीं धांवतो आणि स्वतःची स्थिति सुधारण्याच्या निग्रोच्या प्रयत्नाविषयीं आपणाला आस्था वाटते असें उघडपणें दाखविण्याला जो लाजत

किंवा वावरत नाहीं, असा मनुष्य इतर सर्व बाबतींतहि बहुधा चांगला नागरिक असतो.

साधारणपणें, दक्षिणेंतील समाजांत जे लोक अत्यंत सुसंस्कृत व धार्मिक असतात तेच लोक निग्रोंनां चांगलें जाणतात. उत्तम गोरे लोकच निग्रोंच्या देवालयांत जातात आणि त्यांच्या रविवारच्या शाळांत शिकवितात. अशा उत्तम वर्गांतील गोऱ्या व्यक्तींकडेच साधारण निग्रो लोक अडीअडचणीच्या प्रसंगीं सल्लामसलत विचारण्यासाठीं नेहमीं जात असतात.

निग्रोच्या कुळांत माझा जन्म झाला असल्यामुळें, व माझ्या ज्ञातीच्या उन्नतीच्या कार्याला मीं माझें आयुष्य वाहिलेलें असल्यामुळें, उत्तरदक्षिणेंतील पुष्कळ अलौकिक व्यक्तींशीं माझा संबंध जुळून आला आहे. उदाहरणार्थ, मी एक गरीब नीग्रो मुलगा होतों ह्मणून हाम्पटन संस्थेंत माझा प्रवेश झाला; व तेथें माझे गुरु व मित्र जनरल आर्मस्ट्रांग यांचा माझ्या आयुष्यावर माझ्या आईच्या खालोखाल पण इतर कोणत्याहि व्यक्तीहून अधिक परिणाम झाला. निग्रो ज्ञातीकरितां चालविलेल्या कार्यामुळें लहानपणांतल्याप्रमाणेंच माझ्या मोठेपणींहि उदार, सुशिक्षित, थोर अशा उत्तम व्यक्तींचा सहवास मला नेहमीं मिळत गेला. अशा अलौकिक पुरुषांच्या समागमांतच मीं माझ्या शिक्षणाचा बराचसा भाग संपादन केलेला आहे, हें मीं मागेंच सांगितलें आहे.

माझ्या आयुष्यांत पुष्कळदां असे कांहीं नाउमेदीचे प्रसंग आले आहेत, कीं, स्वतःच्या समाजाबाहेर फारशी प्रसिद्धि नसलेल्या कांहीं शांत, दृढनिश्चयी व उल्हासी व्यक्तींचें उदाहरण माझ्या डोळ्यांपुढें

नेहमीं नसतें, आणि त्या उदाहरणानें मला एकसारखी स्फूर्ति मिळाली नसती, तर पुढील मार्ग आक्रमण्याचें मला धैर्यच झालें नसतें.

पहिल्या खेपेस मी टस्कगीला जात असतां वाटेंत मला एक अलौकिक असे गृहस्थ भेटले. ते रेल्वे कंडक्टर (चालक) होते. त्यांचें नांव कॅपटन् आय्. सी. हॉवर्ड. होतें. अलाबामाच्या पश्चिमेकडील रेल्वेरस्त्यावरील माउंटगमरी व अटलांटा यांच्या दरम्यानची आगगाडी पुष्कळ वर्षे त्यांच्या ताब्यांत होती. कॅपटन् हॉवर्ड यांचें शिक्षण कोठें झालें आणि त्यांनीं किती पुस्तकें वाचलीं, हें मला माहीत नाहीं. त्यांचा जन्म दक्षिणेंत झाला होता आणि त्यांचें बहुतेक आयुष्य तेथेंच गेलें होतें, इतकें बरीक मला माहीत होतें. वीस वर्षांमध्यें उत्तर व दक्षिण प्रांतांत त्यांच्यापेक्षां उच्च प्रतीचा असा सद्गृहस्थ मला क्वचित्च आढळला असेल.

एका प्रसंगाची मला विशेष आठवण होते. नाताळच्या सुटींत मी एकदां माउंटगमरी व अटलांटा यांच्या दरम्यान त्यांच्या गाडींतून प्रवास करीत होतों. नाताळसारख्या सणाच्या प्रसंगीं माझ्या ज्ञातीच्या अशिक्षित व आडदांड लोकांचे थवेच्या थवे प्रवास करीत असतात आणि सणामुळें कांहीं लोक उच्छृंखल व बेलगाम होऊन कमजास्त प्रमाणांत व्हिस्कीच्या अंमलांत धुंद असण्याचा संभव असतो.

आम्ही गाडींत बसल्यानंतर कांहीं वेळानें गाडींतील शेवटच्या भागांतील गर्दींत कांहीं दंगा झाला. कॅपटन् हॉवर्ड तेथें जातात न जातात, तोंच दारू पीत सवलेले कांहीं लोक त्यांच्याशीं अशा रीतीनें बोलूं लागले, कीं, त्यांच्या जागीं दुसरा कोणी गोरा किंवा काळा मनुष्य असता, तर तो फारच चिडून गेला असता. निग्रोंनीं वापरलेली भाषा ऐकून कांहींजणांनीं तर गोळीच घातली असती, आणि त्याचा परिणामहि भयंकर

झाला असता. या आडदांड लोकांशीं कॅपटन् हॉवर्डचें शांत, शहाण्या व अनुभवी पित्यासारखें वर्तन पाहून मी अत्यंत गहिंवरलों. आपल्या आवाजांत किंवा वर्तनांत यत्किंचित्‌हि क्षोभ होऊं न देतां ते त्यांच्याशीं अगदीं शांतपणें बोलले, आणि थोड्या मिनिटांत त्यांनीं गाडींत सर्व बंदोबस्त करून सोडला. त्यानंतर त्यांनीं त्या लोकांनां उपदेशाचे चार शब्द सांगितले. लोकहि त्यांचा आशय जाणून कृतज्ञतापूर्वक त्यांनां मान देऊं लागले.

मीं पुष्कळदां कॅपटन् हॉवर्डबरोबर प्रवास केला आहे; पण, परिस्थिति कितीहि निकराची असली तरी ते चिडले आहेत, किंवा निग्रोला त्यांनीं अधीरपणानें वागविलें आहे, असें मला केव्हांहि आढळलें नाहीं. त्यांच्याबरोबर मी लांबचा प्रवास करीत असतां त्यांनां थोडीशी फुरसत मिळाली, कीं, ते माझ्या शेजारीं येऊन बसत आणि नंतर आह्मी कधींकधीं तासतासभर देखील दक्षिणेंतील निग्रोंची स्थिति व भावी आशा या विषयांवर बोलत बसत असूं. गोऱ्या मनुष्यांचें कर्तव्य व जबाबदारी यांविषयीं त्यांचे विचार निश्चित झालेले होते, आणि निग्रोंनां सहनशीलपणानें व न्यायानें कां वागवावें याचीं, आपलीं स्वतःचीं कारणेंहि त्यांनीं मला पुष्कळदां सांगितलीं. निग्रोंनां अन्यायानें व कडकपणानें वागविण्याची संवय लावून घेतली, तर निग्रोंपेक्षां दक्षिणेंतील गोऱ्या मनुष्यांचाच अधिक तोटा होण्याचा संभव आहे, असें ते वारंवार सांगत असत.

कॅपटन् हॉवर्ड यांचें मीं थोडेंसें विस्तारानें वर्णन केलेलें आहे; याचें कारण दक्षिणेंतील गोऱ्या लोकांच्या एका वर्गाचे ते प्रतिनिधि अथवा नमुना आहेत. दक्षिणेंतील प्रत्येक समाजामध्यें या वर्गांतील लोक दिवसेंदिवस वाढत आहेत. दक्षिणेंतील खऱ्या कुलीन महाजनां-

मध्यें आढळून येणारे दया, आत्मसंयमन, सभ्यता, विनय इत्यादि गुण कॅपटन् हॉवर्डच्या अंगीं प्रमुखत्वानें वसत होते. माझ्याशीं बोलतांना ते पुष्कळदां स्पष्टपणें ह्मणाले, कीं, “ निग्रोंवर प्रेम करण्याचा माझा धंदा नाहीं. वास्तविकपणें निग्रोंविषयीं बरा किंवा वाईट विकार, राग किंवा द्वेष माझ्या मनांत नाहीं; पण, प्रत्येक ज्ञातीला व व्यक्तीला योग्य न्याय मिळावा, हें मला रास्त वाटतें. दक्षिणभागावर माझें प्रेम आहे आणि म्हणूनच इतर ज्ञातींप्रमाणें निग्रोंनांहि सर्व सवलती देणें योग्य आहे, असें माझें मत आहे. उच्च व बलिष्ठ, नीच व कनिष्ठ ज्ञाति यांनां सारख्या न्यायानें वागविल्याशिवाय देशाचें कायमचें कल्याण कधींहि होणार नाहीं.” अलाबामा येथील माझ्या जीवनक्रमांत कॅपटन् हॉवर्डसारख्या मनुष्याशीं माझा लवकरच संबंध जडून यावा, हें मी माझें भाग्य समजतों. त्यांचा परिचय झाल्यावर मी माझ्या मनांत म्हणालों—“ अशा परिस्थितींतहि जर एका गोऱ्या मनुष्याला माझ्या ज्ञातीचा द्वेष करण्याऐवजीं तिच्याशीं सरळ वर्तन ठेवितां येतें, तर शिष्टाचाराला अनुसरून काळ्या मनुष्याला गोऱ्या ज्ञातीशीं परत तसें वागतां आलें पाहिजे.”

अलाबामांतील माझ्या कामासंबंधानें माझी लवकरच दक्षिणेंतील दुसऱ्या एका गोऱ्या सद्गृहस्थांशीं ओळख झाली. यांचा जन्म अलाबामांत झाला होता. हे एक निराळ्याच नमुन्याचे गृहस्थ होते. हे चांगले सुशिक्षित असून त्यांचा समाजांत व सरकारांत दर्जा बराच मोठा होता. हे गृहस्थ परलोकवासी जे. एल्. एम्. करी, हे होत.

त्यांच्या निधनापूर्वीं सतत वीस वर्षें डॉक्टर करी यांचा माझा चांगला परिचय होता. सिव्हिल वॉरमध्यें हे दक्षिणेंतील सैन्याच्या वतीनें लढले होते. हे एकदां कॉलेजचे प्रोफेसर होते. स्पेनच्या दरबारांत अमेरिकेच्या

तर्फे प्रतिनिधि या नात्यानें यांची नेमणूक झालेली होती. इतर कांहीं श्रेष्ठ जागांचींहि कामें यांनीं केलेलीं होतीं. पण, विशेष हें, कीं, दक्षिणेंतील गोऱ्या लोकांच्या जीवनक्रमांत जें कांहीं उत्तम होतें तें सर्व यांच्या वृत्तींत व विचारसरणींत प्रगट झालेलें होतें.

इतक्या उच्च दर्जाचे हे होते, तरी त्यांनीं आपलीं शेवटलीं वर्षें दक्षिणेंतील गोऱ्या व काळ्या लोकांच्या शिक्षणाला वाहिलीं, आणि हें काम करीत असतांना त्यांना फार आनंद होत असे.

माउंटगमरी येथें कांहीं कामानिमित्त डॉक्टर करी यांची व माझी प्रथम गांठ पडली. 'कॅपिटोल' इमारतींत डॉ. करी व कांहीं गृहस्थ ज्या खोलींत बोलत बसले होते, तिला लागून असलेल्या दुसऱ्या खोलींत मी होतों, आणि मला त्यांचें भाषण ऐकूं येत होतें. निग्रो शिक्षणाविषयीं ते बोलत होते. निग्रोच्या शिक्षणाविषयीं दक्षिणेंतील गृहस्थानें मनापासून खटपट करणें हें योग्य आहे किंवा नाहीं, अशी एका सरकारी अधिकाऱ्यानें शंका काढिली. डॉक्टर करी यांचे सर्व शब्द मला जरी आतां सांगतां येत नाहींत, तरी त्यांच्या ह्मणण्याचा इत्यर्थ असा होता, कीं, "निग्रोशिक्षणाशीं संबंध ठेवल्यानें माझा किंवा दुसऱ्या कोणाचा सामाजिक किंवा इतर बाबतींत कांहीं तोटा झालेला आहे, असें मला वाटत नाहीं."

डॉ. करी पुढें ह्मणाले, कीं, "उलट मीं नीग्रोशिक्षणाविषयीं जें कांहीं केलें आहे, त्यापेक्षां निग्रोशिक्षणानें माझा किती तरी फायदा केला आहे." नंतर, "आपण एकादी निग्रो शाळा पहावयाला गेलों, किंवा निग्रो स्त्री, पुरुष किंवा मूल यांच्यासाठीं कांहीं चांगलें कृत्य केलें, तर त्यायोगें आपण अधिक उत्साही व चांगले झालों नाहीं, असें केव्हांच घडलें नाहीं," असें त्यांनीं सांगितलें.

" सिव्हिल वॉरनंतर निग्रो शिक्षणाविषयींच्या प्रत्येक सूचनेच्या मी अगदीं विरुद्ध होतों; पण कांहीं निग्रो शाळा तपासल्यावर निग्रो लोक शिक्षणाविषयीं किती धडपड करीत आहेत हें मीं जेव्हां पाहिलें, तेव्हां माझ्या दुराग्रहाचें रूपांतर सहानुभूति व कौतुक यांत झालें, " असेंहि ते ह्मणाले.

दक्षिणेंतील कांहीं गोरे लोक ज्ञातीच्या व पंथाच्या भेदभावांत जन्मले होते, व त्याच परिस्थितींत वाढलेले होते;शिवाय, सिव्हिल वॉर-मध्यें झालेला पराजय आणि तदनुषंगिक दारिद्र्य यांमुळें या भेदभावाची वाढ आणि गुंतागुंत विशेषच झाली. पण यांशीं झगडतां झगडतां त्यांच्या मनाची तयारी इतकी झाली आहे, कीं, उत्तरेकडील व दक्षिणे-कडील सर्व ज्ञातींच्या लोकांविषयीं त्यांनां आतां प्रेमभावच वाटतो. अशा लोकांसारखे सौम्य, उदार व कृपाळु लोक दुसरीकडे कोठेंहि सांपडावयाचे नाहींत, असा माझा अनुभव आहे, आणि इतरांनांहि असें ह्मणतांना मीं ऐकलेलें आहे. सिव्हिल वॉरमध्यें यशस्वी झालेल्यांनां ह्मणजे उत्तरेकडील गोरा मनुष्य व निग्रो यांनां, ज्ञातीच्या व पंथाच्या संकुचितपणापासून मुक्त होणें अधिक सोपें आहे.

दक्षिणेंत दुसऱ्या एका नमुन्याचे गोरे लोक आहेत. माझ्या कामाची अधिक व्यापक व व्यावहारिक कल्पना यांनींच मला करून दिली आहे. या नमुन्याचे एक गृहस्थ न्यूआर्लीन्सचे मि. जॉन एम्. पार्कर हे आहेत. यांनां निग्रोविषयीं प्रेमहि नाहीं व द्वेषहि नाहीं. पण व्यापारी-दृष्ट्या निग्रोज्ञातीचें महत्त्व ते जाणतात. मिस्टर पार्कर हे सदर्न इंड-स्ट्रियल कॉंग्रेसचे अध्यक्ष आहेत, आणि * गल्फस्टेट्स्मध्यें ते मोठे मळेवाले आहेत. न्यूआर्लीन्स येथील त्यांची पेढी जगांतील इतर कोण-

* मेक्सिकोच्या आखाताच्या आसपासचीं संस्थानें.

त्याहि पेढीपेक्षां कापसाची खरेदी व विक्री अधिक करते. दक्षिणेंतील दुसऱ्या कोणत्याहि मनुष्याहून मिस्टर पार्करनां अधिक स्पष्टपणें असें दिसून आलें आहे, कीं, कचेऱ्या, व्यापार आणि आयुष्यांतील इतर कामें यांमध्यें निग्रोला न्यायानें व सरळ वागविणें हें देशाच्या सांपत्तिक प्रगतीला फार महत्त्वाचें आहे. निग्रोनें नियमितपणें काम करावें, यासाठीं त्याला कांहीं उत्तेजन हवें असेल तर त्याच्या गरजा वाढल्या पाहिजेत. हें शिक्षणाच्याच द्वारें साधणें शक्य आहे, असें त्यांनां वाटतें.

देशांतील सर्व भागांत निग्रो लोकांपुढें झालेलीं पुष्कळ भाषणें मीं ऐकलीं आहेत. पण टस्कगी येथें वार्षिक निग्रो परिषदेच्या एका बैठकींत सुमारें हजार निग्रो शेतकऱ्यांनां मि. पार्कर यांनीं आपल्या भाषणांत जो कांहीं समंजस, व्यावहारिक व योग्य उपदेश सांगितला, त्याहून अधिक सुंदर उपदेश मीं कोठेंहि ऐकिला नाहीं. मिस्टर पार्कर हे बरींच वर्षें आपल्या मळ्यांत पुष्कळ निग्रो मजुरांनां कामाला लावितात. यामुळें त्यांनां आपला उपदेश स्पष्टपणें व उघडपणें सांगतां आला, आणि त्यांनीं आपल्या भाषणांत कांहींशीं अप्रिय सत्यें सांगितलीं, तरी लोकांनीं त्यांचें ह्मणणें नीट ऐकिलें व त्यांचा आशय समजून घेतला.

निग्रोचे हितसंबंध पहातां, दक्षिणेची सर्व आशा पार्करसारख्या मनुष्यांवर बऱ्याच अंशीं अवलंबून आहे. अशा गृहस्थांनां श्रम, उद्योगधंदे, शिक्षण आणि राजकीय संस्था यांमधील निकट संबंध बरोबर कळतो, आणि ते ज्ञातिविषयक प्रश्नाचा व्यापक व उदार दृष्टीनें विचार करतात, आणि तो प्रश्न व्यावहारिक रीतीनें सोडवूं पहातात.

लुसविल येथील 'कोरीयर जर्नल'चे कर्नल हेनरी वाटरसन यांसारख्या दुसऱ्या नमुन्याच्या गृहस्थांशीं वेळोवेळां माझा बराच संबंध

घडून आलेला आहे. कर्नल वॉटरसन ह्मणजे उदारवृत्ति, उच्च ध्येयें, भारदस्त वागणूक यांनीं युक्त असलेल्या, जुन्या पद्धतीच्या दक्षिणेंतील सभ्य गृहस्थाचा नमुनाच आहेत, असें मला वाटतें. निग्रोविषयीं किंवा दुसऱ्या मागसलेल्या ज्ञातीविषयीं यांच्याहून अधिक व्यापक व अधिक उदार विचाराचा दुसरा कोणीहि इसम मला कोठेंहि आढळला नाहीं.

कांहीं वर्षांपूर्वीं टस्कगी संस्थेकडे लोकांचें लक्ष्य वेधावें ह्मणून न्युयॉर्क येथें कार्नेजी हालमध्यें एक सभा भरविण्यांत आली होती. आपण हजर राहतों असें वचन दिलेला दक्षिणेकडील एक प्रसिद्ध वक्ता वेळेवर न आल्यामुळें आमची फार निराशा झाली. सरतेशेवटीं सभेच्या कमिटीनें कर्नल वाटरसन यांनां तार दिली. नुकतेंच एक मूल वारल्यामुळें कांहीं कालपर्यंत लोकांसमोर भाषण करावयाचें नाहीं, असें कर्नल वाटरसन यांनीं ठरविलें होतें, तरी ते लुसविलहून न्युयॉर्कला आले आणि त्यांनीं निग्रो लोकांतर्फे एक वक्तृत्वपूर्ण सुंदर भाषण केलें. "तुह्मीं टस्कगी येथें करीत असलेल्या कार्याविषयीं आपणाला फार कळकळ आहे, ह्मणूनच आपण आलों; नाहीं तर दुसऱ्या कोणत्याहि कामानिमित्त या वेळीं आपण घर सोडलें नसतें," असें ते मला ह्मणाले.

दक्षिणेंतील परिस्थितीविषयीं उदास व खिन्न होण्याचा प्रसंग जेव्हां येतो, तेव्हां मिस्टर पार्कर व कर्नल वाटरसन यांच्यासारख्या उदाहरणांनीं माझ्या अंगीं नवीन शक्ति येते, व माझी श्रद्धा वाढते.

सुदैवानें चांगल्या निग्रो लोकांशीं माझा संबंध जडलेला आहे. आपल्या समाजाचें कल्याण व्हावें, ह्मणून आस्थेनें झटणाऱ्या उत्तम गोऱ्या लोकांप्रमाणें दक्षिणेंत निग्रो लोकांचाहि एक वर्ग आहे. दोन्ही ज्ञातींत तंटा लावणाऱ्या गोष्टींचा थोर गोऱ्या लोकांप्रमाणें तेहि प्रतिकार करतात. तरी पण गोऱ्या लोकांप्रमाणेंच निग्रो लोकांचेहि दोन वर्ग आहेत.

संकुचित वृत्तीचे, कोत्या दृष्टीचे, आणि गोऱ्या लोकांविषयीं दुराग्रह व द्वेष बाळगणारे अशा निग्रो लोकांचाहि एक वर्ग आहे. मी प्रथम अलाबामांत आलों, तेव्हां आमच्या कार्याला उत्तरभागाची सहानुभूति मिळविण्यासाठीं या लोकांशीं एक होऊन दक्षिणेंतील गोऱ्या लोकांची मीं सारखी निर्भर्त्सना करावी, अथवा माझ्या ज्ञातीच्या बहुजनसमाजाच्या खऱ्या हितसंबंधाचा विचार करून दोन्ही ज्ञातींतील संबंध चांगले राखावे व असलेला सलोखा वाढवावा, या प्रश्नाचा मला प्रथमच निकाल लावावा लागला.

माझ्यासभोंवार दृष्टीस पडणाऱ्या अन्यायाची व अपकाराची निर्भर्त्सना करण्यामध्यें मीं सामील व्हावें, असा मोह मला माझ्या कार्याच्या पहिल्यापहिल्या वर्षीं पुष्कळदां पडला, हें मी लपवीत नाहीं. पण या गोष्टीचा नीट विचार करतां, या मार्गानें कांहीं हित न होतां अपायच अधिक होईल, असें मला दिसलें. कारण, एक तर माझ्या ज्ञातिबांधवांनां निकट प्राप्य अशा संधी कोणत्या आहेत, यांविषयीं त्यांची दिशाभूल केल्यासारखें झालें असतें. आणखी गोऱ्या लोकांविरुद्ध एकसारखें सत्र चालू ठेवावें, अशी निग्रो लोकांची इच्छा नाहीं, असें मला दिसून आलें. शिक्षण संपादून आपली सुधारणा करून घेण्याच्या आपल्या प्रयत्नांत गोऱ्या शेजाऱ्यांनीं आपणाला मदत करावी व उत्तेजन द्यावें, हेंच त्यांनां हवें होतें.

ज्या निग्रोंनां माझ्यासारखें हें सर्व स्पष्ट दिसलें, त्यांपैकीं अलाबामांतील क्यांप हिलचे रूफस हेरान हे एक होत. त्यांचा जन्म दास्यत्वांत झाला होता, आणि त्यांनां शाळेंतील शिक्षण कांहींच मिळालें नव्हतें. पण ते व्यवहारचतुर व आपल्या समाजाचे पुढारी होते. कांहीं वर्षांपूर्वीं कापसाचें पीक हातीं आल्यावर ते टस्कगी येथें मला भेट-

ण्याला आलें. कापसाची किंमत यंदां चांगली आली, या वर्षांतील आपलें सर्व कर्ज फिटून वीस डालर आपल्यापाशीं शिल्लक उरले आहेत, असें त्यांनीं मला सांगितलें. टस्कगी येथील एका विद्यार्थ्याच्या शिक्षणासाठीं ह्मणून दहा डालर त्यांनीं माझ्या हातीं ठेविले. नंतर ते आपल्या गांवीं गेले आणि आपल्या शेजारीं असलेल्या गोऱ्या शाळेंतील एका विद्यार्थ्याच्या शिक्षणासाठीं राहिलेले दहा डालर त्यांनीं तेथील शिक्षकाच्या हवालीं केले!

त्या दिवसापासून रूफस हेरानचा व माझा चांगला परिचय झाला. टस्कगी येथील वार्षिक निग्रो परिषदेच्या बैठकी ते केव्हांहि चुकवीत नाहींत. ते नेहमीं महत्त्वाच्या मुद्द्याची गोष्ट सांगतात आणि आपले मुद्दे सांगून झाले ह्मणजे आटोपतें घेतात; यामुळें त्यांचें भाषण ऐकणें प्रत्येकाला आवडतें. माझें त्यांच्याशीं भाषण झालें आणि त्या वेळीं लोकांची भौतिक, शिक्षणविषयक व नैतिक सुधारणा किंवा काळ्या व गोऱ्या लोकांमधील चांगल्या संबंधाची किंवा स्नेहभावाची वाढ यांविषयीं त्यांनीं कांहीं सुचविलें नाहीं, असें घडलें नाहीं. आपल्या समाजाविषयीं व देशाविषयीं रूफस हेरानपेक्षां अधिक प्रेम असलेला गोरा मनुष्य उत्तरेंत किंवा दक्षिणेंत मीं पाहिलेला नाहीं. त्यांच्या मनोवृत्ति व महत्त्वाकांक्षा एखाद्या घरंदाज महाजनाप्रमाणें आहेत.

अन्याय आणि छळ यांविरुद्ध वाटेल तेव्हां व वाटेल त्या ठिकाणीं आपली नापसंती जाहीर करण्याचा हक्क काळ्या अगर गोऱ्या माणसाला नाहीं, असें सांगण्याचा माझा उद्देश नाहीं. पण, आपल्या हक्कांविषयीं नेहमीं व्याख्यानें देत फिरणाऱ्या, आणि काळ्या व गोऱ्या लोकांमध्यें द्वेषभाव वाढविणाऱ्या, मनुष्यापेक्षां रूफस हेरानसारख्या गृहस्थानें आपलें जीवित किती तरी पटीनें उपयुक्त केलें आहे हें दाखविलें नाहीं, तर मीं वस्तुस्थितीचा विपर्यास, आणि दक्षिणेंतील

माझ्या लोकांचा अन्याय केल्यासारखें होईल, असें मला वाटतें. अमेरिकेंतील निग्रो ज्ञातीचा उद्धार तात्त्विक वादविवादानें किंवा अन्यायाविषयीं नुसती नापसंती दाखवून नव्हे, तर प्रत्यक्ष विधायक कामें करून करावयाचा आहे, हें लक्ष्यांत ठेविलें पाहिजे.

नॅशव्हिलमध्यें जेम्स सी. नेपियर या नांवाचे एक सुशिक्षित, श्रीमान्, निग्रो ब्यांकर ( पेढीवाले ) आहेत. ते रूफस हेरानच्याच वयाचे आहेत. वीस वर्षे माझा त्यांच्याशीं निकट संबंध आहे. उत्तरेंत व दक्षिणेंत मीं त्यांच्याबरोबर प्रवास केला आहे, त्यांच्याबरोबर सभांत व परिषदांत काम केलें आहे, त्यांच्या व माझ्या घरीं त्यांच्याशीं खासगी संभाषण केलें आहे. या सर्व अवधीमध्यें गोऱ्या ज्ञातीविषयीं एकहि संकुचित व वाईट विचार त्यांच्या तोंडांतून निघालेला मीं ऐकिलेला नाहीं. उलट, गोऱ्या लोकांचीं दुष्कृत्यें नव्हे, तर सत्कृत्येंच जाहीर करण्याविषयीं त्यांनीं आपली उत्सुकता दर्शविलेली आहे. त्यांच्यासारख्या सत्पुरुषांच्या समागमांतच मीं माझ्या आयुष्यांतील बहुतेक कामगिरी बजावली आहे. अमेरिकेच्या प्रत्येक भागांत या नमुन्याचे निग्रो लोक मला भेटलेले आहेत. मी अशा लोकांनांच विशेष मान देतों. कारण त्यांनीं मनांत आणलें असतें, तर निग्रो लोकांनां सोसाव्या लागणाऱ्या अन्यायाचा व निंदेचा डांगोरा पिटत राहून स्वतःला आणि आपल्या आसपासच्या लोकांनां त्यांनां सहज दुःखी करितां आलें असतें.

मला येथें हें सांगितलें पाहिजे, कीं, या देशांतील निग्रोनें स्वतःला दुःखी किंवा अभागी करून घेण्याचें, माझ्या मतें, कांहीं कारण नाहीं. आपण गोरा मनुष्य नाहीं ह्मणून खेद करण्यांत, किंवा गोऱ्या लोकांशीं सामाजिक वागणुकींत कसें मिसळतां येईल याविषयीं उपाय शोधून काढण्यांत, साधारण निग्रो आपला बहुतेक काळ घालवितो, अशी

अमेरिकेंतील सामान्य गोऱ्या मनुष्याची कल्पना आहे; पण ती चुकीची आहे. उत्तरेकडील व दक्षिणेकडील निग्रोंच्या सर्व वर्गांशीं माझा जो व्यवहार किंवा संबंध आहे, त्यामध्यें आपल्या ज्ञातीपासून अलग राहणें, किंवा सामाजिक बाबतींत गोऱ्या लोकांशीं मिसळणें, या गोष्टीचा उल्लेख झाल्याचा प्रसंग क्वचितच येतो. सुशिक्षित निग्रोंनां आपल्या सामाजिक व्यवहारांत जें कांहीं सुखसमाधान मिळतें, त्याची कल्पना निग्रो ज्ञातीबाहेरील लोकांनां खरोखर नाहीं. त्यांच्या कुटुंबांत, त्यांच्या गुप्त संस्थांत, देवालयांत किंवा इतर संस्थांत त्यांचा भाषणाचा महत्त्वाचा विषय ह्मणजे बहुतेक आपल्या ज्ञातीच्या सुधारणेप्रीत्यर्थ सुरू केलेल्या कोणत्या ना कोणत्या तरी कामाविषयींचाच असतो.

गोऱ्या शेतकऱ्याप्रमाणें निग्रो शेतकऱ्यांच्या भाषणांचा मुख्य विषय ह्मटला ह्मणजे 'शेत' हाच असतो. माझ्या मतें निग्रो जन्मत:च शेतकरी असतो, आणि जमिनीशीं त्याचा संबंध असला ह्मणजेच त्याची खरी हुषारी दिसून येते. शेताचें वातावरणच असें असतें, कीं, तें निग्रोचें स्वाभाविक व्यवहारज्ञान वृद्धिंगत करतें. वस्तूंचें मर्म जाणणें आणि तें खुबीदार शब्दांनीं सांगणें ही अजब कला निग्रो शेतकऱ्याला बहुतकरून साधलेली असते. निग्रो शेतकरी निसर्गाचें निरीक्षण करतो, यामुळें त्याला ती कला साधते, असें मला वाटतें. जमीन, रोप आणि जनावरें यांची वाढ, नदीनाले, पक्षी, ऋतूंचे फेरफार इत्यादिकांचा तो आपल्यापरीनें अभ्यास करितो. स्वत:ला उपयुक्त असलेलें ज्ञान प्रत्यक्ष मिळविण्याची संधि त्याला मिळते.

कांहीं वर्षांपूर्वी शेतकऱ्यांच्या संस्थेच्या एका सभेला मी गेलों होतों; तेथें एका अशिक्षित निग्रो शेतकऱ्याकडून मला एक धडा मिळाला,

तो मी कधींहि विसरलों नाहीं. या सभेला हजर रहावें ह्मणून एका टस्कगी ग्रॅजुएटानें मला आमंत्रण दिलें होतें. ही संस्था टस्कगीहून कांहीं मैल दूर होती. तेथें मी गेलों तेव्हां एका शेतकऱ्याचें स्वानुभव-कथन चाललें होतें. आपला अनुभव सांगावा, अशी एका पांसष्ट वर्षांच्या वृद्ध शेतकऱ्याला विनंती करण्यांत आली. त्याला पुस्तकीज्ञान मुळींच नव्हतें. पण एक शिक्षक त्याच्या गांवीं गेलेला होता आणि त्या शिक्षकानें त्याला व त्याच्या समाजांतील दुसऱ्या शेतकऱ्यांनां शेतीच्या सुधारलेल्या पद्धति दाखविल्या होत्या.

हा वृद्ध शेतकरी आपला अनुभव सांगण्याकरितां पुढें आला आणि ह्मणाला "मला विज्ञान शिकण्याची संधि कधींहि मिळालेली नाहीं. पण हा पंतोजी येथें आल्यापासून मी आपल्यासाठीं थोडें विज्ञान बनविण्याचे प्रयत्न करीत आहें."

यानंतर त्यानें मेजावर कापसाचीं सहा ताटें किंवा देट ठेविले, आणि गेल्या दहा वर्षांमध्यें आपल्या जमिनीचा मगदूर आपण कसा वाढविला आणि प्रत्येक देटावरील बोंडें कशीं वाढविलीं, हें तो सविस्तर सांगूं लागला. त्यानें एक देट उचलून श्रोत्यांनां दाखविला आणि सांगितलें, कीं, "हा शिक्षक आमच्या समाजांत येण्यापूर्वी आणि जमीन सुधारण्याच्यापूर्वी, कापसाच्या एका देटावर दोनच बोंडें येत असत. दुसऱ्या वर्षी सुधारणा करून आपण एका देटावर चार बोंडें केलीं." असें सांगून त्यानें दुसरा देट श्रोत्यांनां दाखविला. नंतर त्यानें तिसरा व चवथा देट उचलून दाखविला व सांगितलें, कीं, "गेल्या कांहीं वर्षांत एका देटावर आपण आठ बोंडें पैदा केलीं." शेवटीं तो ह्मणाला, कीं, "यंदां मीं असा कापूस तयार केला" असें बोलून चवदा बोंडें

असलेला एक देट त्यानें श्रोत्यांनां दाखविला. आणि तो म्हातारा आपल्या जागेवर बसला.

श्रोत्यांपैकीं दुरून एकजण उठला आणि म्हणाला "काकासाहेब, कृपा करून आपलें नांव सांगा ना?"

म्हातारा पुनः उठला आणि म्हणाला "माझें नांव तुम्ही पुसतां, तेव्हां तें मी सांगतों. शिक्षक येण्याच्यापूर्वी मी भाडें भरून एका खोपटींत रहात होतों. पोटासाठीं दरवर्षी माझें पीक मला गहाण घालावें लागे. त्या वेळीं मजपाशीं कांहीं नव्हतें म्हणून लोक मला 'म्हातारा जिम हिल' असें म्हणत. पण आतां मी ऋणमुक्त आहें. पन्नास एकर जमिनीचे कागदपत्र माझें नांवें झालेले आहेत. आंत-बाहेर रंगवून सजविलेल्या चार खोल्या असलेल्या घरांत मी आतां रहातों. ब्यांकेंत माझा कांहीं पैसा आहे. मी माझ्या समाजांत कर देणारा इसम आहें आणि माझ्या मुलांनां मीं शिक्षण दिलेलें आहे. आतां समाजांत लोक मला 'मिस्टर जेम्स हिल' असें म्हणतात."

या म्हाताऱ्यानें दहा वर्षांत कापसाची पैदास चांगली केली, इतकेंच नव्हे, तर त्यानें आपल्या स्वतःपुरता ज्ञातीचा प्रश्नहि सोडविला.

दक्षिणेंतील प्रांतांत फिरत असतां, वर वर्णन केल्यासारखे पुष्कळ शेतकरी नेहमीं भेटतात. वेळोवेळीं खेडोखेडीं जाऊन मळ्यांत किंवा शेतांत निग्रो लोकांची भेट घेतल्यानें मला फार सुख झालेलें आहे. त्यांच्या काम करण्याच्या ठिकाणीं म्हणजे शेतांत किंवा जंगलांत जाऊन त्यांच्याशीं भाषण करणें मला आवडतें. त्यांच्या देवालयांत, रविवारच्या शाळांत, त्यांच्या खुल्या जागेंतील उपदेशसभांत व इतर सभांत जाणें मला आवडतें. या रीतीनें लेखनाला व भाषणाला अत्यंत उपयुक्त असें जितकें साधन मला मिळालेलें आहे, तितकें निव्वळ पुस्तकें

वाचून मिळालेलें नाहीं. साधारण निग्रो शेतकऱ्यामध्यें कृत्रिमपणा किंवा ढोंग नसतें. तो अंतर्बाह्य सारखाच असतो. तो कोणाचेंहि वेडेंवांकडें अनुकरण करीत नाहीं. अशा मनुष्याची भेट व ओळख करून घेण्यांत मला फार आनंद वाटतो.

मागसलेल्या जातींतील लोकांनां उत्तरेंतील उत्तम लोकांशीं परिचय करून घेण्याची सुसंधि मिळते. मलाहि हा सुयोग प्राप्त झालेला आहे. उत्तरेंतहि लोकांचे दोन वर्ग आहेत. त्यांपैकीं एक वर्ग, दक्षिणेंतील गोरा मनुष्य जसा उत्तरेंतील गोऱ्या मनुष्याशीं किंवा निग्रोशीं संकुचितपणें व असमंजसपणें वागतो, तसा दक्षिणेंतील गोऱ्या मनुष्याशीं वागणारा आहे. दुसरा वर्ग, थोर व उदात्त विचारांचा असतो आणि या दुसऱ्या वर्गाशींच व्यवहार करणें मला अधिक पसंत वाटतें.

पण, या वर्गांतून निग्रोचे धंदेवाईक मित्र मात्र वगळले पाहिजेत. एकाद्या ज्ञातीचे मित्र असणें हा माझा धंदा किंवा पोक आहे, अशी एकाद्यानें बढाई मारली, कीं, ती मला बिलकुल खपत नाहीं. चिनी, जपानी किंवा फिलीपिनो यांचा मित्र असणारा मनुष्य बहुतकरून चांगला असतो; पण तो नेहमीं कंटाळवाणा वाटतो. निग्रो हा मानवी प्राणी आहे असें समजून जो त्याला मदत करतो, आणि अशा रीतीनें निग्रोला साहाय्य करून जग सुधारण्याला जो हातभार लावितो, त्या मनुष्याशीं भाषण करणें मला अधिक आवडतें.

टस्कगीसंस्थेसाठीं पैसे जमविण्याकरितां मी प्रतिवर्षी उत्तरेंतील मुलुखांत जात असतों. या माझ्या पंचवीस तीस वर्षांच्या सफरींत तेथील बऱ्याच अलौकिक पुरुषांची ओळख मला झालेली आहे. निग्रोच्या शिक्षणासाठीं—लोकसंख्येंतील मागसलेल्या लोकांच्या उन्नतीसाठीं—मी मदत मागत होतों; ह्मणून साधारण मनुष्या-

पेक्षां निराळ्या व विशेष निकट तऱ्हेनें त्यांची भेट घेण्याची आणि त्यांच्या मित्रांनांहि अवगत नसलेली त्यांच्या जीविताची एक बाजु पहाण्याची संधि मला मिळाली.

स्टँडर्ड ऑईल कंपनीचे माजी अध्यक्ष, परलोकवासी मिस्टर एच्. एच्. रोजर्स यांनां निग्रोविषयीं कांहीं अगत्य किंवा सहानुभूति वाटत होती, असें त्यांच्या ओळखींपैकीं फारच थोड्याजणांनां माहित होतें, हें मी खात्रीनें सांगतों. पण त्यांनीं आपली आस्था व सहानुभूति दर्शविलेला एक प्रसंग माझ्या चांगलाच स्मरणांत आहे. टस्कगी येथें प्रसिद्ध होणाऱ्या निग्रो शेतकऱ्यांच्या एका लहानशा वर्तमानपत्राचा एक अंक मी त्यांनां एके दिवशीं दाखवीत होतों. या अंकांत एक शालागृह बांधण्यासाठीं मिस्टर रोजर्स यांनीं देऊं केलेली रक्कम मिळावी, ह्मणून एका समाजांतील लोक आपसांत वर्गणी गोळा करून किती खटपट करीत होते, याची हकीकत होती. मिस्टर रोजर्सनीं या 'राली' नांवाच्या शाळेची हकीकत जेव्हां वाचली, आणि जरूर असलेली रक्कम जमविण्यासाठीं आपल्या दारिद्र्यांतून ज्या ज्या गरीब लोकांनीं आणा, अर्धाआणा, अडीच आणे, चवलीपावली इत्यादि लहानसहान वर्गण्या दिल्या त्या सर्वांची यादी जेव्हां त्यांनीं पाहिली, तेव्हां त्यांचे डोळे अश्रूंनीं भरून आले. आपल्या पैशाच्या अंगीं किती लोकांचें कल्याण करण्याचें सामर्थ्य आहे, याची कल्पना त्या वेळीं त्यांनां जशी आली, तशी कल्पना त्यापूर्वीं कधीं आली असेल असें मला वाटत नाहीं.

मि. रोजर्स यांच्या आयुष्याच्या शेवटल्या वर्षामध्यें त्यांनीं स्वतःच्या योजनेप्रमाणें व स्वतःच्या भांडवलानें नारफॉकपासून डीपवाटरपर्यंत व्हर्जीनियन रेल्वे बांधली. मीं या रेल्वेवरून प्रवास करावा, आसपासच्या खेड्यापाड्यांतील निग्रो लोकांनां व्याख्यानें द्यावीं आणि

त्या लोकांची स्थिति सुधारण्यासाठीं मीं त्यांची परिस्थिति नीट समजून घ्यावी, ह्मणून हा रस्ता तयार झाल्याबरोबर लवकरच त्यांनीं माझ्यासाठीं स्पेशल आगगाड्या सोडण्याची व्यवस्था केली. निग्रो लोक ह्मणजे देशांतील साधनें होत आणि या साधनांची चांगली वाढ केली पाहिजे, असें त्यांचें मत होतें. रेल्वेलाईन नेलेला सर्व प्रदेश मागसलेला होता; त्याची भरभराट व्हावी, त्यांत जिकडेतिकडे मोठमोठीं शहरें वसावीं आणि तेथील लोकांनीं उद्योगी व सुखी व्हावें, अशी त्यांची इच्छा होती. त्यांचे मनोरथ सफल होण्याचा समय येऊन ठेपला होता, तोंच त्यांची इहलोकची यात्रा आटोपली.

निधनापूर्वी कांहीं वर्षें त्यांचा व माझा निकट परिचय होता. न्युयॉर्कमध्यें त्यांच्या ऑफिसांत वेळोवेळीं जाऊन मी त्यांना भेटे किंवा त्यांच्या बोटीवरून त्यांच्याबरोबर सफर करीं. अशा वेळीं मीं सुरू केलेल्या कामाविषयीं त्यांच्यापाशीं सविस्तर भाषण करण्याला मला संधि मिळे. त्यांचें मन फारच तरतरीत, सामर्थ्यवान् व उपायकुशल होतें. अवाढव्य व्यापारामुळें त्यांची दृष्टि फार व्यापक झाली होती. सामाजिक व सार्वजनिक प्रश्नांचा त्यांना चांगला पोंच होता. यामुळें मला त्यांच्यापासून पुष्कळ गोष्टी शिकण्यास मिळाल्या.

उत्तरेकडील संस्थानांतील माझ्या प्रवासांत दुसऱ्या एका नमुन्याच्या गृहस्थांचा व माझा वारंवार संबंध आलेला आहे. हे गृहस्थ ह्मणजे 'न्युयॉर्क ईव्हिनिंग पोस्ट'चे संपादक मिस्टर ऑसवार्ड गॅरिसन व्हिलार्ड हे होत. मिस्टर रोजर्ससारखे हे बडे व्यापारी नाहींत आणि त्यांची निग्रोशिक्षणाविषयींची आस्थाहि निराळ्या प्रकारची आहे. ते या प्रश्नाकडे निराळ्या दृष्टीनें पहातात.

मिस्टर व्हिलार्ड हे गुलामगिरी बंद करावी म्हणून खटपट करणाऱ्या वुइल्यम लॉईड गॅरिसनचे नातु होत. ते विद्वान् व कल्पनावादी आहेत. आपल्या आजोबाप्रमाणेंच निग्रोंच्या हक्कांविषयीं त्यांनां कळकळ आहे. या देशांतील इतर कोणत्याहि ज्ञातीप्रमाणें निग्रोलाहि प्रत्येक हक्क व प्रत्येक संधि मिळणें इष्ट आहे, असें त्यांचें ठाम मत आहे. कोणाहि व्यक्तीची किंवा वर्गाची स्वतंत्रता कोणत्याहि रीतीनें मर्यादित करूं पहाणाऱ्या मनुष्याचे किंवा संस्थेचे ते कट्टे शत्रु आहेत. मानवी स्वतंत्रतेसाठीं लढाया मारण्यामध्यें ते आपल्या आजोबाच्या मार्गानें जात आहेत आणि त्यांच्याच पद्धति अंमलांत आणीत आहेत, इतकेंच नव्हे, तर निग्रोच्या शिक्षणाविषयीं त्यांनां फार आस्था आहे. मिस्टर व्हिलार्ड यांच्या सूचनेमुळें व प्रयत्नांमुळेंच टस्कगीमंस्थेला तिच्या पंचविसाव्या वाढदिवसाच्या उत्सवप्रसंगीं, मिस्टर वुइल्यम एच्. वाल्डविन आणि दक्षिणेंतील निग्रोशिक्षण यांच्या स्मरणार्थ १५०,००० डालर मिळाले. दक्षिणेंतील कांहीं लहान निग्रोशाळा बांधण्यांत आणि कांहीं शाळांनां मदत करण्यांत त्यांनीं आपला बराच वेळ खर्चून स्वतः खटपट केली आहे. दोन शाळांचे ते पंच आहेत. एका संस्थेच्या पंचमंडळाचे ते अध्यक्ष आहेत. दोन्ही संस्थांच्या कामांचें योग्य नियमन करण्यांत ते फार मेहनत घेतात. त्यांनीं अलिकडे निग्रो लोकांच्या उन्नतिप्रीत्यर्थ एक राष्ट्रीय संस्था काढिलेली आहे. ही संस्था ज्ञातीचे सर्व हक्क व हितसंबंध यांवर देखरेख ठेविते, आणि कोर्टें, कायदेकानु करणाऱ्या संस्था यांच्या द्वारा व इतर खासगी व सार्वजनिक उपायांनीं देशांतील निरनिराळ्या भागांत निग्रोंनां सोसाव्या लागणाऱ्या अन्यायांची दाद लावून देण्याचे प्रयत्न करिते.

मला येथें हें स्पष्टपणें सांगितलें पाहिजे, कीं, जरी मला मिस्टर व्हिलार्डचे हेतु मान्य आहेत, तरी ते साधण्याविषयीं त्यांनीं योजिलेल्या पद्धतींशीं माझा मतभेद आहे. केव्हांकेव्हां त्यांनीं वर्तमानपत्रांतून जाहीर रीतीनें आणि संभाषणामध्यें खासगी रीतीनें माझ्यावर टीका केलेली आहे. तथापि माझ्याशीं त्यांची मैत्री व सद्भाव नेहमीं टिकला आहे, असें मला वाटत आहे. स्वतःविषयीं किंवा मीं सुरू केलेल्या कामाविषयीं त्यांच्याकडे मी कांहीं विनंति करण्यास गेलों आणि त्यांनीं मला त्या वेळीं मोठ्या राजीखुषीनें यथाशक्त्या मदत केली नाहीं, असें केव्हांहि घडलें नाहीं. त्यांनीं केलेल्या सूचनांप्रमाणें मला जरी वागतां आलें नाहीं किंवा मीं कोणत्या पद्धतीचें अवलंबन करावें, याविषयीं जरी आमचा मतभेद झाला, तरी त्यांच्या टीकेनें माझा फायदाच झालेला आहे, असें मला वाटतें.

एकच उद्देश असलेल्या लोकांचा जरी क्षुल्लक गोष्टींत मतभेद असला आणि निरनिराळ्या मार्गांनीं जरी ते एकाच ध्येयाकडे जाऊं लागले, तरी त्यांच्यामध्यें मित्रभाव कायम राहून त्यांनां परस्परांनां मदत करितां येते, हें मी मिस्टर व्हिलार्डपासून शिकलों.

रॉबर्ट सी. ऑग्डन नांवाच्या दुसऱ्या एका सद्गृहस्थांचा माझ्यावर फारच चांगला परिणाम झालेला आहे. हाम्पटनसंस्थेंत मी विद्यार्थी होऊन राहिल्यानंतर कांहीं महिन्यांनीं रॉबर्ट सी. ऑग्डन हे न्युयॉर्कच्या कांहीं गृहस्थांसहित शाळा पहाण्यास आले. मीं त्या वेळींच त्यांनां प्रथम पाहिलें आणि मिस्टर ऑग्डनसारख्या सशक्त, उल्हसित, पवित्र व जोमदार मनुष्याची शारीरिक, मानसिक व नैतिक उन्नति पाहून माझ्या मनावर जो कांहीं सुपरिणाम झाला, त्याची कल्पना इतरांनां करितां येणार नाहीं. मला त्या वेळीं हें मोठें आश्चर्य वाटलें, कीं,

हे गृहस्थ अत्यंत आस्थेवाईक आणि व्यावहारिक आहेत; जरी हे मोठमोठ्या व्यापारांत दंग झाले आहेत, तरी एका अभागी ज्ञातीच्या उन्नतीसाठीं त्यांनां आपला वेळ व विचार खर्च करितां येतात.

मिस्टर ऑग्डन हे मिस्टर रोजर्स किंवा मिस्टर व्हिलार्ड यांहून अगदीं भिन्न नमुन्याचे आहेत. निग्रोच्या उन्नतीचा प्रश्न ह्मणजे हक्काचा आणि स्वातंत्र्याचाच आहे, किंवा दक्षिणेंतील उपेक्षित साधनांची वाढ करण्याचाच आहे, असें मिस्टर ऑग्डनला वाटत नाहीं. हा मानवजातीचा प्रश्न आहे, असें त्यांचें मत आहे. त्यांनां मानवीप्राण्यांविषयीं अत्यंत कळकळ आहे. अभागी व्यक्ति किंवा वर्ग यांविषयीं त्यांच्या मनांत विचार आला, कीं, त्यांनां मदत करावी अशी प्रबल वृत्ति त्यांच्या अंतःकरणांत उठल्यावांचून राहत नाहीं. दुसऱ्या पुष्कळ लोकांमध्यें या वृत्तीचें स्फुरण व्हावें ह्मणून त्यांनीं आपला वेळ, शक्ति व संपत्ति यांचा बराचसा भाग खर्च केला आहे. स्थान, जाति, पंथ इत्यादिकांच्या भेदाकडे लक्ष्य न देतां मानवजातीच्या हितासाठीं सेवातत्त्वाचा प्रसार मिस्टर ऑग्डनहून अधिक दुसऱ्या कोणाहि मनुष्यानें केला असेल, असें मला वाटत नाहीं.

मिस्टर ऑग्डन यांच्या या दिशेनें चाललेल्या प्रयत्नांनीं काय साध्य केलें आहे याची कल्पना, त्यांनीं कोणकोणत्या कामीं आपणाला वाहून घेतलें आहे हें सांगितल्यानें जितकी स्पष्ट होईल, तितकी ती दुसऱ्या कशानेंहि होणार नाहीं. मिस्टर ऑग्डन हे ( १ ) सदर्न एज्युकेशनच्या कॉन्फरन्सचे अध्यक्ष आणि उत्तरेकडील असे एकटेच मेंबर, ( २ ) सदर्न एज्युकेशनल बोर्डचे प्रेसिडेंट, (३) हाम्पटन संस्थेच्या ट्रस्टींच्या बोर्डाचे प्रेसिडेंट, ( ४ ) टस्कगी संस्थेचे ट्रस्टी, ( ५ ) निग्रो कॉमन

स्कूलच्या सुधारणेकरितां असलेल्या आना. टी. जीन्स फंडाचे ट्रस्टी आणि ( ६ ) जनरल एज्युकेशनल बोर्डचे मेंबर आहेत.

यावरून असें दिसेल, कीं, दक्षिणेंतील काळ्या व गोऱ्या लोकांच्या शिक्षणाच्या प्रत्येक महत्त्वाच्या चळवळीशीं मिस्टर ऑग्डन यांचा संबंध आहे. याशिवाय ते न्युयॉर्क येथील 'युनियन थिआलॉजिकल सेमिनरी'च्या डायरेक्टरांच्या बोर्डाचे अध्यक्ष, 'सेज फाउन्डेशन बोर्डा'चे मेंबर व होम मिशनच्या प्रेस्बिटेरियन बोर्डाचे मेंबर आहेत. या सर्व मार्गांनीं सबंध देशाच्या कल्याणासाठीं त्यांनीं शांतपणें व धिम्मेपणें कांहीं कसूर न करतां काम केलेलें आहे. या सर्व संस्थांच्या वार्षिक सभांमधील त्यांच्या भाषणांतील विचार खऱ्या मुत्सद्द्याला शोभण्यासारखे उदार आहेत. समाजांतील प्रत्येक वर्गाला शिक्षणाची सारखी संधि देणें ह्मणजे खऱ्या प्रजासत्ताक राज्याचा पाया घालणें होय, असें त्यांचें मत होतें. उदाहरणार्थ—एज्युकेशनल कॉन्फरन्सविषयीं ते असें ह्मणाले, कीं, ही प्रजासत्ताक राज्यानें बोलाविलेली कांग्रेस आहे. या संस्थेविषयीं ते पुनः एकदां असे बोलले, कीं, प्रत्येक अमेरिकन मुलाला शिक्षणाचा हक्क आहे, हें तत्त्व या संस्थेचा पाया आहे.

शिक्षणाच्या वृद्धीसाठीं याप्रमाणें त्यांनीं अनेक मार्गांनीं खटपट केली आहे, तरी आपण सुशिक्षित मनुष्य नाहीं असें उघडपणें व एकांतीं बोलतांना मीं त्यांनां ऐकिलेलें आहे. इतर लोकांप्रमाणें पुस्तकांच्या द्वारा त्यांनां नेहमींचें औपचारिक शिक्षण मिळालें नसेल. पण पुस्तकें, मनुष्य आणि वस्तु यांच्या अभ्यासानें ह्मणजे निरीक्षणानें मिस्टर ऑग्डन यांनीं उत्तम शिक्षण संपादिलें आहे आणि जगांतील ज्ञानी पुरुषांत गणना करतां येण्याजोगी त्यांची योग्यता आहे. मिस्टर ऑग्डनच्या कारकीर्दीचें निरीक्षण करतां, ती लोकांनां तीन तऱ्हांनीं उपयुक्त व बोधप्रद आहे.

(१) ते व्यवहारांत यशस्वी पुरुष झाले;

(२) जनरल आर्मस्ट्रांग खेरीजकरून इतर कोणत्याहि मनुष्यापेक्षां, ज्ञात किंवा वर्ण यांकडे लक्ष्य न देतां सबंध दक्षिणभागाला शिक्षण देण्याच्या कामीं त्यांनीं पुढाकार घेतला;

(३) उत्तरेंतील नैतिक व धार्मिक शिक्षणाच्या पुष्कळ बाबींत ते प्रमुख पुढारी होते.

मिस्टर ऑग्डनचें चरित्र तरुणांनीं अनुकरण करण्याजोगें आहे; असें अमेरिकेंत फारच थोड्या व्यक्तींचें (चरित्र) असेल.

मिस्टर ऑग्डनशीं जडलेल्या संबंधानें माझ्यावर कसा परिणाम झाला व मी त्यांच्यापासून काय शिकलों, हें सर्व सांगणें फार कठिण आहे. त्यांचें हें विशेष लक्षण होतें, कीं, मला त्यांची जरूरी होती, मीं आरंभिलेल्या कामांत त्यांची मला आवश्यकता होती, ह्मणूनच माझी व त्यांची ओळख झाली. मी निग्रो नसतों, तर मिस्टर ऑग्डनसारख्या उच्च दर्जाच्या मनुष्याला भेटण्याचा आणि त्यांचा निकट परिचय करून घेण्याचा अनुभव मला कधींहि मिळाला नसता. मिस्टर ऑग्डन हे जर मनाचे अशक्त किंवा कोते असते, आणि आपल्या सुखाची, मनाच्या शांतीची आणि सामाजिक दर्जाची त्यांनीं काळजी केली असती, तर दक्षिणेंतील दोन्ही ज्ञातींतील अभागी लोकांची सेवा करण्याच्या प्रयत्नांत त्यांच्याविरुद्ध झालेल्या प्रतिकूल टीकेकडे दुर्लक्ष्य करण्याइतके ते धीट व समर्थ झाले नसते आणि मलाहि त्यांची ओळख झाली नसती.

मीं वर वर्णन केलेले लोक हे दुसऱ्या पुष्कळ बुद्धिमान व धार्मिक लोकांचे प्रतिनिधि किंवा दर्शक होत. या सर्वांनीं अमेरिकेंतील माझ्या ज्ञातीच्या एक कोटि लोकांना धीर, साहाय्य व सल्ला देऊन त्यांचें हित केलेलें आहे.

प्रकरण चवथें.

# वर्तमानपत्रें आणि बातमीदार यांचा मला आलेला अनुभव.

[ सर्व सुधारलेल्या देशांत वर्तमानपत्रांचें बरेंच प्रस्थ असतें, व प्रत्येक पुढाऱ्याचा, सार्वजनिक काम करणाराचा वर्तमानपत्रांशीं आणि त्यांच्या खास प्रतिनिधींशीं फार संबंध येतो. तेव्हां अशा प्रसंगीं कसें वागावें, याविषयींचे वॉशिंग्टनचे विचार फारच मनन करण्याजोगे आहेत. आपल्या देशांतहि वर्तमानपत्रें हें समाजाचें एक कायमचें अंग होऊन बसलें आहे, व परस्पर-दळणवळणाच्या कामीं त्यांचा उपयोग दिवसेंदिवस अधिकाधिक होणार, यांत शंका नाहीं. एकच वर्तमानपत्र वाचणाऱ्या वाचकवर्गांत एक प्रकारचा भ्रातृ-भाव उत्पन्न होतो आणि कांहीं अंशीं त्यांची विचाराची दिशाहि समान होते. घरबसल्या ‘ वसुधैव कुटुंबकं ’वृत्ति उत्पन्न होण्यास वर्तमानपत्रांची फार मदत होते. तेव्हां या सामाजिक साधनाचा किंवा शस्त्राचा उपयोग प्रत्येक पुढाऱ्याला किंवा लोकसेवकाला बराच होतो, हें खरें.

यूरोपांत किंवा अमेरिकेंत ज्या इसमाविषयीं किंवा संस्थेविषयीं लोकांनां कांहीं जाणण्याची इच्छा असते, त्याजवळ किंवा तेथें जाऊन प्रत्यक्ष बातमी काढणारे रिपोर्टर ( बातमीदार ) प्रत्येक वर्तमानपत्रापाशीं असतात. पण ही व्यवस्था तेथें इतक्या थरावर गेली आहे, कीं, जेथें तेथें या लोकांचा सुळ-सुळाट आहे व प्रत्येक प्रतिष्ठित मनुष्याच्या मागें यांचा घोळकाचा घोळका सदोदित असतो. यामुळें खासगीपणा किंवा एकान्त कसा तो त्याला मिळत नाहीं, व ही मागची ब्याद चुकेल तर बरें असें त्याला होऊन जातें. वॉशिंग्टन ह्मणतो “प्रथमप्रथम मलाहि पण असेंच होई; पण आतां मला यांचा उपयोग करून घेतां येऊं लागला आहे. सार्वजनिक काम करावयाचें तर लोकांनां आपल्या विश्वासांत घेतल्यावांचून गत्यंतर नाहीं. कोणतीहि गोष्ट या पत्रकारांपासून चोरून ठेवण्यांत फायदा नसतो. आपण न सांगितली तर तिचा शोध अप्रत्यक्ष रीतीनें ते काढणार आणि सांगासांगीची गोष्ट खरीखोटी

असेल तशी तें छापून प्रसिद्ध करणार. यापेक्षां आपणच त्यांच्यावर विश्वास टाकून त्यांनां ती सांगावी व प्रसिद्ध करणें न करणें त्यांच्या शहाणपणावर सोंपवावें, ह्मणजे बहुतकरून पस्तावण्याचें कारण पडणार नाहीं. वर्तमानपत्रकाराला आपला मित्र बनवावा ह्मणजे अर्थातच तो आपल्या कार्याचा हितचिंतक बनतो. खोट्या-नाट्या कंड्या पिकल्यास वर्तमानपत्रांनां त्याबद्दल सांगोपांग चौकशी करण्याची संधि द्यावी ह्मणजे जनतेचा विश्वास वाढून आपल्या कार्यास बळकटीच येते. आपल्या पक्षाचें वर्तमानपत्र काढल्यास बाकीचे लोक आपल्यासंबंधानें उदासीन होतात. एकाला पैसे देऊन आपल्या तर्फेनें लिहावयाला लावल्यास दुसरे पण पैसे मागूं लागतात, व अशा भाडोत्री लेखांचें समाजांत कांहींच तेज पडत नाहीं. प्रत्येक खोट्या बातमीला उत्तर देण्याच्या भानगडीला पडूं नये. विरुद्ध टीकेनें चिडून जाऊं नये, ' म्हणजे सर्व कांहीं यथासमय सुरळीत चालतें. वर्तमानपत्रांतून प्रसिद्धि झाल्यानें लोकप्रियता मिळते आणि मूर्खपणानें तिचा स्वार्थाकडे उपयोग न केल्यास वरेंच जनहित करण्याचें सामर्थ्य आपल्या अंगीं येतें. वर्तमानपत्रें वाचण्यानें समाजाच्या स्थितीचें यथार्थ ज्ञान होतें. पुस्तकांच्या अवलोकनानें व अध्ययनानें तत्त्वें समजतील, पण समाजांतील वस्तुस्थितीचें ज्ञान वर्तमानपत्रांतूनच विशेष होतें, आणि कार्यकर्त्याला वस्तुस्थितीचें प्रत्यक्ष ज्ञान हेंच फार महत्त्वाचें असतें; किंबहुना असें ज्ञान लोकांनां करून देणें हेंच वर्तमानपत्रकाराचें मुख्य कर्तव्य असतें. जनहित कशांत आहे, हें पाहूनच एकादी गोष्ट छापणें न छापणें हें वर्तमानपत्रकारांनीं ठरविलें पाहिजे. उभयपक्षीं हाच भाव सदोदित राहील, तर प्रत्येक सार्वजनिक कार्याला जोम येईल आणि समाजाचें पाऊल खचित पुढें पडेल. ]

वर्तमानपत्रें आणि बातमीदार यांच्यापासून मी पुष्कळ शिकलों आहे. मी एकाद्या शहरांत गेलों किंवा आगगाडींतून प्रवास करण्यासाठीं प्लॅटफॉर्मवर आलों, कीं, लगेच एकाद्या वर्तमानपत्राचा बातमीदार मला शोधून काढतोच. वर्तमानपत्रांचे हे बातमीदार पुष्कळ अनपेक्षित ठिकाणीं माझी भेट घेत, हें पाहून मला आश्चर्य वाटे, आणि त्यांच्या प्रश्नांनीं केव्हांकेव्हां मी अधिक चकित होऊन घोटाळून जात असें. एकादी गोष्ट मला अवगत असली आणि ती कोणाला कळवूं नये असें

मला वाटत असलें, तर मला भेटलेला बातमीदार बहुतेक नेमका त्या गोष्टीविषयींच प्रश्न करण्याचा प्रयत्न करी. हवी असलेली माहिती बातमीदाराला पुष्कळदां मिळत असे. पण ती जर त्याला मिळाली नाहीं, तर मात्र मला नंतर वाईट वाटत असे; कारण, खरी बातमी प्रसिद्ध झाली असती तर त्यायोगें बातमीदाराला मिळालेल्या व त्यानें प्रसिद्ध केलेल्या अर्धवट्याकच्च्या व अपूर्ण माहितीनें जें कांहीं नुकसान झालें, त्यापेक्षां कमी नुकसान झालें असतें.

मला जेव्हां अनुभव कमी होता, तेव्हां मी बातमीदारांनां घाबरत असें, हें मी कबूल करतों. बातमीदार ह्मणजे छिद्रान्वेषणाचा धंदा करणारा उपद्व्यापी मनुष्य आहे असें मी पुष्कळ वर्षे समजत होतों, आणि त्यामुळें बातमीदारांची गांठ पडली म्हणजे उडवाउडवी करून त्यांनां कसें वाटेस लावावें, आपले हेतु व उद्देश त्यांच्यापासून कसे लपवावे, याविषयीं मी विचार करीत असें.

वर्तमानपत्रें आणि बातमीदार यांच्याशीं माझा अधिक परिचय झाल्यावर माझें हें मत पूर्ण बदललें. मला प्रथम असें आढळून आलें, कीं; अंगीं धैर्य असतें तर एकाद्या समाजांतील साधारण मनुष्यानें जे कांहीं प्रश्न विचारले असते, तेच प्रश्न त्या समाजांतील वर्तमानपत्राचा बातमीदार विचारतो. फरक इतकाच, कीं, बातमीदार प्रत्यक्ष तुमच्यासमोर येतो व तुह्माला पोक्तपणें व सरळ प्रश्न करितो, आणि साधारण मनुष्य हेच प्रश्न दुसऱ्यांनां परभारें विचारून माहिती मिळवितो.

माझ्याविषयीं ह्मणाल तर, समाजांतील एकादा मनुष्य निग्रोंच्या उन्नतीविषयीं किंवा माझ्या कार्याविषयीं कोणत्या तऱ्हेचे प्रश्न करतो, हें समजून घेणें फार मनोरंजक व महत्त्वाचें आहे, असें मला आढळून आलें आहे. देशांतील निरनिराळ्या भागांतील बातमीदारांनीं विचार-

लेल्या प्रश्नांवरून, समाजांतील लोकांनां माझ्या कामाविषयीं कितपत माहिती आहे हें मला चांगलें कळतें; इतकेंच नव्हे, तर निग्रोलोकांविषयीं समाजांतील साधारण मनुष्याची भावना कशी आहे, हें मला उत्तम समजतें. वर्तमानपत्रांचे बातमीदार आपल्या प्रश्नांनीं मला हवी असलेली पुष्कळ माहिती देतात, इतकेंच नव्हे, तर आपल्या प्रश्नांनीं माझे गैरसमज दूर करण्याला आणि निग्रोची स्थिति व उन्नति यांविषयीं लोकांनां जरूर असलेली माहिती देण्याला मला फार मदत करतात.

दुसऱ्या एका विचारानें, बातमीदारांविषयींचें माझें मत बदललें आहे. वर्तमानपत्रांशीं माझा चांगला परिचय झाल्यानें, वर्तमानपत्रें वाचणाऱ्या आणि त्यांनां आश्रय देणाऱ्या लोकांचे हितसंबंध व विचार यांचें तीं कितपत व कशीं निदर्शक आहेत हें मला चांगलें कळून आलेलें आहे. लोकांची सदिच्छा व विश्वास यांची जरूरी असलेलें कोणतेंहि काम करणाऱ्या मनुष्याला लोकांशीं आपला प्रत्यक्ष संबंध घडून येणें आणि बातमीदार विचारतात त्या प्रकारच्या प्रश्नांचीं उत्तरें देणें महत्त्वाचें आहे, हें चांगलें माहित असतें. मीं वर सांगितल्याप्रमाणें बातमीदाराचे हे प्रश्न ह्मणजे साधारण मनुष्याचेच प्रश्न असतात. वर्तमानपत्रांनीं विचारलेल्या या प्रश्नांचीं उत्तरें आपण दिलीं नाहींत, तर ते प्रश्न तसेच—त्यांचीं उत्तरें न मिळतां—राहतील, किंवा लोकांनां या प्रश्नांविषयींची माहिती परोक्ष व कमी विश्वसनीय अशा ठिकाणापासून मिळेल.

मी टस्कगी येथें असतांना, दक्षिणेंतील एकाद्या वर्तमानपत्राचा किंवा मासिकाचा बातमीदार आमच्या संस्थेच्या अंत:स्थितीविषयीं उठलेल्या एकाद्या अफवेसंबंधीं चौकशी करण्याकरितां मजकडे पुष्कळदां आलेला आहे, तेव्हां वाटेल तेवढा वेळ घ्या आणि संस्थेविषयीं हवी

तेवढी पूर्ण चौकशी करा, असें मीं त्याला सांगितलेलें आहे. संस्थेच्या आवारांत भेटणाऱ्या पाहिजे त्या मनुष्याला हव्या त्या विषयावर हवा तो प्रश्न विचारण्याची आपणास पूर्ण मुभा आहे, असें मी त्या वेळीं त्याला बजाविलेलें आहे. त्याला हवी तशी पूर्ण चौकशी करतां यावी ह्मणून त्याला मीं प्रत्येक संधि व पूर्ण मोकळीक दिलेली आहे.

आमच्यासारख्या एकाद्या मोठ्या संस्थेविषयीं विघातक किंवा संहारक टीका करण्याला अथवा संस्थेचा तोटा होईल अशा रीतीनें कोणतीहि माहिती प्रसिद्ध करण्याला एकाद्या दुष्ट मनुष्याला पुष्कळ संधि मिळते हें तर उघड आहे. पण प्रत्येक प्रसंगीं वर्तमानपत्रांनीं पूर्ण तपास केल्यानंतर आमच्या संस्थेविषयीं कोणतीहि अनिष्ट बातमी प्रसिद्ध केली नाहीं, इतकेंच नव्हे, तर उलट आमच्या संस्थेची चांगली प्रसिद्धि केली आहे, आणि संस्थेविषयीं उठलेल्या खोट्या अफवा खोडून टाकिल्या आहेत. गप्पांचा नायनाट करण्याचा रामबाण उपाय ह्मटला ह्मणजे वर्तमानपत्रांनीं तपास करून आपला रिपोर्ट प्रसिद्ध करणें हा आहे. तसेंच बातमीदारांची मर्जी तावडतोब संपादन करण्याचा मार्ग ह्मटला ह्मणजे त्यांच्यापासून छपविण्याजोगें असें आपल्यापाशीं कांहीं नाहीं हें त्याला दाखवून देणें हा आहे, असें मला आढळून आलें आहे.

वर्तमानपत्रें क्षुल्लक गोष्टी किंवा गप्पा प्रसिद्ध करतात ह्मणून लोक त्यांच्यावर टीका करतांना मीं पुष्कळदां ऐकिलें आहे. वर्तमानपत्रांची मला जी कांहीं माहिती आहे तीवरून माझी अशी खातरी झालेली आहे, कीं, त्यांच्याकडे पाठविलेल्या माहितीचा एक दशांशहि तीं प्रसिद्ध करीत नाहींत आणि प्रत्येक वर्तमानपत्राचा बराच काल, संभवनीय व मनोरंजक अशा कोणत्याहि बातमीवर विश्वास ठेवण्याच्या मनुष्य-

स्वभावाच्या साहजिक प्रवृत्तीमुळें समाजांत पसरलेल्या अफवांच्या आणि गप्पागोष्टींच्या खरेखोटेपणाचाच निर्णय करण्यांत जातो. खोट्या वातम्या व गप्पा यांवर अवलंबून असणारा द्वेष व दुराग्रह लोकांच्या मनांतून नाहींसा करण्याचेंच काम जरी वर्तमानपत्रांनीं केलें, तरी त्यांचें अस्तित्व सार्थ झालें असें मला अनुभवानें वाटतें.

पण हें विधान करतांना, दैनिक पत्रें खोट्या व भ्रामक अशा पुष्कळ बातम्यांनां चालन देतात, आणि महत्त्वाच्या गोष्टींविषयीं चकार शब्द न काढतां, क्षुद्र व उत्तेजक बार्वीनां पुष्कळदां नसतें महत्त्व देतात, या गोष्टीकडे मी कानाडोळा करीत नाहीं. खेड्यापाड्यांतील गप्पीदास लोकांचें किंवा तेथील एकाद्या दुकानांत राजकारणाविषयीं गप्पा मारीत बसणाऱ्या आणि लोकमत बनविणाऱ्या लोकांचें काम बहुतेक अंशीं दैनिक पत्रांनीं उचललें आहे. पण हें काम वर्तमानपत्रें उच्च प्रमाणा-वर करतात. जगाचा देखावा, जगाची माहिती तीं आमच्यापुढें ठेवि-तात आणि सत्य शोधून काढण्याविषयीं स्तुत्य प्रयत्न करतात. गप्पी-दासांप्रमाणें जरी वर्तमानपत्रांनीं कधींकधीं अयोग्य वस्तूंनां महत्त्व दिलें आणि क्षुद्र व व्यक्तिविषयक बार्बीवर बराच काल खर्च केला, तरी तीं सर्व जातींच्या लोकांनां एकत्र आणितात. एकच वर्तमानपत्र वाचणाऱ्या लोकांमध्यें एक प्रकारचें सख्यत्व वाढतें—मग त्यांचें परस्पर दर्शन कधींहि झालेलें नसो किंवा ते हजारों मैल दूर राहणारे असोत.

वर्तमानपत्रें आणि वर्तमानपत्रकार यांच्यापासून मी बरेंच शिकलों आहें. कॉन्झरव्हेटिव्ह ( पुराणप्रिय ) पक्षाच्या वतीनें काम करणारे बातमीदारच फक्त नव्हेत, तर हलक्या दर्जाच्या पत्राच्या वतीनें काम करणारे व सर्व तऱ्हेचे बातमीदार मला भेटले आहेत, असें वाटतें. मीं त्यांचें जें कांहीं निरीक्षण केलें आहे त्यावरून माझी अशी खात्री झालेली

आहे, कीं, आपल्या वांट्याचीं कठिण कामें मेहनतीनें, इतक्या चांगल्या रीतीनें व प्रामाणिकपणानें करणारे दुसरे लोक फार क्वचित् आढळतील. मी हेंहि कबूल करतों, कीं, बातमीदारांनां भेटणें व त्यांच्याशीं बोलणें अलीकडे मला आवडूं लागलें आहे; कारण, त्यांनां जगाची, मनुष्यांची व वर्तमानपरिस्थितीची चांगली माहिती असते. त्यांच्याशीं बोलतांना, त्यांनां सार्वजनिक व खासगी बाबींविषयीं किती बरोबर, बिनचूक व अंतरंग माहिती असते, सार्वजनिक लोक व त्यांचीं कृत्यें यांविषयीं त्यांचें अनुमान किती योग्य असतें, हें पाहून मी पुष्कळदां आश्चर्यचकित झालेलों आहें.

देशांतील प्रत्येक मोठ्या वर्तमानपत्राच्या ऑफिसांत पुष्कळ माहिती भरलेली असते; पण तिच्याशीं संबंध असलेल्या कांहीं व्यक्तींवर मेहरबानी करावी ह्मणून किंवा सार्वजनिक हितांत कांहीं बिघाड होईल ह्मणून ती प्रसिद्ध केली जात नाहीं, असें माझ्या निदर्शनाला आलेलें आहे. खासगी व्यक्ति व सार्वजनिक हित यांविषयीं आपली कळकळ, आपण काय प्रसिद्ध करीत आहों यानें नव्हे, तर आपण काय प्रसिद्ध करीत नाहीं यानेंच वर्तमानपत्रें पुष्कळदां दाखवितात, अशी माझी खात्री झालेली आहे. वर्तमानपत्रें चालविण्याची सांप्रतची स्थिति पहातां, समाजाला मनोरंजक व उत्तेजक वाटणारी कोणतीहि गोष्ट ह्मणजे एक प्रकारचा माल आहे आणि असा माल जमविणें व तो खपविणें हें वर्तमानपत्रांचें काम आहे. अशी स्थिति असूनहि वर्तमानपत्रें याप्रमाणें विवेकी व विचारी दिसून येतात, हें फार आश्चर्यकारक होय.

वर्तमानपत्रांकरितां रिपोर्ट (माहिती) मिळवून प्रसिद्धीसाठीं ते तयार करण्याच्या पद्धतींत अलीकडे बरीच सुधारणा झालेली आहे, असें मला आढळून आलें आहे. आतां वर्तमानपत्राचे बातमीदार

सुधारलेले आहेत किंवा त्यांच्याशीं कसें वागावें हें लोकांनां चांगलें समजलें आहे, अथवा हल्लींच्या सामाजिक जीवनांत वर्तमानपत्रांची जबाबदारी किती महत्त्वाची आहे हें, लोक व वर्तमानपत्रकार या दोघांनां चांगलें कळून आलें असल्यामुळें ही सुधारणा झाली आहे कीं कसें, हें मला खात्रीनें सांगतां येत नाहीं. खासगी व्यक्ति व सार्वजनिक लोक या सर्वांनां हें अधिकाधिक चांगलें कळत चाललें आहे, कीं, ज्या देशांत एका व्यक्तीचा दुसऱ्या व्यक्तीशीं इतका निकट संबंध येतो, तेथें प्रत्येकाचा व्यवहार उघडपणें व्हावा व त्याचें कृत्य सर्व जगाला समजावें, हें सार्वजनिकदृष्ट्या फार हितकारक आहे.

तसेंच वर्तमानपत्रांनां हेंहि पण कळून आलें आहे, कीं, कोणतें ना कोणतें तरी सार्वजनिक हित साधणें हेंच कोणतीहि गोष्ट वर्तमानपत्रांत प्रसिद्ध करण्याचें समर्थन किंवा योग्य कारण आहे आणि एकाद्या बातमीचें महत्त्व व ती प्रसिद्ध करणाऱ्या वर्तमानपत्राची पत, त्याच्या रिपोर्टांच्या बिनचुकपणावर व सत्यपणावर अवलंबून आहे.

वर्तमानपत्रें व बातमीदार यांचा मला जो अनुभव आला त्यापासून मी कांहीं शिकलों हें खरें, पण या देशांतील कांहीं सुप्रसिद्ध पुरुष त्यांच्याशीं कसें वागत असत, हें पाहून मी त्यापासूनहि बऱ्याच गोष्टी शिकलों.

कर्नल रूझवेल्ट हे प्रेसिडेंट असतांना मी पुष्कळदां* श्वेतप्रासादांत गेलेलों आहें. प्रत्येक वेळीं मोठमोठ्या दैनिक पत्राचे पांचसहा बातमीदार त्यांच्याभोंवतीं जमलेले असत, असें मीं पाहिलेलें आहे. अशा प्रसंगीं जसें एकाद्या भागीदारानें आपल्या दुसऱ्या भागीदारांशीं मोकळेपणानें

* प्रेसिडेंट यांचा राहण्याचा वाडा.

बोलावें तसें आपले बेत, आपली पॉलिसी (धोरण) इत्यादि राजकारणाच्या गोष्टींविषयीं प्रेसिडेंट रूझवेल्ट या बातमीदारांशीं उघडपणें व स्पष्टपणें बोलत असत हें पाहून मला फार आश्चर्य वाटे. या भेटीनंतर ते बातमीदार आपापल्या पत्रांनां लांब लांब संदेश तारेनें पाठवीत. पण प्रेसिडेंटच्या विश्वासाचा कोणीहि दुरुपयोग क्वचित्च केला असेल, असें मला वाटतें.

अशा उघड भेटी देऊन सर्व देशाला आपल्या रहस्यांत घेतल्यामुळें प्रेसिडेंट रूझवेल्ट यांनीं बहुतेक सर्व देश आपलासा करून घेतला आहे. कर्नल रूझवेल्टची ओळख झाल्यापासून उत्तम वर्तमानपत्रकार व मासिककार यांच्याशीं प्रत्यक्ष निकट संबंध ठेवण्याची पात्रता व प्रवृत्ति त्यांच्या ठिकाणीं आहे, असें मला दिसून आलें आहे. वर्तमानपत्रकारांनां ते फार प्रिय आहेत; याचें कारण ज्या परिस्थितींत ते लोक काम करतात ती ते जाणतात आणि ते लोक व त्यांचे रिपोर्ट यांचें—प्रत्यक्ष सरकारी ऑफिसांत नसलें तरी—आमच्यासारख्या लोकसत्ताक राज्यांत किती महत्त्व आहे हें ते ओळखतात, हें होय.

वर्तमानपत्रांशीं संबंध असलेले दुसरे एक सुप्रसिद्ध गृहस्थ ह्मटले ह्मणजे मिस्टर अँड्रू कार्नेजी हे होत. पुष्कळ श्रीमंत लोक अप्रिय असतांना, सर्वसाधारण लोकसमूह मिस्टर कार्नेजीलाच कां मान देतो आणि त्यांच्यावरच प्रेम कां करितो? असा प्रश्न कांहीं दिवसांपूर्वीं विचारलेला मीं ऐकिला आहे. त्यांची मला जी कांहीं माहिती आहे तीवरून, वर्तमानपत्रें व बातमीदार यांच्याशीं त्यांचें उघड व सरळ वर्तन हेंच त्यांच्या लोकप्रियतेचें बहुतेक मूळ आहे, असें मला वाटतें. बातमीदारांनां आपलीं रहस्यें सांगण्याचा मिस्टर रूझवेल्टचा कांहींसा गुण मिस्टर कार्नेजीच्या अंगीं आहे. आपण काय करीत आहों

हें जगाला कळविण्याचीं साधनें म्हटलीं म्हणजे वर्तमानपत्रें हींच आहेत आणि या साधनांचा उपयोग कसा करावा हें कर्नल रूझवेल्ट आणि मिस्टर कार्नेजी हे दोघेहि चांगलें जाणतात. वर्तमानपत्रांच्याद्वारें जनसमूहाशीं प्रत्यक्ष संबंध ठेवण्याची पात्रता त्यांच्या अंगीं असल्यामुळें ते इतके लोकप्रिय झालेले आहेत.

कर्नल रूझवेल्टनीं किंवा मिस्टर कार्नेजींनीं आपली लोकप्रियता वाढविण्यासाठीं वर्तमानपत्रांचा उपयोग केला आहे, असा माझ्या विधानाचा अर्थ समजूं नये. लोकांचा विश्वास असलेला असा एकादा सुप्रसिद्ध मनुष्य, आपल्या लोकप्रियतेनें शेफारून व बहकून गेला नाहीं तर, तो एकाद्या अप्रसिद्ध मनुष्यापेक्षां अधिक चांगलीं कृत्यें व अधिक चांगली लोकसेवा करूं शकतो.

कर्नल रूझवेल्ट व मिस्टर कार्नेजी या दोघांचीं नांवें लोकांच्या मनांत सार्वजनिक हिताच्या मोठ्या बाबींशीं संलग्न होऊन गेलेलीं आहेत. आपल्या व्यक्तींमध्यें व जीवितांमध्यें कांहीं महत्त्वाच्या सार्वजनिक हिताचा समावेश करून घेतल्यामुळें ते दोघेहि खरोखर सार्वजनिक पुरुष झाले आहेत. मिस्टर कार्नेजी कोणत्याहि सरकारी हुद्द्यावर नाहींत, तरी ते सार्वजनिक गृहस्थ आहेत. मिस्टर रूझवेल्टनीं महत्त्वाच्या सार्वजनिक कामाशीं असलेला आपला संबंध सोडलेला नाहीं, आणि आतां ते अमेरिकेचे प्रेसिडेंट नाहींत, तरी त्यांची राजकीय सत्ता कांहीं कमी झालेली नाहीं. लोकांच्या मनांवर व अंत:करणावर असलेल्या त्यांच्या सत्तेचें कारण, त्यांनीं वर्तमानपत्रांच्या द्वारेंच त्यांची ओळख करून घेतली हेंच बहुतेक अंशीं आहे.

सार्वजनिक हिताच्या एका बाबीशीं म्हणजे नुकत्याच स्वतंत्र झालेल्या ज्ञातीला प्रजासत्ताक राज्यांतील नागरिकत्वाच्या कर्तव्याला व जबाब-

दारीला पात्र करण्याच्या शिक्षणपद्धतीशीं माझें नांव आयुष्याच्या पूर्व-वयांतच जडलें जावें, हें मी माझें मोठें भाग्य समजतों. या शिक्षणाच्या कामीं मला लोकांची विनंति करून मदत घ्यावी लागत असल्यामुळें माझें नांव बहुतेकांनां ठाऊक झालें आहे. याबद्दल मला संतोष वाटत आहे, कारण वर्तमानपत्रांच्या द्वारें शेंकडों नव्हे तर हजारों लोकांत माझा प्रवेश झाला आहे. इतक्या लोकांशीं मला कधींहि तोंडानें बोलतां आलें नसतें. वर्तमानपत्रांच्या योगें माझें सेवेचें सामर्थ्य शतपट वाढलें आहे.

वर्तमानपत्रांच्या द्वारें प्रसिद्धीस आलेला आणि लोकांचा विश्वास संपादन केलेला एकादा मनुष्य, जसा सार्वजनिक हितासाठीं, तसाच त्याच्या मनांत आल्यास,आपला स्वार्थ साधण्याच्या कामींहि या शक्तीचा उपयोग करूं शकतो हें खरें आहे. अशा मनुष्याला आपल्या लोकप्रियतेचा खासगी कामांकडे उपयोग करून घेण्याच्या पुष्कळ संधि दरवर्षी मिळत असतात, हें निःसंशय आहे.

उदाहरणार्थ—वर्षांतून पुष्कळ वेळां, कोणी एकादा मनुष्य, एकाद्या नवीन कारखान्यांतील स्टॉकचे हिस्से मला बक्षीस देतो आणि पुष्कळदां जमिनीच्या किंवा नवीन शहर वसविण्याच्या योजनेंतील कांहीं भागाचे ( जमिनीचे ) रोखे मला नजर केले जातात. या तऱ्हेची प्रत्येक देणगी ताबडतोब परत करण्याचा मीं नियम केला आहे. याचें पहिलें उत्तम व्यावहारिक कारण म्हणजे, नवीन काम कायदेशीर असलें तरी मी त्याविषयीं जबाबदार नसल्यामुळें माझें नांव गुंतविल्यामुळें मला त्यापासून कांहीं फायदा होणार नाहीं आणि माझ्या नांवामुळें जर त्या कामांत कोणाला भांडवल घालावें असें वाटलें तर

माझ्या नांवाचा असा उपयोग करणें ह्मणजे ती एक तऱ्हेची लबाडीच होय.

दुसरें एक कारण असें आहे, कीं, मी लोकांशीं प्रामाणिकपणें वागूं इच्छितों. मीं सांगितलेल्या व्यापक अर्थाच्या निग्रोशिक्षणाशीं ज्या कामाचा प्रत्यक्ष व विशेष संबंध नाहीं अशा कामांत मला मन किंवा वेळ कसा घालितां येईल, हेंच मला मुळीं समजत नाहीं.

मीं वर सांगितल्याप्रमाणें प्रथमप्रथम माझ्या कार्याविषयींचे बेत व महत्त्वाकांक्षा वर्तमानपत्रांच्या बातमीदारांनां सांगण्यांत फार दक्षता ठेवावी असें मला वाटत होतें. पण लोकांनां जी माहिती हवी आहे असें वर्तमानपत्रांनां वाटतें ती त्यांच्यापासून छपवून ठेवणें फार कठिण आहे असें मला कळून आलें. यामुळें मी आतां बातमीदारांशीं उघडपणें व मोकळ्या मनानें वागतों. माझे बेत आणि माझा संबंध असलेला असा सार्वजनिक विषय यासंबंधीं त्यांच्याशीं भाषण करण्याचा परिपाठ मीं कांहीं वर्षें ठेविला आहे. एकाद्या मित्राबरोबर किंवा कामधंद्यामुळें ओळख झालेल्या मनुष्याबरोबर जसें बोलावें तसें त्यांच्याशीं मी भाषण करतों. एकादा बातमीदार माझ्या भेटीला आला ह्मणजे त्यानें माझ्या मतें काय प्रसिद्ध करावें किंवा काय प्रसिद्ध करूं नये, हें सर्व मी त्याला सांगतों. कोणत्या रीतीनें बातमी प्रसिद्ध केली असतां लोकांच्या मनांवर योग्य संस्कार होईल, हें बातमीदार माझ्यापेक्षां अधिक चांगलें जाणतो, असें मला पुष्कळदां आढळून आलें आहे. विशेषत: वाशिंग्टन येथील मोठमोठ्या दैनिक पत्रांच्या बातमीदारांनां हें विधान विशेष लागू पडतें. पुष्कळ महत्त्वाच्या बाबींविषयीं त्यांनां विचार करून लिहावयाचें असतें, तरी कोणत्या गोष्टी छापाव्यात व कोणत्या छापवूं नयेत याविषयीं ते बरेंच तारतम्य दाखवितात,

याचें मी एक उदाहरण देतों. कर्नल रूझवेल्ट प्रेसिडेंट असतांना कांग्रेसमधील त्यांच्या वार्षिक संदेशाचा कांहीं महत्त्वाचा भाग वाचून पाहण्यासाठीं त्यांनीं मला श्वेतप्रासादांत बोलाविलें. आपल्या संदेशाच्या ज्या भागाविषयीं त्यांनीं माझें मत विचारलें त्या भागाविषयीं त्या वेळीं लोकांत बरीच चर्चा झाली होती. वाशिंग्टनचे बातमीदार—विशेषतः श्वेतप्रासादांत कामावर हजर असलेले बातमीदार यांनां, प्रेसिडेंट माझ्या-बरोबर कोणत्या विषयाविषयीं भाषण करणार, याचा कांहीं वास लागलेला होता. मी बराच वेळ प्रेसिडेंटबरोबर होतों. प्रेसिडेंटच्या कचेरींतून बाहेर पडतांच मला एकदम सहा बातमीदारांनीं घेरलें. मीं प्रेसिडेंट-बरोबर काय भाषण केलें तें मीं सविस्तर सांगावें, असें ते मला ह्मणूं लागले. कांहीं वेळ कांकूं केल्यावर त्यांच्याशीं पूर्ण मोकळेपणानें वागून पाहण्याचा मीं निश्चय केला. मीं त्यांनां संदेशांतील ठळक मुद्दे सांगितले, आणि आमच्या भाषणाची थोडीशी सविस्तर माहिती सांगितली. नंतर मीं त्यांनां ह्मटलें—हे सद्गृहस्थहो, आतां विचार करा, वर्तमानपत्रांच्या द्वारें हा विषय मीं लोकांनां कळविण्याजोगा आहे, असें तुह्मांला वाटतें काय ?.

ही माहिती लोकांनां मीं कळवावी असें आपलेंहि मत नाहीं, असें प्रत्येक बातमीदारानें लगेच उत्तर दिलें. याचा परिणाम असा झाला, कीं, दुसऱ्या दिवशीं या बातमीदारांच्या कोणत्याहि पत्रांत याविषयीं एक चकार शब्दहि आला नाहीं. बातमीदारांशीं वागतांना याच प्रकारचा अनुभव मला पुष्कळदां आलेला आहे. मी त्यांच्यापासून कांहीं गोष्टी छपवून ठेवण्याचा किंवा त्यांनां फसविण्याचा प्रयत्न केला असता, तर मात्र याविषयींचा रिपोर्ट, विपर्यास केलेला किंवा खोटीं विधानें असलेला असाच लोकांनां देण्यांत आला असता.

सार्वजनिक भाषण तयार करण्याची व तें बोलण्याची, आणि तें भाषण वर्तमानपत्रांच्या द्वारें बरोबर प्रसिद्ध करण्याची उत्तम पद्धत कोणती, असा एक प्रश्न मला नेहमीं उद्भवतो, आणि बहुतेक सार्वजनिक वक्त्यांपुढेंहि हाच प्रश्न येतो, असें मला वाटतें. मीं पहिल्यापहिल्यानें सार्वजनिक भाषणें करूं लागलों, तेव्हां मीं माझीं भाषणें बहुतेक तोंडपाठ करण्याचा क्रम ठेविला होता. पण हा क्रम मीं लवकरच सोडून दिला. अत्यंत महत्त्वाच्या प्रसंगाशिवाय किंवा एखाद्या अगदीं नवीन विषयावर बोलावयाचें असल्याशिवाय मी भाषणें हल्लीं तोंडपाठ करीत नाहीं.

आपलें भाषण लिहून काढण्याच्या आणि तें वाचण्याच्या पद्धतींत कांहीं फायदे आहेत, पण तींत तसेच कांहीं तोटेहि आहेत. लिहून वाचलेलें भाषण नीरस व औपचारिक वाटण्याचा संभव असतो. शिवाय, लेखी भाषणावर सर्वस्वीं अवलंबून असलें ह्मणजे वक्त्याला प्रसंगानुरूप आपणाला जुळवून घेतां येणार नाहीं. पण भाषण लिहून काढलेलें असलें ह्मणजे तें ( भाषण ) वर्तमानपत्रांला अगदीं बिनचूक असें देतां येतें.

भाषणें तोंडपाठ करण्याची पद्धत आणि ती लिहून काढण्याची पद्धत, अशा दोन्ही पद्धतींचा अनुभव घेऊन मीं एक नवीन उपयुक्त तडजोड काढिली आहे. मला काय बोलावयाचें आहे, याविषयीं प्रथम मी चांगला विचार करतों. नंतर माझ्या भाषणांतील मुद्दे लक्ष्यांत यावे, यासाठीं मी कांहीं मथळे किंवा टाचणें लिहून काढतों. माझ्या भाषणाची दिशा ठरल्यावर मी माझें भाषण लघुलेखकाला सांगतों. हा क्रम मीं पुष्कळ वर्षें ठेविला आहे. आतां सतत अभ्यासानें मला असें आढळून आलें आहे, कीं, एकदां माझें भाषण सांगून झाल्यावर मी टाचणांचा कागद हातीं घेतों

आणि प्रथम सांगितल्याप्रमाणें माझें भाषण बरोबर बोलतों. लघुलेखकाला सांगितलेलें भाषण किंवा त्याचा भाग मी आगाऊ बातमीदारांनां देऊन ठेवितों. यानें त्यांची चांगली सोय होते, आणि त्यांनां भाषणाचा रिपोर्ट बिनचूक देतां येतो. तसेंच तोंडपाठ केलेलें भाषण बोलून दाखवितेवेळीं किंवा लिहलेलें भाषण वाचतेवेळीं वाटणारा नीरसपणा व औपचारिकपणा टाकून देऊन मला मोकळेपणानें भाषण करण्यास मुभा असते आणि कांहीं विशिष्ट प्रासंगिक गोष्टींचा (ह्मणजे श्रोतृवृंदाची मनःस्थिति, पूर्ववक्त्यांचे उद्गार इत्यादिकांचा) फायदा घेऊन माझें भाषण चांगलें खुलवून सांगतां येतें.

लिहिलेल्या किंवा तोंडपाठ केलेल्या भाषणाची दुसरी एक अडचण आहे. ती अशी, कीं, आपल्या श्रोतृवृंदाच्या हितसंबंधांशीं भाषण जुळवून घेणें फार कठिण जातें. मला तर वाटतें, कीं, एकाद्या श्रोतृवृंदासमोर भाषण करणें म्हणजे एकाद्या व्यक्तीशीं बोलण्यासारखेंच आहे. प्रत्येक श्रोतृवृंदाला निराळें व्यक्तित्व असतें आणि ज्याप्रमाणें दोन व्यक्ति अगदीं सारख्या आढळत नाहींत, त्याप्रमाणें दोन श्रोतृवृंद कधींहि सारखे सांपडत नाहींत. आपल्या श्रोतृवृंदाच्या परिस्थितीला अनुसरून जो वक्ता भाषण करीत नाहीं, त्याला बहुतकरून आपल्या भाषणांत यश येत नाहीं. मीं वर सांगितल्याप्रमाणें आपल्या विषयाचा आधीं पूर्ण विचार करावा, त्याचें सांगोपांग ज्ञान करून घ्यावें आणि बोलतांना स्मरणार्थ टांचणांचा उपयोग करावा, हीच पद्धत सर्वांत उत्तम आहे, असें मला आढळून आलें आहे.

वर्तमानपत्रांत खोटा रिपोर्ट प्रसिद्ध झाला असतां, आपण कसें वागावें हा प्रश्न प्रत्येक सार्वजनिक मनुष्यानें पुढेंमागें लवकर सोड-

विला पाहिजे. अत्यंत अपवादक स्थिति खेरीजकरून खोट्या रिपोर्टांचा केव्हांहि निषेध न करण्याचा मीं नियम केलेला आहे. नऊ हिश्शांनीं, रिपोर्टांचा निषेध केला असतां मूळच्या विधानाकडे–रिपोर्टाकडे लोकांचें लक्ष्य जातें व त्याला नसतें महत्त्व मिळतें. मूळ रिपोर्ट न पाहिलेले पुष्कळ लोक निषेध पाहतील आणि हें काय आहे, तें समजून घेण्यासाठीं मूळ रिपोर्ट शोधूं लागतील. शिवाय, नुसता निषेध मिळविण्यासाठींच किंवा वादविवाद सुरू करण्यासाठींच खोटे रिपोर्ट करणारीं कांहीं वर्तमानपत्रें नेहमीं तयार असतात. आळ किंवा असत्य यांचा निषेध केला असतां त्यांनां एक तऱ्हेचें महत्त्व मिळतें, असा माझा अनुभव आहे. तंटा अगर मारामारी पाहणें प्रत्येकाला आवडतें आणि वादविवादानें अगदीं क्षुल्लक गोष्टींनां नसतें महत्त्व प्राप्त होतें.

पुष्कळ वर्षांमध्यें एका वर्तमानपत्राच्या बातमीदारानें मात्र मला अलिकडे एकदां फसविलें. मी आगगाडीनें प्रवास करीत असतां, न्युयॉर्कच्या पत्राचा एक बातमीदार डब्यांत येऊन माझ्याशेजारीं बसला आणि त्या वेळीं लोकांसमोर असलेल्या एका प्रश्नाचा खल करूं लागला. आपण व्यापारी आहों आणि या प्रश्नाचा आपण प्रसंगवशात् विचार करीत आहों, असा त्यानें माझा ग्रह केला. मी त्याच्याशीं सभ्यगृहस्थाप्रमाणें सरळपणें व उघडपणें भाषण केलें. मधल्या एका स्टेशनवर तो चटकन खालीं उतरून गेल्यावर मला त्याची शंका आली. एका व्यक्तीशीं नव्हे, तर मी लोकांशींच बोलत होतों अशी मी माझ्या मनाशीं गांठ बांधली. त्याच्या पत्रांत दुसरे दिवशीं आमच्या मुलाखतीची लांबलचक हकीकत प्रसिद्ध झाली. त्या पत्राच्या व्यवस्थापकाला मीं लगेच सर्व खरा प्रकार कळविला.

माझ्या पत्राचा कांहीं विशेष परिणाम झाला किंवा नाहीं, हें मला खात्रीनें सांगतां येत नाहीं, तरी आपणाला वाईट रीतीनें वागविण्यांत आलें असतां त्याबद्दल निषेध किंवा असंमति दाखविणें हा व्यक्तीशीं वर्तमानपत्रांची वागणूक सुधारण्याचा एक उपाय आहे, असें मला वाटतें.

वर्तमानपत्राविषयींची मुख्य गोष्ट ही आहे, कीं, तें आपल्या समाजांतील साधारण मनुष्याच्या मताचें व ज्ञानाचें द्योतक असतें. स्थानिक वर्तमानपत्रें आपापल्या टापूचे ग्रह व्यक्त करतात. त्यांचीं व्यंगें किंवा दोष ह्मणजे तेथील साधारण लोकांचीं व्यंगें व दोष होत. हें असें असणें योग्यच आहे, असें मला वाटतें. आपल्या वाचकांचीं मनें वर्तमानपत्रांनीं व्यक्त केलीं नसतीं, तर तीं आतां आहेत तशीं मनोरंजक व मौल्यवान् झालीं नसतीं, आणि आह्मांला आज आहे तितकें लोकांचें चांगलें ज्ञान झालें नसतें. वर्तमानपत्र जोंपर्यंत अस्तित्वांत आहे, तोंपर्यंत साधारण मनुष्याच्या वृत्ति व विचार कसे आहेत, हें जाणण्याचें साधन आह्मापाशीं आहे एवढेंच नव्हे, तर त्या मनुष्याच्या अंतःकरणाला जाऊन भिडण्याचें व त्याला वळवून घेण्याचें द्वार आह्मांपाशीं असतें. वर्तमानपत्रांची चाड आपणाला नाहीं असें जे लोक सांगतात, त्यांनां बहुतकरून साधारण मनुष्याविषयीं आदर नसतो.

वर्तमानपत्रांचा खरा दोष ह्मटला ह्मणजे तीं नेहमीं साधारण मनुष्याची वाईट बाजु तेवढी दाखवितात, आणि चांगली बाजु क्वचित्च पुढें आणतात. साधारण मनुष्याच्या उत्कृष्ट बाजूविषयीं कांहीं वाचावेंसें वाटलें तर पुस्तकें व मासिकें आह्मीं वाचलीं पाहिजेत. वर्तमानपत्रें खऱ्या वस्तु व खरीं मनुष्यें यांविषयींच विवेचन करतात, हा एक मोठा फायदा आहे हें खरें; पण हें विवेचन नुसतें वरपांगी असतें. याकरितां वर्तमानपत्रानें एकाद्याची निंदा किंवा स्तुति केली तर मी

त्या निंदास्तुतीला कांहीं महत्त्व देत नाहीं आणि असें करणें हेंच योग्य आहे, असें मला वाटतें.

तथापि पुस्तकांपेक्षां वर्तमानपत्रांपासूनच मी अधिक शिकलों आहें, खरोखर मनुष्य व वस्तु यांच्या समागमापासून मी जरी कांहीं शिकलों आहें, तरी वर्तमानपत्रांपासून माझें बरेंच मोठें शिक्षण झालें आहे, असें मला वाटतें. वर्तमानकालच्या विषयांवर लेख लिहिणाऱ्या मासिकांचा वर्तमानपत्रांत समावेश केला, तर हें माझें विधान अगदीं खरें आहे. पुस्तकांतील साधारण विधानांपेक्षां वर्तमानपत्रांतील बातम्यांनींच मला अधिक उत्तेजन दिलेलें आहे. प्रत्येक गोष्टींत कच्च्या मालाशीं प्रत्यक्ष व्यवहार करणें हें मला अधिक आवडतें आणि पुस्तकांपेक्षां वर्तमानपत्रांतच तो ( कच्चा माल ) मला अधिक सांपडतो.

आपले रिपोर्ट प्रसिद्ध करण्यांत वर्तमानपत्रांचा मुख्य हेतु विधायक नसून विघातक असतो, अशी वर्तमानपत्रांविषयीं टीका करतांना पुष्कळ लोकांनां मीं ऐकिलें आहे. प्रत्येक मनुष्याला—विशेषतः सार्वजनिक मनुष्याला वर्तमानपत्रें लोकमताच्या न्यायासनासमोर निर्दयपणें खेंचून आणतात आणि त्याला आपल्या कृत्याचा खुलासा व समर्थन करावयास लावतात, हें अगदीं खरें आहे.

लोकांची जी कांहीं सेवा आपण करूं, तीवर सर्व मान किंवा अधिकार अवलंबून आहे, हें तत्त्व प्रत्यक्षपणें किंवा अप्रत्यक्षपणें सार्वजनिक कामें करणाऱ्या प्रत्येक मनुष्यानें नेहमीं डोळ्यांसमोर ठेवणें हें फार महत्त्वाचें आहे. या तत्त्वानें प्रेरित होऊन जो कोणी खासगी किंवा सार्वजनिक मनुष्य वर्तमानपत्रांशीं व्यवहार करतो, त्याला त्यांच्यापासून कांहीं अपाय न होतां उलट अत्यंत साहाय्य मिळतें.

माझ्याविषयीं ह्मणाल तर, मला जें कांहीं यश मिळालें आहे तें सर्व दक्षिणेंतील व उत्तरेंतील वर्तमानपत्रांनीं माझ्या कार्याविषयीं जी कांहीं सहानुभूति व कळकळ दाखविली, तिचेंच फळ होय असें मला वाटतें. माझा समाज व माझें मित्रमंडळ याबाहेरील असंख्य जनसमूहाशीं माझा संबंध बहुतकरून वर्तमानपत्रांच्या द्वारेंच वडून आला आहे, आणि या साधनामुळेंच टस्कगीसंस्था ही एकाद्या दात्याच्या आश्रयास पात्र झालेली किंवा एका जातीच्या अगर पंथाच्या हितार्थ चाललेली अशी संस्था न होतां सर्व लोकांनीं पोशिलेली आणि सर्व देशाच्या हितार्थ चालविलेली अशी एक सार्वजनिक संस्था झालेली आहे.

प्रकरण पांचवें.

# अक्कलवान् लोक आणि बोस्टनचें बाजारबुणगे.

[ कोणत्याहि मनुष्याच्या मनांत महत्त्वाकांक्षा उत्पन्न होण्यास त्याच्या पूर्वजांच्या मर्दुमकीची आठवण बऱ्याच अंशीं कारणीभूत होते. निग्रो लोकांनां पूर्वजांचा असा इतिहास मुळींच नसल्यानें त्यांच्यामध्यें आत्मविश्वास उत्पन्न होणेंहि बरेंच मुष्किलीचें असल्यास नवल नाहीं. लहानपणीं आपल्या सवंगड्याबरोबर बोलतांना व आपल्या आयुष्याचें ध्येय काय असावें, याविषयीं वादविवाद करतांना नांव घेण्यासारख्या निग्रोच्या अभावीं गोऱ्या लोकांच्या थोर माणसांचींच उदाहरणें बुकरला द्यावीं लागत. परंतु स्वज्ञातियांच्या उदाहरणांसारखीं परकीयांचीं चरित्रें स्फूर्तिदायक अथवा चैतन्यप्रद होत नसतात; कारण हृदयाची तार हालविणारें ममत्व किंवा आपलेपण त्यांत नसतें. परंतु पूर्वजांचें कीर्तिरूपी भांडवल नाहीं ह्मणून मनस्वी आणि कार्यार्थी पुरुष हताश होऊन स्वस्थ बसत नसतो. नेपोलियनला हिणविण्याकरितां कोणीं त्याला विचारलें –'तुझ्या कुळांत अभिमानानें नांव घेण्याजोगा पूर्वज कुठें आहे?' नेपोलियननें डौलानें जरा मान आंखडून उत्तर केलें–'मीच तो पूर्वज; व माझे वंशज पुढें माझ्या नांवाचा अभिमान वाहतील.' आमच्या बुकर वॉशिंग्टनला पण जवळजवळ असेंच करावें लागलें.

नाहीं ह्मणायला, फ्रेडरिक डगलस नांवाचा एक निग्रो गुलाम आपल्या धन्याच्या घरून पळून जाऊन शिक्षण संपादून नांवारूपाला आला होता. गुलामगिरीविरुद्ध चळवळ करण्यांत यानें बराच पुढाकार घेतला होता, यूरोपांत जाऊन व्याख्यानें दिलीं होतीं, व ओघानेंच अमेरिकन निग्रो जातीचें पुढारीपण त्याच्याकडे आलें होतें. वॉशिंग्टननें याचें चरित्र लहानपणींच साभिमान व मननपूर्वक वाचलें होतें, डगलसचीं व्याख्यानें ऐकिलीं होतीं व पुढें आपल्या संस्थेंतहि विद्यार्थ्यांनां उपदेश करण्यास त्याला व त्याच्यासारख्या इतर समाजनेत्यांला त्यानें बोलाविलें होतें.

पण वॉशिंग्टननें लवकरच ओळखलें, कीं, स्वातंत्र्य मिळविण्यासाठीं चालविलेले चळवळीचे जुने मार्ग, स्वतंत्र निग्रोंनां समाजांत योग्य तें स्थान मिळवून

देण्याच्या कामीं व मिळालेल्या हक्कांचा उपभोग घेण्यास पात्र करण्याच्या कामीं उपयुक्त होणार नाहींत. ज्या सालीं फ्रेडरिक डगलस वारला, त्याच सालीं वॉशिंग्टननें अटलांटा येथील प्रदर्शनांत निग्रोंतर्फे व्याख्यान दिलें. लौकरच डगलसनें रिकामें केलेलें निग्रोजातीचें धुरीणपद वॉशिंग्टनच्या गळयांत पडलें. यामुळें यापुढें कसें वागावें, याविषयीं अनेकांकडून त्याला निरनिराळ्या सूचना येऊं लागल्या. कोणी ह्मणाले–'त्यानें आपली शाळा सांभाळून स्वस्थ असावें.' कोणी म्हणाले–'यापुढें त्यानें लेक्चरें झोडावीं.' कोणी सांगूं लागले, कीं, पंतोजीचें काम आतां सोडून त्यानें राजकीय कामांत–राजकारणांत पूर्ण लक्ष्य द्यावें. कित्येकांनां तर वॉशिंग्टनचा गोऱ्यांशीं गोड वागण्याचा मवाळपणा ह्मणजे शुद्ध भ्याडपणा व ज्ञातिद्रोहच वाटला.

वॉशिंग्टननें आपलें धोरण असें ठरविलें होतें:–' यापुढें आपणाला विघातक कार्य करावयाचें नसून विधायक कार्य करावयाचें आहे. स्वतःचा बचाव करण्याचे दिवस आतां उरले नसून पाऊल पुढें टाकण्याचा काळ आला आहे. विरोध मांडून हार खाण्याची नसून, समेट करून पुढेंच घुसावयाचें, व ज्या गांवीं किंवा प्रांतीं राहूं तेथील लोकांशीं आपला स्वाभिमान न गमावतां गोडीगुलाबीनें पण सरळ वागून दोस्ती संपादन करावयाची.' उत्तरेंतील कांहीं सुशिक्षितांत मोडणाऱ्या व स्वतःला अक्कलवान समजणाऱ्या निग्रोंनां दक्षिणेंतील या मवाळ पुढाऱ्यांचा हेवा वाटूं लागला, व त्यांनीं वॉशिंग्टनविरुद्ध व्याख्यानांचें व चळवळीचें एक सत्रच आरंभिलें. पण चिडखोरपणाच्या भांडवलावर चालविलेला निंदेचा धंदा किती दिवस चालणार? ' हक्कांची पायमल्ली,' ' निग्रोंवर होणारा अन्याय,' ' प्रतिकाराचा निश्चय ' व ' निषेधाचें प्रदर्शन ' असल्या विषयांवर वेळींअवेळीं जोर देत राहिल्यानें आणि आपलें आर्थिक सामर्थ्य व समाजांतील दर्जा वाढविण्याचे प्रयत्न कांहींच न केल्यानें हे लोक दिवसेंदिवस खालावत चालले. स्वतः कांहीं करावयाचें नाहीं व दुसऱ्यांच्या चुका काढीत बसावयाचें अशांचें समाजांत फार दिवस वजन राहत नाहीं. उर्दूमध्यें एक ह्मण आहे "करणाऱ्यांत शंभर आयब ( दोष ) निघूं शकतात, न करणाऱ्याचा एकच आयब." शेवटीं या लोकांनीं वॉशिंग्टनच्या बोस्टनमधील एका व्याख्यानाला गावगुंडांच्या मदतीनें अडथळा करण्याचा आचरट प्रयत्न केला, पण शेवटीं तो त्यांच्याच गळयांत आला. परिस्थितीच्या प्रत्यक्ष ज्ञानाच्या अभावीं पुस्तकीज्ञानानें व उसन्या विचारानें कांहीं लोक

स्वतःचें व समाजाचें कसें नुकसान करून घेतात, याविषयींचें या प्रकरणांतील वॉशिंग्टनचें विवेचन आपल्यापैकीं कितीतरी लोकांनां पथ्यकर होईल. ]

ज्या मानानें जग एकाद्या व्यक्तीपासून किंवा ज्ञातीपासून कमजास्त कार्य व्हावें अशी अपेक्षा करतें, त्या मानानें त्या व्यक्तीच्या किंवा ज्ञातीच्या जीवनांत बराच फरक होतो. जग आपल्याविरुद्ध आहे असें गरिबींत जन्मलेल्या प्रत्येक मुलाला व मुलीला आपल्या आयुष्यांत केव्हां तरी वाटलें असावें असें मला वाटतें. जें कार्य त्यांच्या हातून होईल अशी समाजांतील लोकांची अपेक्षा नसते, तें कार्य त्यांनां करतां येईल अशी त्यांची खात्री होणें फार कठिण आहे.

मला थोडेंसें वाचतां येऊं लागल्यावर, स्वतःच्या प्रयत्नांनीं गरिबींतून नांवारूपास चढलेल्या लोकांचीं चरित्रें वाचून मला फार आनंद होई. अशा तऱ्हेचीं पुस्तकें एकाद्या मुलाला वाचतां येणें ही फार महत्त्वाची गोष्ट आहे. अशा पुस्तकाच्या वाचनानें, आपण कांहीं तरी करून दाखवावें आणि आपल्या आयुष्याचें सार्थक करावें अशी त्याला स्फूर्ति होते, इतकेंच नव्हे, तर कांहीं तरी उपयुक्त काम करण्यावरच आणि जगाला जरूर असलेली कोणत्या तरी तऱ्हेची सेवा चांगल्या रीतीनें करण्याच्या पात्रतेवरच यश अवलंबून आहे, हें तो शिकतो.

मला आणि दुसऱ्या निग्रो मुलांनां—मग तीं कोणत्याहि वयाचीं असोत—उपसर्ग हा असे, कीं, आम्हीं शाळेंत वाचत असूं त्या सर्व गोष्टी गोरीं मुलें व गोरे लोक यांच्या यशाविषयीं व पराक्रमाविषयीं असत. मीं वाचलेल्या व्यक्तींच्या लौकिकांच्या गोष्टी शाळेंतील माझ्या सोबत्यांनां मी कधींकधीं सांगत असें; पण त्या गोष्टींचा संबंध दुसऱ्या ज्ञातीच्या लोकांशीं आहे अशी ते मला नेहमीं जाणीव देत. ‘ दुसऱ्यांनीं जें कांहीं केलें आहे तें आमच्यापैकीं कांहींजणांनां करतां येईल आणि

आमच्या ज्ञातीला भूतकालाभावीं भविष्यकाल असूंच नये कीं काय ?' असें ह्मणून मी कधींकधीं त्यांच्याशीं वाद करण्याचा प्रयत्न करीं. पण आमची गोष्ट अगदीं भिन्न आहे असें ते उत्तर देत. आमची कातडी काळी आहे आणि गुलामगिरी भोगलेल्या ज्ञातीचा डाग आमच्या मुखांवर आहे, ह्मणून आमची भरभराट व्हावी हें गोऱ्या लोकांनां नको आहे, असा त्यांच्या ह्मणण्याचा मथितार्थ असे.

शेवटीं मी फ्रेडरिक डगलसचें उदाहरण देऊन, तो किती उच्च पदवीप्रत गेला, त्यानें आपल्या ज्ञातीची मोठी सेवा कशी केली, गुलामगिरीविरुद्ध चाललेल्या स्वतंत्रतेच्या चळवळींत त्यानें कशी चांगली कामगिरी बजाविली, हें सांगून मी वाद मिटवीत असें.

पुस्तकें आणि वर्तमानपत्रें वाचावयास शिकण्यापूर्वींहि फ्रेडरिक डगलसच्या विलक्षण चरित्राविषयीं व त्यांच्या पराक्रमाविषयीं माझी आई व इतर निग्रो लोक आमच्या गांवांत बोलत असतांना ऐकल्याचें मला आठवतें. मीं लहानपणीं फ्रेडरिक डगलसविषयीं पुष्कळ ऐकिलें. त्यामुळें त्याचे लेख व त्याचीं भाषणें माझीं मला वाचतां यावींत असें मला वाटूं लागलें. शाळेंत जाऊन वाचावयास शिकावें अशी मला इच्छा होण्याला हें एक कारण झालें. खरोखर मीं जीं कांहीं पुस्तकें प्रथम वाचलीं, त्यांत मिस्टर डगलसनीं प्रसिद्ध केलेला "माझें चरित्र व काल" हा ग्रंथ होता असें मला स्मरतें. या ग्रंथाचा मजवर फार चांगला परिणाम झाला आणि मी तो पुष्कळदां वाचलाहि.

हाम्पटन येथें जनरल आर्मस्ट्रांग यांचा मी विद्यार्थी असतांना फ्रेडरिक डगलसविषयीं मला आणखीहि पुष्कळ ऐकावयास मिळालें आणि मी त्यांच्या सर्व हालचाली मोठ्या अगत्यानें पाहूं लागलों. तसेंच

त्या वेळीं माझ्या ज्ञातीच्या कांहीं प्रमुख व नामांकित पुढाऱ्यांविषयीं मी माहिती मिळवूं लागलों. हे गृहस्थ ह्मणजे व्हर्जीनियाचे कांग्रेसमन जॉन् एम्. लांगस्टन, मिसिसिपीचे सिनेटर ब्लांच के. ब्रूस, लुसियानाचे लेफ्टनंट गव्हर्नर, पी. बी. एस्. पिंचबॅक, मिसिसिपीचे कांग्रेसमन जॉन् आर्. लिंच हे आणि इतर कांहीं सुप्रसिद्ध व्यक्ति होत. यांचीं नांवें त्या काळीं निग्रो लोकांत अगदीं घरोब्याचीं होऊन बसलीं होतीं. त्या वेळच्या प्रमुख व ठळकठळक निग्रो पुरुषांविषयीं जी कांहीं माहिती मला मिळे ती मी मोठ्या उत्सुकतेनें वाचीं आणि त्यांचीं चरित्रें व कृत्यें यांचा श्रद्धेनें अभ्यास करीं. पुढें या सर्व पुरुषांची भेट व ओळख होण्याचा मान मला मिळाला; पण त्यांपैकीं एकाद्याची भेट व परिचय होण्याचें भाग्य माझ्या नशीबीं असेल, असें त्या वेळीं माझ्या ध्यानींमनींहि नव्हतें.

मी एकदां वाशिंग्टन येथें सहजगत्या असतांना फ्रेडरिक डगलस हे जवळच्याच गांवांत भाषण करणार आहेत असें मीं ऐकिलें. मीं त्यांनां कधीं पाहिलें नव्हतें किंवा त्यांचें भाषण ऐकिलें नव्हतें,ह्मणून या संधीचा मीं फायदा घेतला. त्यांनां पाहून व त्यांचें भाषण ऐकून माझ्या मनावर फार चांगलाच परिणाम झाला. पण हस्तांदोलन करण्यास सुद्धां त्यांच्या जवळ जाण्याचें मला धैर्य झालें नाहीं. टस्कगीसंस्थेची स्थापना झाल्यावर सुमारें तीनचार वर्षांनीं, फ्रेडरिक डगलस यांनीं एका पदवीदानाच्या प्रसंगीं भाषण करावें, असें मीं त्यांनां आमंत्रण दिलें. माझ्या विनंतीला मान देऊन ते आले आणि मोठ्या श्रोतृसमुदायासमोर त्यांनीं भाषण केलें. या पुढाऱ्याचें व वक्त्याचें भाषण ऐकण्यासाठीं तीसचाळीस मैल लांबून बरेच लोक आलेले होते. टस्कगीला येऊन आमच्या विद्यार्थ्यांनां व आमच्या समाजांतील लोकांनां व्याख्यान द्यावें असें आमंत्रण

वर सांगितलेल्या आणि इतर प्रमुख निग्रो गृहस्थांनां मीं पुढें क्रमाक्रमानें दिले.

बहुतकरून या सर्व लोकांच्या भाषणांत व लेखांत निग्रो ज्ञातीच्या भूतकालाविषयीं—गतगोष्टीविषयीं आणि वर्तमान व भावि राजकीय प्रश्नांविषयीं विवेचन केलेलें असे. गुलामगिरी नाहींशी करून टाकणाऱ्या राजकीय चळवळींत मि. डगलसनीं आपल्या आयुष्यभर खटपट केली. हे ज्ञातीचे खरे कैवारी होत. मनुष्य व नागरिक या नात्यानें निग्रोला सर्व हक्क सरकारापासून मिळण्याच्या कामीं यांनीं बराच पुढाकार घेतला होता. तथापि गुलामगिरीच्या विरुद्ध दीर्घकालपावेतों मोठ्या आवेशानें त्यांनां जो राजकीय लढा लढावा लागला, त्यामुळें स्वतंत्रतेच्या जबाबदाऱ्या व सवलती स्वीकारण्याची निग्रोच्या अंगीं पात्रता आणण्याचें तितकेंच बिकट काम हातीं घेण्याची मात्र त्यांची तयारी नव्हती. बहुतेक हीच स्थिति इतर निग्रो पुढाऱ्यांची होती. मीं त्यांनां भेटलों आणि त्यांचीं भाषणें ऐकिलीं तेव्हां जरी मी तरुण व अननुभवी होतों तरी त्यांच्या सार्वजनिक व्याख्यानांत कोठें तरी न्यून आहे अशी माझी खात्री झाली. हालअपेष्टा आणि राजकीय हक्क यांची आठवण करून देण्याऐवजीं लाखों निग्रो लोकांनां याहून अधिक कांहीं पाहिजे, तसेंच केवळ आपला बचाव करण्यापेक्षां त्यांनीं कांहीं अधिक करणें अवश्य आहे, असें मला वाटलें.

फ्रेडरिक डगलस हे १८९५ च्या फेब्रुवारींत मरण पावले. याच वर्षीं सप्टेंबर महिन्यांत मीं अटलांटाप्रदर्शनांत भाषण केलें. अटलांटा येथें दक्षिणेंतील गोरे लोक, उत्तरेंतील गोरे लोक व माझ्या ज्ञातीचे लोक असलेल्या श्रोतृसमुदायासमोर मीं भाषण केलें. गतगोष्टींनां दोष देत बसण्याऐवजीं आतां आम्हीं काय करावें, हें जोरानें प्रतिपादण्याचें

हेंच स्थळ व हीच वेळ आहे, असें मला वाटलें. आतां आह्माला विघातक नव्हे तर विधायक, संरक्षक नव्हे तर प्रागतिक, वैरभाव किंवा शरणागति यांचें नव्हे तर मैत्री आणि प्रगति यांचें धोरण स्वीकारणें अवश्य आहे, असें मला वाटलें. समाजांतील उपयुक्तता हेंच आमच्या बचावाचें खरें व उत्तम साधन आहे, असें मीं शक्य तितक्या जोरानें प्रतिपादन केलें.

मीं या भाषणांत दुसरा एक मुद्दा विशद केला; तो हा, कीं, हजारों मैल दूर राहणाऱ्या कोणा मनुष्याची सदिच्छा संपादन करण्याऐवजीं आपल्या शेजारीं राहणाऱ्या गोऱ्या मनुष्याची मैत्री निग्रोनें सरळपणें व उघडपणें करावी, हेंच माझ्या मतें इष्ट आहे.

मीं आंखलेलें धोरण बरोबर आहे, अशी माझ्या मनाची पूर्ण खात्री होती, तरी माझ्या शब्दांकडे सर्वांचें लक्ष्य इतकें वेधलें जाईल, ही कल्पनाहि मला नव्हती.

ज्यांचीं नांवें देखील मला माहीत नव्हतीं आणि फार तर ज्यांचीं नांवें मीं वर्तमानपत्रांत अथवा दुसरीकडे पाहिलीं होतीं, अशा पुष्कळ लोकांकडून आणि देशांतील सर्व भागांतून मला अभिनंदनपर तारा व संदेश आले. लवकरच सर्व तऱ्हेच्या विषयांवर आणि सर्व तऱ्हेच्या संस्थांसमोर व्याख्यानें देण्याचीं पुष्कळ आमंत्रणें मला येऊं लागलीं. कल्पनातीत रकमा पुष्कळजणांनीं माझ्या व्याख्यानांसाठीं देऊं केल्या. व्याख्यानें करविणाऱ्या कांहीं संस्थांनीं मी भाषण करीन तितके दिवस रोज तीनशें आणि चारशें डालर देण्याचें कबूल केलें. पश्चिमभागांतील एका प्रमुख वर्तमानपत्रानें तर बक्षिसार्थ झालेल्या एकाद्या प्रसिद्ध सामन्याचें वर्णन त्या पत्रासाठीं लिहून पाठविल्यास मला एक हजार डालर आणि सर्व खर्च देण्याचें कबूल केलें.

राजकीय चळवळींत मीं भाग घ्यावा ह्मणून ठिकठिकाणांहून—विशेषतः निग्रोंच्या मताला महत्त्व असलेल्या संस्थानांतून मला बरींच आमंत्रणें आलीं. व्याख्यानें करविणाऱ्या संस्थांनीं पत्रद्वारां केलेल्या सूचनांचा स्वीकार व्हावा ह्मणून निकड लाविली, इतकेंच नव्हे, तर त्यांनीं टस्कगीस आपले एजंटहि पाठविले. वर्तमानपत्रें व मासिकें यांनीं, मीं त्यांच्याकरितां खास लेख लिहिल्यास, पुष्कळ मोठमोठ्या रकमा देऊं केल्या. पण परिस्थितीची पूर्ण माहिती करून घेईपर्यंत मीं वाट पहाण्याचा निश्चय केला. अटलांटा येथील माझे साधे व सोपे शब्द लोकांनां फार आवडले आणि ते त्यांच्या अंतःकरणांत बिंबले. या गोष्टीनें मला पुष्कळ विचार करावयास लाविलें, आणि तूर्त टस्कगी येथील माझ्या कार्यालाच बिलगून राहण्याचा मीं निश्चय केला.

अटलांटा प्रदर्शनांतील माझ्या भाषणाचा एक आश्चर्यकारक परिणाम असा झाला, कीं, देशांतील सर्व भागांतून अनेक पत्रें, तारा आणि वृत्तपत्रांतील लेख यांचा मजवर सारखा वर्षाव सुरू झाला. फ्रेडरिक डगलसच्या निधनामुळें रिकामी झालेली जागा मीं भरून काढावी किंवा ती जागा मीं भरून काढलेली आहे, असें त्या सर्व लेखांत लिहिलेलें होतें. या सर्व सूचना माझ्याकडे येई तोंपर्यंत मि० डगलसप्रमाणें मला निग्रो ज्ञातीचा पुढारी मानण्यांत येईल अशी अंधुकमुद्रां कल्पना माझ्या मनाला कधींहि शिवली नव्हती. मी त्या वेळीं एका अप्रसिद्ध औद्योगिक शाळेंत शिक्षक होतों. टस्कगी संस्थेची स्थापना व वाढ करण्यांत मीं माझा सारा काळ आणि सारें लक्ष्य घातलें होतें; तसेंच पुढाऱ्यांचीं कामें किंवा कर्तव्यें कोणतीं आहेत, आणि निग्रो लोक व तद्व्यतिरिक्त जग पुढाऱ्यांपासून काय अपेक्षा करतें, याची मला कांहींच कल्पना नव्हती. वर्तमानपत्रांतील या आक-

स्मिक प्रसिद्धीमुळें माझ्यावर लादल्या गेलेल्या या नवीन परिस्थितींत माझ्याकडून कोणत्या गोष्टींची अपेक्षा केली जात आहे, हें मला लवकरच कळून चुकलें.

मी जेव्हां प्रथम लोकांत मिसळूं लागलों, तेव्हां ' फ्रेडरिक डगलसच्या जागीं आलेले ' असा माझ्याविषयीं लोक उल्लेख करूं लागले. हें पाहून कांहीं दिवस मी बराच गोंधळून जात असें. माझें नांव अशा रीतीनें सर्वत्र जाहीर झाल्यामुळें मीं उत्तरेंत किंवा दक्षिणेंत कोठेंहि व्याख्यान दिलें, कीं, बरेच लोक माझें भाषण ऐकावयास जमत.

ज्याचें नांव कांहीं अंशीं लोकांसमोर येत चाललें आहे अशा गृहस्थाला कितीतरी निरपेक्ष उपदेश लोकांकडून कसा मिळत जातो हें पाहणें मोठें मनोरंजक व मौजेचें आहे. अटलांटा प्रदर्शनांतील माझ्या भाषणावर वादविवाद चालू असतां आणि पुढें त्यानंतर प्रत्येक दिवशीं, सार्वजनिक बाबींविषयीं मीं माझी दिशा कशी ठेवावी, यासंबंधीं सल्ला देणारीं एकदोन पत्रें मला येत होतीं.

एके दिवशीं मला एखादें पत्र येतें किंवा वर्तमानपत्रांतील एखाद्या संपादकीय लेखाकडे माझें लक्ष्य वेधिलें जातें आणि त्यांत टस्कगी संस्थेलाच मीं विलगून रहावें आणि माझ्या ज्ञातीची उन्नति चांगल्या रीतीनें व्हावी म्हणून मीं दुसऱ्या कोणत्याहि कामाकडे ढुंकूनहि पाहूं नये, असा उपदेश मला केलेला असतो. एकदोन दिवसांनंतर मला दुसरें एखादें पत्र येतें किंवा वर्तमानपत्रांतील दुसरा लेख वाचावयास मिळतो आणि त्यांत मीं माझें सारें लक्ष्य टस्कगीसंस्थेला, निग्रोशिक्षणाला किंवा अमेरिकेंतील निग्रोंला वाहिलेलें आहे, ही माझी मोठी चूक आहे असें प्रतिपादन केलेलें असतें. उदाहरणार्थ, या देशापेक्षांहि

जेथें निग्रोंची लोकसंख्या अधिक आहे अशा आफ्रिकाखंडांत किंवा वेस्टइंडिज बेटांत मीं टस्कगीसंस्थेसारखें कार्य कोणत्या ना कोणत्या तरी मार्गानें सुरू करावें, असें वेळोवेळीं मला आग्रहपूर्वक सांगण्यांत आलेलें आहे.

अटलांटा येथील माझ्या भाषणानंतर कांहीं थोड्या गोऱ्या लोकांनां आणि तसेंच कांहीं थोड्या काळ्या लोकांनां असें वाटलें कीं, माझ्या प्रयत्नांनां निराळी दिशा फुटून मीं राजकारणाच्या प्रश्नांचा खल करावा, आणि राजकीय चळवळ सारखी चालू ठेवणें व तींत माझ्या ज्ञातीच्या लोकांनां यश मिळणें हें इष्ट आहे, असें मीं जोरानें प्रतिपादन करावें. मी जोंपर्यंत दक्षिणेंत आहें तोंपर्यंत दक्षिणेंतील लोकांनां राग किंवा चीड येईल असें कांहीं मीं बोलूं नये, हें साहजिक आहे; पण उत्तरेंत मीं तोंड मोकळें सोडावें आणि गुलामगिरी व सिविल वॉर यांमुळें उत्पन्न झालेले भेदभाव कायम राहतील व वाढतील अशा रीतीनें मीं दक्षिणेंतील लोकांची बदनामी करावी, अशी कांहींजणांची अपेक्षा होती. निग्रोविषयक माझ्या समर्थनांत कांहीं तरी बरीच उणीव आहे, मीं वस्तुस्थितीचा बराच ऊहापोह केला, पण ‘मनुष्याचे अधिकार’ व ‘स्वतंत्रतेचा जाहीरनामा’ यांविषयीं मीं पुरेसें विवेचन केलें नाहीं, असें दुसऱ्या कांहीं लोकांनां वाटलें.

अटलांटा प्रदर्शनांतील माझ्या भाषणामुळें मीं माझें धोरण वदललें नाहीं, इतकेंच नव्हे, तर माझी पूर्वींची विचारसरणी कायम ठेवून, कर, शिर आणि हृदय–बुद्धि, मनोवृत्ति व कार्यशक्ति यांच्या वाढीचें शिक्षण देणें महत्त्वाचें आहे असें मी जेव्हां सांगूं लागलों, तेव्हां त्या सर्व लोकांची पूर्ण निराशा झाली. राजकीय चळवळीपेक्षां शिक्षणानेंच दक्षिणेंतील ज्ञातिविषयक त्रासदायक प्रश्न सुटेल असा माझ्या अनेक

भाषणांच्या रोख दिसून आल्यामुळें मी भलत्याच गोष्टीला विशेष महत्त्व देत आहें, असें त्यांनां वाटलें.

या सर्व टीकांचा व सूचनांचा माझ्यावर कांहीं परिणाम झाला, हें मी कबूल करतों; पण सर्व गोष्टींचा पुनः नीट विचार केल्यावर, मला असें स्पष्ट दिसून आलें, कीं, लोकांनीं माझ्याकरितां सुचविलेला कार्यक्रम कितीहि सुखावह दिसत असला, तरी मूळ कार्याला विलगून राहून पूर्वीं ठरलेल्या दिशांनींच आपला उद्धार करून घेणें आपणाला भाग आहे.

टस्कगी येथें राहत असतां ठरविलेल्या आणि अटलांटांतील माझ्या भाषणांत सांगितलेल्या कार्यक्रमानें स्वतःला 'अक्कलवान'* ह्मणवून घेणाऱ्या एका लहानशा निग्रोवर्गामध्यें व माझ्यामध्यें विरोध उत्पन्न झाला. या वर्गांतील बहुतेक लोक उत्तरेंतील कॉलेजांचे पदवीधर असल्यामुळें व तेथेंच त्यांनीं आपलीं घरें केल्यामुळें ज्ञातिविषयक सर्व बाबतींत पुढारीपणा उत्तरेंतच असावा असें त्यांनां वाटणें हें साहजिक होतें. दक्षिणेंतील परिस्थितींत जोंपर्यंत निग्रोला अपायकारक व अन्यायकारक असें कांहीं आहे, तोंपर्यंत दक्षिणेशीं असलेल्या कडक वैरभावाच्या धोरणांत कांहीं बदल करूं नये, असें त्यांचें मत होतें.

माझें आयुष्य दक्षिणेंत गेलें असल्यामुळें व तेथील प्रश्नांचा मीं कांहीं वर्षें नीट काळजीनें प्रत्यक्ष अभ्यास केला असल्यामुळें मला जें कांहीं ज्ञान व अंतर्दृष्टि प्राप्त झाली होती, तें ज्ञान व ती अंतर्दृष्टि ते दूर राहत असल्यामुळें व त्यांचा अभ्यास पुस्तकीय असल्यामुळें त्यांनां लाभलीं नाहींत, असें मला वाटलें.

---

* 'The Intellectuals or the Talented Tenth.'

निग्रोंच्या औद्योगिक शिक्षणाच्या माझ्या योजनेला त्यांनीं प्रथम हरकत घेतली. निग्रोलोकांनां हातांनीं काम करावयास शिकविणें ह्मणजे दक्षिणेंतील लोकमताला अवास्तव मान देणें होय, असें त्यांनां वाटलें. माझी स्वतःची औद्योगिक शिक्षणावर खरी श्रद्धा नाहीं, असें त्यांपैकीं कांहींजणांनां वाटूं लागलें; पण खरें पहातां, औद्योगिक शिक्षण चांगलें असो वा वाईट असो, दक्षिणेंतील लोकमताला यत्किंचित्‌हि मान देण्याच्या विरुद्ध ते होते.

त्यांच्या दृष्टीनें दक्षिणेंतील गोरा मनुष्य हा निग्रोंचा स्वाभाविक शत्रु होय. कोणत्याहि उद्देशानें कां होईना, त्याची सहानुभूति व मदत मिळविण्याचा प्रयत्न करणें ह्मणजे ज्ञातिद्रोह करण्यासारखें होय, असें त्यांनां वाटे.

या सर्व गोष्टींमुळें वादविवादाला पुष्कळ रसभरित विषय मिळत आणि मीं वर सांगितलेले कॉलेजांतील विद्यार्थी या वादविवादांत प्रमुख असत. कॉलेजांतून सुटका झाल्यानंतर, कोणत्याहि तरुणानें प्रथम करावयाची गोष्ट ह्मटली ह्मणजे ज्ञातीच्या विषयांवर चर्चा करण्यासाठीं व्याख्यानें देत शहरोंशहरीं हिंडणें ही होय, असा समज होता.

मला एका तरुणाची विशेष आठवण आहे. तो येल युनिव्हर्सिटींतून ग्रॅजुएट झाला आणि त्यानंतरचा शिक्षणक्रम त्यानें हारवर्ड युनिव्हर्सिटींत पुरा केला, आणि नंतर ‘ बुकर टी. वॉशिंग्टन यांच्या चुका ’ या विषयावर व्याख्यानें देऊन त्यानें आपल्या कारकीर्दीला प्रारंभ केला. पण लवकरच त्याच्या नजरेला आलें, कीं, माझ्या चुकांवर नेहमीं पोट भरणें शक्य नाहीं. नंतर इतक्या वर्षांच्या शिक्षणक्रमांत कोणताहि उपयुक्त व उत्पादक उद्योगधंदा करण्यास आपण शिकलों नाहीं, असें

त्याला आढळून आलें. दुसऱ्या पुष्कळ मार्गांत अपयश आल्यावर शेवटीं मला तो शरण आला आणि त्याला कांहीं तरी काम मिळावें ह्मणून मीं खटपट केली. चुकीच्या मार्गानें शिक्षणाला सुरुवात केलेल्या तरुणाला मदत करणें बरेंच कठिण आहे. पुस्तकीज्ञानानें आपलें डोकें भरून घेतल्याबद्दल जगानें आपणाला उपजीविकेचें साधन दिलें पाहिजे, अशी कल्पना एकदां का त्याच्या डोक्यांत शिरली, कीं, ती कल्पना पुनः बदलणें त्याला फार अवघड जातें. शेवटीं वर सांगितलेला तरुण बुकएजंटाचें काम करून आपलें पोट कसें तरी भरीत होता आणि सरकारी कचेरींत द्वाररक्षकाचें किंवा तसेंच दुसरें हलकें काम मिळविण्यासाठीं सरकारांत खटपट करीत होता, असें मीं ऐकिलें.

याप्रमाणें भलत्या मार्गाला लागलेल्या अभागी तरुणांचीं उदाहरणें मी जेव्हां पाहतों, तेव्हां मला त्यांची कींव आल्यावांचून व सहानुभूति वाटल्यावांचून राहत नाहीं. कारण, त्यांच्या स्थितीबद्दल ते सर्वस्वीं जबाबदार नाहींत हें मला माहीत आहे. आपण निग्रो आहों, ह्मणून जगानें आपणाला विशेष सहानुभूति दाखविली पाहिजे, अशी त्यांनीं आपल्या कारकीर्दींत केव्हांना केव्हां तरी आपली समजूत करून घेतलेली असते आणि जगांत नांवलौकिकाला येण्यासाठीं स्वतःच्या प्रयत्नांऐवजीं या सहानुभूतीवर अवलंबून राहण्याची संवय ते लावून घेतात, असें दहांपैकीं नऊ उदाहरणांमध्यें आढळून येतें.

कॉलेजांत शिकत असतांना जगांतील एकाद्या विशिष्ट कार्याच्या तयारीकडे त्यांनीं फारच थोडें लक्ष्य दिलेलें असतें. पण असें असूनहि ज्ञातीचे प्रश्न सोडविण्याच्या तयारीला ते एकदम लागतात. अमेरिकेनें स्वतंत्रता कशी मिळविली याचा इतिहास त्यांनीं बराच वाचलेला असतो; गुलामगिरीविरुद्ध चळवळीच्या गोष्टींनीं त्यांचीं मनें भरून

गेलेली असतात आणि दक्षिणेंतील प्रत्येक प्रश्न सोडविण्याला जरूर असलेली एकच गोष्ट ह्मटली ह्मणजे 'डिक्लेरेशन ऑफ इन्डिपेन्डन्स् ( स्वतंत्रतेचा जाहीरनामा )' व 'बिल *ऑफ राईटस् (हक्कांचा कायदा)' यांचीं तत्त्वें लागू करणें ही आहे, अशा कल्पनेनें कॉलेजांतून ते बाहेर पडलेले असतात. दक्षिणेंतील प्रत्यक्ष ( वर्तमान ) परिस्थितीचा त्यांनीं फारच थोडा अभ्यास केलेला असतो आणि राजकीय प्रश्न व शिक्षण-विषयक प्रश्न, ज्ञातीच्या उन्नतीविषयींचें विघातक काम व विधायक काम, यांमधील सूक्ष्मभेदाचा त्यांनीं विचार केलेला नसतो.

माझ्याशीं संबंध जडलेला सर्वांत बिकट अशा लोकांचा वर्ग ह्मटला ह्मणजे शेक्सपियर, मिल्टन, सिसरो किंवा दुसरा एकादा मोठा ग्रंथकार यांच्या ग्रंथांतील ह्मणी किंवा उतारे प्रत्येक प्रसंगीं पाठ ह्मणून दाखवितां येण्याजोगें शिक्षण मिळविलेले लोक होत. एकादा प्रश्न पुढें आला, कीं, लगेच यांनीं एकादी ह्मण किंवा उतारा म्हणून दाखविलाच. एकाद्या म्हणीनें किंवा व्याख्येनें न सुटणारा असा कोणताहि बिकट प्रश्न यांच्या वांट्याला उरला नाहीं. मला ह्मणी आवडतात आणि त्या भाषणांत फार सोयीस्कर व उपयोगी असतात, हें खरें; पण त्यांत आयु-ष्यांतील बिकट प्रश्नांचा खुलासा असलेला मला केव्हांहि आढळला नाहीं.

कॉलेजांत त्यांनीं कांहीं कूटप्रश्नांचा अभ्यास केला व ते कागदा-वर सोडविले, हें खरें. पण हे प्रश्नहि दुसऱ्यांनींच सोडविलेले अस-तात आणि त्यांचीं उत्तरें त्यांनां कॉलेजांत शिकावयाचीं असतात.

* 'बिल ऑफ राइटस्' हा कायदा १६८९ सालीं इंग्रज लोकांनीं पास करून घेतला. हा कायदा सुप्रसिद्ध 'मॅगनाचार्टा'च्या खालोखाल महत्त्वाचा आहे. यांतील तत्त्वांनां अनुसरून, त्यांत थोडासा फेरबदल करून अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांनीं आपल्या राज्याची अनुशासनपद्धति ठरविलेली आहे.

न सुटलेले असे प्रश्न कॉलेजांत त्यांच्यासमोर आलेले नसतात, आणि तेथील शिक्षणानें आयुष्यांतील खरे प्रश्न सोडविण्यास अत्यंत आवश्यक असलेले सहनशीलता व दीर्घोद्योग हे गुण त्यांच्या अंगीं आलेले नसतात.

एका निग्रो उपदेशकानें कांहीं वर्षांपूर्वी या गोष्टीचें सुंदर स्पष्टीकरण केलेलें मला आठवतें. पुष्कळ प्रयत्न व स्वार्थत्याग करून त्यानें निग्रो अनाथ मुलें व वृद्ध बाया यांच्यासाठीं एक धर्मशाळा बांधिली. या इमारतीचें काम पुरें झाल्यावर ती तपासण्यासाठीं एक तरुण निग्रो तेथें आला आणि तींतील दोष दाखवूं लागला. त्या उपदेशकानें त्याचें ह्मणणें कांहीं वेळ शांतपणें ऐकून घेतलें आणि नंतर त्याच्याकडे वळून तो ह्मणाला 'मित्रा, एका गोष्टींत तूं माझ्यापेक्षां वरचढ आहेस.' नंतर तो थांबला आणि त्या तरुणाकडे पाहूं लागला. तो तरुणहि त्याच्याकडे पृच्छेच्या दृष्टीनें पाहूं लागला, तेव्हां तो ह्मणाला 'तूं बांधलेल्या एकाहि इमारतींत दोष काढण्याला मी समर्थ नाहीं.' (तूं अद्याप एकहि इमारत बांधलेली नाहींस !)

माझ्या विधानाचा भलताच अर्थ होऊं नये ह्मणून मला येथें हेंहि सांगितलें पाहिजे, कीं, वर वर्णिलेला कॉलेजांतील तरुणाचा नमुना आमच्या ज्ञातीच्या लोकांतच आढळतो असें नाहीं. हरएक प्रकारच्या स्थितींत विशिष्ट प्रकारचें अपयश पावलेले लोक आढळतात आणि असे लोक एकाच ज्ञातींत आढळतात, असें नाहीं. वर दिलेलें वर्णन न्यू इंग्लंडच्या (अमेरिकेच्या) किंवा इतर कॉलेजच्या निग्रो ग्रॅजुएटांनां लागू पडतें आणि तें दुसऱ्या कोणालाहि लागू पडत नाहीं, असा माझा ह्मणण्याचा भाव नाहीं. खरोखर पाहतां, आरंभापासून या कॉलेजांतील पदवीधर टस्कगी संस्थेंत आलेले आहेत. दक्षिणेंतील पुष्कळ संस्थां-

मध्यें काम करतांना माझा इतर पदवीधरांशीं संबंध घडून आलेला आहे आणि सर्वांत चांगलें व अत्यंत उपयुक्त काम करणारे लोक हारवर्ड येथें किंवा अमेरिकेच्या इतर कॉलेजांतून ग्रॅज्युएट झालेले होते, असें मला आढळून आलें आहे. मीं वर सांगितलेले लोक नियमात्मक नसून अपवादात्मक होत.

निग्रो लोकांचा दुसरा एक वर्ग आहे. त्याचें मुख्य काम ह्मटलें ह्मणजे निग्रो ज्ञातीचीं दुःखें, त्रास व अडचणी हीं नेहमीं लोकांसमोर मांडणें हेंच आहे. आपल्या ज्ञातीच्या दुःखांमुळें आपली उपजीविका चालते हें समजून आल्यामुळें आपलीं दुःखें जाहीर करण्याची त्यांनां संवयच लागून गेली आहे. यांत त्यांचे दोन हेतु असतात; (१) त्यांनां सहानुभूति हवी असते, आणि ( २ ) त्यापासून त्यांनां फायदा होतो. आपला धंदा किंवा काम नाहींसें होईल या भीतीनें निग्रो लोकांचीं दुःखें नाहींशीं व्हावीं असें यांपैकीं कांहींजणांनां वाटत नाहीं.

आपलीं दुःखें किंवा अडचणी नाहींशा होऊं नयेत असें लोकांनां केव्हांकेव्हां कसें वाटत असतें, हें सिद्ध करणारी एक गोष्ट साऊथ कारोलिनांतील एका निग्रोनें मला सांगितली होती. एका समाजांत जुन्या पद्धतीचा एक निग्रो डॉक्टर होता. त्याला हल्लींच्या वैद्यकीचें ज्ञान फारच थोडें होतें. पण कांहीं अकल्पित रीतीनें लोकांचा त्याच्यावर विश्वास बसला आणि आपल्या विशिष्ट उपचारपद्धतींनीं त्यानें बराच पैसा मिळविला. त्या समाजांत एक श्रीमंत सुखवस्तु बाई राहत होती. आपणाला काळपुळी ( Cancer ) झाली आहे, अशी त्या बाईची समजूत होती. सारखीं वीस वर्षें त्या रोगाबद्दल ती त्या डॉक्टराकडून चैनीनें औषध घेत असे. त्या काळपुळीच्या आणि इतर रोगांच्या कृपा-प्रसादानें तो वृद्ध वैद्य बराच गबर झाला आणि आपल्या मुलांपैकीं

एकाला मेडिकल कॉलेजांत पाठविण्याचा त्यानें निश्चय केला. मेडिकल कॉलेजांतील शिक्षणक्रम संपवून मुलगा परत घरीं आला आणि बापानें कांहीं दिवस विश्रांति घेतली. या अवधींत त्या बाईनें त्या तरुण मुलाला आपली काळपुळी पहावयास बोलाविलें. त्यानें रोग पाहून तिला औषध दिलें. थोड्याच दिवसांत ती काळपुळी किंवा काळपुळी ह्मणून समजला जाणारा कल्पित रोग नाहींसा झाला आणि ती वृद्ध बाई चांगली बरी झाली.

ह्मातारा परत घरीं आला आणि बाई खडखडीत बरी होऊन हिंडतफिरत आहे असें पाहतांच त्याची तळव्याची आग मस्तकाला गेली. त्यानें आपल्या मुलाला समोर बोलावून ह्मटलें 'बेट्या, तूं माझी काळपुळीची केस बरी केली आहेस असें दिसतें; पण आतां तुला मी सांगतों तें ऐक. त्या काळपुळीवरच मीं तुला सर्व शिक्षण दिलें. मीं तुला हायस्कुलांत, कॉलेजांत आणि शेवटीं मेडिकल स्कुलांत त्या काळपुळीच्या किफायतीवरच पाठविलें, आणि वैद्यकीच्या नव्या कल्पना डोक्यांत भरून घेऊन तूं येथें आलास आणि ती काळपुळीची केस बरी केलीस. मुला, मी तुला सांगतों, कीं, तूं सुरवातीलाच ही मोठी चूक केलीस. या रीतीनें तूं वैद्यकी चालवूं लागलास, तर तूं आपली उपजीविका कशी करशील ?'

याप्रमाणें ज्ञातीचा प्रश्न सोडविणाऱ्या लोकांचा एक वर्ग आहे. रोग्यानें बरें व्हावें, अशी यांची इच्छा नसते. कारण, जोंपर्यंत रोगाचा अंमल आहे, तोंपर्यंत त्यांनां निर्वाहाचें साधन आणि लोकांपुढें नांव गाजविण्याचें द्वार हीं सहज मिळतात.

या ' अक्कलवान ' ह्मणवून घेणाऱ्या लोकांनां शास्त्रीयसिद्धांत अथवा तात्त्विक उपपत्ति तेवढी कळते; पण त्यांनां वस्तूंचें किंवा पदार्थांचें

व्यावहारिक ज्ञान नसतें, असा मला अनुभव आहे. माझी पूर्वींच अशी खात्री झाली आहे, कीं, हे लोक जर दक्षिणेंत येऊन राहिले असते आणि मनुष्य व वस्तु यांच्याशीं संबंध घडवून आणणारें एकादें उपयुक्त काम त्यांनीं आस्थेनें सुरू केलें असतें, तर त्यांनां हें सर्व जग अगदीं निराळेंच दिसूं लागलें असतें. कदाचित् प्रथम त्यांनां परिस्थिति अगदीं वाईट दिसली असती; पण पुढें प्रत्यक्ष प्रगति होत असलेली दृष्टीला पडतांच, ते त्याच परिस्थितीविषयीं आशायुक्त आलोचन करूं लागले असते.

पण ते ज्या स्थितींत वाढले होते, तीमुळें ते एका निराळ्याच सृष्टींत जणूं काय राहिलेले होते. अन्याय दिसला, कीं, पुस्तकी तत्त्वां-बरहुकूम निषेध करीत सुटावयाचें आणि तत्त्वांचें अवलंबन करावयाचें, एवढेंच त्यांनां माहीत होतें. बोस्टन येथें 'फॅन्विल हॉल'मध्यें निषेध-प्रदर्शक सभा इतक्या कांहीं होऊं लागल्या, कीं, त्यांपासून शेवटीं लोकांनां त्रास होऊं लागला. ठरलेल्या विषयांचाच विचार करण्या-करितां या सभा भरल्या असत्या, तर इतकें कांहीं वाईट झालें नसतें; पण दक्षिणेंतील गोऱ्या लोकांनां आपले निषेध क्वचित्‌च ऐकूं जातात, आणि कदाचित् ऐकूं गेले तरी ते त्यांकडे बिलकूल लक्ष्य देत नाहींत, असें जेव्हां या 'अक्कलवान' लोकांनां आढळून आलें, तेव्हां त्यांनीं आपल्या शेजाऱ्यांवरच तुटून पडण्यास प्रारंभ केला. बोस्टनच्या लोकां-वर त्यांनीं हल्ला सुरू केला; कारण निग्रोच्या पक्षाविषयीं त्यांची आस्था नाहींशी झाली आहे, असें ते म्हणूं लागले. दुसऱ्या ठिकाणच्या निग्रोच्या मित्रांवर—विशेषतः निग्रोला मदत कशी करावी या मुद्द्या-विषयीं त्यांच्याहून भिन्न मत असलेल्या सर्वांवर—हल्ला केल्यावर त्यांनीं आपला सारा रोंख माझ्यावर वळविला. मीं वर निर्दिष्ट केलेल्या

कारणांशिवाय याचें दुसरें मुख्य कारण असें होतें, कीं, माझ्यावर निकराचा हल्ला केला, कीं, लोक आश्चर्यचकित होतील आणि साऱ्या लोकांचें लक्ष्य त्यांच्याकडे वळेल. वर्तमानपत्रांत हकीगती प्रसिद्ध झाल्या-शिवाय नुसत्या सभा भरविण्यांत आणि निषेध प्रदर्शित करण्यांत कांहीं समाधान नसतें. ज्याच्यावर त्यांनीं पुष्कळदां हल्ला केला, त्याला ते खरोखरीच आपण वर्णन केल्याइतका वाईट मनुष्य समजत, असें मला वाटत नाहीं. आपलें म्हणणें दूरवर ऐकूं जावें, इतक्याकरितांच ते कोणावर तरी तुटून पडतात. याप्रमाणें प्रसिद्धीला येण्याकरितां त्यांनीं आपलें काम नेटानें चालविल्यामुळें व त्यांत त्यांनां थोडेंबहुत यश आल्यामुळें, निग्रोजनसमूहांत माझे जितके कांहीं प्रतिपक्षी आहेत, त्यापेक्षां त्यांची संख्या बरीच मोठी असावी, असा साधारण लोकांचा ग्रह झालेला आहे.

कांहीं वर्षांमागें मी बोस्टन शहरांत असतां, माझ्या प्रतिपक्ष्यांविषयीं संभाषण चाललें होतें. त्या वेळीं या ‘ अक्कलवानां ’च्या कंपूंत नसलेल्या माझ्या एका नीग्रो मित्रानें दिलेलें उदाहरण अद्याप माझ्या लक्ष्यांत आहे. बोस्टनमध्यें तो कांहीं वर्षें राहिला होता, तरी तो मूळचा दक्षिणे-कडचा होता. आपण व्हर्जीनियामध्यें एका फ्याशनेबल हॉटेलापाशीं रहात होतों, असें त्यानें सांगितलें. एके दिवशीं त्याच्या मनांत एक मोठा विचार आला आणि तो हॉटेलाच्या मालकापाशीं गेला. एक तऱ्हेचें पक्वान्न करण्यासाठीं त्या वेळीं बेडकांची फार मागणी होती. खाणावळीच्या मालकापाशीं आपण नियमानें पुष्कळसे बेडूक पुरवूं, असा त्यानें करार केला. ‘पुष्कळसे ह्मणजे किती बेडूक आणून द्याल?’ असें त्या मालकानें विचारतां, आठवड्यांतून निदान एक खटाराभर तरी बेडूक खात्रीनें आणून देईन, असें माझ्या मित्रानें उत्तर दिलें.

शेवटीं हा सौदा जमला. दुसऱ्या दिवशीं मिळतील तितके बेडूक त्यानें हॉटेलांत आणून द्यावेत असें ठरलें.

नुसते सहाच बेडूक घेऊन दुसरे दिवशीं तो आला. मालकानें बेडकांकडे पाहिलें आणि तो त्याच्याकडे वळून ह्मणाला 'दुसरे बेडूक कोठें आहेत ?'

माझ्या मित्रानें उत्तर दिलें ' हें पहा, असें झालें, कीं, आज कित्येक महिने माझ्या घराजवळील डबक्यांत बेडूक ओरडतांना मीं ऐकिलें आहे. त्यांचा तो भयंकर आवाज ऐकून तेथें निदान लाखों बेडूक असावेत, असें मला वाटलें. पण शोध करतां, तेथें मला सारे सहाच बेडूक सांपडले !'

आपलें ह्मणणें लोकांनीं ऐकून घ्यावें आणि आपल्या तक्रारींकडे त्यांचें लक्ष्य लागावें, ह्मणून या लहान कंपूनें नानातऱ्हेनें ठिकठिकाणीं आपली चळवळ चालू ठेविली. १९०३ सालीं एका रात्रीं बोस्टनमध्यें त्यांनीं आपली पराकाष्ठा केली. आपल्या विशिष्टमतांत आपण किती खरे व खोल आहों, मतभेद असलेल्या सर्व लोकांशीं आपण कसे विरुद्ध आहों, याविषयीं लोकांची खात्री करण्यासाठीं त्यांनीं त्या दिवशीं बेसुमार वर्तन करण्याचें ठरविलें. बोस्टनच्या निग्रो लोकांनीं आपल्या एका मोठ्या देवालयांत व्याख्यान देण्यास मला सांगितलें होतें. ही सभा चांगली जाहीर केल्यामुळें बराच मोठा श्रोतृसमाज जमला होता. बोस्टनमधील माझ्या मित्रांनां कळूं न देतां या कंपूनें कांहीं बेशिस्त लोक जमविले आणि सभा मोडून टाकण्याचा प्रयत्न केला. या कंपूमध्यें न्यु इंग्लंड कॉलेजमधील बहुतेक ग्रॅजुएट होते. ॲमहर्स्ट कॉलेज व हारवर्ड लॉ स्कूल यांचे ग्रॅजुएट ऑनरेबल वुइल्यम एच्. लेविस हे त्या वेळीं अध्यक्ष होते. कंपूतील लोक देवालयांतील

निरनिराळ्या भागीं बसले होते. शिवाय, बोस्टनच्या अत्यंत दुराचाराच्या जागांत राहणारे कांहीं वाईट स्त्रीपुरुष सभेच्या कामीं विघ्न आणण्याकरितां त्यांनीं आणून बसविले होते. त्यांचा माथेफिरूपणा कोणत्या थराला गेला होता, हें या एकाच गोष्टीवरून चांगलें सिद्ध होतें.

मीं बोलण्यास सुरुवात करतांच, ठिकठिकाणीं बसलेले कंपूचे पुढारी लोक मला प्रश्न विचारूं लागले. या व दुसऱ्या अनेक मार्गांनीं मला त्यांनीं भाषण करूं दिलें नाहीं. यामुळें बाकीच्या श्रोतृगणाला साहजिकपणें राग आला. त्यांनां पोलिसांची मदत घेऊन दंगेखोरांनां पकडून ठेवावें लागलें.

दंगा शांत झाल्यावर, त्यांपैकीं पुष्कळ लोकांनां आपल्या कृत्याची लाज वाटली. 'अक्कलवानां'च्या कंपूंत सामील झालेल्या बऱ्याच लोकांनीं झालेल्या प्रकाराबद्दल आपली नापसंती दर्शविली. पूर्वीं उदासीन असणारे बरेच लोक माझे जिवलग स्नेही झाले. त्या कंपूच्या दोघां पुढाऱ्यांनां पुढें शिक्षा झाली व 'चार्ल्स स्ट्रीट' जेलमध्यें त्यांनां कांहीं दिवस काढावे लागले. पण त्यांनां पश्चात्ताप झाला नाहीं. एका महत्कार्याला बळी पडलेले वीर आपण आहों, अशी त्यांनीं आपली समजूत करून घेण्याचा प्रयत्न केला; पण त्यांनां इतर निग्रो लोकांकडून या बाबतींत विशेष उत्तेजन मिळालें नाहीं; कारण, कोणत्या कार्याला आपण बळी पडलों हेंच त्यांनां नीट सांगतां येईना.

बोस्टनमधील आणि अमेरिकेंतील निग्रोलोकांनीं सभा भरवून माझें समर्थन व दंगेखोरांचा निषेध करण्याचे ठराव पास केले. सर्व निग्रो वर्तमानपत्रांनीं दंगेखोरांविषयीं कडक टीका करून लेख लिहिले. पुढें कांहीं आठवडे मीं जागोजागीं जावें व तेथील लोकांनां व्याख्यानें द्यावीं, अशा आमंत्रणाचीं पुष्कळ पत्रें मला एकसारखीं येत होतीं.

या दंग्याचे परिणाम काय होतात, हें पाहण्याकडे माझें लक्ष्य लागलेलें होतें. इतर ठिकाणीं लागू पडणारें मानवी स्वभावाचें एक तत्त्व येथेंहि खरें होतें कीं नाहीं, हें मला पहावयाचें होतें.

निग्रो ज्ञातीशीं माझ्या व्यवहारांत मला असें आढळून आलें आहे, कीं,—सर्व ज्ञातींचाहि हाच प्रकार आहे अशी माझी खात्री आहे—लोकांनां एकत्र करण्याचा एकच मार्ग ह्मटला ह्मणजे विधायक व प्रागतिक कार्यक्रम हातीं घेणें हाच आहे. वादविवाद, टीका किंवा द्वेष यांनीं नव्हे, तर विधायक कामानेंच लोक वश होतात आणि एकाद्या सार्वजनिक कार्याच्या मदतीसाठीं एकत्र जमतात.

थोडे आठवडे गेले नाहींत, तोंच ' अक्कलवानां 'च्या पुढाऱ्यांचें आपसांत जुळेनासें झालें. नंतर ते आपसांत भांडूं लागले आणि एकामागून एक गळूं लागले. शेवटीं आतां तो कंपू मोडून नामशेष झाला आहे. पुष्कळ ' अक्कलवान ' लोक आतां परस्परांशीं भाषणहि करीत नाहींत.

या दंग्याविषयीं सर्वांत आश्चर्यकारक गोष्ट ह्मटली ह्मणजे ही होय, कीं, दक्षिणेंतील गोऱ्या लोकांनीं सार्वजनिक प्रश्नांवरील चर्चा बंद करविली आणि निग्रो लोकांनां भाषणस्वातंत्र्याचा हक्क दिला नाहीं, याबद्दल त्यांचा जोरानें निषेध करणाऱ्या लोकांनींच हा दंगा उपस्थित केला होता.

खरोखर, देशांतील प्रत्येक भागांत लोकांसमोर मीं भाषणें केलीं आहेत. उत्तरेंतील निग्रो श्रोतृवृंदासमोर, दक्षिणेंतील गोऱ्या श्रोतृसमाजासमोर, तसेंच दक्षिणेंतील दोन्ही ज्ञातींच्या लोकांसमोर मीं व्याख्यानें दिलेलीं आहेत. मला अंतःकरणापासून जें कांहीं वाटतें, तें सर्व मीं

सरळपणें व उघडपणें या सर्व व्याख्यानांत सांगितलेलें आहे. गोऱ्या लोकांविषयीं मला कांहीं सांगावयाचें असलें, तर तें गोऱ्या लोकांसमोर व काळ्या लोकांविषयीं मला कांहीं सांगावयाचें असलें, तर तें काळ्या लोकांसमोर मीं सांगितलेलें आहे. इतक्या वर्षांत मी हजर असलेल्या सभेला विघ्न आणून ती मोडून टाकण्याचा प्रयत्न केव्हांहि झालेला नाहीं. पण बोस्टन येथील माझ्याच ज्ञातीच्या ‘ अक्कलवान ’ लोकांकडून असा पहिला प्रयत्न झाला, हा एक चमत्कार होय.

हा प्रसंग अधिक विस्तारानें सांगण्याचें कारण असें आहे, कीं, आमच्या ज्ञातीच्या ‘अक्कलवान’ लोकांच्या मनाचे दोष या प्रसंगानें चांगले दृष्टोत्पत्तीला येतात, असें मला वाटतें.

या लोकांच्या अत्याचाराच्या व स्वैरपणाच्या मुळाशीं खऱ्या मनोविकाराची आणि केव्हांकेव्हां खऱ्या वीरवृत्तीची छटा किंवा भावना नसते, असा माझ्या विधानाचा अर्थ नाहीं. त्यांचा उत्साह व जोम हे गौण प्रश्नांवर व क्षुल्लक गोष्टींवर व्यर्थ खर्चिले जात आहेत, हीच काय ती दुःखाची गोष्ट आहे. विधायक व उपयुक्त कामांकडे त्यांचा विनियोग होत नाहीं. हे धर्मवीर (डॉन* क्विक्झोटप्रमाणें) पवनचक्कीशीं लढताहेत, असें मला वाटतें.

खरा प्रकार असा आहे, कीं, मीं मागें सुचविल्याप्रमाणें हे ‘अक्कलवान’ लोक भूतकालांतच फार राहतात, त्याविषयींच नेहमीं विवेचन करतात; ते पुस्तकांनां जाणतात, पण मनुष्यांनां जाणत नाहींत. उदाहरणार्थ—गुलामगिरीच्या प्रश्नाविषयीं त्यांनां पुष्कळ माहिती आहे, पण

---

*‘सरदार डॉन क्विक्झोट यांचीं शूर व साहसी कृत्यें’ या ग्रंथांत त्यांनीं पवनचक्कीशीं केलेल्या युद्धाचें वर्णन आहे. त्या प्रसंगाला अनुलक्षून हें विधान आहे.

निग्रोविषयीं त्यांनां जवळजवळ कांहींहि माहिती नाहीं—विशेषतः दक्षिणेंतील निग्रो लोकांच्या सांप्रतच्या खऱ्या गरजा काय आहेत, हें त्यांनां बिलकूल माहीत नाहीं.

एका व्यक्तीला दुसऱ्या व्यक्तीसाठीं करतां येण्याजोग्या कांहीं गोष्टी असतात; तसेंच एका ज्ञातीला दुसऱ्या ज्ञातीसाठीं करतां येण्याजोग्या कांहीं गोष्टी आहेत हें खरें आहे; पण, एकंदरींत प्रत्येक व्यक्तीनें आणि प्रत्येक ज्ञातीनें आपला उद्धार स्वतःच करून घेतला पाहिजे. येथें मी हें सांगतों, कीं, जर कोणत्याहि एका गोष्टीनें माझ्या ज्ञातीच्या लोकांवर विश्वास ठेवण्यास मला शिकविलें असेल, तर ती, त्यांची शिकण्याविषयीं तत्परता किंवा उत्सुकता आणि स्वतःच्या पायावर उभें कसें रहावें व स्वतःवर अवलंबून कसें असावें, याचें ज्ञान होतांच त्याप्रमाणें वागण्याची त्यांची प्रवृत्ति, ही होय.

## प्रकरण सहावें.

# पदवीदानसमारंभांतील कोबीवरील व्याख्यान.

[ कोणत्याहि राष्ट्राची उन्नति किंवा अवनति त्या राष्ट्रांतील शिक्षणपद्धतीवर अवलंबून असते. हा आर्य सिद्धान्त आतां जगांतील सर्व विचारी लोकांनां मान्य झाला आहे. यामुळेंच जागीं झालेलीं सर्व राष्ट्रें आपला सर्व मेंदू व बराच पैसा शिक्षण उत्तमोत्तम करण्याकडे खर्च करीत आहेत. ज्याला ह्मणून सामाजिक कार्य करावयाचें आहे अथवा राजकीय सामर्थ्य मिळवावयाचें आहे तो शिक्षणापासूनच सुरुवात करतो, व आपल्या कार्याला पोषक अशी शिक्षणपद्धति घालून देतो. शिक्षणाचा प्रश्न राष्ट्रीय नसून अखिल मानवजातीचा आहे खरा; परंतु मागसलेल्या निग्रोंनां किंवा एकाकाळीं जगाचें गुरुस्थान पटकावूनहि पुढें रसातळाला पडलेल्या आमच्या भारतीयांनां हा प्रश्न फारच महत्त्वाचा आहे. निग्रोंचा व आमचा भूतकाल भिन्न आहे आणि आमच्या मतें भविष्यहि भिन्न असणार, तरी वर्तमानकाळ व वर्तमानकाळच्या गरजा समान आहेत. तेव्हां निग्रोंच्या आजकालच्या शिक्षणविषयक प्रयत्नापासून काय बोध घ्यावा व कोणत्या बाबतींत व कोठपर्यंत त्यांचें अनुकरण करावें, याचा आह्मीं नीट विचार केला पाहिजे. वॉशिंग्टननें ह्मटल्याप्रमाणें निग्रोंनां उज्ज्वळ भूतकालाची स्फूर्ति नसली तरी त्याबरोबर जुन्या रूढींचें व समाजांत मुरलेल्या जीर्ण कल्पनांचें जोखडहि त्यांच्या मानेवर नाहीं. आमचें तसें नाहीं. इतर राष्ट्रांनां हेवा वाटण्याजोगी, अनन्यसाधारण संस्कृति आमच्यामध्यें होती. पण तिला पार बुजवून टाकणारे कुसंस्कारहि कांहीं कमी नाहींत. तसेंच महंमदी व ख्रिस्ती लोकांनींहि आमची दिशाभूल कांहीं कमी केली नाहीं. अशा स्थितींत आपणांला योग्य मार्ग ठरविणें व त्याबरहुकूम चालणें या बाबतींत अडथळे अनंत आहेत.

आजपर्यंत आह्मांला मिळत असलेल्या शिक्षणांतील दोष व आमच्या आधुनिक गरजा यांचा विचार करून आपली शिक्षणपद्धति ठरविण्यांत या प्रकरणाची बरीच मदत होईल. यांतील विवेचन जरी साधें दिसलें तरी फारच महत्त्वाचीं तत्त्वें यांत गोविलीं गेलीं आहेत.

सर्वांत पहिलें व मुख्य तत्त्व आणि शिक्षणाचें खरें ध्येय वॉशिंग्टनचे गुरु महात्मा आर्मस्ट्रांग यांनींच प्रथम लोकांपुढें मांडलें आहे. तिसऱ्या प्रकरणांत जिमहिल्नें आपल्या खेडवळ शब्दांत तेंच सूचित केलें आहे. शिक्षणाचा संबंध प्रत्यक्ष जीवनाशीं असला पाहिजे. आयुष्यांतील प्रत्येक काम—मग तें लहान असो वा मोठें असो—पूर्वीहून अधिक चांगल्या तऱ्हेनें करतां येण्याच्या कामीं शिक्षणापासून मदत झाली पाहिजे. स्वतःची व स्वतःच्या सभोंवतालच्या लोकांची स्थिति सुधारून त्यांचें जीवन अधिक सुखमय करण्याची पात्रता आणणारें शिक्षण तेंच खरें शिक्षण होय.

शिक्षणशास्त्रावर मोठमोठ्या विद्वानांनीं काय सांगितलें आहे, याचें ज्ञान असून किंवा त्याचें वर्गीकरण करतां येत असून उपयोगी नाहीं. या ज्ञानाचा प्रत्येक परिस्थितींत कसा उपयोग करून घ्यावा, हें नीट समजलें पाहिजे. तसेंच अनुभवानें निश्चित केलेल्या शिक्षणक्रमाच्या मुळाशीं कोणतीं तत्त्वें आहेत हें शोधून तीं तत्त्वें नवशिक्या शिक्षकांच्या मनांवर ठसवितां आलीं पाहिजेत. नाहींतर पुस्तकी ज्ञानाच्या ओझ्याखालींच शोधकबुद्धि व स्वतंत्र विचार पार चिरडून जावयाचे. व्यवहार उत्तम करतां यावा म्हणून शिक्षण देण्यांत येतें. तेव्हां अर्थात् शिक्षणाची व्यवहाराशीं फारकत करतां उपयोगी नाहीं. पण आमच्याकडे पहावें तर व्यवहार हा सुशिक्षित माणसाच्या विचाराचा विषयच नव्हे, अशी विचित्र कल्पना प्रचलित आहे. शिक्षणक्रमाशीं व्यवहाराची सांगड घातल्यास शिक्षणाचा शिष्टपणा नष्ट होतो, अशी बऱ्याच लोकांची भावना होऊन बसली आहे. श्रमोपजीवी लोकांनां आपण कमी लेखतों. पांढरपेशा लोकांनां श्रमांची व सामान्य व्यवहाराची लाज वाटते, ती इतकी, कीं, ते परोपजीवी होतील पण श्रमोपजीवी होणार नाहींत.

शेतकीचें किंवा उद्योगधंद्यांचें शिक्षण घेणारे लोक देखील ठराविक क्रमाच्या बाहेर जात नाहींत. घरीं शेती करून, घर बांधून किंवा अशींच कामें करून आपलें ज्ञान पक्कें व व्यवहारोपयोगी करण्याची देखील कोणी तसदी घेत नाहीं. जगांतील वस्तु ग्रंथांच्या डोळ्यांनीं न पाहतां प्रत्यक्ष अनुभवानें पाहून व प्रत्येक काम आपल्या हातानें करून त्याविषयींचें ज्ञान प्राप्त करून घेणें हेंच खरें ज्ञान किंवा शिक्षण होय. ‘ परस्वाधीन जिणें व पुस्तकी विद्या ’ म्हणून जी आपल्यांत म्हण आहे ती अगदीं खरी आहे. वॉशिंग्टननें बसविलेली भूगोल शिकविण्याची पद्धत आमचे शिक्षक लक्ष्यांत घेतील तर फार बरें होईल. मात्र त्यांतहि किंडर-

गार्टनचा ( वस्तुपाठाचा ) फार्स होऊं न देण्याची सावधगिरी ठेवावी. गुणी कारागिराच्या हाताखालीं प्रत्यक्ष काम करून कला शिकलेले लोक आपल्या धंद्यांत वाकबगार कां असतात, याचें कारण या दृष्टीनें पाहिल्यास आमच्या लक्ष्यांत सहज येईल.

इतिहास, अर्थशास्त्र, साहित्यशास्त्र इत्यादि विषय शिकूं नयेत, असें आमचें म्हणणें नाहीं. परंतु आपल्या सभोंवारच्या वस्तू व परिस्थिति यांचें यथार्थ व सूक्ष्म ज्ञान करून जी चोख व्यवहारी दृष्टि प्राप्त होईल तिच्याच अनुरोधानें इतर शास्त्रांचा अभ्यास केला पाहिजे. पुसट, अस्पष्ट ज्ञान मोहक व काव्यमय वाटतें, पण तें फलप्रद मुळींच नसतें. असलें कुचकामाचें ज्ञान फक्त चित्तभ्रमणाला कारण होतें व पोकळ डौल माजवितें. लोकांत नसलेलें अतएव विलक्षण ज्ञान संपादून लोकांनां चकित केल्यानें दोन दिवस वाहवा होईल; पण त्यानें कोणाचेंच कल्याण होणार नाहीं. सर्व लोकांनां सामान्यपणें उपयोगी पडेल असेंच शिक्षण चांगलें. शाळेच्या वार्षिक निबंधांत गंधर्वनगरीचें वर्णन करण्यांत आपल्या कल्पनाशक्तीचें वैभव दाखविण्यापेक्षां आपण शिकलेल्या धंद्याची माहिती व तीहि पारिभाषिक शब्दावडंबरांत न घालतां साध्या व सहज समजेल अशा भाषेंत सांगून त्यांतच आपलें व्याकरणाचें, भाषाशैलीचें, गणिताचें, रसायनशास्त्राचें, कृषीचें, यंत्रशास्त्राचें वगैरे वगैरे निरनिराळ्या शास्त्रांचें ज्ञान व्यक्त करणारा विद्यार्थी जगांत यश मिळवून आपलें नांव वर काढील किंवा नाहीं, अशी शंका देखील नको.

बहुजनाच्या उपयोगीं पडून जनार्दनाला वश करावें, हा धर्मशास्त्राचा व नीतिशास्त्राचा उपदेश देखील अशाच मनुष्याला अमलांत आणणें शक्य आहे. आळसावर वेदान्ताचें पांघरूण घालणाऱ्या मनुष्याला स्वतःचेंच हित करतां येत नाहीं, मग तो समाजहित तें काय करणार?

अशा प्रकारें कर्तबगार व वाकबगार लोक तयार करून त्यांनां सकलजनांस शहाणे करून सोडण्याच्या मोहिमेवर सोडले ह्मणजे हां हां ह्मणतां सभोंवतालचा सर्व प्रदेश सुशिक्षित, संपन्न व सुखी होतो. मेकॉन परगण्यांतील 'उगवता तारा' या संस्थेची हकीगत या तत्त्वाची उत्तम साक्ष देते.

शिक्षणक्रम असा असला पाहिजे, कीं, त्यापासून होणारे फायदे मुलांच्या, पालकांच्या व शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या डोळ्यांत एकदम भरले पाहिजेत; ह्मणजे

लोक आपण होऊन असल्या संस्थेचे पुरस्कर्ते व साहाय्यक होतात. प्रत्यक्ष काम व त्याचे परिणाम यासारखी उत्तम जाहिरात नाहीं. ]

कोणत्याहि नव्या राष्ट्राला किंवा ज्ञातीला एक विशेष सोय (फायदे-शीर गोष्ट ) असते. (गुलामगिरींतून अलीकडेच मुक्त झालेले अमेरिकेंतील निग्रो पुष्कळ अंशीं असे नवीन आहेत, ह्मणजे आपल्या जीवनाला त्यांनीं नव्यानेंच प्रारंभ केला आहे. ) ती सोय ही, कीं, इतर लोकांनां केव्हांकेव्हां त्यांची परंपरा जशी प्रतिबंधक होते, तशी नवीन ज्ञातीला परंपरेपासून कांहीं विरोध होण्याची भीति नसते. उदाहरणार्थ, शिक्षणाच्या बाबतींत परंपरा दक्षिणेंतील निग्रोलोकांच्या आड येत नाहीं; कारण सांगण्यासारखी अशी कोणतीहि परंपराच त्यांनां नाहीं. पसंत वाटल्यास अत्यंत आधुनिक व सुधारलेल्या शिक्षणपद्धती एकदम अमलांत आणण्यास आमच्या ज्ञातीच्या लोकांनां पूर्ण मुभा आहे. कारण, कोणत्याहि जीर्ण परंपरेनें आह्मी बद्ध नाहीं आणि नवीन व चांगल्या पद्धती सुरू करण्यापूर्वीं त्याज्य अशा शिक्षणविषयक वाईट रूढी आह्मांला सोडून देत बसण्याचें विशेषसें कारणच नाहीं.

शिक्षणशास्त्राचा मीं केव्हांच अभ्यास केला नाहीं हें कधींकधीं मी एक माझें भाग्यच समजतों. मीं त्या शास्त्राचा अभ्यास केला असता तर कोणतीहि गोष्ट नव्या रीतीनें सुरू करण्यापूर्वीं मला मागील सर्व परंपरेचा विचार करावा लागला असता आणि त्यांत माझा इतका कांहीं काल गेला असता, कीं, माझ्या हातून कांहींएक झालें नसतें. पण माझ्या सांप्रतच्या स्थितींत एकादी गोष्ट पूर्वीं कोणीं केली आहे कीं नाहीं, याचा कांहीं विचार न करतां चालू घटकेला जर ती आवश्यक असली, तर ती बिनदिक्कत करण्याला व पुढें पाऊल टाकण्याला मला पूर्ण मोकळीक आहे.

ग्रंथाबाहेरील एकाद्या बिकट प्रश्नाशीं गांठ पडली असतां पुस्तकी विद्येनें एकाद्या मनुष्याचा कसा घोंटाळा उडतो, हें नीट समजण्यासाठीं मी हारवर्डच्या एका तरुण ग्रॅजुएटाचें उदाहरण देतों. हा तरुण गृहस्थ टस्कगी येथें कांहीं वर्षांपूर्वीं शिक्षक होता. त्याला शिक्षक या नात्यानें फारच थोडा अनुभव होता. पण कॉलेजांत असतांना त्यानें अध्यापनशास्त्राचा विशेष अभ्यास केला होता. त्याच्या या विद्वत्तेमुळेंच टस्कगी येथें त्याला अध्यापनशास्त्राच्या शिक्षकाची जागा मुद्दाम देण्यांत आली होती.

हा शिक्षक येईपर्यंत आह्मांला टस्कगी येथें अध्यापनशास्त्राचें फारच थोडें ज्ञान होतें असें म्हटलें तरी चालेल. पण त्यानें तें ज्ञान आह्मांला देण्याचा उपक्रम केला. [1]कामेनियस, [2]रूसो, [3]पेस्टालाझी व इतर शिक्षणशास्त्रज्ञ यांच्याविषयीं त्यानें आह्मांला पुष्कळ माहिती सांगितली व व्याख्यानें दिलीं. त्यानें सांगितलेली माहिती फार मनोरंजक असे यांत शंका नाहीं; पण मुख्य अडचण ही होती, कीं, त्याला आपले वर्ग नीट शिकवितां येत नसत. इतक्यानेंच भागलें नाहीं. आमच्या विद्यार्थ्यांनां खेड्यापाड्यांत शिक्षकांचें काम करतां यावें ह्मणून आह्मी खटपट करीत होतों. ' विद्यार्थ्यांच्या उपयोगी पडून त्यांनां आपणाकडून कांहीं मदत व्हावी असें असेल, तर खेड्यापाड्यांतील लोकांच्या परिस्थितीचें निरीक्षण व एकाद्या लहान निग्रो शेतकरी समाजाच्या

---

१ जर्मनशिक्षणशास्त्रज्ञ १५९२–१६७१.

२ फ्रेंच शिक्षणशास्त्रज्ञ आणि ग्रंथकार (१७१२–१७७८). शिक्षण या विषयावरील " Emile " नांवाचा यांचा ग्रंथ वाचनीय आहे.

३ स्विस शिक्षणशास्त्रज्ञ (१७४६–१८२७). रूसोच्या " एमिली" ग्रंथाच्या वाचनानें यांनां व इतर पुष्कळांनां स्फूर्ति उत्पन्न झाली. यांनींहि शिक्षण या विषयावर बरेच सुंदर ग्रंथ लिहिले आहेत.

खऱ्या प्रश्नांचें तुह्मीं प्रत्यक्ष ज्ञान करून घेण्याची जरूरी आहे,' असें आह्मीं त्याला सांगितलें. पण त्याला या गोष्टीचें कांहींच महत्त्व वाटलें नाहीं. कारण, प्रत्येक गोष्टीचीं तत्त्वें एकच आहेत, तीं लागू करणें हेंच अगत्याचें आहे, असें त्यानें सांगितलें.

यावर, शेतकरी वर्गांचे प्रश्न सोडविण्यासाठीं टस्कगी येथें आह्मीं कांहीं विशिष्ट पद्धती चालू केलेल्या आहेत, असें मीं त्याला सांगितलें, आणि ह्मटलें, कीं, तुह्मांला जर सामान्य तत्त्वें शिकवायाचीं असतील, तर त्या तत्त्वांनां अनुसरून आमच्या पद्धतींची तुह्मी यथायोग्य उपपत्ति लावा, ह्मणजे विद्यार्थी व शिक्षक यांनां आपण कोणत्या तत्त्वांवर हल्लीं प्रत्यक्ष काम करीत आहों, हें सहज समजून येईल. त्यानें माझ्या या सूचनेकडेहि कांहीं लक्ष्य दिलें नाहीं. शिक्षणासारख्या विषयांत कांहीं नवीन गोष्टी शिकण्यासाठीं अलाबामाच्या कृष्णकटिबंधांत एकाद्यानें येणें ही कल्पना त्याला मूर्खपणाची वाटली. थोडक्यांत सांगावयाचें ह्मणजे, शिक्षणाच्या इतर पद्धतींचें ज्ञान व परंपरा यांचें त्याच्या मनावर एवढें दडपण पडलेलें होतें, कीं, त्या परंपरेला सोडून दुसऱ्या कोणत्याहि शिक्षणपद्धतींत कांहींच तथ्य त्याला दिसत नसे. आह्मीं चालू केलेल्या पद्धतींत त्याला कांहीं नवीन किंवा विलक्षण असें आढळलें ह्मणजे त्या पद्धती चुकीच्या किंवा अपायकारक आहेत, असें त्याला खरोखर वाटे.

मला वाटतें, कीं, माझा स्वतःचा प्रथमचा अनुभव इतर बहुतेक शिक्षकांसारखाच होता. पुस्तकांत सांगितलेल्या व आजुबाजूला प्रचारांत असलेल्या शिक्षणपद्धती मीं सहज उचलल्या. पुस्तकांत काय लिहिलें आहे तें विद्यार्थ्यांनां शिकवावें आणि तें नंतर त्यांच्याकडून तोंडपाठ ह्मणवून घ्यावें अशीच माझी पद्धत होती,

या जुन्या पद्धतींतील चूक व निरुपयोगीपणा हीं माझ्या नजरेला आलीं, ती वेळ मी कधींहि विसरणार नाहीं. त्या वेळीं वेस्ट व्हर्जीनियामध्यें माझ्या जुन्या घरानजीक असलेल्या एका गांवठी शाळेंत मी शिकवीत होतों. शाळेची इमारत एका सुंदर पाणथळीच्या प्रदेशांत होती. जून महिन्यांत एके दिवशीं तर ऊन फार कडक व रखरखीत होतें. सुटीचा तास जवळ येऊं लागतांच, शाळेंतील कोंदट व उबट हवेंतून बाहेरील मोकळ्या हवेंत जाण्याला विद्यार्थ्यांप्रमाणें मीहि उत्सुक झालों होतों. त्या दिवशीं सुटीचा तास मीं नेहमींपेक्षां दुप्पट वाढविला.

सुटीच्या पूर्वींच्या तासांत भूगोलासारख्या गचाळ विषयाकडे मुलांचें लक्ष्य लागावें, ह्मणून मी व्यर्थ खटपट करीत होतों. नीरस व कंटाळवाणे प्रश्न, सरोवरें, भूशिरें, द्वीपकल्पें व बेटें इत्यादिकांच्या व्याख्या मी विद्यार्थ्यांनां विचारीत होतों. मुलांचीं उत्तरें प्रश्नांप्रमाणेंच स्वाभाविकरीत्या नीरस व कंटाळवाणीं होतीं हें सांगणें नलगे.

सुटी होतांच मुलें शाळेबाहेर पडलीं; तीं सारीं जणूं काय एकाच अंत:प्रेरणेमुळें त्या दलदलीच्या प्रदेशाकडेच धांवत गेलीं. थोड्या सेकंदांत ते पाण्यांतून चालूं लागले आणि सुवासिक गवतावर नाचूंबागडूं लागले. शाळेंतील भूगोलाचा रुक्ष व कंटाळवाणा तास कोठें व ही मौज कोठें ! त्या सर्वांचा उत्साह पाहून माझ्याहि अंगांत तसेंच वारें शिरलें आणि थोड्याच मिनिटांत मीहि त्यांच्यामागून धांवूं लागलों व मोकळ्या हवेचा आनंद मनमुराद सेवन करूं लागलों.

भूगोलविषय व शालागृह सोडून बाहेर गेल्यावर थोडा वेळ झाला नाहीं तोंच, शाळेंत आपले धडे पाठ ह्मणून दाखविण्यांत अत्यंत मंद असणारा एक मुलगा एक प्रकारच्या शोधक मंडळीचा मुख्य बनला,

त्याच्या नेतृत्वाखालीं आम्ही सहल करीत जात असतां आम्हांला वाटेंत अनेक बेटें, भूशिरें, द्वीपकल्पें, उपसागर व सरोवरें आढळलीं. प्रवाह मोठा असता तर मोठमोठ्या जहाजांनां या बेटांत व उपसागरांत चांगल्या बंदरांचा आसरा मिळाला असता, असेंहि कांहीं विद्यार्थ्यांनीं सांगितलें. लवकरच प्रत्येक विद्यार्थी जमिनीचे व पाण्याचे स्वाभाविक भाग दाखविण्यांत गुंग होऊन गेला. पुढें कांहीं वेळानें आह्मीं लांकडाचे व झाडांच्या सालीचे तुकडे मिळविले आणि ते प्रवाहांत सोडून दिले आणि ते जगांतील एका भागापासून दुसऱ्या भागाला माल नेआण करणारीं मोठीं जहाजें आहेत अशी आह्मीं कल्पना केली. सपाट प्रदेशावर प्रवाह कसा वाहत जातो, प्रवाहाबरोबर खालीं वाहत जाणाऱ्या मातीच्या व रेतीच्या कणांनीं भाटी ( सैकतक) आणि बंदरें कशीं तयार होतात हें आह्मीं नीट पाहिलें. या बंदरांवर आह्मीं काल्पनिक शहरांची स्थापना केली आणि मोठमोठे कारखाने सुरू करण्यासाठीं जलशक्तींचा ( धबधब्यांचा ) तपास चालविला.

लवकरच आम्हीं शालागृहांतील धडे पुनः नकळत सुरू केले आणि नूतन पद्धतीनें भूगोलाचें अध्ययन करूं लागलों, हें लवकरच माझ्या लक्ष्यांत येऊन चुकलें. पण या वेळीं आह्मांला आमच्या अध्ययनांत खरा आनंद व खरी गोडी मिळाली, आणि मला तर असें वाटतें, कीं, शिक्षक व विद्यार्थी हे उभयतां इतक्या थोड्या अवधींत पुष्कळ भूगोल शिकले. शालागृहांत याच मुदतींत इतका विषय त्यांनां पुढेंमागें केव्हांहि शिकतां आला नसता.

पुस्तकांच्या द्वारें वस्तूचा अभ्यास, व पुस्तकांशिवाय खुद्द वस्तूंचाच अभ्यास यांमधील खरा भेद माझ्या लक्ष्यांत या वेळीं प्रथम आला. शालागृहांत पुष्कळ दिवस भूगोलाचा अभ्यास करून जें कांहीं ज्ञान मुलांनां

झालें असतें त्यापेक्षां पृथ्वीच्या स्वाभाविक भागांविषयीं किती तरी अधिक व स्पष्ट कल्पना त्यांनां या सुटींत मिळाल्या. खरोखर पाहतां भूशिरें, उपसागर, बेटें यांचीं नांवें, स्थळें व व्याख्या तें शिकले नाहींत, पण याहून अधिक महत्त्वाची गोष्ट ह्मटली म्हणजे, भूशिरें, बेटें आणि द्वीपकल्पें यांची योग्य कल्पना करण्यास ते शिकले. या वेळेपासून पुढें केव्हांहि जमिनीचे व पाण्याचे भाग ओळखून काढण्यास त्यांनां अडचण पडली नाहीं आणि हे भाग ओळखून काढण्याचे प्रसंग आले असतां, ते हें काम मोठ्या मौजेनें व आनंदानें करीत.

शिक्षक या नात्यानें मला मिळालेला हा पहिला अनुभव मी कधींहि विसरलों नाहीं. प्रत्यक्ष वस्तूंचें निरीक्षण, पृथक्करण व तुलना करण्याला विद्यार्थ्यांनां तयार करणें, शाळेंत व वर्गाच्या पुस्तकांत शिकलेल्या गोष्टींचा उपयोग करण्याला त्यांनां शिकविणें, आणि नीट निरीक्षण व स्वतंत्र विचार करून प्रपंचांतील परिस्थितीशीं व वस्तूंशीं योग्य व्यवहार करण्याला त्यांनां समर्थ करणें किती महत्त्वाचें आहे हें शिक्षकांच्या मनांत ठसविण्याची कोणतीहि संधि टस्कगी संस्थेंत काम करीत असतांना मीं वांया जाऊं दिली नाहीं.

कांहीं दिवसांपूर्वीं मी टस्कगी येथील एका नवीन शिक्षकाचा वर्ग पहाण्याला गेलों. शिक्षक वर्गाला मोजमाप शिकवीत होता. वर्गांतील प्रत्येक विद्यार्थ्यानें मोजणीचीं कोष्टकें तोंडपाठ करावीं असा त्या शिक्षकाचा आग्रह होता, आणि मी गेल्या वेळीं फूट, यार्ड, एकर, गिल, पिंट, कार्टर्स, औंस, पौंड इत्यादिकांचा पाठ विद्यार्थी एकसारखे गाण्याच्या सुरावर घोकीत होते. मीं हा सर्व प्रकार कांहीं मिनिटें पाहिला. नंतर माझ्या मनांत एक खुबीदार विचार आला आणि माझ्याकडे तो वर्ग देण्याला मीं त्या शिक्षकाला सांगितलें. आपल्या वर्गाची खोली कोणीं

कधीं तरी मोजली आहे काय? असा प्रश्न मीं प्रथम केला. कोणींहि उत्तर दिलें नाहीं. सर्व अगदीं स्तब्ध राहिले. नंतर प्रत्यक्ष जमिनीचा एकादा एकर कोणीं मोजून पाहिला आहे काय, एक गिलभर पाणी मापून पाहिलें आहे काय, किंवा एक औंस अगर पौंड साखर वजन करून पाहिली आहे काय, असा प्रश्न करतांच कोणींहि आपला हात वर उचलला नाहीं.

नंतर, हा वर्ग मी कांहीं दिवस घेतों, असें मीं त्या शिक्षकाला सांगितलें. आठवडा संपण्याच्या आंत प्रत्येक विद्यार्थ्याला एकादा रूल किंवा दुसरें एकादें माप मीं घ्यावयाला लाविलें. माझ्या देखरेखीखालीं विद्यार्थ्यांनीं वर्गाची खोली मोजून पाहिली आणि तिच्या भिंतींनां रंग देण्याला काय खर्च येईल, हेंहि ठरविलें.

शेतांत एका बाजूला विद्यार्थी रताळीं लावीत होते, तिकडे आम्ही नंतर गेलों. लगेच आम्हीं रताळीं लावलेली एक एकर जमीन मोजिली. या एकरांत किती बुशेल रताळीं येतील, त्यांनां खर्च काय येईल व फायदा किती होईल, याचा आह्मीं हिशेब केला.

आठवडा संपण्याच्या आधीं मीं विद्यार्थ्यांनां भोजनगृहांत नेलें. तेथें त्यांनीं साखर प्रत्यक्ष स्वतः वजन करून पाहिली. तेथील व्यवस्थापकाकडून रोज किती साखर खर्च होते, याविषयीं बरेच मजेदार आंकडे मिळविले. नंतर प्रत्येक विद्यार्थ्याला किती साखर लागते हें आम्हीं ठरविलें. नंतर पुनः आम्हीं शेतांत जाऊन एक जीवंत डुकर तोलून पाहिला आणि त्या दिवशीं शिकागोंत नव्हे, तर अलाबामांत डुकराच्या मांसाचा दर काय होता, याचा विद्यार्थ्यांकडूनच शोध घेवविला. एकाद्या काल्पनिक डुकराची किंवा शिकागोंतील डुकराची नव्हे तर त्यांनीं स्वतः

तोलून पाहिलेल्या डुकराची टस्कगीच्या मार्केटांत काय किंमत येईल हें मीं त्यांच्याकडून अजमावून घेतलें. हे सर्व हिशेब करण्याला बराच वेळ लागला; पण त्यापासून बराच फायदा झाला असें मला वाटतें. शिवाय यांत मला मौज वाटली. विद्यार्थ्यांनां तर ती अतिशय गम्मत झाली. ओघानेंच तो शिक्षकहि जागा झाला आणि कधींहि न विसरण्याजोगा धडा शिकला.

हल्लीं पाठशाळेच्या (पुस्तकी विद्येच्या) वर्गांतील सर्व शिक्षकांनां, उद्योग-धंद्याच्या वर्गांतील मुलें जीं कामें करीत असतात त्यांचा काळजीपूर्वक अभ्यास करावा लागतो. उदाहरणार्थ, बहुतेक दररोज एकादा गणिताचा वर्ग शिक्षकांच्या देखरेखीखालीं एकाद्या शिल्पशाळेंत, डेअरींत किंवा शेतांत गणिताचे प्रश्न किंवा उदाहरणें प्रत्यक्ष सोडविण्यासाठीं जातो. इंग्लिश क्लासांतील विद्यार्थ्यांनां एकाद्या धंद्याची साद्यंत कृति पाहण्या-साठीं किंवा संस्थेच्या एकाद्या शिल्पशाळेंतील प्रयोगाचें निरीक्षण करण्यासाठीं मुद्दाम पाठवितात आणि वर्गांतील इतर विद्यार्थ्यांच्या फायद्या-साठीं त्या धंद्याचें किंवा प्रयोगाचें वर्णन त्यांनां लिहावयाला सांग-तात. वरील उदाहरणांमध्यें रिपोर्टांच्या ह्मणजे वर्णनाच्या भाषेकडे नव्हे तर त्यांतील विधानें बरोबर व स्पष्ट केलेलीं आहेत किंवा नाहींत, या गोष्टीकडे विशेष लक्ष्य दिलें जातें. ज्या गोष्टींशीं दुसऱ्या कांहीं विद्यार्थ्यांचा व्यावहारिक संबंध आहे अशा गोष्टींविषयींच हे रिपोर्ट असतात. त्यामुळें त्यांतील कांहीं विधानें बरोबर नसलीं, तर वर्गांतील कोणी तरी तज्ज्ञ विद्यार्थी उठून टीका करून चुकीचीं विधानें तात्काळ दुरुस्त करतो. रिपोर्ट तयार करणाऱ्या विद्यार्थ्याला प्रत्यक्ष गोष्टीविषयीं आपण लिहीत आहों, अशी जाणीव असते आणि त्यामुळें तो आपली जबाबदारी ओळखून रिपोर्टांतील विधानें करतो. एकाद्या सर्वसंग्रह

ग्रंथांतील गोष्टी किंवा ऐकींव माहिती ग्रथित करून रिपोर्ट लिहिणाऱ्या विद्यार्थ्याला अशी जबाबदारी केव्हांहि वाटणार नाहीं, हें उघड आहे.

पुस्तकांपेक्षां वस्तूंचाच अभ्यास करणें हें अधिक महत्त्वाचें आहे, असें मीं जोरानें प्रतिपादन केलें आहे. ह्मणून इतिहास, वाङ्मय किंवा इतर ललितकला यांच्या अभ्यासाला मी कमी लेखतों, असें मात्र कोणीं समजूं नये. तथापि मला असें वाटतें, कीं, तरुण स्त्रीपुरुषांनीं आपल्या भोंवतालच्या वस्तूंविषयीं योग्य व निश्चित कल्पना म्हणजे चांगलें ज्ञान करून घेणें फार महत्त्वाचें आहे. कारण या ज्ञानाच्यायोगेंच त्यांनां आपला व्यावहारिक संबंध नसलेल्या अशा दूरच्या गोष्टींचें मोजमाप व विवरण करतां येणार आहे. तरुण अननुभवी मनुष्यांनां, अनिश्चित, अप्रत्यक्ष व गुह्य अशा गोष्टीं-विषयींच घातुक मोह असतो, असें दिसतें.

निग्रोलोकांनां स्वातंत्र्य मिळाल्यावर आरंभींआरंभीं शिक्षण म्हणजे एक अजब चीज होती. शाळेला जाणाऱ्या मुलाची साहजिक महत्त्वाकांक्षा म्हणजे शाळेंत शिकलेल्या नवीन व विलक्षण गोष्टींनीं घरच्या वृद्ध मंडळीला आनंदभरित व आश्चर्यचकित करून सोडण्यासाठीं परत घरीं येणें हीच होती. आपल्या आईबापांनां न समजणाऱ्या अशा परकी भाषेंत त्याला कांहीं चार शब्द बोलतां आले किंवा विलक्षण व गुह्य लिपींत लिहिलेल्या पुस्तकांतील कांहीं थोडीं वाक्यें वाचतां आलीं ह्मणजे त्यांनां याविषयीं फार अभिमान व आनंद वाटे. यासाठीं शिक्षणाविषयींची प्रत्येक गोष्ट गुह्य व अलौकिक स्थितींत ठेवण्याच्या मोहाला शाळा व शिक्षक नेहमीं बळी पडत. अगदीं नकळत त्यांनीं विद्यार्थ्यांच्या मनांत असा ग्रह उत्पन्न केला, कीं, शिक्षणाच्या विशिष्ट पद्धतींतून व सांच्यां-तून निघालेल्या मुलांमुलींनां व इतर लोकांनां, अगम्य अशा एका तऱ्हेच्या

गुह्य ज्ञानाची दीक्षा मिळते. यासारखीच दुसरी अशी एक कल्पना प्रचलित होती, कीं, एकादा मनुष्य शिक्षणाच्या विशिष्ट सांच्यांतून पार पडला म्हणजे तो कांहीं तरी अकल्पित रीतीनें जगांतील इतर लोकांहून श्रेष्ठ होतो व तो मागील प्रकरणांत वर्णिलेल्या 'अक्कलवान' लोकांच्या वर्गांत किंवा तशाच दुसऱ्या एकाद्या संकुचित वर्गांत मोडतो.

वरील कल्पनांचा सर्वसाधारण स्वीकार करण्यापेक्षां विद्यार्थ्यांच्या यशाला व शिक्षणाच्या कार्याला अधिक विघातक अशी दुसरी गोष्ट नाहीं, असें मला वाटतें. आपल्या मुलांनां अशा तऱ्हेचें शिक्षण द्यावें असें काळ्या किंवा गोऱ्या लोकांनां परिणामीं वाटणार नाहीं आणि असें शिक्षण देणाऱ्या शाळांनां ते मदतहि करणार नाहींत.

शिक्षणाच्या किंवा तत्संबंधीं दुसऱ्या कोणत्याहि बाबतींत यश मिळविण्याचा सर्वांत खात्रीचा उपाय ह्मटला ह्मणजे सामान्य व परिचित अशा वस्तूंनां ( ज्यांचा पुष्कळ लोकांशीं अधिक काल संबंध येतो अशा वस्तूंनांच ) बिलगून राहणें हाच आहे, असें माझ्या अनुभवानें मला शिकविलेलें आहे.

शिक्षण गवतासारखें मुबलक,आणि उन्हापावसाप्रमाणें फुकट मिळावें, अशी माझी इच्छा आहे.

प्रत्येकाला शिक्षणाच्या संधी किंवा सवलती देण्याचा मार्ग ह्मटला ह्मणजे त्याला जरूर असलेल्या गोष्टी शिकविणें, हा होय. उदाहरणार्थ, अन्न पैदा कसें करावें व तें तयार करून कसें वाढावें, याचें ज्ञान करून देण्याच्या उद्देशानें जर एकाद्या शाळेंत कांहीं शिकविण्यांत आलें, तर ती शाळा लोकांनां पसंत व प्रिय होईल. याचें कारण स्पष्ट आहे. प्रत्येक मानवी प्राण्याचा दिवसांतून कांहीं वेळां अन्नाशीं संबंध येतो आणि

अन्नाच्या पैदासींत व विक्रींतहि समाजांतील अधिकांश लोकांचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष संबंध असतोच.

थोड्या दिवसांपूर्वी एका गरीब स्थितीच्या समाजांतील हायस्कुलच्या वर्षअखेरच्या कार्यक्रमाला मी हजर होतों. पदवीधरांच्या भाषणांचा सर्वसाधारण विषय 'यूरोपची काल्पनिक सफर' हा होता. अर्थात् श्रोतृवृंद कंटाळून गेला आणि त्यांपैकीं बरेच लोक झोंपी गेले, यांत मला कांहींच आश्चर्य वाटलें नाहीं. खरोखर पाहतां, भाषण करणाऱ्या एकाद्या विद्यार्थ्याचे आईबाप कधींकाळीं यूरोपला गेले होते किंवा पुढेंमागें लवकरच तेथें जाण्याची त्यांनां संधि मिळेल, असें मला वाटत नाहीं. सर्वांनां आवडेल असा हा विषय मुळींच नव्हता. याचा त्यांच्या व्यावहारिक हितसंबंधाशीं कांहीं संबंध नव्हता. अमेरिकेंतील एकाद्या साधारण कुटुंबाला बराच काल यूरोपांत फिरतां येणें शक्य नाहीं. याशिवाय ग्रॅज्युएटांपैकीं कोणीहि यूरोपला गेलेले नव्हते. अर्थात् प्रत्यक्ष ज्ञान असलेल्या अशा गोष्टीविषयीं ते बोलत किंवा लिहीत नव्हते.

कांहीं वर्षांपूर्वी आमच्या वक्तृत्वाचा व पदवीदानसमारंभांचा प्रत्यक्ष वस्तूंशीं संबंध घडून यावा ह्मणून प्रत्यक्ष ज्ञान असलेल्या विषयांवरच विद्यार्थ्यांनीं निबंध लिहून व वाचून दाखविण्याचा प्रयोग आम्हीं करून पाहिला. खरोखर पाहतां, पदवीदानसमारंभांत अशा तऱ्हेनें सुधारणा करण्यांत टस्कगी हीच पहिली संस्था होय, असें मला वाटतें.

नेहमींचा प्रकार असा आहे, कीं, बहुतेक हायस्कुलांत वर्षअखेरच्या समारंभांत ग्रॅजुएट व्यासपीठावर उभे रहातात आणि त्यांनां कांहीं अनुभव नसला तरी आयुष्यांत यशस्वी कसें व्हावें, याविषयीं आपल्याहून वडील माणसांनां उपदेश करीत सुटतात! टस्कगी येथें ३७(आतां ४०)

धंदे शिकविले जातात आणि हजार एकर जमिनीची लागवड केली जाते. यामुळें आमच्या विद्यार्थ्यांनां इतर सर्वसाधारण शिक्षणाशिवाय एकाद्या उपयुक्त धंद्याचें चांगलें ज्ञानहि मिळतें. ह्मणून श्रोतृवृंदाला उपयुक्त व परिचित अशा गोष्टींविषयीं त्यांनां आपल्या निबंधांत पुष्कळ सांगतां येतें.

' आल्प्स्पर्वताच्या पलीकडे इटली देश आहे, ' अशा एकाद्या विषयावर मुलानें किंवा मुलीनें निबंध वाचण्याऐवजीं, छपर कसें बांधावें, पनीर कशी तयार करावी, कृत्रिम उष्णतेच्या उपकरणांनीं अंडीं उबवून कोंबडींचीं पिलें कशीं बाहेर काढावीं इत्यादि विषय श्रोत्यांनां सप्रयोग समजून देण्याला आम्ही आमच्या विद्यार्थ्यांनां सांगतों. ' दुखापत झालेल्यांनां तावडतोब उपचार कसे करावे,' याविषयीं माहिती आमच्या ' नर्सींस ट्रेनिंग स्कूल 'मधील एकादी पदवीधर स्त्री कदाचित् सांगेल. डेअरीचें काम शिकणारी मुलगी आपण काय शिकलों आहें, हें सांगेल, इतकेंच नव्हे,तर आधुनिक डेअरीच्या सर्व कामाच्या पद्धती कशा असतात, हें ती व्यासपीठावर सप्रयोग दाखवील.

' आपण नेकीनें कां वागावें, ' या विषयावर एकाद्या मुलाला भाषण करूं देण्याच्या ऐवजीं, डुकरांचें अन्न, त्यांचे रोग व आजारीपणांत त्यांचें संगोपन याविषयीं तो काय शिकला आहे हें आम्ही त्याला सांगावयाला लावितों. अशा वेळीं डुकरांचें संगोपन कसें करावें, हें नीट समजावून सांगण्यासाठीं विद्यार्थी व्यासपीठावर डुकर आणील आणि आपले मुद्दे स्पष्ट करून सांगेल.

. गेल्या मे महिन्यामध्यें आमच्या एका विद्यार्थ्यानें पदवीदानसमारंभांतील व्याख्यानांत, आपण एक एकर जमिनींत कोबीची लागवड कशी



टस्कगी येथील दुग्धशालेंत दुधाची परीक्षा चालली आहे.



टस्कगी इन्स्टिटयूटमधील छापखान्याच्या एका भागाचा देखावा.

केली. याची माहिती सांगितली. त्याच्या हाताशींच व्यासपीठावर कांहीं अत्युत्तम व अतिशय मोठ्या अशा कोबीच्या गड्ड्यांचा ढीग व्यवस्थित रचिलेला होता. आपण बीं कोठून व कसें मिळविलें, हें त्यानें सांगितलें. जमीन नांगरून आपण ती कशी तयार केली व पेरिली, कोणतें खत घातलें, याचें त्यानें वर्णन दिलें आणि या सर्व कामाला काय खर्च आला हेंहि त्यानें शेवटीं सांगितलें. साधारणपणें सोप्या अशा या प्रयोगाच्या हकीगतींत या विद्यार्थ्यानें निबंधलेखन, व्याकरण, रसायनशास्त्र व शेतकी या विषयांतील आपल्या बहुतेक ज्ञानाचा उपयोग केला होता; इतकेंच नव्हे तर श्रोतृवृंदांत असणाऱ्या बहुतेक आसपासच्या निग्रो शेतकऱ्यांनां त्यांनां परिचित व प्रिय असलेल्या विषयावर त्यानें बरीच उपयुक्त व व्यवहारोपयोगी माहितीहि सांगितली. शेवटीं, सर्वांत थोरला एक मोठा कोबीचा गड्डा त्यानें वर उचलून सर्व श्रोत्यांनां दाखविला. तेव्हां सर्वांनीं टाळ्यांच्या गजरानें सानंद त्याचा जयजयकार केला. पदवीदानसमारंभांत कोबीसारखा विषय मनोरंजक करतां येणार नाहीं. असें मानणारा कोणी असेल तर त्यानें त्या वेळचा टाळ्यांचा गजर व जयजयकार अवश्य ऐकावयास पाहिजे होता, असें मला वाटतें. लॅटिन ग्रंथाचें पान जितकें मनोरंजक, अद्भुत आणि गूढ असतें. तितकेंच कोबीचें पानहि असतें. लॅटिन ग्रंथांतून जितके उन्नतिकारक, दृष्टि व्यापक करणारे व अभिरुचि संस्कृत करणारे संस्कार शिकतां येतात, तितकेच कोबीपासूनहि शिकतां येतात; आणि या दोहोंत भेद असा आहे, कीं, एकाद्या निग्रो मुलाला लॅटिन ग्रंथांतील एकाद्या पानाचा अर्थ सांगतां आला, तर त्यापासून जगांत (लोकांमध्यें) कांहीं फरक होणार नाहीं व त्याचा कांहीं फायदा नाहीं; पण उलटपक्षीं एकाद्या निग्रो मुलाचें लक्ष्य व विचार कोबीच्या पैदासीसारख्या विषयाकडे लाविलें जातांच तो एक

नवीन पद्धत सुरू करतो, आणि ही पद्धत जर पुढें तशीच एकसारखी चालू राहील तर तो सरतेशेवटीं दक्षिणेंतील सारीच परिस्थिति बदलून टाकील, यांत संशय नाहीं.

औद्योगिक शिक्षण हें शिक्षणाचा जीवनक्रमाशीं संबंध जोडणारें एक साधन आहे, असें मीं येथपर्यंत सांगितलें. पण एकादा मुलगा शाळेंत रंधा वापरावयाला, किंवा कृषिविषयक रसायनशास्त्र कांहींसें शिकला, ह्मणजे तेवढ्यानेंच आपल्या आसपासच्या लोकांच्या राहाणीवर त्याला ताबा मिळवितां येतो असें नाहीं. आपल्या भोंवतालची परिस्थिति बदलण्यांत व तींत सुधारणा करण्यांत आपल्या ज्ञानाचा व शिक्षणाचा उपयोग करण्यालाहि त्यानें शिकलें पाहिजे.

शिक्षणाचा खऱ्या वस्तूंशीं संबंध जोडण्याचे प्रसंग अगदीं हाता-पाशीं आले असतांहि कांहीं शिक्षकांनीं त्यांचा उपयोग करून न घेतां ते तसेच वांया जाऊं दिले, अशीं मनोवेधक आणि गमतीचीं पुष्कळ उदाहरणें माझ्या प्रवासांत मला आढळून आलेलीं आहेत. औद्योगिक शिक्षणाचा किंवा हातकामाचा एक वर्ग असलेली एक प्रसिद्ध शाळा मी थोडे दिवसांपूर्वीं पहावयाला गेल्याचें मला स्मरतें. त्या शाळेच्या अधिकाऱ्यांनीं आपल्या औद्योगिक शाखेविषयीं बरीच बढाई मारलेली होती. या औद्योगिक शिक्षणाच्या वर्गाच्या समोरच कांहीं अंतरावर एका विटांच्या इमारतीचें बांधकाम चाललेलें माझ्या दृष्टीला पडलें. हात-कामाच्या वर्गांत शिकविलें जाणारें शिल्पशास्त्राचें प्रत्येक तत्त्व येथें प्रत्यक्ष उपयोगांत आणलें जात होतें. असें असूनहि चौकशीअंतीं मला कळलें, कीं, हातकामाच्या वर्गांतील शिक्षण आणि समोर चाललेलें बांधकाम यांचा संबंध जोडण्याचा तेथील शिक्षकानें कांहीं प्रयत्न केला नव्हता. या इमारतीचें काम करण्याची संधि विद्यार्थ्यांनां मिळाली नव्हती; शिक्षका-

सहित त्यांनीं ती इमारत पाहिली नव्हती आणि बांधकाम चाललें असतांना उद्भवणाऱ्या प्रत्यक्ष प्रश्नांचा विचार करण्याचा त्यांनीं कांहीं प्रयत्न केला नव्हता. वर्गांत दिलें जाणारें शिक्षण आणि संस्थेच्या कारखान्यांत किंवा संस्थेबाहेर चाललेलें इमारतीचें बांधकाम यांचा कोणत्याहि प्रकारचा संबंध त्यांच्या वांट्याला आला नव्हता. माझ्या मतें त्यांना वर्गांत एकाद्या इंग्रजी वाक्याच्या स्पष्टीकरणासारखें किंवा लॅटिन क्रियापदाच्या उच्चारासारखें नुसतें औपचारिक शिक्षण मिळत होतें.

वेस्ट व्हर्जीनियाच्या खेडेगांवच्या शाळेंतील माझ्या या अनुभवानें मला प्रथम असें शिकविलें, कीं, ग्रंथाशिवाय शिक्षण देणें आणि त्याचा खऱ्या वस्तूंशीं संबंध जोडणें शक्य आहे. पुढें आलेल्या अनुभवानें मी असें शिकलों कीं,शिक्षणाला शालागृहांतच कोंडून न ठेवितां तें बाहेर काढून शेतांमध्यें, घरांमध्यें आणि शाळेच्या आसपास राहणाऱ्या लोकांच्या दैनिक राहणीमध्यें नेणें फार महत्त्वाचें आहे.

टस्कगी संस्थेची एक अत्यंत महत्त्वाची चळवळ ह्मणजे जिला आह्मी संस्थेबाहेरील चळवळ ( Extension work ) असें ह्मणतों, ती होय. या चळवळीला संस्थेचीं सर्व खातीं साहाय्य करतात. खरोखर हल्लीं संस्थेच्या दुसऱ्या कोणत्याहि कार्यापेक्षां या बाहेरच्या चळवळीकडेच लोकांचें अधिक लक्ष्य लागलेलें आहे व त्या दिशेनेंच अधिक प्रयत्न नेटानें व उत्साहानें होत आहेत.

संस्थेबाहेरील या चळवळीच्या सर्व शाखांचें किंवा कामाचें सांगोपांग वर्णन करणें अशक्य आहे. मला विशेष सांगावयाचें हें आहे, कीं. या चळवळींत आह्मी, जुन्या पद्धतीप्रमाणें ज्याला शिक्षण म्हणतात. तें देण्यापेक्षां परिस्थिति सुधारण्याचाच अधिक प्रयत्न करतों.

शाळेच्या आसपासच्या प्रदेशांतील शेतकीच्या पद्धती सुधारण्याचे, शेतकरी वर्गाची घरची राहाणी बदलून ती उत्तरोत्तर चांगली करण्याचे आणि मेकन परगण्यासाठींच नव्हे, तर संस्थानांतील इतर परगण्यांसाठींहि एक नमुनेदार शिक्षणपद्धति स्थापन करण्याचे प्रयत्न आह्मी करीत आहों.

शिक्षणाचा जीविताशीं संबंध असावा, या माझ्या विधानाचा अर्थ आह्मीं मेकन परगण्यांत स्थापन केलेल्या एका नमुनेदार शेतकी शाळेचें वर्णन देऊन मला अधिक स्पष्ट करितां येईल. आमच्या परगण्यांत पुष्कळ नमुनेदार शाळा आहेत हें खरें. सुमारें पन्नास समाजांत अलि-कडे चारपांच वर्षांत नवीन शालागृहें बांधलेलीं आहेत आणि शाळांचें काम आठ ते नऊ महिने चालू ठेवण्याची व्यवस्था केलेली आहे. टस्कगी संस्थेच्या प्रेरणेमुळें आणि देखरेखीखालीं निग्रो शेतकऱ्यांनीं दिलेल्या वर्गण्यांच्या मदतीवर हें सर्व काम चाललें आहे.

मीं ज्या शाळेचें वर्णन देण्याचें मनांत योजिलें आहे, तिला ‘रायझिंग स्टार’ (उगवता तारा) असें ह्मणतात. हेंच नांव काळ्या लोकांनीं आपल्या देवालयालाहि दिलें आहे, आणि त्या देवालयाच्या आसपास राहणाऱ्या लहान शेतकरीसमाजाला हेंच नांव प्राप्त झालें आहे. ‘रायझिंग स्टार’ समाजामध्यें बरेच मेहनती, काटकसरी व यशस्वी निग्रो शेतकरी आहेत. यांपैकीं बहुतेकांच्या स्वतःच्या जमिनी आहेत. या समाजांत विशेष पैसा नाहीं; पण तशीच कंगालीहि फारशी नाहीं. अलाबामांत काम सुरू केल्यावर मीं या समाजाची ओळख करून घेतली. तेव्हां त्यांचें देवालय एका पडित शेतांत जुन्या मोडक्या इमारतींत होतें. मनुष्यांच्या आत्म्यांचें तारण करण्याचें काम जेथें चालत होतें, अशी ती इमारत अत्यंत वाईट स्थितींत होती. शेतें, शेतांतील घरें आणि शाळा यांची स्थिति देवालयासारखीच होती.

उपाध्यायाचीहि स्थिति पण तशीच. तोहि टेकीस येऊन उतरत्या कळेला लागला होता. त्याचा उपदेश ऐकावयाला मी रविवारीं दुपारीं नेहमीं जात असें. त्याचें निरुपण सुमारें दीड तास चाले. त्यान्या धर्मसमाजांतील एकाद्या पुरुषाच्या, स्त्रियेच्या किंवा मुलाच्या हिताचें एकादें तरी त्याच्या तोंडचें वाक्य केव्हांनाकेव्हां तरी ऐकावयास सांपडेल. या आशेनें मी त्याचीं निरुपणें किती तरी आठवडे काळजीपूर्वक ऐकत होतों. पण माझी नेहमीं निराशाच होई. दोनतीन हजार वर्षांपूर्वी घडलेल्या गोष्टींविषयीं, किंवा स्वर्गांतील सुखें व नरकांतील दुःखें याविषयींच बहुतेक त्याचीं व्याख्यानें असावयाचीं.

देवालयाच्या जवळच, दुसऱ्या एका जीर्ण शेतांत रंग किंवा व्हाईटवाश ( सफेती ) यांचा कधींहि स्पर्श न झालेली एक मोडकीतोडकी घाणेरडी इमारत होती. हीच त्या लोकांची शाळा. शिक्षकाची व उपाध्यायाची जोडी फारच नामी होती. शाळेंत पन्नाससाठ मुलें होतीं. उपाध्यायाच्या निरुपणाप्रमाणें शाळेंतील शिक्षणाचा समाजाच्या स्थितीशीं बिलकुल संबंध नव्हता. या लहानशा निग्रोसमाजाच्या कमकुवतपणामुळें व दारिद्र्यामुळें मला हवी होती ती संधि मिळाली. समाजाची स्थिति सुधारण्याचे प्रयत्न करील, अशी नमुनेदार शाळा तेथें स्थापण्याचा प्रयोग करून पाहावें असें मीं ठरविलें. या प्रयोगाची सविस्तर हकीगत मला येथें देतां येत नाहीं. पण हल्लींची तेथील परिस्थिति मी थोडक्यांत सांगतों.

मीं वर सांगितलेल्या जुन्या इमारतीच्या जागीं आतां तेथें एक सोयीस्कर, पांच खोल्या असलेलें घर आहे. आसपासच्या श्रीमंत व सुखवस्तु शेतकऱ्यांच्या घरांसारखें तें बांधलेलें असून दिसण्यांत तें तसेंच दिसतें. या घराला बाग, तबेला, पडव्या इत्यादि असून तेथें दोन शिक्षक—एक

गृहस्थ व त्याची पत्नी हीं राहतात, आणि शिकवितात. घरांतील सर्व खोल्या, बाग, तबेला इत्यादिकांचा उपयोग विद्यार्थ्यांनां त्या प्रांतांतील शेतकऱ्यांचीं साधारण गृहकृत्यें शिकविण्याकडे वेळोवेळां केला जातो. येथें मुलें बिछाना करण्यास व दिवाणखाना झाडूनलोटून स्वच्छ ठेवण्यास शिकतात. दुपारीं विद्यार्थी स्वयंपाकघरांत जाऊन स्वयंपाक करण्यास व भोजनशाळेंत जाऊन मेज व्यवस्थित ठेवून शेतकऱ्यांचीं पानें मांडण्यास शिकतात. घरासमोरील फुलझाडांची काळजी विद्यार्थीच घेतात. तेथील जमिनीला अनुकूल व समाजाच्या गरजानुरूप अशाच भाज्या बागेंत लाविलेल्या असतात, आणि विद्यार्थी व शिक्षक त्यांची काळजी घेतात. गोठ्यांत एक गाय असते, तशींच जवळच खुराड्यांत कोंबडीं, व डुकरखान्यांत डुकरें असतात, गोठा डुकरखाना व खुराडें हीं स्वच्छ व सुरेख कशीं ठेवावीं हें विद्यार्थ्यांनां शिकविण्यांत येतें.

पाठशाळेंतील नेहमींचे अभ्यास दिवाणखान्यांत शिकविले जातात. फरक काय तो इतकाच, कीं, घर, बाग व शेतें इत्यादि ठिकाणीं चाललेल्या कामांविषयींच गणिताचे प्रश्न किंवा उदाहरणें असतात. इंग्रजी निबंध शक्य तितके समाजाच्या दैनिक राहाणीच्या गोष्टींविषयींच असतात. नेहमींच्या क्रमिक वाचनपुस्तकांशिवाय आसपासचे शेतकरी व शाळा यांच्या हितार्थ टस्कगी येथें काढलेलें एक शेतकी वर्तमानपत्र वाचण्यांत विद्यार्थी आठवड्यांतून कांहीं काळ घालवितात.

या शाळेंत येणाऱ्या मुलांच्या आईबापांवर या शिक्षणाचा झालेला परिणाम पाहणें मोठें फायदेशीर आहे. आपलीं डुकरें, कापूस व धान्यें यांची किंमत काय येते, हें सांगण्यास आपलीं मुलें या शाळेंत शिकत आहेत, हें पाहून जुन्या शिक्षणपद्धतीच्या परिणामाविषयीं निराश झालेल्या आईबापांनां या शाळेंत कांहीं तथ्य आहे असें वाटूं लागलें.

'आपले पोषाक शिवून दुरुस्त करण्याकरितां शाळेंत नेतों,' असें मुली जेव्हां आपल्या आयांनां सांगू लागल्या, तेव्हां शाळेविषयीं निराळीच कल्पना त्या आयांच्या मनांत येऊं लागली. पुढें जेव्हां शाळेंत मुलींनां साधे कपडे शिवण्याचें काम शिकविण्यांत आलें, तेव्हां त्या अधिक उत्सुक व आस्थेवाईक झाल्या आणि आयांच्या सभांनां हजर राहूं लागल्या. लवकरच शाळा व तेथील शिक्षक यांविषयींच नव्हे, तर तेथें शिकविल्या जाणाऱ्या गृहस्थितीच्या सुधारणेबद्दल त्या समाजांत खरा उत्साह दिसून येऊं लागला. सफेती करून घरें अगदीं स्वच्छ राखावीं अशी एक मोहीम शिक्षकांनीं विद्यार्थ्यांमार्फत सुरू करविली. सफेतीचा केव्हांहि संपर्क नसलेलीं घरें सुंदर व सुरेख दिसूं लागलीं. सर्वांत मोठा फायदा हा झाला, कीं, ही शाळा व यासारख्या दुसऱ्या शाळा यांच्या प्रेरणेनें या समाजाची व परगण्यांतील इतर समाजांची राहणी व स्वभाव फार सुधारला.

अल्पावधींत 'रायझिंग स्टार' समाजाच्या भौतिक, शिक्षणविषयक, नैतिक व धार्मिक परिस्थितींत एक लहानशी क्रांतिच झाली आहे, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. शाळेचा परिणाम उपाध्यायावर व देवालयावरहि झालेला आहे. अलिकडे त्या देवालयांत मी एकदां गेलों होतों. हा प्रसंग मी लवकर विसरणार नाहीं. या वेळीं "The Earth is full of Thy riches" ( बहुरत्ना वसुंधरा ) हा विषय निरुपणासाठीं उपाध्यायानें घेतला होता, आणि शेतांत स्वतः उत्पन्न केलेलें दोन बुशेल उत्तम धान्य त्यानें व्यासपीठावर ठेविलें होतें. विषयाचें निरुपण करतांना योग्य कालीं त्यानें आपण स्वतः पेरलेलें धान्य अभिमानानें दाखविलें आणि 'बहुरत्ना वसुंधरा' या शास्त्रवचनाचा खरा अर्थ त्यानें सांगितला. हा अर्थ पूर्वीं त्याला चांगलासा अवगत नव्हता.

मीं वर सांगितलेल्या शिक्षणाचा संबंध गोऱ्या आणि काळ्या लोकांच्या जीविताशीं सारखाच येतो. जमीन विकत घेण्यास आणि शेतकीच्या पद्धति सुधारण्यास निग्रो शेतकऱ्यांनां उत्तेजन दिल्यामुळें लहान लहान जमीनदारांची संख्या वाढली आहे, आणि त्याबरोबरच जमिनीचा महसूलहि वाढला आहे. गुलामगिरी बंद झाल्यापासून अलिकडे या चारपांच वर्षांतच निग्रो जमीनदारांची संख्या मेकन परगण्यांत बरीच वाढलेली आहे, असें तपासाअंतीं समजतें. पांच वर्षांपूर्वीं जी जमीन एकरी दोनतीन डालर या भावानें मिळत असे, तिचा दर आतां एकरी पंधरावीस डालर इतका वाढला आहे. परगण्यांतील कांहीं ठिकाणीं मोठमोठ्या जमिनींचे तुकडे पाडून ते निग्रो शेतकऱ्यांनां विकलेले आहेत. बर्मिंगहाम येथील 'कलर्ड स्टेट टीचर्स असोशिएशन'च्या वार्षिक बैठकींत मेकन परगण्यांतील एका शिक्षकिणीनें कळविलें, कीं, गेल्या वर्षीं आपण एक शेतकऱ्यांचा क्लब स्थापन केला आणि या क्लबामार्फत सहाशें एकर जमीन आपल्या समाजांत खरेदी करण्यांत आली.

शाळेची टर्म वाढविण्यासाठीं निग्रो शेतकऱ्यांचे प्रयत्न आणि शालागृहें बांधण्यांत व तीं सामग्रींनीं किंवा उपकरणांनीं सजविण्यांत निरनिराळ्या समाजांत चाललेली प्रतिस्पर्धा यांनीं निग्रो लोकांनां आपल्या समाजांच्या सर्व हितकारक गोष्टींविषयीं विचार करावयास लाविलें आहे. उदाहरणार्थ, प्रतिबंधक कायद्यांच्या अंमलबजावणीला मदत करण्यासाठीं मेकन परगणाभर 'लॉ लीग' व 'आर्डर लीग' नांवाच्या संस्था ठिकठिकाणीं स्थापन झाल्या आहेत. हल्लीं मद्याविषयींचे प्रतिबंधक कायदे आमच्या परगण्यांत जसे पाळले जातात, तसे संस्थानच्या दुसऱ्या परगण्यांत पाळले जात असतील, असें मला वाटत नाहीं. गेल्या ज्यूरीच्या बैठकीसमोर सर्व तऱ्हेचे मिळून फक्त सतराच

गुन्हे चौकशीकरितां आले. पुढील बैठकींत सर्वांत कमी खटले येतील, असें सांगतात. निग्रोंची लोकसंख्या इतकी अधिक, पण गुन्हेगारांची संख्या इतकी कमी असलेला असा दुसरा परगणा संस्थानांत नाहीं, अशी माझी खातरी आहे.

हळुहळू पण नकळत, वर्षानुवर्षें मेकन परगण्यांतच नव्हे, तर थोड्याबहुत अंशीं अलाबामाच्या व दक्षिणेच्या भागांत शिक्षणाचें काम एकसारखें चाललें आहे व परिस्थिति सावकाश बदलत आहे. मीं वर्णन केलेल्या शिक्षणाच्या योगें शेतांतील पिकांच्या उत्पन्नाचा खर्च कमी झालेला आहे आणि त्याबरोबरच शेतकऱ्यांच्या गरजा एकसारख्या वाढत चाललेल्या आहेत; आणि अधिक धन कमावण्यास शिक्षणानें त्यांनां एक कारणहि दिलें आहे. अर्थात् त्यांची राहणी सुधारून त्यांच्या गरजा वाढविल्या आहेत व वाढल्या गरजा भागविण्यास धनोत्पादन करण्यास त्यांनां प्रोत्साहन दिलें आहे.

बागांची लागवड करावयाला, डुकरें व कोंबडीं पाळण्याला आणि होतां होईल तों, आपणास लागणारें अन्न व चारा स्वत: उत्पन्न करावयाला शेतकरी शिकलेले आहेत. त्यामुळें त्यांच्या हातून आतां पूर्वींपेक्षां दुप्पट काम होत आहे. पूर्वींच्या परिस्थितींत वर्षांतून दीडशें दिवसांपेक्षां अधिक काम निग्रो शेतकऱ्याला करतां येत नसे. पूर्वीं फक्त त्याला कापूस पेरावा व गोळा करावा लागे. अर्थात् तेव्हां त्याला अधिक काम करण्याची जरूरी नव्हती.

स्वत:ला लागणारे जिन्नस स्वत: पैदा करण्यास शिकल्यामुळें, निग्रो शेतकरी आतां पूर्वींप्रमाणें सावकारांवर किंवा पेढीवाल्यांवर अवलंबून राहत नाहीं. पूर्वींच्या पद्धतीप्रमाणें दुकानदाराकडून स्वत:ला लागणारे

जिन्नस तो उधार आणी. कापसाचें पीक हातीं येईपर्यंत त्याला जिन्नस पुरविण्यासाठीं दुकानदार आपल्या गांवांतील पेढीवाल्यांकडून कर्ज काढी. हे पेढीवाले मोठ्या शहरांतील सावकारांकडून कर्जाऊ रकमा आणीत, आणि हे सावकार उत्तरेंतील सावकारांकडून पैसा आणीत. पैसा एका हातांतून दुसऱ्या हातांत जाण्याच्या प्रत्येक खेपेला धनको ऋणकोकडून व्याज घेई. शेवटीं, निग्रो शेतकरी आपलें काम बरोबर करतो किंवा नाहीं याविषयीं त्याचेवर देखरेख ठेवण्याचा खर्च ह्मणून दुकानदार व्याजांत कांहीं रकम मिळवी आणि ही सर्व फुगलेली रकम शेवटीं शेतकऱ्याकडून वसूल केली जाई !

स्वतःला लागणारे सर्व किंवा बहुतेक जिन्नस स्वतः पैदा करण्या इतका जो शेतकरी स्वतंत्र झाला, त्याच्या सावकाराला किंवा दुकानदाराला पिकासंबंधीं देखरेख करण्याची कांहीं जरूरी राहत नसे. हल्लीं मेकन परगण्यांतील बहुतेक शेतकरी स्वतः व्यांकांतून पैसा आणून जिनसा रोख खरेदी करितात. व्यांकवाल्याचें मुद्दल व ठेवी आतां बऱ्याच वाढलेल्या असल्यामुळें त्यांनां शेतकीच्या कामाला मदत देण्यासाठीं बाहेरून कर्जाऊ रकमा आणाव्या लागत नाहींत.

शिक्षणाचा हा सर्व प्रत्यक्ष परिणाम आहे असें माझें ह्मणणें नाहीं. आह्मीं सुरू केलेल्या, वर सांगितलेल्या शिक्षणपद्धतीचा समाजाच्या सर्व हितसंबंधांशीं कसा निकट संबंध येतो, एवढेंच मी स्पष्टपणें दाखवूं इच्छितों.

वर सांगितल्याप्रमाणें शिक्षणपद्धतीच्या परिणामांचें सर्व कार्य एवढ्यावर संपलें असें मात्र कोणीं समजूं नये. घडून आलेल्या परिणामांचा फिरून शाळांवर सुपरिणाम होत आहे. टस्कगी येथें काम सुरू केल्यापासून आमचा प्रश्न दुहेरी होता, असें मला दिसून आलें,

प्रथम, निग्रो जनसमूहाच्या गरजा भागविणारी शिक्षणपद्धति आह्मांला तयार करावयाची होती. दुसरें, शिक्षणापासून निग्रोंचा फायदा होईल, असें गोऱ्या लोकांनां पटवून द्यावयाचें होतें.

शिक्षणानें ज्ञातीचा फायदा झाला आहे किंवा होईल असें न वाटणारे पुष्कळ खरे व प्रामाणिक लोक आजला दक्षिणेंत आहेत. या लोकांची सहानुभूति व मदत मिळविल्याशिवाय दक्षिणेंतील निग्रो शिक्षण केव्हांहि पूर्ण यशस्वी होणार नाहीं. कोऱ्या लढवून किंवा वादविवादानें अशा लोकांची खात्री पटणार नाहीं. त्यांनां फळ किंवा कार्यच दाखविलें पाहिजे.

मेकन परगण्यांतील लोक या बाबतींत अपवादात्मक नाहींत. कांहीं वर्षांपूर्वीं या परगण्यांतील बहुतेक गोऱ्या लोकांची वृत्ति उदासीन होती. पण आज मेकन परगण्यांतील नऊदशांश लोकांचा निग्रो शिक्षणावर विश्वास आहे, असें मला वाटतें.

या गोऱ्या लोकांची बदललेली वृत्ति कशी व कोणत्या मार्गांनीं व्यक्त होत आहे, हें मी सांगतों. प्रथम एकादी शाळा बांधावयाची असली, किंवा समाजांत कांहीं सुधारणा करावयाच्या असल्या, तर त्या समाजांत राहणारा गोरा मनुष्य त्या कामीं वर्गणी देतो. मेकन परगण्यांतील एका गोऱ्या मनुष्यानें अशी एक शाळा बांधण्याकरितां नुकतेच शंभर डालर दिले. कांहीं वर्षांपूर्वीं निग्रो शिक्षणाविषयीं उदासीन असलेले गोरे शेतकरी आतां आपल्या शेतांवर काम करणाऱ्या निग्रोंनां वार्षिक बक्षिसें देतात. एका एकर जमिनींत सर्वांत अधिक बुशेल धान्य उत्पन्न करणाऱ्या निग्रो शेतकऱ्याला वार्षिक बक्षीस देणारा एक गोरा मळेवाला मला माहीत आहे. वर्षांतून अधिक दिवस आपलीं मुलें शाळेंत ठेवणाऱ्या निग्रो कुटुंबांनां तो दुसरें एक बक्षीस

देतो. आपल्या घरासमोरील अंगण उत्तम स्थितींत ठेवणाऱ्या बाईला तो एक बक्षीस देत असतो.

एका ठराविक जमिनीच्या तुकड्यावर उत्तम ‘ ओट ’ धान्य पैदा करणाऱ्या निग्रो शेतकऱ्याकरितां मेकन *परगण्यांतील* एका पेढीवाल्यानें एक वार्षिक बक्षीस ठेविलें आहे. परगण्यांतील एका वर्तमानपत्राच्या संपादकानें स्पेलिंग क्लास उत्तम असलेल्या शाळेला एक वार्षिक बक्षीस ठेविलें आहे. मेकन परगण्यांतील निग्रो शेतकऱ्यांच्या जत्रेच्या वेळीं सर्व शाळांमध्यें याविषयीं सामना होत असतो. या जत्रेंत शाळेच्या जमिनींत मुलांनीं उत्पन्न केलेलीं धान्यें व वनस्पती ( भाज्या ) यांचीं प्रदर्शनें भरत असतात. परगण्यांतील सार्वजनिक शाळांतील मुलांनीं तयार केलेलीं सूपशास्त्राचीं कामें व शिवणकामें यांचींहि प्रदर्शनें वेळोवेळीं होत असतात. या प्रदर्शनांत उत्तम धान्यें व पिकें पैदा करणाऱ्यांला गोरे व्यापारी आणि शेतकरी बक्षिसें देतात.

मीं वर सांगितल्याप्रमाणें निग्रोंनां सुधारलेल्या पद्धतीनें शिक्षण देण्याचे सुपरिणाम अलाबामा संस्थानांत व दक्षिणेंत हळुहळू दृष्टोत्पत्तीला येत आहेत. खरोखर समाजाला जरूर असलेल्या वस्तू तयार करण्याचें प्रत्यक्ष शिक्षण मुलांमुलींनां जेथें मिळतें, त्या शाळेला त्या समाजांतील लोकांची—मग ते गोरे असोत अगर काळे असोत—सहानुभूति व मदत मिळाल्यावांचून रहात नाहीं. याच मार्गानें शिक्षणाचे पुरस्कर्ते ज्ञातिविषयक प्रश्न सोडवूं शकतात व सोडवितात असें माझें ठाम मत आहे.*

---

* हें प्रकरण जनरल आर्मस्ट्रांगच्या ‘ Real life makes real men ’ (‘अकृत्रिम जीवनानें खरें पौरुष प्राप्त होतें’ ) या शिक्षणसूत्रावर, त्यांचे शिष्य डॉ० बुकर टी. वाशिंग्टन यांची विस्तृत टीकाच आहे असें वाटतें.

प्रकरण सातवें.

# कर्नल रुझवेल्ट आणि त्यांच्यापासून मी काय शिकलों ?

[ सरकारी नोकरीचा मोह सामान्य लोकांनां फार असतो विशेषतः जित लोकांनां व मागसलेल्या जातींनां वरिष्ठ लोकांप्रमाणें सरकारी हुद्दा आपणांस केव्हां मिळेल असें होऊन जातें. एखाद्या कारकुनाची अगर पट्टेवाल्याची नोकरी झाली तरी ती सरकारी नोकरी! अंमलदारी ! प्रत्यक्ष स्वर्गपदच तें !! सरकारी नोकरीचा हा मोह प्रथम प्रथम सर्वच निग्रोंनां असे. पण हळुहळू त्यांनां कळूं लागलें आहे, कीं, खासगी धंद्यांत पडून स्वतःचें व आपल्या समाजाचें अधिक कल्याण करतां येतें, व आपली प्राप्तिहि कांहीं कमी होत नाहीं. पोस्टमास्तर कॉक्स याची गोष्ट नीट ध्यानांत ठेवल्यास पुरुषार्थी लोक सरकारी चाकरीच्या मागें खचित लागणार नाहींत. सरकारी नोकरीत शिरल्याबरोबर चांगल्या लोकांचेहि डोळे फिरतात आणि सदाचारी लोकांनांहि बुद्धिभ्रंश होतो, ही गोष्ट वाशिंग्टनच्या देशाविषयीं जितकी खरी आहे, तितकीच ती आमच्या देशाविषयीं खरी आहे. अपवाद ह्मणून वाशिंग्टननें आपल्या दोस्ताचें—राष्ट्राध्यक्ष रुझवेल्टचें उदाहरण दिलें आहे. ‘ योग्य दिसेल तें करावयाचें व जसें कर्तबगारीनें तसेंच शीलानें उत्तम असतील असेच लोक हुद्याच्या जागीं नेमावयाचे आणि मग निंदास्तुतीला मुळींच भीक घालावयाची नाहीं,’ हें धोरण अमेरिकेसारख्या प्रजासत्ताक राज्यांत चालविणें म्हणजे कांहीं सामान्य नाहीं. ‘महत्पदानें थोर पुरुषांची थोरवी वाढते व हलक्यांचें हलकेपणहि वाढतें’ असें ह्मणतात, तें अक्षरशः खरें आहे. ]

कांहीं थोड्या वर्षांपूर्वी अमेरिकेंतील साधारण निग्रोची सर्वांत उच्च महत्त्वाकांक्षा ह्मटली ह्मणजे सरकाराशीं संबंध असलेलें कोणतेंहि काम किंवा नोकरी करणें हीच होती असें ह्मणणें वावगें होणार नाहीं, असें मला वाटतें. राजधानींत राहतां येणें ही एक फार महत्त्वाची गोष्ट मानली

जात असे, आणि जो मनुष्य वाशिंग्टनमध्यें इलिव्हेटरं खालींवर नेण्याचें किंवा खिडक्या साफ करण्याचें काम करी ( विशेषतः या खिडक्या किंवा इलिव्हेटर सरकारी असल्यास ), तो स्वतःला देशांतील इतर कोणत्याहि भागांतील खिडक्या साफ करणाऱ्या किंवा इलिव्हेटर चालविणाऱ्या मनुष्याहून श्रेष्ठ मानीत असे. आपण एक मोठे कामदार आहों, असें त्याला वाटे.

अलिकडे कांहीं वर्षांत या बाबतींत बराच फेरफार झालेला आहे. सरकारचा कामदार किंवा हपीसर होण्यापेक्षां दुसऱ्या कोणत्याहि स्थितींत शेवटीं अधिक पैसा मिळवितां येतो आणि समाजाच्या अधिक उपयोगीं पडतां येतें, असें माझ्या ज्ञातीच्या पुष्कळ लोकांनां कळून चुकलें आहे. आपले उद्योगधंदे सोडून देणें आवडलें नाहीं ह्मणून कांहीं निग्रो व्यापाऱ्यांनीं सरकारी नोकरींतील महत्त्वाच्या व मानाच्या जागा नाकारिलेल्या आहेत, अशीं कांहीं उदाहरणें मला माहित आहेत. तथापि साधारण निग्रोला वाशिंग्टन शहराविषयीं एक प्रकारचें महत्त्व व मोह अद्याप वाटत आहेच.

माझ्या ज्ञातिबांधवांप्रमाणें हा विकार मला कधीं बाधला आहे, असें मला वाटत नाहीं. वाशिंग्टनचें वातावरण मला केव्हांच आवडलें नाहीं. 'ज्या ज्ञातीचे पुढारी' नोकरी धुंडण्यासाठीं आणि ती मिळाल्यावर तींतच कायम राहण्यासाठीं आपला सारा वेळ, विचार व उत्साह हीं सर्व खर्च करीत असतात, तिची उन्नति करणें अशक्य आहे, असें मला पूर्वींपासून वाटत असे. म्हणून होतां होईल तों, मीं वाशिंग्टन शहर टाळलेलें आहे, आणि आतां एकादा दिवस मीं तेथें घालविला, तर तो व्यर्थ गेला असेंच मला वाटतें.

---

१ माल, मनुष्यें इ० वर चढविण्याची खुर्ची किंवा पाळणा.

मला राजकारण आवडत नाहीं हें खरें; तथापि राजकीय बाबतींत अलिकडे मला कांहीं अनुभव आलेला आहे. सार्वजनिक प्रश्नांशीं ज्याचा थोडाबहुत संबंध आहे त्याला एकादा राजकीय हुद्दा नको असला, तरी त्याचा राजकारणाशीं कांहीं संबंध आल्याशिवाय राहणार नाहीं हें खास. खरोखर पाहतां, मला कोणताहि राजकीय हुद्दा नको आहे, आणि सन्माननीय व बिनपगारी नोकरीशिवाय मी दुसरी कोणतीहि सरकारी नोकरी स्वीकारणार नाहीं असें सर्वांनां चांगलें माहित असल्यामुळेंच माझा राजकारणाशीं संबंध जुळून आला.

दुसऱ्या एका गोष्टीनें मला राजकारणाचा वीट आलेला आहे. एकादी वस्तु किंवा एकादी व्यक्ति राजकीय वादविवादाचा विषय होतांक्षणींच तिच्या योग्यतेपेक्षां तिला फाजील महत्त्व मिळतें, असें माझ्या अवलोकनांत आलेलें आहे. दरमहा पंचवीस किंवा पन्नास डालर वेतन मिळणाऱ्या एकाद्या राजकीय हुद्दयावर कोणा एकाद्या इसमाची नेमणूक केल्यामुळें एकादा सर्व समाज, परगणा किंवा संस्थान अत्यंत क्षुब्ध झालेलें मीं अनेक वेळां पाहिलेलें आहे. उलटपक्षीं, शिक्षणखात्यांत व कारखान्यांत याहून चौपट वेतन मिळणाऱ्या व याच योग्यतेच्या कामावर कांहीं व्यक्तींची नेमणूक झाली असतां लोकांत किंवा वर्तमानपत्रांत कांहींएक चळवळ झालेली नाहीं, असेंहि माझ्या पाहण्यांत आलेलें आहे. तसेंच राजकीय हुद्दयाला अवास्तव महत्त्व दिल्यामुळें कांहीं गोऱ्या व काळ्या लोकांनीं सरकारी नोकरीपेक्षां अत्यंत किफायतीच्या खासगी जागांचा राजीनामा दिलेलाहि मीं पाहिला आहे. या सर्व गोष्टींनीं माझें मन राजकारणाविषयीं विटून गेलें आहे.

उदाहरणार्थ, मिसिसिपी संस्थानांत कांहीं वर्षांपूर्वी एक नीग्रो मनुष्य व त्याची बायको हीं एका पोस्टआफिसचें काम पाहत होतीं. कांहीं

कारणामुळें याविषयीं एक मोठा वाद उपस्थित झाला आणि पोस्ट-आफिसासारखी सरकारी जागा निग्रोंच्या ताब्यांत आहे ह्मणून सर्व समाज लवकरच फार क्षुब्ध झाला. यानंतर कांहीं दिवसांनीं मिस्टर डब्ल्यू. डब्ल्यू. कॉक्स या निग्रो गृहस्थानें तें पोस्ट आफिसचें काम सोडून दिलें आणि त्यानें त्याच गांवांत एक व्यांक ( पेढी ) स्थापन केली. सांप्रत तो त्या व्यांकेचा अध्यक्ष आहे आणि त्याची बायको आपल्या पतीला मदत करीत असते. पोस्टआफिसापासून त्यांनां जें कांहीं मिळत असे त्याहून तिप्पट किंवा चौपट वेतन त्यांनां व्यांकेपासून मिळतें. गोरे व काळे असे दोन्ही लोकहि या व्यांकेला आश्रय देतात आणि ही व्यांक भरभराटींत आहे, असें मीं नुकतेंच ऐकिलें आहे. पोस्टमास्तर या नात्यानें मिस्टर कॉक्स यांनां जी कांहीं समाजाची सेवा करतां आली असती तीपेक्षां निग्रो व्यांकेचे प्रेसिडेंट या नात्यानें किती तरी अधिकपट सेवा ते हल्लीं करीत आहेत. पोस्टमास्टरची जागा भरून काढणारे त्या गांवीं पुष्कळ लोक आहेत, पण निग्रो व्यांकसारखी लोकांनां अत्यंत उपयुक्त अशी संस्था सुरू करणारे व ती चालू ठेवणारे लोक फारच थोडे मिळतील. यांत संशय नाहीं. पोस्टमास्तरची जागा सरकारी असल्यामुळें त्या जागेवर काम करीत असतांना सर्व मिसिसिपी संस्थानचें लक्ष्य कांहीं काल मि. कॉक्स यांच्याकडे लागलें होतें. खरोखर मि. कॉक्स अगर त्यांची पत्नी हीं थोडा वेळ राष्ट्रीय विषयच झालीं होतीं. पण आतां मि. कॉक्स हे अधिक किफायतीच्या जागेवर खासगी नोकरींत असल्यामुळें आपल्या समाजाबाहेरील लोकांचें लक्ष्य त्यांच्याकडे लागलेलें आहे, असें मला वाटत नाहीं.

या गृहस्थाविषयीं जी कांहीं चळवळ झाली, तिचा परिणाम असा झाला. कीं. सरकारी नोकरी धरणें हें अधिक महत्त्वाचें आहे, असें ठरलें,

आपण केवळ निग्रो आहों ह्मणून जी जागा किंवा हुद्दा आपणाला मिळूं देणें गोऱ्या लोकांनां आवडत नाहीं. तीच जागा मिळविणें हें आपणाला व आपल्या ज्ञातीला विशेष महत्त्वाचें आहे, असें बहुतेक साधारण निग्रोला सहजच वाटूं लागलें. समाजाच्या वतीनें किंवा खासगी व्यक्ति या नात्यानें काम करण्यापेक्षां हपीसर या नात्यानें सरकाराकरितां काम करणें अधिक सन्माननीय आहे, असा साधारण निग्रोचा समज होत चालला.

या गोष्टीमुळें आणि दुसऱ्याहि कांहीं कारणांमुळें मीं राजकीय हुद्दा—सरकारी नोकरी मिळविण्याची खटपट केली नाहीं. प्रेसिडेंट रुझवेल्टच्या कारकीर्दींत युनायटेड स्टेट्सचा कमिशनर या नात्यानें मला लायबेरिया ( आफ्रिका ) येथें जाण्यास सांगितलें होतें. हें काम मीं स्वीकारावें किंवा नाहीं. याचा विचार चालला असतां माझ्या ज्ञातिबांधवांतर्फे केलेल्या कामगिरीमुळें आणि माझें नांव लायबेरियाच्या लोकांनां कांहीं अंशीं माहीत असल्यामुळें सरकारचें हें काम करण्यास लायक असा मीच आहें. असें मला सांगण्यांत आलें. मला हें काम मनापासून आवडत नव्हतें आणि माझ्या ज्ञातिबांधवांकरितां सुरू केलेल्या कामामुळें मला फुरसत मिळत नसे. तरी मीं शेवटीं हें काम करण्याचें पत्करिलें. पण मी स्वतः जाण्याची आवश्यकता नाहीं, माझे सेक्रेटरी इमेट जे. स्कॉट हे माझ्या वतीनें आफ्रिकेला गेले तरी चालेल असें जेव्हां प्रेसिडेंट टाफ्ट यांनीं मेहरबानीनें ठरविलें. तेव्हां मला फार आनंद झाला. सरकारी काम करण्याचा योग कधीं काळीं मला आला असेल तर तो हाच. पण सरकारी कामाशिवाय राजकारणांत प्रविष्ट होण्याचे दुसरे कांहीं मार्ग आहेत.

साधारण मनुष्याविषयीं पाहतां, त्याला एकादी मोठी हुद्द्याची जागा मिळाली तर लगेच तो पूर्ण बदलून जातो, असें मला दिसून आलेलें आहे. जबाबदारीचें काम अंगावर पडलें असतां कांहीं मनुष्यें सुधारतात, कांहींजण बिघडून जातात. मनुष्याचा स्वभाव अशा रीतीनें बिघडून टाकणारें असें अमेरिकन राजकारणांत काय आहे हें मला कधींहि समजलें नाहीं. खासगी वर्तनामध्यें व व्यवहारामध्यें आपलें वचन पूर्णपणें पाळणारे, आपल्याशीं संबंध असलेल्या कोणालाहि प्रत्यक्षपणें किंवा अप्रत्यक्षप्रणें कधींहि न फसविणारे असे कांहीं लोक राजकारणांत शिरल्याबरोबर अगदीं बदललेले मीं पाहिले आहेत.

वाशिंग्टन येथील एका निग्रो गाडीवानापाशीं माझ्या माहितीच्या एका वड्या निग्रो गृहस्थाविषयीं मीं विचारपूस केली. त्यांचें कसें काय चाललें आहे, असें मीं त्याला ह्मटलें. ह्मातारा गाडीवान अशिक्षित पण मनुष्यांचा पारखी होता. त्यानें थोडक्यांत आपलें मत खालीं दिल्याप्रमाणें सांगितलें.

‘ त्या गृहस्थाची एक गोष्ट चांगली आहे, नेहमीं त्याच्यावर विश्वास ठेवण्यास हरकत नाहीं. ’ नंतर डोकें हालवून, हांसून तो ह्मातारा पुढें ह्मणाला—‘ आपण एकादी गोष्ट करणार आहों, असें त्यानें सांगितलें, तर ती गोष्ट तो कधींहि करणार नाहीं असें पक्कें समजावें. ’

एकादी हुद्द्याची जागा मिळाली असतां लोकांच्या स्वभावांत होणारा फेरफार केवळ निग्रो ज्ञातींतच आढळून येतो असें नाहीं. दुसऱ्या ज्ञातींच्या लोकांतहि असेंच स्थित्यंतर होत असतें. नेहमींच्या व्यवहारांत शांत व थंड असलेले लोक, हुद्द्याच्या मागें लागतांच शंकेखोर व मत्सरी होतात, आपल्या कामाधंद्याची हयगय करतात, कुटुंबाचीहि हेळसांड

करतात, कोणत्याहि गोष्टींत त्यांना करमेनासें होतें; थोडक्यांत सांगावयाचें ह्मणजे, त्यांची मानसिक व नैतिक समता बिघडून जाते, असें मला आढळून आलें आहे.

राजकारणाच्या जंतूंनीं या लोकांवर हल्ला केल्यावर रोगाचीं लक्षणें कशीं वळावत जातात हें मीं पाहिलेलें आहे. प्रथम दैनिक वृत्तपत्रांच्या अध्ययनाला हे लोक सुरुवात करतात. राजकारणांतील अधिकारी पुरुषांनीं सांगितलेल्या ( अगर न सांगितलेल्या ) अगदीं क्षुल्लक गोष्टींनां ते फार महत्त्व देतात. हुद्द्याच्या जागा देणारा मनुष्य त्या जागा मिळवूं पाहणाऱ्यांनां देवासारखा वाटूं लागतो. राजकीय पुढाऱ्यांच्या सर्व हालचालींचें ते मोठ्या उत्सुकतेनें निरीक्षण करतात आणि त्यांच्या तोंडांतून निघणाऱ्या प्रत्येक शब्दाचें अध्ययन करतात—जणूं काय त्या शब्दांत कांहीं गूढ व खोल अर्थ आहे. नंतर त्यांची थोडीशी सरशी झाली ह्मणजे आपण एकाद्या विशिष्ट हुद्दयाला लायक आहों अशा प्रमाणपत्रावर गोम्यासोम्या इत्यादि लोकांच्या सह्या मिळवीत रस्तोरस्तीं भटकत असतांना केव्हांकेव्हां ते दृष्टीला पडतात.

या प्रसंगीं, प्रेसिडेंट मॅक्किनले यांची प्रथम निवडणूक झाल्या वेळीं अलाबामांत राहणाऱ्या एका गोऱ्या इसमाची गोष्ट मला आठवते. प्रेसिडेंटच्या कॅबिनेटांत—मंत्रिमंडळांत—आपणाला जागा मिळणार अशा दृढनिश्चयानें हा मनुष्य आपला उद्योगधंदा सोडून वाशिंग्टनला गेला. आपल्या पुढील आशांविषयीं तो मला वेळोवेळीं पत्रें पाठवी. प्रेसिडेंट मॅक्किनले यांनीं मंत्रिमंडळांतील सर्व जागा भरल्यावर त्यानें परदेशच्या वकिलीच्या जागेबद्दल अर्ज केला. त्यांत अपयश आल्यावर, कोणत्याहि खात्यांतील एकादी हिशोबतपासनीसाची जागा त्यानें मागितली. तीहि जेव्हां त्याला मिळाली नाहीं तेव्हां त्यानें शेवटीं मला आणि

अल्बामांतील त्याच्या इतर ओळखीच्या गृहस्थाला. अल्बामाला परत येण्यासाठीं कांहीं रक्कम कर्जाऊ पाठवावी, अशीं पत्रें लिहिलीं.

मीं वर्णन केल्याप्रमाणें राजकारणांत प्रविष्ट होणाऱ्या सर्वांनांच असा विकार जडतो असें नाहीं. येथें मला हेंहि सांगितलें पाहिजे. कीं, मला पुष्कळ सार्वजनिक माणसें—पुढारी—माहित आहेत व त्यांचें मीं काळजीपूर्वक निरीक्षणहि केलेलें आहे. पण खासगी व्यवहारांत व राजकारणांत सारखेंच वर्तन असलेलें सर्वांत उत्तम व अद्वितीय उदाहरण ह्मणजे कर्नल थिओडर रुझवेल्ट यांचें होय.

माझ्या सार्वजनिक जीवनाच्या प्रथमारंभींच कर्नल रुझवेल्टशीं माझा संबंध जुळून आला. कोणत्याहि ज्ञातीच्या, किंवा मानवजातीच्या कोणत्याहि भागाच्या लोकांच्या हितार्थ कसलेंहि काम कोणी एकादा करीत असला, तर अशा गृहस्थाला हटकून सल्ला व मदत मिळण्याचें स्थान म्हणजे रुझवेल्ट होत. निरनिराळ्या परिस्थितींत मीं त्यांनां पाहिलेलें आहे व त्यांच्याशीं माझा निकट संबंध जडून आलेला आहे, आणि त्यांच्या सार्वजनिक व खासगी वर्तनक्रमाच्या निरीक्षणापासून मी बऱ्याच गोष्टी शिकलों, हें मी कबूल करतों. मिस्टर रुझवेल्टविषयीं माझ्या मनांत ठसलेली एक गोष्ट ही आहे, कीं, एकदां त्यांनीं वचन दिलें, कीं, मग ते कधींहि तें विसरत नाहींत, किंवा त्याकडे कधींहि कानाडोळा करीत नाहींत. खरोखर पाहतां, ते कांहींहि, अगदीं क्षुल्लक गोष्टी किंवा प्रसंग विसरत नाहींत. प्रेसिडेंट, न्युयॉर्कचे गव्हरनर, संयुक्त संस्थानांचे व्हाइस प्रेसिडेंट किंवा खासगी नागरिक असतांना ते अगदीं सारखेच होते, असें मला आढळून आलें आहे. खरोखर, मला भेटलेला पूर्ण किंवा सर्वांगसुंदर मनुष्य हाच आहे, असें ह्मणण्यास मला कांहीं दिक्कत वाटत नाहीं.

मिस्टर रुझवेल्टच्या सार्वजनिक व खासगी वर्तनक्रमांतील एक मुख्य गोष्ट ह्मटली ह्मणजे त्यांची सरलता ही होय. त्यांच्या भाषणांतील साधेपणा व सरळपणा पाहून मी वेळोवेळां चकित झालों आहें. एकादी गोष्ट कशी छपवावी, हें त्यांनां कळत नाहींसें दिसतें. खरोखर पाहतां, त्यांचा विचारहि मोठ्यानें चालतो. योग्य विचार न करितां ते उतावळेपणानें वागणारे आहेत, असा पुष्कळ लोकांनीं त्यांच्यावर आरोप केलेला आहे. मिस्टर रुझवेल्टविषयीं मला जी कांहीं माहिती आहे, तीवरून माझें मत असें झालें आहे, कीं, लोकांनां त्यांच्या अंगीं उतावळेपणाचा दोष आहे, असें वाटतें; पण खरोखर तसें नसून, त्यांच्या विचारांची शीघ्रताच मोठी आहे. लोक एकाद्या प्रश्नाच्या अवांतर गोष्टींविषयीं विचार करितात, पण ते मुख्य प्रश्नालाच हात घालतात. लोकांचा प्रास्ताविक गोष्टींविषयीं विचार चाललेला असतो, पण इतक्यांत त्यांचा सिद्धांतहि ठरतो. विचारपद्धतींत ते अगदीं जवळचा रस्ता काढतात. हें खरें आहे, कीं, असें करण्यांत त्यांनां पुष्कळ धोके खावे लागतात, पण प्रसंगानुसार धोके खाण्यास ते केव्हांहि डगमगत नाहींत. एकदां एका विशिष्ट दिशेनें वागतांना त्यांनीं बरीच जोखीम अंगावर घेतली आहे, असें मीं सुचवितां, ते ह्मणाले, कीं, जोखीम अंगावर घेतल्याशिवाय, कांहीं धोके खाल्ल्याशिवाय कोणालाहि लढाई जिंकतां यावयाची नाहीं.

दुसऱ्या प्रसिद्ध सार्वजनिक मनुष्यांशीं तुलना करितां कर्नल रुझवेल्टचें दुसरें एक लक्षण असें आहे, कीं, ते आपल्या मित्राला केव्हांहि सोडीत किंवा विसरत नाहींत. एकाद्या मनुष्यावर एकदां त्यांचा विश्वास बसला, कीं, ते नेहमीं त्याला चिकटून राहतात. ते कोठें सांपडावयाचे हें सर्वांनां नेहमीं माहीत असतें, आणि हेंच त्यांच्या अपूर्व लोकप्रियतेचें बहुतेक अंशीं

कारण असावें, असें मला वाटतें. सार्वजनिक हृदयावर असलेला त्यांचा एकादा मित्र कदाचित् लोकांनां अत्यंत अप्रिय झाला तर होवो, पण त्यानें स्वतः आपल्या तोंडाला काळिमा लावला नसेल, तर मिस्टर रुझवेल्ट हे त्याला धरून राहतील आणि तसें करण्यास ते यत्किंचित्हि भिणार किंवा लाजणार नाहींत. सार्वजनिक किंवा खासगी वर्तणुकींत जो कोणी आपल्या मित्रांला धैर्यानें चिकटून राहतो त्यालाच शेवटीं सर्व लोक मान देतात. अधिक धूर्त मुत्सद्दी ज्या गोष्टी करण्यास धजणार नाहींत अशा गोष्टी करून मिस्टर रुझवेल्टनीं अनेकदां लोकप्रियता संपादन केली आहे.

प्रथम पत्रव्यवहारानें मिस्टर रुझवेल्टची व माझी ओळख झाली. पुढें प्रेसिडेंट होण्याचा संभवहि नव्हता अशा वेळीं एकदां त्यांनीं संभाषणांत अगदीं सरळपणें मला असें सांगितलें, कीं, एकाद्या दिवशीं अमेरिकेचे प्रेसिडेंट होण्याची आपली इच्छा आहे. दुसरा कोणीहि साधारण मनुष्य असता तर असे स्पष्टपणें त्यानें आपले विचार प्रगट केले नसते. आपणाला पुढेंमागें प्रेसिडेंटची जागा मिळणार असें त्याला वाटलें तर त्यानें ह्मटलें असतें, कीं, त्या जागेच्या मागें मी लागलेलों नाहीं, माझे मित्र ती जागा माझ्यावर लादीत आहेत, प्रेसिडेंट होण्याची आपली योग्यता नाहीं इत्यादि. कर्नल रुझवेल्टची तऱ्हा अशी नाहीं. त्यांनीं आपल्या मनांत होतें तें स्पष्ट बोलून दाखविलें. त्या वेळीं, त्यांची महत्त्वाकांक्षा पूर्ण होण्यापूर्वीं पुष्कळ वर्षें त्यांनीं आपण प्रेसिडेंट झालों असतां निग्रोंनांच नव्हे, तर संबंध दक्षिणभागाला कशी मदत करूं याचा कच्चा नकाशा मला सांगितला. दक्षिणभागाची खरीखुरी सेवा करण्याच्या सद्धेतूनें मिस्टर रुझवेल्ट

हे जसे प्रेसिडेंट झाले तसे दुसरे कोणी झाले असतील किंवा नाहीं, याची मला शंका वाटते.

हा प्रसंग मिस्टर रुझवेल्ट यशस्वी कां होतात, याचें एक मुख्य कारण दर्शवितो. ते लवकर विचार करितात इतकेंच नव्हे, तर त्यांचे विचार व बेत पुष्कळ आधींच ठरून गेलेले असतात. त्यांनां जर संस्थानचें एकादें काम लिहावयाचें असेल किंवा मासिकांतील एकादा लेख अगर भाषण तयार करावयाचें असेल, तर सातआठ महिने आधींच हीं त्यांचीं कामें तयार असतात हें मला माहित आहे. याचा परिणाम असा होतो, कीं, ते नेहमीं स्वतःचे व आपल्या परिस्थितीचे धनी असतात. ते आपल्या कामांनीं चेपले जात नाहींत, . तर कामालाच ते पुढें रेटतात.

प्रेसिडेंट झाल्यावर दक्षिणभागाकरितां त्यांनीं जें कांहीं केलें त्या सर्व गोष्टींचें दिग्दर्शन पुष्कळ वर्षांपूर्वीं—ते प्रेसिडेंट होतील अशी पुष्कळ लोकांनां कल्पनाहि नव्हती अशा वेळीं—त्यांनीं संभाषणांत केलेलें होतें. लहरीप्रमाणें त्यांनीं कांहीं केलें नाहीं; तर नीट काळजीपूर्वक विचार व बेत करून सर्व कांहीं केलें.

मिस्टर रुझवेल्ट हे प्रेसिडेंट झाल्याबरोबर घडलेल्या एका प्रसंगाची हकीगत सांगितली असतां, त्यांचें मन एकाद्या सार्वजनिक प्रश्नाविषयीं कसा विचार करतें हें अधिक स्पष्ट होईल. प्रेसिडेंट मॅक्किनलेच्या निधनानंतर, बफालो येथें त्यांनीं प्रेसिडेंट या नात्यानें जाहीर-पणें शपथ घेतलेल्या दिवशींच—( किंवा त्याच्या दुसऱ्या दिवशीं ) त्यांचें स्वदस्तूरचें एक पत्र मला आलें. मीं त्यांनां वाशिंग्टन येथें भेटावें असें त्यांत लिहिलेलें होतें. पुष्कळ वर्षांपूर्वीं आम्हीं खल केलेल्या,

दक्षिणभागाला मदत करण्याच्या उपायांविषयीं व योजनांविषयीं त्यांनां माझ्याशीं बोलावयाचें होतें. ही योजना पुष्कळ महिने नव्हे, तर वर्षे त्यांच्या मनांत घोळत होती आणि संधि येतांच ती अमलांत आण-ण्याचा त्यांनीं प्रयत्न केला.

वाशिंग्टन येथें भेटण्याविषयीं मला जेव्हां मिस्टर रुझवेल्टचें पत्र आलें तेव्हां माझ्या मनांत पुष्कळ संदेह उत्पन्न झाले. ज्या चळवळींपासून मी इतकीं वर्षें पूर्ण अलिप्त राहिलों होतों, तींत मीं आतां सामील व्हावें कीं काय या प्रश्नाचा मीं नीट विचार केला पाहिजे असें मला वाटलें. पण माझ्या स्वतःच्या इच्छा किंवा वृत्ती कांहींहि असोत—या पत्राकडे मला कानाडोळा करितां येईना. श्वेतप्रासादांत मिस्टर रुझवेल्ट यांची स्थापना होतांच लगेच मी त्यांनां भेटावयाला गेलों आणि दक्षिणभागाविषयीं संभाषण करीत आह्मीं एक संध्याकाळ घालविली. या संभाषणांत त्यांनीं दोन मुद्दयांवर विशेष जोर दिला. ते ह्मणाले, कीं, "दक्षिणेंतील कोणत्याहि हुद्दयाच्या जागेवर एकादा गोरा मनुष्य नेमावयाचा तो सर्वांत उत्तम नमुन्याचा असावा. त्याच्यावर सबंध देशाचा पूर्ण भरंवसा असावा, अशी माझी इच्छा आहे व राजकीय वळणांचा किंवा परिणामांचा कांहीं विचार न करितां मी तसल्याच मनुष्याची नेमणूक करणार."

नंतर त्यांनीं हेंहि साफ सांगितलें, कीं, "दक्षिणेंतील कोणत्याहि भागांत निग्रो लोकांनां अधिक नोकऱ्या देण्याचा माझा बेत नाहीं; पण अद्याप कोणींहि न केलेल्या, दोन गोष्टी मी करणार आहें; दक्षिणेंत कोठेंहि निग्रोला जागा द्यावयाची असली तर तो मनुष्य बुद्धिवानच नव्हे, तर शील-वान असावा आणि त्याच्यावर काळ्या व गोऱ्या शेजाऱ्यांचा विश्वास असावा, नुसत्या तात्पुरत्या राजकीय सोयींसाठींच निग्रोला नोकरी दिली जाणार नाहीं, दक्षिणेंत जरी मी थोडे निग्रो नेमणार आहें, तरी उत्तरे-

कर्डाल संस्था नांत बऱ्याचशा जागांवर बुद्धिवान् व शीलवान निग्रोंची मी नेमणूक करणार आहें. काळ्या लोकांनां दक्षिणेंत जागा देण्यांत येतात, तशा उत्तरेकडेहि कां देण्यांत येत नाहींत, याचें मला कोणतेंच योग्य कारण दिसत नाहीं. "

खरोखर पाहतां, मिस्टर रुझवेल्ट प्रेसिडेंट होण्याच्यापूर्वीं उत्तरेंतील संयुक्त संस्थानांत कोणत्याहि मोठ्या हुद्द्यावर एकाहि निग्रोची नेमणूक झालेली नव्हती. स्वतःला जी गोष्ट मान्य नाहीं ती इतरांनां स्वीकारावयास आपण लावणार नाहीं हें सर्व लोकांनां स्पष्ट कळावें ह्मणून त्यांनीं आपल्या शहरांत एका निग्रोची नेमणूक करून उदाहरण घालून देण्याचा निश्चय केला. कांहीं महिन्यांनंतर या धोरणानुसार आनरेबल मिस्टर चार्ल्स डब्ल्यू. अंडरसन यांनां न्यूयार्कच्या दुसऱ्या प्रांतांतील अंतर्गत कर वसूल करण्याकरितां कलेक्टर करण्यांत आलें. याच प्रांतांत ' वाल स्ट्रीट ' वसलेलें आहे आणि सर्व प्रांतांपेक्षां याच प्रांताचा वसूल अधिक आहे. यानंतर दक्षिण व उत्तर भागांत मिस्टर रुझवेल्टनीं दुसऱ्या निग्रो लोकांनां मोठ्या कामांवर नेमिलें. पण या लोकांच्या व्यक्तिशः पात्रतेविषयीं कोणींहि चौकशी केली, तर मिस्टर रुझवेल्टच्या अपेक्षेप्रमाणें ते चांगले बुद्धिवान व शीलवान होते असेंच आढळून येईल, असें मला वाटतें.

प्रेसिडेंट टाफ्टनीं हेंच धोरण चालू ठेविलें आहे, ही मोठ्या आनंदाची गोष्ट आहे. त्यांनीं वाशिंग्टनच्या व्हाइटफील्ड मक्किनलेला जार्जटाऊन पोर्टचे कलेक्टर नेमिलें आहे. ही जागा अद्याप कोणाहि काळ्या मनुष्याला मिळालेली नव्हती. तसेंच नॅशविलच्या ' वन-सेंट सेव्हिंग्ज ब्यांक'चे कॅशियर मिस्टर जे. सी. नेपियर यांची त्यांनीं युनायटेड स्टेट्सच्या ट्रेझरीच्या रजिस्टरच्या जागीं योजना केली आणि नुकतेच

बोस्टनचे युनायटेड स्टेट्स डिस्ट्रिक्ट आटर्नी मि. विल्यिम एच. लेविस यांची युनायटेड स्टेट्सच्या असिस्टंट आटर्नी जनरलच्या जागीं नेमणूक केली आहे,असें त्यांनीं जाहीर केलें. संयुक्त संस्थानांत निग्रोला मिळालेली ही सर्वांत श्रेष्ठ जागा होय.

चांगले लोक मोठमोठ्या जागीं नेमून सर्व खात्यांची सुधारणा करावी, अशी मि. रुझवेल्ट आणि मि. टाफ्ट यांची इच्छा होती. पण या इच्छेच्या मुळाशीं वर वर्णन केलेले निग्रो लोक नेमण्यांत त्यांचा दुसरा एक हेतु होता. आपण नेमिलेले लोक अत्यंत सद्गुणी असावेत, अशी आपली इच्छा त्यांनीं प्रदर्शित केली होती. याचें कारण असें, कीं, जगांतील इतर कामांप्रमाणें राजकारणांतहि अत्यंत हुशार व सद्गुणी लोकांनां सारखाच मान मिळतो हें निग्रोच्या तरुण पिढीला नीट समजावें. हुशार व सद्गुणी लोकांनां मान मिळाला ह्मणजे आपणहि मोठे नांव मिळवावें असें इतर निग्रो लोकांनां वाटूं लागेल, अशी त्यांनां आशा होती.

मिस्टर रुझवेल्टनीं निग्रो लोकांच्याच नेमणुकींनां हा नियम लागू केला असें नाहीं. आपापल्या कामांत पूर्ण वाकबगार असलेल्या व निग्रो लोकांनांच अनुकूल असलेल्या नव्हे, तर गोऱ्या लोकांचाहि विश्वास संपादन केलेल्या लोकांच्या नेमणुका केल्या असतां सार्वजनिक खातीं बरीचशीं सुधारतील, इतकेंच नव्हे, तर दक्षिणेंतील राजकारण व ज्ञातीज्ञातींमधील संबंध हेहि सुधारतील, असा त्यांनां विश्वास होता. राजकारणांतील सर्व पक्षांशीं आपल्या अधिकाऱ्यांनीं कसें वागावें, त्यांपासून संयुक्त सरकार काय अपेक्षा करितें, याविषयीं आपण नेमलेले लोक दक्षिणेंत आदर्शभूत व्हावेत, अशी त्यांची इच्छा होती.

श्वेतप्रासादांत मिस्टर रुझवेल्टच्या पहिल्या मुलाखतींत पुष्कळ गोष्टींची चर्चा झाल्यावर एका गोऱ्या मनुष्याची न्यायखात्यांतील एका महत्त्वाच्या जागेवर नेमणूक करण्याचें त्यांनीं ठरविलें. थोड्याच दिवसांत ही नेमणूक जाहीर होऊन स्वीकारण्यांत आली. या नेमणूकी-कडे लोकांचें जेवढें लक्ष्य वेधलें व तिच्याविषयीं जेवढी अनुकूलता प्रगट झाली, तेवढी दुसऱ्या कोणत्याहि नेमणुकीनें कधीं झाली असेल, असें मला वाटत नाहीं.

१९०१ च्या शरदतूंत मी मिसिसिपि संस्थानांत प्रवास करीत असतां कांहीं महत्त्वाच्या गोष्टीविषयीं. मी सवड होतांच प्रेसिडेंटांनां भेटावें, असा मला निरोप आला. आधींच माझ्या शिरावर मोठीं जबाबदारीचीं कामें आहेत, आणखी नवीन कामें हातीं घ्यावीं कीं काय, या प्रश्नाचा मीं माझ्याबरोबर सहल करीत असलेल्या एका मित्राबरोबर चांगला खल केला. काळजीपूर्वक नीट विचार करून आम्हीं ठरविलें, कीं, नवीन जबाबदारीचीं कामें जसजशीं येत जातील, तसतसें त्यांनां तोंड देणें हेंच योग्य आहे. कारण, नवीन जबाब-दारीच्या कामाबरोबर नवीन संधीहि मिळतात आणि माझ्या ज्ञातीच्या हितार्थ त्या संधींचा मीं उपयोग करून घेतला पाहिजे. शिवाय अला-बामांत काम सुरू केल्यापासून ज्या धोरणांचें मी प्रतिपादन करीत असें, तींच धोरणें अमलांत आणण्याचा मि. रुझवेल्ट यांचा बेत असल्यामुळें तसें करणें हें माझें कर्तव्यच आहे, असें मला वाटलें. मिसिसिपींतील काम आटोपतांच मी वाशिंग्टनला गेलों. मी तेथें दुपारीं पोंचलों आणि मिस्टर व्हाइटफील्ड मॅक्किनले नांवाच्या एका मित्राच्या घरीं गेलों. वाशिंग्टनमध्यें त्यांच्याच घरीं राहावें, असा माझा संकल्प होता.

या वाशिंग्टनच्या सफरींत जी एक गोष्ट घडून आली, तिच्यासंबं-धानें, मला पुष्कळांनीं विनंती केली असतांहि मीं वर्तमानपत्रांत किंवा सार्वजनिक भाषणांत चकार शब्द काढलेला नव्हता. त्या वेळीं उत्पन्न झालेल्या वादाच्या आगींत तेल ओतण्यास मी अर्थात्‌च तयार नव्हतों पण आतां त्याविषयीं जे दोन शब्द मी सांगणार आहें, त्यांवरून त्या प्रसंगाचें वास्तविक स्वरूप व महत्त्व लोकांच्या सहज लक्ष्यांत येईल.

मी मिस्टर मॅक्‌किनलेच्या घरीं जाऊन पोहोंचल्यावर, ‘ रात्रीं आठ वाजतां श्वेतप्रासादांत भोजनासाठीं यावें ’ अशी प्रेसिडेंटची निमंत्रण-पत्रिका माझ्या हातीं आली. नेमलेल्या वेळीं मी श्वेतप्रासादांत गेलों आणि प्रेसिडेंट, त्यांच्या घरची मंडळी, व कोलारडो येथील एक गृहस्थ यांसह मी जेवलों. भोजनोत्तर प्रेसिडेंटच्या मनांत घोळत असलेल्या दक्षिणभागाच्या योजनांविषयीं आह्मीं बरेंच भाषण केलें. नंतर लगेंच श्वेतप्रासाद सोडून आगगाडीनें न्यूयार्कला यावयास निघालों. दुसऱ्या दिवशीं सकाळीं न्यूयार्कला आल्यावर, आदल्या रात्रीं मीं प्रेसिडेंटबरोबर भोजन केलें असें न्यूयार्क ट्रिब्यून पत्रांत लिहलेलें वृत्त मीं पाहिलें. हें वृत्त न्यूयार्कच्या त्याच एका पत्रांत आलें होतें असें मला आठवतें. थोड्याच तासांत ही गोष्ट मी विसरलों. त्या वेळीं ‘ लांग आयलंड रेलरोड’चे अध्यक्ष असलेल्या, मि. विल्यिम. एच. बाल्डविन नामक माझ्या एका मित्रापाशीं मी सहज ही गोष्ट त्या दिवशीं बोललों. दुसऱ्या कोणापाशीं मीं ती गोष्ट सांगितली नाहीं, किंवा ती सांगण्याचा माझा इरादा नव्हता. खरोखर, दुसऱ्या कोणापाशीं ती गोष्ट सांगण्याचें किंवा तिच्याविषयीं वादविवाद करण्याचें मला कांहीं कारण नव्हतें.

दोनतीन दिवसांनंतर दक्षिणेंतील व उत्तरेंतील सर्व वर्तमानपत्रें प्रेसिडेंटबरोबरच्या माझ्या भोजनाच्या लेखांनीं व बातम्यांनीं भरून

गेलेलीं पाहून मला किती आश्चर्य वाटलें असेल. याची कल्पना वाचकांनीं करावी. मुलाखतीसाठीं वर्तमानपत्राचे बातमीदार कित्येक दिवस व आठवडे माझ्यामागें एकसारखे लागले. मीं कांहींतरी खुलासा करावा, किंवा मत द्यावें म्हणून मला भाराभार तारा व पत्रें आलीं. पण या सर्व चळवळीच्या व क्षुब्धतेच्या अवधींत मीं कोणालाहि मुलाखत दिली नाहीं किंवा कोणत्याहि तऱ्हेनें त्या बाबीविषयीं वादविवाद केला नाहीं.

या प्रसंगाविषयीं लिहितांना कांहीं वर्तमानपत्रांनीं तर असें प्रतिपादन केलें, कीं, दोन्ही ज्ञातींचें सामाजिक एकीकरण करण्याच्या कामीं पुढाकार घेण्याचा प्रेसिडेंट रुझवेल्टचा बेत मुकरर झालेला आहे. प्रेसिडेंटच्या मनांत तें (एकीकरण) अगदीं नव्हतें, अशी माझी खात्री आहे आणि माझ्या मनांत तें खरोखर नव्हतें. आह्मां उभयतांना प्रिय असलेल्या अशा विषयावर भाषण करण्यास उत्तम वेळ ह्मटली म्हणजे भोजनकालची व भोजनोत्तरची होय, असें मिस्टर रुझवेल्ट यांना वाटलें.

या भोजनानें लोकांत उडालेली चळवळ असामान्य व अनवश्यक होती. कारण कांहीं वर्षांमागें मीं विंडसर कॅसल येथें व्हिक्टोरिया राणीबरोबर देखील चहा घेतला होता. उत्तरेंतील बहुतेक प्रत्येक संस्थानच्या गव्हरनराबरोबर मी जेवलों होतों; पीस ज्युबिलीच्या मेजवानीच्या वेळीं प्रेसिडेंट मॅक्किनलेबरोबर एकाच खोलींत मी जेवलों होतों; तसेंच पारिस येथें पूर्वीचे प्रेसिडेंट हारिसन आणि इतर प्रमुख सार्वजनिक मनुष्यें यांबरोबरहि मी जेवलों होतों.

या भोजनानंतर कांहीं आठवड्यांनीं मी फ्लोरिडांत प्रवास करीत होतों. मी आगगाडींतून प्रवास करीत आहे असें रेल्वेलाईनभर सर्व

लोकांनां कसें समजलें कोण जाणे; पण त्याचा परिणाम मात्र असा झाला, कीं, प्रत्येक स्टेशनवर लोकांची टोळी येई आणि माझ्याशीं हस्तांदोलन करी. गेन्सव्हिल नांवाच्या एका लहानशा स्टेशनवर एक गोरा इसम आगगाडींत चढला. त्याच्या पोषाकावरून व रीतीभातीवरून तो त्या प्रांतांतील गरीब शेतकरी असावा असें दिसलें. मनःपूर्वक हस्तांदोलन करून तो मला ह्मणाला—'आपणाला पाहून मला अत्यानंद झाला. मीं आपल्याविषयीं पुष्कळ ऐकिलेलें आहे आणि आपली भेट घ्यावी ह्मणून मी पुष्कळ दिवस वाट पहात होतों.'

अंतःकरणापासून केलेल्या या स्वागतानें मी सहजच खूष झालों; पण जेव्हां तो माझ्याकडे टक लावून एकसारखें पाहूं लागला आणि ह्मणाला, कीं—'मी ह्मणतों, आपण मोठे मनुष्य आहां. या देशांत आपण सर्वांत श्रेष्ठ पुरुष आहां.' तेव्हां मला मोठें आश्चर्य वाटलें.

मी हळुहळू या विधानाचा थोडासा निषेध करूं लागलों; पण तो माझें ऐकेना. 'खरेंच, तुह्मीं देशांत सर्वांत श्रेष्ठ पुरुष आहां,' असें तो आपली मान हालवून मोठ्यानें ह्मणूं लागला. शेवटीं, 'युनायटेड स्टेटचे प्रेसिडेंट हे सर्वांत श्रेष्ठ आहेत, असें मला वाटतें; प्रेसिडेंट रुझवेल्टविषयीं आपलें काय ह्मणणें आहे?' असें मीं त्याला विचारिलें.

'अं:—रुझवेल्ट?' त्यानें आवेशानें उत्तर दिलें. 'त्यांनीं आपणाबरोबर भोजन करण्यापूर्वीं ते श्रेष्ठ आहेत अशी माझी समजूत होती. पण त्या गोष्टीनें त्यांच्या श्रेष्ठत्वाविषयींची माझी समजूत पूर्ण मावळून गेली.'

फ्लोरिडा शेतकऱ्याचें हें विधान ह्मणजे मला आलेल्या अनेक अनुभवांपैकीं एक आहे. या सर्व अनुभवांनीं, दुराग्रह, सामाजिक दुराग्रह, ज्ञातिविषयक दुराग्रह इत्यादिकांचें विलक्षण स्वरूप मला थोडेंसें

समेजावून दिलें आहे. या दुराग्रहांनां क्षुब्ध करण्यांत कांहीं फायदा नसतो. ' निजलेल्या भूतांनां न उठविणें ' हेंच शहाणपण आहे. जगांतील इतर भागांप्रमाणें अमेरिकेंतील सर्व भागांच्या विशिष्ट रुढी व दुराग्रह आहेत. याकरितां त्यांनां मान देणें हा व्यवहारचातुर्याचा एक भाग आहे. यूरोपांतील किंवा अगदीं पश्चिमेकडील देशांत, हिंदुस्तानांत किंवा चिनांत कोणी गेल्यास तेथें त्याला कांहीं विशिष्ट रुढी व दुराग्रह आढळून येतात. त्यांनां मान द्यावा लागतो आणि कांहीं अंशीं त्यांप्रमाणें चालणेंहि भाग पडतें. अमेरिकेच्या दक्षिणेंत व उत्तरेंत हीच परिस्थिति आहे. दक्षिणेंत गोऱ्या व काळ्या लोकांनां एका हाटेलांत राहतां येत नाहीं आणि काळ्या व गोऱ्या मुलांना एकाच शाळेंत जातां येत नाहीं. उत्तरेंतील बहुतेक भागांत निराळीच चाल किंवा रुढी आहे. मी प्रवास करीत असलेल्या देशांतील लोकांच्या रीतिभाती किंवा रुढी काय आहेत, याची चौकशी करण्याकरितां किंवा त्या रुढींशीं भांडण्याकरितां मी केव्हांहि थांबलों नाहीं.

एवंच, प्रेसिडेंट रुझवेल्टबरोबर जेवतांना, दक्षिणेंतील एखाद्या रुढीविरुद्ध बंड करावें अशी माझी किंवा मिस्टर रुझवेल्टची इच्छा नव्हती. तेव्हां आमचें सहभोजन आधींच विचार व संगनमत करून ठरविलेलें होतें, या विधानाला कांहीं आधार नाहीं. प्रेसिडेंटच्या सोयीशिवाय त्यांत दुसरा कोणताहि हेतु किंवा उद्देश नव्हता.

माझा जन्म दक्षिणेंत झालेला आहे आणि तेथील रुढी, पूर्वग्रह व परंपरा मला पूर्ण माहित आहेत. तसेंच माझें दक्षिणभागावर प्रेम आहे. परिस्थिति पूर्ण न जाणणारांनां हें माझें विधान कदाचित् विलक्षण वाटेल. दक्षिणेची उन्नति साधणाऱ्या व वैभव वाढविणाऱ्या प्रत्येक गोष्टी-

विषयीं मला जितकी आस्था आहे, तितकी दक्षिणेंतील कोणत्याहि गोऱ्या मनुष्याला नाहीं. दुसऱ्या कोणत्याहि कारणामुळें नसलें, तरी निदान या एका कारणामुळें तरी ज्ञातीज्ञातीमध्यें वितुष्ट वाढविणारी किंवा उत्तर व दक्षिण या भागांत गैरसमज उत्पन्न करणारी कोणतीहि गोष्ट मी जाणूनबुजून कधींहि करणार नाहीं.

ब्राऊन्सव्हिल ( टेक्सास ) येथें बंड झाल्यामुळें पंचविसाव्या निग्रो पलटणीचा कांहीं भाग काढून टाकण्याच्या प्रेसिडेंट रुझवेल्टच्या हुकुमा-विषयींची चळवळ आतां सर्वत्र शांत झाली आहे; तेव्हां या प्रसंगीं त्यासंबंधीं दोन शब्द सांगणें अप्रासंगिक होणार नाहीं. मीं वर वर्णन केलेला त्यांचा स्वभाव या हुकुमांतहि दिसून येतो. निग्रो शिपाई दोषी होते असें धरून चाललें, तरी मिस्टर रुझवेल्टची त्यांना शिक्षा कर-ण्याची पद्धत मला पसंत पडली नाहीं. तो हुकुम सोडण्याच्या पूर्वीं कांहीं दिवस त्यांनीं नेहमींच्या पद्धतीप्रमाणें आपण काय करणार आहों, हें स्पष्ट सांगितलें. शिपायांनां शिक्षा देण्याची दुसरी कांहीं तरी पद्धत काढा, असें मीं त्यांला विनविलें. जरी कांहीं बाबतींत मीं त्यांचें मत बदलण्यास कारण झालों, तरी या बाबतींत ' आपलें मत ठाम झालें आहे, तें आतां बदलणार नाहीं; कारण तें बरोबर आहे अशी आपली खात्री आहे,' असें त्यांनीं मला सांगितलें.

हा हुकुम सोडण्याच्या वेळीं, अमेरिकेंतील कोटी निग्रोंनां कर्नल रुझवेल्टइतका दुसरा कोणीहि प्रिय नव्हता. त्यांची स्तुति प्रत्येक संधीला ते गात असत. ते त्यांनां देवासारखे वाटत. थोड्याच दिव-सांत, छेः, थोड्याच तासांत या हुकुमामुळें या कोटी लोकांचा स्तुति-पाठ पार लयाला जाऊन त्यांचे जागीं टीका व निंदा हे प्रकार आले,

हा हुकुम बदलावा, अशी मिस्टर रुझवेल्टच्या पुष्कळ गोऱ्या व काळ्या जिवलग मित्रांनीं त्यांची वारंवार विनंति केली. त्या वेळीं 'सेक्रेटरी ऑफ वॉर' या हुद्द्यावर असलेले मिस्टर टाफ्ट यांनींहि तो हुकुम परत घ्यावा किंवा बदलावा, अशी विनवणी केली. मींहि तीच विज्ञप्ति केली. त्यांनीं कोणाचेंहि ऐकिलें नाहीं. आपला हुकुम न्याय्य आहे, अशी आपली खात्री आहे आणि आपलें कृत्य कालांतरानें बरोबर ठरेल, असें त्यांनीं सांगितलें.

या हुकुमाचा परिणाम काय होईल, या कल्पनेनें मला अत्यंत हुरहुर लागली होती खरी; तरी निंदा व टीका यांचें वादळ येऊन जाईपर्यंत व पुनः सर्व शांत होईपर्यंत मिस्टर रुझवेल्टनीं दमानें वाट कशी पाहिली याचें मला कौतुक वाटल्याखेरीज राहत नाहीं, हें मी कबूल करतों. या देशांतील निग्रो लोकांविषयीं जो कांहीं मार्ग त्यांनीं आंखून ठेविला होता, त्या मार्गापासून लोकांच्या टीकांनीं व निषेधांनीं ते यत्किंचित्हि ढळले नाहींत. ब्राऊन्सव्हिलच्या प्रकरणानंतर पूर्वीप्रमाणेंच निग्रोंविषयीं त्यांची वृत्ति अनुकूल राहिली.

तो हुकुम बाहेर पडून आज कित्येक महिने लोटले आहेत, चळवळ शांत झाली आहे आणि वितुष्ट नाहींसें झालें आहे. कर्नल रुझवेल्टनीं तो हुकुम सोडण्यांत चूक केली असें बहुतेक निग्रो लोकांचें जरी मत आहे, तरी अमेरिकेंतील कोटि निग्रो लोकांनां त्यांच्याहून अधिक प्रिय व आवडता असा अद्यापिहि दुसरा कोणी नाहीं, असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं.

प्रकरण आठवें.

# दक्षिणेंतील माझ्या शिक्षणविषयक सफरी आणि त्यांनीं मला काय शिकविलें ?

[ आपल्या जातीला योग्य तें शिक्षण देण्यांत पुरीं दोन तपें खर्च केल्यानंतर या शिक्षणानें व नवजीवनसंचारानें निग्रो लोकांनीं आत्मोद्धार कसा केला आहे, हें प्रत्यक्ष पाहण्याकरितां व जातीच्या हिताच्या अनेक गोष्टी स्वबांधवांशीं प्रत्यक्ष बोलून, साधल्यास दक्षिणेंतील गोऱ्या व काळ्या लोकांमध्यें सख्य जोडण्यास मदत करण्याकरितां वाशिंग्टननें दक्षिणी संस्थानांत मोहिमी कराव्या, हें योग्यच आहे.

पन्नास वर्षांपूर्वी जे लोक गुरांजनावरांप्रमाणें विकले जात, पंधरावीस वर्षांपूर्वी ज्या लोकांची स्थिति काबाडकष्ट करणाऱ्या हमालाहून अधिक नव्हती, तेच आज धनवान शेतकरी, पेढीवाले, शिक्षक, धर्मोपदेशक, अंमलदार अथवा कारागीर बनून समाजांत प्रतिष्ठित पदाला पोहोंचले आहेत, हें पाहून वाशिंग्टनला किती धन्यता वाटली असेल, याची कल्पनाच करावी. शिक्षणाची महती ओळखून सर्व पंथांचे व प्रांतांचे निग्रो परस्परांतील चुरस विसरून ज्ञानाच्या प्रसारार्थ मनापासून एकदिलानें झटत असलेले पाहून वाशिंग्टनला आपली आजपर्यंतची तपश्चर्या सफळ झाली ह्मणून समाधान वाटलें असेल. जमिनी खरेदी केल्यानें, घरें बांधल्यानें व पैसा शिल्लक टाकल्यानें समाजांत वजन वाढून सामर्थ्य अंगीं येतें, आणि व्यापारधंद्यांत व कारभारीपणांत आपली योग्यता जगाच्या निदर्शनाला आणून दिल्यानें आपला दर्जा आपोआप वाढतो, हें जसें निग्रोंनां आतां कळलें आहे, तसें आमच्या लोकांनां समजेल तर जातीमत्सराच्या क्षयकारी व्यसनाला बळी न पडतां प्रत्येक जात आत्मोद्धार करूं शकेल. परिस्थितींतील साधक गोष्टींकडे लक्ष्य देऊन त्यांचा पूर्ण फायदा घेतल्यानें व आपण राहत असलेल्या समाजाला आपली उपयुक्तता व आवश्यकता पटवून दिल्यानें आपल्या मार्गांतील सर्व अडचणी हळुहळू दूर करतां येतील. ]

आरकान्सस आणि ओक्लाहोमा या प्रांतांतून कांहीं वर्षांपूर्वी मीं माझ्या कांहीं खास मित्रांसह एक आठवडाभर प्रवास केला. त्या मित्रमंडळींत बहुतेक लिटलरॉक येथील निग्रो व्यापारी होते. आह्मीं वाटेंत मुख्यमुख्य शहरें पाहिलीं आणि वेळ व संधि मिळाली तेथें दोन्ही ज्ञातींच्या श्रोतृगणां-समोर भाषणेंहि केलीं.

आठ दिवसांच्या सफरींत पहातां येईल तितका प्रदेश पहाण्यास मिळावा आणि आमचा प्रवास शक्य तितका सुखकर व्हावा, ह्मणून सेन्ट लुईस येथें आगगाडीचा आह्मीं एक स्वतंत्र डबा ठरवला आणि १७ नोवेंबर १९०५ रोजीं रात्रौ आमच्या अत्यंत रम्य व संस्मरणीय अशा प्रवासाला आह्मी निघालों.

लिटलरॉक येथें व नजीकच्या पाईन ब्लफ या गांवीं निग्रो लोक आपली प्रगति कशी करून घेत आहेत, हें मीं तेथें येऊन स्वतः पहावें, अशी विनंति माझे मित्र मि० जॉन इ. बुश (लिटलरॉक येथील 'रिसिव्हर ऑफ पब्लिक मनीझ' व तेथील निग्रो बिझिनेस लीग—उद्यमसंघाचे—त्या वेळचे प्रमुख) हे कित्येक वर्षें करीत होते. हें आमंत्रण स्वीकारण्याचें मीं शेवटीं ठरविलें आणि या संधीचा फायदा घेऊन जवळच्या ओक्लाहोमा संस्थानांतील निग्रो लोकांची प्रगतिहि पहावी, असा मीं संकल्प केला. त्या वेळीं ओक्लाहोमा हें विशेषतः इंडि-यन लोकांचेंच होतें.

त्या वेळीं दक्षिणेंतून हजारों निग्रो या नव्या संस्थानांत येत असत. ओक्लाहोमा संस्थानांतील निरनिराळ्या भागांत माझे कांहीं विद्यार्थीहि व्यापार करीत किंवा शाळांत शिकवीत होते. निग्रो लोक या प्रांतांत विशेषतः मस्कोगी येथें व बोली नांवाच्या लहान सुंदर शहरीं आपली

प्रगति कशी करून घेत आहेत, याविषयीं त्यांच्यापासून व दुसऱ्या लोकांपासून मीं पुष्कळ ऐकिलें होतें. थोड्या वर्षांतच बोली येथें निग्रोंनीं आपल्या स्वतःच्या देखरेखीखालीं एक लहानसें समृद्ध शहर वसविलें. या शहरांत एकहि गोरा रहिवासी नव्हता.

माझ्या प्रवासांत आरकान्सस संस्थानांतील लिटलरॉक व पाइन ब्लफ हीं शहरें तर मीं पाहिलींच. यांशिवाय ओक्लाहोमा संस्थानांतील ओक्लाहोमा शहर, गथरी, मस्कोगी, साऊथमॅक-अलस्टर, हीं व दुसरीं कित्येक शहरेंहि पाहिलीं. निग्रो वसाहतवाल्यांचें धाडस आणि त्यांची भौतिक व व्यावहारिक प्रगति पाहून मी फार चकित झालों. टेक्सास व कान्सास येथील आपली शेतीभाती किफायतीनें विकून आपला पैसा या नवीन प्रांतांत घालण्यासाठीं आलेले बरेच यशस्वी शेतकरी मला भेटले. संस्थानच्या बहुतेक भागांत यशस्वी व्यापारी, पेढीवाले आणि इतर धंदेवाले लोक यांची मीं ओळख करून घेतली. साऊथ-मॅकअलस्टर येथें इ. इ. मॅक्डॅनिअल्स नांवाच्या एका यशस्वी रेल्वे कंट्राक्टराच्या घरीं मी राहिलों. या धंद्यांतला हाच पहिला निग्रो मला भेटला. ओक्लाहोमाशहरीं आलबर्ट स्मिथ नांवाचा गृहस्थ भेटल्याचें मला स्मरतें. कापसाच्या उत्तम गट्ठ्याबद्दल १९०० सालीं पारिसच्या प्रदर्शनांत त्याला बक्षीस मिळाल्यामुळें त्याची ‘ निग्रो कॉटन किंग ’ अशी त्या प्रांतीं प्रसिद्धी आहे. या सर्व लोकांशीं मला संभाषण करतां आलें; त्यांच्या चुका, अडचणी, त्यांचे प्रयत्न व त्यांनीं संपादिलेलें यश यांविषयींच्या गोष्टी मला त्यांच्या तोंडून ऐकावयाला मिळाल्या, हें पाहून मला फार आनंद झाला. याप्रमाणें त्यांच्या घरीं अगदीं सल-गीनें व मोकळेपणानें संभाषण केल्यामुळें माझ्या ज्ञातीच्या उन्नतीप्रीत्यर्थ

कोणत्या शक्ति काम करीत आहेत, याची मला जशी खरी व पुरी माहिती मिळाली, तशी माहिती मला दुसऱ्या कोणत्याहि मार्गानें मिळाली नसती.

एक गोष्ट माझ्या मनांत विशेष ठसली. ती गोष्ट ह्मणजे नैर्ऋत्येच्या या नवीन भागांत येणाऱ्या निग्रो लोकांची स्थिति, व तीस वर्षांपूर्वी कान्सास येथें येऊन भरणाऱ्या निग्रो लोकांची स्थिति, या दोन्हीं-मधील भेद किंवा अंतर होय. त्या वेळीं ह्मणजे तीस वर्षांपूर्वी लुसेनिया, आरकान्सस आणि मिसिसिपी येथील मळ्यांतून चाळीस हजार अनाथ व कर्तव्यमूढ असे निग्रो लोक अधिक स्वातंत्र्य व चांगल्या संधी मिळाव्या ह्मणून कान्सासला लोटले होते. आतां त्याच कान्सास प्रांतां-तून त्याच उद्देशानें लोक ओक्लाहोमांत जात आहेत. पण दोहों स्थितींत किती अंतर! आतांच्या वसाहतवाल्यांनां आपण कोठें जाणार हें माहीत होतें, त्यांनीं आपल्याबरोबर थोडेंसें भांडवलहि आणलें होतें; मुक्कामाला गेल्यावर तेथें आपणाला काय आढळणार आणि आपण काय करणार, याची त्यांनां स्पष्ट कल्पना होती. या दोन्ही वसाहत-वाल्यांच्या स्थितींतील अंतर हें निग्रो लोकांनीं तीसबत्तीस वर्षांत आपली जी प्रगति करून घेतली आहे, तिचें चांगलें द्योतक आहे.

पुढच्या पांच वर्षांत, मिसिसिपी, टेनेसी, साऊथ कॅरोलिना, नॉर्थ कॅरोलिना, व्हर्जीनिया व वेस्ट व्हर्जीनिया यांच्या भागांत निग्रो व्यापारी व धंदेवाले यांच्या मंडळ्यांसहित मीं वर सांगितल्याप्रमाणें प्रवास केले, आणि बरेंच निरीक्षणहि केलें. या प्रवासामध्यें स्पेशल आगगाड्यांचा आह्मीं उपयोग केला. यामुळें आह्मांला आमच्या सोयीप्रमाणें बरेंच लांब जातां आलें. प्रत्येक प्रवासांत मिळालेल्या संधींचा मीं चांगला

उपयोग करून घेतला. लोकांना व्यक्तिश: भेटून त्यांच्याशीं मीं भाषण केलें, इतकेंच नव्हे, तर काळ्या व गोऱ्या लोकांच्या मोठ्या श्रोतृगणांसमोर मीं व्याख्यानें दिलीं. दोन्ही ज्ञातींना हितकारक गोष्टी, विशेषत: निग्रो शाळांची कार्यक्षमता व पात्रता वाढविल्यापासून दोन्ही ज्ञातींना होणारे फायदे इत्यादि विषयांवर मीं भाषणें केलीं. खरोखर माझ्या अशा तीन सफरी झाल्या नाहींत, तोंच या सफरी ह्मणजे निग्रो शिक्षणाच्या मोहिमी किंवा मोठ्या चळवळीच आहेत, असें मीं प्रवास केलेल्या प्रत्येक संस्थानांतील काळे व गोरे लोक मानूं लागले.

या सफरींचें स्वरूप कसें होतें आणि या सफरींपासून मीं प्रवास केलेल्या संस्थानांतील निग्रो लोकांच्या स्थितीविषयीं मला मिळालेली खरीखुरी माहिती कशी होती, हें मीं मिसिसिपीमध्यें १९०८ सालीं केलेल्या प्रवासाचें सविस्तर वर्णन दिलें असतां चांगलें समजेल. आमच्या प्रवासाचे हेतु व पूर्तता यांविषयीं सर्वांना मोठी आस्था वाटत होती. मिसिसिपीच्या निग्रो उद्यमसंघाच्या सूचनेप्रमाणें जरी आम्ही प्रवास करीत होतों, तरी त्या संस्थानांतील प्रत्येक संस्थेचे प्रतिनिधी आम्हांबरोबर कांहीं अंतरापर्यंत येत किंवा आह्मीं मुक्काम केलेल्या ठिकाणीं सभा चांगल्या रीतीनें भरविण्याला मदत करीत. उदाहरणार्थ, आठवड्याच्या सफरींत निग्रो व्यांकांचे आठ प्रतिनिधी व कांहीं यशस्वी व्यापारी आमच्याबरोबर होते. यांमध्यें मिसिसिपीच्या निग्रो उद्यमसंघाचे प्रेसिडेंट, त्या संस्थानांतील अत्यंत वजनदार निग्रो गृहस्थ, चार्लस बँक्स हे होते. आमचा प्रवास सुखकर व यशस्वी होण्याची सर्व व्यवस्था बहुतेक यांनींच केली. व्यापारी लोकांशिवाय, धार्मिक संस्था, मिसिसिपींत विशेषत: पुष्कळ जोरदार असलेल्या गुप्त संस्था,

मराठी ग्रंथ संग्रहालय

यांचे प्रतिनिधी आणि उद्यमसंघाचे सभासद या सर्वांनी मिळून संस्थानांत ठिकठिकाणीं भरणाऱ्या आमच्या सभा निर्विघ्नपणें पार पडाव्या, आणि यशस्वी व्हाव्या, ह्मणून शक्य तितके प्रयत्न केले.

मिसिसिपी संस्थानांतील व्यापारी, शिक्षक, निरनिराळ्या धार्मिक संस्थांचे सभासद हे सर्व तेथील निग्रो मुलांनां चांगलें व योग्य शिक्षण मिळावें ह्मणून एकजुटीनें प्रयत्न करीत आहेत आणि निग्रो लोकांनीं मिळकत करावी व घरें बांधावीं ह्मणून आपलें वजन खर्च करीत आहेत, हें त्या संस्थानांतील माझ्या ज्ञातीच्या उन्नतीला अत्यंत महत्त्वाचें आहे.

उदाहरणार्थ, आमच्या पार्टीचे सभासद डॉ. इ. सी. नॉरिस हे दोन लाख सभासद असलेल्या, ' दि नॅशनल बॅपटिस्ट कनव्हेनशन ' नांवाच्या जगांतील सर्वांत मोठ्या निग्रो संस्थेचे प्रतिनिधि आहेत; तसेंच ३,२२,००० डालर किंमतीच्या मालकीची मिळकत, ७०,००० सभासद असलेल्या ' निग्रो पिथियन ' संस्थेच्या फायनान्स कमिटीचे सभासद आहेत. क्विनडारो (कान्सास) येथील निग्रो कॉलेजचे हल्लींचे प्रेसिडेंट डॉ. एच्. टी. कीलींग हे ' आफ्रिकन मेथाडिस्ट एपिस्कोपल रिव्ह्यू' नामक मासिकाचे संपादक आहेत. हें मासिक निग्रो ज्ञातींनीं प्रसिद्ध केलेल्या सर्व मासिकांत उत्तम व वजनदार असें आहे. हें पंचविसांहून अधिक वर्षें चाललें आहे.

निग्रो ज्ञातीच्या भौतिक व नैतिक उन्नतिविषयींची आस्था किती सार्वत्रिक आहे हें दाखविण्यासाठीं मीं या गृहस्थांचीं नांवें व निग्रो लोकांतील त्यांचा दर्जा व वजन, हीं सांगितलेलीं आहेत.

मिसिसिपी संस्थानांतील लोक आपली प्रगति कशी करून घेत आहेत, हें मीं तेथें जाण्यापूर्वीं पर्यायानें ऐकिलें होतें. तसेंच त्यांनां

सोसाव्या लागणाऱ्या अडचणींविषयींहि मीं वर्तमानपत्रांतून बरेंच वाचलेलें होतें. उदाहरणार्थ, मिसिसिपी संस्थानच्या कांहीं भागांतून बऱ्याच निग्रो लोकांनां *'व्हाइट कॅंपिंग' संस्थांच्या प्रयत्नामुळें बाहेर हांकलण्यांत आलें होतें. संस्थानच्या दुसऱ्या कांहीं भागांत काळे व गोरे लोक अमेरिकेंतील इतर भागांप्रमाणें परस्परांशीं चांगल्या रीतीनें वागतात.

मेंफिस सोडल्यावर आह्मी प्रथम मार्शल परगण्यांत होली स्प्रिंग्स येथें गेलों. पुष्कळ दिवसांपासून होली स्प्रिंग्स हें मिसिसिपीच्या निग्रो लोकांचें शिक्षणाचें केंद्र आहे. सिव्हिलवॉरनंतर मेथाडिस्ट चर्चच्या 'फ्रीड मेन्स एड अॅन्ड सदर्न एज्युकेशनल सोसायटी' नामक संस्थेनें येथें 'रुस्ट' युनिव्हर्सिटीची स्थापना केली. कांहीं वर्षांपूर्वीं होली स्प्रिंग्स येथें निग्रो शिक्षक तयार करण्याचें एक 'स्टेट नॉर्मल स्कुल' होतें. पण तें पूर्वीच्या व्हर्डमन नांवाच्या गव्हरनरानें बंद करून टाकिलें. हें स्कुल बंद केल्यामुळें संस्थानांतील निग्रो लोक फार निराश झाले. शाळेची नेमणूक बंद करण्यांत गव्हरनरांनीं संस्थानच्या निग्रो शिक्षणावर हल्ला केला असें त्यांनां वाटलें. 'स्टेट नॉर्मल स्कुल'च्या जागीं, त्याचें काम चालू ठेवण्यासाठीं बिशप कॉट्रेलच्या नेतृत्वाखालीं एक नवीन औद्योगिक व धार्मिक शाळा उभारण्यांत आली. या नवीन शाळेच्या दोन सुंदर आधुनिक पद्धतीच्या इमारती बांधण्यासाठीं मिसि-सिपीच्या निग्रो लोकांकडून बिशप कॉट्रेल यांनीं गेल्या दोन वर्षांत ७५,००० डालरपेक्षां अधिक रक्कम जमविली. याच शहरांत अलिकडे

* या संस्थेचे सभासद पांढरा वेष धारण करितात. ते 'लिंच' म्हणजे मुलतानी न्यायाचा अवलंब करून त्यांनां अनिष्ट वाटणाऱ्या लोकांनां शिक्षा करून बाहेर हांकून लावितात किंवा ठार करतात.

संस्थानांतील 'निग्रो बॅपटिस्ट' लोकांच्या वर्गणीनें 'स्टेट नार्मल स्कुल'ची जागा भरून काढण्यासाठीं 'बॅपटिस्ट नॉर्मल स्कुल' नांवाची एक शाळा स्थापन झाली आहे.

होली स्प्रिंग्स येथें शिक्षणाविषयीं जो उत्साह मला आढळून आला, तो मी गेलेल्या संस्थानांतील प्रत्येक भागांतील शिक्षणाविषयींच्या उत्साहाचा द्योतक होता. युटिका येथें टस्कगी संस्थेचे ग्रॅज्युएट विलियम एम्. एच्. हाल्टझक्लॉ यांनीं ता. २७ आक्टोबर १९०३ रोजीं स्थापिलेल्या 'युटिका इन्स्टिटयुट'च्या दिवाणखान्यांत मीं व्याख्यान दिलें. टस्कगी संस्थेच्या नमुन्याप्रमाणें चालणाऱ्या शाळेची ज्या निग्रो लोकांनां अत्यंत गरज आहे अशा लोकांमध्यें जाऊन राहण्याचा मिस्टर हाल्टझक्ला यानें टस्कगीसंस्थेंतून निघाल्यावर निश्चय केला. लगेच तो हिंड्स परगण्यांत येऊन राहिला. येथें चाळीस हजार निग्रो लोक आहेत; त्यांपैकीं तेरा हजार लोकांनां लिहितांवाचतां येत नाहीं. 'युटिका इन्स्टिटयुट' स्थापन झालेल्या समाजांत निग्रो लोक गोऱ्या लोकांपेक्षां ७ ते १ या प्रमाणांत अधिक आहेत. तो प्रथम विद्यार्थ्यांनां जंगलांत शिकवूं लागला. पहिल्यापासून त्यानें आपल्या कार्याला दोन्ही ज्ञातींची सहानुभूति मिळविली. संस्था सुरू झाल्यापासून पांच वर्षांच्या आंत पंधराशें एकर जमीन त्यानें विकत घेतली आणि तीन मोठ्या व (शाळेंतील वर्ग, दुकानें आणि वसतिगृह यांसाठीं) अकरा लहान इमारती उभारिल्या. शेतावर एक मोठा वाडा आणि शेतकीचीं तीस लहान घरें त्यानें बांधलीं. संस्थेच्या मालकीच्या मिळकतीची कमींत कमी किंमत ७५,००० डालरहून अधिक येईल, असें त्यानें मला सांगितलें. याशिवाय आपल्या कार्याला कायमचें स्वरूप यावें आणि गरीब हुशार

विद्यार्थ्यांनां छात्रवृत्त्या देऊन मदत करावी, ह्मणून त्यानें 'एन्डावमेंट (कायमचा) फंड' सुरू केला आहे.

जॅकसन येथें निग्रो विद्यार्थ्यांसाठीं दोन कालेजें आहेत. आफ्रिकन मेथाडिस्ट एपिसकोपलचर्चनें क्यांवेल कालेजची स्थापना केली. वॅपटिस्ट पंथानें जॅकसन कालेज स्थापिलें आहे. त्या पंथाच्या मदतीनें तें चाललें आहे. विद्यार्थ्यांच्या उपयोगासाठीं एक नवीन सुंदर इमारत या कालेजनें बांधून दिली. नाटचेझ येथें वीस हजार डालर खर्च करून मिसिसिपीच्या वॅपटिस्ट लोकांनीं बांधिलेल्या सुंदर नव्या इमारतींच्या अर्पणप्रसंगीं (वास्तुप्रसंगीं) भाषण करण्यासाठीं मला आमंत्रण दिलेलें होतें.

येथें कदाचित् हें सांगणें योग्य होईल, कीं, धार्मिक गोष्टींविषयीं निरनिराळ्या निग्रो चर्चमध्यें स्पर्धा आहे खरी. पण लोकांच्या पुढाऱ्यांनां शिक्षणाच्या प्रश्नाचें महत्त्व जसजसें कळत चाललें आहे, तसतसें पंथभेदांकडे लक्ष्य न देतां निग्रो मुलांनां शिक्षण देण्याच्या निष्काम प्रयत्नांत ती स्पर्धा हळुहळू नाहींशी होत चालली आहे, असें मला वाटतें. निरनिराळ्या पंथांच्या शाळा त्या त्या पंथांतील लोकांनीं ज्ञातींतील लोकांनां शिक्षण मिळावें ह्मणून वर्गणी जमवून काढिलेल्या आहेत.

निग्रो लोकांची भौतिक उन्नति कसकशी होत गेली आहे हें दक्षिणेंतील सर्व भागांमध्यें त्यांनीं काढिलेल्या व्यांकांच्या संख्येनें फार चांगलें समजतें. या संस्थांचा लोकांवर काय परिणाम झाला आहे, हें कांहीं तरी समजावें म्हणून मीं कसून प्रयत्न केला आहे. हल्लीं अमेरिकेंत निग्रो बँका छपन्नाहून कमी नाहींत. यांपैकीं अकरा मिसिसिपी संस्थानांत आहेत. निग्रो बँका गुप्त व बांधव समाजामुळें अस्तित्वांत आल्या आहेत, असें मला पुष्कळदां आढळून आलें आहे. उदाहरणार्थ, मिसि-

सिपी संस्थानांत अशा बेचाळीस संस्था आहेत आणि त्यांनीं १९०७ सालीं ५,०८,६७० डालर जमा केले, आणि ५,२२,७५७ डालर नुकसानीबाबत भरले. या संस्थांना आपल्या फंडाची रक्कम ठेवीच्या रूपानें ठेवितां यावी ह्मणून पुष्कळदां या ब्यांका स्थापन झालेल्या आहेत. यांनां नंतर सेविंग्स ब्यांकचें खातें जोडून निग्रो व्यापाऱ्यांनीं गेल्या दहा वर्षांत स्थापन केलेल्या निरनिराळ्या दुकानांकरितां पेढीचें व अडतीचें काम केलेलें आहे.

जॅकसन शहरीं जाण्यापूर्वीं मीं त्या शहराची माहिती मुद्दाम मिळविली होती. तीवरून मला असें दिसून आलें, कीं, त्या शहरांत निग्रो लोकांनीं त्र्याण्णव उद्योगधंदे चालविले होते. यांपैकीं चवेचाळीस धंद्यांत ३,८८,००० डालरचा व्यापार झाला. यांत एका कंट्राक्टरानेंच १०,००० डालरचा व्यापार केला. शेंकडा त्र्याहत्तर निग्रो लोकांचीं मालकीचीं घरें होतीं किंवा तीं ते विकत घेत होते. जॅकसन शहरांतील अर्धी लोकसंख्या निग्रोंची आहे आणि त्या शहरांतील क्षेत्रफळाचा एकतृतीयांश भाग निग्रो लोकांच्या मालकीचा आहे, असें सांगतात. या भागाची किंमत शहरांतील सर्व करांच्या एकअकरांश आहे.

त्या वेळच्या अंदाजाप्रमाणें निग्रो लोकांच्या शहरांतील ब्यांकांत २,००,००० डालरच्या ठेवी होत्या. यांपैकीं, ७०,००० डालर शहरांतीत दोन निग्रो ब्यांकांत होते. बहुतेक उद्योगधंदे गेल्या दहा वर्षांत सुरू झाले आहेत, असें मला कळलें. पण वस्तुतः जॅकसनमध्यें फार जुना व्यापारी निग्रोच आहे. मी तेथें गेल्यावेळीं त्याच्या घरीं उतरलों होतों. त्याचें नांव एच. टी. रिशर. जॅकसनमध्यें आपल्या धंद्यांत तो वजनदार पुढारी आहे. त्याचा रोटीचा कारखाना व फरा-

ळाचें दुकान हीं विसांहून अधिक वर्षें चाललीं आहेत. जॅकसनमध्यें निग्रो लोकांचीं बरींच घरें सुंदर आहेत, आणि याचें घर तर सर्वांत सुंदर आहे. संस्थानांतून प्रवास करतांना हें घर पाहण्याचा योग मला आला होता.

नाटचेझचे डॉ. ए. डब्ल्यू. डुमास यांचें औषधें विकण्याचें दुकान मला विशेष आवडलें. विटांनीं बांधिलेल्या दोन मजली इमारतींत तें दुकान आहे. अमेरिकेंत पुष्कळ निग्रोंचीं अशीं दुकानें आहेत;पण या दुकानासारखी व्यवस्था व शोभा मला दुसऱ्या कोणत्याहि दुकानांत दिसून आली नाहीं.

आमच्या प्रवासाच्या योजनेप्रमाणें, आह्मी मेंफिसहून निघून, होली-स्प्रिंग, युटिका, जॅकसन, नाटचेझ, व्हिक्सबर्ग, ग्रीनव्हील, माऊंडबायु या शहरीं जाऊन मिसिसिपी संस्थानांत सात दिवस घालविणार होतों, आणि रविवारीं हेलेना ( आरकान्सस ) येथें जाणार होतों. पण वाटेंत आह्मी इतर ठिकाणींहि थांबलों आणि रेल्वेलाईनवर ठिकठिकाणीं काळ्या व गोऱ्या श्रोतृवृंदासमोर भाषण करण्याची संधि मला मिळाली. कंडक्टरनीं अनेक जागीं मेहरबानीनें गाडी थांबविली आणि त्यामुळें या आठ दिवसांत सुमारें चाळीस ते पन्नास हजार लोकांशीं मला भाषण करितां आलें. आमच्या कार्याविषयीं जागोजाग काळ्या व गोऱ्या लोकांत उत्साह व आस्था हीं दिसून आलीं. निग्रोंच्या प्रश्नाविषयीं निग्रो लोकांच्या विरुद्ध जॅकसनमध्यें कांहीं वर्षें चळवळ चाललेली असल्यामुळें, गोऱ्या लोकांनीं सभेला हजर राहूं नये, अशी कांहींजणांनीं हरकत घेतली. पण श्रोतृवृंदांत गव्हरनर नोल, लेफ्टनंट गव्हरनर मॅनशीप, मिसिसिपींतील अत्यंत श्रीमान् गृहस्थ

मेजर आर. डब्ल्यू. मिलसॅप्स, मेथाडिस्ट एपिसकोपल चर्चचे नुकतेच वारलेले बिशप चार्लस बी. गालोवे, युनायटेड स्टेट्सचे मार्शल एडगर एस. विलसन आणि इतर प्रमुख लोक होते, असें मला सांगण्यांत आलें.

नाटचेझ येथें सभेचा हेतु गोऱ्या लोकांनां इतका कांहीं आवडला, कीं, दोन्ही ज्ञातींच्या लोकांनां बसावयाला सारखी जागा मिळण्याची व्यवस्था केली, तर आह्मी नाटकगृहाचें भाडें देऊं, असें त्यांनीं सांगितलें. व्हिक्सबर्ग येथें स्केटिंग (बर्फावरून घसरत जाणें)च्या अभ्यासासाठीं कांहीं काळ उपयोगांत आणलेल्या एका मोठ्या इमारतींत मीं भाषण केलें. सभेला हजर राहू इच्छिणाऱ्या शेंकडों लोकांनां जागा मिळाली नाहीं, असें मला समजलें. ग्रीनव्हील येथें कोर्टहाऊसमध्यें मीं व्याख्यान दिलें. तेथें पुष्कळ लोकांनां येतां न आल्यामुळें शेरिफच्या सूचनेवरून मीं कोर्टहाऊसच्या पायरीवर उभें राहून दुसरें एक व्याख्यान दिलें.

आमच्या प्रवासांतील सर्वांत मोठी व यशस्वी सभा माऊंडबायो येथें भरली होती. हें शहर निग्रोंनीं वसविलेलें असून त्यांच्याच ताब्यांत आहे. हें शहर तीन हजार निग्रो लोकांच्या वसाहतीचें केंद्र आहे. शहराला लागून असलेली ३०,००० एकर जमीन निग्रोंच्या मालकीची आहे. माऊंडबायो हें डेल्टा प्रांताचें मध्य आहे, आणि येथें निग्रो लोक गोऱ्या लोकांपेक्षां १० ते १ या प्रमाणांत अधिक आहेत. याशिवाय दुसऱ्या निग्रो वसाहती आहेत, तेथें एकहि गोरा इसम रहात नाहीं. माझें भाषण ऐकण्यासाठीं लोक आजूबाजूच्या शेतांत जेथपर्यंत माझा आवाज ऐकूं जाई, तेथपर्यंत पसरलेले होते. या शहराच्या कामगिरीविषयीं व भावी

स्थितीविषयीं माझ्या मनावर फार चांगला परिणाम झाला. स्थानिक स्वराज्य व व्यापार यांत यश कसें मिळवावें, याचें उत्तम उदाहरण निग्रो लोक येथें घालून देत आहेत.

मिसिसिपीच्या माझ्या प्रवासांत मला जें कांहीं निरीक्षण करतां आलें आणि इतरांकडून मला जें कांहीं समजलें, त्यावरून मी असें अनुमान काढितों, कीं, या संस्थानांतील निग्रो लोकांनीं सिव्हिलवॉर-नंतरच्या कालापेक्षां गेल्या दहा वर्षांत अधिक कामगिरी बजावली आहे. जमिनी मिळविल्या असतां, घरें बांधिलीं असतां आणि पैसा शिलकी पाडला असतां आपण आपल्या समाजांत वजनदार होऊं असें निग्रो लोकांनां नीट समजल्यामुळें ही कामगिरी बहुतेक अंशीं साध्य झाली आहे. अमेरिकेंत मिसिसिपी संस्थानांतच निग्रोंच्या उन्नतीला विशेष अडथळा येतो, असें साधारणपणें समजण्यांत येतें. पण तेथें इतर ठिकाणांपेक्षां असें चांगलें प्रत्यास आलें आहे, कीं, निग्रोंनीं काट-कसरीची व उद्योगधंद्याची सवय लावून घेतली असतां, मिळकत मिळ-विली असतां आणि स्वतःला उपयुक्त केलें असतां, त्यांनां आशेचें द्वार खुलें होतें. हें द्वार बंद करून सोडावें, अशी दक्षिणेची इच्छा नाहीं.

माझ्या विधानाच्या स्पष्टीकरणार्थ मी असें सांगतों, कीं, मार्शल परगण्यांत गोरे लोक काळ्या लोकांपेक्षां तिप्पट आहेत, तरी सिव्हिल-वॉरपासून एकाच निग्रोला तेथें 'लिंच करण्यांत' ह्मणजे जबरदस्तीनें ठार करण्यांत आलें होतें, असें मला होली स्प्रिंग्स येथें कळलें. दोन्ही ज्ञाती अशा स्नेहभावानें राहूं शकल्या याचें कारण काय, असें मी तेथील काळ्या व गोऱ्या लोकांनां विचारतां दोघांनीं एकच उत्तर दिलें. मार्शल परगण्यांत बहुतेक निग्रो शेतकऱ्यांचीं स्वतःचीं शेतें आहेत हेंच त्याचें कारण

होय, असें त्या उभयतांनीं सांगितलें. याचें दुसरेंहि एक कारण असें आहे, कीं, मिसिसिपीच्या 'ऑड फेलोज' संस्थेच्या, होली स्प्रिंग्स येथें राहणाऱ्या खजीनदाराच्या २,००,००० डालरच्या ठेवी शहरांतील बँकांत नेहमीं होत्या.

वर सांगितलेल्या शिक्षणविषयक सफरी करण्याचा माझा हेतु, माझ्या ज्ञातीच्या लोकांची स्थिति प्रत्यक्ष पहावी एवढाच नसून, दोन्ही ज्ञातींमधील प्रत्यक्ष संबंध समजून घ्यावे आणि काळ्या व गोऱ्या लोकांमध्यें सलोखा वाढेल असे दोन शब्द सांगावे असाहि होता.

आणखी एक गोष्ट या प्रवासामध्यें वारंवार माझ्या नजरेला आलेली आहे. आपणाला उत्थापन कसें मिळालें असें मीं एकादा निग्रो शिक्षक, व्यापारी, पेढीवाला, व वैद्य यांनां विचारावें मात्र, तों सर्वांनीं आपल्या गांवांतील एका प्रमुख गोऱ्या मनुष्यानें आपणाला मदत केली असें न चुकतां सांगावें. या गोऱ्या इसमानें त्यांनां व्यापारांत सल्ला दिला असेल, कर्जाऊ रक्कम दिली असेल किंवा आपला पैसा किफायतवार कोठें गुंतवावा हें सांगितलें असेल. अशा रीतीनें त्याच्या मदतीनें ते पुढें आलेले होते, असें मला समजलें. कांहीं उदाहरणें तर अशीं होतीं, कीं, ज्या गोऱ्या इसमांनीं निग्रो लोकांनां खासगी रीतीनें अशी मदत केली होती ते आपल्या समाजाबाहेर सार्वजनिक आयुष्यक्रमांत निग्रो ज्ञातीचे कट्टे द्वेष्टे किंवा वैरी असे समजले जात होते.

दक्षिणेंतील माझ्या प्रवासांत हे अनुभव मला इतक्या खेपां आलेले आहेत, कीं, सार्वजनिक भाषणें व वर्तमानपत्रांतील रिपोर्ट हीं दोन्ही ज्ञातींमधील प्रत्यक्ष संबंधाचीं खरीं दर्शक नाहींत, असें मला कळून चुकलें आहे. कसें कां होईना, दक्षिणेंतील मुत्सद्दी सार्वजनिक भाषण

करण्यासाठीं प्लाटफार्मावर उभा राहिला ह्मणजे सहजच तो निग्रो बदनामी करूं लागतो. बहुत काळापासून तो हें काम करीत असल्या- मुळें त्याला ती संवयच पडून गेली आहे.

मीं वर्णन केलेल्या शिक्षणविषयक सफरींचा आणखी एक फायदा असा झाला, कीं, दक्षिणेंतील गोऱ्या लोकांनां लोकांसमोर उभें राहून निग्रोविषयीं आपल्या अंत:करणांत काय आहे, कोणती वृत्ति आहे हें प्रगट करण्याची संधि मिळाली. निग्रोविषयीं ही मनोवृत्ति म्हणजे दक्षिणेंतील गोऱ्या मनुष्याच्या उच्च स्वभावाची उच्च बाजू होय आणि ती, एकदेशीय विचारांमुळें व राजकीय वादविवादांमुळें—मतभेदामुळें पुष्कळ वर्षे प्रगट झालेली नव्हती.

नॉर्थ कॅरोलिना संस्थानामधून माझी शेवटची सफर संपवून परत आल्यावर संस्थानांतील सर्व भागांतील प्रमुख लोकांचीं मला पत्रें आलीं. माझीं भाषणें व माझ्या सफरींनीं साधलें जाणारें कार्य याविषयीं त्यांनीं पत्रांत पसंती दर्शविली होती. हीं पत्रें व्यापारी लोक, सार्व- जनिक कामांत आयुष्य खर्च केलेले किंवा करणारे लोक आणि शाळांचे सुपरिन्टेंडेंट यांचेकडून आलीं. उदाहरणार्थ, विलसन येथील सार्वजनिक शाळांचे सुपरिन्टेंडंट चार्लस एन्. कून् यांनीं १९०९ सालीं अटलांटांतील शिक्षणपरिषेदेत निग्रो शाळांची अवश्यकता सप्रमाण सिद्ध केली होती. त्यांनीं आपल्या पत्रांत लिहिलें:—

"विलसन शहरला आपण दिलेली भेट व तिचे परिणाम यांचें महत्त्व मी स्वत: जाणतों. गोऱ्या व काळ्या प्रजेंतील सर्व वर्गांचे लोक आपलें भाषण ऐकावयाला आलेले होते. आपलें भाषण अप्रतिम झालें, असें पुष्कळ उत्तम गोऱ्या लोकांनीं मला सांगितलें आहे. आपण

पुन: येथें यावें असें त्यांपैकीं पुष्कळजण ह्मणत आहेत. आपलें भाषण सर्वांला ऐकावयास मिळावें ह्मणून कांहींजण एकादी मोठी वखार पहात आहेत.

"आपल्या आगमनानंतर येथील निग्रो शाळा निग्रो लोकांनां अधिक प्रिय झालेली आहे आणि गोऱ्या लोकांनां तिच्याविषयीं अधिक अभिमान वाटत आहे. आपणाला भाषण करतां येईल अशी आमची शाळेची इमारत आहे, याबद्दल मला आनंद वाटतो. निग्रो शाळा दर वर्षी सुधारत जाईल. व्हावी तितकी तिची सुधारणा झालेली नाहीं, तरी आह्मी पुढें जात आहों. आतां यापुढें तिला फारच थोडा विरोध होईल. गोऱ्या लोकांपुढें सर्व गोष्टी योग्य प्रकारें मांडल्या, तर निग्रो मुलांच्या शिक्षणावर त्यांचा विश्वास बसेल आणि त्या कामीं ते मदत करतील, अशी माझी आतां अधिक खात्री झालेली आहे. आमच्या निग्रो शाळेंत गोऱ्या मुलांपेक्षां काळ्या मुलांची संख्या अधिक आहे. खरोखर, उर-लेल्या शेवटच्या एका अहंमन्य गोऱ्या मनुष्याचें मन आपण सन्मार्गा-कडे वळविलें. त्या पाप्याचा व माझा समेट झालेला पाहून मला आनंद होत आहे."

सुपरिन्टेंडेंट कूनचें हें पत्र दक्षिणेंतील वाढत्या तरुण पिढीच्या निग्रो-विषयीं व निग्रो शिक्षणाविषयीं मताचें दर्शक असल्यामुळें मीं येथें दिलें आहे. दक्षिणेंतील वृद्ध गोऱ्या लोकांनां निग्रोविषयीं काय वाटतें, याची कल्पना ब्राऊन्सव्हिलमध्यें माझ्या भाषणाचे शेवटीं जज्ज बांड यांच्या उद्गारांवरून कदाचित् अधिक स्पष्ट होईल. ब्राऊन्सव्हिलमध्यें माझ्या भाषणाचे शेवटीं जज्ज बांड थोडेंसें बोलले. त्यांचें भाषण एका लघु-लेखकानें लिहून घेतलें आणि पुढें तें बोस्टन ट्रान्सक्रिप्ट पत्रांत प्रसिद्ध झालें होतें. ते ह्मणाले:—

" माझा जन्म दक्षिणेंत झाला आणि मी येथेंच लहानाचा मोठा झालों. आयुष्यभर माझा निग्रोशीं संबंध जडला. दक्षिणेंतील गोरा मनुष्य या नात्यानें मला असें वाटतें, कीं, मी निग्रोचा ऋणी आहें, तें ऋण माझ्या हातून कधींहि फिटणार नाहीं, किंवा दक्षिणेंतील कोणीहि गोरा मनुष्य त्याची फेड करणार नाहीं. सिव्हिलवॉरमध्यें आपलें घरदार, आपलीं बायकामुलें, निग्रोच्या हवालीं करून दक्षिणेंतील गोरा मनुष्य युद्धाला निघाला. निग्रोंनीं आपल्या धन्याचा विश्वासघात केला किंवा ते कृतघ्न झाले असें एकहि उदाहरण मीं अद्याप ऐकिलेलें नाहीं. ह्मणून तेव्हांपासून मी परमेश्वराला स्मरून अशी शपथ वाहिलेली आहे, कीं,मी मरेपर्यंत निग्रोंशीं कृतज्ञ राहीन आणि मी त्यांच्याशीं केव्हांहि अन्यायानें वागणार नाहीं. तेव्हांपासून मीं असा विचार व निश्चय केला आहे, कीं, जो गोरा मनुष्य आपण निग्रो लोकांचें ऋण देणें आहे असें परमेश्वराला स्मरून मानत नाहीं तो मनुष्यच नव्हे. हें ऋण फेडण्यास किंवा त्यांतून उतराई होण्यास जो सर्वकाळ व सर्व परिस्थितींत शक्य तितकी खटपट करीत नाहीं तो मनुष्यच नव्हे. या देशांत जर कोणी कोणाचा ऋणी असेल, तर दक्षिणेंतील गोरा मनुष्य दक्षिणेंतील काळ्या मनुष्याचा ऋणी आहे. ओहिओ नदीच्या पलीकडे ह्मणजे उत्तरेंतील गोरा मनुष्यहि त्याचा ऋणी आहे; पण परमेश्वराला स्मरून मी असें सांगतों, कीं, दक्षिणेंतील गोऱ्या मनुष्याच्या ऋणापुढें त्याचें ऋण कांहींच नाहीं. निग्रोंनीं पुष्कळ वर्षें इमानेंइतबारें व एकनिष्ठपणें जी दक्षिणेंतील गोऱ्या लोकांची सेवा केलेली आहे, तिच्या मोबदला निग्रो लोक व त्यांचीं मुलें यांविषयींच्या कर्तव्यकर्मांत जर आमच्या हातून अंतर पडेल तर आह्मीं, आमचीं मुलेंबाळें व

आमचे वंशज या सर्वांनां परमेश्वर शेवटीं काय शासन करील, याची मला कल्पनाहि करवत नाहीं.

"मला प्रसवतांना माझी आई मरण पावली. मी आतां वृद्ध होत चाललों. एका वृद्ध निग्रो मावशीनें मला कडेवर घेतलें, माझें संगोपन केलें आणि प्रेमानें मला वाढविलें. ही वृद्ध मावशी परमेश्वराच्या कृपेनें आज जीवंत आहे, आणि जरी ती इतकी वृद्ध आहे तरी ती, माझी बायको व मुलेंबाळें यांचें संगोपन व शुश्रूषा करण्याला प्रत्यहीं तयार आहे.

"कांहीं दिवसांपूर्वींची गोष्ट आतां मला चांगली आठवते. माझ्या सर्वांत लहान मुलीला देवीचा आजार झाला. मी तिची शुश्रुषा करीत माडीवरील एका खोलींत बसलों होतों. सांसर्गभयानें आह्मी (मी व मुलगी) माडीवर सर्व कुटुंबापासून दूर एके बाजूला राहिलों होतों. माझी बायको एकदां धावऱ्याधावऱ्या जिन्यावर चढून भीतभीत मला हांका मारूं लागली. दुसऱ्याहि एका मुलीला तोच आजार जडला असावा, अशी शंका येते असें तिनें मला कळविलें. आमची स्थिति त्या वेळीं काय झाली असेल याची कल्पनाच करावी. त्या मुलीलाहि कुटुंबांतून दूर काढणें जरूर होतें. पण खरोखर तिला तो रोग झाला आहे किंवा नाहीं,याविषयीं शंका असल्यामुळें तिला आमच्या खोलींतहि आणतां येईना. तिला दुसऱ्या एका निराळ्या खोलींत ठेवावें लागलें; पण तेथें आह्मां दोघांपैकीं कोणालाहि राहतां येईना. तिला तेथें अहोरात्र एकटेंच राहावें लागणार व तिची शुश्रूषा कशी होणार, या विवंचनेंत आम्ही होतों. इतक्यांत माझें संगोपन केलेली वृद्ध मावशी पुढें आली आणि म्हणाली, 'देवीचा आजार असो वा नसो, त्या मुलीला

आज रात्रीं किंवा पुढील रात्रीं एकटेंच त्या खोलींत राहतां येणार नाहीं. मी तिच्याबरोबर तेथें राहून तिची शुश्रूषा करणार, मला देवीचा आजार येऊन हवें तर उद्यां मरण येवो. त्याची फिकीर नाहीं.' जरूर असे तोंपर्यंत ती तिच्याबरोबर राहिली. परमेश्वर त्या वृद्ध मावशीचें कल्याण करो !

"वाशिंग्टनची माझी भेट झाली व त्यांचें भाषण मीं ऐकिलें, याबद्दल मला आनंद होत आहे. ते आपल्या ज्ञातीला भूषण आहेत आणि कोणत्याहि ज्ञातीला भूषण होतील. या देशांत त्यांच्यासारखे आणखी पुष्कळ पुरुष असते, तर किती बरें झालें असतें !

"अहो वाशिंग्टन, तुमच्या ज्ञातीच्या उन्नतीच्या कामीं परमेश्वर तुह्माला साहाय्य करो, आणि तुमच्यापासून दक्षिणेंतील काळ्या व गोऱ्या लोकांनां तुमच्या ज्ञातीची उन्नति करण्याला स्फूर्ति मिळो, अशी मी परमेश्वराची प्रार्थना करितों."

माझ्या ज्ञातीच्या कल्याणाविषयींचे असे कळकळीचे उद्गार व माझ्या ज्ञातीच्या उन्नतीप्रीत्यर्थ मीं व इतरांनीं चालविलेल्या प्रयत्नांविषयीं अंत:करणपूर्वक सहानुभूति हीं अलीकडे दक्षिणेंतील प्रत्येक भागांतून मला मिळालेलीं आहेत; तथापि, मी हें सांगतों, कीं, अलाबामांत मीं काम सुरू केल्यापासून मला माझ्या शेजाऱ्यांचेंच नव्हे, तर माझ्या कार्याची माहिती असणाऱ्या दक्षिणेंतील श्रेष्ठ गोऱ्या लोकांचेंहि खासगी व सार्वजनिक साहाय्य व उत्तेजन मिळालेलें आहे. जेव्हांजेव्हां मी निराश होई, तेव्हांतेव्हां सदिच्छेच्या व कल्याणाच्या उद्गारांनीं माझी श्रद्धा जागृत होई. माझ्या ज्ञातीच्या लोकांनां वेळोवेळां अन्याय व छळ सोसावे लागत आहेत, तरी अशा प्रकारच्या उद्गारांमुळें भविष्यकाला-

बद्दल उमेद बाळगण्याला आणि दक्षिणेंतील जनतेच्या जीविताचा एक प्रमुख भाग होण्याची शक्ति निग्रोच्या अंगीं आहे, अशी निष्ठा धरण्यालाहि मी शिकलों आहें. सारांश, ज्या गोऱ्या लोकांमध्यें निग्रोला राहावें लागतें, ते गोरे लोक त्याच्याशीं भिऊन किंवा फार तर सहिष्णु-तेनें वागतील, इतकीच माझी कल्पना नसून निग्रो त्याच्या विश्वासाला व सन्मानालाहि पात्र होईल, असा पूर्ण भरंवसा माझ्या ठिकाणीं उत्पन्न झाला आहे.

प्रकरण नववें.

# मी निग्रो लोकांपासून काय शिकलों?

[ " निग्रो लोक ह्मणजे नुसते हेले, त्यांच्या हातून कांहींहि व्हावयाचें नाहीं, गोऱ्यांची बरोबरी ते काय करणार?" अशीं ज्यांचीं ठरलेलीं मतें असत, त्यांनां वाशिंग्टनसारखे लोक पुढें येत असलेले पाहून आपलीं आवडतीं मतें फोल झाल्याचें अतोनात वाईट वाटलें असलें पाहिजे. तेव्हां त्यांनीं अशी कोटी काढिली, कीं, गोऱ्या लोकांचें रक्त अंगांत खेळत असल्यामुळेंच हे लोक यशस्वी होऊं शकले. अर्थात् वाशिंग्टनला वारंवार असा प्रश्न विचारण्यांत येऊं लागला, कीं, शुद्ध बीजाच्या निग्रोमध्यें 'हाफकास्टा'सारखी धमक असते का? वाशिंग्टननें याचें उत्तर फारच समर्पकपणें दिलें आहे.

कर्मप्रवीण चार्ल्स बँक्स, मानापमानानें विचलित न होणारा गोड स्वभावाचा मेजर मोटन, क्षमावान क्लिटन, कलावान विख्यात प्रोफेसर कारव्हर, वाक्पटु जनमित्र वॉकर, यांसारख्या अस्सल काळ्यांचीं उदाहरणें देऊन व आपल्या शाळेंतीलहि अनुभव सांगून त्यानें प्रतिपक्षांचीं तोंडेंच बंद केलीं आहेत. वाशिंग्टनचें ह्मणणें असें, कीं, एकाद्या जातीला किंवा मनुष्याला पूर्ण शिक्षण व योग्य संधि न देतां त्याच्या कर्तृत्वासंबंधानें अगोदरच मत निश्चित करणें अन्यायाचें आहे. निरनिराळ्या जातींत निरनिराळे विशिष्ट गुण असतात. ते पुढें येण्याला आपण योग्य ती मदत व संधि दिली पाहिजे ह्मणजे कोणाच्याच मनांत अढी न राहतां, सर्वांचेंच कल्याण होईल. अस्पृश्य जातीसंबंधानें आपण असेंच धोरण ठेवावयाला नको काय? ]

एकच प्रश्न मला वारंवार विचारण्यांत येतो. तो हाच, कीं, शुद्ध रक्ताच्या काळ्या इसमाच्या अंगीं भेसळ रक्ताच्या मनुष्यांसारखी योग्यता किंवा गुण असतात काय?

सुदैवानें काळ्या, उदी व अगदीं सफेत निग्रोशींहि माझी बरीच ओळख झालेली आहे. मी निग्रो ज्ञातीचा असल्यामुळें त्या ज्ञातींतील

सर्व वर्णांच्या व स्थितींच्या लोकांनां मी भेटलों आहे व त्यांची ओळख करून घेतली आहे. अमेरिकन निग्रो ज्ञातीमध्यें जसे निरनिराळ्या वर्णांचे व स्थितींचे लोक पहावयाला सांपडतात, तसे दुसऱ्या कोणत्याहि ज्ञातींत किंवा समाजांत सांपडत नाहींत. जपानी लोकांनां बहुतकरून एकाच ह्मणजे पीत वर्णाच्या लोकांचा स्वभाव माहीत असतो. गोऱ्या लोकांनां गोऱ्या लोकांशिवाय बहुतकरून दुसऱ्या लोकांचा परिचय नसतो. निग्रोला मात्र सर्वांचा परिचय होण्याचा संभव असतो; कारण, त्याच्या ज्ञातींत व त्याच्या ओळखीच्या लोकांत मानव जातीच्या सर्व रंगांचे लोक त्याचे मित्र किंवा आप्तहि असतात.

शुद्ध रक्ताच्या निग्रोची व भेसळ रक्ताच्या निग्रोची योग्यता कशी आहे, या प्रश्नाचें समर्पक उत्तर द्यावयाचें ह्मणजे, मला माहीत असलेल्या अत्यंत शुद्ध रक्ताच्या व अत्यंत कृष्ण वर्णाच्या चारपांच लोकांची हकीकत सांगितली पाहिजे. पुष्कळ गोष्टींबद्दल मी या लोकांचा ऋणी आहें, पण विशेषतः पंथ व वर्ण यांकडे लक्ष्य न देतां सर्व मनुष्यांची किंमत त्यांच्या योग्यतेवरून करावी, हें तत्त्व मला शिकविल्याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहें.

माझ्या परिचयांतील काळ्या लोकांपैकीं प्रथम मला चार्ल्स बँक्स यांची आठवण येते. ते ब्यांकर (पेढीवाले), कापूसदलाल, मळेवाले, जमीनजुमल्याचा व्यवहार करणारे व एक लक्ष डालर भांडवल असणाऱ्या संस्थेचे मुख्य आहेत. ही संस्था सरक्यांच्या तेलाची एक गिरणी काढीत आहे. साहसी निग्रो लोकांनीं आपल्या भांडवलानें चालविलेली ही पहिलीच गिरणी होय. सारांश, ते 'माऊन्डब्रायो' नामक छोट्या निग्रो शहरांतील प्रमुख नागरिक आहेत.

त्यांची भेट प्रथम मला बोस्टन येथें झाली. माऊंडबायो शहराचे स्थापक आनरेबल इसाया टी. मांटगामरी यांच्याबरोबर १९०० सालीं 'राष्ट्रीय निग्रो उद्यमसंघा'च्या बैठकीला ते आले होते. माऊंडबायो हें, निग्रो लोकांनीं स्थापन केलेलें, वसाहत केलेलें व नियमन केलेलें असें एकच शहर अमेरिकेंत होतें. त्या शहराचे प्रतिनिधि या नात्यानें ते आले. आतांप्रमाणें त्या वेळींहि ते उंच व बांध्यानें मजबूत होते; त्यांचें मस्तक गोल व तुळतुळीत, त्यांचे डोळे सतेज व पाणीदार होते. हवी असलेली वस्तु हात लांब करून कशी धरावी व ती जलद आश्चर्यकारक रीतीनें कशी घ्यावी हें त्यांनां चांगलें साधलेलें होतें. आपल्या लांब हातानें एकादी टांचणी ते कशी बिनचूक उचलीत आणि एकाद्या ओळखीच्या गृहस्थाचें लक्ष्य आपल्याकडे लागावें ह्मणून ते त्याचें बटन कसें चटकन पकडीत, हें मी पाहीतोंपर्यंत ते किती थोर आहेत याची मला कल्पनाहि नव्हती. हवी असलेली वस्तु त्यांनां सहज प्राप्त होत असे. त्यांच्या हालचालींत कांहीं मोहिनी आहे, असें मला लवकरच आढळून आलें.

जरूर असलेल्या वस्तु मिळविण्याविषयीं खटपट करितांना आणि त्या मिळवितांना मी बॅंक्स यांनां तेव्हांपासून पहात आहें. कामें करतांना व आपली उन्नति करून घेतांना त्यांनां मी लक्ष्यपूर्वक पहात आहें. जसजसें मी त्यांचें अधिक सूक्ष्म निरीक्षण करूं लागलों, तसतसा त्या शांत, बांधेसूद व धिप्पाड मनुष्याविषयीं माझा आदर सारखा वाढत चालला. त्यांच्याविषयींच्या एका गोष्टीनें तर माझ्या मनावर चांगला संस्कार केलेला आहे. ती गोष्ट ही, कीं, 'एकाद्या कृत्याचें श्रेय जर दुसऱ्याला देतां येत असेल, तर तें आपण स्वतः कधींहि घेत नाहींत.' आपलें घोडें पुढें ढकलण्याचा त्यांनीं केव्हांहि यत्न केला

नाहीं. काम करवून घेणें त्यांनां फार आवडतें व दुसऱ्याकडून एकादें काम करवून घेऊन त्याबद्दलचें श्रेय त्याला देतां आलें, तर त्यांत त्यांनां मोठा आनंद वाटतो.

सांप्रत अमेरिकेंत चार्ल्स बॅंक्स सर्वांत श्रीमंत निग्रो नसले, तरी ते अत्यंत वजनदार निग्रो व्यापारी आहेत, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. निग्रोंच्या अकरा पेढ्या असलेल्या मिसिसिपि संस्थानांत ते प्रमुख पेढीवाले आहेत. त्या संस्थानांतील मेसॉनिक पंथाच्या एका परोपकारी विमासंस्थेचे ते सेक्रेटरी व ट्रेझरर आहेत. या संस्थेनें १९१० सालीं वारस–हक्कांबद्दल १,९५,००० डालर रोख दिले आणि त्या वर्षी तिची रोख खिल्लक ८०,००० डालर होती. मिसिसिपि संस्थानांतील उद्यमसंघाचे ते चालक व पुरस्कर्ते आहेत. शिवाय राष्ट्रीय उद्यमसंघाच्या उपाध्यक्षाचेंहि काम त्यांनीं कांहीं वर्षे केलेलें आहे.

चार्ल्स बॅंक्स हे नुसते यशस्वी व्यापारी आहेत, एवढेंच नव्हे, तर ते आपल्या ज्ञातीचे पुढारी असून उदार वृत्तीनें व सार्वजनिक हितबुद्धीनें काम करणारे नागरिक आहेत. त्यांनां सरकारी असामी नाहीं, किंवा ती मिळविण्याची त्यांची इच्छा नाहीं, तरी संस्थानची प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष सेवा करणारा काळा किंवा गोरा माणूस मिसिसिपी संस्थानांत चार्ल्स बॅंक्ससारखा फारच विरळा, असें मला वाटतें.

चार्ल्स बॅंक्स हे आपलें वजन दुसऱ्या अनेक दिशांनीं सत्कार्यी कसें उपयोगांत आणीत आहेत, हें सांगण्याची येथें अवश्यकता नाहीं. याझो डेल्टाच्या सतरा परगण्यांत निग्रो लोकसंख्येचें मान शेंकडा ७५ ते ९४ या प्रमाणांत आहे. या निग्रो लोकांसाठीं माऊंडबायो येथें ते काय काम करीत आहेत, याविषयीं दोन शब्द मी सांगतों.

माझ्या दृष्टीनें पाहतां, माऊंडबायो हें नुसतें शहर आहे असें नाहीं, तर ती खरोखर एक शाळा आहे. तेथें आपल्या ज्ञातिबांधवांनीं काय काय संपादन केलें आहे हें पाहून एकाद्या निग्रोला स्फूर्ति होईल, एवढेंच नव्हे, तर कांहीं मुख्य सामाजिक व नागरिक कर्तव्यकर्में शिकण्याला तेथें त्याला संधि मिळेल.

समाजसंस्थेच्या जीविताच्या सर्व अंगांचा व प्रश्नांचा साहजिकपणें विचार व अभ्यास करण्याला निग्रोंनां तेथें जशी संधि मिळते, तशी उत्तरेकडे व दक्षिणेकडे कोठेंहि मिळत नाहीं. तेथें निग्रो लोक शेतकरी आहेत, व्यापारी आहेत, पेढीवाले, शिक्षक व उपदेशक आहेत. मेअर ( शेरिफ ), शिपाई, कोतवाल, मार्शल ( शहरव्यवस्थापक ) आणि स्टेशन एजंट हेहि निग्रोच आहेत.

काळ्या लोकांनींच जमीन साफ केली, घरें बांधिलीं आणि शहर वसविलें. वर्षानुवर्षें या वसाहतीची लोकसंख्या वाढत चालल्यामुळें, या पुरस्कर्त्या लोकांनां सुधारणेच्या सर्व मुख्य प्रश्नांला तोंड द्यावें लागलें. शहर अद्याप वाढत आहे आणि तें जसजसें वाढत जाईल, तसतसे नवीन व बिकट प्रश्न त्यांनां सोडवावे लागतील. समाजसंस्था स्थापन करण्यांत आणि वाढविण्यांत पुरस्कर्त्या लोकांनां जें कांहीं ज्ञान मिळालें तसें कांहींसें ज्ञान तरुण पिढीला देणाऱ्या शाळा कशा स्थापन कराव्यात, हा सर्वांत कठिण प्रश्न त्या समाजांतील पुढाऱ्यांसमोर हल्लीं आहे.

हें शहर अस्तित्वांत येऊन आज सुमारें वीस वर्षें झालीं. या अवधींत आसपासच्या गोऱ्या समाजांतील लोकांची सहानुभूति व मदत या शहरानें मिळविली आहे. याचें एक कारण असें आहे, कीं, या

शहराचे पुरस्कर्ते डेल्टा प्रांतांतच जन्मलेले व वाढलेले होते आणि त्यांनां देशाची व लोकांची चांगली माहिती आहे.

माऊंडवायोपासून कांहीं मैल वर असलेल्या क्लार्क्सडेल शहरीं चार्ल्स बँक्स्चा जन्म झाला आणि तेथेंच ते मोठे झाले. ते व त्यांचे बंधु त्याच शहरीं कांहीं वर्षें व्यापार करीत होते. दुसऱ्या कांहीं यशस्वी निग्रोंप्रमाणें क्लार्क्सडेलशहरीं लहानपणीं हे सुदैवानें एका गोऱ्या श्रेष्ठ कुटुंबाच्या सहवासांत आले. बालपणीं क्लार्क्सडेलशहरीं आपण दिवस कसे घालविले व तेथील उत्तम गोऱ्या लोकांत सन्मित्र कसे मिळविले, हें मिस्टर बँक्स यांनीं मला पुष्कळदां सांगितलें आहे.

क्लार्क्सडेलमध्यें एका गोऱ्या उच्च कुलांत त्यांची आई स्वयंपाकीण होती. अशा रीतीनें त्यांचा त्या कुटुंबाशीं संबंध जडून आला. या कुटुंबाच्या मदतीमुळें होली स्प्रिंग्स येथें रुस्ट युनिव्हरसिटींत त्यांनां शिक्षणासाठीं पाठविण्यांत आलें.

स्थानिक परिस्थितीची चांगली माहिती असल्यामुळें मिस्टर बँक्स यांनां १९०० सालीं मिसिसिपीच्या तिसऱ्या प्रांताकरितां खानेसुमारीचे सुपरव्हायझर नेमण्यांत आलें. नेमणुकीविषयींच्या माझ्या अर्जावर गांवांतील प्रत्येक गोऱ्या मनुष्यानें अनुकूल शेरा लिहिला होता, असें याविषयीं बोलतांना मि. बँक्स यांनीं मला सांगितलें.

माऊंडबायो येथें येऊन राहिल्यावर मिस्टर बँक्स यांनीं आपला व्यवहार बराच वाढविला आहे. माऊंडबायो येथील ब्यांकेशीं, व्हिक्सबर्ग, मेंफिस, लुइसव्हिल या शहरांतील ब्यांका, सेन्ट लुइसची नॅशनल बँक ऑफ कॉमर्स, न्युयार्क शहरची नॅशनल रिझर्व्ह बँक, इत्यादि बँका दळणवळण ठेवितात. सेन्टलुईस येथील बँकेचे एक अधिकारी,

मिस्टर युजीन स्नोडन हे माऊंडबायो येथील बँक व इतर बँका यांविषयीं मला असें लिहितात, कीं, ' मीं यांनां एका वर्षांत ३०,००० डालर कर्जाऊ दिले आहेत आणि यांचें काम चांगलें समाधानकारक रीतीनें चाललें आहे.'

माझ्या शिक्षणविषयक सफरींत मी कांहीं वर्षांपूर्वीं माऊंडबायो येथें गेलों होतों, तेथें दुसऱ्या पुष्कळ लोकांबरोबर बोलिव्हर परगण्याचे—याच परगण्यांत माऊंडबायो हें शहर आहे—शेरीफ मला भेटले. डेल्टा प्रांतांत सर्वांमध्यें अत्यंत व्यवस्थित असें एकच माऊंडबायो हें आहे, असें मीं कांहीं न सुचवितां किंवा विचारतां त्यांनीं मला सांगितलें. कांहीं वर्षांपूर्वीं या शहराविषयीं लेख लिहिण्यासाठीं मेंफिस येथील वर्तमानपत्राचा एक बातमीदार या शहरीं आला होता. त्यानें जें कांहीं पाहिलें त्यावरून पुष्कळ विचार त्याच्या मनांत आले. त्यानें दुसऱ्या कांहीं गोष्टी देऊन असें लिहिलें, कीं:—

' माऊंडबायोच्या पद्धतीप्रमाणें निग्रो ज्ञात आपला उद्धार करून घेईल काय? कोण जाणे ! येथील लोकांनीं स्थानिक स्वराज्याची इतकी उत्तम पद्धत बसविली आहे, कीं, तशी स्वतंत्र असलेल्या कोणत्याहि श्रेष्ठ ज्ञातीनें आजपर्यंत स्थापन केली नाहीं. कोणतेहि सवर्ण सजातीय लोक कालांतरानें हें करूं शकतील, असें अर्थशास्त्रांतील तत्त्व बहुतेकांनां मान्य आहे. पण या लोकांचें स्थानिकस्वराज्य, परगण्याच्या संस्थानच्या राष्ट्राच्या सरकारांशीं आणि परराष्ट्राच्या सरकारांशींहि अनुरूप असेंच आहे, आणि हीं सर्व सरकारें दुसऱ्या ज्ञातीचीं आहेत. दुसऱ्या ज्ञातीच्या संस्थानच्या व राष्ट्राच्या सरकारांच्या देखरेखीखालीं स्थानिक स्वराज्याप्रमाणें परगण्याचें स्वराज्य, तसेंच यशस्वी रीतीनें चाल-

वितां येईल काय ? माऊंडबायो नमुन्याचे पुष्कळ निग्रो मिळाले आणि त्यांनां प्रथमपासून पूर्वीप्रमाणें योग्य दिशा लाविली गेली, तर ते हें काम करतील.'

दक्षिणेंतील विचारी लोकांच्या मनांत माऊंडबायोच्या प्रयोगानें कोणत्या प्रकारची आस्था व सहानुभूति उत्पन्न होते, हें वरील उताऱ्यावरून कदाचित् स्पष्ट होईल. असो. निग्रो ज्ञातीचा प्रश्न सोडविण्याविषयीं आपण अमुकअमूक काम करीत आहों, असा चार्ल्स बँक्स यांनीं माझ्याशीं झालेल्या सर्व संभाषणांत कधींहि उल्लेख केला नाहीं, हें एक त्यांचें विशेष लक्षण आहे. तथापि डेल्टाप्रांताचा प्रश्न सोडविण्याच्या बाबतींत आपलें काम म्हणजे एक साधन आहे, असें त्यांनीं पुष्कळदां सांगितलें आहे. सर्व गोष्टींच्या मुळाशीं सांपत्तिक प्रश्न असतो, हें ते जाणतात.

माऊंडबायोच्या वाढीमध्यें व भरभराटीमध्यें त्यांचें, खासगी व व्यावहारिक हित आहे, तरी शेतकीच्या उत्तम तऱ्हा शिकविणें, गृहस्थिति सुधारणें, कायदा व व्यवस्था यांचें महत्त्व जनसमूहांनां समजावून देणें इत्यादि गोष्टींचा त्यांमध्यें समावेश होतो, असें त्यांनां वाटतें.

चार्ल्स बँक्सच्या यशाच्या विवेचनानें मी पुष्कळ शिकलों आहें. दक्षिणेंतील सांप्रतच्या परिस्थितीशीं वागतांना व्यवहारज्ञानाचें महत्त्व किती आहे,हें त्यांनीं मला शिकविलें, ही मुख्य गोष्ट होय. रागाच्या आवेशांत दक्षिणेंतील गोरा मनुष्य निग्रोविषयीं कांहींहि बोलो, पण निग्रोची खरीखुरी उन्नति साधून देणाऱ्या प्रत्येक प्रयत्नाला शांत, विचारी अशा दक्षिणेंतील गोऱ्या लोकांची पूर्ण सहानुभूति असते, असें मी यांचेपासून शिकलों.

ज्या थोड्या लोकांनां आपल्या पूर्वजांची परंपरा दोहों बाजूंकडून (आईकडून व बापाकडून) थेट आफ्रिकेंतील मूळपुरुषापर्यंत लावितां येते, त्यांपैकीं हाम्पटन संस्थेचे मेजर आर. आर. मोटन हे एक होत. आपला पणजा आफ्रिकेंतील एक तरुण सरदार होता. तो लढाईंत जिंकलेले कांहीं गुलाम घेऊन त्यांनां विकण्यासाठीं किनाऱ्यावर आला होता. विक्रीचा सौदा झाल्यावर त्याला फुसलावून गोऱ्या लोकांच्या जहाजावर कसें नेण्यांत आलें आणि त्या दुर्दैवी गुलामांबरोबर अमेरिकेंत नेऊन त्यांसहित त्याला गुलाम ह्मणून कसें विकण्यांत आलें, इत्यादि आपल्या आजीच्या तोंडून ऐकिलेली गोष्ट जशीच्या तशी सांगतांना मी त्यांनां पुष्कळदां ऐकिलेलें आहे. मेजर मोटन हे चार्लस बँक्सप्रमाणें शुद्ध रक्ताचे, स्थूल देहाचे, व रुंद चेहऱ्याचे निग्रो आहेत इतकेंच नव्हे, तर ते आपल्या परीनें फारच देखणे आहेत. त्यांच्या तोंडाकडे कोणीं पाहिलं तर त्याला ते आवडल्याशिवाय रहाणार नाहींत, असें मला वाटतें. प्रथम स्नेहपूर्ण मोठ्या डोळ्यांनीं तुमच्याकडे ते सरळ पाहतात आणि ते तुमच्याशीं बोलूं लागले, कीं, त्यांच्या सुंदर चेहऱ्यावर तत्परतेची, चतुरतेची व सहानुभूतीची छटा खेळत असते.

निरनिराळ्या नमुन्यांच्या लोकांशीं माझा परिचय झालेला आहे; पण मेजर मोटनसारखीं प्रेमळ व समंजस माणसें फारच थोडीं मला आढळून आलीं. त्यांच्या अंगीं व्यवहारज्ञान पूर्ण भरलेलें आहे. शिवाय ते स्वत: आपलें घोडें पुढें कधींहि ढकलीत नाहींत. पण त्यांचा तुमचा परिचय झाला, कीं, नकळत तुह्मांला ते आपल्यावर विश्वास ठेवावयाला व प्रेम करावयाला लावितात. त्यांचा मला कधींहि कंटाळा येत नाहीं; त्यांच्या सहवासांत नेहमीं असावें, त्यांच्यापाशीं नेहमीं राहावें, असें मला वाटतें.

दक्षिणेंतील संस्थानांत प्रथम आलेल्या लोकांनां, तेथील गोऱ्या स्त्रीपुरुषांच्या तोंडून त्यांनां वाढविलेल्या वृद्ध निग्रो लोकांविषयींचे, विशेषतः निग्रो दायांविषयींचे प्रेमोद्गार ऐकून फार आश्चर्य वाटतें. या वृद्ध 'मात्रसामावशींमध्यें' आणि त्यांनीं वाढविलेल्या गोऱ्या मुलांमध्यें असलेलें शाश्वत सख्य किंवा प्रेम परक्यांनां समजणें फार कठिण आहे.

या प्रेमामुळेंच पुष्कळ वृद्ध निग्रो आपल्या धन्यांनां व धनिणींनां इतके प्रिय झालेले आहेत. मेजर मोटनमध्यें हें प्रेम विशेष रीतीनें प्रगट झालेलें आहे. हाम्पटन संस्थेंतील शिक्षणाखेरीज दुसरें कोठेंहि त्यांनां शिक्षण मिळालेलें नाहीं, तरी ते फारच बहुश्रुत आहेत. त्यांच्याशीं संभाषण करणें मला फार आवडतें. इतर कांहीं निग्रो लोकांप्रमाणें शिक्षणानें ते शेफारून गेलेले नाहींत. त्यांच्या प्रेमांत कांहीं संकुचितपणा किंवा द्वेषभाव शिरला नाहीं. कोणत्याहि वर्गाचा द्वेष करणें किंवा अविश्वास धरणें हें त्यांनां आवडत नाहीं. काळ्या किंवा गोऱ्या लोकांला, दक्षिणेंतील किंवा उत्तरेंतील मनुष्याला मदत करावयाला किंवा त्यांच्यावर उपकार करावयाला ते नेहमीं तयार असतात.

हाम्पटन संस्थेंत मेजर मोटन ग्रॅज्युएट झाल्यावर त्यांची व माझी ओळख झाली. ताम्रवर्णी इंडियन विद्यार्थी माझ्या ताब्यांत पूर्वीं असतांना मी ज्या हुद्दयावर होतों, त्याच हुद्दयावर ते त्या वेळीं होते. नंतर त्यांनां संस्थेच्या बॅटालियनचे मुख्य, शाळेंतील विद्यार्थ्यांचे कमांडन्ट या महत्त्वाच्या जागेवर नेमण्यांत आलें. हल्लीं ते याच जागेवर आहेत. त्यांनां सर्व विद्यार्थ्यांची शिस्त पहावी लागते. त्यामुळें त्यांच्यावर आपलें वजन ठेवण्याची आणि शिक्षणक्रम संपवून जगांत गेल्यावर येणाऱ्या विशिष्ट अडचणींशीं टक्कर देण्यास शिकविण्याची संधि त्यांनां मिळते.

अशा महत्त्वाच्या जागेवर मेजर मोटनसारखा दयाशील, विनोदी, आत्मसंयमी व आस्थेवाईक मनुष्य हाम्पटन संस्थेला मिळणें हें तिचें मोठें भाग्य आहे, असें मला वाटतें.

उत्तरेंतील व दक्षिणेंतील गोऱ्या लोकांनां मेजर मोटन अंत:स्फूर्तीनें ओळखतात. दक्षिणेंतील गोऱ्या मनुष्याला दक्षिणेंतील निग्रोची दुसऱ्या कोणापेक्षांहि विशेष माहिती असते, असें विधान मीं पुष्कळदां ऐकिलेलें आहे. या विधानाच्या सत्यत्वाविषयीं वाद करीत न बसतां मी येथें असें सांगतों, कीं, मेजर मोटनसारख्या निग्रो लोकांनां जगांतील दुसऱ्या कोणापेक्षां दक्षिणेंतील गोऱ्या लोकांविषयीं अधिक माहिती असते.

उदाहरणार्थ, हाम्पटन संस्थेंत गोरे शिक्षक व निग्रो शिक्षक, दक्षिणेंतील गोरे लोक व उत्तरेंतील गोरे लोक आहेत. शिवाय तेथें निग्रो विद्यार्थी व ताम्रवर्णी इंडियन विद्यार्थी आहेत. या भिन्नभिन्न लोकांवर आपलें वजन कसें ठेवावें, धांसाधांसी होऊं न देतां सर्वांकडून मिलाफानें काम कसें करून घ्यावें, हें मेजर मोटन चांगलें जाणतात. हें काम कठिण आहे, पण तें कसें साधावें, हें त्यांनां माहीत आहे.

दोन्ही ज्ञातींचें असें चांगलें ज्ञान असल्यामुळें मेजर मोटन यांनां आपल्या विद्यार्थ्यांनां व्यावहारिक व उपयुक्त उपदेश देतां येतो. निग्रोंची विशिष्ट परिस्थिति माहीत नसणाऱ्या कोणाहि गोऱ्या मनुष्याला हें काम करितां यावयाचें नाहीं.

मेजर मोटन हे रविवारच्या शाळेंतील वर्ग शिकवीत असतांना हजर असणें हें फार फायद्याचें आहे, असें मला वाटतें. प्रत्येक निग्रोला आपल्या आयुष्यांत केव्हां ना केव्हां तरी सोसावे लागणारे अन्याय, निंदा, शिव्या इत्यादि प्रकारांनीं जर कोणा विद्यार्थ्यांनीं स्वत:ला दु:खी

व कष्टी करून घेतलें असेल, तर त्यांच्या चुका मेजर मोटन कशा दुरुस्त करितात आणि त्यांनां ताळ्यावर कसे आणतात हें पाहणें फार मौजेचें असतें. स्वतःला किंवा आपल्या ओळखीच्या मनुष्याला आलेल्या अनुभवाचें योग्य उदाहरण देऊन मेजर मोटन आपलें ह्मणणें विद्यार्थ्यां-पुढें मांडतात आणि द्वेषापेक्षां सहानुभूतीनें व सलोख्यानें दुराग्रहाला तोंड देणें किती सोपें व सुलभ आहे, हें सिद्ध करितात. तसेंच तुह्मी एका विशिष्ट ज्ञातीचे आहां ह्मणून तुह्मांला शिव्या देणाऱ्या मनुष्याला तुमच्या-विषयीं यत्किंचित्‌हि माहिती नसते आणि त्याच्या शिव्यांनीं त्रस्त किंवा दुःखी न होण्याचा तुह्मीं निश्चय केलात, तर नऊ हिश्यांनीं त्याची त्यालाच पुढें लाज वाटूं लागेल, हें ध्यानांत ठेवा असें ते सांगतात.

देशांत आगगाडीनें प्रवास करतांना निग्रोला अत्यंत अडचणी सोसाव्यां लागतात, असें मला वाटतें. उदाहरणार्थ, दक्षिणेंत प्रवास करतांना निग्रोला खाण्याचे पदार्थ मिळणें नेहमीं फार कठिण असतें. कारण आगगाडींत व वाटेवरील दुकानांत निग्रोंची व्यवस्था किंवा सोय बहुतेक केलेली नसते. गोरे लोक खात बसले आहेत अशा दुकानीं एकादा निग्रो गेला तर तो कितीहि मोठा का असेना, 'तूं येथून चालता हो, बबरजीखान्यांत जा,' असें त्याला असभ्यपणें सांगण्यांत येतें. बबरजीखान्यांतहि त्याला जिन्नस मिळण्याची व्यवस्था केलेली नसते.

अशा अडचणींतून मेजर मोटन पुष्कळदां पार पडलेले मीं पाहिलेलें आहे. ते एकदम व्यवस्थापकाकडे जातात व आपणाला काय पाहिजे आहे तें सांगतात. बहुतकरून त्यांनां प्रथम शिव्यांची लाखोली मिळते. पण मेजर मोटन कधींहि निराश होत नाहींत. ते त्रस्त होत नाहींत किंवा तेथून निघून जात नाहींत. सभ्यपणानें व सुशीलतेनें ते असें सांगतात

कीं, "मला येथील रिवाज माहित आहे, पण मी फार भुकेलेलों आहें आणि मला कांहीं तरी खावयाला पाहिजे." पुढें कसें कां होईना, मानभंग न होतां हव्या असलेल्या वस्तु ते मिळवितात आणि व्यवस्थापकाला लाज वाटावयाला लावून त्याला ते आपला मित्र बनवितात आणि निग्रो ज्ञातीविषयीं त्याच्या मनांत चांगला ग्रह उत्पन्न करतात.

अनेक विकट व अडचणीच्या प्रसंगीं मेजर मोटनला मीं पाहिलेलें आहे. अशा वेळीं साधारण मनुष्याचें डोकें बिघडून गेलें असतें. पण आपला अपमान किंवा नालस्ती झाली असें त्यांनां केव्हांच वाटलें नाहीं. सभ्य गृहस्थ बनण्याला आपण श्रेष्ठ ज्ञातीचे असलेंच पाहिजे असें नाहीं, हें मी मेजर मोटनपासून शिकलों.

वर्णानें काळ्या, पण अंतःकरणानें पवित्र, सात्विक व थोर अशा मेजर मोटनसारख्या मनुष्यांच्या सहवासानें जें कांहीं शिक्षण मला मिळालें आहे तसें कोणत्याहि ग्रंथापासून मिळणार नाहीं. कनिष्ठ ज्ञातीच्या मनुष्याला कितीहि तोटे सोसावे लागले, तरी इतर ज्ञातींच्या कांहीं लोकांप्रमाणें आपलें श्रेष्ठत्व जाहीर रीतीनें मिरवीत फिरण्याची त्याला जरूरी नाहीं, हा एक मोठा फायदाच आहे. जगांत असे कांहीं लोक आहेत, कीं,—आणि ते सर्वच स्वतः गोरे आहेत असें नाहीं—आपलें श्रेष्ठत्व मिरविण्याला आपल्याहून कमी कोणी नसला ह्मणजे ते फार उदासीन होतात.

माझ्या ज्ञातीचे एक सुप्रसिद्ध काळे गृहस्थ शार्लोटचे जार्ज डब्ल्यू. क्लिंटन हे आहेत. ए. एम्. ई. झीऑन चर्चचे हे बिशप आहेत. बिशप क्लिंटन यांचा जन्म पन्नास वर्षांपूर्वीं साऊथ कॅरोलिना येथें एका गुलाम कुळांत झाला. पुनर्घटनात्मक कालामध्यें साऊथ करोलिनाच्या

युनिव्हरसिटीमध्यें प्रविष्ट होण्याची ज्या थोड्यांनां संधि मिळाली त्यांपैकीं बिशप क्लिंटन हे एक होते. १८७४ सालच्या सुप्रसिद्ध वर्गांतील विद्यार्थ्यांपैकीं एक कांग्रेसमन झाला, दोघेजण युनायटेड स्टेट्सचे लायबेरियला पाठविलेले प्रधान झाले, पांचजण डाक्टर, सातजण उपदेशक आणि पुष्कळजण यशस्वी व्यापारी झाले. या वर्गांत आपणहि शिकत होतों, या गोष्टीबद्दल बिशप क्लिंटन यांनां अभिमान वाटतो. जार्ज टाऊनपोर्टचे हल्लींचे कस्टम्स कलेक्टर डब्ल्यू. मॅक्किनले हेहि त्याच वर्गापैकीं होत.

बिशप क्लिंटन यांनीं बरींच वर्षें आपल्या पंथाची मोठी सेवा केलेली आहे, आणि त्या कामीं त्यांनां पुष्कळ मान व पदव्या मिळाल्या आहेत. 'आफ्रिकन मेथाडिस्ट एपिसकोपल झिऑन कार्टर्ली रिव्हयु' या मासिकाची त्यांनींच स्थापना केली आणि ते या पंथाच्या दुसऱ्या एका मासिकाचे कांहीं काल संपादक होते. आपल्या देशांतील व परदेशांतील साधारण परिषदांत ते आपल्या चर्चचे प्रतिनिधि होते. ते लिव्हिंगस्टोन कॉलेजचे ट्रस्टी, पब्लिकेशन बोर्डचे चेअरमन आहेत. 'इंटरनॅशनल कनव्हेंशन ऑफ आरबिट्रेशन' संस्थेच्या सभासदाचें काम त्यांनीं केलेलें आहे आणि 'इंटरनॅशनल सन्डे—स्कुल युनियन'चे ते उपाध्यक्ष आहेत.

वर वर्णन केलेल्या शुद्ध आफ्रिकन रक्ताच्या मनुष्यापेक्षां बिशप क्लिंटन हे एक निराळ्या नमुन्याचे गृहस्थ आहेत. जरी त्यांचें वय पन्नास वर्षांचें आहे तरी दिसण्यांत व वागणुकींत ते सर्वांपेक्षां तरुण आहेत. सरळ व भव्य आकृति, उंच व रुंद कपाळ, सुरेख चेहरा आणि मुलांप्रमाणें सरळ, उत्साही वागणूक इत्यादि गोष्टींमुळें त्यांनां सर्वत्र मान मिळतो व त्यांच्यावर सर्वांचा विश्वास बसतो.

बिशप क्लिटन हे उपाध्यायाचा धंदा करितात आणि त्यांनीं चर्चच्या सेवेला आपलें आयुष्य वाहिलेलें आहे, तरी वर वर्णन केलेल्या सर्व मनुष्यांपेक्षां ते अधिक आग्रही आणि शिपायी बाण्याचे गृहस्थ आहेत.

धंद्यामुळें देशांतील सर्व भागांत त्यांनां प्रवास करावा लागतो हें मला माहित असल्यामुळें मीं त्यांनां विचारलें, कीं, 'आपल्यासारख्या स्वभावाच्या मनुष्याला पेंचांत किंवा संकटांत न सांपडतां कसा प्रवास करतां येतो ?''

ते म्हणाले—मी थोडाबहुत संकटांत सांपडलों होतों, पण अधिक नाहीं. सर्वत्र सुरक्षितपणें प्रवास करण्याचा सोपा मार्ग म्हटला म्हणजे सभ्य गृहस्थाप्रमाणें वागणें हा होय. हा उपाय सोपा, सोईस्कर व व्यावहारिक आहे.

ते पुढें म्हणाले—मी कांहीं वर्षांपूर्वी बराच पेंचांत सांपडणार होतों. त्या वेळीं मी राजकारणांत सामील होतों. नंतर त्यांनीं त्या प्रसंगाची हकीकत सांगितली. त्या वेळीं साऊथ करोलिना, लँकेस्टर येथील बिशपच्या वरचे निग्रोहि राजकीय चळवळींत बरेच तत्पर असत. एकदां एका निवडणुकीच्या प्रसंगीं मद्यपानाविरुद्ध सक्तीचे प्रतिबंधक कायदे पास करूं इच्छिणाऱ्या कांहीं चांगल्या चांगल्या निग्रोंनां व डेमॉक्रॅट पक्षाच्या कांहीं गोऱ्या लोकांना एकत्र करून एकजुटीनें निवडून देण्याचा प्रयत्न चालला होता. दोन निग्रो व चार गोरे लोक यांची एकत्र निवडणूक करण्याचें ठरलें होतें; व या सहा मतदारांचीं नांवें एकत्र छापलेलीं अशीं कार्डें मतदारांत वाटलीं होतीं. पण ऐन वेळीं मतें देतांना बऱ्याच गोऱ्या लोकांनीं छापील कार्डांतून निग्रोंचीं नांवें खोडलीं, आणि बऱ्याच निग्रो लोकांनीं गोऱ्या लोकांचीं नांवें खोडलीं,

यांमुळें उभय पक्षामध्यें बराच तंटा माजला. गांवच्या एका वर्तमान पत्राच्या संपादकानें निग्रोंनां नांवें खोडण्याला क्लिंटननीं शिकविलें असें प्रसिद्ध केलें.

बिशप पुढें ह्मणाले—मला त्या संपादकाची चांगली ओळख असल्यामुळें मी खुलासा करण्यासाठीं त्याच्या आफिसांत गेलों. माझ्या कांहीं वेडगळ व अविचारी उद्गारानें तो संपादक चिडला आणि हातांत सुरी घेऊन माझ्या अंगावर धांवला.

बिशप ह्मणाले—'या धांवण्यांत त्याचा कांहीं इजा करण्याचा हेतु होता असें मला मुळींच वाटलें नाहीं. कारण माझी आई त्याच्या कुटुंबांत स्वयंपाकीण होती. तेव्हांपासून ह्मणजे बालपणापासून आह्मी परस्परांना चांगलें जाणतों. मीं त्याचीं मनगटें गच्च दाबून धरिलीं.' बिशप हे लठ्ठ, सशक्त जवान असून त्यांच्या हाताची पकड मगरमिठीप्रमाणें बळकट होती. पुढें ते ( बिशप ) शांतपणें बोलूं लागले आणि दोघांनीं—आपला तंटा आपसांत मिटविला.

साऊथ कॅरोलिनांतील गोऱ्या लोकांमध्यें आपले पुष्कळ जिवलग मित्र आहेत असें बिशप क्लिंटननीं मला सांगितलें. पण त्यांचा गोऱ्या लोकांशीं झुंपलेला निकडीचा प्रसंग ह्मणजे वर सांगितलेला एकच होय.

बिशप क्लिंटनची व माझी ओळख प्रथम १८९३ सालीं झाली. त्या वेळीं 'फेल्प्स हॉल बायबल ट्रेनिंग स्कुल' उघडण्याच्या समारंभाला, ते 'आफ्रिकन मेथाडिस्ट एपिसकोपल झीऑन चर्च'चे प्रतिनिधि या नात्यानें टस्कगीला आले होते. दुसऱ्या वर्षीं व्याख्याते या नात्यानें ते पुन: टस्कगीला आले आणि तेव्हांपासून ते दरवर्षीं टस्कगीला येऊन आपला कांहीं वेळ खर्च करून शिक्षणाचे कामीं मदत करतात.

टस्कगी संस्थेच्या कामींच बिशप क्लिंटन आह्मांला फार मदत करतात एवढेंच नव्हे तर निग्रो सार्वजनिक शाळा ठिकठिकाणीं स्थापन करण्याची लोकांमध्यें आस्था उत्पन्न व्हावी ह्मणून आह्मीं जें मोठें कार्य हातीं घेतलें आहे त्यांतसुद्धां आह्मांला चांगलें साहाय्य करतात. त्यांनीं १९१० सालीं नॉर्थ कॅरोलिनामधील आमच्या शिक्षणविषयक सफरीचीं उत्तम व्यवस्था केली आणि दक्षिणेंतील संस्थानांतील सर्व सफरींमध्यें ही सफर अत्यंत यशस्वी केली.

बिशप क्लिंटन हे जरी आक्रमशील चर्चमन ( उपाध्याय ) आहेत, तरी निग्रो ज्ञातीच्या हितार्थ चाललेल्या प्रत्येक चळवळींविषयीं त्यांना आस्था आहे. ज्ञातीच्या बौद्धिक आणि औद्योगिक उन्नतीविषयीं त्यांनां सारखीच कळकळ आहे.

माझ्या माहितींतील ज्ञातींच्या अत्यंत बुद्धिमान पुरुषांपैकीं जॉर्ज डब्ल्यु. कारव्हर हे एक आहेत. टस्कगी संस्थेंत कृषिखात्यांतील शास्त्रीय व प्रयोगात्मक शेतकीचें काम ते पाहतात. टस्कगी येथें त्यांना प्रोफेसर कारव्हर असें ह्मणतात. मिस्टर कारव्हर यांची भेट मला १८९५ अगर १८९६ सालीं झाली. त्या वेळीं ते आयोवा संस्थानांतील एमीस येथील स्टेट अग्रिकलचरल कॉलेजांत विद्यार्थी होते. यापूर्वीं ऑनरेबल जेम्स विलसन—सांप्रतचे शेतकीखात्याचे सेक्रेटरी—यांचेकडून मीं त्यांचेविषयीं ऐकिलेलें होतें. मि. विलसन हे त्यांचे कांहीं काल शिक्षक होते. याच सुमारास टस्कगी संस्थेंतील शेतकीचें काम शास्त्रीय पद्धतीवर चालविण्याचे प्रयत्न करण्यांत आले आणि हें काम, तसेंच स्टेट एक्सपेरिमेंट स्टेशनचें ( संस्थानच्या प्रयोगशालेचें ) काम मि. कारव्हर यांनां टस्कगी येथें आणून देण्यांत आलें. तेव्हांपासून हें काम ते फार

चांगल्या रीतीनें बजावीत आहेत आणि कापसाच्या पिकांच्या वाढीच्या कामामुळें व जीर्ण झालेल्या जमिनींत कस कसा आणावा या विषयींच्या त्यांच्या प्रयोगांच्या हस्तपत्रकांमुळें ते सर्वच दक्षिणेंत काळ्या व गोऱ्या शेतकऱ्यांनां चांगले माहीत झालेले आहेत.

कांहीं वर्षांपूर्वी शेतकीखात्याच्या स्टेट सेक्रेटरींनीं माऊन्टगॉमरी येथें जेव्हां प्रमुख शिक्षकांची सभा भरविली, तेव्हां प्रोफेसर कारव्हर या एकाच निग्रो गृहस्थाला आमंत्रण दिलेलें होतें. त्या सभेंत भाषण करण्याविषयीं त्यांनां सांगितलें. प्रयोगशाळेंत ते काय उपयुक्त काम करीत आहेत याविषयीं त्यांनां एक तासपर्यंत प्रश्न विचारण्यांत आले.

प्रोफेसर कारव्हर हे मी वर वर्णन केलेल्या इसमांप्रमाणें शुद्ध आफ्रिकन रक्ताचे आहेत आणि निग्रो ज्ञातींतील एक पूर्ण शास्त्रज्ञ आहेत. कापसाचें पिक किंवा जगांतील या भागाचा नैसर्गिक इतिहास या विषयांविषयीं आस्था असलेला मनुष्य टस्कगीला आला ह्मणजे तो न चुकतां प्रोफेसर कारव्हरना शोधून काढतो आणि त्यांचा सल्ला घेतो. कांहीं वर्षांपूर्वी जर्मनीचे कलोनियल सेक्रेटरी (वसाहतीचे प्रधान) आपल्या खात्यांतील एका कापसाच्या धंद्यांतील तज्ज्ञ गृहस्थासहित दक्षिणेंत फिरत असतां कांहीं दिवस टस्कगींत येऊन राहिले. त्यांचा हेतु, संस्थेच्या इतर कामांबरोबर प्रोफेसर कारव्हर हे कांहीं वर्षें करीत असलेले कापसाविषयींचे प्रयोग नीट पहावे असा होता.

'नूतन खंडांतील निग्रो' नांवाचें एक पुस्तक सर हॅरी जॉन्सन यांनीं लिहिलें आहे. स्वतः जॉन्सन यांनीं जगाच्या भिन्न भिन्न वनस्पतींच्या जीविताचें अध्ययन केलेलें आहे. ते ह्मणतातः—टस्कगी येथें प्रोफेसर कारव्हर हे शास्त्रीय शेतकी, वनस्पतिशास्त्र, कृषिरसायनशास्त्र

इत्यादि विषय शिकवितात. ते वर्णानें व चेहऱ्यानें पूर्ण निग्रो आहेत. पण त्यांचा पोषाक, त्यांची भाषा, पूर्ण शास्त्रीयज्ञान इत्यादि गोष्टींत ते टस्कगीचे नव्हे, तर ऑक्सफर्ड किंवा केंब्रिज येथील वनस्पतिशास्त्राचे प्रोफेसर होऊं शकतील. कोणीहि युरोपियन वनस्पतिशास्त्रज्ञांनीं त्यांच्याशीं दहा मिनिटें भाषण केलें, तर ते योग्यतेनें आपल्या बरोबरीचे आहेत असें त्याला सहज वाटल्यावांचून राहत नाहीं.

शास्त्राच्या कोणत्याहि शाखेंत प्राविण्य संपादणाऱ्या गोऱ्या मनुष्याला मिळणाऱ्या संधींशीं तुलना करून पाहतां त्यांनां अध्ययनाच्या फारच थोड्या संधी मिळाल्या. त्यांचा जन्म गुलामगिरींत झाला होता. या गोष्टींमुळें प्रो० कारव्हर यांनीं जें कांहीं ज्ञान मिळविलें तें फारच विलक्षण होय.

प्रो० कारव्हर यांनां आपल्या कुलाविषयीं फारच थोडी माहिती आहे. सिविल वॉर चालली असतां मिसावरींत एका मिस्टर कारव्हरच्या मळयांत त्यांचा जन्म झाला होता.

त्या वेळीं मिसावरीमध्यें गुलाम बाळगणें हें फार त्रासाचें झाल्यामुळें त्यांनां व त्यांच्या आईला आरकान्सस येथें पाठविण्यांत आलें. युद्ध संपल्यावर, आपल्या गुलामांची काय वाट झाली, याची चौकशी करण्याकरितां मि. कारव्हरनीं दक्षिणेकडे मनुष्य पाठविले. जॉर्ज नांवाच्या दोन तीन वर्षांच्या मुलांखेरीज बाकी सर्व गुलाम नाहींसे झाले असें त्याला कळलें. तो मुलगाहि डांग्या खोकल्याच्या विकारानें इतका मृतप्राय व निरुपयोगी झाला होता, कीं, ही व्याद येथून गेली तर बरें होईल असें आरकान्ससच्या लोकांनीं कळविलें.

जॉर्जला परत घरीं आणलें. पण तो इतका कांहीं अशक्त व रोगी मुलगा होता, कीं, त्याला कोणींहि कामाला लाविलें नाहीं. नोकरांच्या

खोल्यापाशीं असलेल्या कोंबड्यांमध्यें व इतर जनावरांमध्यें त्याला राहूं दिलें आणि आपलें अन्न तेथें कसेंबसें मिळवीत तो तेथेंच मोठा होऊं लागला.

शेवटीं तो मुलगा जगला आणि तो स्वतंत्रपणें जंगलांत भटकूं लागला. तेथील सर्व कृमिकीटकांशीं व जनावरांशीं त्याची चांगली गट्टी जमली. आणि वनस्पतींचें व फुलांचें प्रत्यक्ष पुरें ज्ञान त्यानें तेथें मिळविलें.

मोठा होऊं लागल्यावर त्याची विलक्षण हुषारी दोन दिशांनीं दिसूं लागली. घरगुती कामांतील त्याचें कौशल्य व तीं कामें करण्याची हातोटी पाहून सर्वजणांचें लक्ष्य त्याच्याकडे लागलें. स्वयंपाक, सुताचें व लोकरीचें विणकाम इत्यादि गोष्टी त्याला चांगल्या करतां येऊं लागल्या. तो रंग चांगले ओळखूं लागला आणि ड्राइंग ( रेखालेखन ) शिकला. आपणाला आवडणारीं फुलें व वनस्पति यांचीं चित्रें काढण्यांत ते हल्लीं आपल्या सुटीचा बराच भाग घालवितात.

दुसरें, वनस्पतिशास्त्रांतहि ते आपलें विलक्षण ज्ञान व प्राविण्य दाखवूं लागले. उदाहरणार्थ, कधींहि न मिळणारीं चमत्कारिक फुलें जमविण्यासाठीं ते तासाचे तास अरण्यांत व जंगलांत घालवूं लागले. एके दिवशीं कोणा एकाला असें आढळून आलें, कीं, त्यांनीं जंगलांतील झुडपांत एक लहानशी वनस्पतिसंग्रहवाटिका तयार केली आहे, तेथें त्यानीं पुष्कळ तऱ्हतऱ्हेच्या वनस्पति जमविलेल्या आहेत. पुढें पाहिजे त्या वनस्पति वाढविण्यामध्यें आणि रोगांपासून व कृमींपासून त्यांचा बचाव करून शुश्रुषा करण्यामध्यें ते इतके कांहीं प्रवीण झाले, कीं, त्याना ‘ वनस्पतिवैद्य ’ हें नांव मिळालें.

दुसऱ्या एका दिशेंत ह्मणजे गायनांत त्यांनीं अद्वितीय प्राविण्य दाखविलें. लहान असतांनाच ते उत्तम गाणारे आहेत अशी त्यांची ख्याति निग्रो लोकांत झाली होती. मोठा झाल्यावर कांहीं वर्षें त्यांनीं फिरण्यांत घालविलीं. संधि मिळाल्यावर त्यांनीं हारितगृहांमध्यें ( Green Houses ) काम केलें. एकदां त्यांनीं धोब्याचें काम केलें, दुसऱ्या खेपेस हाटेलांत स्वयंपाक्याचें काम केलें. गायनांत व चित्र-कलेंत, विशेषतः प्रत्येक कलेंत त्यांची रुचि व प्राविण्य पाहून कांहीं मित्र मोहित झाले आणि त्यांनीं देवालयांतील बाजा वाजविणाराची जागा त्यांनां मिळवून दिली.

या सर्व वर्षांमध्यें कारव्हर हे मिळेल तेथें ज्ञान संपादन करीत होते. पुस्तकें मिळालीं तर तीं त्यानीं वाचून टाकावींत. पुस्तकांतून ते कांहीं शिकले, पण अनुभवानेंच नेहमीं त्यांनीं ज्ञान मिळविलें. ते जेथें जात तेथें त्यांनां मित्र मिळत. शेवटीं—एमीस येथील आयोवा अग्रि-कलचरल कॉलेजच्या बागाईत खात्यांतील हारित गृहें आपल्या ताब्यांत घेण्याची संधि त्यांनां मिळाली. ग्रॅज्युएट होईपर्यंत ते तेथें राहिले. नंतर त्यांना असिस्टंट बोटानिस्ट नेमण्यांत आलें. त्या जागेवर राहून त्यांनीं पुढील अभ्यास चालू ठेविला आणि पोस्ट—ग्रॅज्युएटचा डिप्लोमा ( पदवी ) मिळविला. एमीस येथें मिळविलेला अशा तऱ्हेचा हा पहि-लाच डिप्लोमा होय.

आयोवा अग्रिकलचरल कॉलेजांत असतांना, ते तेथील सर्व चळ-वळींत इतर विद्यार्थ्यांबरोबर सामील होत. शिकागो येथें ' वर्ल्ड्स फेअर ' ला गव्हरनर बोईसबरोबर गेलेल्या कॉलेज बटालियनचे ते लेफ्टनेंट होते. संस्थानांतील सर्व भागांत उद्यानविद्येसंबंधीं सभांत ते

निबंध वाचूं लागले व व्याख्यानें देऊं लागले. उत्तरेंत दुसऱ्या ज्ञातीच्या लोकांत त्यांनां यश मिळूं लागलें, तथापि दक्षिणेंत येऊन आपल्या ज्ञातीसाठीं कांहीं तरी करावें असें त्यांनां वाटूं लागलें. ह्मणून त्यांनीं टस्कगीस येण्याचें आमंत्रण स्वीकारलें आणि तेथील कृषि खात्यांतील शास्त्रीय प्रयोगशालेचा चार्ज घेतला.

प्रो. कारव्हर आपल्या वनस्पतिविद्येच्या ज्ञानानें प्रत्येकाला चकित करून सोडतात, तरी ते अत्यंत विनयशील व नम्र आहेत. खरोखर ते जवळजवळ लाजाळू आहेत. त्यांचा पोषाक अगदीं साधा असतो. त्यांचा शृंगार किंवा अलंकार ह्मणजे त्यांच्या कोटाच्या काजांत एक फुल लटकाविलेलें असतें.कोणतें ना कोणतें तरी फुल वर्षभर त्यांच्या कोटावर नेहमीं लटकाविलेलें असतेंच. जंगलांत कधींहि न सांपडणारें असें एकादें फुल मिळालें ह्मणजे तें कोटावर लटकावून आपल्या मित्रांनां दाखविण्यांत त्यांनां विशेष अभिमान वाटतो.

मीं एकदां प्रो. कारव्हर यांनां विचारलें, कीं, आपण इतके भिडस्त असूनहि, या प्रांतांतील इतक्या काळ्या व गोऱ्या उत्तम लोकांची ओळख कशी करून घेतलीत ? ते म्हणाले—वनस्पतींविषयीं कांहीं उपयुक्त ज्ञान मला आहे असें जेव्हां त्यांनां समजलें तेव्हां ते माझ्या-बरोबर भाषण करण्याला उत्सुक झाले.

‘ पण प्रसिद्धिकरणाचा कांहीं तरी आपला मार्ग असला पाहिजे; एरवीं आपणाला वनस्पतीविषयीं ज्ञान आहे हें या लोकांना कसें समजलें ?’ असें मीं विनोदानें विचारलें.

ते ह्मणाले—हं, तें असें झालें. येथें आल्यावर कांहीं दिवसांनीं मी माझी वनस्पतीची परडी हातांत घेऊन जंगलाकडे जात होतों, वन-

स्पतीचे रोग व त्यांचे कृमिशत्रु यांविषयीं मी कांहीं शोध करित होतों. हा एक झातारा निग्रो कसलीशी चमत्कारिक पेटी हातांत घेऊन जात आहे असें एका स्त्रीला वाटून तिनें मला थांबविलें आणि मी फेरीवाला आहे कीं काय असें विचारलें. मी काय करीत आहें हें तिला मीं सांगितलें. तें ऐकून तिला आनंद झाला आणि 'माझ्या गुलाबांनां रोग झाला आहे, त्यांनां पहा' असें तिनें मला सांगितलें. गुलाबाकरितां तिनें काय उपाय योजावें हें मीं तिला सांगितलें, मी तेथें बसलों आणि तिला उपाय लिहून दिले.

ते पुढें ह्मणाले—या व दुसऱ्या मार्गांनीं, संस्थेंत वनस्पतिविद्या जाणणारा एक गृहस्थ आहे अशी बातमी बाहेर पसरली. लोक माहिती व सल्ला घेण्यासाठीं मला भेटूं लागले.

मला स्वतःला आतां असें आठवतें, कीं, कांहीं वर्षांपूर्वीं गांवांत एकदां एका वनस्पतीच्या नांवाविषयीं वाद उपस्थित झाला. ती वनस्पति कोणती आहे हें कोणालाहि समजेना. शेवटीं एका गृहस्थानें सांगितलें—कारव्हर नांवाचे एक गृहस्थ शाळेंत आहेत, त्यांनां जगांतील कोणत्याहि वनस्पतीचें, वृक्षाचें, पक्ष्याचें अगर दगडाचें नांव माहीत आहे. त्यांना जर या वनस्पतीचें नांव समजलें नाहीं, तर विशेष चौकशी करण्यांत तथ्य नाहीं, असें समजावें. घोड्यावरून एका मनुष्याला त्या वनस्पतीसहीत प्रो. कारव्हरकडे संस्थेंत पाठविण्यांत आलें. त्यांनीं वनस्पतीचें नांव सांगून पाठविलें. तेव्हांपासून या तऱ्हेचे बरेच नमुने त्यांच्या प्रयोगशाळेंत येत असतात.

ज्ञातिद्वेष नाहींसा करण्याचा उत्तम मार्ग ह्मटला ह्मणजे निग्रोनें आपल्या समाजाचा एक उपयुक्त व अवश्यक सभासद स्वताला बनविणें

हाच आहे असें मी नेहमीं सांगितलें आहे. कोणत्याहि दिशेंत कां असेना, कांहीं विशिष्ट ज्ञान किंवा योग्यता असणाऱ्या पुरुषाला किंवा स्त्रीला प्रत्येक व्यक्तीनें व समाजानें मान दिलाच पाहिजे. याचें उत्तम उदाहरण प्रो. कारव्हरशिवाय दुसरें मिळावयाचें नाहीं. आपली जरूरी नाहीं अशा ठिकाणीं स्वताला पुढें पुढें करण्याची जरी त्यांची वृत्ति नाहीं तरी आपल्या विशिष्ट ज्ञानामुळें व योग्यतेमुळें दक्षिणेंतील काळ्या व गोऱ्या सर्व लोकांशीं त्यानां मैत्री संपादन करतां आली. जगांतील सर्व भागांतून त्यांच्या कामाची पृच्छा करणारीं पत्रें त्यांनां येत आहेत आणि कापसांची शास्त्रीयरीत्या वाढ करणाऱ्या मळवाल्या-मध्यें कापसांच्या नवीन जातींच्या वाढीच्या त्यांच्या प्रयोगांनीं मोठी चळवळ करून सोडली आहे.

जॉर्जियांतील ऑगस्टाचे, टॅबरनकल बॅपटिस्ट चर्चचे पॅस्टर (पालक) डॉ० चार्लस टी. वॉकर यासारखे सुप्रसिद्ध गृहस्थ दक्षिणेंत क्वचित आढळतील असें मला वाटतें. डॉक्टर वॉकरविषयीं बोलतांना प्रेसिडेंट विल्यिएम्. एच. टाफ्ट ह्मणाले कीं, आपण ऐकिलेल्या सर्वांमध्यें ते उत्तम वक्ते होते. खासगी संभाषणांत किंवा सार्वजनिक व्यासपीठावर त्यांच्याहून अधिक मोहक दुसरा कोणी वक्ता मला तर आढळला नाहीं.

मनुष्य जातीवर प्रेम करणाऱ्या, लोकांचें लक्ष्य वेधावें आणि त्यांच्या मनावर परिणाम व्हावा अशा रीतीनें आपले विचार स्पष्टपणें व अस्खलितपणें व्यक्त करणाऱ्या जन्मसिद्ध वक्त्याप्रमाणें डॉक्टर वॉकरच्या संभाषणांत आणि व्याख्यानांत एक प्रकारची मोहनी आहे.

ऑगस्टाच्या शहरांत, दक्षिणेंतील लोकांच्या रुढीप्रमाणें डॉक्टर वॉकर हे रस्त्याच्या एका कोपऱ्यावर किंवा एकाद्या किराण्या दुकाना-

समोर उभे आहेत आणि नुसतें त्यांचें भाषण ऐकण्यासाठींच त्यांच्याभोंवतीं लोकांचा घोळका जमलेला आहे असा देखावा वारंवार दृष्टीस पडतो. ऑगस्टाच्या पंधरा हजार लोकांपैकीं निम्याहून अधिक लोकांना ते नांवानिशीं जाणतात असें ह्मणतात. रस्त्यांत एकादा ओळखीचा गृहस्थ भेटला ह्मणजे त्याच्या कुटुंबांतील इतर मंडळीविषयीं प्रेमानें व मित्रभावानें चौकशी करण्यासाठीं ते थांबतात. गेल्या खेपेला भेटल्यानंतर कुटुंबांतील प्रत्येक व्यक्तीचें कसें काय चाललें आहे किंवा कोणाला काय झालें आहे इत्यादि पृच्छा ते करीत असतात.

अशा रीतीनें एकाद्या ओळखीच्या गृहस्थानें त्यांना रस्त्यांत थांबविलें ह्मणजे बहुतकरून त्यांच्याभोंवतीं दुसरे ओळखीचे गृहस्थ व मित्र जमतात आणि ते एकदां जगांतील भिन्नभिन्न भागांतील आपल्या धाडसाचें किंवा आपल्यावर ओढवलेल्या प्रसंगांचें विनोदानें वर्णन करूं लागले किंवा एकाद्या सार्वजनिक प्रश्नाचें विवेचन स्पष्ट व चटकदार भाषेंत करूं लागले ह्मणजे शहरांतील त्या भागचा व्यवहार कांहीं काल बंद पडतो.

डॉक्टर वॉकर हे उत्तम कथेकरी ( गोष्टी सांगणारे ) आहेत. त्यांच्यापाशीं चुटक्यांचा बराच मोठा संग्रह आहे. वादामध्यें एकादा मुद्दा किंवा विधान बिनतोड प्रतिपादन करण्यासाठीं त्या चुटक्यांचा उपयोग करण्याची विलक्षण खुबी व हातोटी त्यांनां साधलेली आहे. मला आठवतें, कीं, गेल्या खेपेस ते टस्कगीस निग्रो परिषदेला आल्या वेळीं, आगस्टा येथें वॉकर बॅपटिस्ट असोसिएशननें स्थापन केलेल्या शाळेंत शेजारच्या शेतकऱ्यासाठीं आपण काय करणार आहों, हें त्यांनीं सांगितलें. त्यानंतर निग्रो शेतकरी, त्याला मिळणाऱ्या संधी, त्याची

उन्नति इत्यादि विषयांवर ते बोलूं लागले. दिसतो त्याप्रमाणें निग्रो शेतकरी भोळा नाहीं अशी सिनेटर टिलमन यांनीं एकदां तकरार केली होती असें त्यांनीं सांगितलें आणि याविषयीं पुढील गोष्ट सांगितली. आपल्या भागांतील एका निग्रो शेतकऱ्यानें चौथाईच्या करारानें एका गोऱ्या इसमाकडून कांहीं जमीन लागवणीला घेतली. कराराप्रमाणें पिकाचा चौथा हिस्सा त्या गोऱ्या इसमाला जमिनीच्या उपयोगाबद्दल मिळावयाचा होता.

पिकाची वांटणी करण्याची वेळ आल्या वेळीं, तीनच गाड्या कापूस मिळाला असें दिसून आलें आणि हा तीन गाड्या कापूस तो वृद्ध शेतकरी आपल्या कोठाराकडे नेऊं लागला.

अर्थात् त्या जमीनदारानें हरकत घेतली. तो म्हणाला ज्यो काका त्या कापसापैकीं चौथा हिस्सा मला द्यावयाचा असें तूं कबूल केलें नाहींस काय ?

'होय, कप्तान,' शेतकऱ्यानें उत्तर दिलें. 'तें खरें आहे. पण चवथा भागच राहिला नाहीं याबद्दल मला वाईट वाटतें. कारण तीन गाड्या कापूस मिळाला, चवथी गाडी कापूस मिळाला नाहीं.'

डॉक्टर वॉकर संभाषणचतुर व प्रेमळ मित्र आहेत, एवढेंच नव्हे तर ते यशस्वी धर्मोपदेशकहि आहेत. ते न्युयॉर्कमध्यें 'माऊंट आलिव्हेट बॅपटिस्ट चर्च'चे पॅस्टर असतांना, त्यांचीं कीर्तनें व शुभ-वर्तमानोपदेशक या नात्यानें त्यानां मिळालेलें यश याविषयीं न्युयॉर्कच्या वर्तमानपत्रांत पुष्कळ लेख आले.

डॉक्टर वॉकर हे व्यासपीठावर उत्तम व्याख्याते आहेत, एवढेंच नव्हे तर ते उत्तम व्यवहारचतुरहि आहेत. हा गुण (व्यवहारचातुर्य)

विशेष रीतीनें प्रगट करणारीं कांहीं उदाहरणें मला आठवतात. पहिलें उदाहरण सेंट लुईस येथें १८८६ सालीं निग्रो बॅपटिस्टाच्या राष्ट्रीय कन्व्हेन्शनच्या ( सभेच्या ) बैठकींत घडलें. या सभेंत कोणीं एकानें 'दक्षिणेंतील बहिष्कार' या विषयावर भाषण केलें, आणि त्यांत त्यानें दक्षिणेंतील गोरे बॅपटिस्ट, हीं नुसतीं बाहुलीं आहेत, गोऱ्या लोकांकरितां व काळ्या लोकांकरितां भिन्नभिन्न स्वर्ग आहेत असें त्यांचें मत आहे. असें सांगून त्यांना पुष्कळ शिव्या दिल्या.

त्याच बैठकींत कांहीं वेळानें या मनुष्याला उत्तर देण्याची संधि डॉक्टर वॉकरनां मिळाली. त्यांनीं असें दाखवून दिलें, कीं, सदर्न बॅपटिस्ट कनव्हेनशननें नुकतेंच कांहीं महिन्यांपूर्वीं दक्षिणेंतील निग्रो बॅपटिस्ट लोकांसाठीं १०,००० डॉलर धर्मकार्यासाठीं खर्च करण्याचा ठराव पास केला आहे. पहिल्या वक्त्याचा निषेधदर्शक एक ठराव त्यांनीं आणला आणि तो सभेंत पास झाला.

त्याचें भाषण व ठराव हीं दक्षिणेंतील पुष्कळ वर्तमानपत्रांत आणि धार्मिक पंथांच्या मासिकांत प्रसिद्ध झालीं आणि त्यायोगें लोकमत बरेंच बदलून दोन्ही ज्ञातींत सलोखा चांगला वाढला.

डॉक्टर वॉकर हे त्यांच्या हल्लींच्या आगस्टांतील घराहून सोळा मैल दूर असलेल्या, रिचमंड परगण्यांतील हेपझीबाह नांवाच्या खेडेगांवीं जन्मले. त्यांचे वडील आपल्या धन्याचे कोचमन होते. शिवाय ते १८४८ सालीं गुलामांनीं स्थापन केलेल्या देवालयाचे 'डीकन' होते. त्यांचे चुलते त्या देवालयाचे पॅस्टर होते. 'वॉकर बॅपटिस्ट असोसिएशन' या संस्थेचें नांव रेव्हरंड जोसेफ टी. वॉकर नामक त्यांच्या एका चुलत्याच्या नांवावरून पडलें आहे. त्या चुलत्याच्या भगत गुलाम लोकांनीं पैसे

देऊन त्यांना विकत घेऊन मोकळें केलें. १८८० सालीं डॉक्टर वॉकरच्या सुचनेप्रमाणें या वॉकर संस्थेनें निग्रो मुलांसाठीं 'वॉकर बॅपटिस्ट इन्स्टीटयुट' नांवाचें नॉर्मल स्कूल स्थापन करण्याचा ठराव पास केला. आरंभापासून ही शाळा डॉक्टर वॉकर यांच्या सतत व अविरत परिश्रमांवर चालली आहे.

मध्यंतरीं दुसऱ्या कांहीं चांगल्या कामांकडे त्याचें लक्ष्य लागलें. 'आगस्टा सेंटिनल' मासिकाची स्थापना करण्यांत त्यांनीं फार मदत केली. १८९१ सालीं पॅलेस्टाईनच्या पवित्र भूमींत ते प्रवास करीत असतांना त्यांनीं तेथून आपल्या प्रवासाचीं वर्णनें लिहून पाठवून या मासिकांत प्रसिद्ध केलीं. त्यामुळें त्याला शोभा येऊन त्याचे वर्गणीदार बरेच वाढले. १८९३ सालीं आगस्टा येथें निग्रो स्टेट फेअर ( संस्थानची जत्रा ) स्थापन करण्याच्या कामीं ते प्रमुख होते. ही जत्रा तेव्हांपासून चांगली चाललेली आहे. दुसरें त्यांचें अंगीकृत कार्य ह्मटलें ह्मणजे त्यांनीं आपल्या देवालयाला जोडून 'टॅबरनेकल ओल्ड फोक्स होम' ( वृद्धाश्रम ) नांवाची संस्था काढिली आहे व चांगली चालविली आहे. संस्थानच्या सर्व धार्मिक व शिक्षणविपयक कामांत त्यांनीं पुढाकार घेतलेला आहे आणि राजकारणाची थोडीशी चांचणी केली आहे. ते एकदां रिपब्लिकन स्टेट एक्सिक्युटिव्ह कमिटीचे सभासद होते.

या सर्व चळवळी आणि दुसऱ्या दिशांनीं चाललेले त्यांचे प्रयत्न हे सर्व बाजूस ठेविले असतां, डॉक्टर वॉकर हे वर्तमान वस्तुस्थितीला धरून चालणारे गृहस्थ आहेत. त्यांनीं स्वतांकरितां आणि आपल्या लोकांकरितां मिळालेल्या संधींचा होतां होईल तितका उपयोग करून घेतलेला आहे. ते चळवळे नाहींत. देशांतील दोन्ही भागांमध्यें आणि

ज्ञातीमध्यें प्रेम व ऐक्य असावें ह्मणून त्यांच्याइतके प्रयत्न दुसऱ्या कोणींहि केले नाहींत. अमेरिकेंतील दुसऱ्या कोणत्याहि शहरापेक्षां आगस्टामध्यें काळे व गोरे लोक अधिक सुखानें व समाधानानें राहतात याचें बहुतेक श्रेय त्यांनां आहे.

डॉक्टर वॉकर यांच्या जीविताचें आदर्शवाक्य त्यांच्याच शब्दांनीं सांगतों. 'कृतघ्नतेचा दोष अंगीं लावून घ्यावयाचा नाहीं, मित्राला कधींहि दगा द्यावयाचा नाहीं आणि शत्रूला परत कधींहि मारावयाचें नाहीं,' असा माझा संकल्प आहे.

डॉक्टर वॉकर आणि त्यांचेसारखे दुसरे पुष्कळ पुरुष माझ्या ज्ञातींत आहेत; यामुळें मला माझ्या ज्ञातीसंबंधानें आदर आहे इतकेंच नव्हे, तर माझ्या ज्ञातीविषयीं मला अभिमान वाटतो.

शुद्ध आफ्रिकन रक्ताचा निग्रो व भेसळ रक्ताचा निग्रो यांची सापेक्ष योग्यता कशी असते या प्रश्नाचें उत्तर देण्यासाठीं, आयुष्याच्या भिन्न स्थितींत प्रतिष्ठा मिळविणाऱ्या पांच इसमांचीं उदाहरणें मीं सांगितलीं. दुसऱ्या शेंकडों जणांचीं नांवें मला सांगतां येतील. हे त्यांच्याप्रमाणें सुप्रसिद्ध नसले तरी आपापल्या परीनें देशाची व ज्ञातीची अमोलिक सेवा करीत आहेत. येथें टस्कगी संस्थेंतील आमचा तीस वर्षांचा अनुभव सांगणें अप्रासंगिक होणार नाहीं. जे विद्यार्थी आपल्या सबंध शिक्षणक्रमांत उत्तम ठरतात त्यांना आह्मीं ग्रॅजुएटिंग ह्मणजे ह्मणजे शेवटच्या वर्गांत 'व्हलीडिक्टोरियन' (स्नातक) नांवाची शेवटची मोठी मानाची पदवी देतों. आमच्या संस्थेंत शुद्ध काळ्या रक्ताच्या विद्यार्थ्यांची संख्या अधिक नाहीं, तरी ही शेवटची पदवी भेसळ व शुद्ध रक्ताच्या विद्यार्थ्यांमध्यें सारखी वांटली गेलेली आहे, असें आह्मांला आढळून आलें.

कोणाहि व्यक्तीची, ज्ञातीची अगर समाजाची योग्यता आधीं ठरवूं पहाणारें विवेचन शुष्क आहे असें मला स्वतःला वाटतें. प्रथम व्यक्ती-प्रमाणें ज्ञातीलाहि निरनिराळे गुण व सेवेची निरनिराळी पात्रता असते. अशी वस्तुस्थिति असल्यामुळें प्रत्येक व्यक्तीला, त्याच्या वाढीसाठीं व उन्नतीसाठीं, त्याला अत्यंत उपयुक्त बनविणाऱ्या संधी देणें हें शहाणपणाचें काम आहे.

जेव्हां एकाद्या व्यक्तीला किंवा ज्ञातीला आपल्या पदापर्यंत--ध्येया-पर्यंत मोकळेपणानें सक्तीशिवाय जातां येते, तेव्हां ते स्वतः सुखी व तृप्त असतात, एवढेंच नव्हे, तर समाजांतील इतर लोकांशीं ते मोठ्या प्रेमानें व गुण्यागोविंदानें वागूं लागतात.

दुसरें, हें लक्ष्यांत ठेविलें पाहिजे कीं, मानवी जीवित व मानवी-ज्ञात (समाजसंस्था) हीं इतकीं कांहीं भानगडीचीं आहेत, कीं, एकाद्या व्यक्तीच्या अगर ज्ञातीच्या अंगीं कोणत्या गुप्त शक्ति असूं शकतील हें कोणालाहि ठरवितां येणार नाहीं.

समाजामध्यें आपण स्वतःला व इतर जगाला अत्यंत उपयुक्त होऊं अशी जागा किंवा स्थान कोणतें आहे हें शिक्षणानें, प्रयत्नानें आणि जीविताच्या भिन्नभिन्न चळवळीविषयीं व स्थितीविषयीं केलेल्या प्रयो-गानें कोणत्याहि व्यक्तीला अगर ज्ञातीला ठरवितां येणें शक्य आहे.

याहून इतर गोष्ट गृहीत धरणें ह्मणजे ज्या स्वतंत्र संस्थांच्या आश्रयाखालीं आह्मी राहतों, त्यांचें महत्व, आणि त्या (संस्था) अस्तित्वांत आणण्यासाठीं जीं कित्येक शतकें प्रयत्न व श्रम करावे लागले त्यांचें महत्व नाकबूल करण्यासारखें आहे.

## प्रकरण दहावें.

# यूरोपांतील उच्चनीचांची भेट.

[ज्ञान व चातुर्य प्राप्त करून घेण्याच्या अनेक मार्गांपैकीं देशाटन हा एक महत्त्वाचा मार्ग आहे. प्रवासानें निरनिराळ्या देशांतील भिन्नभिन्न परिस्थिति, चालीरीति, तेथील लोकांपुढील प्रश्न वगैरे अनेक गोष्टींचें प्रत्यक्ष ज्ञान होतें: आणि आपली दृष्टि सूक्ष्म व व्यापक होते. उलटपक्षीं, एकाद्या महत्कार्याचा भार शिरावर घेऊन कार्यकर्त्याला जी व्यवहारी व तीक्ष्ण दृष्टि लाभलेली असते तिच्या योगानें निरनिराळ्या देशांचें यथार्थ निरीक्षण करण्याची शक्ति अंगीं येते. वाशिंग्टननें हें दोन्ही प्रकारचें सामर्थ्य मिळविलें आहे. वाशिंग्टननें यूरोपच्या एकंदर तीन सफरी केल्या. पहिलींमध्यें सामान्य निरीक्षण व शिष्ट लोकांच्या भेटी यांखेरीज त्यानें विशेष कांहीं केलेंसें दिसत नाहीं. पण नंतरच्या सफरींत स्वज्ञातीय निग्रोप्रमाणेंच ज्याची निकृष्ट स्थिति आहे अशा यूरोपमधील गरीब व बेकार वर्गाची स्थिति कशी आहे व ती सुधारण्याकरितां तिकडे काय प्रयत्न केले जात आहेत हें त्यानें मार्मिकपणें पाहिलें, व आपलें निरीक्षण व आपलीं मतें त्यानें एका वाचनीय ग्रंथामध्यें नमूद करून ठेवलीं आहेत. प्रस्तुत प्रकरणांत आपल्या प्रवासांत पाहिलेल्या गोष्टींचें फक्त सामान्य दिग्दर्शनच त्यानें केलें आहे.

अमेरिकेची गोरी वस्ती यूरोपमधून गेलेल्या वसाहतवाल्यांची आहे. अर्थात् यूरोपियन रीतीभाती, विचार व ज्ञान यांचा अमेरिकेवर परिणाम होणें स्वाभाविक आहे. पण स्वतंत्र हवेंत व नवीन परिस्थितींत राहून अमेरिकेनें सुधारणेच्या बाबतींत इतकी आघाडी मारली आहे, कीं, अमेरिकेचा, आतां उलट यूरोपवर परिणाम होऊं लागला आहे. हा परिणाम दोन तऱ्हांनीं होतो.

अमेरिकेंतील सुधारलेल्या कृषीनें तिकडील माल यूरोपांत येऊं लागला. त्यामुळें मागसलेले यूरोपियन शेतकरी पार बसले, आणि एक तर आपली शेतकी सुधारावी किंवा मजूर बनून अमेरिकेस जावें अशी स्थिति त्यांनां प्राप्त झाली आहे. डेनमार्कसारख्या देशांत शेतकी उत्तम केल्यानें तेथील शेतकऱ्यांनां अमेरिकेचा रस्ता सुधारण्याचें कारण पडलें नाहीं. पण आष्ट्रियाहंगेरी, दक्षिण-

इटली येथें शेतकरी वर्गाच्या हातीं जमीन न राहिल्यानें व अमेरिकेच्या चढा-ओढींत त्यांचा टिकाव न लागल्यानें त्या देशांतून दरवर्षी कितीतरी मजूर नव्या दुनियेंत जातात.

अमेरिकेचा दुसरा परिणाम म्हणजे यूरोपियन मजूर अमेरिकेंत जाऊन पैशानें व शिक्षणानें संपन्न होऊन येतात व येथील (यूरोपमधील) परिस्थितींत क्रांति करतात, हा होय. अमेरिकेंतील सुधारलेल्या कल्पना व नवीन कृती घेऊन आलेले लोक समाजांतील अत्यंत निकृष्ट लोकांची स्थिति सुधारतात, आणि खालचा पाट उचलला म्हणजे सारा देव्हारा जसा वर उचलला जातो तद्वत् यूरोपांतील साऱ्या समाजाचें होत आहे. वाशिंग्टननें इंग्लडच्या मजूरदार वर्गाची स्थिति फारच बारकाईनें तपासली आहे, व लॉर्ड मोर्लेसारख्या विद्वान लोकांशीं त्या बाबतींत त्यानें चर्चाहि केली आहे. पण त्याविषयीं त्यानें आपलें मत स्पष्टपणें दिलें नाहीं. स्वातंत्र्याच्या व समतेच्या वातावरणांत वाढलेल्या वाशिंग्टनला इंग्लडमधील स्थिति ( कीं जेथें थोडेसे धनवान लोक हिंवाळ्यांत परगांवीं गेले असतां लाखों मजूरांना उपासमार काढण्याची पाळी येते अशी स्थिति ) समाधानकारक वाटली नसावी. पण इंग्लडमधील सुशिक्षित पुढारी जगांतील सर्व देशांतील प्रश्नांवर अत्यंत आस्थेनें व व्यापक दृष्टीनें विचार कर-तात, याचें त्याला मोठें कौतुक वाटलें.

सर्व गोष्टींचा विचार करून वाशिंग्टननें जुन्या ( यूरोपमधील ) व नव्या दुनिये ( अमेरिके ) मधील फरक एका पारिग्राफांत आणला आहे तो असाः— "जुन्या सुधारणेचा पाया गरीब लोकांचें अज्ञान व त्यांच्यावर होणारा सामाजिक जुलूम यांवर रचलेला आहे. थोड्या लोकांचें हित साधण्याकरितां व त्यांची उन्नति होण्याकरितां, बाकीच्या अनेकांना अज्ञानांत ठेऊन, त्यांच्या जन्मसिद्ध हक्कांची पायमल्ली करण्यांत आली आहे. नव्या सुधारणेचे प्रागतिक देश, अशा रीतीनें आपली उन्नति होईल असें मानीत नाहींत. सामान्य जनतेला खालीं न दावतां, शाहणे व हुशार, स्वतः स्वतंत्र विचार करण्याला व आपल्या पाया-वर उभे राहण्याला समर्थ करून सर्व राष्ट्रांचें कल्याण ते साधीत आहेत." ]

अमेरिकेंतील सर्व वर्गांच्या लोकांच्या भेटीपासून मी बरेंच शिकलों आहें. पण यूरोपांतील भिन्नभिन्न वर्गांतील लोकांच्या भेटीपासून मला सुदैवानें बरेंच शिक्षण मिळालें आहे.

यूरोपांतून प्रवास करीत असतां १९१० सालच्या शरदतूंत मी क्राको नांवाच्या एका प्राचीन शहरीं गेलों. हें शहर पूर्वी पोलंड देशाची राजधानी होतें. आह्मी मुक्कामाला जाऊन पोहोंचतों तों संध्याकाळ झालेली होती. सबंध दिवसभर एकहि अमेरिकन किंवा इंग्रजी बोलणारा दुसरा कोणीहि गृहस्थ आमच्या दृष्टीस न पडल्यामुळें मला कसेंसें वाटूं लागलें व अगदीं करमेनासें झालें. वास्तव गाडींतून खालीं उतरतांच 'महाराज, आपण बुकर टी. वाशिंग्टन ना ?' अशी कोणा एकाची हांक ऐकून मी थोडासा चकित झालों. कारण, त्या आवाजाची ढब अगदीं अमेरिकन होती.

'होय, तोच मी.' असें मीं उत्तर दिलें आणि यूरोपांतील या दूरच्या भागांत आपला हा स्वर ऐकून मला फार आनंद होत आहे, असें मीं त्याला सांगितलें. थोड्याच मिनिटांत त्याचें व माझें भाषण सुरू झालें आणि तो गृहस्थ माझ्या जन्मभूमींत ह्मणजे वेस्ट व्हर्जिनियांत एकदां रहात होता, असें मला कळलें. त्याचा मूळ देश पोलंड असावा आणि तो यूरोपच्या पूर्व व दक्षिणभागांत आढळणाऱ्या, देशांतर केलेल्या लोकांपैकीं एकादा पोलिश ज्यू ( यहुदी ) असावा असें मला वाटतें.

दुसरे दिवशीं एक हुशार अमेरिकन स्त्री—पण पोलिश वंशाची—मला भेटली. हाटेलचा चालक व मालक असलेल्या एका पोलिश काऊंटची ही पत्नी होती. क्राकोमध्यें असतांना, पोलिश देशभक्त कोस्कीस्को याचें थडगें मीं जाऊन पहावें असें याच बाईनें मला सांगितलें. हा देशभक्त क्रांतिकारक वीर होता, आपल्या देशांत लोकांनां स्वातंत्र्य मिळत नाहीं, असें जेव्हां यानें पाहिलें तेव्हां दुसऱ्या नवीन खंडांत ( अमेरिकेंत ) त्या स्वातंत्र्याची स्थापना करण्यासाठीं तो समुद्र ओलांडून गेला होता, असें मी शाळेंत असतांना वाचलें होतें,

स्वातंत्र्य मिळविण्यासाठीं अमेरिकेनें केलेल्या पहिल्या प्रयत्नांत कोस्कीस्कोनें अमेरिकेसाठीं काय केलें हें मी शाळेंत इतिहासांतून शिकलों होतों. पण त्यानें माझ्या ज्ञातीच्या लोकांच्या स्वातंत्र्यासाठीं व शिक्षणा-साठीं काय केलें होतें हे क्राकोमध्यें माझ्या नजरेस आणीतोंपर्यंत मला माहित नव्हतें.

मला तेथें असें समजलें, कीं, १७९७ सालीं अमेरिकेस दुसऱ्या खेपेस आल्यानंतर त्यांनीं आपलें मृत्युपत्र केलें आणि त्यांत त्यांनीं या देशांतील आपली कांहीं मिळकत थॉमस जेफरसन* यांच्या नावें करून, निग्रो गुलामांनां विकत घेऊन त्यांनां स्वतंत्र करण्यासाठीं आणि त्यांनां औद्योगिक व इतर शिक्षण देण्यासाठीं तिचा विनियोग करावा असें लिहून ठेविलें.

त्यांच्या मरणानतर सात वर्षांनीं (न्युजरेसीमध्यें) नेवार्क येथें निग्रोसाठीं 'कोस्कीको स्कूल' नांवाची एक शाळा स्थापन झाली. या शाळेसाठीं तेरा हजार डॉलर ठेविलेले होते.

या पोलिश देशभक्ताला क्राको येथील क्याथीड्रलांत पुरलेलें आहे. हें क्याथीड्रल ह्मणजे पोलंडचे 'वेस्ट मिन्स्टर अबेचा†' होय. या मंदिरांत त्या देशच्या सन्माननीय पुरुषांचीं स्मारकें भरलेलीं आहेत. क्याथीड्रलच्या संगमरवरी जमिनीखालच्या कमानींत कोस्कीको विश्रांति घेत आहे. त्याचें थडगें पाहिल्याबरोबर, 'जग हें वस्तुतः किती लहान आहे ! आणि लोकांना एकत्र बांधणारे धागे (संबंध) किती विलक्षण आहेत!' असा विचार माझ्या मनांत आला. पहा, मी या परकी-देशांत आहें, माझ्या घरापासून मी इतका लांब येईन अशी मीं माझ्या

* हे अमेरिकेचे तिसरे प्रेसिडेंट होत.

† इंग्लंडांत मोठ्या नामांकित लोकांना या क्याथीड्रलमध्यें पुरतात.

आयुष्यांत कधींहि अपेक्षा केलेली नव्हती. तथापि अमेरिकेंत ज्यानें माझ्या ज्ञातीच्या लोकांसाठीं सर्वांत पहिल्यानें एक कायम शाळा स्थापन करून त्यांना ऋणी करून सोडलें त्या मनुष्याला मी आज येथें वंदन करीत आहें.

मीं त्या थडग्यावर माझ्या ज्ञातीच्या वतीनें एक गुलाबाचें फूल ठेविलें.

थोड्या दिवसानंतर आगगाडीनें व छकडी गाडीनें एक दिवस प्रवास करून पोलंडांतील दुसऱ्या खेड्यापाड्यांत तेथील शेतकऱ्यांची साधी राहणी पाहण्यासाठीं मी गेलों. डोंगराळ प्रदेशांत धाब्याचीं छपरें असलेल्या कांहीं झोंपड्यापाशी आह्मी थांवलों. त्यांचीं घरें आंतून कशीं आहेत हें पहावें ह्मणून मीं एका झोपडीचें दार ठोठावलें आणि इंग्रजींत कांहीं प्रश्न विचारले. समजण्याजोगें उत्तर मिळेल अशी मला आशा नव्हती. परंतु एका मनुष्यानें साधारण चांगल्या इंग्रजी-भाषेंत उत्तरें दिलेलीं पाहून मी चकित झालों. आपण (मिचिगान येथील) डेट्राईट शहरामध्यें वरेच दिवस राहिलों होतों असें त्यानें मला सांगितलें. माझ्याबरोबर आलेले माझे मित्र डॉ. राबर्ट इ. पार्क हेहि डेट्राइटमध्यें राहिले होते. अर्थात् ते त्याच्याशीं, त्या शहरांत पोलिश वसाहतवाल्यांचा पुढारी असलेल्या कोलिसीनस्कि नांवाच्या प्रसिद्ध बंड-खोर उपाध्यायाविषयीं मोकळेपणानें बोलूं लागले.

यापूर्वीं एक आठवडा, सिसलीच्या जंगली प्रदेशांत क्यांपो फ्रांकोच्या गंधकाच्या खाणी मीं पाहिल्या. या खाणींच्या खोल भागांत मीं एका बेलदाराला पाहिलें. हा मनुष्य मीं पूर्वीं काम करीत असलेल्या वेस्ट व्हर्जीनियाच्या खाणींत काम करीत होता.

अशाच तऱ्हेचे अनुभव मला युरोपांत जागजागीं आले. यूरोपच्या दूरदूरच्या प्रदेशांत अमेरिकेचें ज्यांनीं नांवहि ऐकिलेलें नाहीं असे बरेच

लोक भेटतील असें मला वाटत होतें. पण माझी भाषा बोलणारे, इतकेंच नव्हे तर स्वदेशबांधवांप्रमाणें माझें स्वागत करणारे लोक मला ठिकठिकाणीं आढळले. या गोष्टींवरून युरोपियन राहणी, यूरोपच्या अडचणी व तेथील जनता यांचा अमेरिकेशीं कसा निकट संबंध आहे व अमेरिकेवर त्यांचा कसा परिणाम होत आहे, याची मला पूर्वीं-पेक्षां अधिक कल्पना आली. तसेंच अमेरिकेचा उलट युरोपावर कसा विलक्षण आणि अकल्पित परिणाम होत आहे, हेंहि मला उत्तम रीतीनें पाहतां आलें.

मीं एकंदरींत यूरोपच्या तीन सफरी केल्या आहेत. कांहीं वर्षांपूर्वीं मीं पहिली सफर केली. ती करण्यांत माझा कांहीं विशिष्ट हेतु नव्हता. मी त्या वेळीं प्रवासाच्या मुख्य मार्गानें गेलों. शिष्ट सत्ताधिकारी लोकांच्या बाजूनें इंग्लंड व यूरोपखंडाचे कांहीं इतर भाग मीं पाहिले. उदाहरणार्थ, लंडनमधील अमेरिकन वकील ऑनरेबल जोसेफ एच. शोट यांचा मीं पाहुणचार घेतला, विंडसर कॅसलमध्यें राणीच्या एका उपाहाराला हजर राहण्याचा मला मान मिळाला व हल्लींचे अमेरिकेचे वकील आनरेबल जेम्स ब्राईस यांची मीं ओळख करून घेतली. याशिवाय आणखी पुष्कळ सुप्रसिद्ध लोकांच्या मीं भेटी घेतल्या. त्यांचीं नावें त्यांनीं अंगीकृत केलेल्या सर्वलोकहितकारी कामांमुळें मला आधींच परिचित झालेलीं होतीं.

शेवटच्या सफरींत होतां होईल तों प्रवासाचे राजमार्ग टाळण्याचा आणि दरिद्री कंगाल अशा लोकांची स्थिति पाहण्याचा मीं निश्चय केला. या सफरीचा माझा हेतु या देशांतील माझ्या ज्ञातीच्या लोकांच्या स्थितीशीं राजकीय व सांपत्तिकदृष्ट्या समान अवस्थेंत असणाऱ्या यूरोपांतील गरीब लोकांची स्थिति ताडून पहावी असा होता. यूरोपांतील

गरीब लोकांनां कोणत्या संकटाखालीं व ओझ्याखालीं रहावें व राबावें लागतें हें जर अमेरिकेंतील निग्रोंनां थोडेंसें समजलें, तर त्यांची स्थिति केव्हां केव्हां त्यांनां भासविली जाते, तितकी भयंकर मुळींच नाहीं असें त्यांनां दिसून येईल.

यूरोपांतील कनिष्ठ लोकांची स्थिति समजून घेण्यांत माझा दुसरा एक हेतु होता. दक्षिणेंतील निग्रो लोकांसाठीं टस्कगी संस्थेंत आह्मीं चालविलेलें काम आणि यूरोपांतील निरनिराळ्या भागांत गरीब लोकांसाठीं केलें जाणारें काम यांमध्यें बराच निकट संबंध आहे, अशी माझी पुष्कळ वर्षें खात्री झालेली होती. दक्षिणेंतील निग्रोचा व यूरोपांतील गोऱ्या मनुष्याचा इतिहास जरी भिन्नभिन्न असला तरी दोघांच्या जीवितांत पुष्कळ गोष्टींत बरेंच साम्य आहे असें मला वाटतें. निग्रोच्या बाबतींत काळे लोक गुलामगिरींतून स्वातंत्र्याकडे जाण्याचे प्रयत्न करीत आहेत. दुसऱ्या उदाहरणांत गोरे लोक सौम्य स्वरूपाच्या दास्यत्वांतून राजकीय व सांपत्तिक स्वातंत्र्याकडे मजल मारीत आहेत; आणि पहिल्या उदाहरणांत एका ज्ञातीनें व दुसऱ्या उदाहरणांत एका वर्गानें आक्रमिलेल्या बिकट मार्गाचीं साधनें बहुतेक सारखींच आहेत.

पण या सर्व हेतूंशिवाय, माझें लक्ष्य त्या लोकांकडे स्वाभाविकपणेंहि लागलें. जी व्यक्ति किंवा ज्ञात गुलामगिरींतून वर आलेली आहे, तिला, स्वतास चालावा लागलेला मार्ग किंवा त्या मार्गाचा कांहीं भाग चालून आलेल्या दुसऱ्या व्यक्तीविषयीं अगर जातीविषयीं विशेष आस्था व सहानुभूति वाटल्यावांचून राहणार नाहीं.

उन्हाळ्याच्या अखेरीस मी लंडनमध्यें आलों. त्या वेळीं तेथील सर्व शिष्ट, सभ्य, प्रसिद्ध व श्रीमंत लोक सुटीमध्यें बाहेर दुसऱ्या देशांत

गेले होते. हिंवाळ्यासाठीं मुद्दाम बांधलेलीं घरें ज्याप्रमाणें उन्हाळ्यांत बंद असतात, त्याप्रमाणें या लोकांच्या बाबतींत, लंडन शहर शून्य झालें होतें. पण ज्यांचा परिचय मला या सफरींत करून घ्यावयाचा होता, ते सहा कोटि लोक तेथें होते.

कशा ना कशा मार्गानीं तेथील गरीब लोकांची—विशेषतः दरिद्री व मजूर लोकच बहुतेक राहतात अशा ईस्ट लंडन भागांतील लोकांची राहणी मीं बरीच पाहिली. मला सांपडतील ते शहरांतील अतिशय काळे कुट्ट कोने कोपरे पहात मी रात्रीं फिरलों. एके रात्रीं, टेम्स नदीच्या बंधाऱ्यावर, दिवसा किनाऱ्यावर इकडून तिकडे फिरणाऱ्या व रात्रौं फरशीवर निजणाऱ्या त्या मोठ्या शहरांतील करुणास्पद निराश्रितांची मीं भेट घेतली. दुसऱ्या खेपेस दारूच्या दुकानांत व पानभोजनालयांत मी गेलों. येथें गरीब वर्गांतील स्त्रीपुरुष दारु पिण्यासाठीं व गप्पा मारण्यासाठीं जमतात. शहरांतील गरीब भागांतील पोलिस कोर्टांत मी पुष्कळदां गेलों. पोलिसांच्या हातांत सांपडणाऱ्या हतभागी अकिंचन लोकांनां लंडनचे पोलिस कोणत्या पद्धतींनीं वागवितात, हें पाहण्याची मला संधि मिळाली.

आस्ट्रिया, इटली व डेनमार्क यांमधील खेड्यापाड्यांतील कामकरी लोकांचा परिचय करून घेण्यांत शक्य तितका अधिक वेळ खर्च करावा, असा माझा बेत होता.

लंडन शहरांतील मजुरांच्या स्थितीचा विचार करतांच मीं वर सांगितलेल्या देशांतील खेडवळ लोकांच्या स्थितीची मला आठवण होते. कारण लंदन शहराची लोकसंख्या कोणत्याहि शहराच्या लोकसंख्येपेक्षां अधिक आहे आणि इंग्लंद देशांतच विशेषतः सामान्य लोकांची व शेतीची फारकत झाली आहे. आस्ट्रिया, इटाली व डेनमार्क

हे कृषिप्रधान देश आहेत. एक रशिया देशाशिवाय यूरोपच्या या देशांमध्येंच लोक बहुतेक जमिनीवर अवलंबून असतात.

मीं पाहिलेल्या यूरोपच्या निरनिराळ्या भागांतील लोकांच्या स्थितीविषयीं मी काय शिकलों हें सविस्तर वर्णन करणें शक्य नाहीं. शेतीवर अवलंबून राहणारा मनुष्य बहुतकरून सर्व लोकांत अशिक्षित व मागसलेला असतो असें मला आढळून आलें. या वर्गांतील लोकांना शहरांतील त्याच दर्जाच्या लोकांपेक्षां प्रत्येक ठिकाणीं आजपर्यंत शिक्षणाची कमी संधि मिळालेली आहे आणि आस्ट्रिया हंगारीचा कांहीं भाग व लोअर इटाली येथल्याप्रमाणें जमिनींची मशागत करणाऱ्या लोकांच्या ताब्यांत त्या जमिनी ( मालकी नात्यानें ) आल्या नाहींत, तर ते लोक बहुतेक जमीनदार वर्गांच्या ताबेदारींत असतात. लोअर इटलीमध्यें शेतकरी वर्गांच्या जमिनी नाहींत व शाळाहि नाहींत; ते लोक जवळजवळ गुलामगिरीच्या स्थितींतच आहेत. उलटपक्षीं डेनमार्कमध्यें शेतकरी वर्ग हा स्वतंत्र जमीनदार लोकांचा वर्ग असल्यामुळें तेथील शेतीची वाढ इतर कोणत्याहि देशापेक्षां अधिक पूर्णपणें व व्यवस्थितपणें झालेली आहे, एवढेंच नव्हे तर, तेथील शेतकरी वर्गाचें महत्व राज्यकारभारांतहि बरेंच आहे.

राजकीय स्वातंत्र्याचें माहेरघर असलेल्या इंग्लंदांत, जमिनीचा बहुतेक भाग कांहीं थोड्या जमीनदारांच्या ताब्यांत आहे तरी, इतर इंग्रज लोकांप्रमाणें मजूरदार लोकांनाहि सर्व राजकीय हक्क आहेत. असें असूनहि शहरांतील मजूरांनीं आपली सांपत्तिक स्थिति सुधारलेली नाहीं. खरोखर पाहतां, शहरांतील इंग्रज मजूर हा मीं पाहिलेल्या कोणत्याहि देशांतील इतर लोकांपेक्षां आपल्या मालकावर आणि भांडवलवाल्यावर अधिक अवलंबून असतो असें मला दिसून आलें.

लंडनमध्यें राहत असतां घडलेल्या एका प्रसंगानें ही गोष्ट माझ्या लक्ष्यांत चांगली आली. एके दिवशीं एक मजूर आपल्या खिशांत हात घालून शून्य दृष्टीनें रस्त्याकडे पाहत असलेला दिसला. अशा तऱ्हेचे बेकार मजूर लंडनांत पुष्कळ असतात. वर्षांत या सुमाराला काम पुष्कळ असतें काय असें मीं त्याला विचारलें.

त्यानें उत्तर दिलें—छे, आतां काम मिळणें फार कठिण आहे, बरेच लोक बाहेर गेले आहेत.

हा मनुष्य गोदींतील मजूरासारखा मला दिसला. तो मला ईस्ट एन्डमध्यें माईल एन्डपाशीं कोठें तरी भेटला असावा. ईस्ट एन्ड भागाच्या सभोंवतीं सुमारें दहा लाख कामकरी लोक राहतात. लंडनसारख्या मोठ्या शहरांत हजार पांचशें लोक बाहेर गेले असतां, इतका फरक कां पडावा, काम कां मिळूं नये हें मला समजत नाहीं, असें मी त्याला ह्मणालों. त्यानें उत्तर दिलें:—होय महाराज, बराच फरक पडतो. ते लोक बाहेर गेले ह्मणजे सर्व कांहीं काम बंद पडतें.

हा मनुष्य खरोखर फालतू मजूरच असला पाहिजे. चढाओढीमुळें याला नियमित काम मिळत नसावें. इंग्लंडामध्यें अशा मजूरांची संख्या अतिशय मोठी आहे. हा वर्ग ह्मणजे तेथील समाजस्थितीचें एक फल होय.

आठ दहा दिवसानंतर स्काटलंडांतील पहाडी मुलुखांत स्किबो-कॅसलमध्यें त्या वेळचे भारतसचिव लार्ड जॉन मोर्ले यांची माझी भेट झाली. मी तेथें असतांना मजूरांची स्थिति हा विषय पुष्कळदां संभाषणांत आला आणि मीं सांगितलेल्या स्थितीविषयीं कांहीं उल्लेखहि करण्यांत आला. लॉर्ड मोर्ले यांनीं कांहीं टीका न करितां सर्व वाद

कांहीं वेळ ऐकून घेतला, आणि नंतर ते आग्रहानें ह्मणाले, कीं, कांहींहि म्हणा, आतां इंग्रज मजूरांची स्थिति माझ्यामतें पूर्वींच्या कोणच्याहि काळापेक्षां किती तरी पटीनें चांगली आहे. लॉर्ड मोर्ले हे विद्वान व ग्रंथकार आहेत अशी त्यांची जगभर ख्याति आहे. शिवाय ज्या मंत्रि-मंडळानें मजूरवर्गाची स्थिति सुधारण्यासाठीं सर्वांत अधिक खटपट केली, त्या अत्यंत प्रजापक्षीय मंत्रिमंडळाचे ते एक प्रमुख मेंबर ( सभासद ) असल्यामुळें त्यांचें विधान माझ्या मनांत चांगलें बिंबलें.

लंडन शहरांतील गरीब लोकांमध्यें मला जो कांहीं अनुभव आला त्यानें एक गोष्ट पूर्वींपेक्षां अधिक स्पष्टपणें माझ्या नजरेस आणिली. निग्रोला जरी अन्यायानें व दुजाभावानें वागविण्यांत येत आहे, तरी आज त्याला अमेरिकेंत, विशेषत: दक्षिणेंतील संस्थानांत जमीन मिळ-विण्याची, ईश्वराच्या खुल्या प्रदेशांत राहण्याची, साध्या व नैसर्गिक वस्तूंच्या सहवासांत आयुष्य काढण्याची संधि आहे. पण गच्च भरलेल्या इंग्लिश शहरांत लाखों लोक कसाबसा आपला निर्वाह करितात आणि कांहीं वर्षांपूर्वीं केलेल्या चौकशींत बाहेर आल्याप्रमाणें त्यांतील लोक-संख्येचा एक दशांश भाग दारिद्र्यांत किंवा उपासमारींत काढतो; या स्थितीशीं तुलना करितां निग्रोची स्थिति कितीतरी चांगली आहे.

सांप्रत, सार्वजनिक उद्यानें तयार करण्यांत, सार्वजनिक स्नानगृहें व नमुनेदार राहण्याचीं घरें शहरांतील गरीब लोकांच्या वस्तींत बांध-ण्यांत राष्ट्रीय ( इंग्लिश ) सरकार लंडन शहराच्या ( म्युनसिपालटीच्या ) मदतीनें प्रचंड रकमा खर्च करीत आहे. यापेक्षां सर्वांत अधिक चांगली गोष्ट ह्मणजे लंडन शहराबाहेर कांहीं मैल अंतरावर असलेल्या मोकळ्या जागेवर ते सुंदर उद्याननगरें आणि नमुनेदार घरांच्या चाळी बांधीत आहेत. या प्रत्येक घरासमोर लहानशी बाग असून, तें आरोग्यदायक

व सुखकर व्हावें ह्मणून आधुनिक शास्त्राला व शोधाला सुचतील त्या सर्व सोयी त्यांत केलेल्या आहेत. या सुधारणेमुळें दरवर्षी हजारों कामकरी लोकांना शहरांतील गच्च वस्तीच्या, रोगोत्पादक व अंधेऱ्या भागांतून, या खुल्या व मोकळ्या भागांत नेण्यांत येत आहे व तेथें त्यांनां ईश्वरनिर्मित स्वच्छ हवा व सूर्यप्रकाश यांचा लाभ करून घेण्याची संधि मिळत आहे.

गरीब कामकरी लोकांची स्थिति सुधारून त्यांची उन्नति करण्याच्या कामीं सरकारच नव्हे तर लंडनचे उदार गृहस्थहि आपलें 'तनमनधन' खर्च करतांना पाहून मला फार आश्चर्य वाटलें. लंडनांतील गरीब लोकांच्या शिक्षणासाठीं व उन्नतीसाठीं खर्च केलेल्या तनमनधनांपैकीं अर्धा किंवा एक दशांश भाग दक्षिण अमेरिकेंतील निग्रोसाठीं खर्च करण्यांत आला तर, आमच्या देशांतील ज्ञातिविषयक प्रश्न बहुतेक सुटला जाईल, अशी मला खात्री आहे.

लंडनहून मी, मागें सांगिल्याप्रमाणें आस्ट्रियांत गेलों, आणि बोहिमियांतील प्रेग शहरीं कांहीं काल राहिलों. तसेंच व्हायेना (आस्ट्रिया) बुदापेस्ट (हंगारी) येथेंहि राहिलों. तेथें असतांना, मीं खेड्यापाड्यांत जाऊन शेतकरी मजुरांची स्थिति पुष्कळदां पाहिली. तेथून मी सिसीलीला गेलों. तेथील पलर्मो प्रांतांत लहानसहान शेतकऱ्यांची स्थिति मीं पाहिली. मध्यभागांतील डोंगराळ प्रदेशांत क्यांपो फ्रांको येथील गंधकाच्या खाणी मीं पाहिल्या. क्याटानिया येथें मीं कांहीं दिवस घालविले आणि तेथें द्राक्षाचें पीक आणि द्राक्षाची दारु बायबलांत लिहिल्याप्रमाणें उघड्या पायानें तुडविणारे लोक पाहिले. तेथून मी परत आलों आणि आस्ट्रियन पोलंदांत कांहीं दिवस घालवून मिठाच्या खाणी

पाहिल्या. खेड्यापाड्यांत जाऊन क्राकोच्या आसपास असलेल्या गांवांतील लोकांची स्थिति पाहिली. नंतर सरहद्द ओलांडून मी रशियन पोलंडांत आलों. तेथून मी कोपेन्हेगेनला गेलों आणि तेथील लोकांनीं शेतकीच्या पूर्ण व व्यवस्थित वाढीविषयीं ज्या कांहीं विलक्षण गोष्टी सिद्ध केल्या आहेत त्याविषयीं मीं नवीन माहिती मिळविली.

माझ्या या परदेशच्या सफरींत मीं जें कांहीं पाहिलें व शिकलों त्या सर्वांचा विचार करितां, अतिशय मागसलेले लोक असलेल्या यूरोपच्या भागांत, एका मोठ्या पण सावकाश होणाऱ्या क्रांतीचीं चिन्हें मला स्पष्ट दिसलीं. लोअर इटली व सिसलीखेरीज करून प्रत्येक ठिकाणीं कनिष्ट मनुष्य वर जाण्याचा, आपली उन्नति करून घेण्याचा यत्न करीत आहे आणि त्याबरोबरच सुधारणेचा दर्जाहि वाढवीत आहे असें मला आढळलें.

प्रत्यक्षपणें असो किंवा अप्रत्यक्षपणें असो, ही क्रांति बहुतेक अंशीं अमेरिकेच्या उदाहरणामुळें घडून येत आहे. उदाहरणार्थ, अमेरिकेंतील मध्यभागांच्या शेतांचीं धान्यें परदेशीं पाठविल्यामुळें, यूरोपांत ज्या ज्या प्रदेशांत तो माल गेला, तेथील शेतकीची जुनी पद्धत चढाओढीमुळें मोडून गेली. अमेरिकन शेतकीच्या स्पर्धेमुळेंच आस्ट्रिया, हंगारी आणि दक्षिण इटली येथील लोक भराभर अमेरिकेंत येऊं लागले. दक्षिण यूरोपांत जेथें शेतकरी मजुरांची स्थिति विशेष वाईट होती, तेथून अमेरिकेंत लोक अधिकाधिक जाऊं लागले, असें मला आढळलें. उलटपक्षीं डेनमार्कमध्यें शेतकीची—शेतकऱ्याची—आणीबाणीची स्थिति, अधिक उपजाऊ व शास्त्रीय अशा शेतकीच्या पद्धतींनीं निभावल्यामुळें, तेथील लोकांचें परदेशगमन—अमेरिकेला जाणें—बंद झालें आहे.

अमेरिकन चढाओढीचा दुसरा एक परिणाम असा आहे कीं, शेतकऱ्याची स्थिति सुधारेल अशी शेतकीची पुनर्घटना होत आहे. मोठमोठ्या इष्टेटीचे तुकडे पाडून लहान जमीनदारांची संख्या वाढविण्याचे प्रयत्न पुष्कळ देशांत होत आहेत. खेड्यापाड्यांतील शाळांच्या स्वरूपांत पुष्कळ सुधारणा झाली आहे. शेतकरी वर्ग हा राष्ट्रीय साधनांचा —धनोत्पादनाचा—अत्यंत महत्त्वाचा भाग आहे असें यूरोपांतील देशांना कळून आल्यामुळें त्या वर्गाच्या उपेक्षित लोकांना शिक्षण देऊन सुधारण्याचे उपाय ते अमलांत आणीत आहेत.

जुनी सुधारणा कनिष्ठ लोकांच्या अज्ञानावर व त्यांचेवर होणाऱ्या जुलमावर वहुतेक अंशीं रचलेली आहे, असें माझें मत आहे. त्या सुधारणेंत पुष्कळ लोकांच्या खर्चानें थोड्या व्यक्तींचें हित साधलेलें आहे. पण सांप्रत यशस्वी व प्रागतिक देश, लोकांनां जुलमानें खालीं दावून नव्हे तर त्यांनां शहाणे, हुषार, स्वतंत्र विचार करण्यास व स्वतःची काळजी घेण्यास समर्थ असें करून आपली उन्नति करून घेत आहेत.

प्रथम, अमेरिकन चढाओढीमुळें हा परिणाम घडून आला. दुसरें, बरेच लोक अमेरिकेंत जाऊन राहिल्यामुळें व तेथील स्थिति पाहून आल्यामुळें हें स्थित्यंतर घडून आलें. दक्षिण युरोपांत, मजूरदार वर्गामध्यें अमेरिकेस जाऊन परत आलेले पुष्कळ लोक मला ठिकठिकाणीं भेटले. अमेरिकेंत मोलमजुरी करून बराच पैसा मिळवून ते परत आले आणि त्या पैशांनीं मिळकत विकत घेऊन ती त्यांनीं सुधारली. या परदेश (अमेरिका) गमनामुळें हंगारी, पोलंड, व दक्षिण इटली येथील लहान जमीनदारांची संख्या बरीच वाढली आहे. हे लोक जेव्हां

केव्हां पैसा कमावून परत येतात. निदान नव्या कल्पना, आणि नव्या महत्त्वाकांक्षा घेऊन परत येतात. पूर्वींइतकी मजूरी घेऊन काम करण्याचें त्यांनीं आतां नाकारिलें. याचा परिणाम असा झाला, कीं, इटलींत व दक्षिण यूरोपाच्या दुसऱ्या भागांत शेतकीच्या मजूरीची किंमत बरीच वाढली.

पण याबरोबर त्यांनां शेतकीचीं यंत्रें, व पीक अधिक देणाऱ्या सुधारलेल्या शेतकीच्या पद्धति उपयोगांत आणाव्या लागल्या. कांहीं लोकांच्या अपेक्षेप्रमाणें परदेशगमनाचा देशाच्या वाढीवर प्रतिकूल परिणाम झालेला आहे असें मला कोठेंहि आढळून आलेलें नाहीं. दक्षिण युरोपांतील खेड्यापाड्यांतील मजूरदार लोकांनां तर, हा अमेरिकेचा प्रवास ह्मणजे एक तऱ्हेचें उच्च शिक्षणच आहे. या प्रवासानें त्यांनां काम अधिक चांगलें व पायाशुद्ध करावयास शिकविलें आहे, एवढेंच नव्हे तर, स्वतःवर विश्वास ठेवण्याला आणि स्वतःच्या मुलाबाळांच्या भावी कल्याणाविषयीं आशा बाळगण्याला शिकविलें आहे. याप्रमाणें मीं वर उल्लेख केलेली युरोपांतील क्रांति मंदगतीनें व धिमेधिमे घडून आलेली आहे.

आतां या गोष्टींपासून धडा घ्यावयाचा असेल तर तो असा कीं, मनुष्यांच्या व्यवहारांत जुलमाची किंवा सक्तीची जागा शिक्षणानें अधिकाधिक भरून काढली पाहिजे. जग बदलत आहे. अधिक सैन्य असलेलें किंवा अधिक संहार करूं शकणारें राष्ट्र आजकाल मोठें नसून तर अत्यंत कार्यक्षम मजूर व अत्यंत उत्पादक यंत्रसामग्री असलेलें, सर्वांत अधिक माल पैदा करणारें राष्ट्रच मोठें होय.

पण मजूर जर कार्यक्षम झाले पाहिजेत, तर त्यांनां चांगलें शिक्षण देऊन स्वतंत्र केलें पाहिजे. आज लष्करी शिपायापेक्षां शाळामास्तर

हा राष्ट्राला फार महत्त्वाचा आहे आणि सैन्यापेक्षां शाळेची सुधारणा करणें हें सर्वांत उत्तम मुत्सद्दीगिरीचें ध्येय झालें पाहिजे.

कनिष्ट लोकांचा परिचय करून घ्यावा या संकल्पानें मी यूरोपची शेवटची सफर करण्यास निघालों होतों आणि यूरोपांत असतांनां तेंच माझें मुख्य काम होतें, तरी प्रसंगवशात् कांहीं श्रेष्ठ लोकांच्या मुलाखतीचा सुयोग मला प्राप्त झाला. खरोखर, अमेरिकेंत माझ्या ज्ञातिबांधवांसाठीं मीं चालविलेल्या कामाशीं संबंध असलेल्या, किंवा त्या कामाविषयीं अगत्य असलेल्या गृहस्थाशीं संभाषण करतांनां जो माझा काल गेला तो यूरोपच्या माझ्या प्रवासांतील सर्वांत सुखकर व उपयुक्त काल होय.

उदाहरणार्थ, माझे मित्र मिस्टर जेकब रीस यांचे मार्फत, 'पोलिटिकेन' नांवाच्या डेनमार्कांतील एका प्रतिष्ठित वर्तमानपत्राच्या संपादकाची—मि. व्ही. काव्हलिंग यांची—मीं ओळख करून घेतली. त्यांच्याद्वारा थोड्या अवकाशांत तेथील खेड्यापाड्यांतील लोकांची राहाणी आणि त्यांच्या हितार्थ स्थापिलेल्या तेथील प्रसिद्ध शाळा मला पाहतां आल्या, आणि त्याविषयीं माहिती मिळवितां आली. कोपेन्हेगेन येथें असतांनां, अमेरिकन प्रतिनिधि मिस्टर मारिस एफ. इगन यांनीं माझी डेनमार्कच्या राजाराणीशीं ओळख करून दिली. टस्कगी येथील आमच्या कामाची त्यांनां पूर्ण माहिती आहे हें ऐकून मला फार आश्चर्य वाटलें. तीस हजार निग्रो असलेल्या डॅनिश वेस्ट इंडिया आयलंडमध्यें टस्कगीसारखें काम सुरू करणें शक्य आहे किंवा कसें याविषयीं भाषण करण्याला ते उत्सुक दिसले. माझें पहिलें पुस्तक 'Up from slavery' (आत्मोद्धार) हें आपण वाचलें आहे इतकेंच नव्हे, तर मीं नुकताच

संपविलेला 'Story of the Negro' ( निग्रोचा इतिहास ) हा ग्रंथहि आपण वाचला आहे असे राणीसाहेबांनीं मला सांगितलें. अमेरिकेंतील निग्रोच्या प्रत्यक्ष स्थितीविषयीं व प्रगतीविषयीं, मला भेटलेल्या अनेक अमेरिकन लोकांपेक्षां डेनमार्कच्या राजाराणींनां अधिक माहिती आहे हें पाहून मला अत्यंत आश्चर्य वाटलें.

दुसऱ्या वेळीं मी अँड्र्यु कॉर्नेजीचा, स्काटलंडांतील त्यांच्या बंगल्यांत पाहुणा होतों. हे उत्तम विश्रांतीचे व मौजेचे तीन दिवस मीं स्कीबो क्यासल येथें घालविले. स्कीबो क्यासल स्काटलंडच्या उत्तरेकडील डोंगराळ प्रदेशांत लोकवस्तीपासून बराच दूर आहे, तरी तेथें असतांनां मी भर लोकवस्तींतच आहें असें मला वाटलें.

सर्व तऱ्हेचे लोक स्कीबो क्यासल येथें जातात आणि जगाच्या कल्याणांत भर घालण्याजोगें ज्याचेपाशीं कांहीं आहे अशा मनुष्याचें तेथें चांगलें स्वागत होतें.

साहजिकपणें अशा तऱ्हेच्या पाहुण्यांमध्यें संभाषण व वादविवाद अनेक विषयांवर चालतो. तीन दिवस जगांतील मोठमोठ्या प्रश्नांविषयीं त्यांची प्रत्यक्ष माहिती असणाऱ्या पुरुषांनां वाद करीत असतांना मीं ऐकिलें. मला स्कीबो क्यासल येथें लॉर्ड मोर्ले भेटले, त्या वेळींहि ते हिंदुस्तानचे स्टेट सेक्रेटरीच होते. हिंदुस्तानांत इंग्रज व हिंदी लोकांच्या प्रत्यक्ष संबंधाविषयीं मीं वर्तमानपत्रांतून कांहीं वाचलें होतें, पण तेवढ्यावरून मला कांहीं निश्चित कल्पना नव्हती. ह्मणून या बिकट व भानगडीच्या प्रश्नावर लॉर्ड मोर्ले यांची टीका ऐकून मला फार आनंद झाला. त्यांचें या विषयावरील ह्मणणें मला अधिक चित्ताकर्षक वाटलें; कारण पौरस्त्य आणि पाश्चात्य देशांतील ज्ञानींच्या स्थिती-

मध्यें हिंदुस्तानांतील हिंदी लोक आणि अमेरिकेंतील निग्रो लोक यांच्या-मध्यें त्यांनां साम्य दाखवितां आलें.

दक्षिण यूरोपांतून परत आल्यावर मीं लंडन येथें " दास्यविरोधी आणि दस्युसंरक्षक संघ " या संस्थेच्या द्वारा एक, व नॅशनल लिबरल क्लब या संस्थेच्या द्वारा दुसरें, अशीं दोन भाषणें केलीं. या सभांमध्यें, मिशनरी, लेखक व सरकारी ऑफिसर या नात्यानें ज्यांनीं ज्यांनीं आफ्रिकेंत व आपापल्या देशांत मीं न पाहिलेल्या ठिकाणीं माझ्या ज्ञातीच्या कल्याणार्थ व उद्धारार्थ खटपट केली होती, त्यांनां प्रत्यक्ष भेटण्याची संधि मला मिळाली.

उदाहरणार्थ, पहिल्या संस्थेतर्फे मला दिलेल्या पानसुपारींत उपा-हाराच्या प्रसंगीं, ब्रिटिश वेस्ट इंडीजमध्यें गुलामगिरी बंद करण्यासाठीं अति परिश्रम करणाऱ्या प्रसिद्ध मुत्सद्याचे नातु सर टी. फॉवेल बक्सटन हे अध्यक्ष होते.

या वेळीं असें घडलें, कीं, इंग्लंड, अमेरिका या देशांत आरंभा-पासून आजपर्यंत निग्रोचें मित्राप्रमाणें हित करणारी 'सोसायटी ऑफ फ्रेन्ड्स' (मित्रमंडळ) ही संस्था आपली वार्षिक सभा भरवीत होती. माझ्या भाषणाच्या वेळीं या संस्थेचे पुष्कळ सभासद हजर होते. त्यांपैकीं आफ्रिकेंत निग्रोविषयीं कामगिरी करून प्रसिद्धीस आलेले पुढील गृहस्थ होते. प्रसिद्ध आफ्रिकन शोधक सर हॅरी एच्. जॉनसन, सर आर्थर कोनन डॉईल, मिस्टर इ. डी. मोरेल आणि ॲंटिस्लेव्हरि ॲंड अबॉरिझिनीस प्रोटेक्शन सोसायटीचे सेक्रेटरी रेव्हरंड जे. एच्. हारीस. या सर्वांनीं कांगो फ्रीस्टेटमध्यें सुधारणा घडवून आणण्यासाठीं फार प्रयत्न केले आहेत.

या उपाहाराच्या प्रसंगाच्या आनंदकारक व आश्चर्यकारक गोष्टी ह्मटल्या ह्मणजे सभेस हजर राहतां न आलेल्या प्रसिद्ध पुरुषांचीं पुष्कळ पत्रें होत. यांमध्यें इंग्लंडचे मुख्य प्रधान दि राईट ऑनरेबल हर्बर्ट हेनरी, आसक्विथ यांची एक चिठी आणि दोवा खासगी स्नेह्यांचीं पत्रें हीं होतीं. या पत्रांपैकीं माझ्या दोन नामांकित मित्रांच्या पत्रांत मी चालविलेल्या कामाची उदारपणें इतकी वाखाणणी केलेली होती, कीं, तीं पत्रें येथें द्यावीं असा मला मोह होतो. हीं पत्रें सेक्रेटरी जॉन् जे. हारीस यांनां आलेलीं होतीं व तीं खालीं दिल्याप्रमाणें होतीं.

स्कीबो क्यासल,
डारनेच सदरलंड,
१९ सप्टंबर, १९१०.

"प्रिय मिस्टर हारीस,

आजकालच्या वर्तमान थोर पुरुषांपैकीं एकाचें--बुकर टी. वॉशिंग्टनचें--अभिनंदन करण्याची संधि चुकल्याबद्दल मला फार वाईट वाटतें. त्यांच्या आयुःक्रमाचा आरंभ,--(गुलामगिरींत त्यांचा झालेला जन्म,) आणि त्यांनां हल्लीं प्राप्त झालेला आपल्या ज्ञातीच्या पुढारीपणाचा मान हीं लक्ष्यांत घेतां त्यांची ही उन्नति अद्वितीय आहे, असें मला खचित वाटतें. क्रमाक्रमानें व धिम्मेधिम्मे त्यांनीं आपली उन्नति करून हा सर्वमान्य पुढारीपणा मिळविला आहे; आणि त्याबरोबर त्यांनीं गोऱ्या ज्ञातीचा विश्वास व पसंती, आणि त्यांतील प्रमुख लोकांची मैत्री हींहि संपादन केलेलीं आहेत.

बुकर टी. वॉशिंग्टन यांची गणना अमर किंवा चिरंजीव लोकांत केली पाहिजे. कारण त्यांनीं आपल्या लोकांनां कल्याणाचा मार्ग दाख-

विला आहे; एवढेंच नव्हे, तर त्या मार्गाचे अधिकारी कसें व्हावें हेंहि ते त्यांनां शिकवीत आहेत. त्यांच्यामध्यें जोशाया* व *मोसेस जणो एकवटलेले आहेत.''

आपला—अँड्रयु कार्नेजी.

दुसरें पत्र क्यांटरबरीच्या आर्चबिशपचें होतें. तें येणेंप्रमाणें:—

"लंडनहून फार दूर गांवीं कांहीं फार जरूरीचें काम असल्यामुळें मिस्टर बुकर टी. वॉशिंग्टन यांचें अभिनंदन करणाऱ्या व त्यांनां निरोप देण्याच्या सभेला मला हजर राहतां येत नाहीं, याबद्दल मला मोठी दिलगिरी वाटते. मी असें कळवितों, कीं, आजकालचा एक मोठा बिकट व भानगडीचा प्रश्न सोडविण्याच्या कामीं त्यांनीं जी सेवा केली आहे व जी सेवा ते करीत आहेत, तिचें महत्त्व इतरांप्रमाणें मलाहि माहित व मान्य आहे. ते समकालीन लोकांच्या आदराला सर्वतोपरी पात्र असे गृहस्थ आहेत. एका ज्ञातीला अन्यायानें वागविल्याच्या पापांचें व दोषांचें निरसन करण्यांत ख्रिस्ती लोकांचे जे आजकाल प्रयत्न चालले आहेत त्यांचा इतिहास जर पुढेंमागें लिहिण्यांत आला, तर त्यांत बुकर टी. वॉशिंग्टनचें नांव अग्रस्थानीं येईल.''

लंडनमध्यें गांठ पडलेल्या पुष्कळ प्रसिद्ध पुरुषांच्या भेटी घेणें व त्यांच्याशीं भाषण करणें हें मला फारच आनंददायक व समाधानकारक वाटलें. जगाची भावी स्थिति व जगाचे प्रश्न यांविषयीं ते कसा व्यापक दृष्टीनें विचार करतात हें त्यांच्या भाषणांत मला सर्वत्र आढळून आलें. अमेरिकेंत जे प्रश्न आह्मांला स्थानिक व व्यक्तिविषयक (आमच्या देशाविषयींचेच) असे वाटतात, तेच ज्यांचे हितसंबंध एकाच देशानें

---

* जोशाया आणि मोसेस हे इस्राइल लोकांचे दोन मोठे पैगंबर होत. यां दोघांनीं इस्राइल लोकांनां दास्यत्वांतून सोडवून कसें पार केलें, याबद्दलची कथा बायबलांत जुन्या करारांत वर्णिलेली आहे.

किंवा खंडानें मर्यादित नाहींत अशा इंग्लिश लोकांनां जगाचे प्रश्न वाटतात. मी इंग्लंडांत असतांना असें शिकलों, कीं, अमेरिकेंत ज्ञाति-विषयक प्रश्न हा,—इंग्लिश पोस्टमास्तर जनरल मिस्टर हर्बर्ट साम्युएल्स यांनीं ह्मटल्याप्रमाणें,—'परस्पराहून अत्यंत भिन्न अशा ज्ञाति एकत्र राहत असणाऱ्या सर्व देशांचा आहे.'

अमेरिकेंत निग्रोंनां जें कांहीं यश मिळालें आहे आणि ज्ञाति-विषयक प्रश्न सोडविण्यांत त्यांनीं जी कांहीं प्रगति केली आहे, त्याचा खोल व गंभीर अर्थ या यूरोपच्या सफरीमुळें माझ्या ध्यानीं आला.

प्रकरण अकरावें.

# डेनमार्कांतील शिक्षणावरून मिळालेला बोध.

[सर्व यूरोपच्या प्रवासांत वॉशिंग्टनला जेथें शेतकऱ्याची स्थिति नुसती समाधान कारकच नव्हे, तर हेवा वाटण्याजोगी दिसली असा देशह्मणजे डेनमार्क होय. या चिमुकल्या देशाचें हवापाणी किंवा जमीन विशेष चांगली आहे, असें मुळींच नाहीं. पण शिक्षणानें, मेहनतीनें व सहकारी तत्त्वानें येथील लोकांनीं आपला देश प्रत्यक्ष गोकुळ करून टाकला आहे. यूरोपांतील छोटेखानी शेती करणारा वर्ग अजून आर्थिक व बौद्धिक दास्यांतून पुरा मुक्तहि झाला नाहीं, तोंच डेनमार्कचा शेतकरी आपल्या देशाचीं शासनसूत्रें आपल्या हातांत बाळगून आहे. हिंदुस्तानहि सांप्रत कृषिप्रधान देश बनला आहे, त्याअर्थीं इकडे शेतकऱ्यांना शिक्षण देण्याची कोणतीहि योजना ठरवितांना डेनमार्कचा अनुभव आपल्या बऱ्याच फायद्याचा होईल. परंतु मुख्य भेद हा आहे, कीं, डेनमार्कच्या एकाद्या नांगऱ्यालाहि सर्वसाधारण शिक्षणाची जी महति पटली आहे, ती आमच्याकडील पदवीधर सुशिक्षितांनांहि समजली नसेल.

डेनमार्कनें आपली उन्नति कशी करून घेतली, याचा इतिहास लिहिल्यास मनोरंजक होईल. शंभर वर्षांपूर्वी डेनमार्कची स्थिति अत्यंत शोचनीय होती. कारण नेपोलियनी युद्धांत, इंग्लंडनें या दर्यावर्दी लोकांचें आरमार पार नामशेष करून टाकलें. पुढें सुमारें ५०।६० वर्षांनीं जर्मनीनें या देशाचा एक लचका तोडला व सगळ्या देशापैकीं तिसरा हिस्साच गट्ट केला. अशा रीतीनें देश नित्राण झाला असतां ग्रंडविग ( १७८३–१८७२ ) नांवाचा एक धर्मोपदेशक उत्पन्न झाला. त्यानें बाहेरून झालेली हानि अंतस्थ शक्ति वाढवून भरून काढण्याची सल्ला आपल्या देशाला दिली, आणि शिक्षण व संपत्ति यांच्या मदतीनें देशांतील प्रत्येक व्यक्तीचें व तद्द्वारा साऱ्या राष्ट्राचें सामर्थ्य पुनः मिळविण्याची खटपट सुरू केली, व या कामांत डॅनिश लोकांनीं चांगलेंच यश मिळविलें आहे. या यशाची गुरुकिल्ली ह्मणजे तिकडील शिक्षणपद्धति होय. तेथें तीन प्रकारच्या शाळा आहेत. लिहावाचावयाला शिकवणाऱ्या साध्या शाळा, शेतकी व गृहकृत्य यांचें शास्त्रीय शिक्षण देणाऱ्या कृषिशाळा, आणि स्वदेश

व स्वराष्ट्र यांच्या पूर्वपरंपरेचें व संस्कृतीचें ज्ञान देऊन त्याबरोबर युरोपांतील मुख्य भाषा व आधुनिक शास्त्रें यांचें सामान्य दिग्दर्शन करून देणाऱ्या शाळा. यांनां आपण त्यांच्या राष्ट्रीय शाळा ह्मणूं. या राष्ट्रीय शाळांची रचना व क्रम मनन करण्याजोगा आहे. यांत प्रवुद्ध विद्यार्थ्यांचाच शिरकाव होतो. हिंवाळ्यांत तरुण शिकतात, उन्हाळ्यांत स्त्रियांनां संधि मिळते, आणि सुटीच्या आठवड्यांत वृद्ध लोक शाळेंत राहून आपणांला झेपेल इतकें शिक्षण घेतात. बहुतकरून प्रत्येक विद्यार्थी आपल्या गांवाहून दूर असलेल्या एकाद्या शाळेंत दाखल होतो, व त्यायोगें नवीन नवीन ओळखी करून घेतो. शिक्षक व विद्यार्थी एकत्र राहतात. लॅटिन-ग्रीकचें लटांवर नसतें. देशाभिमान, आत्मप्रतीति व सुसंस्कार उत्पन्न करण्याकरितां डॅनिश इतिहास व डॅनिश सारस्वतच शिकविलें जातें. टेक्स्टबुकें नसतात व धडे पाठ करावयाचे पण नसतात. विद्यार्थ्यांच्या माग परीक्षेचा राक्षसहि नसतो. प्रत्येक विषयांत निष्णात असे प्रोफेसर आपापल्या विषयांवर अगदीं सोप्या भाषेंत व्याख्यानें देतात व गणितासारखे विषयहि ऐतिहासिक पद्धतीनेंच शिकविले जातात.

या सर्वांचा परिणाम असा झाला आहे, कीं, डॅनिश शेतकरी शास्त्रज्ञ बहुभाषी व अर्थशास्त्रांत निष्णात असा तयार झाला आहे. प्रत्येक नांगऱ्याच्या घरीं दोनचार वर्तमानपत्रें, एकदोन शास्त्रीय मासिकें व दोनतीन भाषेंतील ग्रंथ दिसून येतात. गेल्या पिढींतील शेतकरी गोठ्यांत राहत व घरची सर्व मंडळी एकाच वाडग्यांतून खात. भांडीं घांसणेंहि त्यांनां धड माहित नसे. तेच लोक आज आपल्या डुकरांनांहि न्हाऊं घालतात, चाऱ्याची बचत करण्याकरितां हिंवाळ्यांत गाईंनां घोंगड्यांचीं पांघरुणें घालतात व दूध काढण्यापूर्वी गाईचीं आचळें औषधानें शुद्ध करतात. आपल्या व्यापारांत त्यांनीं दलालाचें बंड मोडून टाकलें आहे. इंग्लंडला लोणी, अंडीं व डुकरांचें मांस पुरविण्याचें काम ते स्वतःच करतात व खूप नफा मिळवितात. प्रधानमंडळांतहि शेतकऱ्यांचाच भरणा अधिक आहे, आणि हें सर्व राष्ट्रीय शाळांच्या शिक्षणाचें फळ आहे. कारण या देशांतील श्रेष्ठ विद्वान नांवाच्या किंवा नोकरीच्या मागें न लागतां देशांतील सामान्य लोकांनां सर्व बाबतींत शहाणें करून सोडण्याचें व्रत पाळीत आहेत. तिकडील लोकांत असा प्रवाद आहे, कीं, 'जर्मनींत एकादी मोठी इमारत दिसली तर ती सोजरांची बराक आहे असें समजावें, इंग्लंडांत तो कारखाना आहे असें ओळखावें व डेनमार्कमध्यें ती बहुतकरून राष्ट्रीय शाळाच

असावयाची!' परीक्षा पास करवून सरकारी नोकऱ्या मिळवून देणाऱ्या खासगी संस्था चालणें जेथें मुष्किल त्या आमच्या देशांत अशा राष्ट्रीय शाळा निघतील व चालतील काय ? काम कठिण असो वा सोपें असो, याच मार्गानें आमचा उद्धार होणें शक्य आहे. ]

कोपेनहेगेनहून ( डेनमार्क ) हॅम्बुर्गला ( जर्मनी ) आगगाडीनें येत असतां वाटेंत एका इंग्लिश प्रवाशाची गांठ पडून त्याचें व माझें भाषण सुरू झालें. जगांतील पुष्कळ भागांत त्यानें प्रवास केला होता आणि माझ्याप्रमाणें डेनमार्कचें नीट निरीक्षण करून तो परत आपल्या गांवीं चालला होता. आम्हीं परस्परांनां प्रवासांतील अनुभव सांगितले. त्यानें त्या देशाचें ( डेनमार्कचें ) माझ्याहून अधिक बारकाईनें निरीक्षण केलें होतें. त्या देशांतील शेतकी व लोकस्थिति याविषयीं बरीच मनोरंजक माहिती त्यानें मला दिली.

उलट, मींहि डेनमार्कांत जाण्यापूर्वीं कोणकोणतीं स्थळें पाहिलीं आणि यूरोपांतील निरनिराळ्या प्रदेशांतील कनिष्ठ वर्गांतील लोकांच्या सामाजिक स्थितीचें वरपांगी नव्हे, तर सूक्ष्म निरीक्षण मीं कोणत्या तऱ्हेनें केलें, हें मीं त्याला सांगितलें. मीं जें जें ह्मणून पाहिलें त्यावरून यूरोपांतच नव्हे, तर या जगांत डेनमार्क हा एकच सुखी देश आहे असें माझें मत झालें आहे, असें मीं त्याला सरतेशेवटीं सांगितलें. डेनमार्काप्रमाणें आपले प्रश्न जगांतील दुसऱ्या कोणत्या देशानें सोडविले आहेत, असेंहि मीं त्याला विचारिलें.

माझ्या प्रश्नाचा रोंख पाहून त्या गृहस्थाला मौज वाटली व तो थोडासा चपापला. पण, माझ्या प्रश्नाचा नीट विचार करतां डेनमार्कहून अधिक सुस्थितींत असलेला देश आपण पाहिला नाहीं, असें त्यानें कबूल केलें.

इंग्लंड किंवा अमेरिका यांप्रमाणें डेनमार्क श्रीमंत नाहीं. आंकडे-शास्त्रविशारदांचें या बाबतींत काय ह्मणणें आहे तें मला माहित नाहीं. पण, इंग्लंड, अमेरिका आणि यूरोप या देशांचे बरेचसे भाग जसे धनवान लोकांनीं भरून गेलेले आढळतात तसे फारच थोडे डेनमार्कांत आहेत. खरोखर या लहानशा देशांत कोट्यधिशाला वावरण्याला जागाच नाहीं. कारण, हा देश आकारानें अलाबामा संस्थानच्या एकतृतीयांशाहूनहि लहान आहे आणि याची लोकसंख्या अलाबामापेक्षां एकतृतीयांशानें अधिक आहे.

डेनमार्क हा कृषिप्रधान देश आहे. या देशांतील दोनपंचमांश लोक कोणत्या ना कोणत्या तरी कृषिकर्मांत गुंतलेले आहेत. अलीकडे डेनमार्कांतील शेती फार भरभराटींत आहे. तथापि, अमेरिकेंतील उत्तम शेतकीप्रदेशांत जितकें उत्पन्न येतें तितकें डेनमार्कांत येतें किंवा नाहीं, याची मला शंका आहे. डेनमार्कांतील जमीन विशेष सुपीक नाहीं. स्काटलंडच्या उत्तरभागाप्रमाणें, डेनमार्कांतील बहुतेक जमीन माळरान होती. पण, अलीकडे कांहीं थोड्या वर्षांपूर्वीं केलेल्या कृषि-यंत्रविद्येच्या प्रयोगांमुळें, या माळजमिनीचे बहुतेक भाग सुपीक प्रदेश झाले आहेत.

प्रतिकूल परिस्थितींतहि गेलीं कांहीं वर्षें देशाची बरीच भरभराट होत गेली आहे. डॅनिश कृषिविद्या शिकण्यासाठीं जगांतील सर्व भागां-तून लोक येत आहेत आणि तेथील प्रयोगांनीं आश्चर्यचकित होऊन जात आहेत. हे प्रयोग कोणते आहेत व ते कसे केले जात आहेत, हें सविस्तर सांगण्याचा मी प्रयत्न करीत नाहीं; पण, मी येथें एवढेंच सांगतों कीं, पिकांची मशागत करण्याच्या पद्धतींमध्यें आणि त्यांची

विक्री करण्यामध्यें, डेनमार्कनें फार आघाडी मारलेली आहे; आणि जगांतील कोणत्याहि देशापेक्षां अधिक प्रगति केलेली आहे, असें बहुतेक सर्वांचें मत आहे. शिवाय, सांप्रत डेनमार्कमध्यें जसा शेतकी-वर्ग श्रेष्ठ आहे आणि त्याचें राजकीय व सामाजिक स्थितीवर जसें वजन पडतें, तसा प्रकार दुसऱ्या कोणत्याहि देशांत--अमेरिकेंत किंवा कानडांतहि नाहीं, अशी माझी खात्री आहे.

मीं माझ्या इंग्लिश मित्राला विचारलें, कीं, डॅनिश शेतकऱ्याला कशाचा आश्रय आहे ? या देशांत शेतकी इतक्या परिणत अवस्थेला कशी आली ?

'डॅनिश शाळांमुळें.' असें त्यानें उत्तर दिलें. मीं मागें हा प्रश्न पुष्कळदां विचारला होता आणि मला निरनिराळीं उत्तरेंहि मिळालीं होतीं. पण, त्या प्रत्येक उत्तरांत शाळांविषयीं, विशेषत खेड्यापाड्यांतील हायस्कुलांचा उल्लेख होता. मीं या शाळांविषयीं अमेरिकेंत बरेंच ऐकलेलें होतें; नंतर पुनः इंग्लंडांतहि त्यांच्याविषयीं ऐकिलें. कारण, डेनमार्कच्या शेतकीचा माल शेंकडा ऐशीं असा इंग्लंडला जातो.

तथापि,मीं डेनमार्कला जाऊन तेथील शाळा जेव्हां स्वतः पाहिल्या, कांहीं शिक्षकांशीं संभाषण केलें, इतकेंच नव्हे तर तेथून परत आल्या-वर जेव्हां मीं त्यांचा इतिहास व त्यांची संघटना यांचें नीट अध्ययन केलें, तेव्हां तेथील खेड्यापाड्यांतील शाळांचा डॅनिश लोकांवर काय परिणाम होत आहे आणि त्यांचा शेतकी सुधारण्याकडे कसा उपयोग होत आहे, हें मला कोठें थोडेंसें समजूं लागलें.

या शाळांविषयींच्या दोन गोष्टींकडे माझें लक्ष्य अधिक लागलें. ( १ ) साधारण लोकांनां मदत करावी, विशेषतः खेड्यापाड्यांतील

लोकांची उन्नति व्हावी, ह्मणून सुरू केलेल्या चळवळींत या शाळांची उत्पत्ति झाली, ( २ ) त्यांनां चांगलें यश आलें आहे. डेनमार्कातील शेतकऱ्यापेक्षां अधिक हुषार शेतकरी बहुतकरून जगांतील कोणत्याहि भागांत आढळावयाचा नाहीं, असें ह्मणण्याचें मी धाडस करतों. कांहीं लहानसहान शेतकऱ्यांच्या घरीं मी गेलों होतों. तेथें आढळून येणाऱ्या वर्तमानपत्रांची व मासिकांची संख्या पाहून मला फार आनंद झाला.

सांप्रत यूरोपच्या पुष्कळ भागांमध्यें, शिक्षणद्वारा कामकरी लोकांची स्थिति सुधारण्याची एक चळवळ सुरू झालेली आहे. शेतकी सुधारण्याचा कोठेंहि विस्तृत प्रमाणावर प्रयत्न झाला, कीं, तेथें त्या प्रयत्नाचें पर्यवसान कोणत्या ना कोणत्या तरी तऱ्हेच्या शाळेंत झालें आहे. उदाहरणार्थ, हंगेरीमध्यें, सरकारनें विस्तृत प्रमाणावर कृषि-विद्येचें शिक्षण देण्याची योजना केली आहे. प्रयोगशाला, अन्वेषण-शाला, शेतकी कॉलेजें, हायस्कुलें आणि साध्या शाळा यांच्या द्वारें शेतकीची सुधारणा करण्याचे दीर्घप्रयत्न यूरोपमध्यें दुसऱ्या कोठेंहि झाले नाहींत, असें मला समजतें. हंगेरीच्या आणि डेनमार्कच्या पद्ध-तींत फरक एवढाच आहे, कीं, डेनमार्कनें खालपासून सुरुवात केली आहे, तर हंगेरीनें वरून प्रारंभ केला आहे. शिक्षक व तज्ज्ञ लोक तयार करून त्यांच्या द्वारें खालच्या वर्गाला शिक्षण देण्याची योजना हंगेरीनें केलेली आहे.

शेतकीखात्याच्या मंत्र्यांच्या एका रिपोर्टावरून भिन्नभिन्न वर्गांच्या लोकांच्या गरजानुरूप त्यांनां शिक्षण द्यावयाचें; पण, ते लोक फार शिकणार नाहींत, ते आपल्या दर्जाला अयोग्य होतील अशा तऱ्हेचें कांहीं शिकणार नाहींत, अशी काळजी घ्यावयाची, असा हंगेरियन सरकारचा एक प्रमुख उद्देश दिसतो.

उदाहरणार्थ, डेवरेकझन येथें, शेतकी कॉलेजाला जोडून असलेली एक शेतकी शाळा बंद करणें जरूर पडलें. कृषिमंत्र्यांच्या रिपोर्टांत ह्मटल्याप्रमाणें, याचें कारण असें होतें, कीं, शाळेंतील विद्यार्थी कॉलेजांतील पहिल्या वर्षांतील विद्यार्थ्यांशीं दररोज मिसळत असल्यामुळें, ते त्यांचें अनुकरण करूं लागले आणि आपल्या दर्जाला जरूर असलेल्या शिक्षणापेक्षां अधिक शिकूं लागले आणि आपणाला राखतां येणार नाहीं असा हुद्दा मिळविण्याचा यत्न करूं लागले.

हें सर्व डॅनिश खेड्यांतील हायस्कुलाच्या तत्त्वांच्या व पद्धतींच्या अगदीं विरुद्ध आहे. डॅनिश शाळा प्रथम अत्यंत गरीब शेतकरी वर्गांमध्यें सुरू झाली आणि वर्षानुवर्षे तिची एकसारखी वाढ होत जाऊन आतां तिचें वजन शेतकरी समाजांतील बहुतेक लोकांवर आहे. या शाळेमध्यें शेतकऱ्यांच्या व सरदारांच्या मुली कधींकधीं एकाच बांकावर बसून शिकतात. जमीनदारांचे व रयतांचे मुलगे हाताला हात लावून काम व अभ्यास करतात; आपल्या शिक्षकांची मैत्री व त्याच्या घरचा पाहुणचार यांचाहि त्यांनां लाभ मिळतो.

डेनमार्कांतील हायस्कुलांविषयीं विशेष मुख्य गोष्ट ह्मटली ह्मणजे, तें स्कूल एकादी शिल्पशाळा किंवा औद्योगिक शाळा नसतें आणि तें स्कूल जरी शेतकरी लोकांसाठीं उघडलेलें आहे, तरी शेतकीच्या विषयाचा उल्लेख त्या विषयांतील तात्त्विक किंवा व्यावहारिक शिक्षण देण्याच्या हेतूनें तरी निदान तेथें केव्हांहि केला जात नाहीं.

शेतकऱ्यांच्या शाळेंत शेतकीविषयीं कांहीं सांगितलें जाऊं नये, हें कोणालाहि मोठें विलक्षण वाटेल आणि अशा तऱ्हेची शाळा व डेन-मार्कांतील शेतकीची भरभराट यांचा संबंध कसा जोडावा, याचा मला

बराच वेळ विचार करावा लागला. शेतकींत शिक्षणानें सुधारणा करण्याचा सर्वांत सोपा व सरळ उपाय ह्मटला ह्मणजे, शाळांत शेतकीचा विषय शिकविणें हा होय असें मला वाटलें व इतरांनांहि तसेंच वाटेल.

हंगेरियन व डॅनिश पद्धतींतील खरा भेद रूपांत—मांडणींत नसून तत्त्वांत आहे. प्रत्येक मनुष्याला, आयुष्यांतील त्याच्या दर्जाच्या धंद्यानुरूप शिक्षण देणें, एवढाच हंगेरींतील शिक्षणाचा उद्देश दिसतो. कोणाला किती शिक्षण द्यावें हें तेथील सरकार ठरवितें. दुसऱ्या शब्दांनीं सांगावयाचें ह्मणजे, तथील शिक्षण वर्णभेदावर अवलंबून आहे. खालच्या वर्गाच्या मनुष्यानें, वरिष्ठ दर्जाच्या मनुष्याकडे पाहण्याचा अभ्यास शाळेंत केला, नित्य प्रचारांतली आपली स्थिति सोडून अधिक महत्त्वाकांक्षा तो बाळगू लागला, तर एक मोठें सामाजिक व राजकीय तत्त्व मोडल्यासारखें होतें आणि ह्मणून शेतकी खात्याच्या कमिशनरनें ह्मटल्याप्रमाणें, सरकारला सक्त हुकूम सोडण्याला कोणताच प्रत्यवाय नाहीं.

अर्थात् अशा उपायांचा स्वाभाविक परिणाम ह्मणजे, असंतोषाची वाढ होय. इतरांनां दिले जाणारे हक्क आपणाला मिळत नाहींत असें एका वर्गांतील लोकांनां आढळून आलें, ह्मणजे त्या हक्काचें—मग ते हक्क शिक्षणविषयक सवलती असोत किंवा आणखी कसलेहि असोत —त्या लोकांना विशेष महत्त्व वाटूं लागतें.

या धोरणाचा परिणाम देशांतर केलेल्या लोकांच्या आंकड्यावरून चांगला दिसून येतो. शेतकीच्या शिक्षणाविषयीं हंगेरियन सरकारनें एवढे प्रयत्न केले तरी शेतकरीवर्गांतील असंतोष कांहीं कमी झाला आहे, असें मला वाटत नाहीं. अमेरिकेंत जाऊन आपलें नशीब पहावें

असें हजारों हंगेरियन शेतकऱ्यांनां वाटतें आणि यामुळें शेतकरीवर्ग एकसारखा बाहेर जात आहे.

डेनमार्कच्या खेड्यापाड्यांतील शाळांचें धोरण याच्या अगदीं विरुद्ध आहे. शेतकरी लोकांच्या बुद्धीला व महत्त्वाकांक्षेला चालन देण्याचा त्यांनीं एकसारखा प्रयत्न केलेला आहे. जगाविषयीं कांहीं ज्ञान मिळवावें अशी महत्त्वाकांक्षा बाळगणाऱ्या शेतकऱ्याच्या मुलाला, अमेरिकेला किंवा एकाद्या कॉलेजला किंवा शहराला जाऊं देण्याच्या ऐवजीं, तेथील शाळांनीं, कॉलेजांतील ज्ञान व शहरांतील फायदे त्याच्या खेडेगांवीं मिळतील अशी सोय करून ठेविली आहे.

या हायस्कुलांविषयीं अत्यंत आश्चर्यकारक व विलक्षण गोष्ट ह्मटली म्हणजे, प्राथमिक शाळांत मूलतत्त्वें शिकलेल्या खेड्यापाड्यांतील मुलांमुलींनांहि समजतील अशा सोप्या व सुलभ भाषेंत, सुशिक्षित मनुष्यानें जाणावयाचा प्रत्येक विषय उत्तम रीतीनें समजावून देण्यांत या शाळांनीं चांगलें यश संपादन केलें आहे, ही होय.

या शाळांतील शिक्षक खरोखर विद्वान असतात. बहुतेक शिक्षण व्याख्यानरूपानें द्यावयाचें असल्यामुळें, त्यांनां आपलें काम कोणत्याहि क्रमिक पुस्तकाशिवाय करावें लागतें; आणि विषयप्रतिपादनाच्या त्यांच्या शैलीवर त्यांचें यश अवलंबून असतें. विद्यार्थ्यांमध्यें उत्साह व आस्था उत्पन्न करण्याकरितां त्यांनां विषयांच्या ज्ञानासाठीं मूळ उगमाकडेच जावें लागतें.

मला भेटलेल्या बहुतेक शिक्षकांनां दोन किंवा तीन भाषा बोलतां येत होत्या. डेनमार्कमध्यें राजाराणीपासून तों तहत शेतकऱ्यापर्यंत मला भेटलेल्या सर्वांचें अमेरिकन गोष्टींविषयीं ज्ञान, आणि निग्रोंची

उन्नति व टस्कगी येथील आमचें कार्य, याविषयींची त्यांची आस्था पाहून मी फार आश्चर्यचकित झालों. प्रोफेसर वुइल्यम जेम्स याच्या प्रॅगमॅटिझम ( Pragmatism ) पुस्तकाचें डॅनिश भाषेंत भाषांतर करतांना मीं एका शिक्षकाला पाहिलें. यावरून तेथील शिक्षक कोणकोणत्या विषयांत आपलें मन घालतात, हें दिसून येतें.

यूरोपांतील दुसऱ्या कोणत्याहि लोकांपेक्षां डॅनिश लोक अधिक सुशिक्षित व बहुश्रुत आहेत, असें मीं डेनमार्कला गेल्यावर वारंवार ऐकिलें आहे. ही गोष्ट आंकड्यांनीं सिद्ध झाली आहे. कारण, १९०० सालच्या इमिग्रेशनच्या आंकड्यांप्रमाणें पहातां, यूरोपांतून अमेरिकेंत येणाऱ्या शेंकडा २४·२ पुरुषांना लिहितांवाचतां येत नव्हतें व स्कॅन्डिनेव्हियांतून ( ह्मणजे डेनमार्क, नॉर्वे व स्वीडन या देशांतून ) येणाऱ्या लोकांपैकीं शेंकडा आठ लोकच अशिक्षित होते. यूरोपांत जर्मनीमध्यें शिक्षणाचा प्रसार सर्वांत अधिक आहे अशी माझी नेहमीं समजूत असे. जर्मनींतून येणाऱ्या लोकांपैकीं अशिक्षितांचें प्रमाण शेंकडा ५·८ होतें.

हा विषय पुढें चालविण्याच्या आधीं या शाळा कशा दिसतात, याची कांहीं कल्पना मनांत भरवून दिली पाहिजे. यांपैकीं एक प्रसिद्ध शाळा रास्कील्ड नामक लहान शहराजवळ व कोपेनहेगेनपासून एक तासाच्या अंतरावर आहे. ही शाळा विस्तीर्ण व पसरट ढिगारे असलेल्या जागेंत बांधलेली आहे. येथून उपसागराचा देखावा चांगला दृष्टीला पडतो. मासे धरणाऱ्या बोटी आणि लहानसहान जहाजें, आंत बेटाच्या मध्यभागीं येतांना या ठिकाणाहून दिसतात. सभोंवार चांगली सुपीक जमीन आणि लहानसहान खेडीं आहेत.

शाळेची इमारत मोठी असून दोन्ही बाजूला मोठ्या खोल्या आहेत. एका खोलींत शाळेचे हेडमास्तर राहतात, आणि दुसरींत व्यायामशाळा आहे. या दोन्ही खोल्यांच्या दरम्यानच्या वर्गांत शिक्षक विद्यार्थ्यांनां व्याख्यानें देतात. सर्व गोष्टींत शाळेची व्यवस्था योग्य, साधी, स्वच्छ व सुंदर असते. विशेपत: कौटुंबिक राहणीसारख्या, तेथील पवित्र वातावरणाकडे माझें लक्ष्य विशेष वेधलें. शिक्षक आणि विद्यार्थी एकाच मेजावर जेवतात आणि संध्याकाळीं एकत्र जमतात. यामुळें ते (शिक्षक व विद्यार्थी) केवळ मित्र आहेत, एवढेंच नव्हे, तर संवगडी आहेत असें वाटतें.

रास्कील्डच्या शाळेंत नेहमीं सरासरी दीडशें विद्यार्थी असतात. हिंवाळ्याच्या पांच महिन्यांच्या टर्ममध्यें तरुण विद्यार्थी शाळेंत असतात; तर उन्हाळयांत तरुण विद्यार्थिनी येऊन राहतात. जेवण व भाडें याबद्दल विद्यार्थ्यांनां वीस क्राऊन ह्मणजे अजमासें पंधरा सोळा रुपये द्यावे लागतात. शिक्षणाची फी पहिल्या महिन्याला वीस क्राऊन, दुसऱ्या महिन्याला पंधरा क्राऊन, तिसऱ्या महिन्याला दहा क्राऊन, चवथ्या महिन्याला पांच क्राऊन असते. पांचव्या महिन्याला कांहीं फी द्यावी लागत नाहीं. या आंकड्यावरून या शाळा किती काटकसरीनें व साधेपणानें चालविल्या जातात, हें दिसून येतें. वीस वर्षांपूर्वी या शाळा प्रथम सुरू झाल्या तेव्हां विद्यार्थी एका मोठ्या खोलींत गवताच्या चटयांवर निजत असत आणि त्या वेळच्या शेतकऱ्याप्रमाणें, एकाच ताटांतून लांकडी चमच्यांनीं जेवीत असत असें मला समजलें. या सुमाराला टस्कगी येथील विद्यार्थीहि असेच कष्ट सोशीत होते, या गोष्टीचें मला स्मरण झालें. त्या दिवसांत सर्व शाळेचें अन्न एका मोठ्या लोखंडाच्या किटलींत शिजविलें जात असे आणि किटलींत घाल-

ण्याला कांहीं अन्न नसलें ह्मणजे, आह्मांला उपवासी रहावें लागे. त्या वेळेपासून आतां परिस्थिति बदलत चालली आहे. डेनमार्कच्या शाळांचीच नव्हे, तर खेडेगांवच्या लोकांचीहि स्थिति आतां बदलली आहे. आतां प्रत्येक शेतकऱ्याच्या झोंपडींत नसलें तरी प्रत्येक कोआपरेटिव्ह डेअरीमध्यें स्नानगृह आहे. कांहीं वर्षांपूर्वीं लहान शेतकरी प्रत्येक शोधाकडे साशंक दृष्टीनें पहात असे; पण, आतां तोच स्वतः टेलिफोन वाळगतो. यूरोपांतील कोणत्याहि देशापेक्षां लोकसंख्येच्या मानानें डेनमार्कांत अधिक टेलिफोन आहेत आणि प्रत्येक खेडेगांवांत एक तालमीचा आखाडा आणि सार्वजनिक व्याख्यानासाठीं एक दिवाणखाना आहे.

आतां माझ्यासमोर डेस्कवर एका शाळेचें वेळापत्रक आहे. त्यावरून असें दिसतें, कीं, ती शाळा सकाळीं आठ वाजतां सुरू होते, आणि संध्याकाळीं सात वाजतां बंद होते; मध्यंतरीं दोनप्रहरीं दोन तास सुटी असते. शाळेची दोन तृतीयांश वेळ डॅनिश भाषेचें व इतिहासाचें शिक्षण देण्यांत जाते. उरलेली वेळ गणित, भूगोल, प्राणिशास्त्र, वनस्पतिशास्त्र यांच्या शिक्षणाकडे खर्च होते.

या शाळांची एक विशेष गोष्ट ह्मटली ह्मणजे, बहुतेक सर्व शिक्षण व्याख्यानांच्या रूपानें दिलें जातें. परीक्षांचें लचांड विद्यार्थ्यांमागें नसतें. फारच थोडा भाग तोंडपाठ करून घेण्यांत येतो. प्राणिवनस्पतिविज्ञानशास्त्रें व उच्च गणित यांसारखे विषयहि इतिहासदृष्ट्या व्याख्यानांनीं शिकविले जातात. शास्त्रांचा उपयोग कसा करावा, हें शिक्षण देण्याचा या व्याख्यानांचा हेतु नसतो, तर निरनिराळे प्रश्न कसे उपस्थित झाले आणि ते सोडवितांना आमची दृष्टि कशी व्यापक झाली, व आमचें जगाविषयींचें ज्ञान कसें विस्तृत झालें, याची विद्यार्थ्यांना साधारण माहिती व्हावी हा असतो.

या शाळांत, डॅनिश लोकांचीं गाणीं, डॅनिश इतिहास आणि जुनीं उत्तरेकडील देशांचीं पुराणें यांनां विशेष महत्त्व दिलें जातें. इतर कॉलेजांमध्यें लॅटिन व ग्रीक यांविषयीं (त्या भाषा, व त्या लोकांचा इतिहास यांविषयीं ) पुष्कळ गोष्टी शिकविल्या जातात. डेनमार्कच्या शाळांचें धोरण याविरुद्ध असून स्कॅन्डेनेव्हियन लोकांची संस्कृति व इतिहास यांनां विद्यार्थ्यांनीं विशेष महत्त्व द्यावें आणि एकेपरी जगांतील लोकांमध्यें आपलें स्थान व आपलें कार्य आहे, असा देशभक्तिपूर्ण विश्वास त्यांच्या मनांत उत्पन्न व्हावा, असा त्यांचा हेतु आहे.

या शाळांविषयीं ध्यानांत धरण्याजोग्या कांहीं ठळक गोष्टी आहेत. या शाळांची संख्या सुमारें एकशेंवीस आहे. माझ्या मनांत बिंबलेली पहिली गोष्ट ह्मणजे, शाळा स्थापन झालेल्या वेळची परिस्थिति होय. प्रारंभीं या शाळा खासगी लोकांनीं स्थापन केल्या. सध्यां त्या त्यांच्याच ताब्यांत आहेत. त्यांनां सरकारांतून थोडीशी मदत मिळते. या शाळांची सर्व योजना कांहीं धाडशी लोकांनीं केली. यांनां सरकाराकडून कधींकधीं विरोध झाला तरी पुष्कळदां मदतच मिळाली. या शाळा सर्व एकदम सुरू झाल्या नाहींत. त्या क्रमाक्रमानें वाढल्या व वाढत आहेत, हा मुद्दा मी येथें स्पष्टपणें मांडतों. या शाळांत प्रचलित असलेल्या पद्धती व योजना ठरविण्याला व त्या लोकप्रिय करण्याला पुष्कळ वर्षें सारखे प्रयत्न करावे लागले. या कामांत निकोलस फ्रेडरिक सेव्हर्न ग्रंडव्हिग नामक लुथरपंथी एका बिशपनें सर्व पुढाकार घेतला. हा डेनमार्कचा *लुथर आहे, असा

* लुथर ( १४८३–१५४६ ) हा ख्रिस्तीधर्मांतील प्रॉटेस्टंट पंथाचा आद्यप्रवर्तक जर्मन देशांत होऊन गेला. यानें १५२२–ते १५३४ पर्यंत ह्मणजे एक तपभर खपून बायबलचें देशी म्हणजे जर्मन भाषेंत भाषांतर करून मोठी क्रांति घडवून आणिली.

यात्रिषयीं पुष्कळदां उल्लेख करण्यांत येतो. ही शाळांची चळवळ उदार, धार्मिक चळवळीमुळें वाढली. वस्तुत: ही चळवळ ह्मणजे, लोकांची अध्यात्मिक स्थिति सुधारण्याचा प्रयत्न होय.

या शाळा प्रथम सन १८४४ सालीं स्थापन झाल्या. पण, पुढें वीस वर्षांनंतर प्रशियाशीं झालेल्या अनर्थकारक युद्धांत जेव्हां डेनमार्कनें आपला एकतृतीयांश चांगला सुपीक प्रदेश गमावला, तेव्हां या शाळांनां कांहीं स्वरूप प्राप्त होऊं लागलें. याप्रमाणें, त्या वेळीं जेव्हां डेनमार्कला अत्यंत वाईट दशा आली, तेव्हां बिशप ग्रंडव्हिग हे, 'बाहेर जें कांहीं गमावलेलें आहे, तें आतां आंतून मिळविलें पाहिजे; युद्धांत जो कांहीं तोटा झाला, त्याची उणीव राष्ट्राच्या साधनांची शांतपणें वाढ करून भरून काढली पाहिजे,' असा उपदेश डॅनिश लोकांनां करूं लागले.

डेनमार्कचें किंवा दुसऱ्या कोणत्याहि देशाचें सर्वांत श्रेष्ठ धन ह्मटलें ह्मणजे, साधारणजनसमूह हें होय, असें बिशप ग्रंडव्हिग यांनीं जाणिलें. त्यांनीं सुरू केलेल्या शाळा व तेथील शिक्षणांच्या पद्धति लोकांच्या गरजानुरूप होत्या. शिक्षण लोकप्रिय करावें, सोप्या भाषेंत तें द्यावें, त्यांतील गुप्तपणाचा बाऊ काढून लोकांनां तें सहज मिळावें, असा त्यांचा प्रयत्न होता.

या शाळांची दुसरी एक विशेष गोष्ट अशी आहे, कीं, त्या शाळा लहान मुलांसाठीं नसून तरुण विद्यार्थ्यांसाठीं आहेत. या शाळांतील शेंकडा ऐंशीं विद्यार्थी १८ ते २५ वर्षांचे असतात, शेंकडा बारा २५ हून अधिक वर्षांचे आणि शेंकडा आठ १८ हून कमी वर्षांचे असतात. या शाळांत येणारे विद्यार्थी सार्वजनिक प्राथमिक शाळांत

शिक्षण घेऊन आलेले असतात. शेतकऱ्यांचीं मुलें या शाळांत येण्यापूर्वी सार्वजनिक शाळांत शिकतात आणि घरांत व शेतांत स्वतः काम करून व्यावहारिक शिक्षण मिळवितात. आतां, आपण घरदार सोडून बाहेर जगांत जाऊन नांव मिळवावें असें जेव्हां (ज्या वयांत) मुलांमुलींना वाटूं लागतें, बाह्य जगाचें व पुस्तकांत सांगितलेल्या गुह्य गोष्टींचें, किंवा शाळांतील आख्यायिकांचें ज्ञान मिळवावें असें जेव्हां तरुणांनां वाटूं लागतें, तेव्हां त्यांना सातआठ महिने या शाळांत पाठविलें जातें. बहुतकरून विद्यार्थी आपल्या शेजारीं असलेल्या शाळेंत न जातां देशाच्या दुसऱ्या भागांतील शाळेंत जातात. तेथें, शेतांतून त्यांच्याप्रमाणें, आलेल्या दुसऱ्या तरुण मुलांमुलींची व त्यांची ओळख होते. अशा प्रकारच्या ओळखीनें व दळणवळणानें त्यांनां सार्वजनिक हिताची कल्पना येऊं लागते आणि समाजवादी ज्याला सामाजिक संवेदना असें ह्मणतात त्याची वाढ होऊं लागते. येथें आलेला सर्व अनुभव कोआपरेटिव्ह संस्था, कोआपरेटिव्ह गोशाला, कोआपरेटिव्ह खाटिकखाना, अंडीं पैदास करणाऱ्या संस्था, गुरांची पैदास करणाऱ्या संस्था व इतर कामें करणाऱ्या संस्था स्थापन करण्याच्या कामीं पुढें फार उपयोगी पडतो. डेनमार्कांतील सांप्रतची शेतीची व्यवस्थित रचना अप्रत्यक्षपणें या शाळांपासून घडून आलेली आहे.

सामाजिक किंवा सांपत्तिक चळवळीमुळें नव्हे, तर धार्मिक चळवळीमुळें या शाळा अस्तित्वांत आल्या. या शाळा पद्धतींनीं व बाह्य स्वरूपांनीं अमेरिकेंतील निग्रो औद्योगिक शाळांहून भिन्न आहेत, तरी दोहोंस एक गोष्ट सामान्य आहे. ती ही, कीं, दोन्ही शाळा कोणत्याहि विशिष्ट पंथाच्या नसूनहि त्या पूर्ण धार्मिक आहेत. विद्यार्थ्यांचीं मनें उदार व व्यापक करावीं एवढाच त्यांचा उद्देश नसून लोकांची

नीतिमत्ता वाढवावी असाहि त्यांचा हेतु आहे. डेनमार्कांत भेटलेल्या गृहस्थानें डॅनिश शाळांचें हें विशेष लक्षण 'स्फूर्तिकारक' या एका शब्दांत सांगितलें.

राजकीय स्वातंत्र्यानेंच देशांचा उद्धार होईल असें न वाटणाऱ्या लोकांपैकीं ग्रंडव्हिग होता, असें ह्मणतात. तथापि या खेड्यापाड्यांतील शाळांचा डेनमार्कच्या राजकारणावर बराच परिणाम झालेला आहे. या शाळा जरी कोणत्याहि राजकीय चळवळीपासून अलिप्त आहेत तरी या शाळांमुळेंच 'शेतकरी प्रधान मंडळा'च्या नियमनानें डेनमार्क हा यूरोपांत अत्यंत लोकसत्ताक देश झालेला आहे. कांहीं वर्षांपूर्वीं जो वर्ग डेनमार्कांत अत्यंत खालावलेला व जेर झालेला होता, तोच शेतकरी-वर्ग सांप्रत देशाचा शास्ता किंवा नियंता झालेला आहे. या गोष्टीवरून त्या शाळांच्या शिक्षणाचा परिणाम कसा झाला, हें स्पष्ट दिसत आहे.

या शाळांची रचना व साधारण स्वरूप यांविषयीं मीं हें बरेंच विस्तृत वर्णन केलेलें आहे. याचें कारण, डॅनिश शेतकरी लोकांत या शाळा पुष्कळ वर्षांपूर्वीं सर्वांत आधीं स्थापन झाल्या व त्यांची रचनाहि अगदीं असामान्य व विलक्षण आहे. तसेंच या शाळा आणि आयुष्यभर माझा संबंध असलेल्या अमेरिकेंतील निग्रो औद्योगिक शाळा, यांचें तत्त्व जरी एक आहे तरी त्यांचें स्वरूप व पद्धति या अगदीं भिन्न आहेत.

डेनमार्कांतील हायस्कुलें, डॅनिश खेड्यापाड्यांतील शाळांचा एक भाग होत; अलीकडे या हायस्कुलाला जोडून कृषिविद्या व घरगुती कला यांचें शिक्षण देणारी निराळी शाळा अस्तित्वांत आली आहे. उदाहरणार्थ, रास्कील्डपासून अर्ध्या मैलाच्या अंतरावर आह्मीं अमेरिकेंत जिला औद्योगिक शाळा असें नांव देऊं अशी शाळा स्थापन झाली

आहे. येथें शेतकीचें शास्त्रीय शिक्षण व संसारांतील घरगुती उपयुक्त कलांचें शिक्षण दिलें जातें. टस्कगी येथें विद्यार्थ्यांनां जसें व्यावहारिक
१ शिक्षण मिळतें तसेंच या शाळेंतहि मिळतें. फरक इतकाच, कीं, हें शिक्षण शेतकी व गृहसंसार यापुरतेंच असतें. पण, दक्षिणअमेरिकेंतील शाळांप्रमाणें, या कृषिशाळांत विद्यार्थ्यांनां सामान्य शिक्षण दिलें जात नाहीं. खरोखर डेनमार्कांत दोन भिन्न शाळांच्या योगें विद्यार्थ्यांनां जें शिक्षण मिळतें तेंच शिक्षण हाम्पटन व टस्कगी येथील संस्था आपल्या विद्यार्थ्यांनां एकत्र देत आहेत.

हायस्कुलाप्रमाणें ही शाळाहि उत्तम जागीं बांधलेली आहे. तिच्या सभोंवार सुंदर बगीचे आहेत. तेथें विद्यार्थी आपला भाजीपाला उत्पन्न करतात. स्वयंपाकघरांत तरुण मुली स्वयंपाक करण्याला व पानें मांडण्याला शिकतात. शाळेंतील सर्व व्यवस्थेमध्यें खेड्या-पाड्यांतील साधी राहणी ठेवण्याचा प्रयत्न केलेला पाहून मला बरें वाटलें. उदाहरणार्थ, ५०।१०० वर्षांपूर्वीं सुखवस्तु शेतकरी जसें चित्रविचित्र आकाराचें, पण मजबूत व साधें सामान वापरीत असत त्या प्रकारचें सामान या शाळेंत वापरण्यांत येत आहे. माझ्याबरोबर यूरोपचा प्रवास करीत असलेले माझे मित्र डॉ. रॉबर्ट इ. पार्क यांनीं, मीं ही शाळा जेव्हां पाहिली तेव्हां मला सांगितलें, कीं, तेथें बगीचांत काम करीत असलेला एक प्रोफेसर त्यांनीं पाहिला, त्यानें या देशांत शेतकरी लोक सर्वत्र वापरतात त्या प्रकारचे लांकडी जोडे घातले होते. त्यानें बराच प्रवास केला होता. जर्मनींत अभ्यास करून तेथील शेतकी कॉलेजांतील एक विशिष्ट पदवीहि त्यानें मिळविली होती.

सन १९०२ सालीं एन. जे. नीलसन क्रॉडस्कोव्ह यांनीं रिंगस्टेड येथें स्थापन केलेलें ‘ हसमांडम ’ किंवा ‘ कॉटर्स स्कूल ’ पाहण्यांत

माझा जो वेळ गेला तो माझ्या प्रवासांतील अत्यंत उपयुक्त व मौजेचा काल होय. या शाळेंत भाजीपाला, धान्यें, सफरचंद आदिकरून फळें व असेच इतर पदार्थ जे कांहीं मीं पाहिले तसले पदार्थ मीं आजपर्यंत कोणत्याहि कृषिशाळेंत पाहिलेले नाहींत.

ही चित्ताकर्षक शाळा पाहतांना, मीं तेथील शिक्षणाविषयीं व खेड्यापाड्यांतील साध्या राहणीविषयीं जें कांहीं पाहिलें व मीं जें कांहीं शिकलों, तें सर्व वर्णन करण्याची संधि मला मिळाली असती तर फार बरें झालें असतें. ही शाळा आणि दुसऱ्या तशाच शाळा मीं पाहिल्या. या सर्व शाळा परस्परांशीं प्रेमानें व ऐक्यभावानें कशा वागत आहेत आणि प्रत्येक शाळा आपापल्या परीनें खेड्यापाड्यांतील लोकांची राहाणी व काम सुधारून त्यांनां स्फूर्ति व उत्तेजन कसें देत आहेत, हें माझ्या मनावर चांगलें ठसलें.

उदाहरणार्थ, रिंगस्टेड येथील शाळेंत तरुण मुलांकरितां हिंवाळ्यांतील कृषिकर्माचा कोर्स ( शिक्षणक्रम ) व तरुण मुलींसाठीं उन्हाळ्यांतील गृहशिक्षणाचा कोर्स आहे, तरी टस्कगीप्रमाणें, या शाळेनें वृद्ध लोकांसाठींहि एक छोटा कोर्स ठेवलेला आहे. वृद्ध पुरुष आपला कोर्स हिंवाळ्यांत व वृद्ध बायका आपला कोर्स उन्हाळ्यांत शिकतात. हा शिक्षणक्रम अकरा दिवस चालतो. या अकरा दिवसांत तरुण विद्यार्थ्यांप्रमाणें, वृद्ध विद्यार्थी शाळेंत राहतात आणि परस्परांच्या व शिक्षकांच्या सहवासापासून आपला पुष्कळ फायदा करून घेतात. ही शाळा व याच नमुन्याच्या दुसऱ्या शाळा यांपासून किती लोकांचें कल्याण झालें आहे हें दाखविण्यासाठीं त्या शाळेच्या संस्थापकांच्या पत्रांतील उतारा मी येथें देतों. ते ह्मणतात:—'कॉटर्सस्कुल' ही डेनमार्कांत एका पद्धतीची उत्तम शाळा आहे. ही लोकांनीं स्थापन केलेली आहे, १९०२ साला-

पासून बांधलेल्या इमारती चार लाख क्राऊन ( एक लाख डॉलर ) किंमतीच्या आहेत. सात वर्षांमध्यें ६३१ पुरुष व ६०३ बायका यांनीं सहा महिने शिक्षण घेतलें आहे. याशिवाय ३२०५ स्त्रीपुरुषांनीं अकरा दिवस शिक्षण संपादिलें आहे.'

रिंगस्टेड येथील शाळेंत शिकविल्या जाणाऱ्या कृषिकर्म व गृह-शिक्षण यांच्या शिक्षणक्रमाशिवाय कांहीं खेड्यापाड्यांतील शाळा प्रत्येक शरदतूंत आमच्या *शाटाकाप्रमाणें, मोठमोठ्या सार्वजनिक सभा भरवितात. या सभा २।३ ते ७।८ दिवसपर्यंत चालतात आणि खेड्यापाड्यांतील स्त्रीपुरुष या सभांनां हजर राहतात. या सभांत ऐतिहासिक, धार्मिक व वाङ्मयसंबंधी विषयांवर सार्वजनिक व्याख्यानें होतात. संध्याकाळीं गाणें, बजावणें, नाच इत्यादि करमणुकीचे प्रकार होतात.

---

*शाटका या नांवाची शिक्षणसंस्था मिस्टर मिलर आणि बिशप व्हिन्सेंट यांनीं १८७४ सालीं अमेरिकेंत काढिली. प्रथमतः ( १ ) रविवारच्या शाळेंतील शिक्षकांकरितां उन्हाळ्याची शाळा चालविणें, ( २ ) आणि लोकांकरितां प्रवचनें व व्याख्यानें देणें हीं दोन कामें ही संस्था करीत असे. आतां या संस्थेची फार वाढ व भरभराट झाली असून तिच्या अनेक शाखाहि निघालेल्या आहेत. शाळेंत जातां न येणाऱ्या स्त्रीपुरुषांकरितां या संस्थांनीं पुष्कळ सोयीवार शिक्षणक्रम सुरू केले आहेत. अमेरिकेंत या संस्थेचे तीन मोठे परिणाम दिसून आले आहेत. ( १ ) मुख्य संस्थेच्या तत्त्वानुसार तीनशें दुसऱ्या पोटसंस्था स्थापन झाल्या आहेत, ( २ ) ठिकठिकाणीं -विशेषतः अमेरिकन विश्वविद्यालयांत व शिक्षणसंस्थांत उन्हाळ्याचे वर्ग सुरू झाले आहेत, ( ३ ) कॉरेस्पांडेन्स कोर्स ( पत्रव्यवहारानें शिकविणारे शिक्षणक्रम)हि पुष्कळ सुरू झाले आहेत. श्रीमती रमाबाई रानडे यांनीं सुरू केलेलें सेवासदनाचें काम–स्त्रियांपुरतेंच कां होईना, शाटाकाच्या तत्त्वांप्रमाणेंच होय. मॉडर्न रिव्हु. १९१३ आक्टोबरच्या अंकांत ( पान ३८२ ) शाटाकाची थोडीशी हकीकत आलेली आहे. जिज्ञासूंनीं ती वाचावी, अशी आम्ही शिफारस करितों.

पूर्वी दरवर्षी सुगीच्या वेळीं उत्सव होत असत व त्यांत खाणेंपिणें यथेच्छ असून शिक्षणविषयक किंवा उन्नतिकारक असा कांहीं प्रकार नव्हता. खेड्यापाड्यांतील हायस्कुलाच्या देखरेखीखालीं भरणाऱ्या वार्षिक सभांनीं या उत्सवांची जागा भरून काढिली आहे. या वार्षिक सभांना दूरदूरचे लोक येतात. शिवाय हायस्कूलच्या इमारतींत, दिवाणखान्यांत अगर आखाड्यांत दरमहिना सभा भरत असतात. शहरांमध्यें या सभा कधींकधीं 'हायस्कुल होम्स'मध्यें भरत असतात. तरुण पुरुष व स्त्रिया यांच्या संस्थांच्या सभा भरण्याचें स्थान, आणि प्रवासी खेड-वळ लोकांच्या घरासारखें हाटेल ( भोजनगृह ) अशीं दोन्हीं कामें हीं होम्स करतात.

याप्रमाणें, या हायस्कुलाचा परिणाम सर्व देशभर वाढून येत आहे. त्यांनीं शेतकऱ्यांची स्थिति स्पृहणीय केली आहे आणि खेड्यापाड्यांतील साध्या, सुंदर आणि हितावह राहणीचें उदाहरण जगापुढें ठेवण्यास डेनमार्कला मदत केली आहे.

मीं हें जें मनोहर चित्र रेखाटलें आहे, त्यावर शितोडे उडविणाऱ्या कांहीं गोष्टी डेनमार्कच्या खेड्यापाड्यांतील राहणींत आहेत, यांत शंका नाहीं. जुने प्रश्न सोडवितांना नेहमीं नवीन प्रश्न उद्भवतात. कितीहि यश मिळविलें असलें तरी परिस्थितीचें पूर्ण ज्ञान असणाराला आपलें कार्य नुकतेंच सुरू झालें आहे असेंच नेहमीं वाटतें. हें कसेंहि असो, शिक्षणानें काय काय साधणें शक्य आहे याचें अधिक चांगलें उदाहरण, डेनमार्कच्या खेड्यापाड्यांतील शाळांनीं मिळविलेल्या यशाशिवाय इतरत्र कोठें सांपडेल, असें मला वाटत नाहीं.

बौद्धिक शिक्षण व औद्योगिक शिक्षण यांचें सापेक्ष महत्त्व किती आहे, याविषयीं अमेरिकेंत बराच वाद ऐकूं येतो. बौद्धिक शिक्षण

ह्मणजे काय हें मला डेनमार्कला जाण्यापूर्वी चांगलें समजलें नव्हतें. अमेरिकेंत जें कांहीं बौद्धिक शिक्षण मीं पाहिलें होतें, त्यावरून बौद्धिक शिक्षणाची ग्रीक व लॅटिन भाषांशीं नेहमीं सांगड आहे, अशी माझी समजूत होती. बौद्धिक शिक्षणाच्या पुरस्कर्त्यांनांहि पुस्तकांच्या अभ्यासांत, किंवा मनुष्याचा नेहमींचा अनुभव बाजूस ठेवून परदेशच्या प्राचीन वस्तूंचा अभ्यास करण्यांत कांहीं गूढ शक्ति किंवा जादू आहे, असें वाटतें. क्रमिक पुस्तकांचा बिलकूल उपयोग न करणाऱ्या शाळा मीं डेनमार्कांत पाहिल्या; पण तेथें बौद्धिक शिक्षण फारच चांगलें मिळतें, असें मला आढळून आलें.

ज्याला आपण बुद्धिविकासन ह्मणतों, तें कॉलेजांत जाऊन शिकणाऱ्या शेलक्या लोकांपुरतेंच आहे आणि पुष्कळ वर्षांच्या अभ्यासानें समजणाऱ्या गूढ भाषेंत व ह्मणींत तें कोंडून ठेविलेलें आहे, असा माझा समज होता. डेनमार्कमध्यें खरे विद्वान लोक खेड्यांपाड्यांतील साध्या लोकांनां शिकवितांना, कॉलेजांतील ज्ञानांतील पारिभाषिक व गूढ भाग काढून तें सोप्या, व्यवहारांतल्या भाषेंत लोकांनां सांगतांना मला आढळलें.

परदेशाची कोणतीहि भाषा शिकणें, दुसऱ्या लोकांचा इतिहास व आख्यायिका यांचा अभ्यास करणें ह्मणजेच बौद्धिक शिक्षण मिळविणें, अशी माझ्या मनाची समजूत होती. पण, डेनमार्कमध्यें मला अशा तऱ्हेचें शिक्षण आढळलें, कीं, ज्यांचीज्यांची माहिती सुशिक्षित मनुष्याला असणें अगदीं जरूर आहे, अशा प्रत्येक विषयाशीं व देशाशीं जरी त्या शिक्षणाचा संबंध होता, तरी डेनमार्कच्या कला, आख्यायिका, भाषा व इतिहास आणि आपल्या भोंवतालचे लोक यांविषयीं विद्यार्थ्यांच्या मनांत त्या शिक्षणानें आस्था व उत्साह उत्पन्न केला आहे. स्वतः-

विषयीं, आपल्या ज्ञातीविषयीं आणि मानवजातीविषयीं विश्वास, अगत्य व आस्था बौद्धिक शिक्षण उत्पन्न करूं शकतें, असें मला दिसून आलें. बौद्धिक शिक्षणानें विद्यार्थ्यांचें स्वाभाविक स्वातंत्र्य हिरावून घेऊं नये आणि परिचित व जवळच्या वस्तूपेक्षां लांबच्या, परदेशच्या व गूढ वस्तु उच्च व श्रेष्ठ आहेत, असें त्यांनां वाटूं देऊं नये.

कोणत्याहि तऱ्हेच्या शिक्षणाला कोणतें नांव द्यावें, या वादाच्या भरीला मी पडलों नाहीं. उदाहरणार्थ, टस्कगी येथें आह्मीं विद्यार्थ्यांनां देत असलेलें शिक्षण बौद्धिक आहे कीं औद्योगिक आहे, किंवा दोन्ही प्रकारचें आहे, या वादांत मीं केव्हांहि फारसें लक्ष्य घातलें नाहीं. आमच्या ज्ञातीच्या लोकांनां जरूर असलेलें शिक्षण त्यांनां मिळत आहे आणि सांप्रतच्या परिस्थितींत हें शिक्षणाचें काम शक्य तितक्या चांगल्या रीतीनें चालत आहे, एवढीच काळजी मी घेत आहें. डेन-मार्कमध्यें जें कांहीं मी शिकलों त्यावरून मला असें आढळून आलें, कीं, या देशांतील कॉलेजांत सर्व निग्रो लोकांनीं ग्रीक व लॅटिन भाषांविषयीं जें कांहीं शिक्षण मिळवून लोककल्याण साधलें आहे, त्यापेक्षां आपल्याच ज्ञातीच्या लोकांनां मान देण्यास व त्यांची वाहवा करण्यास मुलांमुलींनीं शिकावें ह्मणून निग्रो लोकांनीं आपल्या मुलांमुलींसाठीं गोऱ्या बाहुल्यांच्या ऐवजीं निग्रो बाहुल्याच विकत घ्याव्या, असा डॉ. आर. एच. बॉइड यांचा उपदेश, आपल्या लोकांच्या गाण्यांमध्यें निग्रोला प्रेम वाटावें ह्मणून फिस्क युनिव्हरसिटीचे प्रयत्न, ज्ञातीच्या उन्नतीसाठीं व सार्व-जनिक हितासाठीं निग्रोला उत्साह व आस्था वाटावी ह्मणून टस्कगी येथें वार्षिक निग्रो परिषद् आणि राष्ट्रीय उद्यमसंघ या संस्थांचें चाललेलें काम, या सर्वांच्या योगें त्यांचें अधिक कल्याण झालें आहे आणि हें सर्व खरें शिक्षण होय.

या प्रकारच्या प्रबोधनाचा, बौद्धिक उत्कर्षाचा, मानसिक उन्नतीचा प्रकाश फार दूरवर पसरत असतो; तो पुष्कळ लोकांच्या अंतःकरणांत जाऊन भिडतो. डॅनिश लोकांच्या शाळा पाहून राष्ट्राभिमान व जात्यभिमान जागृत करण्यास व प्रदीप्त ठेवण्यास काय केलें पाहिजे हें तर मी शिकलोंच; पण, माझ्या असेंहि लक्ष्यांत आलें, कीं, कोणत्याहि समाजाचे बाह्य ह्मणजे भौतिक स्थितीचे तंतू व अंतस्थ ह्मणजे मानसिक स्थितीचे तंतू इतक्या सूक्ष्म रीतीनें एकमेकांशीं संलग्न झालेले असतात, कीं, त्यामुळें प्रत्येक मनुष्याच्या ठिकाणीं दुसऱ्या हरएक मनुष्याच्या उत्कर्षाचें प्रतिबिंब प्रकाशित होऊन राष्ट्राचें व ज्ञातीचें जीवित जोमदार व सुखकर बनत जातें.

प्रकरण बारावें.

# निग्रोंच्या शिक्षणांतील चुका आणि त्यांची भावी स्थिति.

[ बिघडतें कोठें हें समजल्याशिवाय सुधारतां येत नाहीं. निग्रोंनां शिक्षण देण्याला सुरुवात होऊन सुमारें पन्नास वर्षे झालीं आहेत; तरी पण निग्रोंमध्यें शिक्षणाचा प्रसार व्हावा तसा अजून झाला नाहीं, असेंच ह्मणावें लागेल. याचें कारण एक तर गोऱ्यांच्या शिक्षणावर ज्या मानानें पैसा खर्च केला जातो आणि गोऱ्यांसाठीं जितक्या धनसाहित्यसंपन्न संस्था आहेत, त्या मानानें पाहतां निग्रोंच्या शिक्षणाची हेळसांडच होत आहे, यांत शंका नाहीं. पण दुसरें कारण असें आहे, कीं, ज्या काळयागोऱ्या लोकांनीं अशा शिक्षणसंस्था चालविल्या आहेत, त्यांपैकीं बऱ्याच जणांनां आपल्या कार्याची यथार्थ कल्पना नाहीं. समाजांत आज निग्रो कोणती कामगिरी बजावीत आहे अथवा बजावूं शकेल, शिकून तयार झाल्यावर कोणत्या कामांत तो सामान्यतः पडतो, याचा विचार करून शिक्षणक्रम ठरविला पाहिजे. जवळपास असणाऱ्या अनेक संस्थांनीं एकच काम हातीं घेऊन परस्परांत निष्कारण चढाओढ न करितां परस्परपोषक अशी कामाची वांटणी करून घेतली पाहिजे. सर्वच काम आमची शाळा करील अशी हांव धरूं नये. ओनामापासून विश्वविद्यालयाच्या सर्व विषयांपर्यंत आह्मीच शिकवूं अथवा एकानें ह्मटल्याप्रमाणें नामकरणापासून अंत्येष्टीपर्यंतचे सर्व संस्कार आह्मीच करूं असा आग्रह धरल्यानें प्राथमिक अडचणीखालींच सर्व शक्ति क्षीण होऊन जाते. शिक्षणसंस्था म्हणजे कांहीं गारोड्याची पोतडी नव्हे, कीं, जींतून ज्याला जो विषय हवा तो एकदम तींतून निघावा. निश्चित ध्येय व मर्यादित कार्यक्षेत्र हें यशसाधनाचें मुख्य अंग आहे. तसेंच शिक्षण हें जीवनाचें साहाय्यक झालें पाहिजे. पुढील आयुष्यक्रमाला नालायक बनविणारें शिक्षण नच घेतलेलें बरें. किंबहुना अशा क्रमाला शिक्षण हें नांव देणेंच मुळीं चूक आहे. गोऱ्या लोकांप्रमाणें कोणताहि विषय शिकणें निग्रोलाहि शक्य आहे, एवढेंच सिद्ध करणें हा कांहीं शिक्षणाचा हेतु नव्हे. तर गोऱ्या लोकांप्रमाणें समाजांतील आपलें नैसर्गिक स्थान पटकावून आपल्या उद्योगानें व पात्रतेनें काळया-

गोऱ्यांच्या उपयोगीं पडून स्वतःला सुस्थिति प्राप्त करून घेतां यावी, हेंच शिक्षणाचें ध्येय असलें पाहिजे; आणि शिक्षणानें हें कार्य होऊं लागलें म्हणजे निग्रो लोकांच्या शिक्षणाप्रीत्यर्थ सुशिक्षित लोक सढळ हातानें पैसा खर्च करतील. मेकॉन परगण्याच्या अलीकडील इतिहासावरून ही गोष्ट वॉशिंग्टननें पूर्णपणें सिद्ध केली आहे. ]

तीस वर्षें झालीं, दक्षिणेंत निग्रोंनां शिक्षण देण्याच्या कामांत मी गुंतलों आहें. या अवधींत माझा पुष्कळ निरनिराळ्या प्रकारच्या नीग्रो शाळांशीं परिचय झालेला आहे. दक्षिणेंतील प्रत्येक भागांतील असल्या या शाळा मीं पाहिल्या आहेत. या शाळा काय करितात, तसेंच त्यांच्या अडचणी काय आहेत व त्यांनां कितपत यश मिळालेलें आहे, हें समजून घेण्याचीहि संधि मला मिळालेली आहे. उदाहरणार्थ, गेल्या पांच वर्षांमध्यें माझ्या कामांतून सवडींत सवड काढून *मी निरनिराळ्या आठ संस्थानांत निरीक्षण करीत बरेच दिवस हिंडलों* आहें आणि तेथील शाळांची स्थिति अवलोकन करून त्यांच्या हितार्थ मला योग्य वाटले ते चार शब्द मी प्रत्येक ठिकाणीं बोललों आहें. याप्रमाणें जिकडे तिकडे नेहमीं व पुनः पुनः फिरत असतां, प्रत्यक्ष शालागृहांत कितपत सुधारणा झाल्या हें तर मला दिसून आलेंच; पण, निरनिराळ्या नमुन्यांच्या निरनिराळ्या शाळांचा त्या त्या ठिकाणच्या कुटुंबांवर व समाजांवर काय काय परिणाम झाले आहेत, हेंहि माझ्या लक्ष्यांत आलें आहे.

मीं वर्णन केलेल्या मार्गानें निग्रोंच्या शिक्षणाच्या बाबतींत ज्या गोष्टी मीं पाहिल्या व जाणिल्या, त्यांचा विचार करतां माझ्या स्वतःच्या व्यापक शिक्षणासंबंधाच्या शेवटच्या आठवणीमध्यें ‘ कार्यसिद्धि कितपत झाली आहे ’ याचाच नव्हे तर सामान्यतः दक्षिणेंतील निग्रोशिक्षणाच्या कार्यांत तूर्त कोणत्या अडचणी आहेत व त्यांच्या भावी

स्थितीचा आज काय अंदाज करतां येण्यासारखा आहे, त्याचा टिप्पणवजा उल्लेख करणें हेंच मला एकंदरींत अधिक इष्ट वाटतें. शिक्षणाच्या कार्यांत जी कांहीं अल्पस्वल्प कामगिरी करण्यास मी समर्थ झालों, ती करीत असतांनाच माझ्या स्वतःच्या व्यापक शिक्षणांतील बराच मोठा भाग मीं संपादिला असल्यामुळें, तो उल्लेख या ठिकाणीं अर्थांत्च अस्थानीं व्हावयाचा नाहीं. मी येथें प्रथमतःच स्पष्ट सांगतों, कीं, आपल्या सभोंवतालची सुधारणा आपलीशी करून घेण्यासाठीं व तींतील सर्व उच्च व श्रेष्ठ गोष्टी काबीज करण्यासाठीं गुलामगिरींतून इतक्या अलीकडे मुक्त झालेल्या लोकांनीं इतके आटोकाट प्रयत्न जगाच्या इतिहासांत यापूर्वीं कधींहि केलेले नाहींत, व अमेरिकेमध्यें निग्रो लोकांनीं जेवढ्या अवधींत जेवढा पल्ला झेंपला आहे, तसा तर इतर कोणाला कधींच गांठतां आलेला नाहीं.

त्याचबरोबर असेंहि नमूद करणें अवश्य आहे, कीं, अमेरिकेंतील गोरे लोक व निग्रो लोक या दोन ज्ञातींत वडून आलें त्याप्रमाणें, एका जातीनें दुसऱ्या जातीला मदत करण्याचा, तिला सुधारून नांवारूपाला आणण्याचा याहून अधिक औदार्याचा यत्न झाल्याचें जगाच्या इतिहासांत एकहि उदाहरण नाहीं. असें मी एवढ्याचसाठीं ह्मणतों, कीं, अमेरिकेंतील गोरा मनुष्य निग्रोला येथें आणून त्याला गुलामगिरींत जखडून ठेवण्याच्या पापाचा जसा धनी झाला होता, तसेंच निग्रोला स्वातंत्र्य देण्याचें व गेल्या अट्ठेचाळीस वर्षांमध्यें त्याची जी पराकाष्ठेची सुधारणा झाली आहे ती त्याला प्राप्त करून देण्याचें पुण्यहि अमेरिकेंतील गोऱ्या मनुष्याकडेच आहे, ही गोष्ट वाचकांनीं नीट लक्ष्यांत ठेवावी.

हें सर्व जरी खरें आहे, तरी मागील कालाच्या दृष्टीनें नव्हे तर पुढील कालास अनुलक्षून निग्रोच्या शिक्षणाची दक्षिणेमध्यें आज जी

स्थिति आहे तिचा विचार केला असतां, ती अर्धकच्ची, अपुरी व असमाधानकारक आहे असेंच माझ्या प्रत्ययाला आलें आहे. निग्रोंच्या शिक्षणाच्या प्रत्यक्ष सोयीसंबंधानें उत्तरेकडे व दक्षिणेमध्येंहि लोकांचा बराच गैरसमज झाला आहे, अशी माझी समजूत आहे.

पहिली गोष्ट अशी, कीं, निग्रोंच्या शिक्षणासंबंधानें जरी आम्ही कितीहि प्रौढी सांगत असलों, तरी उत्तरेकडील संस्थानांत गोऱ्या लोकांनां ज्या अर्थाचें शिक्षण मिळालेलें आहे, त्या अर्थाचें शिक्षण दक्षिणेंतील सामान्य शाळांमध्यें व निग्रो कॉलेजांमध्यें बहुतेक निग्रो लोकांनां कधींच प्राप्त झालेलें नाहीं. सगळा तपशील सांगत न बसतां उच्च प्रतीचें ह्मटलें जाणारें शिक्षण देणाऱ्या दक्षिणेंतील निग्रो शाळांसंबंधानें कांहीं ठळक गोष्टी मात्र मी येथें सांगतों. दक्षिणेमध्यें पंचवीस निग्रो शाळा अशा प्रकारच्या आहेत, कीं, त्यांची सामान्यतः कॉलेजांमध्यें गणना करण्यांत येते. संयुक्त संस्थानांच्या विद्याखात्याचे कमिशनर यांच्या रिपोर्टावरून पाहिलें तर असें दिसून येतें, कीं, त्या सर्वांची मालमत्ता व देणग्या वगैरेंची किंमत ७९,९३,०२८ डॉलर आहे. उत्तरेकडील संस्थानांत उच्च प्रतीच्या शिक्षणाच्या अकरा स्वतंत्र संस्था असून त्यांतील हरएक संस्थेचीच मालमत्ता व देणग्या यांची रक्कम दक्षिणेंतील सर्व कॉलेजांच्या उत्पन्नाएवढी आहे. उदाहरणार्थ, उत्तरेकडील पांच कॉलेजें किंवा विश्वविद्यालयें अशीं आहेत, कीं, त्यांतील प्रत्येकाची मालमत्ता २,००,००,००० डॉलरपेक्षांहि अधिक आहे; आणि तीन विश्वविद्यालयें तर अशीं आहेत, कीं, त्या तिहींच्या मालमत्तेची व देणग्यांची किंमत जवळजवळ १०,००,००,००० डॉलर आहे.

चोवीस मुख्य मुख्य निग्रो कॉलेजांचें मिळून वार्षिक उत्पन्न १०-४८,३१७ डालर आहेत. गोऱ्या लोकांच्या पंधरा शाळा अशा आहेत, कीं, त्यांतील एकेकटीचेंच वार्षिक उत्पन्न दहापासून पन्नास लक्ष डॉलर आहे. फार तर काय, पण १९०९ सालीं उत्तरेकडील एका शिक्षणसंस्थेचें वार्षिक उत्पन्न, शिक्षणखात्याच्या डायरेक्टराच्या रिपोर्टांत समाविष्ट असलेलीं एकंदर एकशेंतेवीस निग्रो कॉलेजें, औद्योगिक शाळा व इतर खासगी संस्था यांच्या एकत्र वार्षिक उत्पन्नाच्या जवळजवळ दुप्पट होतें! या वस्तुस्थितीवरून हें अगदीं स्पष्ट सिद्ध होतें, कीं, उच्च शिक्षणाच्या निग्रो संस्थांची संख्या जरी केवढीहि मोठी असली, तरी संयुक्त संस्थानांतील एकंदर एक कोटि निग्रो लोकांनां जेवढें व जसलें शिक्षण मिळावयास पाहिजे तेवढें व तसलें शिक्षण त्यांनां बिलकूल मिळत नाहीं.

तथापि, विशेष मागसलेल्या अशा कित्येक निग्रोसमाजांची जी स्थिति माझ्या प्रत्यक्ष अवलोकनांत आलेली आहे, तिजसंबंधानेंच तूर्त मी सांगतों. उदाहरणार्थ, खुद्द माझ्याच संस्थानामध्यें कित्येक ठिकाणें अशीं आहेत, कीं, तेथें वर्षांतून केवळ तीनचार महिने शिकविण्याचें काम करण्याकरितां निग्रो शिक्षकांनां दरमहा पंधरापासून सतरा डॉलर-पेक्षां अधिक पगार कधींहि देण्यांत येत नाहीं. 'मॉंटगमरी ॲडव्हरटायझर'मध्यें मीं जें अनावृत पत्र प्रसिद्ध केलें आहे, त्यांत ह्मटल्याप्रमाणें, निग्रो शिक्षकांपेक्षां निग्रो कैद्यांसाठीं अधिक पैसा खर्च होत असतो. पहिल्या वर्गांतील सशक्त निग्रो कैद्यासाठीं प्रत्येकीं सुमारें ४६ डॉलर दरमहा खर्चीं पडतात. दुसऱ्या वर्गासाठीं ३६ व तिसऱ्या वर्गासाठीं २६ डॉलर इतकें असून हा इतका खर्च त्यांनां वर्षांतून बाराहि महिने मिळतो. एवढ्यावरून खेड्यापाड्यांतील कित्येक

निग्रो शाळांच्या स्थितीचें साधारण अनुमान बहुधा कोणालाहि करतां येईल.

या वर्णन केलेल्या स्थितीइतकीच वाईट स्थिति सर्वत्र आहे असा माझ्या लिहिण्याचा अर्थ नाहीं; तथापि 'निग्रो शिक्षणाच्या फळा'-विषयीं बोलतांना आपण इतकें लक्ष्यांत ठेविलें पाहिजे, कीं, सामान्य निग्रो जनतेवर शिक्षणाचा खरा प्रयोगच अद्याप झालेला नाहीं.

प्रस्तुत काळीं निग्रो शिक्षणाच्या अडचणींपैकीं एक अडचण अशी आहे, कीं, निरनिराळ्या निग्रो शाळांच्या शिक्षणाचें ठराविक असें कोणतेंच मान नाहीं. उदाहरणार्थ, एकाद्या संस्थेच्या नांवावरून तींत सामान्य शाळांतील ग्रीक, लॅटिन इत्यादि विषय शिकविले जातात किंवा सुतारकाम, लोहारकाम, शिवणकाम इत्यादि शिक्षण देण्याची तींत व्यवस्था आहे, याचा बोध होणें केवळ अशक्य असतें. इतकेंच नव्हे, तर या शाळांमध्यें शिक्षणपद्धतीचें किंवा शिकविणारांची पात्रता ओळखण्याचेंहि सर्वसंमत असें कोणतेंहि माप नसतें. विद्यार्थ्यांनां या शाळांतून केवळ र, ट, फ करण्यापुरतें, एकादें पुस्तक किंवा वर्तमानपत्रहि धड न वाचतां येण्यासारखें शिक्षण दिलें जातें; किंवा एकाद्या विषयांत त्यांनां फारच चांगलें शिक्षण मिळून दुसऱ्या कोणत्याहि विषयाचा त्यांनां गंधहि नसतो. अशा एकाद्या शाळेंत शिरतांना आपण येथें काय शिकणार, याची कोणत्याहि विद्यार्थ्याला मुळींच कल्पना नसते; व शिक्षणक्रम संपवून शाळेंतून बाहेर पडतांना आपण येथें काय शिकलों याचीहि बहुतेकांनां जाणीव नसते! शिक्षण-क्रम संपल्यावर या शाळांतून त्याला जो डिप्लोमा ( पदवीपत्र ) देण्यांत येत असतो, तो पुष्कळ प्रसंगीं बेगडी दागिन्यापेक्षां अधिक मोलाचा मुळींच नसतो. त्यामुळें आपण मोठें शिक्षण संपादिलेलें आहे,

अशी मात्र त्याची समजूत होते. पण वास्तविक पाहतां बिचाऱ्याला शिक्षण ह्मणजे काय, याचा देखील बोध झालेला नसतो.

या वेळीं, एकदां आमच्याकडे आलेल्या एका तरुणाचें मला स्मरण होत आहे. त्यानें मीं वर वर्णन केलेल्या प्रकारच्या एका लहान कॉलेजांतील शिक्षण संपादन केलेलें होतें. ग्रीक, लॅटिन, जर्मन, ज्योतिष व इतरहि पुष्कळ विषयांचा त्यानें अभ्यास केलेला होता. त्यांतच शॉर्टहँड ( लघुलिपी )हि तो शिकलेला होता. तथापि, ग्रीक व लॅटिन भाषांचा आपणांला उपयोग करतां येत नाहीं, असें त्याला आढळून आलें व जर्मन भाषेचा उपयोग करतां यावा इतकी ती भाषा तर तो मुळीं शिकलाच नव्हता. तेव्हां शार्टहँडच्या कामीं आह्मांकडे आपला कांहीं उपयोग होईल या आशेनें तो आह्मांकडे आला; पण दुर्दैवानें त्या विषयांतहि तो तितकाच कच्चा निघाला. फार तर काय, पण जर्मन भाषेसारखीच त्याच्या इंग्रजी भाषेचीहि अवस्था होती. लघुलिपींत अपयश मिळाल्यावर, त्यानें दुसऱ्या पुष्कळ गोष्टींत आपलें मन घालून पाहिलें. परंतु आपण कॉलेजांतील शिक्षण संपादिलेलें असून आपणाला डिप्लोमा मिळालेला आहे, ही भावना त्याच्या ठिकाणीं प्रबल असल्यामुळें, कोणतीहि एक गोष्ट चांगल्या प्रकारें तडीला नेण्याची चिकाटीच त्याच्यानें कधीं धरवली नाहीं. याचा परिणाम असा झाला, कीं, स्वतःचें किंवा आपल्या आश्रयदात्यांचें समाधान करण्याला असमर्थ होऊन तो असंतुष्ट वृत्तीनें देशांत कोठें तरी भटकत फिरूं लागला.

या तरुण मनुष्याला जरी व्याकरणाच्या किंवा दुसऱ्या कोणत्या तरी प्रकारच्या चुका केल्याशिवाय एकादें सामान्य पत्रहि लिहितां येत नव्हतें, तथापि कांहीं दिवसांपूर्वीं त्याची जेव्हां मला शेवटची बातमी

लागली, त्या वेळीं, धंदे शिकविणाऱ्या शिक्षकाच्या कामावर त्याची नेमणूक झालेली होती. मीं वर्णिलेल्या पद्धतीच्या एका कॉलेजांत धंदेशिक्षणाच्या खात्यांतील तो मुख्य अध्यापक झालेला होता! कोणत्याहि सुव्यवस्थित ऑफिसांत आपल्या लघुलिपीचा जरी त्याला कांहीं उपयोग करतां येत नव्हता, तथापि एका निग्रो कॉलेजांत मात्र औद्योगिक शिक्षणक्रमाची पूर्तता करण्यास आवश्यक इतकें लघुलिपीचें शिक्षण विद्यार्थ्यांनां देण्याला त्याचें लघुलिपीचें ज्ञान पुरेसें आहे, असें मानण्यांत आलें! दुर्दैवेंकरून या नमुन्याचींच कॉलेजें दक्षिणेंत फार आहेत.

आतां, खरें पाहूं जातां त्या तरुण मनुष्याचा दोष काय तो एकच होता; आणि तो दोष ह्मटला ह्मणजे, त्याला मिळालेलें शिक्षण हाच होय. तो मेहनती, महत्त्वाकांक्षी व सर्वतोपरीं इमानी गडी होता आणि त्याजवर सोंपविलेलें काम चांगल्या रीतीनें करतां येईपावेतों त्यालाच चिकटून राहूं शकला असता, तर माझ्या मतें तो खचित मोठा उपयुक्त मनुष्य झाला असता. परंतु, त्याच्या उच्च शिक्षणानें त्याचा नाश झाला! कॉलेजांत असतांना आपणाला शिक्षण मिळत आहे, अशी त्याची समजूत करण्यांत आली होती; पण वास्तविकपणें नांव घेण्यासारखें असें कांहींच शिक्षण त्याच्या पदरांत पडलेलें नव्हतें.

निग्रो शाळांकडून आणखी एक अशी चूक वारंवार होत असते, कीं, त्या कोणत्या तरी प्रकारें सबंध शिक्षणक्रमाची—अगदीं प्राथमिक अवस्थेपासून तों थेट कॉलेजांतील श्रेष्ठ प्रतीच्या ज्ञानदानापर्यंतची—अथवा माझ्या एका मित्रानें एके वेळीं ह्मटल्याप्रमाणें, 'विद्यार्थ्यांनां त्यांच्या पाळण्यापासून तों त्यांच्या थडग्यापर्यंत ओढून नेण्याची तरतूज करण्यांत' मोठें भूषण मानीत असतात. याचा परिणाम असा झाला आहे, कीं, पुष्कळ नीग्रो कॉलेजांनीं प्राथमिक शिक्षणाचें एवढें मोठें

ओझें निष्कारण आपल्या डोक्यावर लादून घेतलें आहे, कीं, त्यामुळें त्यांजकडून कॉलेजाचें खरें काम बहुतेक मुळींच होत नाहीं असें ह्मटलें तरी चालेल. तथापि त्या संस्थांनीं आपलें 'कॉलेज' हें नांव सोडलेलें नाहीं किंवा विद्यार्थीहि आपणाला 'कॉलेज स्टूडन्ट्स'— 'कॉलेजांतील विद्यार्थी' असें ह्मणवून घेण्यास कांहीं कमी करीत नाहींत.

या प्रकारें, बहुतकरून प्रत्येक लहानसहान शाळेनें आपणाला 'कॉलेज' असें नांव धारण करून आपली स्वतःची परिपूर्ण व सविस्तर शिक्षणपद्धति अमलांत आणण्याचा—प्राथमिक शिक्षणापासून तों विश्वविद्यालयामधील सर्व प्रकारच्या शिक्षणाचा समावेश करण्याचा— प्रयत्न केलेला आहे. या शाळांनीं याप्रमाणें आपल्या हातीं अशक्य काम घेतलें असल्यामुळें व विशेषतः त्यांच्यापाशीं द्रव्याची केवढी उणीव असते हें लक्ष्यांत घेतां, त्यांचें काम बहुधा वाईट रीतीनें चालतें यांत अर्थांतच कांहीं नवल नाहीं.

दक्षिणेंतील एका संस्थानांतील जंगली प्रदेशामध्यें अशा प्रकारची एक संस्था आहे. ती पाहण्यास मी एकदां गेलों होतों. एका जुन्या मोडकळीस आलेल्या इमारतींत ही शाळा होती. ती इमारत विद्यार्थी व शिक्षक यांनीं मिळूनच बांधलेली होती. पण, इमारतीच्या एकंदर स्वरूपावरून पाहतां त्यांनां करवत किंवा गुण्या हातांत कसा धरावा, याचीहि धड कल्पना नव्हती, असें दिसून येत होतें.

त्या इमारतींत या टोंकापासून त्या टोंकापर्यंत वारा घोंघावत होता. शाळेच्या कित्येक हितचिंतकांनीं शाळेला नजर केलेल्या बायबलांचे ढीगच्या ढीग त्या इमारतीच्या एका कोंपऱ्यांत जमिनीवरच धूळ खात पडलेले होते. या इमारतींतील विद्यार्थ्यांचें शयनगृह इतकें गैरसोयीचें

होतें, कीं, कांहीं सांगतां सोय नाहीं. अर्धी इमारत जळून गेलेली होती; पण, ती पुनः कधीं कोणीं बांधविलीच नाहीं. मोडक्या खाटा व फाटक्या चटया खोल्यांमध्यें अस्ताव्यस्त कशा तरी लोटून दिलेल्या होत्या. शाळेशीं संबंध असलेल्या प्रत्येक मनुष्याची परिपूर्ण नालायखी सिद्ध करणारी आणखी एक गोष्ट ह्मणजे, पिण्याचें पाणी मिळविण्या-साठीं करण्यांत आलेले निरर्थक प्रयत्न होत. त्या इमारतीच्या आस-पासच्या मैदानांत जिकडे तिकडे खोल व भयंकर असे खड्डेच खड्डे पाडलेले होते. कारण त्या त्या ठिकाणीं निरनिराळ्या वेळीं कोणीं विहिरी खोदण्याची खटपट करून यश न आल्यामुळें तें काम तसेंच सोडून दिलेलें होतें. विहीर खोदण्याचें काम कसें करावयाचें, याची मुळीं यत्किंचितहि कोणाला कल्पना नव्हती.

मी तेथें गेल्या वेळीं शाळेला लागणारें पाणी कांहीं अंतरावरील दलदलीच्या जागेंतून घेऊन येत. या शाळेच्या ऊर्फ कॉलेजाच्या प्रेसिडेंटानें आपण शोधून काढलेली एक भव्य योजना मला अशी सांगितली, कीं, ‘ एक कृत्रिम सरोवर तयार करावयाचें, ह्मणजे त्यांत दुसरा मोठा फायदा हा होईल, कीं, विद्यार्थ्यांनां काम आयतें मिळेल.’

या मनुष्याला, शाळेंतील अभ्यासक्रम काय काय आहे, असें मीं विचारिलें, तेव्हां त्यानें माझ्या हातीं एक सुमारें सव्वा फूट रुंद व दोन फूट लांब असा एक मोठा कागद दिला. हा कागद त्यानें सर्व प्रकारच्या शाळांतील—तत्त्वज्ञानविषयक संस्था, विश्वविद्यालयें व औद्योगिक शाळा यादेखील न वगळतां—अभ्यासविषयांची नक्कल करून घेऊन खच्चून भरून काढलेला होता. या पत्रकावरून असें दिसून येत होतें, कीं, त्या शाळेंत हिब्रू भाषेपासून तों टेलिग्राफीपर्यं-तचे सर्व कांहीं विषय शिकविण्यांत येतील! खरोखरीच या पत्रकांतील

सर्व विषय शिकवावयाचे झाले तर निदान दोनशें शिक्षक त्या शाळेंत असावयास पाहिजे होते. मीं जेव्हां त्याला विचारिलें, कीं, मुलांना ज्या विषयांची विशेष जरूर आहे व जे तुह्मांला चांगल्या प्रकारें शिकवितां येतील तेवढ्याच विषयांच्या मर्यादेंत तुम्ही कां राहत नाहीं? तेव्हां त्यानें मला असें उत्तर दिलें, कीं, 'अहो, तुह्मी ह्मणतां तें खरें; पण माझा अनुभव असा आहे, कीं, कांहीं लोकांनां एक प्रकारचें शिक्षण हवें असतें, तर कांहींनां दुसऱ्याच प्रकारचें हवें असतें. माझ्यासंबंधानें जर ह्मणाल तर मी जरा उदार मनाचा मनुष्य आहें. ज्याला जें पाहिजे त्याला तें देण्याची माझी नेहमीं इच्छा असते. माझ्या विद्यार्थ्यांनां औद्योगिक शिक्षण, धार्मिक शिक्षण किंवा कॉलेज शिक्षण यांपैकीं कोणतेंहि हवें असलें तरी तें देण्याची माझ्याकडे व्यवस्था आहे.'

यावर मी ह्मणालों, 'ही योजना मोठी व्यापक आहे, यांत शंका नाहीं; पण ती तुमच्या हातून तडीस जाणें अगदीं अशक्य आहे.' त्यानें उत्तर दिलें, 'होय, तूर्त अशक्य असेल कदाचित्; परंतु आपलें ध्येय नेहमीं उच्च असावें या मतावर माझा विश्वास आहे.' यांत विशेष दुःखाची गोष्ट ही, कीं, हा मनुष्य व यानें आपल्या भोंवतीं जे लोक जमा केले होते ते असे सारेच जण आपले प्रयत्न पूर्ण कळकळीनें करणारे होते, तरी शिक्षण ह्मणजे काय व तें कशासाठीं पाहिजे, एवढेंच त्यांनां माहीत नव्हतें.

दक्षिणेमध्यें आमच्या शाळा मुख्यत्वेंकरून पांच प्रकारच्या आहेत. (१) सामान्य शाळा. या बहुतेक अंशीं संस्थानच्या पैशावर चालत असतात व त्यांतील पुष्कळांनां निग्रो लोकांकडून वर्गण्यांच्या व देणग्यांच्या रूपानेंहि कांहींशी मदत होत असते; (२) विद्यालयें व

नामधारी कॉलेजें किंवा विश्वविद्यालयें. हीं कांहीं अंशीं निरनिराळ्या निग्रो धार्मिक पंथांच्या मदतीनें व कांहीं अंशीं परोपकारी लोकांच्या व संस्थांच्या मदतीनें चालविण्यांत येतात; ( ३ ) संस्थानचीं नमुनेदार यांत्रिक शिक्षणाचीं कॉलेजें; या कॉलेजांचा खर्च संस्थानाकडून व मध्यवर्ती राष्ट्रीय सरकाराकडून भागशः होत असतो; ( ४ ) वैद्यकीच्या शाळा. या प्रायः कोणत्या तरी प्रकारच्या कॉलेजास जोडूनच असतात. तथापि वास्तविक त्यांचा त्यांच्याशीं कांहीं संबंध नमून त्या थोड्याबहुत स्वतंत्रच असतात; ( ५ ) हाम्पटन व टस्कगी येथील संस्थांच्या नमुन्याच्या औद्योगिक शाळा.

पुष्कळ प्रसंगीं या शाळा एकमेकींच्या अगदीं जवळजवळ असूनहि प्रत्येक शाळा बाकीच्या इतर शाळांचीहि थोडींफार कामें करण्याचा नेहमीं यत्न करीत असते. प्रत्येक शाळा दुसऱ्या प्रत्येक शाळेचें काम करण्याचा यत्न करीत असल्यामुळें, सहकारितेला व जोडीनें मिळून काम करण्याला कोणालाच अवसर मिळत नाहीं. या शाळा सांपत्तिक आश्रयासाठीं व विद्यार्थी मिळविण्यासाठीं परस्परांशीं भांडत असलेल्या व चढाओढ करीत असलेल्याच पुष्कळ वेळां आढळून येतात. कॉलेजें आणि त्यांच्याहून खालच्या दर्जाचीं विद्यालयें हीं सामान्य प्रतीच्या सार्वजनिक शाळांतील विद्यार्थ्यांनां आपल्याकडे ओढून घेत असतात. मध्यवर्ती सरकारची कांहीं मदत घेऊन चालविलेल्या संस्थांच्या शेतकी शाळा, या धार्मिक शिक्षण देणाऱ्या शाळांहून क्वचित्च भिन्न असतात. परस्परांशीं व सरकारी अधिकाऱ्यांशीं सहकारितेनें वागून सार्वजनिक शाळा नांवारूपाला आणाव्या आणि शिक्षणाच्या सर्व संस्थांमध्यें एक प्रकारचें ऐक्य व पद्धतशीर वळण उत्पन्न करावें, तें सोडून या निरनिराळ्या शाळा आपल्या वेळेचा व उत्साहाचा व्यय परस्परांनां कोणत्या

तरी प्रकारें अडविण्याच्या व दुखविण्याच्या कामीं करीत असतात, असेंच पुष्कळ वेळां दिसून येतें.

निरनिराळ्या प्रकारच्या निग्रो शाळांमध्यें सहकारितेची किती उणीव असते, याचा टस्कगी येथेंहि आह्मांला थोडासा अनुभव मिळालेलाच आहे. दक्षिणेंतील कांहीं नांवाजलेल्या कॉलेजांतीलच नव्हे, तर उत्तरेकडील कित्येक उत्कृष्ट कॉलेजांतीलहि बऱ्याचशा पदवीधरांची आह्मीं कांहीं वर्षें शिक्षकांच्या कामावर योजना केलेली आहे. कॉलेजांतील पदवीधरांनां इतर कोणत्याहि ठिकाणापेक्षां टस्कगी येथें नोकरी लागण्याचें एवढें मोठें क्षेत्र असतां दक्षिणेंतील कॉलेजांतून आलेला एकहि पदवीधर मला अद्याप असा आढळला नाहीं, कीं, ज्यानें औद्योगिक शिक्षणाचे उद्देश व इतिकर्तव्य यांविषयीं थोडा तरी अभ्यास किंवा विचार केला आहे ! औद्योगिक शिक्षणाच्या शाळांसाठीं शिक्षक तयार करण्याकडे आपला विशेष कटाक्ष असतो असा टेंभा मिरवूं पाहणाऱ्या कॉलेजांतील पदवीधरांची देखील हीच कथा आहे, हें विसरतां कामा नये.

या कॉलेजांतून आह्मांकडे आलेल्या पदवीधरांनां औद्योगिक शाळांत शिकविण्यास लागणारें ज्ञान नसतें किंवा तशी त्यांची कोणत्याहि प्रकारें तयारी नसते हें तर झालेंच; पण, या औद्योगिक शाळा काय साधण्याच्या प्रयत्नांत असतात, याविषयीं भलत्यासलत्या कल्पना मात्र आपल्या डोक्यांत भरून घेऊन ते पुष्कळदां आमच्याकडे येतात.

कॉलेज सोडल्यावर बरेचसे पदवीधर शहरांतील अगर खेड्यापाड्यांतील शाळांत शिक्षकांच्या कामावर प्रायः जातात. तथापि कॉलेजें व औद्योगिक शाळा यांच्यामध्यें जसा सहकारितेचा अभाव

असतो तसाच कॉलेजें व सार्वजनिक शाळा यांच्यामध्येंहि दिसून येतो. माझा स्वतःचा जेवढा अनुभव आहे, तेवढ्यावरून पाहतां कॉलेजचे विद्यार्थी पदवी मिळाल्यानंतर ज्या शाळांत किंवा समाजांत काम करावयास जातात, त्या शाळांची किंवा समाजांची प्रत्यक्ष स्थिति कोणत्या प्रकारची आहे व त्यांच्या प्रत्यक्ष गरजा काय काय आहेत, याविषयीं सुसंगत विचार करण्याची त्या विद्यार्थ्यांनां कॉलेजांत क्वचित्‌च संधि मिळत असते! शाळेचा बाहेरील जगाशीं संबंध जोडणारे मार्ग आंखून ते विद्यार्थ्यांच्या परिचयाचे करून देण्याचें व अशा रीतीनें शाळेला सकल सुमंगल प्रेरणांचें मध्यवर्ती उगमस्थानच बनवून सोडण्याचें शिक्षण विद्यार्थ्यांनां देण्याऐवजीं 'आपला डिप्लोमा हेंच आपल्या थोरपणाचें पदक व तें ज्याच्याजवळ आहे तो कोणी श्रेष्ठ प्राणी असून त्यानें एकाद्या शाळेंत शिक्षकाचें काम करण्यास राजी होणें ह्मणजे, तो त्याचा 'न भूतो न भविष्यति' असा मोठा स्वार्थत्यागच होय,' अशा प्रकारची कल्पना आपल्या पदवीधरांच्या डोक्यांत भरवून देऊन हीं कॉलेजें त्यांनां खुशाल निघून जाऊं देतात.

दक्षिणेंतील सार्वजनिक शाळांमध्यें निग्रो शिक्षणाची प्रगति होण्याला, माझ्या मतें मुख्य अडचण ही आहे, कीं, ज्या निग्रो कॉलेजांत इतके शिक्षक तयार होऊन बाहेर पडतात, त्या कॉलेजांनीं 'शिक्षणाच्या योगानें गोऱ्या मनुष्याची जी सुधारणा होते तीच काळ्या मनुष्याचीहि होऊं शकते, तसेंच शिक्षणाच्या योगानें त्याच्या श्रमाचा उपयुक्तपणा वाढतो, तो अधिक चांगला नागरिक बनतो व आयुष्यांतील सर्व प्रकारच्या संबंधांमध्यें तो अधिक विश्वासार्ह होतो व ह्मणूनच त्याच्या शिक्षणासाठीं पैसा खर्च करणें बिलकुल नुकसानीचें नाहीं,' अशी दक्षिणेंतील गोऱ्या लोकांची खात्री करून देण्याचें महत्त्व अद्यापि

बिलकुल ओळखलेलें नाहीं. जोंपर्यंत दक्षिणेंतील गोऱ्या लोकांच्या समाजांची त्यांच्या सभोंवार दिसणाऱ्या शिक्षणाच्या परिणामांवरून अशी खात्री होणार नाहीं, कीं, शिक्षणाच्या योगानें निग्रो मनुष्य अधिक चांगला पुरुष बनतो, तोंपर्यंत शिक्षणासाठीं सार्वजनिक शाळांवर अवलंबून राहणारे निग्रो लोकांचे समाज थोड्याबहुत अंशांनीं अज्ञानांतच कुचंबत राहतील, यांत शंका नाहीं.

केवळ वाङ्मयात्मक विषयांस वाहून घेतलेलीं कांहीं विद्यालयें असें ह्मणतात, कीं, जुन्या तऱ्हेच्या पांडित्यप्रचुर शिक्षणालाच चिकटून राहण्याचा आमचा उद्देश असा आहे, कीं, आमच्या विद्यार्थ्यांनां ' ख्रिस्ती प्रतिष्ठित सद्गृहस्थ ' बनवावयाचें. प्रत्येक पुरुषानें व स्त्रीनें ख्रिस्ती व्हावें व साधल्यास शिष्ट प्रतिष्ठित गृहस्थ व गृहिणी व्हावें, हें अर्थातच अगदीं योग्य आहे; व त्यासाठीं ग्रीक व लॅटिन शिकण्याचीच कांहीं जरूरी नाहीं. शिवाय जी शाळा मुलांमुलींनां केवळ शिष्ट प्रतिष्ठित गृहस्थ व गृहिणी मात्र बनविते—त्यावांचून आणखी कांहीं नाहीं—ह्मणजे वकील, डॉक्टर, उदमी, पेढीवाले, सुतार, शेतकरी, शिक्षक किंवा गृहकृत्यांतील हुशार गृहिणी—अशांपैकीं कांहीं न करतां केवळ शिष्ट गृहस्थ व गृहिणी ( ह्मणजे, अंगमेहनतीचीं कोणतींहि कामें न करणारे प्राणी ) मात्र तयार करते, ती शाळा माझ्या मतें आज ना उद्यां, थोडीबहुत कुचकामाचीच ठरावयाची. केवळ गृहस्थांच्या वर्गांत मोडणाऱ्या लोकांनां या देशांत जागा नाहीं व पूर्वींहि कधीं नव्हती आणि बाहेर देशीं जें कांहीं अलीकडे मीं पाहिलें आहे, त्यावरून अनुमान काढूं गेल्यास केवळ गृहस्थांच्या वर्गांतील लोकांनां—ह्मणजे आपल्या देशाची किंवा समाजाची कांहीं तरी निश्चित अशी सेवा कर-

ण्यास नालायक असलेल्या लोकांस—इतर देशांतहि जागा न मिळण्याची वेळ अगदीं जवळ येत चालली आहे.

युद्धाच्या समाप्तीनंतर लगेंच उत्तरेकडील गुलामगिरीच्या विरुद्ध-पक्षाच्या लोकांनीं दक्षिणेमध्यें ज्या प्रथमतःच शाळा स्थापन केल्या, त्या शाळांच्या नमुन्याबरहुकूमच पुढें बहुतेक लहानलहान निग्रो कॉलेजांची उभारणी करण्यांत आली, असें मला आढळून आलें आहे. एकाद्या चांगल्याशा सामान्य शाळांच्या पद्धतीचा (ह्मणजे सर्वसाधारण जनतेस उपयोगीं पडेल अशा शिक्षणपद्धतीचा) पाया अद्याप घालण्यांत आला नसल्यामुळें, त्या वेळीं ग्रीक व लॅटिन शिकविणाऱ्या संस्थाच जिकडे तिकडे फार सुरू झाल्या. येथें हें लक्ष्यांत ठेविलें पाहिजे, कीं, हल्लीं ज्या उद्देशानें शाळा चालविण्यांत येतात किंवा आल्या पाहिजेत, त्याहून त्या वेळीं शाळा सुरू करणारांचा उद्देश फार निराळा होता. गुलामांच्या मुक्ततेसंबंधानें माजलेल्या वादाच्या लांबलचक कालांत जी एक गोष्ट सहसा कबूल केली जात नसे ती—ह्मणजे काळा मनुष्य गोऱ्या मनुष्याइतकाच पुस्तकी ज्ञान मिळविण्याला लायक आहे ही—गोष्ट साऱ्या जगाच्या निदर्शनाला आणून दिल्यावांचून निग्रोच्या आत्मोद्धाराचें कार्य पूर्ण होणार नाहीं, अशी त्यांची त्या वेळीं ठाम समजूत असल्यामुळेंच पुस्तकी ज्ञानावरच त्यांनीं सर्व भर दिलेला होता.

ती गोष्ट आतां पूर्णपणें शाबीत होऊन चुकली आहे, असें ह्मणण्याला कांहीं हरकत नाहीं असें मला वाटतें. यापुढें जें करावयाचें राहिलें आहे तें हें, कीं, शिक्षण कोणत्याहि प्रकारचें असलें तरी त्याच्या साहाय्यानें गोऱ्या मनुष्याइतकाच निग्रो मनुष्यहि समाजांतील अधिक उपयोगी, अधिक मौल्यवान् व्यक्ति होऊं शकतो, हें दाखवून द्यावयाचें.

विशेषत: दक्षिणेंतील गोऱ्या मनुष्याची अशी खात्री करून देणें जरूर आहे, कीं, केवळ निग्रो लोकांचीच नव्हे, तर सबंध दक्षिणेची भरभराट होण्याला व लौकिक वाढण्याला निग्रो लोकांचें शिक्षण ही एक आवश्यक पायरी आहे.

या बाबतींत ही एक गोष्ट लक्ष्यांत ठेवण्यासारखी आहे, कीं, निग्रोशीं पूर्ण मित्रभावानें वागणारे व त्यांनां कांहीं तरी मदत करूं इच्छिणारे असे दक्षिणेंत हजारो गोरे लोक आहेत. पण, शिक्षणानें निग्रोचें प्रत्यक्ष कांहीं तरी हित झालें आहे अशी मात्र त्यांची अद्याप खात्री झालेली नाहीं. शिक्षणाचे सुपरिणाम त्यांचे त्यांनां दिसूं लागल्यावांचून त्यांचीं मनें कधींहि फिरावयाचीं नाहींत.

या दिशेनें विशेषशी प्रगति न होण्याचें कारण असे आहे, कीं, उत्तरेकडील गोऱ्या लोकांनीं दक्षिणेमध्यें स्थापन केलेल्या शाळा—त्यांचा त्यांत कांहीं अन्याय नसतां—अद्याप एका परीनें ‘ परकीय संस्थाच ’ राहिलेल्या आहेत. शिक्षणक्रम ठरवितांना त्यांनीं निग्रोंच्या किंवा दक्षिणेच्या प्रत्यक्ष गरजांचा मुळींच विचार केलेला नाहीं. बरेच वेळां या शाळांत गेल्यानें तरुण पुरुष व स्त्रिया यांची वस्तुस्थिति व समाजाच्या गरजा यांशीं इतकी फारकत झाली आहे, कीं, शाळा सोडल्यानंतर पुन: शेतकीचें किंवा तसलेंच कांहीं उपयुक्त काम करावयास लागून सुखी होण्याला त्यांनां बरींच वर्षें लागतात.

निग्रो कॉलेजांतील विद्यार्थ्यांनां ज्या परिस्थितींत शिक्षण मिळे, तिचा केव्हां केव्हां असा परिणाम होई, कीं, ते विद्यार्थी पुढें नुसते चळवळ करणारे होत व कोणतेंहि उपयुक्त व विधायक काम करण्यास ते बिलकुल खूप व योग्यहि नसत. अर्थात्च अशा स्थितींत

शिक्षकाच्या किंवा दुसऱ्या कोणत्याहि नात्यानें निग्रोंच्या शिक्षणाला दक्षिणेंत लोकाश्रय संपादण्याच्या कामीं त्यांचा फारसा उपयोग कधींच
४ होत नसे. तरी पण, निग्रोंनां जर कांहीं शिक्षण मिळवावयाचें असेल, तर तें त्यांनीं दक्षिणेंतील सार्वजनिक शाळांतच संपादावयास पाहिजे, हें उघड आहे.

पुष्कळ दिवसांपासून माझें असें मत झालें आहे, कीं, दक्षिणेंतील गोऱ्या लोकांचा निग्रो लोकांच्या ज्या समाजांशीं पदोपदीं संबंध येतो, त्या निग्रो समाजांचें शिक्षणाच्या योगानें कांहीं तरी प्रत्यक्ष हित व दृश्य कल्याण झालें आहे, असें जर दाखवितां आलें, तर निग्रो शिक्षणासंबंधानें दक्षिणेंतील प्रत्येक भागीं केवढा तरी मित्रभाव जागृत करतां येणें शक्य आहे, याची निग्रो कॉलेजांच्या चालकांनां अद्याप बरोबर कल्पनाच झालेली नाहीं. गोऱ्या लोकांचा सुशिक्षित निग्रोशीं नव्हे, तर बहुजनसमाजांतील लोकांशीं ह्मणजे शेतकरी, मजूरदार, चाकर अशांशींच नेहमीं संबंध येत असतो, हें आह्मीं विसरतां कामा नये. कांहीं थोड्या लोकांनां जें उच्च शिक्षण मिळालेलें आहे तें जर कोणत्याहि प्रकारें प्रत्यक्ष किंवा पर्यायानें खालील बहुजनसमाजापर्यंत पोंचून त्याला कांहीं साहाय्य करणार नाहीं तर दक्षिणेंत निग्रो शिक्षण लोकप्रिय होण्याचा किंवा तें पुढें चालू ठेवण्यास निरनिराळ्या संस्थानांकडून द्रव्यादिक साहाय्य प्राप्त होण्याचा संभव अगदींच थोडा आहे.

उलटपक्षीं, दक्षिणेंतील गोऱ्या मनुष्याला जसजसें समजूं लागेल, कीं, शिक्षणाच्या योगानें निग्रो मजूरदार शेतांत किंवा दुकानांत अधिक चांगलें काम करतो; गोऱ्या व्यापाऱ्याच्या असें लक्ष्यांत येईल, कीं, शिक्षणामुळें, निग्रो लोकांच्या गरजा वाढतात व त्या भागविण्यासाठीं तो पैसाहि जास्त मिळवतो व त्याचें अधिक चांगलें गिऱ्हाईक बनतो;

तसेंच गोऱ्या लोकांची सामान्यतः अशी खात्री होईल, कीं, निग्रो शिक्षणाच्या योगानें गुन्हे व रोग कमी होतात व निग्रो लोक सर्वतोपरीं अधिक चांगले नागरिकहि बनूं शकतात, तसतसें कर भरणाऱ्या गोऱ्या लोकांनां निग्रो शिक्षणावर खर्च होणारा पैसा निग्रो जातीला खूष करण्यासाठीं टाकावा लागणारा भाकरीचा तुकडा होय असें, अथवा पाण्यांत टाकून दिलेला पैसा असें खचित वाटणार नाहीं.

कांहीं वर्षांपूर्वीं परलोकवासी मि. एच्. एच्. रोजर्स यांच्याशीं मीं अशाच अर्थाचे कांहीं उद्गार काढले होते आणि उभयतांनीं मिळून या गोष्टीचा पुरा अनुभव घेण्यासाठीं एक योजना ठरविली. आमच्या प्रयोगासाठीं दोनतीन परगणे आह्मीं हातीं घ्यावे, तेथें चांगल्या प्रकारच्या शाळा सुरू कराव्या व त्यांचा कसा काय परिणाम होतो तो पहावा, अशी त्या गृहस्थाची सूचना होती.

शाळेच्या इमारती बांधून त्या लगेच लोकांच्या स्वाधीन केल्यापासून कांहीं उपयोग व्हावयाचा नाहीं, असें आह्मां उभयतांचेंहि मत पडलें. पण थोडाबहुत पैसा खर्च करून या परगण्यांतील निग्रो लोकांनां स्वतःच्या पायावर उभें राहण्यास उद्युक्त व उत्तेजित करावयाचें असा आह्मीं निश्चय केला. आमच्या प्रयोगास प्रथम सुरुवात १९०५ च्या पावसाळ्यांत अलाबामा संस्थानांतील मेकान परगण्यांत झाली. हा प्रयोग पुरा होण्याच्या आंतच मि. रोजर्स हे वारले. तथापि ठरविलेल्या मुदतीपर्यंत ह्मणजे १९१० च्या ऑक्टोबरपर्यंत काम चालू ठेवण्याला त्यांच्या कुटुंबांतील मनुष्यांनीं कृपा करून कबूली दिली.

या कामाचा असा परिणाम झाला, कीं, प्रत्येकीं सरासरीनें सातशें डॉलर खर्च करून शेचाळीस नवीन शाळांच्या इमारती बांधण्यांत

आल्या; आणि शाळांच्या वर्षांतून शिकण्याच्या मुदती ज्या तीनचार महिन्यांच्या होत्या त्या आठनऊ महिन्यांवर आल्या. या शिक्षणाबद्दल लोकांनीं सरासरीनें दरसाल छत्तीसशें डॉलर खर्च केले. एकंदरींत पांच वर्षांच्या अवधींत लोकांनीं सुमारें वीस हजार डॉलर जमा केले. याचप्रमाणें पण कमी प्रमाणावर दुसऱ्या चार परगण्यांतहि काम झालें आतां मेकान परगण्यांत आमची एक नमुनेदार सार्वजनिक शाळापद्धति निर्माण झाली असून ती हल्लीं परगण्यांतील विद्याखातें व लोकांच्या देणग्या यांच्या आश्रयानें चालत आहे.

निरनिराळ्या खेड्यापाड्यांतील निग्रो लोकांच्या मदतीनें सर्व परगणाभर ह्या प्रकारच्या नमुनेदार शाळा बांधण्यास जेव्हां आह्मीं सुरुवात केली, तेव्हां या प्रयोगाचे व्यवस्थापक सी. जे. कॅलोवे या गृहस्थांनीं दक्षिणेंतील काळ्या लोकांनीं चालविलेल्या एकंदर वर्तमानपत्रांतून अशा जाहिराती प्रसिद्ध केल्या, कीं, " मेकान परगण्यांत आठ महिने मुदतीच्या शाळांच्या आसपास काळ्या शेतकऱ्यांस लहानमोठ्या जमिनी विकत मिळणें शक्य आहे." फार दिवस गेले नाहींत, तों, नजीकच्या परगण्यांतूनच नव्हे तर जॉर्जिया व त्याच्या शेजारच्या इतर संस्थानांतूनहि निग्रो शेतकरी विचारपूस करूं लागले. बरेचसे शेतकरी—जे जमिनी विकत घेण्यास समर्थ नव्हते, पण ज्यांना एकाद्या चांगल्या शाळेच्या जवळ येऊन रहावयाचें होतें—ते शेतकामें करण्यासाठीं या परगण्यांत हळुहळू येऊन राहूं लागले. दुसऱ्या कित्येकांनीं दक्षिणेंतील निरनिराळ्या भागांत आपली आयती असलेली मालमत्ता विकून टाकून मेकान परगण्यांत जमिनी खरेदी केल्या. मि. कॅलोवेनीं मला असें कळविलें आहे, कीं, गेल्या पांच वर्षांत त्यांनीं स्वतःच सुमारें पन्नास कुटुंबांनां ४९,७४० डॉलर

किमतीच्या मेकान परगण्यांतील जमिनी खरेदी दिल्या. १९१० सालामध्यें त्यांनीं १४५० एकर जमिनी २१,३३५ डॉलरांस विकल्या.

१९१० ची खानेसुमारी होईपर्यंत मेकान परगण्यांत देशांतर करणाऱ्या लोकांचें प्रमाण केवढें मोठें होतें याची आह्मां कोणालाच बरोबर कल्पना नव्हती असें मला वाटतें. त्या खानेसुमारीवरून त्या संस्थानांतील निरनिराळ्या भागांतील शेतकरी लोक आपल्या जागा कसे भराभर सोडून जात आहेत तें दिसून आलें. उदाहरणार्थ, अलाबामांतील कृष्णकटिबंधांतील ( काळ्या पट्टींतील ) बऱ्याचशा परगण्यांची लोकसंख्या वाढण्याच्या ऐवजीं ती गेल्या दहा वर्षांत उलट कमीच झाली आहे, असें खानेसुमारीवरून समजतें. कृष्णकटिबंधांतील परगण्यांत जेथें मोठीं शहरें नाहींत, तेथेंच लोकसंख्या कमी झाली आहे. मेकान परगण्यांतहि मोठीं शहरें नाहींत, पण तो मात्र या गोष्टीला अपवाद आहे; कारण त्याची लोकसंख्या कमी न होतां ती शेंकडा दहानें वाढलेली आहे. माझ्या मतें असा फेरफार होण्याचीं दोन कारणें आहेत. पहिलें असें, कीं, मेकान परगण्यांत निग्रो लोकांकडून फार थोडे गुन्हे होतात व दंगेधोपे तर मुळींच होत नाहींत. येथें मद्यपान-निषेधक कायदा अमलांत आला असून गुन्हेगारीचें निर्मूलन करण्याच्या कामीं अधिकाऱ्यांशीं सहकारितेनें न वागणारे असे निग्रो लोक मेकान परगण्यांत फारच विरळा आहेत.

दुसरें कारण असें, कीं, मेकान परगण्यांत मीं वर्णन केलेल्या शाळांचा भरणा झालेला आहे; इतकेंच नव्हे, तर त्यांतील शिक्षक आपल्या विद्यार्थ्यांनां निरनिराळ्या बाबतींत अशी कांहीं माहिती सांगतात व असें कांहीं शिकवितात, कीं, त्यामुळें त्या विद्यार्थ्यांनां व त्यांच्या मातापितरांनां आपलीं घरें, गुरेंढोरें व जमिनी सुधारण्याला

व इतरहि अनेक प्रकारें आपली किफायत करून घेण्याला बरीचशी मदत होते.

खानेसुमारीवरून सिद्ध झालेल्या गोष्टी जेव्हां अलाबामामध्यें प्रसिद्ध झाल्या तेव्हां मोठमोठ्या मळेवाल्यांमध्यें व सामान्यतः सर्व वर्तमानपत्रांमध्यें तो एक मोठा चर्चेचाच विषय होऊन बसला होता. ही चर्चा चालली असतांना मीं वर निर्दिष्ट केलेल्याच गोष्टी 'माऊंटगामरी ॲडव्हरटायझर'मध्यें लोकांपुढें त्यांच्या विचारासाठीं मीं मांडल्या होत्या.

माझ्या पत्राची समालोचना करतांना त्या पत्राचा संपादक लिहितोः—

"अलाबामा संस्थान शिक्षणाप्रीत्यर्थ मोठमोठ्या रकमा बऱ्याच सढळ हातानें खर्च करीत आहे आणि उभयतां गोऱ्या व काळ्या मुलांचें हित व्हावें हें येथील शिक्षणपद्धतीचें एक प्रधान अंग आहे. पैशाचा योग्य विनिमय व सदुपयोग करण्याच्या कामीं पुष्कळ अडचणी आहेत, हें खरें; त्या कालांतरानें व कायद्याच्या साहाय्यानें दुरुस्त होतील. वाशिंग्टन यांच्या पत्रांत नमूद केलेली तक्रार निरनिराळ्या परगण्यांतील इन्स्पेक्टरांकडून सहज दूर होण्याजोगी आहे. अशा तक्रारींचीं कारणें त्वरित दूर करणें हें त्यांचें कर्तव्यच आहे. निग्रो आईबाप आपल्या मुलांच्या शिक्षणाबद्दल केवढें अगत्य बाळगतात, हें आतां स्पष्ट दिसून आलें आहे; आणि त्यांनां जें पाहिजे तें जर त्यांनां त्यांच्या हल्लींच्या ठिकाणीं मिळणार नाहीं, तर जेथें तें मिळत असेल तेथें ते शक्य तितक्या लवकर निघून जातील. या विषयावरील बुकर टी. वॉशिंग्टन यांच्या पत्रांचा विद्याधिकाऱ्यांनीं व अलाबामांतील सर्व नागरिकांनीं काळजीपूर्वक विचार करावा अशी आह्मी शिफारस करतों."

मेकान परगण्यांत केलेल्या प्रयोगाची खरी किंमत तेथें राहणाऱ्या सव्वीस हजार काळ्यागोऱ्या लोकांचें प्रत्यक्ष कल्याण किती झालें, या

गोष्टींत तादृश्य नसून एका कृषिप्रधान प्रदेशांत पद्धतशीर निग्रो शिक्षणाच्या योगानें जातिविषयक प्रश्न सुटण्याला केवढी मदत होऊं शकते, या गोष्टीचें प्रत्यंतर होण्यांत आहे.

मेकान परगण्यांत जातिविषयक प्रश्न आतां राहिलेला नाहीं. येथील जाति परस्परांशीं खऱ्या प्रेमभावानें वागत आहेत. शेतकी सुधारत आहे आणि परगण्याची संपत्ति वाढत्या प्रमाणावर आहे. तेथील शेरीफबरोबर परवां बोलण्याचा योग आला असतां त्यांनीं मला असें सांगितलें:—' या परगण्यांत गुन्हे इतके थोडे होतात, कीं, त्यामुळें आपणाला अंगभर कामच मिळत नाहीं. ' आणखी एक गोष्ट निखालस निर्भयपणानें सांगतां येईल, कीं, निग्रोंनां शिक्षण देणें ही परिणामीं आपल्याच फायद्याची गोष्ट आहे, अशी येथील गोऱ्या लोकांची पूर्ण खात्री झालेली आहे.

मेकान परगण्यासंबंधानें जी गोष्ट सत्य ठरली, तीच दक्षिणेंतील इतर परगण्यांसंबंधानेंहि सत्य ठरली पाहिजे, असें माझें मत आहे. ज्या शाळा मुख्यत्वेंकरून शिक्षक तयार करण्यांत गुंतल्या आहेत, त्यांनीं त्यांचें जेथें वास्तविक काम आहे—तेथें ह्मणजे खालीं दक्षिणेकडे—जर आपला मोर्चा वळविला तर ही गोष्ट सिद्धीस नेण्याचें बरेंचसें काम त्यांजकडून खचित होईल. माझ्या स्वतःच्या अनुभवावरून माझी अशी खात्री झालेली आहे, कीं, कोणत्याहि चांगल्या कामासाठीं पैसा मिळविण्याचा अत्यंत सोपा मार्ग म्हटला म्हणजे तें चांगलें काम करण्यास तुह्मी तयार आहां व समर्थ आहां, असें आधीं तुह्मीं दाखवून दिलें पाहिजे. पुष्कळ अडचणी असतां व बाहेरची बहुतेक मुळींच मदत न घेतां आज सर्वोत्कृष्ट ठरलेल्या निग्रो वैद्यकीय कॉलेजांनीं संपादिलेलें यश, हें याचेंच अत्युत्तम उदाहरण होय. हीं कॉलेजें जरी

पुष्कळ अंशीं विद्यार्थ्यांकडून मिळणाऱ्या फीच्या पैशावरच अवलंबून आहेत, तरी ज्या प्रकारच्या सेवेची समाजाला खरोखर जरूर होती त्याच प्रकारची सेवा करण्याला त्या कॉलेजांनीं आपल्या विद्यार्थ्यांनां तयार केलें, आणि ह्मणूनच त्यांनां शेवटीं यश आलें.

मेकान परगण्याच्या बाहेरहि त्याच प्रकारचे प्रयत्न यशस्वी होतील, असा जो मला भरंवसा वाटतो, त्याचें कारण असें, कीं. हाम्पटनच्या बाबतींत व इतर ज्या शाळा बहुतेक त्याच धर्तीवर काम करीत आहेत त्यांच्या बाबतींतहि त्या प्रकारचे प्रयत्न तितकेच फलप्रद झालेले आहेत. दक्षिणेंतील निरनिराळ्या संस्थानांमध्यें, मीं ज्या वेळोवेळीं शिक्षणविषयक सफरी केल्या, त्या प्रसंगीं मी करीत असलेल्या कामाबद्दल चांगल्या वर्गांतील गोऱ्या लोकांनीं दाखविलेलें विलक्षण अगत्य पाहून मी नेहमीं चकित व सद्गदित होऊन जात असें. या सफरींमध्यें, हरएक ठिकाणीं काळ्या लोकांकडूनच नव्हे, तर गोऱ्या लोकांकडूनहि माझें अंतःकरणपूर्वक किंबहुना उत्साहपूर्वकहि स्वागत होत असे.

उदाहरणार्थ, १९१० च्या नवंबर महिन्यांत नॉर्थ कॅरोलिनामधून फिरत असतां, शाळांची व जातिमूलक संबंधांची सुधारणा करण्याच्या बाबतींत मीं ज्या कांहीं सूचना केल्या, त्यांसंबंधानें दैनिक पत्रांनीं वारंवार चर्चा करून प्रांजलपणें आपली अनुकूलता प्रगट केली, इतकेंच नाहीं तर मी परत आल्यावर त्या संस्थानाच्या निरनिराळ्या भागांतील ज्या ज्या थोर गोऱ्या लोकांनीं माझें जें कांहीं बोलणें होतें तें सर्व ऐकून घेतलें होतें, त्यांजकडून मला किती तरी सम्मतीदर्शक व अभिनंदनपर पत्रें आलीं.

थोड्या दिवसांपूर्वीं निग्रो लोकांच्या शिक्षणाबद्दल सतत कळकळ बाळगणाऱ्या एका गृहस्थानें मला असें विचारिलें, कीं, पन्नास वर्षांच्या

स्वातंत्र्यानंतर आज निग्रोला कोणत्या गोष्टीची सर्वांत जास्त जरूरी आहे? मीं लगेंच त्यास उत्तर दिलें, कीं, पन्नास वर्षांपूर्वीं त्याला ज्या गोष्टीची जरूरी होती तिचीच आजहि आहे—अर्थात् शिक्षणाची. माझें ह्मणणें जास्त स्पष्ट करावयाचें जर मीं मनांत आणिलें असतें, तर मीं आणखी असेंहि सांगितलें असतें, कीं, निग्रो शिक्षणाला आज जी जरूरी आहे ती अधिक शाळांची किंवा भिन्न प्रकारच्या शाळांची तादृश नसून केवळ शिक्षणविषयक धोरणाची व शाळांच्या संघटित पद्धतीचीच होय.

मीं सांगितलेली शाळापद्धति रचून तिला व्यवस्थित रूप देण्याचें काम अखेरीस शिक्षक तयार करणाऱ्या औद्योगिक नॉर्मल (नमुनेदार) शाळा व कॉलिजें यांजवरच पडणार आहे; कारण, शिक्षकांच्या यशापयशावरच शाळेचें यशापयश अवलंबून असतें. मीं दाखविलेल्या दिशेनें आरंभ करावयाचा असेल, तर यापुढें निरनिराळ्या शाळांनीं व कॉलिजांनीं पूर्वीपेक्षां फारच थोडा वेळ निग्रोला कोणत्या प्रकारचें शिक्षण द्यावें याबद्दल भांडण्यांत खर्च केला पाहिजे, आणि त्याच्या पदरांत कोणतें तरी शिक्षण घालण्यांतच अधिक लक्ष्य व अधिक वेळ त्यांनीं खर्च केला पाहिजे.

ही गोष्ट साध्य करण्यासाठीं या शाळांनां हल्लींपेक्षां फारच मोठ्या रकमांची जरूरी लागणार आहे. तथापि, मला असा भरंवसा आहे कीं, जर या निरनिराळ्या शाळा ती गोष्ट यथायोग्य रीतीनें उत्तरेकडील व दक्षिणेंतीलहि लोकांसमोर मांडतील, तर प्रत्येक मार्गानें त्यांनां बऱ्याच मोठ्या रकमा मिळणें अगदीं शक्य आहे. माझी अशी खात्री आहे, कीं, दक्षिणेंतील संस्थानी सरकार यापुढें पूर्वीपेक्षां निग्रोंच्या सार्वजनिक शाळांनां पैशाचा योग्य वांटा अधिक सढळपणानें देण्याकडे लक्ष्य पुर-

वील. येथें असेंहि ह्मटल्यावांचून माझ्यानें राहवत नाहीं, कीं, निग्रो लोक पैसे देण्याला किती कबूल व किती समर्थ असतात व हल्लींहि ते आपल्या शिक्षणासाठीं किती पैसा खर्च करीत आहेत—हें फारच थोड्यांनीं ओळखलेलें आहे. ज्या शिक्षणानें लोक असंतुष्ट व दुःखी होतात, आणि आपल्या पायावर उभें राहण्याचें धैर्य किंवा वासनाच जें शिक्षण उत्पन्न करूं शकत नाहीं, तें शिक्षण देण्याच्याऐवजीं, ज्या प्रकारच्या शिक्षणानें लोकांनां आपलें उत्पन्न वाढवितां येईल अशा प्रकारचें शिक्षण देण्यास समर्थ असे शिक्षक जर आमच्या वरिष्ठ दर्जांच्या व नमुनेदार शाळा तयार करतील, तर दक्षिणेंतील शिक्षणपद्धति उभारण्याच्या कामीं लागणारा पैसा जमा करण्यास त्या शाळांनीं निग्रो लोकांनां फारच मोठें साहाय्य केल्याप्रमाणें होईल.

कितीहि चुका व गैरसमज झालेले असले तरी निग्रो लोकांनीं आपली बौद्धिक उन्नति करून घेऊन आपल्या गरजांनां अनुरूप असें शिक्षण शोधून काढण्याच्या कष्टमय झटापटींत, शिक्षण ह्मणजे काय आहे व काय असावें, याची पूर्वींपेक्षां अधिक व्यापक व अधिक उदार कल्पना जगाला अर्पण करण्याचें श्रेय संपादिलें आहे, असा माझा पूर्ण भरंवसा आहे.

गुलामगिरींतून नुकतेच मुक्त झालेल्या लोकांनां कोणतें शिक्षण द्यावें, असा प्रश्न उपस्थित होण्याच्या पूर्वीं जेवढ्या गोष्टी शाळेंत शिकवितां येणें शक्य व योग्य समजल्या जात असत, त्यांहून किती तरी अधिक व भिन्न गोष्टी, निग्रोला जें अत्यंत तांतडीनें पाहिजे होतें, तें त्यास प्राप्त करून देण्यासाठीं कराव्या लागल्या आहेत. निग्रो शाळेनें पुरुष व स्त्रिया यांची त्यांच्या घरांत व नित्याच्या व्यवसायांत शिक्षणाबरोबर सांगड घालून देण्याची कामगिरी बजाविली आहे.

शिक्षणाची—विशेषतः औद्योगिक शाळांमधील शिक्षणाची जी पद्धति हल्लीं चालविली जात आहे, तिचें महत्व निग्रो लोकांपुरतें किंवा अमेरिकेपुरतेंच आहे,असें नाहीं. यूरोप, आफ्रिका, आशिया किंवा इतरत्रहि जेथें लोकांचे मोठमोठे समाज पहिल्याप्रथमच श्रेष्ठ प्रकारच्या सुधारणेच्या सहवासांत व सान्निध्यांत येत आहेत, तेथें तेथें निग्रो शाळांनीं दक्षिणेंत प्रचारांत आणिलेल्या औद्योगिक शिक्षणाच्या पद्धतीच हळुहळू मान्यता व महत्त्व संपादूं लागल्या आहेत.

माझ्या मतें ही एकच गोष्ट निग्रोंला मागील कालाबद्दल—तो कितीहि अल्प असला तरी—अभिमान बाळगण्यास पुरेशी आहे; इतकेंच नव्हे, तर पुढील कालाबद्दलहि ती आशाजनक आहे.

समाप्त.

श्रीबलभीम प्रसन्न.

# The New Aryan School of Health & Physical Culture.

## आर्यांची आयुरारोग्यवर्धक नूतन व्यायामपद्धति.

'शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम्.'

*'The only real wealth is Health.'*

**उद्देशः**—मोठमोठीं वजनें उचलणें, मोठे वजनदार दगड छातीवर घेणें, मोटार थांबविणें, सांखळी तोडणें इत्यादि अचाट शक्तीचीं कामें करून दाखविण्याचा आणि लोकांनां चकवून सोडण्याचा या नूतन आर्य व्यायामपद्धतीचा उद्देश नाहीं; तर सर्व लोकांचें आरोग्य चांगलें रहावें, विशेषतः तरुण पिढीची शक्ति वाढून तिच्या अंगीं नवीन जोम यावा आणि ती सदृढ, समर्थ व कर्तृत्ववान् अशी व्हावी, असा हिचा उद्देश आहे.

**फलः**—इतर अस्वाभाविक व्यायामपद्धतींपासून अंगीं जडलेले दोष व विकार या पद्धतीनें नाहींसे होतात आणि शरीरप्रकृति फार चांगली राहते.

**कोणाला करितां येते?**—स्त्रीपुरुष, आबालवृद्ध, इत्यादि सर्वांनां ही व्यायामपद्धति करितां येते.

**स्थळः**—तालिमखाने, आखाडे इत्यादिकांची या व्यायामपद्धतीला जरूरी नाहीं.

**उपकरणेंः**—जोडी, डंबेल्स वगैरे कोणत्याहि उपकरणांची या पद्धतीला जरूरी नाहीं.

**वेळः**—वेळेचाहि निर्बंध नाहीं.

अशी ही निर्दोष, सर्वानुकूल व सर्वांगसुंदर व्यायामपद्धति पुष्कळ वर्षांच्या अनुभवानें आणि फार परिश्रमानें आह्मीं तयार केलेली आहे आणि तिचे प्रयोग लोकांनां सवडीनुसार दाखविण्याचें कामहि सुरू झालें आहे.

**पोशिंदे**:—ही व्यायामपद्धति शिकविण्यासाठीं संस्था काढणें, निरनिराळ्या ठिकाणीं तिच्या शाखा स्थापन करणें, या व्यायामपध्दतीचीं सचित्र पुस्तकें छापून प्रसिद्ध करणें, तसेंच आरोग्यविषयक ग्रंथसंग्रहालय (Physical Culture Library) सुरू करणें इत्यादि कामासाठीं आह्मांला द्रव्यसाहाय्याची फार जरूरी आहे. यासाठीं जे कोणी सद्गृहस्थ शंभर किंवा त्याहून अधिक रकमेची देणगी देतील त्यांना पोशिंदे ( पेट्रन्स ) असें मानण्यांत येईल. आणि त्यांनां ही व्यायामपद्धति त्यांचे घरीं त्यांचे सोयीप्रमाणें शिकविण्यांत येईल.

तूर्त या नूतन व्यायामपद्धतीचे प्रयोग लोकांनां मोफत दाखविण्याचें ठरविलेलें आहे. वाटखर्च व रोजखर्च याची व्यवस्था केल्यास बाहेरगांवच्या कोणत्याहि लोकांनां हे प्रयोग दाखविण्याची व्यवस्था केली जाईल.

विशेष माहितीसाठीं समक्ष भेटावें अगर खालीं दिलेल्या पत्यावर लिहावें.

बेळगांव,
१०-१२-१५.

**नागेश वासुदेव गुणाजी,**
बी. ए., एल् एल्. बी.

या नूतन व्यायामपद्धतीविषयीं लोक काय ह्मणतात ?

Dr. V. H. Kelkar, L. M. & S. Belgaum, spoke to a crowded audience in the Shivanand Theatre, Belgaum, on 21st February 1915, at the first demonstration as follows:-

" The subject matter of to-day's demonstration is very important. Mr. Gunaji is going to give you a demonstration of a system of exercises which will enable you to maintain a high standard of health and save you many a doctor's bills. What is health and what is disease? Whatever leads to activity, thought and joy is health. Whatever leads to sloth, stupidity and suffering is disease. Absence of pain during normal functioning is health. Pain is disease. Viewed from this index of health most of us will be found to be unhealthy.

Situated as we are in this world amidst the strife of existence, almost all of us are leading lives contrary to the dictates of nature. We drink and eat things which

we should not. We assume postures injurious to the proper functioning of the body. Some functions we overdo and some are underdone by us. It is the aim of this New System of exercises to remedy this and give you a body at once supple, elastic and strong.

They say **health is wealth.** I go a step further and say **health is happiness, Health is life.**

Action is better than idleness. Most of us follow sedentary lives. What is the result ? There is an accumulation of waste, which some proper form of exercises alone would help us in removing. Allowed to accumulate, it leads to all sorts of diseases from an ordinary cold to an attack of paralysis. It is the aim of this new system of exercises, to liberate and remove this accumulated waste far more efficiently than any other system of exercises.

This system of exercises puts into action almost every muscle of the body, not too violently but in a steady manner. It causes increase of strength and endurance in the muscles themselves and augments the respiratory power. It makes the heart stronger, circulation more active, improves digestion and increases the power of the mind. Stiff joints are made moveable and the whole body is made elastic and supple. It thus causes a sensation of well being both bodily and mental, increases the resistance of the body to both microbic and climatic influences and thus preserves health and prolongs life.

This system of exercises consists of movements, passive, active, against resistence and movements hrythmic. This system gives you exercises which will change a torpid liver into an active one, exercises which will prevent sea-sickness, exercises to improve the digestion, exercises for weak heart, exercises against increasing the respiratory power, exercises against protruding belly, exercises to flush out the brain with fresh blood, exercises to remove constipation etc.

These exercises may not give you the strengh of the giant, but they give you what is infinitely better, health, suppleness and a clear brain.

The characteristics of these exercises are:—

I. They are very simple.
II. They are not violent.
III. They bring into play all the muscles of the body.
IV. They require no apparatus.
V. They are self-regulating.
VI. Therefore there is no danger of over-exercise.
VII. They stretch and extend. They do not flex and contract.
VIII. There is a gradation of exercises.
IX. As they are stretching movements, they remove contractions and stiffness, aid in removing waste.
X. They cause no fatigue.
XI. They are useful to persons in all walks of life and at all ages.

Dr. Y. G. Nadgir, M. S. ( Master of Surgery ) Professor of Anatomy and Second Surgeon, Grant Medical College, Bombay, writes as follows;—

" I have much pleasure in stating that Mr. N. V. Gunaji was good enough to give a demonstration of his system of physical culture to the members of the Karnatak Sabha in March last. Mr. Gunaji is an ardent physical culturist and has devoted much time and energy to this subject.

The system is a valuable one and its beneficial effects are apparent within a short time. Its special feature is the care bestowed on the digestive and respiratory systems, which are the key to health, but which are neglected in some forms of physical exercises. Another advantage of the system is the absense of any apparatus or appliances. The exercises can be practised at any place and at any time convenient to the individual.

On the whole I can confidently recommend Mr. Gunaji's system to our young men, who really need a healthy course of physical exercises. ( 31-5-1915. )

T. V. Kalsulkar, Esquire B. A., L. L. B. Ist. Class Sub Judge Dharwar writes on 10–8–15 as follows:—

" I appreciate your exercises very much. "

रा. कृष्णाजी बल्लाळ देवल, रिटायर्ड हुजुर डेपुटी कलेक्टर हे सांगलीहून ता. १३।९।१५ च्या पत्रांत लिहितातः—

" अलीकडेस खर्चाच्या तालिमी, पाश्चिमात्य पद्धतीप्रमाणें देऊन मुलांनां व्यायाम व खेळ शिकविण्याच्या ज्या रीति–त्याजपेक्षां आपण आह्मांस धारवाड मुक्कामीं ज्या व्यायामाच्या पद्धती दाखविल्यात, त्या आपल्या परंपरागत असून बिनखर्चाच्या आहेत; शिवाय सर्व वयाच्या मनुष्यांनां होण्यासारख्या आहेत, अशी माझी पक्की खात्री झाली आहे, व त्याप्रमाणें मीहि १२ पद्धतींप्रमाणें व्यायाम करीत आहें. "

रा. त्र्यंबक लक्ष्मण केतकर हे ता. १८।९।१५ रोजीं लिहितातः–

" आपण करून दाखविलेला प्राणायाम गायनास फारच उपयोगी असें आढळून आलें. मीं सहज एके दिवशीं आपण केल्याप्रमाणें प्राणायाम–चांगल्या रीतीनें जरी नाहीं तरी–साधारणपणें केला आणि नंतर माझ्या गायनास बसलों व पहातों तों माझ्या फुटलेल्या आवाजांत जी खर होती ती–तेवढ्या वेळेपुरती –नाहींशी झाली. "

Mr. V. B. Joshi, Principal Training College, Dharwar, writes in his letter dated 9th September 1915 as follows:-

" As regards the New Aryan System of Health and Physical Culture of which you were kind enough to give a demonstration before the students of the College the other day, I am of opinion that the various physical exercises without apparatus devised by you for the development of each and every part of the body are well calculated to attain their object and as they deserve to be practised by every one wishing to have health and proper bodily development. I wish you could bring out your work on the subject with suitable photographs as

soon as possible. You will, I am sure, be doing real service in the cause of the physical education of the youth of the country by publishing your book."

Miss F. L. McAfee, Lady Superintendent, Training College for Women, Dharwar, writes on 13th September 1915 as follows.

"Mr. N. V. Gunaji showed the students of this College some of his physical exercises. Many of these exercises are very good indeed, and Mr. Gunaji seems to have practised them a great deal.

**Latest Invention ! Unique Design !**

# LOOK HERE!

Scientific Appliances are the keynote of prosperity. Neglect the kitchen and the whole race dwindles. Women are wanted in the higher walks of life,—for educating the children, for inspiring the men, and for nursing the old and the sick.


## THE ANNAPURNA COOKER

lays the foundation on which a beautiful and majestic womanhood can be built. Listen ! What it will achieve for you ! To be brief,—it saves your fuel charges, dispenses with servants, preserves the nutritive value of foods, ensures healthy stomachs, cheerful tempers and a love of labour.

This Cooker is guaranteed to give satisfaction. Do not mistake it for the forlorn types which adorn the lumber room very often ! Order one today. You will confer a blessing on your ladies. You will give them a clean, loyal, frugal, and never-failing servant, who needs no scolding nor guidance.

Who will not pay ten times its value for this combination of advantages ? Yet the **Annapurna Cooker** is a marvel of cheapness.

ANNAPURNA COOKER CO.,
Visram Mansions,
Sandhurst Road, BOMBAY.



No. 5.

# अन्नपूर्णा कुकर.

# THE ANNAPURNA COOKER.

## फोटोंत दाखविलेलें सामान.

*Index to the parts shown in the Photograph.*

1st Vessel—for Dal. १.—पहिलें भांडें डाळीचें.
2nd „ —for Vegetable. २.—दुसरें भांडें भाजीचें.
3rd „ —for Rice. ३.—तिसरें भांडें भाताचें.
4th „ —Cover. ४.—( आच्छादन ) वरील झांकण.
D. „ —Vegetable dish and baffle plate to be placed in the 2nd vessel.
डी—(D) दुसऱ्या भाड्यांतलें भाजीचें ताट.
S.—Charcoal Stove.
एस—(S) कोळशाची शेगडी.
M.—One pav Measure glass (20 tolas)
एम्—(M) पावशेराचें ( २० तोळ्याचें ) माप.

नूतन शोध ! अजब युक्ति !

# इकडे लक्ष्य द्या !

शास्त्रीय उपकरणें हीं राष्ट्राच्या भरभराटीचीं मुख्य अंग होत. अन्नपूर्णेची (स्वयंपाकगृहाची) हेळसांड कराल तर सबंध कुलाच्या नाशाला सुरुवात झालीच ह्मणून समजा ! मुलाबाळांना शिक्षण देऊन वाढविणें, पुरुषांना स्फूर्ति व उत्तेजन देणें, वृद्ध व आजारी यांची शुश्रूषा करणें इत्यादि आयुष्यांतील अधिक महत्त्वाचीं कामें करण्याला स्त्रियांची अवश्यकता आहे.

## अन्नपूर्णा कुकर

हा असा कांहीं पाया घालतो कीं, त्यावर सुंदर व उदात्त अशी स्त्रीत्वाची उभारणी करतां येते. नीट लक्ष्य द्या, तो तुमच्याकरिता कायकाय करील तें पहा ! अगदीं थोडक्यांत सांगावयाचें ह्मणजे, तो तुमच्या सर्पणाचा खर्च कमी करील, चाकरांची गरज भागवील, अन्नाची पौष्टिकता ( सत्त्व ) कायम राखील, उदर सशक्त व निरोगी करील आणि आनंदी स्वभाव व श्रमावर ( उद्योगावर ) प्रेम यांची जोड करून देईल.

हा कुकर खात्रीनें तुमच्या मनाचें समाधान करील. अडगळीच्या खोलींत माती खात पडलेल्या इतर जुन्या नमुन्याच्या कुकरशीं याचा संबंध जोडून घोटाळूं नका ! आजच एक मागवून पहा. गृहीणींना उत्तम देणगी दिल्याचें श्रेय तुह्मांला मिळेल. तुह्मीं त्यांना एक स्वच्छ, आज्ञाधारक, मितव्ययी, कधींहि दगा न देणारा आणि रागें भरून न घेणारा, तत्पर आणि दक्ष असा नोकर दिल्यासारखें होईल.

या सर्व गोष्टींचा—फायद्यांच्या मालिकेचा विचार करितां, दसपट किंमत देण्याला कोण राजी होणार नाहीं ? तरी पण हा कुकर अत्यंत स्वस्त आहे !

**अन्नपूर्णा कुकर कंपनी,**
**विश्राम मॅनशन्स, सॅन्डहर्स्ट रोड,**
**गिरगांव-मुंबई.**



The Manoranjan Press, Bombay.

REFBK-0061271

THE MANORANJAN PRESS,
BOMBAY.

तरी प्रकारें अडविण्याच्या व दुखविण्याच्या कामीं करीत असतात, असेंच पुष्कळ वेळां दिसून येतें.

निरनिराळ्या प्रकारच्या निग्रो शाळांमध्यें सहकारितेची किती उणीव असते, याचा टस्कगी येथेंहि आह्मांला थोडासा अनुभव मिळालेलाच आहे. दक्षिणेंतील कांहीं नांवाजलेल्या कॉलेजांतीलच नव्हे, तर उत्तरेकडील कित्येक उत्कृष्ट कॉलेजांतीलहि बऱ्याचशा पदवीधरांची आह्मीं कांहीं वर्षें शिक्षकांच्या कामावर योजना केलेली आहे. कॉलेजांतील पदवीधरांनां इतर कोणत्याहि ठिकाणापेक्षां टस्कगी येथें नोकरी लागण्याचें एवढें मोठें क्षेत्र असतां दक्षिणेंतील कॉलेजांतून आलेला एकहि पदवीधर मला अद्याप असा आढळला नाहीं, कीं, ज्यानें औद्योगिक शिक्षणाचे उद्देश व इतिकर्तव्य यांविषयीं थोडा तरी अभ्यास किंवा विचार केला आहे! औद्योगिक शिक्षणाच्या शाळांसाठीं शिक्षक तयार करण्याकडे आपला विशेष कटाक्ष असतो असा टेंभा मिरवूं पाहणाऱ्या कॉलेजांतील पदवीधरांची देखील हीच कथा आहे, हें विसरतां कामा नये.

या कॉलेजांतून आह्मांकडे आलेल्या पदवीधरांनां औद्योगिक शाळांत शिकविण्यास लागणारें ज्ञान नसतें किंवा तशी त्यांची कोणत्याहि प्रकारें तयारी नसते हें तर झालेंच; पण, या औद्योगिक शाळा काय साधण्याच्या प्रयत्नांत असतात, याविषयीं भलत्यासलत्या कल्पना मात्र आपल्या डोक्यांत भरून घेऊन ते पुष्कळदां आमच्याकडे येतात.

कॉलेज सोडल्यावर बरेचसे पदवीधर शहरांतील अगर खेड्यापाड्यांतील शाळांत शिक्षकांच्या कामावर प्रायः जातात. तथापि कॉलेजें व औद्योगिक शाळा यांच्यामध्यें जसा सहकारितेचा अभाव

असतो तसाच कॉलेजें व सार्वजनिक शाळा यांच्यामध्येंहि दिसून येतो. माझा स्वतःचा जेवढा अनुभव आहे, तेवढ्यावरून पाहतां कॉलेजचे विद्यार्थी पदवी मिळाल्यानंतर ज्या शाळांत किंवा समाजांत काम करावयास जातात, त्या शाळांची किंवा समाजांची प्रत्यक्ष स्थिति कोणत्या प्रकारची आहे व त्यांच्या प्रत्यक्ष गरजा काय काय आहेत, याविषयीं सुसंगत विचार करण्याची त्या विद्यार्थ्यांनां कॉलेजांत क्वचित्च संधि मिळत असते! शाळेच्या बाहेरील जगाशीं संबंध जोडणारे मार्ग आंखून ते विद्यार्थ्यांच्या परिचयाचे करून देण्याचें व अशा रीतीनें शाळेला सकल सुमंगल प्रेरणांचें मध्यवर्ती उगमस्थानच बनवून सोडण्याचें शिक्षण विद्यार्थ्यांनां देण्याऐवजीं 'आपला डिप्लोमा हेंच आपल्या थोरपणाचें पदक व तें ज्याच्याजवळ आहे तो कोणी श्रेष्ठ प्राणी असून त्यानें एकाद्या शाळेंत शिक्षकाचें काम करण्यास राजी होणें ह्मणजे, तो त्याचा 'न भूतो न भविष्यति' असा मोठा स्वार्थत्यागच होय,' अशा प्रकारची कल्पना आपल्या पदवीधरांच्या डोक्यांत भरवून देऊन हीं कॉलेजें त्यांनां खुशाल निघून जाऊं देतात.

दक्षिणेंतील सार्वजनिक शाळांमध्यें निग्रो शिक्षणाची प्रगति होण्याला, माझ्या मतें मुख्य अडचण ही आहे, कीं, ज्या निग्रो कॉलेजांत इतके शिक्षक तयार होऊन बाहेर पडतात, त्या कॉलेजांनीं 'शिक्षणाच्या योगानें गोऱ्या मनुष्याची जी सुधारणा होते तीच काळ्या मनुष्याचीहि होऊं शकते, तसेंच शिक्षणाच्या योगानें त्याच्या श्रमाचा उपयुक्तपणा वाढतो, तो अधिक चांगला नागरिक बनतो व आयुष्यांतील सर्व प्रकारच्या संबंधांमध्यें तो अधिक विश्वासार्ह होतो व ह्मणूनच त्याच्या शिक्षणासाठीं पैसा खर्च करणें बिलकुल नुकसानीचें नाहीं,' अशी दक्षिणेंतील गोऱ्या लोकांची खात्री करून देण्याचें महत्त्व अद्यापि